म. ग्रं. सं. ठाणे
विषय
लेखक
मन


४८

— सीता —

सीताराम बा. गुर्जर

— १८८९ —

[illegible]. २८९

अं-२८

श्री

# सीता.

सीताराम बाबाजी गुर्जर

ह्यांनीं लिहिली

ती

मुंबईत

"भारती" छापखान्यांत छापिली.

शके १८११. सन १८८९

किंमत २ रुपये.

( सर्व हक्क राखिले आहेत. )

श्रीमंत राजमान्य राजश्री

# संपतराव ऊर्फ रावसाहेब गायकवाड

यांस,

यांचे ठायीं—विद्याभिरुचि, रसिकता, विद्योत्तेजनानंद,

विद्वज्जनसमागमेच्छा, उदारान्तःकरण,

स्वभाषावृद्ध्यैकबुद्धि, आत्मसंमान,

इत्याद्यनेक अनुकरणीय गुण पाहून

पुस्तककर्त्यानें

ही कृति

त्यांच्या कृपानुमोदनानें

संमानपुरःसर, प्रेमबुद्धीनें व सान्तःकरण

समर्पण केली आहे.

# प्रस्तावना.

श्रीमती जनककन्या व रामभार्या सीतादेवी ह्या जगद्विख्यात साध्वीचें परम पवित्र चरित्र आणखी अशा रीतीनें लोकांपुढें आलें असतां तें सदभिरुचीस पात्र होईल, असें मनांत आणून हा अल्प यत्न केला आहे. हा सफल झाला असतां अशा प्रकारें महाराष्ट्रबंधुवर्गाची सेवा करण्यास विशेष आनंद वाटेल.

# सीता.

## उच्छ्वास पहिला.

ह्या विस्तीर्ण भरतखंडांतील आपल्या ह्या महाराष्ट्र देशांत जेथें मोठ-मोठाले डोंगर, घराएवढाले दगड, अनेक दऱ्या, खिंडी, खोरीं, विशाल गुहा, डोळे फिरण्यासारखे उंच कडे, अफाट रानें, सपाट मैदानें, रसवंदीसारखी स्वतःसिद्ध कोसांचे कोस ओसाड दगडी जमीन, खा-ा, दुसऱ्या लहान लहान नद्या, समुद्रगर्जना, अनेक वृक्ष, पशुपक्षी, रोग्यकारक हवा, स्वच्छ व मधुर उदक, इत्यादि अप्रातिम व विपु-नैसार्गिक वैभव असल्यामुळेंच काय ज्याच्या संरक्षणार्थ पूर्वेच्या बा-नें भक्कम सह्याद्रिरूप तट असून पश्चिमदिग्भागीं मोठा खोल खंदक-असा महासागर आहे! सर्वांशीं दुसऱ्यावर विश्वास ठेवणें योग्य हीं, असें मनांत आणूनच काय उत्तरेस सृष्टिकर्त्यानें नदीरूपानें पल्या प्रियपत्नी सावित्रीची योजना केली आहे! दक्षिणादिशेसही अ-च एका सागरकन्यकेची स्थापना केली आहे! आणि जेथील हें सु-वैभव अत्यंत सुरक्षित रहावें ह्मणूनच काय जिची आकृतीही पेटी-रखी अरुंद बनविली आहे! आणि ज्यां स्थळीं हें अनश्वर नैसार्गिक पुल वैभव असल्यामुळेंच जणूं मनुष्यमात्र ज्या वैभवाचा लोभ करितें ा नाशवन्त वैभवास जेथें क्षणभरही थारा मिळत नाहीं! अशा द-ण कोंकण भूमीमध्यें धूतपापेश्वरनामक शंकराचें रहाण्याचें, जणूं इह-कींचा कैलासच असें, एक स्थान आहे. त्याच्या उजवे अंगास बा-रूपानें आलेली अन्य भागीरथीच अशी एक नदी वहाते. अशा यस्थळीं कैलासनाथानें मोठ्या प्रेमानें आपणास आणिलें ह्मणूनच ती ा गर्जना करीत आहे असें भासतें. हें स्थान इतकें कांहीं रमणीय हे कीं, हिमालयास आपल्या प्रियजामात्यास देण्यास सर्व पृथ्वी धुं-ळितां ह्याशिवाय दुसरें कोठेंही आढळलें नाहीं! हें धूतपापेश्वरालय र विस्तीर्ण असून दुःखिताच्यही अंतःकरणास प्रसन्न करणारें आहे.

ह्या देवालयांतील गर्भागार प्रशस्त व विस्तीर्ण असून तेथें भक्तजन सदो-दित शंकराच्या पूजेंत निमग्न असतात. जेथें नंदिकेश्वर आहे तो देवाळयाचा भागही बराच विस्तृत आहे. त्याच्या पुढें मोठा सुशोभित सभामंडप आहे. पुढें कांहीं अंतरावर नगारखाना असून तेथें नियमित वेळीं चौघडा झडत असतो. देवालयाचे सभोंवतीं दगडी तट असून त्यांत धर्मशाळा आहेत. त्यांत कधीं कधीं प्रपंचास कंटाळून कोणी साधु झालेले लोक दृष्टीस पडतात. कधीं कधीं हें जगत् केवळ मिथ्या व दुःखमय मानून कोणी वीतरागी होत्साते भिक्षावृत्तीनें राहून सदा अक्षय्य परमेश्वरसेवेंत काळ घालविणारे अशांचें दर्शन होतें. कधीं वैदिक, कधीं पुराणिक, कधीं हरिदास, कधीं गोसावी असे लोकही त्यांत उतरलेले दिसतात. रामेश्वरादि दक्षिणेकडील यात्रा करावयास जाणारे व तिकडून येणारे यात्रिक, बैरागी वगैरे ह्या स्थळीं पुष्कळ येतात. त्यांनीं व दुसऱ्या अनेक लोकांनीं ह्या रम्य व अत्यंत पवित्र अशा स्थानाची स्तुति केलेली ऐकण्यांत येते. हें स्वयंभु स्थान आहे असें तेथील लोक सांगतात, व ह्या लिंगाचा द्वादश ज्योतिर्लिंगांच्यापेक्षांही अधिक महिमा आहे ह्मणून कथन करून त्याच्या पुष्टीकरणार्थ ते अनेक दंतकथाही सांगतात.

हें देवालय ज्या गांवीं आहे त्यासही पूर्वीं धूतपापेश्वरच ह्मणत; परंतु ह्या नांवाचा अपभ्रंश होऊन त्यास सांप्रत धोपेश्वर असें ह्मणतात. हें सर्व खेडें फार काळापासून देवाच्या नांवें इनाम आहे. गांव फार डोंगराळ आहे. लोकवसति डोंगरावरच घरें बांधून आहे. एका डोंगराच्या पायथ्याशीं थोडी सारखी जमीन करून हें पूर्वाभिमुख देवालय साधलें आहे. येथें सर्व डोंगर जसे काय पाझरत असतात, इतकें सांगितल्यावर ह्या गांवीं पाण्याची विपुलता असते, व तेथें वास करणाऱ्या भगवान् गंगाधराची ही दया अशी भासते, हें आणखी निराळें सांगणें नकोच. गांवाच्या मध्यें एक नदी असून तिच्या दोन्ही बाजूंस थोडी वसति आहे, ती मुख्यत्वेंकरून ब्राह्मण, गुरव व शूद्र ह्यांची असून जिकडे तिकडे पाटाचें पाणी, फणस, आंबे, रामफळी, शिताफळी व पानवेलींनीं वेष्टिलेल्या पोफळी वगैरे फार आहेत. एका सुपारीच्या झाडापासून दुसरें जवळचें झाड निदान एक वीत तरी खालीं किंवा वर

असतें. ह्यावरून तेथील जमीन किती सारखी आहे ह्याचें अनुमान केल्यास तें चुकणार नाहीं! पुढील देवद्वारापासून राजापूर शहरीं जाणारी एक कोश लांबीची फार वर्षांची पण नवीन प्रमाणें दिसणारी दगडांची रुंद सडक आहे. तिच्या दोन्ही बाजूंस जांबळीचे उंच वृक्ष आहेत. ते त्र्यंबकराजाचे सैन्यांतील शिपाईच रांगेनें समांतरावर उभे आहेत असें भासतें! हे पर्जन्याचे दिवसांत फळांनीं फारच नम्र होतात. व मार्गावरील पाण्यांत तीं अत्यंत पक्क फळें पडलीं ह्मणजे जिकडे तिकडे जांभळाच जांभळा रंग होऊन जातो. असो.

असें सांगतात कीं सुमारें सव्वीस सत्तावीस वर्षांपूर्वीं म्हणजे, राज्यभ्रष्ट झालेला, ब्रह्मकर्मांतच कायतें पुण्य आहे असें मानून सदा जपजाप्य व तिलतर्पण यांत गुंतलेला व जो प्रत्येक महाराष्ट्रव्यक्तीच्या निंदेस पात्र असा ब्रह्मावर्त्तनिवासी शेवटचा बाजीराव ह्याचा दत्तक पुत्र नानासाहेब ह्यानें ह्या देशांत प्रचंड बंड उद्भवून सर्व देश जेव्हां भयानें थरथर कांपूं लागला होता, व सध्यांचे राज्यकर्त्तेंही अगदीं चिंताग्रस्त होऊन ह्याच्या परिणामाविषयीं साशंक होऊन बसले होते व अनेक कल्पनांत निमग्न होते, अशा ह्या ऐतिहासिक गोष्टीनंतर सुमारें दोन एक वर्षांनीं,वर सांगितलेल्या देवालयांत ऐन पर्जन्याच्या दिवसांत आषाढमासांत कृष्णपक्षीं, एके दिवशीं संध्याकाळीं कोणी पांच पुरुष आले. त्यांतील प्रमुख मनुष्य मोठा रूपवान् दिसत असून अगदीं तरुण ह्मणजे तिशीच्या आंत बाहेर दिसत होता. त्याचा अंगवर्ण पिंवळा धमक असून चेहेरा अत्यंत मनोहर व सतेज होता. त्याचे इतर अवयवही सुबक होते. तो फार उंच नव्हता, तरी त्याची गणना उंचांत करण्यासारखी होती. तो फार कृश नव्हता व ह्मणण्यासारखा लठ्ठही नव्हता. त्याचा पोषाग ह्मटला ह्मणजे डोकीला एक भगवें बारीक वस्त्र गुंडाळलेलें असून तें त्याच्या गांभीर्ययुक्त मुद्रेस फारच शोभा देत होतें. गळ्यापासून पायांच्या नखांपर्यंत त्याच रंगाचें एक सैल उत्तरीय होतें. हात मोकळेच होते. आंत कौपीन असून एका हातांत लाल कमंडलु व दुसऱ्या हातांत भगव्या वेष्टनांत गुंडाळलेली एक लहानशी पोथी होती. पायांत खडावा असून नाभीपर्यंत भक्कम रुद्राक्षांची माळ रुळत होती. ह्या रूपाला व वयाला तो भगवा वेष पहातांच

त्यावेळीं असें सहज मनांत यावें कीं हा खरोखर तो नानासाहेब पेशव्या-च्या तडाक्यांतून सुटून सर्वसंगपरित्याग करून ह्या वृत्तीनें आतां ईश्वरा-स प्रसन्न करून पुढील जन्मीं तरी आपली इष्टकार्यसिद्धि व्हावी ह्मं-णून आपल्या ह्या चार अत्यंत विश्वासू सेवकांसह तीर्थयात्रा करीत हिं-डत आहे! ह्या चौघांचाही असाच वेष असून ह्यांच्यापाशीं पोथ्यांचीं बरींच मोठीं ओझीं होतीं! शिवाय निर्वाहापुरतीं आणखी थोडीं भगवीं वस्त्रें होतीं. ह्यांचीं वयेंही पंचेचाळीसांचे आंतबाहेर होतीं. ह्यां-तील प्रमुख त्या वेळीं मुखांतून "नारायण"ह्या पवित्र नामावांचून कांहींच उच्चार करीत नव्हता. पण एवढ्या सप्तमात्रात्मक शब्दावरून हा मधुर सप्त सूरच काढीत आहे असें संगीतशास्त्रज्ञांस वाटे! नंतर थोड्याच वेळानें असें कळून आलें कीं ब्रह्मावर ह्मणजे वेदान्तिक विषयावर हा आपल्या मित्रांशीं अस्खलित संभाषण करितो.

जिच्या कोशांत शब्दरत्नें विपुल, जिच्या भांडारांत हजारों अलं-कार पडले आहेत, जी सुवर्णमयी असून जिची पवित्रता सीतादिसतींपे-क्षां बलवत्तर आहे, जी आपल्या कविपुत्रांना हवें तसें पोषण देणारी, जिचा स्वर फारच मंजुळ, जी वयानें मात्र पृथ्वीसारखी वृद्ध असून जिचें सौन्दर्य व तारुण्य एकाद्या गन्धर्वकन्येप्रमाणें सतत सारखें रा-हणारें, आर्यमातेपासून जिची उत्पत्ति, जिच्या गुणांची बरोबरी कोणत्याही काळीं कोणीही करूं शकणार नाहीं. जिच्या शरीराचा एकादा अवयव दृष्टीस पडतांच अन्यदेशीय लोकसुद्धां कामुक होऊन जातात! हजारों परकीय विधर्मी राजांनीं आजपर्यंत जिच्या मातेचा उपभोग घेऊन मत्सरबुद्धीनें जिच्या अपार ग्रंथरूपसंपत्तीस आग्नि लावून दिला तरी जिच्या उरलेल्या जीर्ण व अल्पवैभवापुढें पृथ्वींतील अन्य देशांतील नूतन वैभवही निस्तेज दिसत आहे, अशा गीर्वाणभाषासुंदरीनें त्या यतिवरास ती अक्षमाळा घातली आहे असें भासे! इतर यतिवर्गही विद्येंत कमी नव्हता. परंतु पांच बोटें सारखीं नसतात, ह्या दृष्टांता-नें ते एकमेकांपेक्षां अधिक उणे विद्वान् होते असें ह्मणतां येईल, पण ते सदाचरणांत मात्र अगदीं एकसारखे होते. हे सर्व ह्या ठिकाणीं दोन मास तरी रहावें अशा आशयानें आले होते. ते येथें नियमित भिक्षा-न्नानें उदरनिर्वाह करीत.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळचें नित्यकर्म संपल्यानंतर तो यतिश्रेष्ठ प्राकृत भाषेंतच त्यांच्या बरोबर वेदान्तावर भाषण करूं लागला. कांहीं दिवसांनीं पुष्कळ लोक तेथें श्रवणास बसूं लागले. परंतु बहुतेकांना विद्येच्या अभावामुळें त्यांतील एक अक्षरही समजेना! पण अशा सारख्या पुण्यमूर्तींच्या मुखांतील ब्रह्मविद्याविषयक शब्द कानीं पडणें ह्यांतच मोठें पुण्य आहे, असें मानून बहुतेक लोक मोठ्या श्रद्धेनें व भक्तिपुरःसर दररोज तेथें बसत. थोड्या दिवसांतच त्या यतिवर्गाची कीर्ति लांब पसरून ऐन पावसांतून त्यांच्या दर्शनास दूर दूर ठिकाणांहून लोक त्या स्थळीं येऊं लागले. त्याच्या वाणीच्या अप्रतिम माधुर्यामुळेंच पुष्कळ श्रोत्यांची गर्दी होऊं लागली. पुष्कळांनीं अनेक प्रसंगीं त्यांस पूर्वाश्रमींचा त्यांचा वृत्तांत कळण्याविषयीं इच्छा दर्शविली, परंतु ती त्यांपासून पूर्ण झाली नाहीं. मात्र त्या यतिवराचें त्या आश्रमांतील त्यास शोभणारें भास्करानंद नांव आहे असें समजलें. असे थोडे दिवस गेल्यावर त्या यतिराजाच्या मनांत आलें कीं, मी जें कांहीं यथें बोलतों तें ऐकावयास हे लोक मोठ्या भक्तिभावानें येतात खरे, परंतु हा गूढ विषय ह्यांस समजत नसेल. तर जेणेंकरून ह्या सर्वांचें मनोरंजन होईल, ज्याच्या श्रवणानें ह्यांची बुद्धि सन्मार्गाकडे वळून ती धर्मपरायण होईल, अशा पुराणग्रंथांतील प्रथमतः ह्यांस कांहीं कथा सांगणें हेंच योग्य आहे. त्याप्रमाणें त्यानें सांगण्यास आरंभ केला. त्यावरून संस्कृत महाकाव्यें, उत्कृष्ट नाटकें, कादंबऱ्या, चंपू, सुभाषितें, साहित्य इत्यादिकाचा त्यास चांगलाच परिचय असून भागवतभारतरामायणादिकग्रंथ त्याला आरशासारखे पुढें दिसत होते असें वाटे. व तो मोठा व्यवहारज्ञ असून राजकीय कामांतही मोठा दक्ष असावा असें तेव्हांच कळून आलें. श्रावणमासांत शेवटच्या सोमवारीं सकाळीं सुमारें पांच सहा घटिका दिवसास—पूर्वी निश्चित केल्याप्रमाणें—त्या देवालयांत श्रोतृसमाज जमला. सभामंडपाचे शेवटीं शंकराभिमुख एक मोठें उंच आसन त्यांस बसण्याकारितां मांडून तयार केलेलें होतें. त्याच्या जवळ डाव्या बाजूस इतर सन्यासी बसले असून आणखीही कित्येक वैरागी, साधु वगैरे यात्रेकरू बसले होते. त्यांच्या पुढें शास्त्री, हरिदास, सेवेकरी, भिक्षुक वगैरे मंडळी बसली होती. उजव्या बाजूस कांहीं गृह-

स्थ, सावकार, कामदार बसले असून अनेक जातींचे लोक एकत्र बसले होते. पलीकडे बऱ्याच अंतरावर स्त्रिया मोठ्या दाटीनें बसलेल्या होत्या, त्यास्थळीं बराच गलबला चालला होता ! हे सर्व लोक यतिमहाराज आपल्या आसनावर कधीं येत आहेत ह्मणून अगदीं उत्सुक होऊन गेले होते. इतक्यांत ते आले. त्याबरोबर सर्व लोक उठले व ते बसतांच सर्व श्रोतेही बसले. नंतर त्या कथासागरानें नमनपूर्वक पुढील कथा सांगण्यास आरंभ केला.

" श्रोते हो ! मी जी तुह्मास आतां कथा सांगणार आहे ती आजकालची नव्हे; ती फार जुनी आहे; इतकी जुनी कीं, ही कधीं घडून आली हें पुढें लोकांस स्पष्ट समजावें ह्मणून त्या काळच्या दूरदर्शी लोकांनीं जरी कांहीं स्पष्ट लेख लिहून ठेविले असतील, तरी आजपर्यंत लक्षावधि वाईटचऱ्या वस्तूंचा जसा ह्या अनिवार्य काळानें चुराडा करून त्यांचा मागमूसही कोठें नाहींसा करून टाकिला आहे, त्याप्रमाणेंच ह्या लेखांचीही गति झाली असावी ! असें असतांही जीं कांहीं आपणास सध्यां अंधक अंधक प्रमाणें मिळतात, त्यांवरून ही गोष्ट आपण अगदीं जवळ जवळ आणूं लागलों असतांही सुमारें नऊ लक्ष वर्षे लांब रहाते ! ह्मणजे मी तुह्मांस नऊ लक्ष वर्षांपूर्वीची कथा सांगणार आहे ! पहा, आपण आपल्या लहानशा गांवाहून पांच पंचविस वर्षें कोठें बाहेर प्रवासास गेलों व त्या पूर्वस्थळीं पुनः आलों, तर त्या ठिकाणीं आपण कितीतरी फेरफार झालेले पाहतों ! लहान लहान नाले मोठे रुंद होतात. जेथें ते नसतात तेथें उत्पन्न झालेले दिसतात. कित्येकांचे प्रवाह वळलेले दृष्टीस पडतात. जेथें कांहीं नसतें तेथें उंच झाडें पाहतों. झाडें असलेलीं ठिकाणें ओसाड दिसतात. गवतासाठीं राखून ठेवलेल्या जमिनी उत्तम शेतानें गार दिसतात व शेतांच्या जमिनी खडकाळ झालेल्या दिसतात. पहिले रस्ते बुजून दुसरे नवेच होतात. त्याप्रमाणेंच लहान मुलगे व मुली भर तारुण्यांत असून त्यावेळचे तरुण, जे काळाच्या सपाट्यांतून चुकले ते शुभ्रकेशधारी होऊन बसतात. चाळशीवाले अगदीं जरठ होऊन मृत्यूच्या भक्ष्यस्थानीं पडण्यास तयार झालेले असतात! कित्येक यमसदनास जाऊन त्यांचे ठिकाणीं नवीन गोजिरवाणीं मुलें पुष्कळ दृष्टीस पडतात.

कांहीं घरें जमनिदोस्त होऊन त्या जागा भयाचीं स्थानें होऊन जातात. कित्येक ओसाड स्थळीं नवीन घरें होतात. ह्याप्रमाणें जर अल्पकाळांत ल्हानशा स्थळीं अनेक कारणांनीं अनेक लहान मोठे घडामोडीचे प्रकार घडून येतात, तर मी ज्या काळांतील तुह्मांस कथा सांगणार आहें, त्या काळापासून आजपर्यंत जगांत केवढें स्थित्यंतर झालें असेल बरें ? ह्याचा तुह्मीच विचार करा. ह्या एवढ्या काळांत अनेक प्रजापालनदक्ष अशा उत्तम राजांच्या राजसत्तेंत अनक कला उत्तमावस्थेंत आल्या असून त्यांपासून देशांत अनेक लाभ झाले असतील व ते सर्व केव्हांच जुलमी व रणप्रिय राजांच्या राज्यांत लयास गेले असतील ! कांहीं कला कांहीं काळपर्यंत भरभराटींत असून मध्यंतरींच त्यांचा नाश होऊन पुनः त्या उदयास आल्या असतील ! किती चमत्कारिक विद्या ठार बुडाल्या असतील ! किती दुसऱ्या उत्पन्न झाल्या असतील ! हजारों ग्रंथांचा नाश झाला असेल ! नष्ट झालेलीं अनेक शास्त्रें पुढें नवीन ह्मणून उदय पावावयाचीं असतील ! पूर्वींच्या असंभाव्य वाटणाऱ्या गोष्टी पुढें शास्त्रतः खऱ्या म्हणून ठरावयाच्या असतील ! धरणीकंप मोठमोठीं वादळें, झंजावात, अतिवृष्टि, अनावृष्टि, ज्वालामुखी पर्वतांचे पेट, ह्यांच्या अनेक आवृत्तींनीं आजमितीपर्यंत पुढें कधीं भरून न येणारा असा काय थोडा नाश झाला असेल ? ह्या एवढ्या काळांत जगांत किती तरी मनुष्यसंख्या वाढली असेल ! हजारों राजधान्या उद्ध्वस्त झाल्या असतील! त्या वेळेस जेथें किर्र अफाट रानें होतीं तीं आतां मनुष्यांनीं गजबजून गेलेलीं असतील ! कदाचित् भरभराटींचीं शहरें ओसाड रानें झालीं असतील ! त्या काळीं पूर्वीं नव्हत्या अशा कांहीं नद्या पर्वतादिकांपासून निघून लीन होऊन आतां समुद्रास मिळाल्या असतील ! किती सरोवरें नवीन झालीं असतील व किती गुप्त झालीं असतील! असे हजारों उलटसुलट अतर्क्य प्रकार घडून आले असतील! कित्येक पर्वत, नद्या सरोवरें, ग्राम, नगरें, प्रदेश, ह्यांचीं पूर्वींचीं नांवें मर्यादा वगैरे बदलून काळाच्या अति दीर्घपणामुळें आज आपण त्यांचीं निराळींच नांवें घेत असूं ! समुद्राच्या कांहीं भागीं जमीन, जमिनीचे कित्येक भाग समुद्रांत गेलेले, मैदानाचे डोंगर बनलेले, व डोंगराळ प्रदेश सपाट झालेले काय आज थोडे असतील ! त्यावेळीं नसतील असे पुष्कळ जीवजंतु आतां

सृष्टींत उत्पन्न झालेले असून कदाचित् त्या काळचे कित्येक कालमानानें सांप्रत पाहण्यांत येत नसतील! सकल विश्वाच्या कर्त्याला ही सर्व सृष्टि ह्मणजे कांहींच नाहीं, त्याचा हा सहज खेळ आहे ! खेळांत अनेक तऱ्हा असणें हें ठीकच आहे. त्यानें पूर्वी एकदां जसें जगत् निर्माण केलें तसेंच अगदीं थेट चालविलें असेल, त्यांत न्यूनाधिक्य कांहीं एक झालेलें नाहीं, असें तरी ह्मणण्यास आह्मा मानवांजवळ काय प्रमाणें आहेत? ह्मणून त्या काळच्या मनुष्यमात्राच्या ठिकाणीं असणारी शक्ति, त्यांना इष्टवस्तु प्राप्त होण्याचीं साधनें, त्यांस असणारें ज्ञान वगैरे हीं ह्या क्षणापर्यंत तो जगदीश ह्या वेळच्या मनुष्याचे ठायीं जशाचीं तशींच ठेवील अथवा ह्या वेळेस मनुष्यमात्राच्या ठिकाणीं दिसणारें ज्ञान, त्यांची शक्ति, हीं पुढें लक्षावधि वर्षेंपर्यंत तो जगच्चालक तंतोतंत अशींच राखील असें तरी कशावरून ह्मणावें ? त्याप्रमाणेंच पूर्वकाळच्या मनुष्यादिकांचें आयुष्याचें मान आतांपेक्षां पुष्कळ पटीनें अधिक नसेल व सांप्रतच्या पेक्षांही पुढें दीर्घ काळानें तें अधिक किंवा उणें होणार नाहीं, आहे इतकेंच राहणार, हें तरी परमेश्वराच्या इच्छेचें अथवा नैसर्गिकस्थितीचें आज आमच्यानें काय अनुमान करवणार आहे ? पूर्वकाळचे लोक ईश्वरप्राप्तीचे कामीं सध्याचे लोकांपेक्षां अनेक पटीनें गुंतले असल्यास त्यांच्यामध्यें ईश्वरप्राप्तीस साहाय्यकारक असे दया, क्षमा, शांति, निर्लोभता इत्यादि सद्गुण अधिक असावे हें उघड आहे. त्या वेळीं लोकवसति थोडी असल्यामुळें उदरनिर्वाहार्थ त्यांस मुळींच अडचण पडत नसे, ह्यामुळें त्यावेळच्या लोकांकडून पापकर्म क्वचित् घडत होतें, ह्यांत संशय नाहीं. असें बोलूं लागलों असतां अनेक विचारतरंग उद्भवतात ! ते आपल्यास वाणीनें सांगतां सुद्धां येणार नाहींत. असो; ही कथा नऊ लक्ष वर्षांची असून ज्यापेक्षां ती ह्या भरतभूमीवर अद्यापि जागृत आहे तेव्हां तिची योग्यता काय वर्णावी ? अशा जुन्या व पवित्र कथेपासून तुमचें मनोरंजन होईल, तुह्मास सदुपदेश होईल, तुमचें अंतःकरण निर्मळ होईल. तुह्मांस आपल्या देशाचें पूर्वीचें वैभव कळून आतां तें नष्ट होऊन अशी दशा आली ह्मणून वाईटही वाटेल ! ही कथा स्वदेशांतील आहे ह्मणून आणखी ती तुह्मास फार गोड लागेल. इतका काळ होऊन गेला तरी ह्या गोष्टींतील पुरुष, स्त्रिया ह्यांचीं नांवें व स्थळें तुह्मास प्रत्येकास नां-

वानें तरी माहीत असतील, त्यावेळच्या रीतिभाती, आचारविचार, लोकांचे स्वभाव, आपल्याशीं पुष्कळ प्रकारें जमतील. नवलक्ष वर्षांपूर्वींचे ह्मणजे त्रेतायुगांतील, सध्या न दिसणारे प्रकार काय काय आपल्या ह्या कथेंत येणार आहेत हें थोडक्यांत सांगून मग आपल्या गोष्टीकडे वळूं.

कृत, त्रेता, द्वापर, व कलि ह्या चार युगांपैकीं दुसऱ्या युगांत घडलेली ऐतिहासिक गोष्ट मला तुह्माला सांगणें आहे. सर्व युगांविषयीं आज कांहीं न बोलतां केवळ त्रेतायुगाविषयींच थोडें सांगतों. ह्या युगाचें कालमान बारा लक्ष शहाण्णव हजार वर्षें सांगितलें आहे. ह्या युगांतील मनुष्यांची दहा हजार वर्षें आयुर्मर्यादा असून त्या कालच्या इतिहासांत अशा प्रकारचीं चरित्रेंही वाचण्यांत येतात. ह्या काळचे राजे बहुधा प्रजांचें हित हेंच आपलें इहलोकींचें कर्तव्य व परलोकींचें साधन समजणारे असत. ह्या वेळचे लोकही अशा राजांस पित्याप्रमाणें मानीत. साधारणतः लोक मोठे भव्य व अतिशय बळकट असून आपल्या कर्तव्यकर्मांत सदा दक्ष असत. ह्या काळीं एकान्तीं ह्मणजे अरण्यांत राहून ईश्वराराधना करणारे लोक बरेच असत. ह्यांसच ऋषि, मुनि वगैरे ह्मणत. हे वनामध्यें नदीतटीं अथवा सरोवरांच्या आश्रयानें पर्णकुटिका बांधून त्यांत अथवा सोईवार गुहांमध्यें रहात. हे फलमूलांवर किंवा सांव्यासारखीं निःसत्त्व धान्यें स्वश्रमानें उत्पन्न करून त्यांवर निर्वाह करीत. वस्त्रांचे ऐवजीं त्यावेळीं उत्तम प्रकारें मिळणारीं अशीं वल्कलें ते धारण करीत. ह्यांतील फार थोडे लग्नें करीत व बहुतेक कडकडीत ब्रह्मचर्यव्रतानें दिवस घालवीत. ह्यांना त्यावेळचे राजे फार पूज्य मानीत, व त्यांस प्रसन्न ठेवण्याविषयीं सदा झटत. ह्यांचे तेजास ते फार भीत. राजे जर ह्यांस इतके नमून वागत तर इतर लोक कसे वागत असतील हें आणखी कशाला सांगितलें पाहिजे? कित्येक ऋषि राजांच्या विनंतीवरून त्यांच्या राजधानींत त्यांच्यापाशींही रहात. मोठें एकादें यज्ञयागादि धर्मसंबंधी कृत्य करणें असेल तर तें यथासांग व्हावें ह्मणून ऋषींना लोक आपल्या घरीं बोलावीत. हे आपला सर्व काळ विद्येंत व परमेश्वराचें ध्यान करण्यांत घालवीत. सतत विद्याव्यसनांत गर्क असल्यामुळें ह्यांस अनेक विद्या अवगत असत. मोठे विद्वान् व त्यांस एकान्तवास असल्यामुळें ह्यांचे हातून ग्रंथरचना उत्तम होत असे, आप-

त्या पवित्र संस्कृत भाषेंत जे उत्तमोत्तम ग्रंथ आहेत ते ह्यांचेच सर्व मनुष्य प्राण्यांवर उपकार आहेत. कित्येक यज्ञयाग करून परमेश्वराची भक्ति करीत. ह्यांच्या स्त्रियाही त्यांच्यासारख्या ज्ञानी असत. हे ऐहिक सुखाविषयीं सदा निरिच्छ असत. ह्यांपैकीं कित्येक महर्षींचें तपःसामर्थ्य इतकें कांहीं विलक्षण वाढलें होतें कीं, जेव्हां जेव्हां हे एकाग्रचित्त करीत ह्मणजे समाधि लावीत तेव्हां तेव्हां ह्यांना, बसलेल्या आसनांवरूनच त्रिभुवनांतील भूत, भविष्य, वर्तमान कळे! आपण जगांतही नित्य असें पहातों कीं, ज्या मनुष्याचा आपण अधिक अधिक सहवास करावा त्या मनुष्याचे आपणांस गुण किंवा दुर्गुण अनायासें जडतात, तर कोणी बुद्धिपुरःसर व मोठ्या भक्तिभावानें परमात्म्याचा रात्रंदिवस सहवास केल्यास त्यांना त्याचे गुण लागावे हें अगदीं स्पष्ट आहे. अशा ह्या ईशचिंतनाभिलाषी, ज्ञानी व शांत मुनींस त्या काळीं त्यांच्या ह्या सत्कार्यांत विघ्नकरणारे दुष्टबुद्धि, मोठमोठे बलाढ्य असे पुष्कळ प्राणी असत. हेच राक्षस होत. हे मुनींना नानाप्रकारें छळीत, त्यांस फार त्रास देत, इतकेंच नाहीं, तर पुष्कळांना ठार मारून त्यांचे रक्त मांस मोठ्या प्रीतिनें खात! हे मोठे विक्राळ, बळकट, काळे, भयंकर जबड्याचे असत व ह्यांतील कित्येक पुरुष व स्त्रियाही प्रसंग पडेल तेव्हां पाहिजेल तें रूप घेत, ह्यामुळें हे कपटविद्येंत निष्णात असत! ह्यांचे रूपांचें वर्णन वगैरे प्रसंगवशात् पुढें मला सांगावें लागेलच. असे सत्वस्थ ऋषि व असे दुष्ट राक्षस ह्यांचा संबंध आपल्या ह्या कथेशीं बराच येणार आहे. त्या वेळीं ह्या देशांतील बहुतेक भूमि सपाट असल्या मुळें पाहिजे तेथें रथ नेतां येत असत. त्या समयीं पुष्कळ कलाकुशल राजांस विमानांत बसून जाण्याचें साधलें होतें; व ते विमानांतून लांबलांबचा प्रवास करीत. अशा अनेक गोष्टी ह्या काळीं न दिसणाऱ्या यथाप्रसंगीं कथा प्रसंगानें तुह्मांस कळतीलच. येथें आतां सांगत बसत नाहीं.

अशा काळीं ह्या आपल्या देशांत सीरध्वज नांवाचा एक राजा होऊन गेला. त्याचे पूर्वज मोठे नीतिमान, पराक्रमी यज्ञकरणारे, असे होते. त्यांत निमि, मिथि, जनक, देवरात हे तर अनेक गुणांनीं प्रख्यात असे होऊन गेले. त्या सर्वांत हा राजा तर मोठें कुलभूषण होऊन गेला. ह्याला बहुधा पूर्वजाचे नांवावरून जनक ह्मणत असत. हा अनेक

यज्ञ करणारा, आपत्तिकाळांतही सच्छील न सोडणारा, प्राणिमात्राचे कल्याणाविषयीं सदा दक्ष असणारा, परोत्कर्षानें अत्यंत आनंदित होणारा, सत्यवादी व सत्यप्रतिज्ञ असा होता. हा प्रजांपासून फक्त त्यांचे रक्षणार्थ कायतो एकषष्ठांश कर घेत असे, दुसरा कांहींच कराचा त्रास नव्हता. हा इतका सौम्यप्रकृति असे कीं ह्याला राजर्षि ह्मणत; व ह्मणूनच परशुरामानें निःक्षत्रिय पृथ्वी केली त्या वेळीं ह्याच्याकडे पाहिलें सुद्धां नाहीं! त्या काळीं किंवा त्या पूर्वी ह्याला उपमा देण्या सारखा एकही दाता प्रसिद्ध नव्हता. कर्णाच्या ठिकाणीं जें दातृत्व आलें तें ह्याच्याच कथा ऐकून! ह्याच्या प्रजा ह्याला पित्याप्रमाणें मानीत. ह्याच्या राज्यांत अन्याय मुळींच होत नसे. सर्व कामदार आपापल्या कामीं नेहमीं तत्पर रहात. सर्व ऋषिजनांचें हा विश्रांतिस्थान असून विद्वान् लोकांच्या हृदयकमलांस प्रफुल्लित करणारा साक्षात् सूर्यासारखा भासे. दीन व पीडित यांच्या अन्तःकरणरूपकुमुदांस विकसित करणारा हा निष्कलंक चंद्रसाच असा वाटे. पर्वतानेंही घेण्यासारखें धैर्य ह्याचे ठायीं असे. महासागराच्या खोलीहून ह्याचे विचाराची खोली अधिक असे! हा वेदान्ताचें रहस्य जाणणारा, ब्रह्मविद्येंत मोठा प्रवीण व षट्शास्त्रांचा केवळ आरसाच होता. कामक्रोधादि षड्रिपु अगदीं ह्याचे मुठींत असत. हा अनेक कलांचा उत्पादक, काव्यादिरसांचें ग्रहण करण्याविषयीं भ्रमरच, गायनवादनादिकांत पारंगत, गुणिजनांचा आश्रय, नवीन रसभरित ग्रंथ करून कविवरांसही ऐकविणारा. जगांतील दुर्लभ वस्तूंचा संग्रह करणारा व वैभवानें दुसरा कुबेरच असा होता. आणि शत्रूरूप अजांना हा सिंहासारखा दिसे, शरणागतांना माते प्रमाणें वाटे, व अपराध्यांना साक्षात् यमच असा भासे.

अशा ह्या सीरध्वज राजाची, राजधानी हिमालयाच्या पायथ्याशीं विदेह नांवाच्या प्रदेशांत मिथिला नांवाची होती. ह्या नगरीचें नांव पूर्वीं वैजयंती असें होतें. परंतु ह्या नृपतीच्या पूर्वजांत मिथि नांवाचा जो विक्रमशाली राजा होऊन गेला त्यानें मिथिला असें नांव ठेविलें. ह्या नगरीमधून त्यावेळीं एक लहानशी नदी वाहत असे. तिचें उदक स्वच्छ व अमृतासारखें गोड असे. ह्मणून त्या नदीच्या त्या तेवढ्या भागाला अमृतसदा असें नांव पडलें होतें. ह्या विस्तीर्ण राजधानींतील

बहुतेक सर्व मार्ग रुंद होते. सर्व रस्त्यांतून दगडांची फरसबंदी केलेली होती. त्यांच्या दोहों बाजूंस पांच पांच सहा सहा मजलेपर्यंत सुद्धां नागरिक सावकार लोकांचे भव्य व सुंदर वाडे होते. त्यांचा बाहेरून रंग पांढरा शुभ्र असे, तेव्हां लगेच मनांत येईकीं ह्या लोकांनीं हे यशोधन खर्चून बांधलेले आहेत! ह्या नगरीमधून जातांना दोनप्रहरींच कायतें थोडें ऊन लागत असे. मधून मधून देवळांचीं उंच शिखरें जवळ असलेल्या हिमालयाच्या उंचीची बरोबरी करावयाला डोकावतात कीं काय अशी शंका येई! मोठमोठ्या रस्त्यांतील वाड्यांच्या खालीं अनेक प्रकारच्या पदार्थांचीं दुकानें होतीं. ह्याशिवाय पुष्कळ ठिकाणीं विक्रीच्या जिनसांचे बाजार होते. तेथील दुकानांची रचना, व जिन्नसवगैरे मांडण्याची शैली ही मनास आल्हाद देणारी असे. खेड्यांतून आलेला किंवा लहानसान शहरांतील मनुष्य ह्या नगरींत अगदीं गांगरून जाई. गजशाळा, अश्वशाळा, गोशाळा इत्यादिकांनीं ही नगरी युक्त असून सर्वदा मनुष्यांनीं गजबजलेली असे. त्या नगरींत नदी होती ह्मणून मघांशी तुह्मास सांगितलेंच आहे. शिवाय ठिकठिकाणीं मोठमोठे तलाव, व बहुतेक घरोघरीं विहिरी असत. ह्या नगरीचे एकेबाजूस संपत्तीचा योग्य प्रकारें उपभोग घेणाऱ्या सावकारांचे व मोठमोठ्या राजाश्रितांचे, पाहतांक्षणीं मनावर रमणीयतेचा ठसा उमटविणारे असे, वाडे होते. त्यांचे सभोंवती रम्य बागबगीचे असून त्यांत ठायींठायीं मनोरम कारंजीं होतीं. हे वाडे नगरींतील भरवस्तींतील वाड्याइतके उंच नव्हते. ह्यांचा रंग बहुधा हिरवा असे. ह्यावाड्यांतील बैठकीच्या जागा चांगल्या प्रशस्त असून अनेक रमणीय पदार्थांनीं शृंगारलेल्या असत. ह्मणून अशास्थळीं सदा सुप्रसन्नता वास करी. तेथील भिंतींवर अनेक प्रकारचीं मनोवेधक चित्रें काढलेलीं असत. बसण्यासाठीं अनेक तऱ्हा केलेल्या असत. तशींच त्यांतील अन्तःपुरेंही फार रम्य होतीं. ह्या वाड्यांवर सदा फुलणाऱ्या अशा पुष्पांच्या हिरव्यागार वेली चढवलेल्या असत. सकाळसंध्याकाळीं तर तेथें निर्जीव वस्तूलाही सजीव करील असा नानाविधपुष्पामिश्रित सुगंध पसरे. ह्या शिवाय अनेक संस्थानिकांस अथवा भेटीस येणाऱ्या राजांस राहण्याकरितां नदीच्या काठीं बहुत द्रव्य खर्चून वाडे बांधलेले होते. त्यांची उलट

प्रतिबिंबें पाण्यांत पडलेलीं पाहून हे अतिशय बळकट असल्यामुळेंच जणूं टक्करच मारीत आहेत असें वाटे! ह्या वाड्यांकडे जातांना माणेक हिरे, पाच, पुष्कराग, वगैरे नानाविध रत्नें, मोत्यें, सोनें, शाली, पीतांबर, मोत्यांचे व रत्नांचे दागिने वगैरे मूल्यवान् पदार्थांचीं सुशोभित दुकानें लागत. ह्याशिवाय त्या राजधानींत पुष्कळ धर्मशाळाही होत्या.

मुख्य प्रासाद ह्मणजे राजवाडा हा त्या नगरीच्या मध्यभागीं होता. इतका उंच व विस्तृत दुसरा एकही वाडा त्या नगरांत नव्हता. ह्याच्या चोंहों बाजूंनीं मोठा चारपांच हात रुंदीचा व सुमारें पंधरा सोळा हात उंचीचा तट होता. चारही बाजू सारख्या असून प्रत्येकीची लांबी किमानपक्ष अर्धकोश तरी असावी असें वाटतें. हा तट दगडी होता. मात्र बाहेरील आंगचे दगड फार कठिण असून आंतील अंगास शरत्काळच्या चांदण्याप्रमाणें शुभ्र असे संगमरवरी दगड कलाकुशलतेनें जडलेले होते. ह्या चारही तटांच्या मध्यभागीं मोठे रुंद व उंच दरवाजे होते; परंतु उत्तरे कडील भिंतीला जो दरवाजा होता तो मुख्य असून तेथील कारागिरी बघत बसण्या सारखी होती. ह्या प्रमुख दरवाज्याशिवाय बाकीचे दरवाजे चांदीच्या पत्र्याचे असून त्यावर कुशल कारागिरांनीं मनोहर चित्रें वगैरे खोदलेलीं होतीं. हे तीन दरवाजे बहुधा दररोज बंद असत, प्रसंग पडेल तेव्हां मात्र उघडीत मुख्य दरवाज्यांची चौकट शुद्ध सुवर्णाची असून त्यावर रत्नजडित काम केलेलें होतें. तेथील तटाची भिंत अनेक प्रकारच्या दगडांनीं बांधलेली होती. दरवाजे सोन्याचे केले असतां फारच जड होतील व बंद करणें कठिण पडेल ह्मणून लांकडी दरवाजे सोन्याचे पत्र्यांनीं मढवलेले होते. त्यांवर चारही बाजूंनीं हिरव्या रंगाच्या वेली होत्या, त्या पाचमण्याच्या होत्या. त्यांवर फुलें, फळें, पक्षी वगैरे दुसऱ्या अनेक रंगाच्या रत्नांनीं दाखविलेलीं होतीं. मध्येंही अनेक प्रकारचीं मनोहर चित्रें खोदलेलीं होतीं. हा मुख्य दरवाजा बहुधा कधीं बंद करावा लागत नसे. तरी तो सहज उघडतां झांपतां यावा ह्मणून त्याचे खालीं चक्रें जोडलेलीं होतीं. ह्या चारही दरवाज्यांत खालीं देवडीवर संरक्षक लोक सशस्त्र तयार असतच, शिवाय आणखीं ह्या चार दरवाज्यांचे बाजूंस व तटांच्या चार कोंपऱ्यांवर बळकट व सुरेख बुरूज बांधलेले होते. त्यांवर रात्रंदिवस

लोक हातांत शस्त्रें घेऊन आपल्या नियमित कामांत तत्पर असत. ह्या बाराही बुरुजांवर अनेक प्रकारचीं शस्त्रें होतीं. मुख्य दरवाज्यावरील एका बुरुजावर एक मोठी टोलेजंग घंटा असे, ती नियमित वेळीं ह्मणजे अर्ध्या प्रहरानें वाजे, ह्यावरून त्या नगरांत दिवसरात्रीचें मान समजे. ह्या कोणत्याही चार दरवाज्यांतून आंत गेलें असतां अनेक रंगाच्या पण नियमित रीतीनें बसविलेल्या दगडांचे, दरवाज्यांचे रुंदीहून कांहीं कमी रुंदीचे, गुळगुळित मार्ग होते. ह्या मार्गावर आंत जाण्याकरितां पाऊल ठेवलें कीं आपण एका मोठ्या सुंदर बागेंत आलों असें वाटे. ह्या मुख्य चार रस्त्यांच्या दोन्ही बाजूंस फार उंच नाहींत असे सारख्या अंतरानें असणारे व बहुधा बारा मासही फलपुष्पांनीं लवणारे असे वृक्ष होते. ह्यांना पहातांच असें वाटेकीं, "ह्या राजाला नम्र व्हा, ह्मणजे तुह्मांस तत्काळ फलप्राप्ति होईल," असे हे रात्रंदिवस लोकांस सांगत आहेत! त्याकाळीं आपल्या ह्या विस्तीर्ण देशांत मिळणारीं व हिमालयादिकांवर वाढणारीं फुलझाडें, वेली, वनस्पति वगैरे हीं सर्व त्या उपवनांत होतीं. ह्या मुख्य चार रस्त्यांशिवाय आंतून अनेक तऱ्हांच्या लहानलहान वाटा होत्या. कित्येक फुलझाडें वगैरे वर्तुलाकृति अष्टकोणाकृति, चतुष्कोणाकृति, त्रिकोणाकृति, कमलाकृति, अशाअनेक आकृतींनीं लाविलीं होतीं, अर्थात् तेथील वाटाही तशाच केलेल्या होत्या. ह्याशिवाय लहान मोठ्या अनेक प्रकारच्या कुंड्यांतून लहान लहान सुशोभित झाडें त्या सर्व उपवनभर शोभतील अशा तऱ्हेनें मांडलेल्या होत्या. सर्वत्र लतांचे मंडप होते. ह्या लतामंडपांतील भूमि पुष्परस पडून सतत ओल्या झालेल्या असत. ह्यांत सूर्यकिरणांचा सुद्धां प्रवेश होत नसे. आंत मयूर व मयूरिका जाऊन यथेच्छ ओरडून नृत्य करीत, कारण तेथें त्यांना सदा पर्जन्यकाळ आला असें वाटे. अनेक पक्ष्यांचा आंत किलकिलाट होई, त्यावरून आंत असणारांस हा प्रातःकाळ आहे असें भासे. ठायीं ठायीं तऱ्हे तऱ्हेचीं मूल्यवान् व रमणीय अशीं कारंजीं होतीं, त्यांतून दिवसभर उदकवृष्टि होई. अशा जलवृष्टीनें जवळ असणारे मयूरादि पर्जन्यकालाची वाट पाहणारे पक्षी मोठ मोठ्यानें ओरडत. त्या कारंजावरील मनुष्यकृतीचे मोर, हंस, पोपट, वेली, फळें इत्यादि पाहून खरे पक्षीही पुष्कळ वेळ फसले जात. कित्येक ठिकाणीं तर

चारा कातरून साफ भूमि केलेली होती, कित्येक स्थळीं चित्तवृत्तीस जागृत करणारीं व बोधपर संस्कृत वचनें वाचतां येतील असा चारा ठेविला होता. ह्या उपवनांत विश्रांतीसाठीं बसण्या करितां अनेक स्थळीं अनेक प्रकारच्या बैठकी केल्या होत्या. ह्या सर्व अवर्णनीय व रम्य उद्यानाचें दर्शन होतांच कोठें वसंतऋतु आपला जिवलग मित्र जो काम यासह सावकाश सहल करीत आहे असें वाटे! कोठें ग्रीष्म नुकताच येत आहे असें भासे! कोठें तर पर्जन्यकाळाची पूर्ण सत्ता चालली आहे असें दिसे! कोठें हिमाचलाच्या वसतीचा भास होई! सारांश, हें उपवन सहाही ऋतूंचें एक संकेतस्थान, किंवा आपापले अधिकार बाहेर कितपत चालतील हें अगोदर पाहण्याचें स्थल आहे, अथवा हा आराम षड्ऋतूंचा पिताच कीं काय असें वाटे! ह्यांत क्रीडार्थ पाण्यानें तुडुंब भरलेले कांहीं उघडे व कांहींकांवर वेलीचे दाट मंडप असे हौद होते. त्यांतील स्वच्छ जल वाऱ्यानें वारंवार चंचल होई, तेव्हां तत्काल मनांत येई कीं मनुष्याचें आयुष्य चंचल आहे, ह्याचा हे उपदेश करीत आहेत, व मंडपांचीं आंत पडलेलीं प्रतिबिंबें हें जगत् सत्य नव्हे भासमात्र आहे, हें रहस्य सांगतात कीं काय असें वाटे! त्यांत वर्तुलाकार सरोवरें, चतुष्कोणी दीर्घिका, षट्कोणी तळीं वगैरे बरींच होतीं; ह्यांत दिवसास कमळें व रात्रौ कुमुदें फुलून चोंहोंकडे त्यांचा घमघमाट पसरे! एक कृत्रिम वेडी वांकडी नदी केलेली होती, तींत उतरण्यास पुष्कळ ठिकाणीं पायऱ्या केलेल्या होत्या. तिला पांढऱ्या वाळूचें वाळवंट केलेलें होतें, त्यावर कित्येक पुष्पवल्ली लोळत पडलेल्या होत्या. ह्या कृत्रिम नदीच्या तीरीं ऋषींच्या आश्रमांचा भास व्हावा ह्मणून मुद्दाम कांहीं पर्णकुटिका वगैरे बांधल्या होत्या! ह्या तटाच्या आंतील एका बाजूस लांबच्यालांब कांहीं पागा होत्या, त्यांत एके ठिकाणीं सर्व पृथ्वींतील केवळ मूर्तिमंत रत्नेंच असे शुभ्र चार अश्व बांधलेले होते. दुसऱ्या जागीं एक श्वेतवर्ण मद स्रवणारा असा हत्ती डोलत होता. ह्या शिवायही दुसऱ्या एका स्थळीं पुष्कळ घोडे व हत्ती बांधलेले होते. एका पागेंत एका विस्तीर्ण भागांत अनेक प्रकारचे लोखंडी गज मारून मोठमोठ्या खोल्या केल्या होत्या. त्यांत सिंह, वाघ, लांडगे, अस्वलं इत्यादि क्रूर जनावरें ठेवून दुसऱ्या भागीं हरिणासारख्या

सुंदर व इतर दुर्मिळ पशूंचा मग्रह केला होता. ह्यांचा खाण्यापिण्याचा योग्य बंदोबस्त केला होता. आणखी त्या बागेंत पुष्कळ ठिकाणीं शोभिवंत अशीं अनेक पक्ष्यांस राहण्या साठीं घरें केलेलीं होतीं, तेथें त्यांचे भक्ष्याची व उदकाची चांगली व्यवस्था केलेली होती. एका बागेंत पुष्ट व मनास आल्हाद देणाऱ्या अशा निदान १०० तरी दुभत्या सवत्स गाई होत्या.

तेथें एक शिवालय होतें. तें जरी फार वर्षांचे बांधलेलें होतें, तरी अगदीं नवीनाप्रमाणें दिसे. ज्यांनीं आपल्या वाड्याच्या सभोंवतीलच्या तटाच्या दरवाज्यांत इतका खर्च केला होता त्या अत्यंत शिवभक्त राजांनीं आपल्या प्रिय उपास्य देवतेच्या मंदिरार्थ फारच पैसा खर्च केला सेल हें आणखी काय सांगावें? त्या देवालयाचें शिखर दोनशें हातापेक्षांहूनही कांहीं उंचच असेल. हें बळकट असून त्यांत शिल्पकारांनीं सौंदर्य आणण्याचे कामीं तिळभरही आळस केला नव्हता. हें सर्व पांढऱ्या दगडाचें होतें, वर कित्येक शोभतील अशा जागीं दगडांच्या ऋषींच्या ध्यानस्थ मूर्ति बसविलेल्या होत्या, कित्येक स्थळीं वत्सें पीत आहेत अशा गाई होत्या, कित्येक ठिकाणीं चेष्टा करणारीं मांकडें, कित्येक ठिकाणीं उग्र व भयंकर सिंह, व्याघ्र, पळणारे हरिण, नाचणारे मोर, जणूं आतां बोलणारच असे पोपट, फणा उभारणारे सर्प अशांची चित्रें पाहण्यांत येत! अनेक प्रकारच्या योग्यस्थळीं जाळ्या व वेली खोदलेल्या होत्या. वरील भक्कम कळस सुवर्णाचा असून तो मुंदर दिसावा ह्मणून त्यावर रत्नांचें काम केलेलें होतें. त्यावर सूर्याची प्रभा पडली ह्मणजे त्याची कांहीं विलक्षणच शोभा दिसे. कळसाच्यावर एक शुभ्र पताका वाऱ्यानें सदा फडफडत असे. देवळाचा गर्भागार मोठा प्रशस्त होता, आंत जाऊन वर पाहिलें ह्मणजे आंतील पोकळ भाग फारच उंच ह्मणजे शिखराच्या उंची इतका दिसे. त्यास जाळीचीं गवाक्षें होतीं, त्यामुळें आंत चांगला उजेड होता. पायाखालची भूमि, पांढऱ्या व काळ्या गुळगुळीत संगमरवरी दगडांची होती, त्यांत प्रतिबिंबें दिसत. सभामंडप मोठा असून उंच होता. त्याचे स्तंभ, एका स्तंभावरून दुसऱ्या स्तंभावर नेलेल्या मेहेरपा, त्यांवरील पशुपक्ष्यांचीं खोदलेलीं व रंगवलेलीं चित्रें, वरील चित्रविचित्र छत, सभामंडपाची अनेक रंगाच्या घोटलेल्या

दगडांनीं केलेली भूमि वगैरे सर्वकांहीं पाहून पहाणाऱ्यांच्या डोळ्यांस आनंदातिशय होऊन त्यांचें मन संतृप्त होऊन जाई. हा सभामंडप व गर्भागार ह्यांच्या मध्यें जो एक प्रशस्त देवालयाचा भाग होता, तोही मन हरण करणारा होता. सभामंडपांतून ह्या उच्च भागीं चढण्यास दगडांच्या, जणूं भिंगाच्याच दिसणाऱ्या अशा, पांच सहा पायऱ्या होत्या. ह्या भागावरून गर्भागारीं उतरण्यास तशाच दोन तीन पायऱ्या होत्या. ह्या गर्भागाराच्या भिंती घोटीव दगडांच्या असल्यामुळें त्यांत सभामंडप आपलें सुंदर रूप पहात बसला आहे असे दिसे! ह्या गर्भागारांत अमूल्य रत्नखचित एक उंच सिंहासन होतें, त्यावर कर्पूराप्रमाणें धवल, जटाजूट धारण करणारी व सुंदर वस्तूंची पराकाष्ठाच अशी श्रीशंकराची मूर्ति होती. ह्या महादेवाचा एक चरण त्या आसनावर असून दुसरा खालीं सोडलेला होता; वामांकावर साक्षात् आदिमाया जगन्माता गिरिजा हिची सर्वावयवांनीं संपूर्णअशी अप्रातिम प्रतिमा होती; हिचाही एक चरण आसनाच्या खालीं सोडलेला होता. तें खालीं सोडलेलें शंकर-पार्वतीचें चरणयुगुल पाहतांच मनांत भक्तिभावाचा प्रादुर्भाव होई. ह्या देवतांचें दर्शन झालें कीं अन्तःकरण वैराग्यानें वितळून जाई व जन्मास येऊन आपण परलोकींचें कांहींच साधन केलें नाहीं असें वाटून मनास एका प्रकारचा धक्का बसून पश्चात्ताप होई व तेणेंकरून सर्वांग घामानें भिजे! ह्या देवतांना दररोज नवे नवे पोषाक असत व तेथील शृंगार आज पाहिलेले उद्यां नसत. ह्या शिवमंदिराच्या आसपासही अत्यंत रम्यता होती. सारांश, हें देवालय जगांतील सर्व कारागीर व कसबी लोकांनीं अनेकवेळ प्रत्यक्ष पाहून माना डोलविण्या सारखें होतें आणि आंत तर देहधारी कैलासनाथ पार्वतीसह स्वतः वास करीत आहे असें भासे.

आतां आपण मुख्य राजवाड्याकडे पाहूं. हा वाडा फार बळकट व विस्तीर्ण होता. ह्याला एकंदर लहान मोठे आठ चौक होते. ह्याचे मजले उंच होते. ह्यांतील पहिला चौक तर तळचा मजलासुद्धां धरून सात मजली होता! ह्यांतील तळचा मजला मोकळाच होता. दुसऱ्या मजल्यावर मुख्यप्रधानाची एक कचेरी होती. तिसऱ्या मजल्यावरील सर्व जागा महाराजांसाठीं बसण्याकारितां केलेली होती. सर्व मजल्यांवर खिडक्या वगैरे मोठ्या होत्या, त्यामुळें उजेड चांगलाच

होता, पण त्यांतही ह्या मजल्यावर तो विशेष होता. ह्यांतील एका दिवाणखान्यांत सीरध्वजमहाराजांला बसण्यासाठीं एक फारच रम्य जागा केलेली होती. प्रधान, मंत्री, ह्यांसह कांहीं गुप्त मंत्र करणें आल्यास तो ह्याच स्थळीं होत असे. किंवा राज्यप्रकरणीं, अथवा न्यायसंबंधी किंवा कोणत्याही कामांत प्रधानादिकांस कांहीं विचारणें झाल्यास ते ह्याच स्थळीं महाराजांस विचारीत. महाराज ह्या ठिकाणीं दररोज कमींत कमी अर्धप्रहर तरी नियमित वेळीं बसत. ह्या चौकांतील हाच काय तो एक मजला सुशोभित होता. बाकीच्या मजल्यांवर मनोरम असें कांहींच नव्हतें, अनेक वर्षांचे कामकाजांच्या कागदपत्रांचे रुमाल ह्मटल्या वेळेस सांपडतील अशा सुव्यवस्थेनें रचलेले होते. ह्यांत महाराजांच्या पूर्वजांचे इतिहास व अनेक परकीय राजांचे व पराक्रमी पुरुषांचे लहान मोठे जुने इतिहास होते. दुसऱ्या चौकांतील बहुतेक मजले, अनेक मूल्यवान् संग्रहणीय व रमणीय वस्तूंनीं भरलेले होते. ह्या वस्तु व्यवस्थित रीतीनें ठेवलेल्या होत्या, ती रीति पाहूनच मनास संतोष होई, मग वस्तु पाहून अधिक होईल हें उघड आहे. ह्या वस्तूंमध्यें अमुक एक चमत्कारिक किंवा आल्हादकारक वस्तु नव्हती असें नाहीं. कोणास भेटणें वगैरे झालें तर सीरध्वजमहाराज ह्या चौकांत भेटत असत. तिसरा चौक विशेष उंच नव्हता. मांडलिक राजांनीं बसून अनेक प्रकारचे खेळ खेळून अथवा जेणेंकरून मनाला रंजन होईल असें करण्याकरितां ह्या चौकाचे सर्व मजले गुंतविलेले होते. ह्यास्थलीं अनेक प्रकारचीं वाद्यें होतीं. तळच्या मजल्यावर मोठी कसरतशाळा होती. चवथ्यांत धान्यसंग्रह असून द्रव्याच्या मोठमोठ्या बळकट पेट्या भुयारांत होत्या. ह्या ठिकाणीं द्रव्यरक्षणार्थ सशस्त्र लोकांचा रात्रंदिवस पाहारा असे. पांचव्या चौकांत तळच्या मजल्यावर होमशाळा होती. ह्या पवित्र स्थळीं यज्ञसंपत्ति असून होमधेनू सवत्स मोकळ्या असत, वर मजल्यांवर ब्राह्मणांचा वेदघोष, वेदार्थचिंतन, शास्त्रचर्चा चाललेली असे. ऋषींची पूजा करणें, त्यांच्याशीं ब्रह्मविद्येवर बोलणें किंवा कोणतेंही धर्मकृत्य करणें तें तो ह्या स्थळीं करीत असे. सहाव्या विस्तीर्ण, पण फार उंच नाहीं अशा, चौकांत जिकडे तिकडे सर्वदा पक्वान्नांचा घमघमाट सुटलेला असून पहावी तेव्हां स्वयंपाक्यांची धामधूम चाललेली असे. वरील

मजल्यांवर धूत वस्त्रें वाळत घातलेलीं असत. सातव्यांत अन्तः-पुर होतें. ह्या स्थळीं दरवाज्यांवर व चोहोंकडे कुब्डे, ठेंगणे, बहिरे, ह्मातारे, कंचुकी, दासी, ह्यांची गर्दीच गर्दी होती. हा चौक पहिल्या इतकाच उंच होता. ह्यावर मोठी गच्ची असून तेथून सर्व मिथिला नगरी दिसे. ह्यांतील प्रत्येक मजला दर्शनीय होता. ह्यांत अनेक तऱ्हांचे बहुतेक सुवर्णमय पर्यंक असून त्यांवर मऊ परांच्या रेशमी गाद्या, हात हात उंचीच्या पसरलेल्या असत; त्यांवर चांदण्यासारखीं शुभ्र व बारीक आस्तरणें असून स्वच्छपांढऱ्या वस्त्रांत गुंडाळलेल्या उशा, गिरद्या, तक्ये वगैरे पुष्कळ असत. जिकडे तिकडे पंखे टांगलेले होते. ह्याशिवाय नाना-प्रकारचे विंझणेही तेथें होते. भिंतींवर अनेकविध देव, मनुष्य, पशु, पक्षी, इत्यादिकांचीं व कामोद्दीपक चित्रें काढलेलीं होतीं. अनेक मनोरम वस्तु जिकडे तिकडे मांडलेल्या होत्या. भिंतींला मोठमोठाले आरसे टांगलेले होते. मूल्यवान् आरशांत बसविलेल्या सुंदर तसबिरीही त्या-वेळीं व त्यास्थळीं कमी नव्हत्या. वर चित्रविचित्र छतें होतीं. ह्या अन्तःपुराच्या चौकांत रात्रौ दीपांचा लखलखाट पडे, त्यावेळीं येथें सदो-दित दीपावळीची भ्रांति होई. शेवटच्या ह्मणजे आठव्या चौकांत स्नान करण्याच्या जागा, स्त्रियांस पोंहण्याकरितां पाण्याचे मोठाले हौद, त्यांना एकान्तस्थळीं न्हावयाच्या खोल्या वगैरे होत्या. ह्या स्थलीं अनेक मनोहर कारंजीं असून येथें श्वेत मयूर, सारसपक्षी वगैरे रहात. शिवाय ह्या राजवाड्याच्या शेजारीं जरूरीचे सेवक, कांहीं कामदार, राजवैद्य, कांहीं विद्वान् ब्राह्मण, ह्यांस सोईवार घरें बांधून दिलीं होतीं; त्यांत ते सकुटुंब व आपल्या मडळीसह रहात. आणखी आंत लहानलहान शोभिवंत एकान्तीं बसण्याकरितां मोकळीं घरें होतीं. तात्पर्य इतकेंच कीं, हें सीरध्वजमहाराजांचें राहण्याचें मुख्य स्थान असून येथें सदास-र्वकाळ उल्हास, आनंद, सौख्य, शोभा, रम्यता, प्रसन्नता, इत्यादि नांदत होतीं.

ह्या मिथिलानगरींत ह्या राजाचे वेळीं तर फारच लोकवसति वाढली होती. राजाचे पदरीं अनेक गुणिजन होते. ह्याशिवाय दुसरे पुष्कळ विद्वान् व कलाकुशल लोक तेथील श्रीमान् लोकांच्या आश्रयानें रहात होते. ह्या नगरींत व्यंग, निराश्रित असला तरी तो आनंदानें कालक्रमणा

करी. दररोज राजाकडून व इतर धर्मात्मे धनवान् लोक यांजकडून धर्मार्थ द्रव्य व अन्न ह्यांचा पुष्कळ व्यय होई. ह्यामुळें उदरपोषणाची कोणासही काळजी फारशी नसे. येथें व्यापार फार चांगला चालत असे. राजाचें बहुतेक सैन्य नगरीच्या सभोंवती राही. सैन्याचें वेतन वेळच्या वेळीं पोंचे, ह्यामुळें तें सदा संतुष्ट राहून राजाचे हिताविषयीं सतत तत्पर असे.

ह्याचें राज्य बरेंच मोठें होतें. आणखी अन्यायानें वाढविण्याची त्याची मुळींच इच्छा नव्हती. ह्याच्या राज्याच्या सीमेंत अनेक ऋषींचे आश्रम होते. सर्व प्रजांस हा जनक खरोखर जनकाप्रमाणें वाटे. कदाचित् पिताही कारणावांचून आपल्या अपत्यांना दुखवील, परंतु ह्या राजाचे हातून प्रजांला कधींही दुःख होत नसे. व अशामुळें राज्यांत अपराधही क्वचित् होत.

हा राजा स्वतः मोठा धर्मनिष्ठ पडल्यामुळें प्रजाही तशाच परलोकची भीति मानून धर्माचरण करणाऱ्या होत्या. कुवासना, नास्तिकपणा इत्यादिकांचा त्यांना क्षणभरही विटाळ होत नसे ! प्रजाजनांचें अज्ञान, दारिद्र्य वगैरे ह्या राजानें द्वीपान्तरास पाठविलें होतें, तें तिकडे सुखानें चिरकाळ नांदत होतें, ह्यामुळें कोणी सत्कार्यांत द्रव्य खर्चण्यांत कृपण असा क्वचितच दृष्टीस पडे. त्यावेळीं आपल्या ह्या देशांत चोरी असत्य भाषण, विश्वासघात, व्यभिचार इत्यादि अपराधांस हात पाय तोडणें, जिव्हा छेदणें, डोळे काढणें, नाक कापणें, अशा सारख्या-आतां फार कडक अथवा अमानुष वाटणाऱ्या—शिक्षा असल्यामुळें कोणाकडून कधींही अपराध होत नसत. त्या वेळीं कुलुपांची कल्पना काढण्याचा कोणावरही प्रसंग आला नव्हता!

त्या काळीं ह्या देशांत सर्वत्र चार वर्ण होते. त्यांजकडे एकेक काम संपविल्यामुळें सर्व नीट व्यवस्था असे. व ह्या सुव्यवस्थेचीं मधुर फळें आपल्या देशांत लाखोंवर्षें लोकांनीं सेवन केलीं. तीं अमृत फळें सांप्रत ह्या देशांत नाहींशीं झाल्यामुळें लोक आतां दुःखसागरांतील मत्स्य होऊन राहिले आहेत. असो. त्या काळीं जनकाचे राज्यांत ब्राह्मण स्वकर्मनिष्ट असून साग्र वेदविद्या व शास्त्रविद्या जाणणारे असत. त्यांच्या

बुद्धि निर्मल होत्या. ते निर्लोभी असून परगुणाचा व परलोकसुखाचा मात्र अत्यंत लोभ करणारे होते. क्षत्रिय ब्राह्मणांस अत्यंत पूज्य मानणारे, शस्त्रास्त्रविद्येंत पारंगत, सत्यप्रतिज्ञा करणारे, शूर असून पापाचरणांत फार भित्रे, क्षमाशील व दाते असे असत. कित्येक क्षत्रिय तर ब्राह्मणांला गुरु शोभतील असे वेदशास्त्रसंपन्न असत. वैश्यही व्यापारांत मोठे दक्ष असून सत्यास प्राणांसारखे जपणारे असत. ह्यांनीं आपल्या शहाणपणानें सर्व देश समृद्ध करून सोडला होता. हे मोठे विचारी असत खरे परंतु व्यापारांत फार साहस करीत. शूद्रवर्गानें देशभर सेवाधर्म स्वीकारला होता. हे मोठे विश्वासु सेवक असून पडेल तें काम मोठ्या संतोषानें, आस्थेनें व नम्रतेनें करीत.

त्या काळच्या स्त्रिया निर्मळ अंतःकरणाच्या असून पतिसेवेंत आनंद मानणाऱ्या होत्या. व हाच एक आनंद परलोकीं सुख देणारा होय, अशी त्यांची दृढ समजूत होती. गृहकार्यांत ह्या दक्ष असून पापभीरु व धार्मिक असत. देशांत दारिद्य नसल्यामुळें त्या सदा मूल्यवान् वस्त्रालंकारांनीं विभूषित असत.

आपल्या राजांच्या राज्य करण्याच्या उत्तम रीतीप्रमाणें जनक महाराजांच्या पदरींही अष्ट प्रधान होते. राज्याचीं आठ निराळीं खातीं करून प्रत्येकावर एकेक प्रधान नेमलेला होता. हे मोठे विद्वान्, सुशील, कुलीन, कुशल, अनुभवानें व वयानें वृद्ध, शूर, राजाचे हितकारी, गोड व सत्य बोलणारे, व्यवहारामध्यें चतुर, दूरदर्शी, स्वदेशाचे व परदेशांतील जुने व तत्कालचे इतिहास जाणणारे, निस्पृह, स्वाभिमानी, न्यायाच्या कामांत कोणाचीही भीड न ठेवणारे, दयाशील खरे परंतु अपराध्यांस अत्यंत कठोर असे होते. ह्यांच्याकडे राजानें बहुतेक कारभार संपवून आपण परलोक साधण्यांत सर्व लक्ष घातलें होतें. असें होतें तरी ते महत्त्वाचीं कामें राजाच्या आज्ञेवांचून करीत नसत. राजाही वेळोवेळीं त्यांना योग्य सल्लामसलत सांगे. व कांहीं कांहीं महत्त्वाचीं कामें कधीं स्वतःही पहात असे. ह्या अष्टप्रधानांमध्यें सुदमन नांवाचा मुख्य प्रधान होता. हा सर्वांत वृद्ध असून त्या काळीं सर्व पृथ्वींत ह्याच्या इतका एकही शहाणा दुसरा मंत्री नव्हता असें ह्मणत. युद्धप्रसंगादिकाच्यावेळीं दूर दूरचे राजे आपले प्रधान ह्या जनकाच्या प्रधानाकडे सल्लामसलत

विचारण्याकरितां पाठवीत! त्यांना तो संतुष्ट करून परत पाठवी. सर्वत्र काय चाललें आहे हें समजण्य.करितां पाठविलेले विश्वासु वार्ताहर येऊन खरें वृत्त सांगत. न्यायाधीश स्वतः वादिप्रतिवादींचें काय ह्मणणें आहे तें ऐकून त्यांस प्रश्न वगैरे करण तें करी. द्रव्यद्वारें खोटा पक्षही बुद्धिबला-नें न्यायाधीशास खरा ह्मणून भासविणारे त्या वेळीं सध्याच्यासारखे मध्यस्थ वकील नव्हते, ह्यामुळें न्याय मागणारे भिकेस लागत नसत! राजकीय व सार्वजनिक कामांकरितां मिथिलेंत अनेक ठिकाणीं भव्य कचेऱ्या असून मिथिलेच्या बाहेर प्रदेशींही प्रजांच्या हितार्थ योग्य व्यवस्था होती.

ह्या सीरध्वजमहाराजांस कुशध्वज नांवाचा एक कनिष्ठ बंधु होता. हाही आपल्या ज्येष्ठबंधूप्रमाणें गुणशीलानें युक्त होता. त्या दोहों बंधूंमध्यें फारच विलक्षण प्रीति होती. राजाला तो प्रत्येक कार्यांत साहाय्य करीत असे. तोही कुशध्वजास पुसल्यावांचून कोणतेंही काम आरंभीत नसे. हा आपला केवळ सहावा प्राणच असें तो समजे. त्यांस त्याकाळीं लोक सूर्यचंद्राची उपमा देत. त्यालाही लोक जनका-प्रमाणें पूज्य मानीत.

ह्या राजाच्या उपाध्यायाचें नांव शतानंद असें होतें. हा गौतम ऋषीचा पुत्र. ह्याची माता अहल्या. हा ऋषिपुत्र वेदवेदांगांचा, सकल शास्त्रांचा व सर्वस्मृत्यादिकांचा ज्ञाता होता. सर्व ऋषींची व राजकुलांची अतिशय जुनीं इतिवृत्तें जाणणारा हा होता. वयानें वृद्ध, व ज्ञानानें परिपूर्ण असून सर्वांस आपल्या नांवाप्रमाणें शुद्धाचरणानें आनंद देणारा होता. आणखी देशकालवर्तमानलोकस्थिति समज-णारा, बुद्धिमान्, स्पष्टवक्ता, तपोबलरूप ऐश्वर्यानें शोभायमान असा हा होता. राजा ह्याला अत्यंत पूज्य मानून आपला उजवा हात समजे. ह्याशिवाय आणखी यज्ञकर्मांत निपुण व विद्याचारसंपन्न ब्राह्मण ह्या कल्पतरुराजाच्या आश्रयच्छायेखालीं सुखानें वसत होते.

ह्या सीरध्वजजनकराजाची स्त्री सुमेधा नामें होती. ही आपल्या गोड नांवाप्रमाणें मोठी बुद्धिमती होती. ही पातिव्रताधर्माची केवळ माताच, सकलगुणांची खाण, इहलोकींची साक्षात् लक्ष्मी किंवा सर-स्वती, याचकांना कल्पलता, गुरुजनांचे सेवेविषयीं तत्पर, पृथ्वीसारखी

सहनशील, वैभव चंचल मानून कधींच उन्मत्त न होणारी, सर्वांशीं प्रेमभावानें वागणारी, अशी होती.

• श्रोते हो, एवढें वैभव व जवळ सुखांचीं सर्व साधनें तयार असून ह्या राजाला कांहींच संतति नव्हती! ह्यावरून " जनीं सर्वसुखी असा कोण आहे ? " तर कोणीही नाहीं. हें उत्तर मिळण्यासाठीं समर्थांनीं केलेला जो प्रश्नरूपी सिद्धान्त हा त्या कालापासून आजमितीपर्यंत अगदीं खरा आहे. राजानें आपल्यास पुत्र अथवा कन्या कांहीं तरी अपत्य व्हावें ह्मणून बहुत उपाय केले. अनेकविध यत्न केले. अनेक देवतांच्या आराधना केल्या. नारायणनागबलि केले. ऋषिजनांची भक्ति केली. ब्राह्मणांकडून नानाविध अनुष्ठानें करविलीं. त्याच्या प्रियेनेंही पुष्कळ दानधर्म केला. उपवास केले. अनेक सत्पात्र ब्राह्मणांस अष्टफळें दिलीं. सुवासिनी स्त्रियांना पुष्कळ वायनें दिलीं. दूरदूरच्या अनेक पवित्र क्षेत्रीं ब्राह्मण पाठवून त्यांजकडून अनेक देवतांचीं दर्शनें घेववून त्यांस नवस करविले. शतशः ब्राह्मणभोजनें घातलीं. अनेक पुराणें ऐकिलीं. एकांतीं नेत्र मिटून परमेश्वराची प्रार्थना केली. ज्योतिष्यांस प्रश्न विचारिले. अश्वत्थांस प्रदक्षिणा घातल्या. सप्ताह करविले. कोटिलिंगार्चन केलें. सारांश, तिला ज्याज्यावेळीं जे जे कोणी लहान किंवा मोठे उपाय सांगितले ते ते सर्व तिनें मोठ्या श्रद्धेनें, परमभक्तीनें व भावपुरःसर केले. परंतु ते सर्व व्यर्थ गेले! ती अगदीं निराश होऊन गेली. सर्व पृथ्वी तिला शून्य अरण्यासारखी वाटूं लागली. सर्व वैभव तिला तृणवत् भासूं लागलें. कोणाचेंच बोलणें तिला रुचेनासें झालें. अन्नावरून तिची वांच्छा उडाली. सुंदर पदार्थांकडेही ती पाहीनाशी झाली. विशेष अलंकार घालीना. पाहावीं तेव्हां तिचीं नेत्रकमलें अश्रूंनीं भरलेलीं असत. कोणींकांहीं विनंति केली तरी तिचें लक्ष्य तिकडे वळेना. एकांतांतील सुखावरही तिची दिवसेंदिवस अप्रीति वाढत चालली. संतान नसल्यामुळें राजाही आपल्यास फलहीन वृक्षाप्रमाणें समजे! आपल्या हातून पितृऋण फिटलें नाहीं ह्मणून सदा खिन्नमानस होई. आपल्यास मरणोत्तर उदक द्यावयास कोणीही नाहीं, ही चिंता त्यास रात्रंदिवस जाळी. आपल्या पाठीमागें हें एवढें अफाट राज्य नीतीनें व शांततेनें कोण चालवील ह्या विचारसागरांत तो सर्वकाळ

निमग्न झालेला असे. सर्व दिशांभर कीर्तिगंध पसरणाऱ्या माझ्या वंशरूपी चंदनवृक्षाचा माझ्या हातून समूळ नाश होत आहे असें मनांत आणून तो जनकराजा सदा दुःखी होई, परंतु तो महाज्ञानी होता ह्मणून विचारानें अंतःकरणाचें कांहीं तरी समाधान करी. ज्या ज्या वेळीं ती राज्ञी राजाबरोबर अंतःपुरांत असे, तेव्हां तेव्हां तें अंतःपुर स्वच्छ आकाशासारखें दिसे, राजा हा त्यांतील निस्तेज चंद्रमा, अनपत्यत्व-कलंकानें युक्त असून सुमेधा ही त्याच्याजवळ रोहिणीसारखी चमके. इतर दासीजन नक्षत्रसमुदायासारखा दिसे. अस्तु.

ज्या काळीं सूर्य आपल्या प्रखर उन्हानें लोकांस त्राहि त्राहि करून सोडतो, थंड गारपाणी हेंच ज्यावेळेस खरें जीवन होऊन जातें, मनुष्यमात्र घामानें भिजून जाऊन हुश्श करीत गार वाऱ्याची इच्छा करीत असतो, पहावा त्याचे हातांत पंखा डोलत असतो, स्त्रियांचे गाल रातंबीचे पक्व फलाप्रमाणें लाल होऊन त्यांवर घर्मबिंदु मोत्यांप्रमाणें पसरलेले दिसतात, पांथस्थ झाडांखालीं बसून झोंप घेतात, रात्रीं जरा थंडपणा असतो ह्मणून रात्र कधीं येईल असें होऊन जातें, जो तो पर्जन्यकालाची जिवलग मित्राप्रमाणें वाट पहात असतो, गुरेंढोरें पाण्याकडे धावत जाऊन जें थोडेंबहुत पाणी मिळतें तें पीऊन वटवृक्षादिकांच्या दाट व विस्तीर्ण छायेखालीं स्वस्थ डोळे झाकून व पाय पसरून रवंथ करीत असतां मुखावाटे फेंस टाकीत असतात, सर्व पृथ्वी जणूं प्राणिमात्राच्या भारानें त्रासून संतप्त झालेली दिसते, असा सबंध वैशाखमास नुकताच जाऊन जेष्ठ महिन्याचे ह्याहीपेक्षां फार ताप देणारे कांहीं दिवस गेल्यावर पृथ्वीचा संताप दूर करून सर्वांस आनंद देणारे मेघ नभोमंडलांतून संचार करून क्वचित् उदकवृष्टि करीत असतां, एके दिवशीं सूर्यास्त व्हावयास सुमारें प्रहर एक अवकाश असतां सुमेधा राणी आपल्या सुंदर मंदिरांत स्वच्छ शिलामय भूमीवर चिंताक्रांत बसली होती. जवळ दासदासी उभ्या होत्या. दासींनीं बहुतप्रकारें विनयपूर्वक तिच्या चिंतेचें कारण तिला विचारिलें, परंतु तिनें त्यांस कांहींही उत्तर दिलें नाहीं, एवढेंच नाहीं तर जसजशा त्या तिची विनंति करीत तसतशी ती अधिकाधिक दुःखी होत आहे असें दिसे! तिच्या नेत्रांतून वारंवार अश्रु येत, ते ती आपल्या पदरानें टिपी. ही राणीची अवस्था

दासीमुखानें महाराजांस कळली. कळतांच महाराज [illegible] होऊन लगबगीनें तेथें आले. तेव्हां तेथील सेवकमंडळी एकदम चूप झाली. राणी उभी होती. तिचा कर धरून जनकमहाराजांनीं तिला मोठ्या प्रेमानें जवळील पलंगाजवळ नेलें. व आपण त्यावर बसून तिलाही जवळ उजव्या अंगास बसविलें व तिच्या कंठासभोंवतीं आपला उजवा हात गुंडाळून तिला महाराज ह्मणाले, " सुंदरि, चारुशाले, असें एकाएकीं तुला काय बरें झालें ? तुला कोणीं दुष्टानें दुखविलें असल्यास, त्यास तू सांगशील तें पारिपत्य करितों, कोणा अपराध्याला दरिद्री करावयाचें किंवा कोणा भल्या मनुष्यास सधन करावयाचें असेल तर सांग. कोणाला देशाच्या पार करावयाचें असेल किंवा देशांतराहून येथें कोणास आणावयाचें असेल तर तसें बोल. जें जें तू सांगशील तें तें मी करण्यास अगदीं तत्पर आहे. तुझ्या मुखांतून काय तें एकदां येऊं दे, तूं उगाच दुःखी होणार नाहींस. कांहीं शरीरीं समाधान नसेल तर पृथ्वींतील सर्व वैद्य येथें जमवितों. एकादी वस्तु पाहिजे असेल तर ती चतुःसमुद्रापलीकडे अथवा त्रैलोक्यांत कोठेंही असली तरी तुझ्या केव्हांच हस्तगत होईल असें करितों ! मात्र बोल काय दुःख आहे तें. तुझें मुख दिवसास दिसणाऱ्या चंद्रमाप्रमाणें फिकट दिसत आहे. तुझ्या वदनांतून जे दीर्घ उष्णश्वास वरचेवर निघत आहेत त्यामुळेंच काय हीं तुझीं नेत्रकमलें कोमेजून गेलीं आहेत ? ललाटावर घर्मबिंदु असून वेणीही अस्ताव्यस्त झाली आहे. उर उरोजांसह कांपत असून करचरण तर फार उष्ण लागतात. अंगसंस्कारही तूं नीटपणें केले नाहींस. प्रिये, बोल आतां तुला काय होतें तें ? लाजूं नकोस. " ह्या प्रमाणें राजानें तिला अनेक प्रकारें विचारिलें, परंतु ती कांहींच बोलेना, ह्मणून राजानें तिच्या जवळ असणाऱ्या तिच्या अत्यंत विश्वासु दासीला विचारिलें, " प्रियेनें असें हें मौन कां धरिलें हें तुला माहित आहे काय ? " ती मोठ्या नम्रतेनें हात जोडून ह्मणाली, " महाराज, ह्या अवस्थेचें कारण आह्मीं बाईसाहेबांना बहुतप्रकारें विचारिलें, परंतु ह्यांनीं आपलें मौनव्रत सोडिलें नाहीं. ह्मणून मग लगेच हें वृत्त महाराजांस कळवावें लागलें. पण बाईसाहेबांची अशी दुःखावस्था केव्हांपासून झाली हें मी महाराजांस सांगतें. आज

प्रातःकाळीं सूर्योदय झाल्यावर सुमारें चारपांच घटिकांनीं ह्मणजे ज्या वेळीं बाईसाहेब दररोज भगवान् शशिशेखरपिनाकपाणिशंकराची पूजा करावयास आपल्या शिवालयां जातात, त्या वेळीं तेथें गेल्या असतां, कोणीएक स्त्री कमरेवर सुंदर लहान मूल घेऊन देवदर्शनार्थ आलेली बाईसाहेबांच्या दृष्टीस पडली. तिला पाहून बाईसाहेबांना फार आनंद झालाच, पण आपणांस अपत्य नसल्याची त्यांस एकदम स्मृति झाली असावी असें मला तत्क्षणीं बाईसाहेबांच्या चेहेऱ्यावरून भासलें. बाईसाहेब शंकराचें यथासांग अर्चन करून नंदिकेश्वराची पूजा करीत आहेत तों, ज्याचे केश पिकून अगदीं पांढरे झाले आहेत, ज्याच्या कंठांत धवल यज्ञोपवीत असून ज्यानें स्वच्छ वस्त्रें परिधान केलीं आहेत, ज्याचें तेजःपुंज मुख पाहतांच जो मोठा विद्वान् व यशस्वी असावा असें लक्षांत येई, व भव्य आकारावरूनच ज्याचे सदाचाराविषयीं मनांत पूज्यभाव उत्पन्न होई, व ज्याच्या कपाळावरील भस्मावर लावलेलें चंद्राकृति पांढरें चंदनाचें गंधच, हा कोणी शिवभक्त आहे, असें न विचारतां सांगे, असा कोणी एक पूर्वीं कधीं न पाहिलेला वृद्ध ब्राह्मण बाईसाहेबांस भेटला. बाईसाहेबांनीं त्यास तत्क्षणीं नमस्कार केला. तेव्हां त्यानें "सपतिरत्वन्दीर्घायुर्भव" असा आशीर्वाद दिला. नंतर बाईसाहेबांनीं आपल्यास पुत्र नसल्यामुळें रात्रंदिवस होणारें दुःख त्यास कळविलें. "पुत्रप्राप्तीसाठीं जनकराजानें पुष्कळ उपाय केले, हें मला विदित आहे, परंतु दैवाधीन गोष्टींपुढें उपाय चालत नाहीं. अनेक राजांनीं असे यत्न केलेले आहेत व बहुतेकांना पुत्रप्राप्ति झाली आहे, असें असून ह्या अत्यंत धार्मिक राजालाच कां पुत्रलाभ होऊं नये हें समजत नाहीं. थोड्या वर्षांपूर्वीं दशरथराजाला वृद्धपणीं पुत्रकामेष्टियज्ञानेंच चार पुत्र झाले हें तुह्मांस विदित असेलच." ह्याप्रमाणें तो ब्राह्मण बोलला, व लगेच देवदर्शनार्थ गेला. त्याचे बोलण्यांत बाईसाहेबांस पुत्र होणार नाहीं, किंवा कन्याप्राप्तीचाही योग नाहीं असें कांहीं आलें नाहीं. असो, तेव्हांपासून बाईसाहेबांचें म्लान मुख झालें आहे असें मला तर वाटतें."

हें ऐकून राजा तिला ह्मणाला, "हेंच तुझ्या असमाधानाचें व मौनाचें कारण दिसतें; पण तुझ्यासारख्या शहाण्या स्त्रीनें असें करणें उचित नाहीं. तुला ठाऊकच आहे कीं हें सर्व दैवाधीन आहे. आपण संतती-

साठीं कमी उपाय केले असें नाहीं. उपायांनींच अशा मारख्या गोष्टी सर्वकाळ साध्य असतात असें नाहीं. आपल्या पूर्वजन्मींचें एकादें कृत्य मध्यें आड येत असेल, किंवा आपल्या कपाळीं अपत्य नाहीं हा तरी तूं निश्चितार्थ कशावरून केलास ? पुढील काय कोणाला समजतें आहे ? अपत्यप्राप्तीसाठीं केलेले सर्व शास्त्रोक्त उपाय अगदीं व्यर्थ गेले असें आजच तू कशावरून समजतेस ? कांहीं उपाय विलंबानें फलद्रूप होतात. तेव्हां तू निराश होऊं नको; व उगाच खेद करूं नको. अपत्य नसल्यामुळें मलादेखील उदासीनता वाटते, परंतु तुझ्यापाशीं तुला अधिक वाईट वाटेल ह्मणून बहुधा बोलत नाहीं. जगांत खरोखर तोच धन्य होय. तो कोण, तर ज्याच्या शरीरास पुत्रालिंगन सुख मिळतें. ज्याला पुत्राचे मस्तकाचा सुवास प्राप्त होतो. ज्याचे मस्तकावर पुत्राचीं मलिन व आरक्त कमलासारखीं पावलें नाचवीत असतां लागतात. ज्याचीं वस्त्रें मुलास घेऊन घेऊन मळून जातात. ठोदे ठोदे, ह्मणत असतां ज्याचे ललाटाला ललाट घांसतें. बघूं बाळा, तुझ्या तोंडांत काय आहे तें असें ह्मणून ज्याची अंगुलि मुखरसानें ओली होते. ज्याचे कर्ण, बोबडे व अस्पष्ट शब्दांनीं तृप्त होतात. ज्याला मुखचुंबनापुढें सर्व रस तुच्छ वाटतात. ज्याला हास्यानें क्षणभर ब्रह्मसुखांत निमग्न असल्याचा भास होतो. कोमल दंतांकुर पाहून ज्याला ते यशोंकूर वाटतात. रांगावयास लागला ह्मणजे ह्यानें पृथ्वीप्रदक्षिणाच केली असें ज्याला भासतें. चालावयास लागला ह्मणजे हा ज्याला स्वर्लोकीं नेऊन बसवील असें होऊन जातें. बोलावयास लागला ह्मणजे ते बोल जणूं ज्याला वेदाक्षरेंच भासतात. बुद्धिमान्, विद्वान्, पराक्रमी, सुशील, कीर्तिमान्, द्रव्य मिळविणारा, गोड बोलणारा, मातापित्याचे सेवेविषयीं तत्पर असा पुत्र निघाला ह्मणजे ज्याला इंद्रलोकही तुच्छ वाटतो. अशीं पुत्र किंवा कन्या यांपासून मिळणारीं व ज्यांचा मला अनुभव नसल्यामुळें सांगतां यावयाचींही नाहींत अशीं अनेक प्रकारचीं सुखें सर्वांस सुलभ असतात असें नाहीं; तेव्हां तूं शोक करूं नकोस. हें दुःख माझ्यानें परिहार होण्यासारखें नाहीं; सर्वथा दुर्लभ गोष्टीविषयीं खेद करणें व्यर्थ आहे. आह्मांला एक नाहीं तर नाहीं पण माझ्या कुशध्वजाला जरी मूल असतें तरी तें, आह्मांस असल्या प्रमाणेंच होतें. त्या-

कडूनच आह्मांस स्वर्गलोकीं जलांजलि मिळाला असता. मग आह्मांस मुळींच दुःख झालें नसतें. असें आह्मीं कोणतें पाप केलें आहे कीं, ज्याच्या योगानें आमच्या हातून वंशच्छेद होत आहे ! " असें राजा राणीशीं बोलत असतां तो धीरस्वभावाचा होता तरी त्याचें अंतःकरण बर्फाप्रमाणें विरघळून जाऊन त्याचे बिंदु डोळ्यांतून बाहेर पडूं लागले ! कंठ गद्गदित झाला. तत्क्षणीं सुमेधाराणी अडखळत अडखळत बोलली, " आपण सांगितलेंत हें सर्व अगदीं खरें आहे, पण काय करूं ? मन स्वाधीन नाहीं. पुनः पुनः अपत्य नाहीं असें मनांत येऊन अशी स्थिति होते. मूल नसल्यामुळें आपणांस जगांत कोणी नाहीं असें कधीं कधीं मनांत येतें. किती विचार केला तरी कांहीं उपाय चालत नाहीं. मनांत ह्याविषयीं कांहीं येऊं नये ह्मणून दुसऱ्या कार्यांत जरी मन गुंतावेलें तरी तें पुनः आपलें तिकडेच धांव घेतें. सर्व प्रजा आपलीं मुलेंच आहेत ह्यांचें संरक्षण करणें ह्यापासूनच उत्तम गति आहे असा मनांत विचार मात्र येतो, परंतु आपलें मूल व प्रजा ह्यांमध्यें किती अंतर आहे हें, अशासारखी मनाची स्थिति होऊन स्पष्ट दिसतें. आपल्यास माझ्यामुळें आणखी दुःख होतें ह्मणून मी होईल तितकें करून मन आवरतें. पुत्र नाहीं तर नाहीं एकादी सुंदर कन्या जरी असती तरी ती पुत्राचे ठिकाणीं झाली असती. निदान कण्वमहर्षींस जशी शकुंतला तशी जर एकादी आह्मांस प्राप्त होती, तरी मी जगांत आज धन्य धन्य झालें असतें. परंतु असें रत्न कोणीं अभाग्यानें टाकावें आणि तें आमच्या हातांत पडावें इतकें पुण्य आमचे पदरीं कोठें आहे ? असतें तर अपत्याविषयीं अशीं आह्मी आशाबद्ध कां झालों असतों बरें ? "

अशा सारांशाचें त्यांचें बराच वेळ बोलणें चाललें आहे इतक्यांत मेघराजाच्या आगमनानें व सूर्याच्या अस्तानें जिकडे तिकडे काळोख पडला. पर्जन्यानें सर्वत्र गोंगाट सुरू केला. मधून मधून वाऱ्यानेंही धामधूम चालविली. शेतकरी लोक वगैरे भिजून अगदीं चिंब झाले. नगरांतील मार्गांमध्यें लोक कमी झाल्यामुळें ते फार विस्तीर्ण दिसूं लागले. जो तो आपआपल्या घराकडे घाई घाईनें छत्री असूनही भिजत चालला आहे. पागोळ्या पिंजऱ्यांच्या रेज्यांप्रमाणें घराला दिसत आहेत व त्यामुळेंच जशीं काय पिंजऱ्यांतील पक्ष्यांप्रमाणें मनुष्यें

घरांत अटकून राहिलीं आहेत! कोणाला कितीही महत्त्वाचें काम असलें तरी त्याच्यानें बाहेर पडवेना. सर्व मार्ग धुवून स्वच्छ झाले आहेत, लोक सर्वत्र आनंदांत आहेत. अशा समयीं एका शेतकऱ्यानें एक पेटी डोकीवर घेतली आहे, आपली शुभ्र घोंगडी त्या पेटीवर घालून आपण अगदीं भिजून गेला आहे, त्याच्या पुढें एक मध्यमावस्थेचा ब्राह्मण आहे, तोही अगदीं भिजून गेला आहे. असे दोघे राजवाड्याजवळ आले. त्यांस मुख्य दरवाज्यावरील संरक्षकांनीं आंत जाण्यास बंदी केली नाहीं. राजवाड्याजवळ जातांच, "महाराज कोठें आहेत? मला त्यांना ह्या वेळीं स्वतः भेटावयाचें आहे, तेव्हां कृपा करून आंत लौकर जाऊन ते असतील तेथें माझी दाद लागेल असें करा." असें तो ब्राह्मण तेथील द्वारपुरुषांस ह्मणाला. हे अशा ठोम पावसांतून आले आहेत तेव्हां ह्यांचें महाराजांपाशीं मोठ्या महत्त्वाचें कार्य असेल असें मनांत आणून एक मनुष्य सातव्या चौकांत राजाच्या अंतःपुरांतील पहिल्या दरवाज्याजवळ गेला. व तेथें हातांत सुवर्णयष्टि घेतलेल्या प्रतिहारीस त्यानें राजास कळवावयाची विज्ञप्ति कळविली. तिनें तत्क्षणीं राजाजवळ जाऊन प्रणामपूर्वक विज्ञापना केली कीं, "महाराज, ज्याचे मस्तकावर एक मोठी पेटी आहे अशा एका शेतकऱ्यासह बाहेर कोणी एक ब्राह्मण आला आहे, तो ह्या क्षणीं महाराजांच्या दर्शनाची इच्छा करीत आहे." "बरें आहे, त्यांना लौकर आंत घेऊन ये," असें राजानें ह्मणतांच ती प्रतीहारी बाहेर गेली. राणी खालीं भूमीवर उभी राहिली, व जनकराजा जवळ पसरलेल्या एका उत्तम गालिच्यावर त्यांची वाट पहात उभा राहिला. गालिच्यावर शुभ्र आच्छादनाचे टेंकावयास पुष्कळ तक्ये होते. चार पांच मोठमोठ्या सुवर्णाच्या समया त्या समयास तेथें जळत होत्या. त्यांच्या मोठ्या ज्योती, पेटींत काय वस्तु आहे, तिचें तेज कसें आहे, हें अगोदर समजल्यामुळेंच जणूं मंद मंद डोलत आहेत असें वाटे! ह्याशिवाय त्या अंतःपुरांत व बाहेर चोंहोंकडे विपुल दिवे लागले असल्यामुळें स्वच्छ उजेड पडला होता.

राजा मनांत चिंतन करावयास लागला कीं, येणाऱ्या ब्राह्मणानें पेटींतून आह्मांकरितां काय बरें आणिलें असेल? आह्मीं ज्याचें रात्रंदिवस चिंतन करीत आहों असें एकादें पुत्ररत्न किंवा कन्यारत्न तर

तींत नमेचना! रात्रीं मला सुस्वप्न पडलें होतें, मधार्शी इकडे येत असतांही शुभशकुन झाला,व ह्या समयीं तर माझा हा बाहूही स्फुरण पावत आहे! काय चमत्कार तरी हा कीं हजारों शास्त्रोक्त व महापुरुषांनीं सांगितलेले उपाय केले असूनही जें इष्टफल प्राप्त झालें नाहीं,तें अशासारख्या स्वप्नशकुनस्फुरणादिकांवर विश्वास ठेवून, मिळेल ह्मणून दृढाशा करीत बसावें! तस्मात् मनःसमुद्राच्या आशालहरींमध्यें असा कांहीं जोर आहे कीं त्या कोठें जाऊन आदळतील यांचा नेम नाहीं! कारण ह्या महासागराला मर्यादाच नाहीं! किंवा ह्या विप्राला कोणीं त्रास तर दिला नसेलना! पण ही कल्पना खोटी आहे. कारण कीं माझ्या राज्यांत असा त्रासदायक कोणी दुष्ट आहे असें मला वाटत नाहीं. ह्याप्रमाणें राजा चिंतन करीत आहे, तों ज्यांस पुढें प्रतीहारी मार्ग दाखवीत आहे असे ते दोघे मनुष्य तेथें आले. तेथील राजवैभवानें ते दोघेही चकित झाले. राजानें ब्राह्मणाला पहातांच अभिवंदन केलें, व शेतकऱ्याचे डोकीवरील पेटी जवळच्या सेवकाला उतरावयास सांगितलें. ब्राह्मणानें स्पष्टवाणीनें " राजन् विजयी भव " असा राजास आशीर्वाद दिला. राजा उभा असतांच ब्राह्मणास ह्मणाला, " हे भूदेव! आपण ह्या वेळीं, अशा ह्या प्रचंड पर्जन्यांतून येथें येण्याचे श्रम किमर्थ घेतलेत? असें आपणांवर महत्संकट कोणतें आलें आहे? आपणांस कोणीं त्रास दिला काय? किंवा आपल्या ब्रह्मकर्मांत कोणीं विघ्न केलें? अथवा आपलें धन कोणीं लुटलें? ह्या प्रसंगीं सर्व पशुपक्षिजीवजंतुसुद्धां आपल्या विश्रामस्थानीं विश्रांति घेत बसले असतां व बहुतेक लोक आपल्या घरीं स्वस्थचित्त असतां आपण मला दर्शन कशासाठीं दिलें? माझ्या हातून आपला नकळत तर कांहीं अपराध घडला नाहींना? अथवा माझ्या अधिकाऱ्यांकडून आपणांस पीडा पोंचली? झालें तरी काय?" ह्या प्रमाणें राजा बोलतांच ब्राह्मण ह्मणाला, " महाराज, आपण बसावें, मीं येण्याचें कारण सांगतों. " नंतर राजानें त्या उभयतांस कोरडीं वस्त्रें देववून त्यांस योग्य स्थानीं बसविलें. ब्राह्मण राजाजवळ असून तो शेतकरी पाठीमागें बसला. ब्राह्मण ह्मणाला, " ह्या मिथिलानगरीजवळ चार पांच महिन्यांपूर्वीं मला आपण एक विस्तीर्ण भूमि दान केली हें कदाचित् आपले लक्षांत

असेलच. हें क्षेत्र फारच उत्तम आहे. ह्यांतील थोडा भाग खडकाळ असल्यामुळें, पर्जन्याचे दिवशीं तो नागरला असतां उत्तम, असें ह्या हुशार शेतकऱ्यानें सांगितल्यावरून आज त्यानें तो भाग नागरण्याचें मनांत आणिलें. बहुतेक नांगरून झाल्यावर एके ठिकाणीं ह्याच्या नांगराच्या पुढच्या फाळास कांहीं लागल्या सारखें वाटलें. मोठा दगडबिगड असेल तो काढून टाकावा ह्या उद्देशानें ह्यानें नांगर व बैल एकीकडे ठेवून ऐन पावसांतच तेथील सर्व जागा खणून काढली. तों त्यांत ही बंद असलेली सुंदर पेटी सांपडली ! मी तें शेत पाहण्या करीतां घराहून निघून मिथिलेच्या बाहेर पडलों सुद्धां नाहीं, इतक्यांत हा शेतकरी ही पेटी घेऊन मजकडे येतअसतां मला वाटेंत भेटला. त्यानें मला पेटीविषयीं, ही मीं महाराजांस सांगितल्याप्रमाणें हकीगत कळविली. आह्मीं दोघेही परस्पर महाराजांकडे ही जशाची तशी पेटी घेऊन आलों आहों. तर ही आपली आपण घ्यावी. कारण हिजवर सर्व प्रकारें महाराजांची सत्ता आहे." असें ह्मणून त्यानें ती पेटी स्वतः आपण राजापुढें आणून ठेविली. हें ऐकून राजा ह्मणाला, "अहो द्विजवर्य, ज्यापेक्षां ती भूमि मीं आपल्यास समर्पण केली आहे, त्यापेक्षां तिजपासून जें कांहीं प्राप्त होईल त्यावर सर्व प्रकारें तुमचें प्रभुत्व आहे. तेव्हां अमूल्य रत्नांनीं भरलेली असो किंवा कशीही असो, ही आपली आहे." ह्यावर ब्राह्मण ह्मणाला "महाराज, असें कसें होईल ? आपला त्यावेळीं केवळ मला भूमि देण्याचाच उद्देश होता, द्रव्य देण्याचा नव्हता. भूमिदानप्रसंगीं दक्षिणा ती दिलीतच. तेव्हां न्यायदृष्टीनें पाहतां ही पेटी सर्वथैव आपली आहे. माझी हिजवर कोणत्याही प्रकारची सत्ता नाहीं. राज्यांत सोनें, रुपें, हिरे, ह्यांच्या खाणी सांपडतात किंवा अशासारख्या वस्तु मिळतात, ह्यांवर भूमीच्या धन्याची सत्ता नसते. तर सर्वप्रकारें ह्या सर्वांचा स्वामी राजा आहे. कारण भूमि ही राजाची आहे. ती त्यानें नियमित करानें प्रजांस दिलेली असते. जोंपर्यंत प्रजांकडून कर पोंचतो आहे, तोंपर्यंत ती त्यांच्याकडे ठेवणें न्याय्यच आहे. कर पोंचत असूनही ती जमीन राजा कोणाकडून हिरावून घेईल तर तो राजा, जुलमी, चोर, अन्यायी व प्रजांचे शापास पात्र होईल, हें अगदीं उघड आहे. योग्य कारणावांचून ज्यावेळीं राजास कर पोंचणार नाहीं,

त्यादिवशीं ती त्याच्याकडून काढून दुसऱ्यास देणें हें राजाचें कर्तव्य होईल. प्रजा जो कर देतात तो करच सांगतो कीं, भूमि ही राजाची आहे! आतां महाराज ह्मणतील कीं, 'ही भूमि तुह्मांस दान दिली आहे. हिजवर मजकडून कर नाहीं, ज्यापेक्षां कर नाहीं त्यापेक्षां हिजवर आपली सत्ता आहे. ह्या भूमीचे तुह्मी राजे अहां. तेव्हां ह्या भूमिरूपराज्यांतील ठेव ही तुमचीच आहे.' हें ह्मणणें सकृद्दर्शनीं खरें दिसतें, परंतु आंतील वस्तूवर माझा अधिकार पोंचत नाहीं, असें मला माझें मन सांगतें. व आपण मला हें क्षेत्र केवळ धान्य पिकवून खावें ह्या मुख्य उद्देशानें दिलेलें आहे." हें ऐकून घेऊन राजा ह्मणाला, "आपल्या पुढें माझें बोलणें ह्मणजे सूर्याला चंद्रमानें तेज द्यावें अशा सारखें आहे. आपल्या सारखे, व ह्या कृषीवलासारखे निर्लोभी प्रजाजन माझ्या राज्यांत आहेत ह्मणून हें माझें राज्य सुरळीतपणें चाललें आहे. असो; आतां असा वाद करणें योग्य नाहीं, पेटी अगोदर उघडून पहावी, तींत जें काय मिळेल तें आपल्या संग्रहीं ठेवण्यासारखें असल्यास आपण ठेवावें, अथवा माझ्या योग्य असल्यास मी त्याचा स्वीकार करीन. नंतर राजानें ती पेटी उघडण्यास आज्ञा केली. तत्क्षणीं जवळ असलेल्या राजसेवकांनीं ती मोठ्या प्रयासानें उघडली, तों मेघांतून जशी विद्युल्लता चमकावी, अथवा महासागरांतून लक्ष्मी जशी वर यावी, अथवा धुमसणाऱ्या अग्निकुंडांतून जशी ज्वाला निघावी, तशी तींतून अत्यंत देदीप्यमान अशी किंचित् मुखकांति दृष्टीस पडली! तेणें करून सर्वांचे डोळे दिपून गेले. तेथील तेजस्वी वस्तु निस्तेज दिसूं लागल्या. दिव्यांचें तेजही मंद भासूं लागलें. तिला बाहेर गालिच्यासारख्या भूमीवर ठेवतांच ती कन्या आहे असें कळलें. ती मूर्तिमती विद्युल्लता लगेच दुड दुड रांगत सुमेधा राणीकडे गेली! राणीनें मोठ्या प्रेमानें तिला उचलून तिचें चुंबन घेतलें! तिचा अंगवर्ण तप्तसुवर्णाप्रमाणें होता. मुख तर नुकत्या उदय पावलेल्या पूर्णिमेच्या चंद्रमापेक्षांही आनंददायक होतें. त्यावर हरिणाबद्दल त्याच्या नयनांसारिखे मनोरम व चंचल नयन शोभत होते. काळ्याभोर मत्स्याकृति भृकुटि तरतरीत दिसत होत्या. वदन पारिजाताच्या पुष्पाप्रमाणें असून त्याला सुवास येत होता. अधराचा रंग त्याच्या देंठासारखा होता. पुढील

कोंवळी दंतपंक्ति मोत्यांच्या सरांप्रमाणें दिसे. नाक सरळ व अनुपम होतें. ललाट मोठें भव्य असून मस्तकावर तेजस्वी व काजळासारखे काळे कुळकुळीत केश होते. तिच्या मृदु कंठास निरुपायामुळें शंखाची उपमा द्यावी लागत आहे! बाकी कंठ तो कंठ व शंख तो शंखच! हात चांगले गोंडस व मांसल होते, व चांगली उपमा मिळेपर्यंत ते मृणालांसारखे होते, असें ह्मटल्यानेंही त्यांस कमीपणा येतो! हस्ततल तर शुद्ध रक्तकमलेंच, कटि कृश, मांड्या पुष्ट, पावलें कमलांसारखींच दिसत. नखकांतीही विलक्षण होती. सारांश, त्रेतायुगीं जी एक सर्व जगतांत विलक्षण रूपवती स्त्री होऊन गेली, तिचे बालपणीं अवयव कसकसे होते हें त्यावेळेस कळून आलें. अशी ही सुंदरकन्या, अपत्याविषयीं आतुर झालेल्या राणीच्या कडेवर असतां दोघांचीं मुखें हास्ययुक्त दिसत होतीं. राणीच्या अंतःकरणामध्यें जो कांहीं आनंद झाला, तो तिलाच माहित, त्याचें वर्णन करतां यावयाचें नाहीं, व समजावयाचेंही नाहीं. ह्याला अनुभवच पाहिजे. तेथील सर्वलोकांस मोठें आश्चर्य वाटलें व "हा काय चमत्कार आहे?" ह्मणून राजा ब्राह्मणास विचारूं लागला, व ह्मणाला, "अपत्यप्राप्तीस्तव रात्रंदिवस चिंता करणारा जो मी त्या मला हें स्वप्न तर पडत नाहीं आहेना? स्वप्नामध्यें इष्टवस्तु दिसते, व ज्यापेक्षां इष्टवस्तूची मला एकदम प्राप्ति झाली आहे, त्यापेक्षां हें स्वप्न आहे ह्यांत संशय नाहीं." ब्राह्मण ह्मणतो, "महाराज, हें स्वप्न तर खचित नाहीं, हें मी आपल्यास खात्रीनें सांगतों, दिसतो हा प्रकार सर्व सत्य आहे. परंतु हा पाहून मीही आपल्यासारखाच आश्चर्यसमुद्रांत बुडून गेलों आहें!" नंतर राजा जनकानें आपल्या शतानंद उपाध्यायास त्या स्थळीं बोलाविलें. राजाज्ञा पोंचतांच तो तेथें आला. राजानें ह्या अमूल्य व अनुपम कन्यारत्नाचा मुळापासून वृत्तान्त शतानंदजींस सांगितला, व "आतां पुढें आपलें काय ह्मणणें आहे तें मला कळवावें" असें ह्मटलें. हें ऐकून शतानंद उपाध्याय ह्मणाला, "मला तें कन्यारत्न नीट पाहूं द्या." नंतर राणीजवळून तें रत्न राजानें आपल्या जवळ घेऊन उपाध्येबुवांजवळ आणिलें. शतानंद तिला पाहून ह्मणाले कीं, "हिचें भालतल स्निग्ध असून मोठें प्रशस्त आहे व मध्यभागीं किंचित् उन्नत दिसत आहे, ह्यामुळें तें केवळ सुंदर दिसत

आहे एवढेंच नाहीं तर स्त्रीजातकामध्यें हें मोठें सुलक्षण गणलें आहे. ह्याचें फल संपत्तिवर्धक असून पुत्रादिप्राप्तिकारक आहे. ह्या विषयीं असें आहे-" यस्या भालतलं दीर्घं स्निग्धं मध्योन्नतं भवेत् । सा भार्या वर्धते तस्या धनपुत्रादिकं महत्." महाराज, ही मत्स्याकृति पहा कोठें व कशी आहे ती ! ह्यावरून ही खचित अलौकिक पतिव्रता होईल, अर्थात् ही भर्त्याचे ठिकाणीं अनुपम प्रेम करणारी निपजेल. ह्याला प्रमाण असें आहे कीं, " स्तनयोरंतरा यस्या मत्स्यो वा तिलको भवेत्। पातिव्रतपरा नित्यं सा भवेत्पतिवल्लभा." ही सार्वभौमराज्ञी होऊन हिच्या ठायीं दयादाक्षिण्यादि गुण वास करतील असें सांगणारें हें करतलावरील रेखांकित पद्म पहा-" यस्याः पाणितले पद्मं ध्वजो वापि प्रदृश्यते । सा सार्वभौममहिषी दयादाक्षिण्यसंयुता." आणि इकडच्या अंगास ही अंकुशाकृति पहा, ह्या आकृतीचें फल भर्त्याचें यश वाढविणारें आहे, अर्थात् त्याचे हातून महान् शत्रूंचा नाश झाला पाहिजे हें उघड आहे. ह्या अंकुशचिन्हाविषयीं ग्रंथांतरीं असें आहे कीं, "वज्रं पाणितले यस्या अंकुशो वापि दृश्यते। भर्तुर्यशो वितन्वाना खलु शत्रुजयादिभिः" अशीं अनेक सुलक्षणें हिच्याठायीं दिसत आहेत. मला वाटतें कीं, कोणी सामुद्रिकशास्त्रपारंगत हिच्या सर्वांगावरील लक्षणें लक्षपूर्वक पाहून हिचें पुढील सर्व चरित यथाकालीं समजून घेऊन ह्या शास्त्रास जर ह्या काळीं चालन देईल तर हें शास्त्र ह्याहीपेक्षां विशेष मान्यता पावेल. असो. तेव्हां महाराज, ही आपल्या घरीं साक्षात् आदिमाया, लक्ष्मीच आली आहे असें निर्भ्रान्त समजा. आपण अपत्यलाभासाठीं फारच आतुर झालां होतां, व तदर्थ अनेक यज्ञयागही केलेत; तेव्हां लक्ष्मी संतृप्त हाऊन तिलाच वाटलें असेल कीं आपण स्वतः जनकमहाराजांच्या गृहीं जाऊन त्यांस बालकौतुक दाखवावें! हें तरी तिला नुकतेंच वाटलें असेल! कशावरून तर राज्ञीच्या उदरीं यावें तर नवमास तरी आंत राहिलें पाहिजे! पण इतका धीर तिच्यानें धरवेना ! आणखी ही पेटींत कांहीं काल राहूनही सोमलतेप्रमाणें टवटवीत दिसत आहे! ह्यावरून ही मनुष्यकन्या ह्मणावी कीं देवता ह्मणावी ! हिच्या रूपांत तिळभरसुद्धां न्यून नाहीं. ही यौवनांत आपल्या अनुपम सौंदर्यानें त्रिभुवनांतील सर्व सुंदरस्त्रियांना जिंकील ह्यांत संशय नाहीं. हिला वरही हिच्या योग्यतेप्रमाणें रूप-

गुणवैभवानें युक्त असा मिळेल! तो आपल्या पराक्रमानें सर्व जगतास आनंद देईल, मग आपल्यास देईल हें विशेप काय सांगावें ? तोच महाराजांस पुत्राचे ठायीं होईल. हिच्या योगें आपलें कुल यावच्चंद्रदिवाकर कीर्तियुक्त राहील. तर महाराज, आपण होऊन चालत आलेली ही आपली कन्या समजून हिचा आपण सर्वप्रकारें पोटच्या अपत्याप्रमाणें व मोठ्या प्रेमानें प्रतिपाल करावा. ही आपल्या घरीं कामधेनूच चालत आली आहे असें समजा. हिचे आपण आतां सर्व संस्कार करावे. ही जन्मास आजच आली असें समजा." हें ऐकून राजा ह्मणाला, "माझ्याही मनांत असेंच होतें. परंतु ह्यास आपलें अनुमोदन मिळालें हें फार चांगलें झालें." नंतर शतानंद उपाध्याय राजाज्ञा घेऊन स्वस्थानीं गेला. राजानें तें कन्यारत्न राणीच्या हातीं दिलें, ही मुलगी रडत वगैरे कांहीं नव्हती. तर तिचें हास्यमुख होतें. तिच्या मुखचंद्राच्या दर्शनानें राजा जनक व राणी सुमेधा यांचीं अंतःकरणें द्रवून जाऊन तत्क्षणीं प्रेमाच्या अश्रूंनीं त्यांचा अनपत्यत्वदोष धुवून गेला ! परमेश्वरानें केलेल्या ह्या अलौकिक अनुग्रहाच्या योगानें त्यांचे कंठ भरून आले. त्यांच्यानें कांहीं बोलवेना. राजानें त्या ब्राह्मणाचे व शेतकऱ्याचे उपकार मानले व त्यांस राहवून घेतलें. आणि आपण राणीचा निरोप घेऊन ईश्वरलीला अगाध आहे अशासारखे अनेक उद्गार काढीत स्वकार्यार्थ निघून गेला. नंतर लौकरच राणीही त्या कन्येचें चुंबनादिक घेऊन ज्या परमेश्वरानें आपल्यास हें अमोलिक रत्न अर्पण केलें, त्याविपयीं अत्यंत कृतज्ञबुद्धि होऊन नियमित सेवकांसह आपल्या धाकट्या जावेच्या महालांत गेली.

इतका प्रकार झाला तों रात्रीचा प्रथम प्रहर झाला. पर्जन्यवृष्टि नाहींशी होऊन आकाश तेव्हांच निरभ्र झालें. रस्त्यांतून राजकीय रक्षकलोकांवांचून दुसरें कोणी फिरत नव्हतें. तरी ही सुवार्ता सूर्यप्रकाशाप्रमाणें त्या मिथिलानगरींत हां हां ह्मणतां पसरली! ज्यास त्यास प्रातःकाळ कधीं येईल व आपल्या महाराजांस प्राप्त झालेलें दिव्यरत्न आपल्या दृष्टीस कधीं एकदां पडेल असें झालें. राजाची स्थितीही तशीच झाली कीं हें वर्तमान सर्वप्रधानादिकांस व सर्व प्रजाजनांस मी कधीं कळवीन! राजाला व राणीला त्या रात्रीं निद्रा कशी ती लागली नाहीं.

ह्या कन्यारत्नलाभानें त्यांना पुनः पुनः आश्चर्य वाटे. व ही अपूर्व गोष्ट घडली तरी कशी आशा तात्पर्याचें बोलतां बोलतां ती रात्र सरली. व ज्याची राजा व प्रजा वाट पहात होतीं, असा राजाधिराज प्रातःकाळ अगदीं नेमलेल्या वेळीं आला. तत्पूर्वीं पक्षिगण बंदिजनांसारखे मंजुळ मंजुळ गाऊं लागले. मंद मंद वाऱ्यानें चोहोंकडे सुगंध पसरला. सर्व पृथ्वी पर्जन्यानें धुवून अगोदर स्वच्छ केलीच होती. लोकही ताजे तवाने होऊन जणूं त्यास ( प्रातःकाळराजास ) सामोरें जाण्याकरितां घरांबाहेर पडले. अशा समयीं मिथिलानगरींत पहावें त्या घराला अनेक रंगांचे मंगलकारक ध्वज फडकूं लागले! जिकडे तिकडे पुष्पमाला, तोरणें दिसूं लागलीं, गृहांगणांत चित्रविचित्र रंगवल्लि शोभूं लागल्या. राजवाड्यांतही चोहोंकडे मंगलसमारंभाची धामधूम चालली. तें राजमंदिर सुंदरवस्त्रांनीं शृंगारिलें. मंगलवाद्यांचे गजरानें तें नगर दुमदुमून गेलें. इतक्यांत हा उत्सव पहाण्यालाच काय सकलतेजोनिधि भगवान् सूर्यनारायण दिवसासह उदयपर्वताच्या वरवर येऊं लागला! तेव्हां नागरिक स्त्रिया कमलिनींसारख्या प्रफुल्ल वदनें करून, अमूल्य वस्त्रालंकारांनीं नीटनेटक्या नटून राजवाड्याकडे चालल्या. त्यांत कित्येकांचे कडेवर सजविलेलीं लहान मुलें होतीं, कित्येक मुलांना हळूहळू चालवीत नेत होत्या, तेव्हां कधीं कधीं तीं अडखळून पडत सुद्धां! कित्येकांचीं मुलें त्यांचे सेवकांनीं आपल्या खांद्यावर घेतलीं होतीं. ह्यांत कित्येक वृद्ध स्त्रिया होत्या, कित्येक यौवनकुसुमांनीं अगदीं ओथंबलेल्या होत्या. कित्येक लहान मुली होत्या. कित्येक गरोदर असून मंदगति चालत होत्या. पुरुषमंडळी तर कांहीं विचारूंच नका. ज्यांना ह्मणून चालतां येत होतें ते सर्व लहान, मोठे, वृद्ध, उत्तम पोषाग करून राजवाड्याकडे वळले. त्यावेळीं श्रीमान् सावकारलोक वगैरे आपल्या वाहनांतून गेले नाहींत.. त्यासमयीं तें नगर अनेक प्रकारच्या कमलांनीं फुलून गेलेल्या विस्तीर्ण सरोवराप्रमाणें दिसत होतें. सर्व रस्ते भरून चालले होते. राजवाड्याजवळील रस्त्यांवर तर अतोनात गर्दी जमली होती. राजवाड्यांत व सभोंवतालच्या उपवनांत मुंगी शिरण्यास सुद्धां जागा राहिली नव्हती, तेव्हां कदाचित् ह्या ठिकाणीं ही पृथ्वी खालीं दबेल सुद्धां असें वाटूं लागलें! ही सर्व गर्दी कशाकरितां तर आपल्या सदय राजास प्राप्त झालेल्या

अलौकिक कन्यारत्नाचा आपणांस दर्शनलाभ व्हावा ह्मणून! त्या राजवाड्यास जेवढीं ह्मणून द्वारें होतीं तीं सर्व उघडीं केलीं. कांहीं संस्थानिक, व मोठमोठे आश्रितजन तर सूर्योदय होतांच तेथें आले होते! राजानें ह्या कन्येचें जातकर्म यथाविधि करून ब्राह्मणांस सुवर्ण, भूमि, गाई, अश्व, रथ, छत्रें, मेष, पुष्पमाळा, मंचक, आसनें, गृहें, सुवर्णसहित तिळांनीं भरलेलीं पात्रें, इत्यादि पुष्कळ दानें केलीं. मुलीला दुसऱ्या चौकांत एका विस्तीर्ण व सुशोभित दिवाणखान्यांत नानाविध रत्नांनीं मंडित व उंच अशा एका सिंहासनावर बसविलें. ह्या वेळीं तिच्या गळ्यांत मोत्यांचा हार मात्र असून लहान पण किंमतीनें मोठी अशी कंचुकी अंगांत होती; व तिला एक झगझगीत व मूल्यवान् परकर नेसविला होता. तिचे ते काळे केश चांगले विंचरलेले असून त्यांत पुढें ललाटावर पडेल असें हिरे मोत्यांचें सुंदर पिंपळपान घातलें होतें. तिच्या जवळ तिची माता सुमेधाराणी असून आणखी सभोंवती सेवेविषयीं तत्पर पुष्कळ दासी होत्या. तेथें तिला पाहण्याकरितां स्त्रीपुरुषांची फार गर्दी चालली होती. हजारों लोक तिला पाहण्यासाठीं येत होते व हजारों तिचें दर्शन घेऊन आनंदित होऊन जात होते. स्त्रियांनीं एके-बाजूनें यावें व पुरुषांनीं दुसऱ्याबाजूनें यावें, अशी तेथें सुव्यवस्था केली होती. त्या गर्दींत स्त्रिया फार श्रांत झालेल्या दिसत, त्यांच्या अंगाव-रील वस्त्रें अस्ताव्यस्त झालीं असून कित्येकांच्या वेण्या सुद्धां सुटल्या होत्या. त्यांतील पुष्पें व पुष्पांचे हार भूमीवर पडून ते तुडविले जात. कित्येक श्रमाच्या योगानें श्वासोच्छ्वास टाकीत, कित्येकांचे कपाळां-वरील सौभाग्यदर्शकतिलक पसरलेले दिसत. कित्येक घामानें भिजून चिंब होत. कित्येक विश्रांतीसाठीं जेथें कोठें जागा मिळेल तेथेंच बसत. कित्येकांचे त्या गर्दींत अलंकार सुद्धां गळत. "अहो, आतां तुह्मी परता, आह्मांला पुढें जाऊंद्या, आमच्या दृष्टीस राजकन्यारत्न एकदां पडूंद्या, आह्मी येथें केवढावेळ तरी उभें रहावें," अशासारखें ज्याचे त्याचे मुखांतून भाषण येत होतें त्या मुळें; व व्यवस्थेकरितां ठेविलेल्या राजकीय रक्षक लोकांच्या, "चला, आतां निघा; केवढा वेळ पाहतां, पाठीमागच्यांना नको का पाहावयाला?" अशा मोठ्यांनीं होणाऱ्या शब्दांनीं; व तिचें मुख पहात असतां पहाणाऱ्यांनीं अनेक प्रकारचे

आशीर्वादयुक्त व कल्याणपर काढलेले उद्गार ह्यांच्या योगानें; व परत येणारी मंडळी तिच्या रूपाचेंवगैरे वर्णन करीत असतां तिच्या मुखांतून " वाहवा ! वाहवा ! " अशा सारख्या निघणाऱ्या स्तुतियुक्त शब्दांच्या वर्षावानें; व ही कन्या महाराजांस कशी प्राप्त जाहली ह्याविषयीं चाललेल्या बोलण्यामुळें; व कित्येक स्त्रिया मंगलपर गाणीं गावयास लागल्या ह्मणून; व कित्येक स्त्रिया ह्या रत्नावर दुष्टांची दृष्टि लागूं नये ह्मणून मस्तकावर बोटें काड्दिशीं मोडीत त्याच्या योगानें होणाऱ्या कर्कश शब्दानें; व मंगलवाद्यांच योगानें जो एकंदर गोंगाट झाला तेणेंकरून आकाश अगदीं भरून गेलें ! हा दर्शनसमारंभ कमींतकमी दीड दोन प्रहर तरी चालला असेल. ह्या अवकाशांत ज्यांस ती दिसली नाहीं ते लोक तिला पाहण्यास पुढें येतच होते. ही जनककन्या पाहून सर्वांस अत्यानंद झाला. तेथें आलेल्यांस व मिथिलानगरींतील सर्वांस राजानें हत्तीं वरून साखर, जणूं कीर्तीच, वांटिली. त्यामुळें सर्व रस्ते पांढरे च पांढरे झाले ! सुवासिक अत्तरें दिलीं, अनेक प्रकारचीं फुलें, बुका, वगैरे सुगंधी पदार्थ चोहोंकडे उधळीत असल्यामुळें क्षणभर आकाश वर अदृश्य झालें, व भूमि चित्रविचित्र दिसूं लागली. सर्वत्र मेघनादापेक्षांही मोठा असा " जनक महाराजकी जय " शब्द होत होता. राजानें त्या दिवशीं आतिशय खर्च केला. कित्येकांस मोठमोठालीं बाक्षिसें दिलीं, कित्येक लोकांचीं वतनें वाढविलीं, कित्येकांस गांव इनाम दिले, कारागृहांत एकाददूसरा बंदिवान होता त्याची मुक्तता केली ! ज्या ब्राह्मणानें, व ज्या शेतकऱ्यानें हें रत्न राजास दिलें, त्यांसही यथायोग्य बक्षीस देऊन तृप्त केलें. आपल्या कन्यारत्नाच्या आयुष्यवृद्ध्यर्थ आणखी पुष्कळ दानधर्म करण्याचें त्यानें योजिलें, भोजनें घातलीं. आपल्या विस्तीर्ण राज्यांतील सर्व प्रजांस राजानें अशा करण्यानें आपणांस आनंद झाला असें कळविलें. मिथिलानगरींत त्या दिवशीं लोकांनींही आपल्या घरीं मोठा उत्सव केला. जनकराजाचे कारकीर्दींत प्रजाजनांस असा महोत्सवाचा दिवस कधींच आला नव्हता ! त्यारात्रीं पर्जन्य मुळींच नव्हता. त्यामुळें रात्रौ सर्व नगरभर दीप लाविले होते. चोहोंकडे गाणीं सुरू झालीं; राजवाड्यांतही मोठा उत्सव चालला; राजवाडा नानाप्रकारच्या दीपमाळांनीं फुलून गेला होता; प्रतिगंधर्व

अशा गवयांचीं गाणीं होत होतीं; व स्वर्गींच्याच केवळ वारांगना अशांचीं गीतनृत्यें चालू होतीं. त्याकाळीं जे जे महोत्सवाचे प्रकार होते ते ते सर्व सुरूझाले. अशा रीतीनें त्या राजधानात बरेच दिवस उत्सव चालला होता. ह्या उत्सवाच्या रात्रीं त्या विस्तीर्ण नगरींत दिवसाप्रमाणें लोक फिरत होते. सोळावे दिवशीं तिचा नामकरणसंस्कार मोठ्या थाटानें व यथाविधि झाला. शतानंद महोपाध्यायांनीं सांगितल्याप्रमाणें तिचें नांव **सीता** असें ठेविलें. कारण ही ज्या पेटींत होती, ती नांगराच्या पुढच्या सीतास ह्मणजे फाळास लागली होती. तरी पुढें तिला जनकाची मुलगी ह्मणून जानकी, विदेह देशच्या राजाची कन्या ह्मणून वैदेही असेंही ह्मणूं लागले. ह्या नामसंस्करणाचे समारंभांत राजवाड्यांत पुष्कळ नागरिक स्त्रिया जमल्या. त्यावेळीं सुमेधाराणीनें कोणास अलंकार, कोणास वस्त्रें, वगैरे देऊन संतुष्ट केलें. तिलाही त्यादिवशीं मोठमोठ्या लोकांकडून भेटी आल्या होत्या. सधन व राजनिष्ठलोकांनीं ह्या कन्येसाठीं अनेक प्रकारचीं सुबक व दुर्मिळ खेळणीं अर्पण केलीं. पुढें यथाकाळीं आंदोलारोहण, सूर्यावलोकन, भूम्युपवेशन, अन्नप्राशन, कर्णवेध, इत्यादि तिचे शास्त्रोक्त सव संस्कार झाले. नंतर वर्षानें तिचा वाढदिवस आला, तन्निमित्तही राजगृहीं आनंदोत्सव झाला. ह्या पूर्वींच ती चांगली चालावयास लागून उत्तम रीतीनें बोलावयास लागली होती. हिनें आपल्या अस्पष्ट व मधुर बोलांनीं, अनेक प्रकारच्या खेळांनीं व विलक्षण बुद्धिवैभवानें मातापितरांस फार फार आनंद दिला. जसजशी ती कन्या वाढूं लागली तसतशी चंद्रकलेप्रमाणें अधिकाधिक शोभूं लागली. नंतर सुमारें दोनतीन महिन्यांनीं राजपत्नी सुमेधा ही गरोदर आहे असें राजास कळलें. त्यासमयीं राजाच्या व मिथिला नगरींतील सर्व लोकांच्या आनंदसमुद्रास मर्यादा नाहींशी झाली! तेव्हांपासून सीतेवर तर राजाचें व राणीचें जें कांहीं प्रेम जडलें तें कशानेंही स्पष्ट करतां यावयाचें नाहीं. त्यांस आतां आपणांस मूल होत नाहीं असें वाटलें होतें, तें, सर्व सुखाची केवळ खाणच अशा ह्या सीतेच्या प्राप्तीनें आपल्यास प्राप्त होत आहे, अशी त्यांची पक्की खातरी झाली. राजानें आपल्या गर्भवती स्त्रीचे सर्व संस्कार केले. आपल्या राजास पुत्ररत्नलाभ होईल अशी आशा सर्वप्रजांस उत्पन्न झाली; परंतु

तसें न होतां, नवमास पूर्ण झाल्यावर कन्याच झाली. हीही थेट सीते प्रमाणेंच सुंदर होती. ह्या दोन मुली पाहतांच असें वाटे कीं, साक्षात् रमा व उमा ह्यांना पृथ्वीवर कांहीं तरी अलौकिक कृत्यें करणें आहेत ह्मणून ह्या धर्मप्रभु जनकाचे घरीं अवतरल्या आहेत ! ह्या कन्येचें नांव ऊर्मिळा असें ठेविलें. पुढें लौकरच जनकराजाच्या कुशध्वज बंधूसही दोन कन्या झाल्या. मोठीचें नांव मांडवी व धाकटीचें नांव श्रुतकीर्ति.* अशा ह्या थोडथोड्या अंतरानें झालेल्या चार कन्या जनकराजाचे सुंदर गृहरूप आकाशांत तारकांप्रमाणें चकाकत होत्या. ह्या सर्वांनीं आपल्या बाललीलांनीं राजास फार संतोषविलें. ह्यांची एकमेकांवर फारच प्रीति होती. ह्या एके ठिकाणीं खेळत, जेवीत, न्हात बसत, निजत, ह्यांचा क्षणभरसुद्धां वियोग होत नसे ! फार तर काय पण ह्या सर्व श्वासोच्छ्वास सुद्धां एकदम सोडीत असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं ! ह्यांच्या अत्यंत प्रेमामुळें, ह्यांचीं लग्नें होऊन परस्परांचा वियोग होईल तो ह्यांना कसा सहन होईल ह्या विषयींही राजाचे मनांत वारंवार विचार येत असत.

अशीं तेरा चौदा वर्षें गेल्यावर सीता आतां एक दोन वर्षांनीं विवाहास योग्य झाली असें राजास वाटलें. आपल्या प्रिय सीतेस तिच्या रूपगुणशीलाला योग्य व अत्यंत पराक्रमी असा वर कसा मिळतो, व ह्यासाठीं काय उपाय योजावे ह्या विचारांत तो पडला. सुज्ञ श्रोतेहो, आपल्या सारख्यांस मुलगी असून जेव्हां तिचा लग्नसमय येतो तेव्हां बिचाऱ्या आईबापांची काय त्रेधा उडते; हें आपल्यापैकीं पुष्कळांस सांगावयास नको. त्यांचा तुह्मांस अनुभव असेलच. व्यवहारांतील सर्व कृत्यें सुरळीतपणें शेवटास जावयास आदिकारण व मुख्य तत्त्व जें द्रव्य तें अगोदर जवळ विपुल असलें पाहिजे. तें असलें तरी मुलगी रूपवती असावी लागते. बरें ह्या दोन्ही गोष्टी अनुकूल असल्या तर तिला वर ह्मणून जो शोधावयाचा तो चांगला मिळत नाहीं. रूपवान् असला तर बुद्धिमान् नसतो, रूपबुद्धीनें बरा असेल तर तो सधन मिळणें कठिण पडतें. जर कदाचित् त्याचे ठिकाणीं सुरूपता, बुद्धिमत्ता, व सधनता हे तीन्ही गुण असले तर त्याचेठायीं सुशीलता, आरोग्यता, आदिकरून गुण असावेसे वाटतात. ह्या शिवाय मुलीस

ज्यांच्या सहवासानें दिवस काढावयाचे तीं सासूसासरा वगैरे लहान मोठीं पतिगृहांतील माणसें थोर मनांचीं पाहिजे असतात. कन्येस वर शोधीत असतां पित्यास जे श्रम पडतात, जी नम्रता धारण करावी लागते, जीं लोकांचीं अस्पष्ट, कपटयुक्त, अविचारानें भरलेलीं, अहंकाराचीं, कर्णकठोर, थट्टेचीं, अपमानकारक, डौलाचीं, अगोदर मधुर व शेवटीं निराशेचीं, बोलणीं ऐकावीं लागतात, व त्यामुळें त्याच्या चेहऱ्यावर उमटणारी चिंता, औदासीन्य, वगैरे सर्वांविषयीं बोलूं लागल्यास मोठा ग्रंथच होईल.* सारांश, कन्येचे पित्यास जें कांहीं पाहिजे असतें तें सर्व एकत्र मिळत नाहीं; आणखी त्यास तर मुलीवरील अत्यंत वात्सल्यास्तव उत्तम स्थळ हवें असतें. ज्याची ह्मणून कन्या उपवर झाली आहे, त्यास अगोदर चिंताग्नि पोळीत असतोच व लग्नोत्तरही कित्येकांस तो दहन करण्यास सोडीत नाहीं! ही आपल्यासारख्याचीच गोष्ट आहे असें ह्मणाल तर असेंच केवळ नाहीं. जनकासारखा भाग्यवान् राजा असून व त्रिभुवनांतील सुंदरकन्यारत्नांतील शिरोरत्नच अशी सीतेसारखी रूपवती व गुणवती मुलगी पदरीं असतां त्याला तिच्या विवाहाविषयीं काळजी पडूं नये, असें तुह्मांस वाटेल खरें, परंतु तसें नाहीं. ज्याला त्याला आपल्या योग्यतेप्रमाणें किंबहुना आपल्या योग्यतेहूनही अधिक योग्यतेचा वर पाहिजे असतो; ह्यामुळें पिता हा कन्येच्या संबंधानें सदा काळजींत असतो. तात्पर्य कायकीं, कन्यारूप दुसऱ्याचे ठेवींचें आपणांस अगोदर काळजीनें संरक्षण केलें पाहिजे, नंतर तिचा मालक मोठ्या काळजीनें शोधून ती त्याचे स्वाधीन केली पाहिजे व तिचा तो योग्य रीतीनें उपभोग घेतो आहे कीं नाहीं ह्या काळजींत ही आपणास असावें लागतें. असो, ह्या प्रमाणें राजा चिंतेचा धनी झाल्यावर त्याचें राज्यकारभारांत अगदींच लक्ष नाहींसें झालें. दररोजच्या व्यवहारांवरूनही मन उडालें. अनेक देशांतील क्षत्रियराजांचें इतिहासज्ञान, ह्मणजे अमुक देशाचा सांप्रत राजा कोण आहे, त्याचें राज्य कसें चाललें आहे, त्याच्या प्रजा कितपत सुखी आहेत, त्याला पुत्र किती, त्याचें बल केवढें आहे, त्याचे पूर्वज कसे होऊन गेले, हें सूक्ष्म रीतीनें समजून घेऊं लागला; व ह्यासाठींच विद्वान्, कुशल, युक्ति जाणणारे, मधुर असून स्पष्ट बोलणारे, भव्य आकृतीचे,

विद्याचारसंपन्न, काळवेळ समजणारे, अनेक प्रांतांतील रीतीभाती व भाषा जाणणारे, असे अनेक ब्राह्मण मोठ्या मन्मानानें, जें लागेल तें बरोबर देऊन चोहोंकडे पाठवूं लागला; ते जणूं सर्व राजांचीं अंतःकरणेंच घेऊन येतील कीं काय असें वाटे. असे कित्येक दिवस लोटल्यावर त्यांपैकीं कित्येक परत येऊन राजास आपण गेलेल्या प्रदेशांतील सविस्तर वृत्त कळवीत आहेत, राजा त्यांच्यावृत्तकथनाविषयीं स्तुति करीत आहे, त्यांस पुनः दुसऱ्या प्रदेशीं पाठवीत आहे, अशा समयीं ह्मणजे राजांचीं वृत्तें ऐकतअसतां, सीतेलाही राजा बरोबर घेऊन बसे, अशाकारितां कीं कोणत्या राजपुत्राच्या वृत्तांतानें सीतेचें मुखकमल प्रफुल्लित होतें तें पहावें! तीही त्या राजपुत्रांचीं चारित्रें मन लावून ऐके. परंतु ह्यांतील एकही चरित्रापासून तिला अंतःकरणापासून आनंद अथवा उत्कंठा झाली असें कधींही दिसून आलें नाहीं. त्यामुळें राजाचा चिंताग्नि अधिकाधिक प्रज्वलीत होऊं लागला ! व त्याच्या वाफाच काय असे उष्ण श्वास टाकीत एके दिवशीं प्रातःकाळीं सुमारें प्रहर दिवसास राजा यज्ञशाळेंत बसला होता व सीता आदिकरून चौघी बहिणी जवळच आसपास खेळत होत्या, इतक्यांत—ज्याच्या शिरोभागीं शुभ्र जटाजूट मुकुटाप्रमाणें शोभत आहे, किंवा क्षत्रियांस मारून सर्व यशाचा पुंजच काय ज्यानें मस्तकीं धारण केला आहे, ज्याचा ललाटप्रांत मोठा असून त्यावर भस्मांकित असणाऱ्या शिरा जणूं विद्याच प्रकट होऊं पहात आहेत ! ज्याच्या भृकुटि पांढऱ्या व डोळे आरक्त आहेत, ज्याचें वक्षस्थळ विशाल असून ज्यांतील दयारूप ठेव्याचें वरील यज्ञोपवीतरूप भुजंग जणूं रक्षण करीत आहे! आर्तजनांची पीडा दूर करण्याकारितांच काय ज्याचे बाहु लांब आहेत, ज्याचें सर्वांग भस्मानें चर्चिलें असून हस्तामध्यें अक्षमाला आहे. जो चौथा अग्नीच काय ! किंवा पांचवा वेदच काय ! अथवा चालता बोलता धर्मच काय ! किंवा मूर्तिमंत तीर्थच काय ! किंवा जुना कल्पवृक्षच काय ! असा कोणीएक अत्यंत वृद्ध तेजस्वी तापस त्या स्थळीं आला. त्यास उत्तम व उच्च आसन बसावयास देऊन राजानें त्याची विधिपूर्वक पूजा केली व त्याचा फार फार सत्कार केला. व करद्वय जोडून वर मस्तक ठेवून त्याचे चरणमूलाजवळ जाऊन विज्ञापना केली कीं, " अहो ! वीरश्रेष्ठ!

दयासागर, भार्गवराम, आपल्या आगमनानें आज मी धन्यधन्य आहें; आज सर्व वेद ब्रह्मदेवासह माझ्या घरीं आले आहेत असें समजतों, किंवा ह्या स्थळीं मूर्तिमान् धर्मच प्रकट झाला किंवा साक्षात् शंकरच प्रसन्न झाले असें मी मानतों; आज आपल्या दुर्लभ दर्शनानें माझीं सर्व पापें धुवून जाऊन माझा चिताग्नि विझाला. महाराज, आपण मजसारख्याच्या घरीं महेंद्रपर्वतावरून येण्याचे श्रम घेतलेत ह्याबद्दल ह्या चरणांची काय सेवा करावी, ह्या विषयीं आज्ञा ऐकण्यास मी तत्पर आहें; तर कायती कृपाज्ञा व्हावी." हें ऐकून तो श्रेष्ठ तापस ह्मणाला—"मित्रा सीरध्वजा, जनका, अरे आज्ञा कशाची? तुझ्या वैभवास इतके दिवस संतति मात्र कमी होती ती तुला आतां ईशकृपेनें प्राप्त झाली आहे, त्यांत सीता ह्मणून जी तुझी जेष्ठ कन्या आहे ती विलक्षण रूपवती असून गुणवतीही तशीच आहे, व ती आतां विवाहालाही हळूहळू योग्य होणार, असें मी कर्णोपकर्णीं ऐकिलें; तेव्हां अशा कन्यारत्नाच्या दर्शनानें हे नेत्र पवित्र करून तिला कोणता योग्य वर योजिला आहेस हें ऐकून हे कर्ण ही आणखी तृप्त करावे, आणि जर अजून वरयोजना निश्चित झाली नसेल तर एकादी युक्ति सांगून माझ्या वाणीसही धन्यता आणावी ह्या उद्देशानें फिरत फिरत येथें आलों. आणखी तुझ्या भेटीला बहुत काळ होऊन गेला, नाहीं बरें?" हें ऐकतांच राजा ह्मणाला, "भगवन्, क्षुधितास जसें अन्नदान, अथवा मरणोन्मुखास जसें अमृतपान, अथवा अंधास जसें सृष्टिदर्शन, तसें मला झालें आहे." इतकें ह्मणून त्यानें आपल्या सीतादि चारही कन्यांस हांक मारून जवळ बोलाविलें. त्या जनकापाशीं धांवत येत असतां त्या पवित्र यज्ञशाळेंत त्या मूर्तीमती चार श्रुतीच येत आहेत असें वाटे. तापसास पाहून त्यांनीं त्यास नमस्कार केले व मोठ्या मर्यादेनें राजापाशीं उभ्या राहिल्या. जनकानें परशुरामास त्या चारही कन्या दाखवून सीता कोणती, उर्मिळा कोठली, मांडवी कोणास ह्मणतात, व ही श्रुतकीर्ति, असें सांगून त्यांचे गुणांविषयीं व त्यांचे एकमेकांवरील अत्यंत प्रेमाविषयीं कळविलें. परशुरामांनीं त्यांस कांहीं प्रश्न केले, त्यांचीं उत्तरें त्यांनीं मोठ्या मर्यादेनें व स्पष्ट व मधुर अशा वाणीनें दिलीं. तेणेंकरून ते संतुष्ट झाले व त्यांची स्तुति करून त्यांनीं त्या कन्यांस आशीर्वाद दिले.

व "जा आतां तुह्मी खेळावयास," असें ह्मटलें. जनकानेंही त्यांस तापसाच्या आज्ञेप्रमाणें करावयास सांगितलें. त्या तेथून निघून गेल्यानंतर ते राजास ह्मणाले "मित्रा सीरध्वजा, ही सीता खचित मानुषकन्या नव्हे; हिचें दिव्यरूप, अलौकिक लक्षणें, आश्चर्यकारक बुद्धि, हीं पाहतांच असें वाटतें कीं, आदिशक्ति, चिद्रूपा, लक्ष्मी ह्मणतात तीच ही; अशी तुझीपण केव्हांच खात्री झाली असेल. हिला जगतांत कांहीं तरी लोकोत्तर कृत्य करणें आहे ह्मणून तुजसारख्या पुण्यशील राजाचे घरीं ही चालत आली आहे. लक्ष्मीला शोभतील अशाच ह्या तिच्या भगिनीही सर्व गुणांनीं युक्त आहेत! अशा कन्येस अनुरूप पति मिळून सीता व सीताकान्त हीं जगांत उत्तम रीतीनें राहून तुला जगांत धन्यःता यावी, अशी काय योजना केली आहेस, ती आतां मला सांग." राजा ह्मणाला, "ब्रह्मन्, मीं अद्यापि कांहींच तयारी केली नाहीं. मात्र जिकडे तिकडे धर्मशील, शहाणे, विद्वान् असे ब्राह्मण पाठवून, त्यांनीं आणलेलीं राजपुत्रांचीं चारित्रें ऐकत आहें. परंतु त्यांवरून अद्यापि हिला अनुरूप असा राजपुत्र कोठें आढळला नाहीं. ह्यामुळें मी फार चिंतातुर झालों होतों, इतक्यांत आपण आलां; आतां ह्यांतून मला मुक्त करण्याविषयीं आपण समर्थ आहां." ह्यावर तो तपोनिधि ह्मणाला, "राजा जनका, ही साक्षात् ज्यापेक्षां लक्ष्मी आहे, त्यापेक्षां हिला विष्णुसारखा पराक्रमी पति मिळाला पाहिजे, व तो कोठें तरी उत्पन्न झाला आहे हें उघड आहे. तो शोधून काढून त्या भाग्यवानाच्या कंठांत हिच्याकडून माला घालविणें हें तुझें कर्तव्य आहे; मला वाटतें कीं तो वर शोधण्यासाठीं हिचें स्वयवर योजावें, हा उत्तम पक्ष. त्यांत असा पण करावा कीं, जो कोणी कुलीन क्षत्रिय राजपुत्र, तुझ्या घरीं असलेल्या शिवधनुष्यास वांकवून त्यास गुण चढवील तो अतुल पराक्रमी सीतेस माला घालण्यास योग्य होईल. तूं ज्याची यज्ञशाळेंत प्रतिदिनीं पूजा करीत असतोस तें शिवधनुष्य सामान्य नाहीं. ह्याची मूळपीठिका, इतिहास व योग्यता तूं जाणतच आहेस, हें शंकरांनीं तुझा पूर्वज जो देवरात त्यास दिलेलें होतें. हें धनुष्य किती जड आहे व ह्यामध्यें काय दैविक चमत्कार आहे हें मला स्वानुभावें पक्कें माहित आहे; जो ह्यावर गुण चढवून आकर्षण करील तो जगांत अलौकिक पराक्रमी होऊन

दुष्टांस जर्जर करून सोडील ह्यांत संदेह नाहीं; व तो पति शोधण्यासाठीं हा असा दारुण पण पाहिजे सुंदर क्षत्रियकन्यास उत्तम पति मिळण्यास स्वयंवरासारखें दुसरें एकही उत्तम साधन नाहीं बरें तर मी आतां येतों, मला अन्य बहुत कार्यें आहेत. " असें ह्मणून तो तपोधन जाण्याकरितां वर उठला; इतक्यांत राजा सविनय ह्मणाला, " आपल्या आज्ञेप्रमाणें तसें करितों, आपल्या सारख्यांच्या विभूति परोपकारासाठींच जगतांत निर्माण झालेल्या असतात. आपण मला फार चांगली युक्ति सांगितलीत. आपण आज मला चिंतासागरांतून वर काढलें व सौख्यवस्त्रानें पुसून शांतिगृहांत ठेविलेंत. आतां आपल्या दर्शनलाभानें व आशीर्वादानें माझ्या लाडक्या सीतेस चांगला वर मिळो ह्मणजे झालें. " असें ह्मणत आहे तों तो तेजोनिधि जनकास आशीर्वाद देऊन गेला. तत्क्षणीं त्या यज्ञशाळेंत अंधकार पडल्यासारखें भासलें ! नंतर राजा भोजनास निघून गेला. हें वृत्त त्यानें त्या दिवशीं शतानंद उपाध्यांयास मात्र कळविलें.

दुसऱ्या दिवशीं दोन प्रहरानंतर कांहीं संस्थानिक, प्रधानादि कामदार, शतानंदप्रभृति ब्राह्मण, मिथिला नगरींतील मोठ मोठे व्यापारी, सावकार, सभ्य गृहस्थ, इत्यादि लोकांची राजानें मोठी सभा केली. ती इंद्रसभेप्रमाणें शोभूं लागली. तींत बृहस्पतितुल्य शतानंद सर्वांस ऐकूं येईल अशा स्पष्ट व अस्खलित, वाणीनें बोलला, " मांडलिक राजेहो, अहो सुदमनादिप्रधान हो, अहो सर्व सज्जनहो, महाराजाज्ञेनें आपणा सर्वांस मी मोठ्या नम्रतेनें असें विदित करतों कीं, महाराजांची ज्येष्ठ कन्या जी सीता, ती आतां विवाहास योग्य होत आली आहे, तिला अनुरूप पति मिळावा ह्मणून महाराजांनीं वराच्या शोधार्थ देशोदेशीं अनेक ब्राह्मण पाठविले आहेत, अद्यापि सर्व परत आले नाहींत. जे कित्येक आले, त्याणीं महाराजांस अनेक राजपुत्रांचें वैभव, रूप, गुण, पराक्रम, स्वभाव, इत्यादिकांविषयीं सांगितल, परंतु महाराजांस, सीतेला योग्य असा एकही वर पसंत पडला नाहीं. ह्मणून ते चिंताक्रांत बसले असतां ज्याला विष्णूचाच अवतार ह्मणतात, ज्यांनीं आपल्या पराक्रमानें सर्व पृथ्वी गाजवून टाकिली, परमपूज्य, व आपल्या महाराजांचे हितेच्छु, भगवान् जमदग्निपुत्र भार्गवराम काल प्रातःकाळीं

येथें आले होते, ते चार मुलींस पाहून फार आनंदित झाले,पण त्यांत ह्या कन्येचें दिव्यरूप, पराक्रम, लोकोत्तरगुण इत्यादि पाहून फारच संतुष्ट झाले, व महाराजांस त्यांणीं विचारिलें कीं "हिला कोणता वर योजिला आहेस ? " महाराज ह्मणाले कीं "ह्याच चिंतेंत मी आहें, " तत्क्षणीं त्या कृपासिंधूनें महाराजांस सांगितलें कीं, " तुझ्या घरीं जें प्रचंड शिव-कोदंड आहे त्यास जो कोणी क्षत्रियवीर भुजदंडानें वांकवून गुण चढवील, तो तुझ्या गुणवती कन्येस पति योग्य होईल; तर ह्या पणावर तू हिचें स्वयंवर योजावें-" अशासारखें बोलून ते त्वरित निघून गेले. तर आतां सीतास्वयवररूप पवित्र कार्याच्या सिद्धतेस एव्हांपासूनच सर्वांनीं झटलें पाहिजे. कोणी कोणतीं कामें करावीं तें नेमून टाका, स्वयं-वर दिवस आजच जरी निश्चित करतां येत नाहीं, तरी आतां तें कार्य व्हावयास आजपासून निदान वर्ष दीडवर्ष तरी पाहिजे. तर सर्वां-नीं मनःपूर्वक आपापलीं कामें करावीं. सुदमन प्रधानानीं सर्वांच्या अनुमता-नें किती खर्च करावयाचा, व त्यास किती अवकाश पाहिजे हें ठरवावें. महाराजांचें ह्मणणें असें आहे कीं, आजपर्यंत कोणीं असें कृत्य केलें नाहीं, असें झालें पाहिजे; ह्यांत कोणत्याहि तऱ्हेची न्यूनता असतां कामा नये. द्रव्यसंबंधानें मुळींच काटकसर करूं नये. आपण सर्व शहाणे, विश्वासु व कीर्तीच्छु अहां, तेव्हां महाराजांचे इच्छेहूनही उत्तमप्रकारचा हा स्वयंवरसमारंभ होईल असें महाराजांचें ह्मणणें आहे. " असें शतानंद बोलला;. तेव्हां लगेच तेथें 'जनक महाराजांचा जयजयकार असो !' असा कर्णमधुर ध्वनि झाला. नंतर त्या वेळच्या शिष्टाचारास योग्य ते सर्व विधि झाल. नंतर राजा सिंहासनावरून उठला, तत्क्षणीं सर्व लोक उभे राहिले व आपआपल्या स्थानीं गेले.

अनंतर सीतास्वयंवरवार्तारूपवायूनें सीतेच्या दिव्यरूपरूपी पुष्पाचा कीर्तिसुगंध चोंहोंकडे पसरला. ह्या अपूर्व गंधानें हजारों राजपुत्र मधुप अगदीं वेडे होऊन गेले ! व ह्या पुष्पाची आपणास कशी प्राप्ति होते ह्या विचारांत जो तो निमग्न झाला. कोणास कांहीं अन्य व्यवहार सुचनासा झाला. त्यांस विलास आवडतनासे झाले, राज्यांवरून त्यांचें मन उडालें, विद्यामृत तुच्छ वाटूं लागलें, शस्त्र धरणें त्यांस अशास्त्र भासूं लागलें, गजाश्वारोहण, धनुर्विद्या वगैरे युद्धविद्येचा तिटकारा येत

चालल्या, जीवित निष्फळ वाटत चाललें, शरीराचा कंटाळा येऊं लागला जगांत सुंदर असें कांहींच दिसेना! गुरुजनाची आज्ञा, आश्रित जनाच्या विनंति, वाद्यांचे कर्णमधुर ध्वनि, संगीत, नाटकावलोकन, हीं तिरस्करणीय होऊन गेलीं! भोजनाची रुचि, आंबट, तिखट इत्यादि कांहींच कळेनासें झालें! कित्येकांस अंगस्पर्शमुद्धां भासेनासा झाला! कित्येक विलग बोलूं लागले! तरी अद्यापि कोणत्याही राजपुत्रास सीतेच्या पूर्ण मुखचंद्रमाचें प्रत्यक्ष दर्शन झालें नव्हतें. अशी जरी त्यांची स्थिति झाली होती तरी धैर्यरूपनौकेचा आश्रय करून तिच्या अप्रतिम रूप संपत्तीचें कांहीं स्वरूप समजावें ह्मणून मिथिलानगरींत कित्येकांनीं आपले विश्वासु मित्र पाठविले, कित्येकांनीं प्रधानांकडे हें काम सोंपविलें, कित्येकांनीं कुशल ब्राह्मणांस विनंति केली, कित्येक स्वतःच राजपुत्र आपलीं रूपें बदलून तेथें गेले! अशा अनेक रीतींनीं तिला पाहण्याचे उद्देशानें त्या नगरींत लोक येत होते. त्यांनीं अनेक युक्तिप्रयुक्तींनीं तिचें दर्शन घेतलें. तिच्या विलक्षण तेजानें त्यांचीं नेत्रें दिपून गेलीं! हें कामाचें अमोघ शस्त्र आहे, अशी त्यांची खात्री झाली; तिच्या संबंधानें त्यांच्या मनांत नानाविध तरंग येऊं लागले; कोणी ह्मणत आपल्या मित्रांस हिचें वर्णन तरी कसें सांगावें? कोणी बोलत आपल्या मूर्ख राजास हें स्त्रीरत्न न मिळेल तर बरें. कोणाच्या मनांत येई कीं, हिच्या रूपाला अनुरूप असा जेव्हां हिला वर मिळेल, तव्हांच ब्रह्मदेव हें निष्कलंक मानवचित्र निर्माण करण्याच्या स्तुतीस पात्र होईल! कोणाच्या मनांत अशा कल्पना येत कीं आपण आपल्या महाराजांस हिच्या अद्वितीय रूपाविषयीं सांगितलें असतां ते आपल्या सैन्यबळानें ह्या निरपराध जनकमहाराजांस त्रास मात्र देतील! कित्येक राजपुत्र परत जाण्यास नाखूषच झाले! कोणी ह्मणत हिच्या स्वयंवरविधीपर्यंत तरी ह्या नगरींत हिचें जितके वेळपर्यंत दर्शन होईल तें घेऊन, तोच महल्लाभ समजून स्वस्थ रहावें! कारण कीं हिची प्राप्ति आह्मांस कशानें व्हावी? ह्याप्रमाणें त्या काळीं मिथिलानगरींत व बाहेर सर्वत्र सीतेच्या सुरूपाविषयीं बोलणें चाललें असतां त्या अवकाशांत सर्व राजे युद्ध विसरले! एकमेकांचा वैरभाव निमाला! सीतेच्या लाभावांचून अन्यलाभ त्यांस तुच्छ वाटूं लागले! जनकराजाचे मिथिलेंत जो आनंद आहे तो

इंद्राच्या अमरावतींतही नाहीं असें त्यांस भासूं लागलें! स्वर्गसुख मध्या त्या नगरींतच आहे असें जो तो ह्मणे! देवेंद्राच्या अप्सरांनीं सीतेचें दास्यच करावें अशी ही पृथ्वींत रूपानें अप्सरांचीहा अप्सरा आहे असें लोक बोलत! कोठें कुशल चित्रकारांनीं तिचीं चित्रें काढलेलीं लोक पहात आहेत, कोणी तिच्या वर्णनपर कविता रचीत आहेत, कोणी रचलेली कविता पुनः पुनः वाचीत आहेत. कोणी परत जाऊन आपल्या भूपालास तिचें वर्णन ऐकवीत आहेत. पुष्कळ राजांनीं त्यांचे पूर्वजांनीं संपादन केलेलीं मूल्यवान् हजारों रत्नें जनकराजास पाठविलीं, अशा करितां कीं हें कन्यारत्न त्यानें आपल्यास निमूटपणें द्यावें! कित्येकांनीं पूर्वापर मित्रत्वाचें नातें सांगून आपली कन्या देऊन तें वृद्धिंगत करण्याविषयीं सीरध्वजास सन्मानपूर्वक व मोठ्या गौरवानें पत्रें लिहिलीं! कांहींकांनीं तर जर आपली कन्या मला देणार नाहींस तर तुला युद्धांत जिंकून तिचें हरण करूं, असे मिथिलाधिपास धमकीचे निरोपही पाठविले! कित्येक राजांचीं सीतेमुळें आपसांतच युद्धें झालीं! ह्या प्रमाणें जनक राजास पुष्कळांनीं त्रास दिला. जनकपुरीस पुष्कळ बलाढ्य राजांनीं वेढे दिले, परंतु शिवकृपेनें तो राजा सर्वांतून मुक्त झाला. एके प्रसंगीं संकाश्यनगरीचा महाप्रतापी राजा सुधन्वा, ह्यानें सीतारूप दीप कलिकेवर अज्ञानानें लुब्ध होऊन झडप घातल्यामुळें तो पतंगाप्रमाणें रणांगणरूप तैलपात्रांत पडला! नंतर जनकाचा कनिष्ठबंधु कुशध्वज तेथचें राज्य करूं लागला. तेव्हां त्याच्या कन्याही त्या नगरींत पित्यासह राहूं लागल्या. ह्यामुळें सीतेस फार वाईट वाटूं लागलें. अस्तु. जनकमहाराजांस सीताप्राप्तीसाठीं अनेक राजांनीं त्रास देऊन जेरीस आणिलें. त्या मुळें योजलेल्या पणाप्रमाणें आपली प्रियकन्या सीता ही, निर्विघ्नपणें आपल्या पतीस कधीं एकदांची माळ घालते, असें त्यास होऊन गेलें.

अशाप्रकारें मिथिला राजधानींत जनकराजाला अनेक देशचे राजे त्रास देत आहेत; अशांतच सीतेच्या स्वयंवरसंबंधी तयारी मोठ्या झपाट्यानें चालली आहे; हजारों कुशल कारागीर, शतशः व्यापारी, अनेक सावकार, ह्यांची तेथें गर्दी उडाली आहे, अशा समयीं ज्याचे एके अंगास सुमेधा राणी उभी आहे, सीता व उर्मिळा ह्या अत्यंत प्रिय

कन्या जवळ दुसऱ्या बाजूस बसल्या आहेत, असा जनकराजा एके दिवशीं आपल्या अंतःपुरांत सीतेच्या विवाहसंबंधानेंच कांहीं बोलणार होता, इतक्यांत प्रतिहारीनें बाहेर कोणी आल्याची वार्ता त्यांस कळविली. राजाज्ञेनें एक शंकरनामा द्विजश्रेष्ठ आंत आला व नमनाशीर्वादाविधीनंतर दिलेल्या मृदु आसनावर बसून बोलावयास लागला; "महाराज, मी आपल्या आज्ञेप्रमाणें वर शोधावयास गेलों होतों, तो आतांच आलों; मीं जो वर पाहिला आहे, त्याची विद्या, त्याचे गुण, त्याचें रूप, त्याचें वैभव, त्याचा पराक्रम, विनय, त्याचें कुल, शील, त्याची ब्राह्मणांवर भक्ति, इत्यादि कांहीं अवर्णनीय आहेत; त्याच्यासारखा राजपुत्र मीं कोठें अद्यापि पाहिला नाहीं, किंवा ऐकिलाही नाहीं; त्याचें वैभव पाहून मला आतां आपलें वैभव तुच्छ वाटूं लागलें आहे! तो अति उंच व फार ठेंगणाही होणार नाहीं; त्याचा अंगवर्ण श्याम असून तेजःपुंज आहे; त्याचें विशाल कपाल, मंद हास्ययुक्त सुंदर मुख, पाणीदार नेत्र, सरळ नाक, सतेज गाल, रमणीय हनुवटी, प्रशस्त स्कंध, दीर्घ बाहु, विस्तीर्ण उरःस्थळ इत्यादि दोषरहित अवयवांनीं परिपूर्ण ती मानवमूर्ति नेत्रांपुढें निरंतर असावीशी वाटते; त्याचें वय लहान असल्यामुळें आज त्यानें अमुकच महान् पराक्रम केला आहे असें जरी सांगतां येत नाहीं, तरी त्याची धनुर्विद्येंत जी कांहीं अप्रतिम प्रवीणता आहे, त्यावरून सर्व पृथ्वींत हाच एक अमोघ धनुर्धर होईल असें आज लक्षण दिसत आहे. वेदशास्त्रादिकामध्यें तरी त्याच्या बुद्धीची कुशाग्रता किती ह्मणून सांगूं! पाहिजेल ती विद्या अथवा कला असो, तिचें रहस्य आपलें ह्याला माहितच! त्याचें भाषण किती मधुर, शहाणपणाचें व युक्तीचें असतें ह्मणून निवेदन करूं! कितीही कोणीं त्याचा द्वेष किंवा नाश केला तरी तें कांहीं मनांत न आणितां तो त्याच्यावर यथाप्रसंगीं उपकारच करितो; त्यावर कोणीं उगाच बिंदुमात्र जरी उपकार केला असला, तरी तो समुद्राप्रमाणें मोठा मानितो; सर्वदा साधुसमागमाविषयीं अत्यंत आतुर असतो; दीन, पीडित व दुःखी, यांचीं दुःखें ऐकून त्यास फार वाईट वाटतें, ह्मणून त्यांचें सांत्वन करून त्यांचीं दुःखें दूर करण्याविषयीं मनःपूर्वक झटतो; सदा आनंदित असतो; परोत्कर्षानें संतुष्ट होतो; महाराज, मी फार काय सांगूं, सर्व

गुणांचा, सकल विद्यांचा व कलांचा तो शांत सागर असून रूपसंपत्तीचें मातबर भांडारगृह आहे. एव्हांपासून त्याचे बलाढ्य शत्रु त्याला पाहून भयानें थर थर कांपूं लागले आहेत! व त्याचे प्रजाजन हा आपला पुढें राजा झाल्यावर आपणास सध्यापेक्षांही फार सुख होईल ह्मणून आनंद मानीत आहेत. मला तर असें वाटतें कीं, ह्याच्या जन्मानें इह लोकीं मनुष्यास धन्यत्व आलें, त्याचे जन्मभूमीस, सर्व क्षत्रियवर्णास व त्याचे कुलास, गर्व व भूषण वाहण्यासारखें झालें; साधुजनास विश्रांतिस्थान मिळालें; मातापित्यांच्या पुण्याचा कळस झाला. महाराज, ह्या राजपुत्रास केवळ त्याच्याच प्रतिमा असे आणखी तीन बंधु आहेत. ह्यांचें एकमेकांवर कांहीं विलक्षणच प्रेम आहे. ते अजून लहान आहेत ह्मणून त्यांच्या ह्या अप्रतिम बंधुप्रीतीच्या गोष्टी सांगण्या सारख्या फारशा मला माहित नाहींत, परंतु पुढें ह्यांच्या केवळ प्रेमाच्याच कथा ऐकून लोक रोमांचिततनु होऊन प्रेमाश्रु गाळतील! असो, हा राजपुत्र कोण, ह्यानें कोणतें कुल आपल्या जन्मानें पवित्र व धन्य केलें, ह्याचीं पुण्यशील मातापितरें कोण? ह्याचे बंधु कोण, ह्याचा देश कोणता, ह्याच्या भाग्यशाली प्रजा कोण इत्यादि जाणण्याविषयीं आपल्यास उत्कंठा असेलच, तर ऐका."

श्रोतेहो, हा राजपुत्र कोण असावा हें त्या इतिहासज्ञ जनकराजास तेव्हांच समजलें, तरी ह्याचें सविस्तर वृत्त आपल्या प्रिय ज्येष्ठ कन्येस कळावें असें त्याच्या मनांत होतें; कारण कीं, तेवढ्या चरितामृतपानानेंच सीतेच्या मुखकमलावर टवटवी आलेली त्याचे तत्क्षणीं लक्षांत आली, ह्मणून त्यानें तें सविस्तर वृत्त सांगण्याविषयीं त्यास इच्छा दर्शविली. ब्राह्मण पुढें सांगूंलागला:—"येथून सुमारें शें दीडशें कोशांचे आंतच कोशल नांवाचा एक विस्तीर्ण देश लागतो, तो मोठा सुपीक आहे; त्यांत पुष्कळ प्रकारचीं धान्यें पिकतात व दुसऱ्या अनेक वस्तु उत्पन्न होतात; त्यांत उदकाचीही विपुलता आहे, त्यांतून बऱ्याच नद्या वाहतात, त्यांत शरयू नांवाची एक मोठी नदी आहे; त्या देशांत पर्जन्य वगैरे यथाकाळीं पडतो, त्यामुळें तेथें बहुधा दुष्काळ कधीं पडत नाहीं; तेथील लोक फार उद्योगी असल्या मुळें बहुतेक सधन आहेत; ह्या प्रदेशांत लहान मोठीं अनेक नगरें व ग्रामही पुष्कळ आहेत; लोकवसतीही फार आहे;

अरण्यांत ऋषींचे आश्रम बहुत दिसतात; ह्या देशाची अयोध्या नांवाची सार्थवती राजधानी आहे; ही त्या शरयूचे कांठीं आहे. सूर्यवंशांतील अत्यंत पराक्रमी व मूळपुरुष जो मनु त्यानें हें नगर वसविलें; त्या पुरुषापासून आजपर्यंत त्या देशांत मोठे धार्मिक, पराक्रमशाली, व महातेजस्वी सगर, भगीरथ, काकुत्स्थ, रघु, दिलीप, अज, ह्या प्रमाणें एकाच नांवाचे अनेक असे बहुत राजे होऊन गेले; त्यांनीं ही नगरी वाढवितां वाढवितां इतकी कांहीं वाढली आहे कीं, सांप्रत तर असें ह्मणतात कीं हिची लांबी सुमारें अठ्ठेचाळीस कोश असून रुंदी बारा कोश आहे! एवढी मोठी विस्तीर्ण नगरी जगतांत आज कोठेंही नाहीं! हिच्या रक्षणार्थ अनेक भागीं शतघ्नी ( तोफा ) तयार असतात; हींत लोकसंख्याही बरीच आहे; बळकट, उंच व अनेक प्रकारच्या मनोहर वस्तूंनीं परिपूर्ण असे हजारों वाडे आंत आहेत; लोक सधन व सुखी आहेत; मार्ग रुंद व स्वच्छ आहेत; वसति विरळ आहे; धूळ उडूं नये ह्मणून मार्ग पाण्यानें भिजविलेले असतात; चोहोंकडे पांढरींशुभ्र गोपुरें, उंच प्रासादशिखरें, देवालयांचे अत्युच्च सुवर्णमय कळस, त्यांवरील अनेक रंगांचे ध्वज, ह्या सर्वांच्या योगानें ती अयोध्या पुरी सदा नटलेली दिसते. प्रस्तावना, परिभाषा इत्यादिकाच्या योगानें जशी एकाद्या चांगल्या ग्रंथकाराची कृति प्रथम नीरस वाटावी, परंतु आंत आंत शिरावें तों तों मनोहरण व्हावें, त्याप्रमाणें ही नगरी आहे; हींत अनेक रम्य उपवनें, जलमंदिरें, अनेक रमणीय व लोकोपयोगी पदार्थ निर्माण करण्याचीं विस्तीर्ण घरें आहेत. क्रयविक्रयस्थानें तर कांहीं पुसूंच नका; तलाव, सरोवरें, हीं सर्वत्र आहेत; शस्त्रांचीं मोठमोठालीं आलयें आहेत; गज, अश्व, उंटें, बैल, आदिकरून उपयुक्त जनावरें व दुसरीं अरण्यांतील क्रूर व सौम्य जनावरें तेथें पुष्कळ पाहण्यांत येतात; राजाच्याही जनावरांच्या मोठमोठ्या पागा आहेत; नाटकगृहेंही बहुत आहेत; नगरीच्या मधून विस्तीर्ण प्रदेश मोकळे ठेविले आहेत; तेथें सणावारांच्या दिवशीं यात्रा वगैरे भरतात; व कधीं कधीं सैन्यही उतरतें; फार काय सांगूं, ही नगरी आपल्या वैभवानें, शोभेनें व विस्तारानें इंद्राच्या अमरावतीसही मागें सारील! त्या नगरींत शुक्राचार्यच काय तो कवि, पण ह्यानगरींत हजारों कवि व काव्यग्रंथ आहेत!

तींत बृहस्पति हा एकच गुरु, पण हींत शतशः गुरु व शाळा आहेत! तेथें चंद्रालाच काय त्या कला माहित, पण येथें सहस्रशः कला जाणणारे व हजारों बघण्यासारखीं कलाकौशल्याचीं कामें दृष्टीस पडतात! ही शत्रूंस सिंहगुहेसारखी वाटते; हींत मांडलिक राजेही पुष्कळ राहतात; अशा अवर्णनीय अयोध्यानगरीचा सांप्रतचा राजा, अजराजाचा पुत्र दशरथ आहे; हा अनेक पूर्वराजांप्रमाणें मोठा पुण्यशील, तेजस्वी व सत्यवचनी आहे; हा आज फार वर्षें राज्य करीत आहे; हा प्रजाजनांचा प्राण होऊन राहिला आहे; इंद्रासही ह्यानें स्वप्रतापानें अनेक प्रसंगीं मागें सारलें आहे; ह्याच्यासारखा धनुर्धारी सध्या एकही ऐकिवांत नाहीं; हा शब्दवेधी बाण सोडणारा आहे; धर्मशास्त्रविशारद असून मोठा नीतिशास्त्रज्ञ आहे; ह्यानें विधिपूर्वक अनेक यज्ञ केले आहेत; ह्याचे पदरीं अनेक विद्वान् आहेत; ह्याचे जे अनेक गुणसंपन्न अष्टप्रधान आहेत, त्यांत सुमंत्र हा फार वृद्ध असून सारथ्यकामांत फारच कुशल आहे, व जुने नवे इतिहास जाणणारा ह्यासारखा अन्यत्र क्वचितच मिळेल; ह्याला पाहून मला असें वाटलें कीं, जगांत एकापेक्षां एकेक केवढाले विद्वान्, चतुर व शहाणे लोक पडले आहेत, हें प्रवासावांचून कधीं कळत नाहीं; युद्धामध्यें पटाईत असें ह्या राजाजवळ पुष्कळ सैन्य आहे; ह्याचें आचरण ऋषींसारखें आहे, ह्मणून ह्याला कोणी कश्यपमहर्षींचा अवतार ह्मणतात; हा आतां अगदीं वृद्ध झाला आहे; ह्या राजास वृद्धत्वानें गाठलें तरी मूल होत नव्हतें, त्यामुळें ह्याची काय दशा झाली होती, तिजविषयीं महाराजांस सविस्तर सांगणें नकोच! ह्याला अनेक स्त्रिया आहेत, पण त्यांत मुख्य तीन आहेत; अपत्यप्राप्तीस्तव ह्यानें बहुत यत्न केले; शेवटीं त्यानें ब्रह्मविद्येचा केवळ जनकच व ऋषिजनांचा गुरुच असा जो दशरथराजाचा कुलगुरु ब्रह्मर्षि वसिष्ठ ह्याच्या आज्ञेनें, व अनेक ऋषींच्या साहाय्यानें त्यानें अगणित द्रव्य खर्चून यथासांग पुत्रकामेष्टि यज्ञ केला; तेव्हां यज्ञकर्माच्या सामर्थ्यानें ह्मणा, किंवा पूर्वपुण्याच्या अत्यंत प्रतापानें ह्मणा, किंवा त्यास दिलेल्या अनेकऋषींच्या आशीर्वादांच्या बळानें ह्मणा, किंवा प्रजाजनांच्या सुदैवानें ह्मणा, त्यास सर्व लक्षणांनीं युक्त व सौंदर्यांनें अप्रतिम असे त्या तिघी स्त्रियांपासून चार पुत्र झाले; त्यांत

ज्येष्ठ राज्ञी जी कौसल्या तिला जो पुत्र झाला त्याचें नांव राम; मधली जी सुमित्रा ,तिच्या मुलांचीं लक्ष्मण व शत्रुघ्न अशीं नांवें असून कनिष्ठ राज्ञी कैकेयीस झालेल्या पुत्राचें नांव भरत असें आहे; हे चार पुत्र जन्मले त्यावेळेस दशरथराजानें लोकांच्या स्मरणांतून कधींही जाणार नाहीं असा मोठा उत्सव केला; असो; ज्येष्ठ पुत्र जो राम त्यालाच रामचंद्र, रामभद्र, रघुनंदन, रघुनाथ, राघव व लक्ष्मणास सौमित्रि असेंही ह्मणतात. हे चार बंधु मोठ्या प्रीतीनें रहातात ह्मणून मघाशीं सांगितलेंच आहे, पण त्यांत रामलक्ष्मणांमध्यें जें कांहीं प्रेम मला दिसलें, तें कोणत्याही उपमेनें, कसल्याही उदाहरणानें, कोठल्याही भाषेंतील शब्दांनीं स्पष्ट करून सांगतां यावयाचें नाहीं ! मीं ज्याचें गुणवर्णन महाराजांपुढें केलें, तोच हा दशरथमहाराजांचा प्रथम पुत्र रामचंद्र; हे चौघे बंधु वसिष्ठमहर्षींच्या सुशिक्षणानें ब्रह्मविद्येंतही मोठे निष्णात झाले आहेत; ज्याचे सभोंवती अति विस्तीर्ण व परमरमणीय असें उद्यान असून जो केवळ लक्ष्मीचें सासरघर होऊन राहिला आहे, असा ह्यापेक्षांही मोठा त्या राजाचा वाडा आहे, त्यांत ते पित्याला आनंद देण्याकारितां व त्याचे आशीर्वाद व आज्ञा ग्रहण करण्यासाठीं कधीं गेलेले असतात; कधीं त्या राजवाड्याच्या शेजारीं जगांतील रम्यवस्तूंनीं सुशोभित व जलमंदिरें, विहारस्थानें, क्रीधागारें, ह्यांनीं युक्त जीं तिघा राण्यांचीं सुंदर मंदिरें आहेत त्यांत आपल्या मातांचीं नयनें प्रेमाश्रूंनीं भरावयास जातात; ही ह्मणजे सावत्र आई आणि हा ह्मणजे सावत्र मुलगा असें त्यांच्या मनांत कधींही येतनाहीं ! कधीं कधीं ते वसिष्ठमहर्षींच्या यज्ञशाळेंत जाऊन त्यांस नम्रता, सन्मान व आपल्या बुद्धीचा प्रभाव दाखवितात; कधीं धनुर्विद्येच्या अभ्यासाकरितां शरयूनदीच्या अफाट वाळवंटांत जातात; कधीं आपल्या प्रजाजनाचीं अंतःकरणें प्रीतीच्या पाझरांनीं ओलीं करण्याकारितां अयोध्यानगरींतून आपल्या वैभवासह फिरतात; कधीं प्रधानपुत्रांबरोबर मृगयार्थ सुंदर अश्वांवर बसून त्यांस वनांत पिटाळतात; कधीं एकांतीं बसून विद्याभ्यास कारितात; कधीं वृद्धांपासून इतिहास ऐकत बसतात; कधीं स्वतः पुरातन इतिहास व पुराणें वाचतात; कधीं सांप्रतची देशस्थिति व काल जाणून घेतात; कधीं अनेक देशांतील राजनीतिविरील ग्रंथ अवलोकन करतात; कधीं काव्यामृ-

तानें तृप्त होत असतात; कधीं नवीन कविता रचतात; कधीं कविवर्यांशीं, कधीं साधुजनांसह, कधीं ऋषींबरोबर, कधीं कलाभिज्ञ लोकांपाशीं, त्या त्या विषयावर संभाषणें करतात; कधीं प्रजांशीं स्नेहानें बोलत असतात; ह्याप्रमाणें कित्येक कामांत ते नियमानें गुंतलेले असतात व कांहींत ते इच्छेस वाटेल त्या वेळीं निमग्न होतात. ते प्रतिदिनीं पंचपंचउषःकालीं उठून स्नानसंध्यादि सर्व शास्त्रोक्त कर्मे यथाकालीं करतात; धर्माहून प्रियतम कांहीं वस्तु जगांत आहे, असें त्यांस वाटत नाहीं ! हे पुत्र त्या वृद्धराजास प्राणसे वाटतातच पण त्यांतही रामावर त्याचें अत्यंत प्रेम आहे असें कधीं कधीं आढळतें. हे कोठें गेले आणि जर का त्यांस थोडा विलंब लागला तर त्या वृद्धपित्याचे प्राण अगदीं कासावीस होतात ! ह्या चार समवयस्क पुत्रांसाठीं नवीन चार उत्तम मंदिरें बांधलीं आहेत, त्यांतील एकदोहोंचें आंतील काम अजून पुरेंही झालें नाहीं; सध्या ह्यांचीं वयें पंचवीस वर्षांपेक्षां अधिक नाहींत; रामभद्राची पत्रिका मीं मोठ्या प्रयासानें आणिली आहे, ह्याचें जन्म चैत्र शुद्ध नवमीस कर्क लग्नावर बरोबर दोनप्रहरीं झालें आहे; मी येथें ह्यासंबंधानें अधिक कांहीं बोलत नाहीं, पण वसिष्ठासारख्या महर्षींनीं ह्याचे ग्रहादि वर्तवून जीं कांहीं ह्याचेसंबंधानें भविष्यें कथन केलीं आहेत तीं लोकोत्तर आहेत; ह्या रामभद्राच्या हातून दुष्टांचा नाश होऊन साधुजनांस सुख होईल, व हा मोठा पराक्रमी, धर्मज्ञ व सत्यप्रतिज्ञ होईल इत्यादि ह्या पत्रिकेंतील कुंडलीचें सार आहे. आणखी तेथील लोक असें सांगतात कीं ह्यांचे जन्मकाळीं अनेक शुभाचिन्हें झालीं. सांप्रत ज्या ज्या म्हणून उपवर झालेल्या राजकन्यांनीं ह्या राजपुत्रांचें अतोनात वैभव, अप्रातिम गुणवर्णन, व अतुल सौंदर्य हीं ऐकिलीं, त्या सर्वांस कामदेव फार पीडा देऊं लागला आहे! धड त्यांस जेऊं देत नाहीं! निद्रा घेऊं देत नाहीं! कोणाशीं मोकळे मनानें बोलूं देतनाहीं ! फार काय सांगूं आपल्या प्रिय मातापित्यांसही प्रसन्नमुखचर्येनें पाहूं देत नाहीं! त्याच्या चारितश्रवणानें उपवर कुमारिकांचीच केवळ अशी स्थिति व्हावी असें नाहीं; लग्न झालेल्या इतर स्त्रियांविषयीं मी कांहीं ह्मणत नाहीं, पण प्रत्यक्ष विष्णूच्या लक्ष्मीचेंही अंतःकरण चंचल व्हावें, असा त्या रामचंद्राच्या चारित्राचा गुण आहे! महाराज, जशा आपल्या चार कन्या

तसे ते चार पुत्र आहेत; अशी त्यांची स्तुति किंवा वर्णन मी किती करूं? अगोदर दुसऱ्या एकदोन प्रदेशीं वरशोधार्थ गेलों, परंतु तेथें महाराजांस कळविण्यासारखें कांहीं आहे असें मला वाटलें नाहीं, ह्मणून मी येथें न येतां परस्पर दशरथमहाराजांच्या राजधानींत गेलों. त्या रम्य नगरींत मी चार महिन्यांपेक्षां अधिकच होतों; तेथें असतां मीं जें प्रत्यक्ष पाहिलें, अनुभविलें व ऐकिलें, त्यांतील जें कांहीं स्मरलें व स्मरलेल्यांतून जेवढें सांगतां आलें तें आपल्या पुढें निवेदन केलें." असें ह्मणून तो ब्राह्मण मुका राहिला. तरी जनकादि तेथें असलेली अल्प मंडळी ह्या चरितामृतानें अतृप्त असून त्या ब्राह्मणमुखाकडे चकोराप्रमाणें पहात होती! थोडा वेळ तेथें अगदीं सामसूम झालें. कोणी कांहींच बोलेना; तेव्हां तो ब्राह्मण ह्मणाला, "महाराज, अयोध्यापति दशरथमहाराज ह्यांच्या चार पुत्रांचें, त्यांत विशेषतः रामचंद्राचें चरित आपल्यास मीं थोडक्यांत कथन केलें." हें ऐकून रामचंद्राचें चरित्र सांगणें संपलें असें त्यांस वाटून वाईटही वाटलें. असो; हें चरित श्रवण करीत असतांच जनकाचे मनांत आलें कीं, "धनुष्याचा जो आपण पण केला आहे तो व्यर्थ! कारण कीं दशरथपुत्र रामचंद्र हा सीतेला अगदीं योग्य पति असून ह्याचे पूर्वज मोठे प्रतापी होऊन त्यांनीं जगतांत हजारों कीर्तीचीं कृत्यें करून ठेविलीं आहेत. शिवाय ह्या सूर्यवंशीय राजांत राजा दशरथ माझा परम मित्र आहे, तेव्हां सीतारामचंद्रांचा विवाह घडून येण्यास मोठासा प्रयत्न पाहिजे होता असें नाहीं. तो दयासागर भार्गवराम येण्याचे अगोदर ह्मणजे पांच साहा महिन्यां पूर्वी जर ह्या ब्राह्मणश्रेष्ठाचें येणें झालें असतें, तर फार चांगलें झालें असतें. आणखी, सीतेच्या प्रफुल्ल मुखकांतीवरून हिलाही हें चरित आवडलें असें दिसत आहे. परंतु काय करावें? भगवान् परशुरामाची आज्ञा तर मला अशा प्रकारची आहे. दुसरें, सीतेच्या स्वयंवरार्थ त्र्यंबकचापाचा पण लाविला आहे, हें वर्तमान सर्वत्र पसरलें आहे, व तदर्थ बहुतेक तयारीही होत आली. स्वयंवरदिवसही आतां ठरला. फार लांबच्या राजांस निमंत्रणपत्रिका पाठविल्या. तेव्हां पणाविषयीं झालेला निश्चय असत्य करून प्रतिज्ञाभंग माझ्या हातून कालत्रयीं होणें नाहीं. रामचंद्राचा जो लोकोत्तर पराक्रम, व त्याचे

अवर्णनीय गुण ऐकिले ह्यावरून हा पण तो तेव्हांच जिंकील. मीं आजपर्यंत जीं राजपुत्रांचीं चरित्रें ऐकिलीं तीं सर्व ह्या दशरथपुत्राच्या चरित्राच्या पासंगासही पुरणार नाहींत ! ह्मणून तोच दशरथसुत सीतेच्या कंठांत माळ घालील ह्यांत संशय नाहीं. असें जरी मला वाटत आहे तरी हें इतिवृत्त ऐकिल्यापासून मनास स्वस्थता नाहींशी होत चालली आहे. कारण पण आहे हा, ह्यांत कोण यशस्वी होईल व कोणाची फजिती होईल ह्याचा नेम नाहीं. ह्याद्विजवरानें सांगितलेल्या अयोध्या नगरीच्या राजपुत्राचें वृत्त ऐकून मला अत्यंत आनंद होऊन आतां औदासीन्यही वाटत आहे. " ह्याप्रमाणें जनकाच्याच मनाची स्थिति झाली असें नाहीं, सुमेधाराणीसही हा रामभद्र आपल्या सीतेस कसा मिळतो असें वाटूं लागलें. आपली चरित्रनायिका जी सीता तिच्या ह्या शंकरब्राह्मणोक्त रामचरितमंत्रानें सर्वांगीं हळूहळू मदन संचार करूं लागला. त्या ब्राह्मणास तेथून राममूर्ति तर दिसत होतीच, व सीता तर प्रत्यक्ष पुढें होती; त्यामुळें त्यासही असें वाटलें कीं ही सौंदर्यनदी त्या रामचंद्ररूप प्रशांत व गंभीर गुणसागरासच मिळाली पाहिजे. ह्या विद्युल्लतेस त्या मेघाशिवाय स्फुरण पावण्यास दुसरें कोठेंच स्थान नाहीं. नंतर तो ब्राह्मण राजाज्ञेनें राजसन्मान घेऊन स्वस्थानीं गेला. व जनक राजा ही मनाची स्थिति शतानंद उपाध्यायास व प्रधानमंडळीस सांगण्यां करितां निघून गेला.

नंतर बराच काल गेल्यावर सीतेच्या मंद कामाग्नीस साहाय्य करण्याकरितांच काय त्याचा परम मित्र वसंत बरोबर सर्व साहित्य घेऊन पृथ्वीवर आला; तेव्हां मलय पर्वतावरून कामिजनास अतिशय विव्हल करणारा असा वायु अंगास लागूं लागला; तत्क्षणीं असें वाटे कीं ह्या वायूंत तेथील कामातुर झालेल्या नागिणींचे विषारी उष्णश्वास मिळून गेलेआहेत ! बहुतेक लहानमोठे वृक्ष पल्लव, फुलें व फळें ह्यांनीं शोभत होते; तरी त्यांत करीरवृक्षांसारखे पर्णफलहीन ह्मणून जन्मदारिद्र्यांप्रमाणें दुर्दैवी दिसत आहेतच ! हाच ऋतु आपणाला मानवतो, हें सांगण्याकरितांच काय मोठमोठाले वृक्ष डोलत आहेत, मोगरीसारख्या वेली इतर ऋतूंला हसत आहेत व मालती जाई वगैरे सुंदर लता आह्मी ह्या ऋतूंत फुलणारच नाहीं ह्मणून हट्ट घेऊन बसल्या आहेत ! गुलाब, पाटल तर

अगदीं भरांत आले आहेत; चांफेवगैरे आपली सुगंधरूपी कीर्ति दिगंतीं पसरीत आहेत; गुलछवू, कोऱ्हांटी वगैरे असंख्य फुलझाडें व वृक्ष फुलिलेले पहातां असें वाटे कीं जो तो आपलें वैभव वसंतास दाखविण्या-करितां पुढें सरसावला आहे! लहान लहान जलाशय, सरोवरें, नद्या; स्वतः उदकरहित ह्मणून, मत्सऱ्यांच्या अंतःकरणाप्रमाणें शुष्क दिसत आहेत! चोहोंकडे वनांत, उपवनांत घमघमाट सुटला आहे! कोकिलांच्या पंचम स्वरानें हृदयास उत्कंठित होण्याविषयीं उत्तेजन मिळत आहे; हजारों पक्ष्यांचे कळप रानांत इकडून तिकडे लगबगीनें धांवत आहेत; त्यांना कोठलीं फळें खाऊं, कोठलीं टाकूं, कोठल्या फुलांतील मध प्राशन करूं, कोणत्या पल्लवयुक्त वृक्षांवर बसूं, हें कांहींच सुचेना, त्यामुळेंच ते जणूं कलकल करीत आहेत! कामदेवास वसंतराजाचें साहाय्य मिळतांच तो गुप्तपणें भ्रमररूप गोळ्या जगतावर सोडूं लागला कीं काय असें लोकांस वाटूं लागलें आहे! कामाचे ध्वजच काय असे अनेक प्रकारचे उंच उंच वृक्ष चोहोंकडे फुलून गेले आहेत! मानिनी स्त्रियांचा राग जाऊन त्यांचे ठिकाणीं नुकताच अनुराग उत्पन्न होऊं लागला आहे! आम्रमंजरीच्या परिमलानें दशदिशा कोंदून गेल्या आहेत; विरहिणी स्त्रियांच्या दुःखानें दुःखी झाल्यामुळेंच काय बकुलतरु पुष्परूप आसवें गाळीत आहेत! रात्री पण त्यांचें अल्प दुःख तरी कमी व्हावें ह्मणून लहान झाल्या आहेत! विरहिजन कामानें आर्त झाल्यामुळें दीनवदन दिसत आहेत! मृगनयना स्त्रियांच्या नेत्रांचें अनुकरण करणारीं कमलें विकसित झालीं आहेत! ही वसंत शोभा दिसावी ह्मणूनच काय विश्वचक्षु सूर्य-देखील ह्या समयीं मंदगति चालतो व आपली दृष्टि प्रखर करितो! रात्रौ स्वच्छ कर्पूराप्रमाणें फटफटीत चांदण्यांत सौधावर बसून कित्येक युवयुवति प्रीतीचीं भाषणें करीत चंद्रमाकडे पहात आहेत; कित्येक चंदनाच्या उट्या लावून वारा घेत आहेत; कित्येक सुवासिक पुष्पांचे हार गळ्यांत घालीत आहेत! कित्येक अत्तरांच्या सुवासांत दंग होत आहेत! राजाच्या उत्तेजनानें जशा कला तशा नक्षत्रनाथाच्या साहाय्यानें चोहोंकडे कुमुदिनी विकसित झाल्या आहेत. अशी अनेक प्रकारें वसंतानें वनांत, उपवनांत, घरीं दारीं, चोहोंकडे धामधुम चालविली असतां जनककन्येच्या अंगीं इतके दिवस धुमसत राहणारा

मंद कामानल प्रज्वलित झाला. त्याचें कांहीं तरी शमन व्हावें ह्मणून तिच्या सख्यांनीं नानाप्रकाचे थंड उपचार केले; चंदनाचा रस तिच्या सर्वांगास अनेक वेळ लाविला; तिला पुष्पशय्येवर व पल्लवांचे शयनावर अनेक प्रसंगीं निजविलें; कमलपत्रें हृदयावर ठेविलीं; वाळ्याचे पडदे भिजविले; बर्फाचे तुकडे उरावर ठेविले; कमलांच्या देठांच्या माळा गळ्यांत घालून वलयें हातांत घातलीं; सर्वांगीं मोत्यांचे चूर्णाचा लेप लावून पाहिला; अनेक प्रकारच्या विंझण्यांनीं तिला एकसारखा वारा घातला; चंद्रकांतमण्याचे आरसे दाखविले; तिला कारंज्यांच्या विस्तीर्ण गृहांत नेऊन बसविलें; तिला कांहीं तरी सुखास पडावें ह्मणून योग्यप्रसंगीं अनेक रमणीय स्थलीं नेलें; अनेक मनोहर पदार्थांचें दर्शन करविलें; तिला आवडणाऱ्या वस्तू तिच्या समोर आणिल्या; उपवनांत नेलें; ह्याप्रमाणें त्या कालीं जे जे शीतोपचार साध्य होते ते ते सर्व सख्यांनीं निरलसपणें, मोठ्या ममतेनें व आस्थापूर्वक केले; परंतु रामाच्या गुण-युक्त चारितघर्षणानें तिच्या हृदयारणीवर जो कामाग्नि उत्पन्न झाला तो अशा उपायांनीं लेशाही शमला नाहीं इतकेंच नाहीं, तर उलटें असें वाटूं लागलें कीं हे उपाय, त्या अग्नीस अधिक प्रज्वलित होण्यास जणूं साहित्य झालें आहे! सीतेची ही स्थिति कशामुळें झाली हें कित्येकांच्या जरी अगोदर लक्ष्यांत आलें नाहीं, तरी चतुर सख्यांनीं ही मदनबाधा आहे असें तेव्हांच ताडिलें! व ह्मणूं लागल्या कीं, “ आह्मी जरी असे शतशः उपाय केले तरी हिची ही पीडा अशा प्रकारें दूर होणार नाहीं; ह्मणून हा दुष्ट मदन तुला केव्हां पासून अशी पीडा देऊं लागला? तूं त्याची काय खोडी केलीस? तुझें लक्ष्य कोणीकडे गेलें आहे? हें विचारिलें पाहिजे. नाहीं तर हिची ही स्थिति जनक महाराजांस कळविणें भाग आहे; कारण ही कामरोगानें दिवसें दिवस अशक्त होत चालली आहे! हिचें मुखकमल तर कोमेजूं पहात आहे! हिनें भाषण करण्याचें सोडलें, अन्नाचा त्याग केला, निद्रा टाकिली, ही स्नेहाला कंटाळली, सखीजनांचा तिरस्कार करूं लागली, मातापित्यांवरील हिची पूज्यबुद्धि कमी होत चालली, भगिनींवरील प्रीति उडत चालली, ही वेणीफणी धड करीत नाहीं, वस्त्रालंकाराकडे लक्ष देत नाहीं, हिची रसिकता अस्तास गेली! ” नंतर सर्व सख्यांनीं असा बेत केला कीं

हिची अत्यंत प्रियसखी विजया हिनें एकान्तीं सीतेच्या अशा स्थितीचें कारण विचारावें.

असें ठरल्यावर दुसऱ्या दिवशीं, ज्यावर अनेक प्रकारच्या लतांचें इतकें गर्द वेष्टन होतें कीं, वर बिंदुमात्रही आकाश दिसत नव्हतें; ज्याच्या चारही बाजूंस दाट पल्लवांच्या लता भिंतीच बनल्या होत्या, पण एकेबाजूस आंत जाण्यास लहानसा एक दरवाजा होता त्यांतून नम्र होऊन ज्यांत प्रवेश करावा लागे; ज्याच्या वरील व बाजूंच्या वेली पुष्पांनीं फुलून गेल्या होत्या, त्यामुळें ज्यामध्यें सुवासाचा घमघमाट सुटला होता; ज्याच्या आंत आंत रात्रीप्रमाणें निबिड अंधकार पडला होता; ज्यास्थलीं बसण्याकरितां संगमरवरी दगडांचे गुळगुळीत प्रशस्त ओटे केलेले होते; ज्यामधून तुडुंब भरलेले व एकमेकांस छेदणारे असे उदकाचे पाट वहात होते, त्यांत वरील पुष्पें व मकरंद पडल्यामुळें पाणी मंदगतीनें वहात होतें; अशा जनकमहाराजांच्या वाड्याजवळील उपवनांतील रम्य व विस्तीर्ण लतामंडपांत त्या विजयेनें सीतेला बोलत बोलत आणिलें; व त्या ओट्यावर तिला आपली मांडी उशाला देऊन निजविलें आणि येतांना तिनें आपल्या बरोबर आणलेलीं कमलपत्रें उरावर ठेवून मृणालांचीं वलयें गळ्यांत व हातांत घातलीं व केळीच्या हिरव्याचार पानानें तिला वारा घालीत असतां ती मंद स्वरानें ह्मणाली:—" अग सीते, ह्या वैशाख अखेरीस महाराजांनीं तुझें मंगल स्वयंवर करण्याचें योजिलें असून ह्या समयीं तूं काय बरें आरंभिलें आहेस हें ? तो विवाहसमय अगदीं जवळ येत चालला आहे; मला वाटतें आतां त्याला पुरे वीस दिवसही नसतील. तुझ्या ह्या मंगलकार्यासाठीं महाराज किती झटत आहेत हें तुला ठाऊक आहेच. स्वयंवरार्थ बहुतेक राजपुत्र आपल्या नगरींत येऊन उतरले सुद्धां; कित्येकांचे पुढें प्रधान आले; कित्येकांचें सैन्य येऊन ठेपलें; लांबलांबचे ब्राह्मण, तसेच महाराजांच्या अफाट राज्यांतील प्रजाजन हळूहळू यावयास लागले आहेत; शतशः कुंकुमलग्नपत्रिका पाठविल्या असून अजून कोठें कोठें जवळ पाठविण्याचें काम चाललें आहेच; ह्या स्वयंवरप्रसंगानें येथें अतोनातच लोक जमणार आहेत; ह्या स्वयंवरोत्सवसमारंभाचा जो कांहीं थाट उडणार आहे तसा पूर्वीं क्वचित् झाला असेल व पुढें ही कधीं

होणार नाहीं असें ह्मणतात ! महाराजांनीं ह्या उत्सवार्थ लागेल तित के द्रव्य खर्चण्याची आज्ञा दिली आहे. हें सर्व कांहीं महाराजांचें तुजवरील अत्यंत वात्सल्य करवीत आहे, समजलीस ? हा समारंभ ज्यांचे दृष्टीस पडेल त्यांचेच नेत्र धन्य होत. सीते, आपल्या घरचें शंकरचाप सामान्य आहे असें तू समजूं नकोस; ह्याचा पूर्वापर सर्व इतिहास तुला माहितच आहे; ह्यावर गुण चढविणारा राजपुत्र मोठा बलाढ्य असला पाहिजे, अर्थात् तो संपत्तिमान्‌ही असणारच; त्या पराक्रमी राजसिंहाच्या पुष्ट कंठांत तू माळ घालशील व तुला तो मोठ्या थाटानें स्वराजधानीरूप गुहेंत घेऊन जाईल ! मग आमची तुला तिळ-भर सुद्धां आठवण होणार नाहीं ! आह्मांसर्वांस तुझ्या वियोगानें अत्यंत दुःख होणार आहे; तरी पण तूं सुखी झालीस ह्मणजे अह्मासही त्यांत सुख आहे; अग सीतालते, पतिरूप कल्पतरूला वेढून टाकण्या-चे व प्रफुल्लित होण्याचे तुझे दिवस अगदीं जवळ आले असतां तू अ-त्यानंदांत असावें, ती अशी अगदीं उदासीन कां झाली आहेस ? तूं आतांशी नीट कां बोलत नाहींस ? हें महाराजांस समजल्यावर त्यांना वाईट नाहीं का वाटावयाचें ? आपल्या मनांतील आपल्या जिवलग मैत्रिणींस सुद्धां सांगावयाचें नाहीं ? कीं तुझी तशी मैत्रीणच कोणी नाहीं ? असें काय तें अगदीं गुप्त आहे, कीं ज्याच्या योगानें तू दिव-सेंदिवस क्षीण व फिकट होत चालली आहेस ? जानकी, पोटांत रोग झाला ह्मणजे तो जसा वैद्यास सांगितला पाहिजे, त्याप्रमाणें अंतःकर-णास जाळणारें दुःख आपल्या जिवलग मैत्रिणींस कळविलें पाहिजे. आपल्यावर ममता करणारांस आपलें दुःख सांगून कमी होतें हा अनुभव अजून तुजसारख्या सुखांत असलेल्या मुलीस कोठून येणार ? एकाद्या-वेळेस आपणास अज्ञानानें मोठेंसें दुःख ह्मणून वाटत असतें, परंतु तें योग्य मनुष्याला सांगतांच त्याचा प्रतीकार होतो. मी आतां फार बोलत नाहीं, कोणी इकडे येऊं लागेल. तू अगदीं मनांत कांहीं न ठेवितां काय असेल तें स्पष्ट सांग. दुसऱ्यास सांगण्याजोगें नसल्यास, किंवा सांगण्यासारखें असूनही कोणापाशीं बोलूंनये असा तुझा आग्रहच असल्यास मी अगदीं कोणापाशीं बोलणार नाहीं; तू जसें गुप्त ठेविलें आहेस तसेंच ठेवीन. माझें आणि तुझें अन्तःकरण काय निराळें आहे?

मला वाटतें तुझा कोमल कर कधीं एकदां [illegible]च्या करास [illegible] असें तुला झालें आहे, आणि त्यामुळें तू हें दुःख [illegible] परंतु त्या मंगल प्रसंगासही अवधि आतां राहिला नाहीं. तो तुझ्याकडे चालत येत आहे. उतावीळ होऊंनको. सीते, मी आतां कांहीं बोलत नाहीं, मुकी राहेलें. तर सांगपाहूं कायतें लौकर. का कोणा भाग्यवान् राजपुत्रावर तुझें मन बसलें आहे ? पण असा अद्यापि कोणी राजपुत्र तुझ्या दृष्टीस पडला नसावा असें मला वाटतें. कीं महाराजांनीं तुला वर शोधावयास पाठविलेल्या कोणा ब्राह्मणानें सांगितलेल्या कोणा राजपुत्राचें नुसतें चारित्रच ऐकून तू वेडी होऊन गेली आहेस ? झालें तरी काय ? सांग सांग पुरे आतां लाज. लाजेला तरी कांहीं मर्यादा पाहिजेच. " ह्याप्रमाणें सीतेची अत्यंत प्रियकर सखी विजया बोलून तिच्या कोमलांगावरून हळूहळू हात फिरवूं लागली. सीता तर ह्या वेळीं अगदीं स्तब्ध होती. तिचें सर्व अंग रोमांचानें फुलून गेलें, घामानें डवडवलें, अधर हलूं लागला, व थरथर कांपत असतां ती अडखळत अडखळत बोलूं लागली, "प्रियसखि विजये ! अग मला कोणीकडे इकडे एकटीला आणींत आणलेंस हें ? आणि अलीकडे तूं अशी काय बोलूं लागली आहेस, कीं त्या शब्दांच्या वाफाऱ्यांनीं माझ्या सर्वांगाची आपली कहालीच व्हावी ! डोळ्यांतून उष्ण अश्रु पडावे ! मुखांतून ऊन ऊन श्वास निघावे ! व हृदय अगदीं उडूं लागावें ? " नंतर ती चतुर सखी ह्मणाली, " प्रियसखि, तूं जरी मला सांगण्याविषयीं फार आढेवेढे घेत आहेस, तरी मी आतां तुला स्पष्ट सांगतें कीं कोणातरी चंद्रासारख्या शीतलप्रकृति व गुणवान् राजपुत्रावर तुझें मन गेलेलें आहे; आणि ह्यामुळेंच मदनाग्नि तुला फार ताप देत आहे. आणखी त्यांत त्याचा मित्र वसंतही त्यास सध्या साह्य करीत आहे ! ह्मणून ह्मटलें ह्या ऐन दुपारीं एकाद्या एकान्त व शीतळ प्रदेशीं जावें ह्मणजे तेथें तुला अल्प विश्रांति व कांहीं सुखही वाटेल, आणि मनची गोष्टही मजजवळ बोलशील; ह्या आशेनें तुला मीं ह्या संतापहारक लतामंडपांत आणिलें. " काय प्रियसखि, " सीता ह्मणते, " मी ह्या वेळीं लतामंडपांत आहें ! असा कसा हा शरीराची आगआग करणारा तुझा लतामंडप ? " " तर मग तुला कसा पाहिजे आहे तो

बोल." असें ती विजया बोलतांच, जनकनंदिनी आर्त्तस्वरानें ह्मणाली, "सखि, प्रियसखि, तुला सांगून तुला दुःख मात्र होईल; मला फारच लज्जा वाटते; अग कोणी ऐकत तर नाहीं ना ! माझी अशी अवस्था कशानें झाली हें तूं, चतुरे, जाणलेंच आहेस; मग तुला सांगावयाचें तें काय उरलें? सखि, तो लतामंडप कसा आहे ह्मणशील तर— अनेक प्रकारच्या विद्यालतांचें ज्यावर छत झालें आहे, जेथील यशोरूप पुष्पांच्या सुवासानें सर्व जगत् कोंडून जात आहे, ज्यामधून दया स्नेहादिकांचे तुडुंब भरलले निरतर पाट वहात आहेत, जेथून अनेक गुणगणपक्ष्यांचा समुदाय रात्रौ सुद्धां ढळत नाहीं, ज्याचा वर्ण सजल मेघासारखा श्याम असून याचकांवर धनवृष्टि करणारा, ज्याच्या आश्रयच्छायेखालीं हजारों लोक सुखानें रहातात इतका तो विस्तीर्ण व रम्य आहे." इतकें बोलून ती दीर्घ श्वास सोडून स्तब्ध राहिली. तेव्हां ती विजया ह्मणाली. "अग, तो लतामंडप कोठल्या उपवनांत आहे? तो तुझ्या दृष्टीस कसा पडला? त्याची रमणीयता तुला कशी कळली? तें सांग लौकर. अथवा सीते असें कशाला? स्पष्ट शब्दांनीं, तो दैववान् पुरुष कोण तो सांग ह्मणजे झालें" हें ऐकून सीता ह्मणाली, "त्या पुण्यवान् पुरुषाचें पवित्र नाम ह्या अभागिणीनें ह्या अपवित्र वाणीनें उच्चारून त्यास कलंक लावावा हें वरें नाहीं. सखि, माझें मन त्यावर गेलें आहे, परंतु माझी वार्ताही त्याला ठाऊक नसेल. आणि ठाऊक असली ह्मणून त्या मदनमनोहरानें माझ्याकडे पहावें असें माझ्या ठिकाणीं काय आहे? सखे, माझें मन दुर्लभ पुरुषावर गेलें आहे ग! तेथून कांहीं केल्या परतत नाहीं. आतां मरणावांचून मी कोणास शरण जावें? तेव्हां माझ्या जीवाची तुह्मी आशा सोडा!" असें ह्मणून ती ढळढळां रडूं लागली, ती त्या काळीं पूर आलेल्या नदीप्रमाणें दिसूं लागली! नंतर त्या विजयेनें महत्प्रयासानें तिला उठविलें व घट्ट मिठी मारून तिचे ते मृणालासारखे कोमल कर आपल्या कमरेसभोंवतीं कांचीसारखे गुंडाळून दीनस्वरानें ह्मटलें "सीते, असें नको ग भलतेंच बोलूं! तुझ्या अशा बोलण्यानें माझ्या अंतःकरणाचें पाणी होऊन जातें! बाळे जानकी, त्या गुणवान् व कुलीन राजपुत्राचें नांव तर मला कळूं दे अग, नांव समजल्यावर कांहीं तरी त्यावर उपाय योजितां येईल? तर

मांग लौकर माझे प्रियकरणी मीते." मीता ह्मणाली "प्रिय सखि, मांगूंच का? पण मांगून तरी काय? एकाद्या अज्ञ मुलानें जसा आकाशींचा चंद्र मागावा त्या प्रमाणें अलभ्य वस्तूच्या ठिकाणीं माझें मानस गेलें आहे. जर ही माझी मनची गोष्ट बाबांना व आईला समजली तर त्यांना फारच वाईट वाटणार आहे, व मग मी जगांत सर्व प्रकारें कृतघ्न आहें असें होणार! तर सर्व दुःख मनच्या मनांत गट्ट करून रहावें व विधि घडवून आणील तेंच निमुटपणें बरें ह्मणावें, हेंच मला चांगलें वाटतें. मग माझें मन तुला कळवून मी अशी वेडी आहें, एवढें तरी तुझ्या मनांत कशाला भरवून द्यावें? सखि, पण असा दैवावर भरंवसा ठेवून राहवत नाहीं. मनाविरुद्ध तरी कसें होऊं द्यावें! विजये, ह्या प्रमाणें मीं सांप्रत चिंतासागरांत दैवरूप फुटक्या नावेंत आहें! अथवा चोंहोंकडून वणवा लागलेल्या अरण्यांत असल्या प्रमाणें माझी स्थिति झालीआहे. तेव्हां माझा परिणाम काय होईल तो कळतोच आहे. अग, ही गोष्ट तुला सांगायला माझी मलासुद्धां लाज वाटत आहे. मग तुझी कशी नाहीं वाटणार? पण तुझा आग्रहच फार आहे तर ऐक. आपल्या परमपूज्य शतानंदउपाध्यायांचा अंगचा केवळ अवयवच, महाविद्वान्, चतुर, सत्यवक्ता असा महातेजस्वी ब्राह्मण शंकर कांहीं दिवसांपूर्वीं अयोध्यानगरीहून आला, त्यानें त्याच दिवशीं बाबा व आई यांजपाशीं मी असतां तेथें माझ्या पित्याप्रमाणें परम पवित्र व पराक्रमी अशा तेथील राजर्षीचें सविस्तर चारित्र सांगितलें. तें ऐकतांच तो भाग्यवान् राजा मला श्वशुर मिळाला असतां मी जगांत धन्य होईन असें मला वाटलें. सखि, त्या राजाला अवर्णनीय चार पुत्ररत्नें आहेत; त्यांत माझें ज्यानें मन हरण केलें, तो सर्वांत ज्येष्ठ पुत्र. अग, त्याचे चरित्रानें माझी अशी स्थिति करून सोडली! तें मनोहर चरित्र ऐकिल्यापासून मला कांहीं सुचेनासें झालें आहे! सर्वत्र उदासीनता दिसते, सर्व जगांत ती एक अयोध्या नगरी धन्य वाटत आहे; सखि, फार काय सांगूं, हें चरित्र कानीं पडतांच सर्व जगांतील इतर पुरुष मला बाबांप्रमाणें भासूं लागले! व मीही आतां तुझ्या समक्ष मनाचा असा निर्धार करितें कीं, माझ्या मनानें जो एकदां वरिला, त्याशिवाय इतर पुरुष मला जनकाप्रमाणें होत! ज्याचें अलौकिक गुणवर्णन ऐकून

ज्याचे ठायीं माझें मन रमलें, त्याच्याच चरणारविन्दीं जर मी मिलिंदाय-मान न झालें तर ह्या जीविताची तुह्मीं आशा सोडा." इतकें बोलून ती स्तब्ध झाली व हें वृत्त सखीला मीं उगाच कळविलें असें तिच्या मनांत येत आहे इतक्यांत तिची सखी ह्मणूं लागली; "अग, तुझें मानस भलतीकडे कसें जाईल ? मधुमक्षिका पुष्परसाकडेसच धांव घेते! तेव्हां ज्यापेक्षां तुझें मन त्या अयोध्येच्या युवराजावर गेलें आहे, त्यापेक्षां तोच तुझा पति होईल ह्यांत संशय नाहीं. अग, त्या दशरथपुत्र रामचंद्राचें गुणवर्णन बाईसाहेबांनीं आह्मांस सांगितलें होतें, तेव्हांपासून त्यांच्याही मनांत तो विष्णूसारखा पति तुजसारख्या लक्ष्मीसच मिळावा असें आलें आहे. आणखी महाराजांसही हाच वर आवडला असें त्या सांगत होत्या. मला ही तेव्हां तसेंच वाटलें. पण ह्मटलें तुझें मन ह्या राजपुत्राशिवाय दुसरीकडे कोठें गेलें आहे कीं काय तें तुला विचारावें, व आणखी मला कालच रात्रीं बाईसाहेबांकडून असें कळलें कीं तोच ब्राह्मणश्रेष्ठ नुकताच अयोध्येस कुंकुमपत्रिका घेऊन गेला आहे. तींत महाराजांनीं दशरथराजास चारही पुत्र घेऊन स्वयंवरोत्सवास बोलाविलें आहे. आणखी महाराजांनीं नम्रतापूर्वक असें लिहिलें आहे कीं, 'वास्तविक पाहतां मित्रत्वाच्या नात्यानें मीं स्वतः आपल्याकडे निमंत्रणार्थ यावें, परंतु स्वयंवराच्या गडबडींत असल्यामुळें मला तिकडे येण्यास अवकाश नाहीं!' ह्यावरून रामचंद्रानें ह्या प्रसंगीं अवश्य यावें व पण जिंकून तुझ्या गळ्यांत त्यानें माळ घालावी असें महाराजांस रात्रंदिवस वाटत नाहीं काय? ते यावे ह्मणून महाराज सुद्धां जाण्यास तयार झाले होते ! तेव्हां त्यांनीं त्या ब्राह्मणापाशीं कांहीं निरोपही सांगितला असेल ! हें सर्व खरें, पण काय ग सीते, त्या रामचंद्राच्या गुणरूपकिरणांनीं तूं कुमुदिनीप्रमाणें अगदीं विकसित झाली आहेस, व ज्याच्या प्राप्तीस्तव विचार न करितां मनाच्या स्वाधीन होऊन अविचारानें भलतीच मजजवळ प्रतिज्ञा केलीस त्याला तूं स्वतः पाहिलें सुद्धां नाहींना ! त्या ब्राह्मणानें जें सांगितलें तें अगदीं सत्य मानून तूं तल्लीनझालीस ह्यास काय ह्मणावें! त्याच्याच स्तुतीनें तूं आपली अशी अवस्था करून घेतली आहेस, नाहीं बरें ? कोणाला एकादी गोष्ट आवडली ह्मणजे तिजविषयीं त्याचें वर्णन त्याचे मुखांतून यथार्थापेक्षां

अधिक होतें हें तुला माहित नाहीं काय? आतां हे शंकरब्राह्मण तसे नाहींत, हे सत्य बोलणारे, यथार्थ वर्णन करणारे आहेत, हें मला ठाऊक आहे; परंतु एक गोष्ट सांगितली. आणखी पहा, त्या रामचंद्रास अनेक कारणांनीं यावयास सांपडलें नाहीं, किंवा येऊनही त्याचे हातून पण सिद्धीस गेला नाहीं, आणि त्यापेक्षांही गुणांनीं उत्तम किंवा त्याचे बरोबरीचा व रूपानेंही तुझ्या मनोहर रामचंद्रापेक्षां चांगला किंवा तसा असून कोणा बलवान् व तरुण राजपुत्रानें शिवधनुष्य सज्ज केलें, तर तो तुझ्या प्रीतीस पात्र कां होऊं नये, हें मला कळत नाहीं! मग तुझा पिता असत्यप्रतिज्ञ आहे असें होणार नाहीं काय? मग तुझ्या मुळें आमच्या निष्कलंक महाराजांस हा केवढा कलंक लागणार आहे बरें! मग सर्व राजे एक होऊन महाराजांस त्राहि त्राहि करून सोडून त्यांच्यावर काय विलक्षण प्रसंग आणतील ह्याविषयीं तुझ्या मनांत कांहींच आलें नाहींना? मग अशा साहसाच्या प्रतिज्ञेनें सर्वांस चिंताग्नींत कां बरें ढकलीत आहेस? अग, रामचरित ऐकतांच हा जर तुझा दृढ निश्चय झाला होता तर त्यावेळेसच आह्मांस कां नाहीं सांगितलास? तत्क्षणीं आह्मीं तो महाराजांस कळविला असता; ह्मणजे मग हा आतां होणारा समारंभ नको होता; अर्थात् हजारों राजांचा व महाराजांचा लक्षावधि रुपये खर्च वांचला असता, त्यांना श्रम पडले नसते आणि त्यांची निराशा व महाराजांची फजिती झाली नसती! आतां महाराजांना कळविणें उचित नाहीं. ह्या तुझ्या प्रतिज्ञेनें तुझ्या मातापित्यांस महद्दुःख होणार आहे. असो; होणारापुढें उपाय नाहीं. माझी शेवटीं ईश्वराजवळ अनन्यभावानें एवढेच प्रार्थना आहे कीं, सत्यप्रतिज्ञ महाराजांस ह्या मंगल समारंभांत कोणत्याही प्रकारें विघ्न न येतां तुला तो मदनाकृति युवराज रामचंद्रच प्रियकर मिळो, ह्मणजे त्या एका दशरथनंदनाच्या हातून हा पण सिद्धीस जाऊन आह्मां सर्वांस व तुला आनंद होवो! आणि अयोध्येस जाण्याचे समयीं आपण उभयतां महाराजांस व बाईसाहेबांस वंदन करावयास याल तेव्हां प्रेमामृतानें व विरहदुःखानें त्यांचे नेत्रांवाटे येणारे अश्रु तुमच्या मस्तकीं पडोत! सीते, भीऊं नको. तुझ्या दृढ मनोभावाप्रमाणें सर्व कांहीं घडून येईल. जानकी, तूं रागावणार नाहींस असें समजून मला जें कांहीं वाटलें तें मी स्पष्ट बोललें." नंतर सीता ह्मणाली,

"प्रियसखि, तू खरें बोललीस, ह्यांत असत्याचा लेशही नाहीं. अग, मग तुझ्या अशा सत्य व स्पष्ट बोलण्याचा मला कां बरें राग यावा? अग, मीं जरी त्या भाग्यवानाला पाहिलें नाहीं, तरी त्याचें हुबेहुब चित्र त्या कुशल ब्राह्मणानें माझ्या हृदयफलकावर खोदिलें आहेना! तें रात्रीं, दिवसास, एकान्तीं, समाजांत, वडील मनुष्यें जवळ असतां, कोठें गेलें तरी, कांहीं करीत असलें तरी, डोळे उघडे असोत किंवा मिटलेले असोत, सर्वत्रसंगीं व सर्वस्थळीं मला दिसत आहे! सखि, कोणी जवळ आलें तरी हें चित्र भीतीनें पदराखालीं लपवावयास नको कीं कांहीं करावयास नको! विजये, त्या नररत्नाला मीं अजून प्रत्यक्ष पाहिलें नाहीं आहे, ह्मणून कांहीं तरी माझी स्थिति बरी आहे! नाहीं तर काय अवस्था झाली असती ती सांगवत नाहीं! मी काय करूं? सखि, विचारविचार, पुढील धोरण हीं सर्व कोणाला? ज्याचें मन थाऱ्यावर असेल त्यालाना? हे सर्व मनाचे धर्म खरेना? मग तें मन जर मजपाशीं नसेल तर माझी अवस्था झाली आहे अशीच व्हावयाची; नाहीं बरें? माझें मन त्या गुणग्रामानें हरण केलें आहे. तें तेथेंच रमलें! कधीं त्याच्या चरणकमलीं लीन होतें, कधीं त्याच्या विशाळ वक्षस्थळीं संचार करितें, कधीं त्याच्या दीर्घ बाहूंचा अवलंब करितें, कधीं त्याच्या अधरीं मधुकराप्रमाणें तल्लीन होतें, कधीं त्याच्या विशाल नेत्रीं आपली चंचलता दाखवितें, कधीं त्याच्या प्रशस्त ललाटभागींच रममाण होतें आणि कधीं कधीं तर त्याच्या केशपाशांतच गुंतून राहतें. ते कांहीं केल्या परतत नाहीं. ह्मणून जिकडे मन गेलें तिकडे शरीर गेलें पाहिजे, असें मी ह्मणतें व त्याप्रमाणें मीं दृढ निश्चय किंवा प्रतिज्ञा केली, ह्यांत वावगें तें काय तुला वाटतें?" नंतर विजया बोलूं लागली, "सीते, ह्या तुझ्या अमृताहून गोड व सत्य भाषणानें मला कांहींच पुढें बोलणें सुचत नाहीं. अगे, कुलीन मुलीचा हा धर्मच आहे कीं, तिचें ज्याच्याकडे प्रथम मन गेलें, तो कसाही असो, तिनें तो पुरुष तेव्हांच वरिला! बाकी सर्व संस्काराविधि पाठीमागून लौकिकासाठीं व शास्त्रांचे आज्ञेकरितां करावयाचे! तेव्हां तू केलेंस तें वावगें तरी कोण ह्मणेल? बरें, झालें तें झालें; त्या रामचंद्राच्या प्राप्त्यर्थ आतां आपण काय करावें ह्याविषयीं विचार केला पाहिजे. हा सर्व प्रकार

चारपांच दिवस जरी अगोदर कळता तरी त्या शंकर ब्राह्मणास युवराज रामचंद्रावरील तुझें अत्यंत प्रेम व तत्संबंधानें तूं केलेला दृढनिश्चय ह्यांविषयीं कांहीं कळवितां आलें असतें, अर्थात् त्यानें हरउपयानें रामभद्राची भेट घेऊन तुझी अल्पावस्था तरी त्यास समजविली असती. मग तो दयाघन हजारों अन्य कार्यें एकीकडे ठेवून तुझ्या प्रीत्यर्थ अगत्य आला असता. व तुझ्या दृढनिश्चयाचे योगानें व अत्यंत प्रीतीमुळें त्याला शिवधनुष्य वांकविण्यास मोठें उत्तेजन आलें असतें; उत्तेजन हें कधीं कधीं आंगच्या गुणाला वाढविणारें आहे हें अनुभवसिद्ध आहे. तें असो. पण आतां तुझें हें अत्यंत प्रेम त्याला समजावें कसें? काय दुसरा कोणी विश्वासु शाहणा मनुष्य तिकडे धाडून त्याजवळ सांगून पाठवावें, कीं "रामचंद्रा, तुजवांचून ह्या जनकतनयेनें जगांतील सर्व पुरुष आपल्या जनकाप्रमाणें मानिले आहेत, तेव्हां कसेंही करून ह्या स्वयंवरोत्सवांत येऊन हें धनुष्य तुला सज्ज केलें पाहिजे!" सीते, काय करावें तें मला कांहींच सुचत नाहीं. हा तुझा प्राणवल्लभ जवळच कोठें असता किनै, ह्मणजे मीच स्वतः तिकडे जाऊन तुझी मदनानें केलेली सर्व अवस्था त्या परम कारुणिकास सविनय निवेदन केली असती! पण कोठें ती अयोध्या आणि कोठें ही मिथिला! अग, कोठें तें मार्गांतील ऊन व त्यामुळें होणारे अत्यंत श्रम, आणि कोठें ही लतामंडपांतील निबिड छाया व हीमुळें होणारें सुख! कोठें ते दूरदूरचे प्रवास करणारे कंटक पुरुष आणि कोठें आपल्यासारख्या, उपवनांत फिरत असतांही दमून जाणाऱ्या मृदुचरणांच्या स्त्रिया! अग सीते, तुला तरी कांहीं उपाययोजना सुचत असेल तर बोल, आतां लाजूं नकोस." सीता ह्मणाली-" ह्या स्थितींत मला काय सुचणार? मला त्यास सुरेखसें पत्र लिही ह्मणशील, तर अनेक शंकांच्या योगानें माझें मन भयभीत असल्यामुळें मला कांहीं मजकूर सुचणार नाहीं व हात कांपेल ह्मणून अक्षरही वाईट येईल! कोणी शहाणा चांगला मनुष्य तिकडे निरोप सांगून पाठवावा ह्मणतेस, पण त्यावरोवर त्या महाभागाला निरोप तरी काय सांगून पाठवावा? ब्राह्मणमुखानें तुझें चरित ऐकून मी मदनानें फारच पीडित झालें असून अगदीं दीन झालें आहे तेव्हां मजवर दयाकर, असें जर तूं सांगून पाठविशील तर त्याला मी फार उतावीळ व अत्यंत इंद्रियाधीन आहें, असें वाटेल! तुझ्या मनोहर रूपाला

मी फार मोहित होऊन गेलें आहे, असें जर कांहीं कळविशील तर हें शुद्ध वारांगनेचें आचरण आहे, असें तो समजेल! मला तूंच आवडला आहेस, धनुष्याचा केलेला पण मला मान्य नाहीं, असें जर त्याला ऐकविशील तर ही पित्याचे इच्छेविरुद्ध वागणारी आहे, अर्थात् ही कृतघ्न स्त्री पुढें आपल्या इच्छेप्रमाणें वागणार नाहीं, असें त्याचे मनांत येईल! तुझ्या रूपगुणाला मीच एक पात्र आहें, असें जर त्याला कथन करशील तर ही आपल्या रूपाचा गर्व मानणारी आहे व आपल्या आपणासच गुणवती ह्मणून घेणारी आहे, असा दोषारोप तो मजवर करील! तुझ्यावांचून मी अन्य पुरुष पित्याप्रमाणें मानिले आहेत, हा निरोप जर तो ऐकेल तर, हिचे ठिकाणीं काय अविचार जास्त आहे कीं साहस अधिक वसतें आहे, कीं मूर्खपणाच्च सर्वत्र भरला आहे हें मला समजत नाहीं, असें तो ह्मणेल! हें सर्व असो, पण असा मनुष्य पाठवावा तरी कसा! पूर्वीची ओळख ना देख, ह्या संबंधानें पूर्वी कांहींच त्याला कळविलेलें नाहीं! ह्मणून मी ह्मणतें, कुलीन कुमारिकांना जें सर्वथैव अयोग्य तें आपण कांहीं करूं नये. त्या दशरथनंदनाचें वृत्त माझ्या कानीं पडून माझी झालेली अवस्था तुला, प्रियसखि, म्यां सांगितली, ती सांगतांना मन्मथानें मजकडून करविलेली प्रतिज्ञाही तू ऐकलीसच! ह्या गोष्टी सहजींच घडल्या ह्यासाठीं कोणीं तिळभरसुद्धां यत्न केलेला नाहीं! तेव्हां पुढेंही साहजिक होईल तेंच खरें, आपण कांहीं यत्न करूं नये. तो शंकर ब्राह्मण तिकडे गेलाच आहे; तो जसा विद्वान् तसा चतुरही आहे. तो मजसमक्ष बाबांना तें पवित्र चरित्र निवेदन करीत असतां वरचेवर माझ्या मुखाकडे पाही, मला वाटतें अशा करितां कीं, तें मधुर वृत्त मला आवडतें आहे कीं नाहीं तें पहावें! त्या वेळच्या माझ्या प्रफुल्ल व किंचित् लज्जायुक्त दिसणाऱ्या वदनावरून त्यानें तेव्हांच हा तर्क केला असेल, व पुढें माझी झालेली अवस्थाही त्यानें कशीतरी समजावून घेतली असेल, असें मला वाटतें. त्याला जरी कोणी मजविषयीं असा असा यत्न कर ह्मणून सांगितलें नाहीं, तरी तो होऊन मोठ्या युक्तिप्रयुक्तीनें माझी सर्व स्थिति त्या कौसल्यापुत्रास कथन करील, ह्यांत संशय नाहीं. मात्र माझ्या दुर्दैवानें तो त्या नगरींतून कोठें बाहेर गेलेला नसावा! प्रियसखि विजये, तो ब्राह्मण आपल्या नांवाप्रमाणें

माझें कल्याण करणारा होवो ह्मणजे झालें. निदान तो त्या सौभाग्यवती अयोध्या नगरीहून परतयेईपर्यंत तरी आपण स्वस्थ बसावें. सखि, हें वृत्त कोणास न कळविशील तर मजवर तुझे जे अनंत . उपकार आहेत, त्यांत आणखी ही भर पडेल ! आपणास येथें येऊन बराच वेळ होत आला, कदाचित् आपणास कोणी शोधीत इकडे येईल, तर चला आपण आतां वाड्यांत जाऊं. तुझ्याशीं किती बोललें तरी थोडेंच वाटावयाचें." हें सर्व ऐकून घेऊन सीतेची प्रियसखी ह्मणाली , " सीते, तू ह्मणतेस हेंच मला बरें वाटतें; तो तुझ्या हृदयांत वास करणारा आपल्या वैभवासह आतां लौकरच येईल; व येतांच त्या प्रसंगाला, स्थितीला व कार्याला योग्य अशी कांहीं उपाययोजना करूं ह्मणजे झालें. चल तर आतां येथून, " असें ह्मणून ती विजया वर उठली व सीतेलाही उठविलें; दोघींनींही आपआपलीं वस्त्रें, वेण्या, अलंकार वगैरे जेथच्या तेथें ठाकठिक करून नयनाश्रु पुसून त्या लतामंडपांतून बाहेर आल्या व राजवाड्यांत गेल्या.

ह्या गोष्टीस सुमारें पंधरा दिवस लोटले; स्वयंवरादिवस चारपांच दिवसांवर येऊन ठेपला; तत्पूर्वी राजपुत्रवगैरे यावयाचे ह्मणून सीरध्वज महाराजांच्या अष्टप्रधानांनीं सर्वत्र उत्तम व्यवस्था ठेविली होती; आपल्या रज्यांतील चोहोंदिशांकडील मोठमोठाले मार्ग सर्व नीट करविले; अनेक ठिकाणीं पाण्याच्या सोई केल्या; राजांबरोबर येणाऱ्या सैन्यास उतरण्याची व उतरल्यावर त्यांस धान्यादिकांचा पुरवठा होईल अशी योग्य तजवीज योजून, मिथिला नगरीच्या बाहेर पण जवळच नदीच्या कांठीं मोठमोठ्या धनिकांचे वर्षांतून कधीं काळीं राहण्याकरितां बांधिलेले उत्तम वाडे होते ते सर्व मोठमोठ्या राजांस उतरण्याकरितां तयार करून ठेविले; त्याशिवाय मिथिलानगरींतीलही प्रधानादिकांचे विस्तीर्ण वाडे व राजकीय कामांकरितां बांधिलेलीं मोठमोठालीं घरें यांस नानाप्रकारचे रंग देऊन राजपुत्रांस राहण्यासाठीं सिद्ध करून ठेविलीं होतीं. व्यवस्था चांगली रहावी. ह्मणून अमक्या राजानें अमुकच स्थळीं उतरावें असा त्यांनीं पूर्वसंकेत करून ठेविला होता. पूर्वी राजांस ज्या कुंकुमपत्रिका गेल्या होत्या, त्यांत "महाराजांची नीट व्यवस्था होईल," असें लिहिलें होतें. असो; ह्या वेळीं त्या मिथिला नगरींत

कलिंग, कुलिंद, पुलिंद, कुंतल, कंक, अंग, वंग, सिंधु, सिंहलद्वीप, पांचाल, पांड्य, गांधार, विदर्भ, नेपाल, आग्नेय, मगध, मद्र, मत्स्य, मालव, उत्सवसंकेत, किरात, काश्मीर, कांबोज, कनोज, कर्नाटक, केरल, करहाट, कुरु, करूषक, कच्छानिलय, कर्कखंड, कर्कोटक, उलूक, उलूत, नैषध, द्रविड, गौड, गुर्जर, सौराष्ट्र, महाराष्ट्र, मरु, मळियाड, आनर्त्त आन्ध्र, जालंदर, चैद्य, चोल, लाट, बाल्हिक, इत्यादि लहान मोठ्या देशाचे लहानमोठे राजे आपल्या वैभवानिशीं येऊन थडकले. बहुतेक सर्व देशांतील राजे आले; यावयाचे असे थोडेच राहिले होते; हे सर्व जनकाच्या प्रधानांनीं नेमिलेल्या ठिकाणीं उतरले. बरोबरचें सैन्य राजधानीच्या बाहेर नदीच्या तीरीं असलेल्या अफाट मैदानांत उतरलें; त्या जागाही त्यांस नेमून दिलेल्या होत्या; त्याच ठिकाणीं अश्व हारीनें बांधलेले होते; तेथेंच डेरे राहुट्या रोंविल्या; तेथें व नगरींत राजांचे अनेक रंगांचे ध्वज फडकूं लागले; राजांबरोबरचे हत्ती पुढील अंगणांत डोलूं लागले, तें जणूं प्रधानांची ही व्यवस्था पाहून आपण खूश झालों किंवा ही नगरी आपणास फारच उत्तम वाटली ह्मणून सांगतात कीं काय असें भासे ! आलेल्या राजांबरोबर त्यांचे प्रधानादि कामदार व अनेक गुणिजन होते. जनकाच्या राज्यांतील तर अनेक सधन, गुणज्ञ, मार्मिक व इतर लोक हा दर्शनीय उत्सव पहाण्याकरितां राजाच्या निमंत्रणावरून आले व येत होतेच व आणखी परराज्यांतूनही अनेक प्रकारचे लोक तेथें आले होते; ते ह्मणत ह्या एकास्थळीं गेलें असतां अनेक राजे दृष्टीस पडतील, अनेक गुणिजन पाहण्यास सांपडतील, अनेक देशांतील रिवाज समजतील; कोणाचें किती बळ आहे हें सहज कळेल, मोठमोठ्या ऋषींचीं एके ठिकाणीं दर्शनें होतील. जसे राजे तसे राजर्षीही आपल्या शिष्यमंडळांसह जनकाच्या अत्यंत आग्रहाच्या व सन्मानपूर्वक आणि पूज्यभावपुरस्सर निमंत्रणामुळें त्या राजधानींत येऊन पोंचले. त्यांचीं अंतःकरणें सदा प्रसन्न राहून त्यांच्या धर्मक्रिया यथासांग होतील अशीं रम्य स्थानें ह्मणजे देवालयें त्यांस उतरण्यास दिलीं; जेणेंकरून हे शांतचित्त राहून सुप्रसन्न राहतील अशी ह्यांची तजवीज शतानंद उपाध्यायांनीं ठेविली होती. राजधानीबाहेरील जनकराजाचे कामदार तेथील कामदारांस साहाय्य करण्या करितां आले; नागरिक

लोकांनीं मिथिलानगरीबाहेर राहणारे आपले संबंधी, इष्टमित्र, या सर्वांस ह्यासाठीं अगोदर बोलाविलें होतेंच, त्या प्रमाणें ते बहुतेक त्यांच्या त्यांच्या घरीं येऊन राहिले होते. ह्याप्रमाणें जनकराजानें ज्यांना ज्यांना ह्मणून बोलाविलें होतें ते बहुतेक सर्व त्याच्या नगरींत येऊन पोंहोंचले. जनकबंधु कुशध्वजही मुलींसह कौशांबीहून आला.

अशा वेळीं त्या नगरींतून, कोणी प्रातःकाळीं, कोणी दोन घटिका दिवसास, कोणी प्रहर दिवसास, कोणी तिसऱ्या प्रहरीं, कोणी दोन घटिका दिवस असतां, कोणी ऐन संध्याकाळीं, तेथें आलेले राजे सुंदर अश्वांनीं युक्त अशा सुवर्णमय रथांतून, विस्तीर्ण व शोभायमान पालख्यांतून, अमूल्य घोड्यांवरून, शृंगारलेल्या हत्तींवरून, बरोबरच्या सैन्यासह फिरत. त्यावेळेस त्यांच्या स्वाऱ्या पाहाण्याकरितां रस्त्यांच्या दोन्ही बाजूंस लोकांची गर्दी जमत असे, व पहात असतां त्यांच्या मुखांतून अशा सारखे अनेक उद्गार निघतः—"हा कोण राजा? हा कोण गेला? हा पाठीमागून येत आहे हा विलक्षण राजा कोणत्या देशांतील? ह्या उंच व भव्य रथांत हे दोघे बसलेले तरतरीत दिसतात हे कोणत्या भाग्यवान् राजाचे पुत्र कोण जाणे; ह्याचा वेश तर फारच चमत्कारिक! हा कोठल्या लोकांचा स्वामी असावा बरें! हा ह्मातारा राजा कशाला उगाच आला! हा फार सुंदर आहे; हा फार शूर दिसतो; हा केवढा धिप्पाड! ह्याच्या शरीराची रचना पाहण्यासारखी आहे; ह्याचा पोशाग व ऐट तर फारच उत्तम आहे; हाच तो सिंधुदेशाचा पराक्रमशाली राजा! हा नेपाळचा असावा; हा पोशाकावरूनच काश्मीरचा असावा असें दिसतें! हा श्यामवर्ण कोणी दक्षिणदिशेकडील असावा! ह्याच्यांत कांहींच अर्थ दिसत नाहीं! हा दिसण्यांतच भागुबाई दिसतो! हा मोठ्या वेगानें अश्वावर बसून चालला आहे, ह्यास कदाचित् वाटत असेल मीच हा पण जिंकीन!"

ह्यासमयीं तर ही नगरी कुबेराच्या अलकानगरीहूनही रम्य दिसत होती! जिकडे पहावें तिकडे सोन्याचे रथ, सुवर्णाचे दंड, नानाविध रत्नें, मोत्यें, अलंकार, मूल्यवान् व सुंदर वस्त्रें! ह्यासर्वांच्या तेजानें डोळे दिपून जात! त्या वेळीं तेथें वैकुंठाहून लक्ष्मीच उतरली आहे असें ज्यास त्यास वाटे; तें नगर सर्व पृथ्वींतील तेज, वैभव, सौंदर्य, पराक्रम, विद्या,

कला, गुण, मौल्यवान् गज, अश्व, ह्यांचें स्थान बनून गेलें होतें! सर्व नगरी मनुष्यांनीं गजबजून गेली होती. प्रधानादि कामदार तेथें आलेल्या राजांचा वरचेवर समाचार घेत होते, त्यांना काय पाहिजे, काय नको ह्याविषयीं चौकशी करीत होते. जनकमहाराजांच्या ह्या व्यवस्थेनें ते राजे फार संतुष्ट झाले, व ह्यांचें राज्य फारच उत्तम रीतीनें चालत असेल असें कित्येकांनीं त्यावरून खरें अनुमान काढिलें. ह्या स्वयंवराच्या अगोदर तीन चार दिवस त्यानगरींत मोठा अवर्णनीय उत्सव सुरू झाला.

असे ते तीन चार दिवस अशाच धामधुमीनें निघून गेले; स्वयंवर-तिथि उद्यांवर येऊन राहिली; तेव्हां आपली स्वयंवरनायिका जी सीता व तिची सखी विजया ह्या तर चिंतेनें अगदीं दग्ध झाल्या! अयोध्येस पत्रिका घेऊन गेलेल्या त्या शंकर ब्राह्मणाची वाट पाहून पाहून दमल्या, परंतु तो त्या दिवसपर्यंत आला नव्हता. तो रामाच्या स्वारी बरोबर येत असेल व त्यामुळें त्याला इतका विलंब लागला असावा, असा त्यांनीं तर्क केला. इतक्यांत प्रातःकाळीं घटिका दोन घटिका दिवसास तो द्विजश्रेष्ठ येऊन राजास भेटला; त्यानें दशरथराजाकडील वृत्त कळविलें, तें ऐकून जनकराजा फार निराश दिसला व सीतेस कोण पति मिळतो आहे, असें ह्मणून चिंतातुर झाला. त्या मंगलकार्याविषयीं त्याचा उत्साह कमी होत चालला; हें वृत्त सांगून राजाचा निरोप घेऊन तो ब्राह्मण राजवाड्यांतून बाहेर पडत आहे तों, त्या उत्सुक झालेल्या सीतेच्या परमप्रियसखीनें त्यास गांठून एकांतस्थळीं त्यास नेऊन विचारिलें कीं, "अयोध्येचा राजा दशरथ ह्याचा पुत्र रामचंद्र स्वयंवरास कां आला नाहीं? त्याचा पिता, तो, त्याचे कनिष्ठ तिघे बंधु, त्यांच्या माता हीं सर्व कुशल आहेत ना? महाराजांनीं दशरथमहाराजांस मोठ्या अगत्यानें निमंत्रण केलें असून ते राजकुमार कां आले नाहींत बरें? कीं ते पाठीमागून येत आहेत? तुह्मांस पुढें जा ह्मणाले? तेअगदीं समयास येतों, असें बोलले? किंवा महाराजांकडून त्यांचा कांहीं नकळत अपराध घडला? किंवा दशरथराजानें ते लहान व त्यास अत्यंत प्रिय असल्यामुळें ह्यागर्दींत त्यांना पाठविलें नाहीं? कीं ह्या जमलेल्या राजसिंहांत कधीं काय प्रसंग येईल ह्याचा नेम नाहीं, असें समजून त्यानें त्यांस येण्यास

अनुमोदन दिलें नाहीं? किंवा आजच त्याचा विवाह त्यांस कर्तव्य नाहीं! किंवा रामानें धनुष्यावर गुण चढविला ह्मणजे सर्व राजे त्याच्याशीं वैर धरतील व मग तें सर्वकाळ तसेंच राहील, ह्मणून तो रामपिता भ्याला काय? पण हें क्षत्रियधर्मास अगदीं उचित नाहीं. किंवा तो कोठें अन्य कार्यांत गुंतला आहे? महाराज, त्या राजपुत्रास न येण्याचें कारण तरी काय आहे, तें कृपा करून सांगावें." हें सखीचें भाषण ऐकून त्यानें तत्क्षणींच तर्क केला कीं, मीं पूर्वीं तर्क केल्याप्रमाणेंच सीतेला रामचंद्र वर आवडला आहे! तो आज येईल उद्यां येईल ह्या आशेंत ती होती, परंतु अजून आला नाहीं ह्यामुळें अगदीं हताश झाली असेल, व ह्यासंबंधानें खरें वृत्त काय आहे, हें समजून घेण्याकरितां तिची प्रियसखी मला तें विचारीत आहे. तर तें तिला सांगितलें पाहिजे; असें मनांत आणून तो तिला सांगूं लागलाः—"हे सीतावत्सले, विजये, मी जनकमहाराजांची आज्ञा घेऊन त्या अयोध्या नगरींत पोहों-चल्यावर त्या उदार व धर्मनिष्ठ दशरथ राजाचें दर्शन घेतलें. अभि-वंदनाशीर्वादानंतर त्यांनीं सांगितलेल्या मृदु आसनावर मी बसलों व अगोदर कांहीं कुशल प्रश्नोत्तरें झाल्यावर "जनकमहाराजांनीं महारा-जांस ही कुंकुमपत्रिका दिली आहे," इतकें मी ह्मणत आहें तोंच त्या अयोध्यापतीनें ज्यावर वृद्धत्वामुळें सुरकुत्या पडल्या असून कोठें कोठें एखादा शुभ्र लांब केश दिसत आहे, असा तो लांब अडसरासारखा कर पुढें केला व त्या रेखांकित हस्ततलावर मीं ती ठेविली. स्वतः वाचून पाहतांच त्याचे डोळे अश्रूंनीं भरले, व मुखांतून वरचेवर दीर्घ श्वास बाहेर पडूं लागले. तत्क्षणीं माझ्या मनांत शतशः कुकल्पना आल्या! ह्याचा पराक्रमी ज्येष्ठ पुत्र रामचंद्र तर कुशल आहेना! किंवा नीतिमान् लक्ष्मणास तर कांहीं होत नसेलना! किंवा उदारधी भरतशत्रुघ्न सुखरूपपणें वास करीत असतीलना! अथवा ह्यांच्या मुख्य स्त्रियांच्या प्रकृति बऱ्या आहेतना! ह्याप्रमाणें माझ्या मनाची स्थिति झाली असतां दशरथम-हाराज ह्मणाले, "हे द्विजश्रेष्ठा, जनकानें मला अत्यादरें चार पुत्रांसह, वसिष्ठादिकांस घेऊन, ससचिव व सैन्यासहवर्तमान आपल्या कन्येच्या स्वयंवरार्थ बोलाविलें आहे. व शिवधनुष्य सज्ज करण्याचा पण राम-चंद्राच्याच हातून पूर्ण होईल अशी माझी खात्री आहे, व हाच वर

माझ्या प्रिय सीतेस मिळावा अशी माझी फार इच्छा आहे, ह्मणून आंत लिहिलें आहे. माझ्या रामचंद्राच्या पराक्रमाविषयीं माझ्या प्रियमित्र जनकास कोणीं बरें सांगितलें ? " असें तो बोलतांच मी ह्मणालों, " महाराज, तेजोराशि सूर्य उगवला ह्मणजे भूमंडळावर त्याचा प्रकाश पसरण्यास कोण पुढें सरसावतो ? " हें ऐकून तो पुनः बोलूं लागला, " उद्यां बरोबर तीस दिवस होतील, तो माझा पंचप्राण रामभद्र आपल्या अत्यंतप्रिय बंधु लक्ष्मणासह अरण्यांत गेला आहे ! द्विजश्रेष्ठा, मी काय करूं ! त्या दिवशीं तो तेजोनिधि अत्यंत कोपी विश्वामित्रमहर्षि मजकडे आला, व यज्ञाच्या संरक्षणार्थ ह्मणून त्यांना घेऊन गेला! भयंकर राक्षस अलिकडे ऋषिजनांचे कर्मास फारच त्रास देऊं लागले आहेत. मी मोहपाशानें अत्यंत बद्ध होऊन त्यांना पाठवीत नव्हतों, राक्षसांचें निर्मूलन करण्याकरितां मीच स्वतः धनुष्यबाण घेऊन येतों, असें त्या तपोधनास प्रार्थिलें, परंतु त्याच्या अत्यंत कोपमिश्रित आग्रहास्तव व आमचे परमपूज्य कुलगुरु ब्रह्मर्षि वसिष्ठ ह्यांच्या सदुपदेशानें त्यांस त्यांच्या बरोबर क्रूरप्राण्यांनीं भरलेल्या भयंकर अरण्यांत जाण्याची मीं आज्ञा केली ! अहाहा ! काय त्या रामचंद्राचा सुस्वभाव सांगूं! माझ्या ठिकाणीं जी त्याची निःसीम भक्ति आहे ती कशी कथन करावी ? माझा लक्ष्मणही दुसरा रामचंद्रच आहे. त्या दिवसापासून ह्या जीवाला सर्व वस्तु अप्रिय झाल्या आहेत; चैन पडत नाहीं; अन्नावर वांच्छा नाहीं; त्याच्या वियोगाग्नीच्या ज्वाळा माझ्यानें सोसवत नाहींत. हे चार पुत्र व कन्या शांता माझे पंचप्राण होत ! भरत शत्रुघ्न हे दोघे मजजवळ आहेत ह्मणून मी अद्यापि जीवन्त तरी आहें ! आजच्या अनुभवावरून मला असें वाटतें कीं जेव्हां कधीं ह्या सर्वांचा असा वियोग होण्याचा मजवर दुर्धर प्रसंग येईल तेव्हां मी गतप्राणच होईन !! त्या रामलक्ष्मणरूप जीवनाची मला अत्यंत तृषा लागली आहे ! मी आतां अत्यंत वृद्ध झालों आहें ह्मणून माझ्याही मनांत, विष्णूस जशी रमा, किंवा शंकरास जशी पार्वती, अथवा मदनास जशी रति, अशी एकादी माझ्या रामचंद्रास चंद्रिकेसारखी कन्या पाहून तिच्याशीं त्याचा विवाह करून द्यावा, असें होतें ; परंतु हें ऋषीचें कार्य मध्येंच आलें ! जनकाची ही कन्या मोठी सुशील गुणवती असून रूपानेंही अद्वितीय आहे,

असें अनेक प्रसंगीं म्यां, रामचंद्र जवळ असतां, ऐकिलें आहे. ही धन्या माझी स्नुषा झाली असती तर सीता-रामचंद्राचें दंपत्य जगांत यशस्कर झालें असतें, व ह्या संबंधामुळें जनकाचें व माझें मित्रत्व अधिक वाढलें असतें. जनकाचा जो कोणी व्याही होईल तो जगांत दैवशाली होय, ह्यांत संशय नाहीं. असो; तिचा स्वयंवरसमय अगदीं समीप आला असून माझा रामचंद्र तर फारच दूर वनांत राक्षसांच्या नाशार्थ नुकताच गेला आहे! आतां सर्वस्वी त्यांचा पिता तो ब्रह्मर्षि-विश्वामित्र होय! आतां कोणीकडे सीता व कोणीकडे राम! कोठें आनंदसागरांत तरंगणारी ती जानकी व कोठें मला चिंताग्नींत दहन करणारा तो पुत्र! राक्षसादि भयंकर प्राण्यांनीं गजबजलेलें कोठें तें वन, व स्वयंवरार्थ आलेले राजे व दुसरे हजारों लोक ह्यांच्या योगें शोभणारें कोठें तें जनकभुवन! शिवधनुष्य त्याच्यानें सज्ज होईल किंवा न होईल ही गोष्ट स्वतंत्र आहे, पण जेथें शतशः राजगज जमणार तेथें माझा रामनामा सिंह नाहीं ना? आतां त्यानें आपला पराक्रम कोणास दाखवावा? आपलें असहनीय तेज कोणत्या सभेंत पाडावें? हें नाहीं तर कोणतें स्त्रीरत्न भूषणार्थ मिळवावें? वा भूदेवा, तेव्हां मला तर त्या दोघांवांचून ह्या दोघांसच घेऊन येववत नाहीं. इतक्यांत दैववशात् विश्वामित्र ऋषीचा कार्यभाग संपून जर माझे प्रिय वत्स घरीं आले, तर मी सर्वांसह मोठ्या आनंदानें खचित मिथिलानगरींत त्या उत्सवार्थ येईन. असें आपल्या जनकमहाराजांस प्रेमपुरःसर व प्रणामपूर्वक सांग." हें त्याचें बोलणें ऐकून मला अत्यंत दुःख झालें, आणि हा पण कोणाच्यानेंही आतां जिंकिला जाणार नाहीं, असें माझ्या मनांत येऊन महाराजांनीं येवढा हा स्वयंवराचा केलेला खटाटोप व्यर्थ जाईल! हा स्वयंवरोत्सव नव्हे तर सर्वांचा अपमानोत्सव आहे, असें मला वाटलें; व हें वर्तमान ऐकून महाराजांना, बाईसाहेबांस, सर्व आश्रितजनांस वाईट वाटून सर्व सख्यांसह सीतेला तर दुःसह दुःख होईल असेंही माझ्या मनांत तत्क्षणीं आलें. नंतर त्या नृपवरानें मला तेथें राहण्याविषयीं आग्रह केला, परंतु अशा प्रसंगीं मला तेथें रहाणें कसें सुचेल? शेवटीं मला त्यानें हें दक्षिणायुक्त महावस्त्र देऊन तांबूल अर्पण केलें. त्या समयीं माझ्या उदासीन अंतःकरणास त्यानें न बोलतां असें सांगितलेंसें

वाटलें कीं, " रामचंद्र हा सीतेचा हृदयवल्लभ होऊन तिच्या साहाय्यानें दुष्टांचें निर्दलन करण्याविषयीं विडा उचलून यावच्चंद्रदिवाकर ह्या वस्त्रासारखी शुभ्र कीर्ति जगांत ठेवील; व याचकांस अतोनात द्रव्य देईल! " नंतर मी खिन्नान्तःकरण होऊन तेथून निघालों तों येथें आलों व तिकडील हें वृत्त महाराजांस कळविलें. विजये, ह्या रामसंबंधी वृत्तांत ऐकण्याविषयीं तूं अत्यंत आतुर कां झाली होतीस हें माझ्या लक्षांत आलें. मला पूर्वी वाटल्याप्रमाणेंच रामचंद्राचें चारित्र ऐकून सीतेचें मन फार चंचल झालें असेल ! ती मानवाकृति तशीच रमणीय आहे. तरी मला त्याच्याविषयीं कांहीं सांगतां आलें नाहीं ! तेथें रामचंद्र असता तर कसेंही करून सीतेचें इतिवृत्त त्याला कळवून ह्या प्रसंगीं त्याच्या आर्द्र हृदयभूमीवर सीतेच्या प्रीतीचें बीज पेरिलें असतें ! विजये, ह्या वृत्तांतावरून जरी आतां नियमित कालीं वनांत गेलेल्या रामचंद्राचें येणें कठिण दिसत आहे, तरी तो ह्मणजे नच येईल असें कांहीं ह्मणवत नाहीं. विधात्यानें जर रामच सीतेचा वर योजिलेला आहे, तर मग तो कोठेंही असो, कोणत्याही महत्कार्यांत गुंतलेला असो, तो आपला समयास येऊन ठेपेलच ! जर नसेल, तर महापराक्रमी असूनही वेळीं त्याचे हातून इष्टकार्य व्हावयाचें नाहीं ! दैव अनुकूल असलें ह्मणजे काय नाहीं होणार ? त्या परमवंद्य विश्वामित्र महर्षीस सर्व शिष्यमंडळीसहवर्तमान येण्याविषयीं विवाहपत्रिका गेलीच आहे. अन्य महत्त्वाचीं कार्यें एकीकडे ठेवून महाराजांच्या घरच्या ह्या स्वयंवरयज्ञास ते आल्याशिवाय कदापि राहणार नाहींत. ते महाराजांचे हितेच्छु आहेत. रामलक्ष्मणाचा अप्रतिम पराक्रम, त्यांचे अनुभवास आलाच असेल. तेव्हां ते तपोनिधि अशा पराक्रमी, सुंदर, तरुण, राजपुत्रांस येथें कसे बरें आणणार नाहींत ? मला तर असें वाटतें कीं, त्या कारुणिक ऋषीनें ह्यांच्या बुद्धीची विलक्षण ग्राहकता अनुभवून मोठ्या आनंदानें त्यांस अस्त्रविद्या शिकविली असेल. सांप्रत तर त्या माहात्म्यासारखा त्या विद्येंत एकही पारंगत नाहीं असें ह्मणतात ! असो, त्या महर्षीस कुंकुमपत्रिका पोंचण्यापूर्वींच जर ते बंधु तीनचार दिवसांपूर्वीं अयोध्येस गेले असतील, तर तो महाराजांचा मित्र सत्यवादी दशरथराजा आपल्या चारही पुत्रांसह खचित येईल.

विजये, मी आतां अन्य कार्यास जातों बरें. तू ह्या प्रमाणें सीतेस सांगून तिचें सांत्वन कर." इतकें बोलून तो ब्राह्मण तेथून गेला.

हें ह्यांचें भाषण राजवाड्यांतील ज्या एकांत भागीं झालें तेथें जवळच आंतल्या बाजूस सीता होती, तेथून ती तें सर्व ऐकत होती! तें ऐकत असतां तिचें मुख तर उष्ण श्वासोच्छ्वासाचा भाताच झाला होता! जेथून सिंधु व ब्रह्मपुत्रा ह्या नद्या उगम पावल्या आहेत, अशीं मानस व रावणऱ्हद सरोवरेंच काय तिचीं नेत्रें बनलीं होतीं! व विजयेच्या ठिकाणीं मूर्च्छा तिची सखी होऊं पहात होती! ब्राह्मण निघून जातांच तिला मूर्च्छेनें स्पर्श केला. इतक्यांत त्या स्थळीं विजया आली व अशा स्थितींत तिला पाहतां ती फार घाबरली व तत्क्षणीं तिला वारा घालूं लागली, आणि ह्मणाली, "अग नयनानंद-चंद्रिके, अग सखीगणवत्सले, सीते, सावध हो; शुद्धीवर येग माझ्या आई! तुझ्या पित्यानें बाहेर काय चालविलें आहे आणि तूं त्याच्या विपरीत घरांत काय आरंभिलें आहेस हें? प्रियकरणी, ह्या वेळीं तुझी माता तुला कदाचित् इकडे शोधीत येईल; मग इतके दिवस आपण होऊन गुप्त ह्मणून ठेविलेली तुझी अवस्था सर्व तिला कळेल! आणि बाईसाहेबांना फार वाईट वाटून महाराजांच्या औदासीन्याला तर पारावार नाहींसा होईल! ह्या मुळें त्यांना बाहेर तोंड काढण्यास लज्जा वाटेल एवढेंच नाहीं, तर हे सर्व राजे महाराजांवर एकदम तुटून पडतील! अग तुला हें कितीदां सांगूं? तुला सर्व समजतें, तुझ्या सारखी समंजस, गुणवती कन्या मीं अद्याप पाहिली नाहीं. मातापित्यांविषयीं तू फारच स्नेहाळ असतां, त्यांना अशा संकटाग्नींत लोटणें तुला बरें वाटतें काय? सीते, धीर धर, रामचंद्र तुझा प्रियकर होईल. रामचंद्राचें नांव घेतांच व सखीच्या प्रेमयुक्त भाषणामृतानें ती किंचित् सावध होऊन हळूहळू ह्मणाली, "सखि, तिकडील सर्व वृत्त मीं येथून ऐकिलें, किती ग माझें जीवित कोडगें हें! हें आजपर्यंत अशापाशानें बद्ध असतां जाऊं पहात होतें, पण आंतां तो सुटला तरी हें जात नाहीं! त्या ब्राह्मणानें थोडें का आतां त्यावर विष ओतलें, तरी तें आपलें मला पीडा देण्याकारितां मठ्ठच राहिलें आहे! ह्या प्रसंगीं मला मरण येतें ह्मणजे सोन्याहून पिवळें झालें असतें! मग

सर्वांना सुख झालें असतें. आतां माझ्या मुळें बाबांवर केवढे बरें वाईट प्रसंग गुदरतील ! अग, जेवढे राजे ह्मणून आले आहेत तेवढे मला पित्याप्रमाणें आहेतना ? मग आतां स्वयंवर कशाचें ! सखि, मला आतां मरणाचा उपाय सांग. मला तुझ्यापासून आतां दुसरें कांहीं-एक ऐकावयाचें नाहीं व मीही तुझ्याशीं आणखी कांहीं बोलत बसत नाहीं ! माझें जन्मच मुळीं दुसऱ्यास दुःख देण्याकरितां आहे ! " हें ऐकून विजया ह्मणाली, " सीते, असें काय भलभलेंतच बोलतेस ! अग, तुझीं नेत्रकुमुदें प्रफुल्लित करणाऱ्या रामचंद्राचा उदय उद्यां स्वयंवर मंडपांत खचित होईल ! त्या ब्राह्मणानें सांगितल्याप्रमाणें ते दिव्यज्ञानी विश्वामित्रमहामुनि रामलक्ष्मणास घेऊन येथें येतील. अजून काय थोडा वेळ आहे ? आजचा हा सर्व दिवस सर्व रात्र व उद्यांचा अर्धा दिवस. ह्या एवढ्या वेळांत काय काय नाहीं होणार ? दृढ सुनिश्चयाचा पूर्णकर्ता परमेश्वर आहे. त्याला तुझा हा निश्चय तुझ्या-इच्छेप्रमाणें शेवटास नेलाच पाहिजे. त्या जगन्नियंत्यास सर्व काळजी आहे. जनकमहाराजांची पार्वतीशावरची अनन्यभक्ति सर्व स्वी व्यर्थ गेली काय ? त्यांचा किती वर्षांचा योगाभ्यास आजच कुंठित झाला ? त्यांची अप्रातिम धर्मबुद्धि आजच विलयास गेली, असें तू समजतेस काय ? त्यांनीं सत्पात्रीं केलेलें दान यथाकाळीं कांहींच उपयोगी पडणार नाहीं काय ? प्रजाजनांची त्यांच्याविषयीं कल्याणेच्छा ही दांभिकपणाची आहे असें तुला क्षणभर तरी वाटतें काय ? जानकी, मोठमोठे ढग आल्यावांचून पाऊस पडत नाहीं, हें तुला ठाऊक आहेना ? मग तुझ्या इष्टहेतुची वृष्टि करणारा हा तुझा महा शोक सजल मेघच आहे, असें कां समजत नाहींस ? " ती असें बोलत आहे तों सीता मध्येंच बोलूं लागली, " सखि, ह्या बोलण्यानें तू भाषणामध्यें मोठी चतुर आहेस येवढेंच काय तें मला सांगितलेंस ! परंतु त्यांतील मला तिळभरसुद्धां खरें वाटत नाहीं ! अग, राक्षसांनीं व्याप्त व सिंहव्याघ्रसर्पादि भयंकर प्राण्यांनीं भरलेल्या अशा अरण्यांत ते गेलेले आहेतना ! आणि कशाकरितां तर राक्षसांच्या वधार्थ ! मीं जरी ते क्रूर राक्षस पाहिले नाहींत, तरी त्यांच्या कथा ऐकिल्या व वाचिल्या आहेत त्यांवरूनच अंगावर भीतीनें शहारे उभे राहातात !

अन्य कांहीं साह्य नसतां त्यांना वनांत जाऊन मारणें हें मनुष्याचे पराक्रमाबाहेरचें काम आहे, असें मला वाटतें. ' त्यांना जो मनुष्य मारील त्याच्यामध्यें कांहीं तरी ईश्वरी अंश असला पाहिजे, असें ह्मणावें लागेल ! त्यांची तेथें काय स्थिति झाली असेल ह्याविषयीं तू कांहींच संशय मनांत न आणतां, मला केवळ संतोषविण्याकरितां ते, विश्वामित्र तपोनिधींबरोबर येतील ह्मणून सांगतेस ! मनुष्यांचें रक्त पिण्याची ज्यांना उत्कठ इच्छा, असे ते दुष्ट प्राणी जर महान् महान् ऋषींना तपोबलानें आटपत नाहींत तर तेथें बिचाऱ्या धनुष्यबाणाची काय दाद लागणार ? तशांत त्यांचीं वयें लहान,कधीं त्यांना अजून युद्ध-प्रसंग ठाऊक नाहीं! अरण्यांतील तें ह्या दिवसांतील कडकडऊन, खाण्या-पिण्याची आबदा, अशा सारख्या लहान मोठ्या गोष्टी पुष्कळ मनांत येऊन पोटांत धस्स होऊन जातें ! ते बंधु आपले रानांत खुशाल असोत; इकडे न आले तरी चालतील. सखि, असें असून त्यांना ज्ञानी विश्वामित्र ऋषींनीं काय जाणून नेलेंग ! व सुज्ञ दशरथ महा-राजांनीं तरी त्यांचे काय पराक्रम पाहून त्यांस वनांत जाण्याविषयीं आज्ञा दिली ! सखि, आतां मी कायग करूं ? तूं हें सर्व बाबांना सांग; आजच सांग; ह्याचक्षणीं सांग. मी आतां सर्वथैव निराश झालें ! ह्या क्षणापर्यंत तो कौसल्याहृदयानंद बंधूंसह येईल असें मला वाटत होतें, व ह्मणूनच तुला सर्व गुप्त ठेवावयास सांगितलें. प्रथमच ज्या वेळेस माझी अशी अवस्था झाली त्या वेळेस त्यांना हें सर्व कळविलें असतें तर मजवर व माझ्यामुळें सर्वांवर हा असा जगांत तोंड न दाखविण्यासारखा प्रसंग आला नसता. मी आतां बोलूं तरी काय, करूं तरी काय, सांगूं तरी काय, ऐकूं तरी काय, मला कांहीं समजत नाहीं. मी अगदीं वेडी होऊन गेलें आहे. ”

हें तिचें भाषण ऐकून सखी ह्मणते, “ अशा बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं. रामचंद्राचा पराक्रम जर तू जाणलास नाहीं, तर मला असें वाटतें कीं त्या वीराचें तूं लक्षपूर्वक चारित्रच ऐकिलें नाहींस ! त्याच्या पुढें राक्षस ह्मणजे कांहींच पदार्थ नाहीं. विश्वामित्रासारख्या महर्षींनीं त्यांना अरण्यांत नेले आहेत, ते काय त्यांचा पराक्रम जाणल्यावांचून? मला तर असें वाटतें कीं तो रघुकुलप्रदीप हा पण जिंकून सर्व राजां-

च्या मुखास कलंक लावील! तो साक्षात् विष्णूचा अवतार आहे असें ह्मणतात, आणि तू तर प्रत्यक्ष लक्ष्मी आहेस, अशी माझी खात्री आहे. तेव्हां विष्णूचा व लक्ष्मीचा विवाहसंबंध घडून यावयास नको काय? असो; विश्वामित्रमहर्षि त्यांना खचित खाचित इकडे घेऊन येतील. ते ज्यावेळीं अयोध्येस त्यांना वनांत न्यावयास गेले, त्यावेळींच ते मिथिलानगरीस तुझ्या स्वयंवरासच आणण्याकरितां गेले असें समज. त्या महर्षीस स्वयंवरादिवस माहित आहे, तेव्हां ते परोपकारदक्ष मुनिराज उद्यां आल्यावांचून कधींही राहणार नाहींत. आणखी जर तुझ्या अतुल सौंदर्याची व ह्या दारुण पणाची वार्ता त्या राजपुत्रांच्या कानीं गेली असेल, तर तेही त्या पूज्य ऋषीस ह्या अलौकिक महोत्सवार्थ येण्याविषयीं आपली इच्छा प्रदर्शित करतील. प्रीयसखि, सीते, उगाच व्यर्थ बोलूं नको; भलतेंच मनांत आणून हजारों कुकल्पना काढण्यापेक्षां एकादी चांगली कल्पना काढून जिवाचें समाधान कां करीत नाहींस? जेथें कांहीं यत्न चालत नाहीं, उपायांची गति खुंटते; युक्तीला जागा नाहीं; अयोग्य कृत्य करितां येत नाहीं, लौकिकाची भीति असते; सत्य, नीति हीं जिवापलीकडे राखावयाचीं असतात; लज्जाविनयादि सद्गुण हे पंचप्राण ह्मणून हृदयाशीं धरावयाचे असतात, तेथें दैवाचेंच प्राबल्य समजून परमेश्वरावर भार ठेवावा, हेंच उचित होय." अशा रीतीनें ती सखी आपल्या प्रिय सखीचें जरी सांत्वन करीत होती तरी तिचीही सीते प्रमाणेंच स्थिति झाली होती. पुनः पुनः तिच्या मनांत येई कीं, सीतेची प्रतिज्ञा किती भयंकर! स्वयंवर तर उद्यां! आणि रामचंद्र तर घोरतर अरण्यांत! आतां उद्यां होणार तरी काय! तो गिरजापतीच एक ह्या संकटांतून सोडवील तर! सीतेची ही प्रतिज्ञा माझ्या मुखांतून अथवा बाईसाहेबांच्या द्वारें महाराजांस कळतांच, ते एकदम मेघासारखी गर्जना करितील! आमच्यानें मग त्यांच्या क्रोधरूपी विद्युल्लतेपुढें क्षणभर सुद्धां उभें राहवणार नाहीं! अशा चिंतेत ती होती तरी पुनःसीतेस ह्मणाली, "सीते, तुजसारख्या निर्मलबुद्धीच्या वधूनें रामास तर मनोभावें वरिलेंच आहे, अर्थात त्याचे ठायीं तुझी अत्यंत भक्ति आहे. तो तर तुला आतां देवाप्रमाणें

आहे, तर ज्या देवास तूं अनन्यभावानें भजत आहेस त्यानें तुला उ-द्यां प्रसन्न झालेंच पाहिजे. असें न होईल तर तो तुझा देवच नव्हे असें होईल, किंवा तुझी त्याचे ठिकाणीं अंतःकरणपूर्वक भक्ति नाहीं असें तरी ह्मणावें लागेल ! पण तुझ्या भक्तीविषयीं मला तिळभरही संशय नाहीं ; तेव्हां रामाचे ठिकाणीं देवत्व नाहीं, असें जर ह्मटलें तर शास्त्रांत "स्त्रियांना पति हाच एक परमेश्वर आहे," ह्मणून जें सांगितलें आहे तें सर्वथैव असत्य होईल. शास्त्रें तर परमेश्वरतुल्य ऋषिजनांचीं निर्मल अंतःकरणें होत; तेथें असत्यास थारा कोठून मिळणार? सारांश, त्या तुझ्या रामरूप परमेश्वरास तुझी अनन्यभक्ति ह्या उत्सवास खचित खचित आणील व तुझी मनःकामना पूर्ण करील ! ह्या प्रमाणें कांहीं वेळ विजयेनें सीतेचें समाधान करण्याचा पुष्कळ यत्न केला, परंतु तिच्या उदासीन अंतःकरणास त्यापासून कांहींच उपयोग झाला नाहीं ! सुमेधाजनकांसारखीं तिचीं मातापितरें व ऊर्मिळा व दुसऱ्या प्रेम करणाऱ्या भागिनी हीं जवळ असतां, आपलें जगांत अगदीं कोणी नसावें अशी तिची अवस्था झाली ! सेवेविषयीं तत्पर अशा अनेक दासी व मसलती सांगण्यास हुशार अशा अनेक सख्या असतां, ती केवल निराश्रितासारखी आपणांस मानूं लागली ! एवढ्या सुंदरभवनांत असतां ओसाड वनांत असल्याप्रमाणें तिला झालें ! एक मन तिच्या जवळ नसल्यामुळें तिला सर्व इंद्रियें नसल्याप्रमाणें होऊन गेलें ! आपला प्राणच त्या विश्वामित्रानें नेला असें तिला वाटूं लागलें ! त्या नगरींत एवढा महोत्सव असतां तिचें अंतःकरण निरुत्सवच होतें ! इतके राजे तेथें जमले असून हिच्या मनास रंजविण्यास त्यांत एकही राजा समर्थ नव्हता ! अनेक मंत्री असतां हिला कोणी मंत्र सांगेल असा एकही चतुर नव्हता ! उपाध्याय स्वतः शतानंद खरे, परंतु त्यांच्यापासून हिला आलपानंदही होणें कठिण झालें ! सुमेधा राणीची मेधा ( बुद्धि ) तिच्या कांहींच कामीं पडली नसती ! सुखाचा लेश तरी हिच्या हृदयांत उत्पन्न करील असें जनकामध्यें जनकत्व नव्हतें ! जगांत रामावांचून रममाण वस्तु कांहींएक नाहीं असें तिला होऊन गेलें ! लोहचुंबकानें जशी सुई तशी रामानें ती चंचलवृत्ति झाली ! तिला एकीकडे रामचंद्र व दुसरीकडे उदयिक होणारा अनर्थ दिसत होता ! नंतर सीता ह्मणाली,

" विजये, मी आतां तुझें बोलणें खरें किंवा खोटें ह्याविषयीं कांहीं ह्मणत नाहीं. सखी ह्या शब्दास शोभणारें तेवढें तूं सर्व केलेंस. सखि, मी उद्यां सर्व सख्यांसह रंगमंडपांत येतांच जर तूं मला तो राममणि बंधूसहवर्तमान तेथें आल्याचें वृत्त न सांगशील तर तत्क्षणीं क्रोध व अविवेक हे ज्या संकटांत मला नेतील तेथें डोळे मिटून मी जाईन ! किंवा साहस जेथें प्राण द्यावयास सांगेल तेथें आनंदानें देईन ! अथवा अविनय जो अनीतीचा मार्ग दाखवील त्यानें खुशाल जाईन ! किंवा मोह जें विष घ्यावयास उपदेश करील तें निर्धास्त घेईन ! किंवा प्रेम ज्या डोहांत ओढून नेईल तिकडे बेधडक जाईन ! किंवा आजपर्यंत हृदयीं धरलेलें धैर्य ज्या पर्वतावरून उडी टाकण्याविषयीं मसलत देईल तेथून निःसंशय उडी टाकीन ! किंवा हा मदनाग्नि जेथें जाळील तेथें जळेन ! " अशाप्रकारें ती बोलत असतां क्षणांत उदयकालच्या सूर्यप्रभेप्रमाणें लाल होई ! क्षणांत धेनूसारखी दीन दिसे ! क्षणांत हरिणीसारखी कावरीबावरी भासे ! क्षणांत पृथ्वीसारखी स्थिर वाटे ! क्षणांत दिव्याच्या ज्योतीप्रमाणें कांपे ! नंतर विजया ह्मणाली, " सीते, पुढें काय होईल तें होईल ; तूं विचारी आहेस. असें बोललीस तरी तुझ्या हातून भलतेंच कांहीं व्हावयाचें नाहीं. तें असो; प्रिय सखि, आह्मां थोड्या सखीजनावांचून तुझी ही अवस्था कोणास ठाऊक नाहीं. आतां बाईसाहेबांनीं तुझ्या न लपणाऱ्या मुखचर्येवरून तुझ्याविषयीं कांहीं तर्क केला असेल, पण ज्यापेक्षां त्यांनीं आह्मा कोणासच किंवा तुला प्रत्यक्ष ह्या संबंधानें कांहीं विचारिलेलें नाहीं, त्यापेक्षां त्यांस कांहीं माहित नाहीं, असेंच आपण समजलें पाहिजे ! आजपर्यंत तूं जशी आपली अवस्था अगदीं गुप्त ठेविली आहेस तशीच पुढेंही ठेव ! व आतां ह्या उत्सवांत तूं उदासीन आहेस असें कोणासही कृतीनें किंवा भाषणानें दाखवूं नको. मुख म्लान करूं नकोस. मन थाऱ्यावर ठेव. जिकडे तिकडे लक्ष्य असूं दे. सुंदर व रमणीय वस्तूंनीं दृष्टीस व मनास आनंद होत आहे, असें दाखीव."
ह्याप्रमाणें त्या एकांतस्थळीं त्यांचीं भाषणें होत आहेत, इतक्यांत त्यांना शोधीत शोधीत सुनंदा नांवाची एक दासी तेथें आली व " बाईसाहेब आपल्यास यज्ञशाळेंत बोलावीत आहेत, " असें सीतेस सविनय ह्मणाली. लगेच त्या त्या पवित्रस्थळीं निघून गेल्या.

त्या दिवशींही त्या नगरींत बाहेरून येणाऱ्या लोकांची आणखी आणखी गर्दी होत होतीच. राजेही कांहीं येत होते. आलेल्या राजांस प्रधानांनीं जाऊन विनंति केली कीं, "महाराज, उदयिक दोनप्रहरचे आंत स्वयंवरमंडपांत आपल्या अल्पपरिजनासह येण्याची कृपा करावी." ऋषींनाही, शतानंद उपाध्याय व त्यांची मंडळी ह्यांनीं त्या रंगस्थळीं केव्हां यावयाचें त्याविषयीं विनयपूर्वक सूचना केली. त्या राजधानींतील मोठमोठ्या लोकांस त्या रम्य स्थळीं नियमित वेळीं येण्याविषयीं तर कळविलेंच, पण तेथील सर्व प्रजांसही सर्व लहान मोठ्या रस्त्यांतून अनेक प्रकारचीं वाद्यें वाजवून समजाविलें. स्त्रियांसही आमंत्रणें पोंचलीं. जिकडे तिकडे त्या दिवशीं मंगलवाद्यें वाजूं लागलीं. अशी गडबड त्या नगरींत चालली आहे तों तो दिवस जणूं समाप्त होण्याचे अगोदरच काय सूर्य हा सीतेचा आनंदसूर्य ह्मणून अस्तास गेला! तिचा रामावर किती अनुराग आहे हें सर्वांस समजण्याकरितांच काय पश्चिमदिशेनें गगनभागीं रंगाचा एक हात फिरविला! प्रदोषानें सर्व जगतास तिच्या मोहाचें स्वरूप हळूहळू दाखविलें! तिच्या हृदयांत असणारे आशाबिंदुच काय आकाशांत नक्षत्ररूपानें चमकूं लागले! अस्तु; ह्या स्वयंवरदिवसाच्या पूर्वरात्रीं तर त्या जनकनगरींत मोठाच उत्सव झाला. ती राजधानी सर्वत्र दीपमय झाली होती. राजवाड्याजवळील तें रम्य उपवन व खुद्द राजवाडा हीं तर अनेक प्रकारें सुशोभित केलीं होतीं. तेथें अगणित दीप लाविले होते! त्यांतील एका सुंदर व विस्तीर्ण दिवाणखान्यांत, पुनः इतके राजे कधीं येणार नाहींत, उदयिक तर बहुतेक सर्व निघून जातील, असें समजून मुद्दाम राजे लोकांकरितां, जें मनोरंजक वस्तूंमध्यें अग्रेसर, अति दुःखिताचेंही दुःख दूर करणारें, क्षुधिताची भूक क्षणभर निवविणारें, ज्याचे योगानें कोप्याचा कोप विझून जातो, रोगग्रस्ताचा रोग नाश पावतो, अंतःकरण प्रसन्न होतें, मनाची अनिर्वचनीय स्थिति होते, पशुपक्षीही तल्लीन होतात, परमेश्वरभक्तीचें जें मुख्य साधन, गंधर्वांचें जें सर्वस्व, इक्षुरस, द्राक्षारस इत्यादि अनेक रसांहून जें मधुर, मनुष्यमात्राच्या आनंदाचें मुख्य स्थान, इहलोकींचें केवळ अमृतच, असें वारांगनांचें व गवयांचें गायन चाललें होतें. तेथील तीं अनेकविध सुस्वर वाद्यें व गाणारांचे मधुर

व संगीताला अनुकूल कंठ इत्यादिकांचे योगानें श्रोतृजन अगदीं तटस्थ होऊन जात ! राजवाड्यांतील इतर दिवाणखान्यांतही इतर लोकांकरितां असाच उत्सव चालला होता. त्या रात्रीं तेथें निद्रा ह्मणून कोणास लागली नाहीं ! कित्येक राजे स्वयंवरदिवस उद्यांवर आला ह्मणून भीतीनें धैर्यहीन झाले ! कित्येक सीता आपणास मिळणार नाहीं ह्मणून निराश झाले ! कित्येकांस आपण उगाच आलों, असें वाटूं लागलें ! कित्येक उद्यां कोणता पोषाग करावा, कोणतीं भूषणें अंगावर घालावीं, आपल्याबरोबर कोणास घ्यावें ह्या विचारांत होते ! कोणी अमुक अमुक स्तुतिपाठकांना आपल्या बरोबर येण्याविषयीं सांगा, ह्मणून प्रधानास आज्ञा करीत होते ! ह्याप्रमाणें त्या नगरींतही घरोघर स्त्रीपुरुषांची—स्वयंवरमंडपांत जाण्याविषयींचीं, उद्यां केव्हां उठावयाचें, केव्हां निघावयाचें, कोणकोण येणार, कोणतीं नवीं वस्त्रें काढावीं, कोणते दागिने घालावे, कोणत्या रस्त्यानें जावें, कोठें बसावें, त्या स्वयंवरमंडपांत आपला प्रवेश कसा व्हावा—अशा आशयाचीं अनेक प्रकारचीं बोलणीं चाललीं होतीं. अशी धामधूम चालली असतां त्या रात्रीचें वैभव नष्ट होत चाललें; त्या बरोबर तिचा पति चंद्रमाही निस्तेज झाला ! दीपप्रभा फिकट झाल्या ! स्त्रियांचे अलंकारांतील मोत्यें, हिरे वगैरे गार होऊन गेले; चोहोंकडे गार वारा वाहूं लागला ! पक्षिगण बाजारांतील लोकांप्रमाणें कलकल करूं लागले ! प्रसूत व्हावयास झालेल्या नवीन गर्भिणीप्रमाणें पूर्वदिशा चिंताग्नीनें लाल दिसूं लागली ! इतक्यांत ती, ज्याचे प्रथम कर दिसूं लागले अशा अत्यंत तेजस्वी व आरक्तवर्ण बालरवीतें प्रसवली ! नगरांत सर्वत्र सुस्वर मंगल वाद्यें वाजूं लागलीं. तो दिवस लोकांस सणाहून अधिक वाटला. जो तो आपल्या घाईंत व तयारींत होता ! धनुष्य सज्ज करण्याचा समय लौकर यावा ह्मणूनच काय तो सूर्यनारायणही त्या दिवशीं शीघ्रगति झाला ! दिवसाचा पाहिला प्रहर झाला ह्मणून सांगणारी घंटा वाजून चोहोंकडे शंखनाद झाले ! जनकराजा त्याचे प्रधानादि सर्व कारभारी शतानंदादि ब्राह्मणमंडळी, ह्यांस क्षणभरसुद्धां कोणापाशीं बोलण्यास अवकाश नाहींसा झाला ! राजवाड्यांतील स्त्रियांचीही फार लगबग उडाली ! प्रधानादि सर्व व्यवस्थापकमंडळी त्या स्वयंवरमंडपांत सूर्योदयापूर्वींच जाऊन व्यवस्था करीत होती.

सुज्ञ व रसिक श्रोतेहो, जेथें आतां हळूहळू राजेलोक आपल्या वैभवासह यावयास लागणार, अनेक ऋषि व दुसरे हजारों लोक जमणार, जनकराजानें सीतेवरील अत्यंत प्रेमास्तव ज्यासाठीं विपुल द्रव्य खर्च केलें, जेथें आतां प्रहराच्या आंत अवर्णनीय शोभा येणार, ज्यास्थळीं कांहीं वेळानें आनंद व औदासीन्य हीं प्रत्यक्ष दिसणार ! असा तो स्वयंवरमंडप रिकामा आहे तोंच लगबगीनें तुह्मांस दाखवून नंतर आपल्या कथेच्या पुढील मार्गक्रमणास लागूं. मिथिलानगरीच्या मध्यभागीं एक विस्तीर्ण मोठें पटांगण होतें. तेथें जनकमहाराजांचा एक भव्य वाडा होता. त्याच्या पुढें हा मंडप होता. ह्याचा आकार दीर्घवर्तुलाकार होता. ह्यांत कमींत कमी एक लक्ष मनुष्यें विशेष गर्दी न होतां राहतील इतका हा विस्तीर्ण होता ! ह्यांत प्रवेश करण्यास अनेक सुंदर व रुंद अशीं द्वारें होतीं. त्यांत तीन चार तर फार दर्शनीय होतीं; ह्यांतही ज्या मधून राजेलोकांचा प्रवेश व्हावयाचा होता तें एकद्वार फारच मनोहर व भव्य होतें. ह्या एका प्रवेशद्वारावरील बाहेरून दिसणारें वैभवच जनकराजाशीं इतर राजांस मत्सरबुद्धि प्रकट करण्यास कारण बस होतें ! हें द्वार उंच होतें; त्या स्थळीं सुंदररीतीनें रंगवलेले असून ज्यांवर सुवर्णाच्या मनोहर वेली, रत्नमय पुष्पगुच्छ, फळांचे झुबके, पक्षिगण, ह्यां सह काढल्या आहेत, असे अनेक गोलाकृति उंच स्तंभ होते. अनेक ध्यानांचीं पशुपक्ष्यांचीं लांकडांचीं रंगविलेलीं चित्रें त्या द्वारावर बसविलेलीं होतीं ! अनेक देशांतील मनुष्यांचे चेहेरे त्या स्थळीं लाविलेले होते. जनकाचा मुख्य प्रधान व त्याच्या हाताखालीं अनेक लोक, उत्तम पोषाक घालून राजांच्या स्वागतार्थ उभे होते. ह्याप्रमाणेंच सर्वद्वारांत लोकांचें स्वागत करून त्यांस योग्य स्थळीं बसविण्याकारितां राजाचे कामदार तयार होते. ह्या मुख्य राजद्वारांतून, त्या उंच, भव्य व विस्तीर्ण मंडपांत प्रवेश करून चोंहोंकडे एकदां दृष्टि फेंकिली कीं, पहाणाराचें अंतःकरण अगदीं प्रसन्न होऊन जाई ! वर निरभ्र आकाशाप्रमाणें स्वच्छ छत दिसत असून ठायीं ठायीं अनेक सूर्याचें अनुकरण करणारीं अशीं सुवर्णाचीं फारच मोठीं कमलें होतीं. शिवाय त्या छतावर रेशमाच्या प्रेक्षणीय लांब लांब वेली काढलेल्या होत्या. आंत समान्तरावर दीर्घवर्तुलाकृतीनें असणारे अनेक चित्रविचित्र उंच स्तंभ

जवळ असणारांचीं मनें हरण करून त्यांस कांहीं वेळ आपल्यासारिखेंच उभे करीत ! ह्या स्तंभावरून त्या स्तंभावर अनेक प्रकारच्या मेहरपा होत्या, त्यांच्या दोन्ही अंगांस नानाविध देखाव्यांचीं हुबेहुब चित्रें लिहिलेलीं होतीं ! त्यांचें वर्णन कोठवर करावें ! अशा सारखीं शोभास्थानें हीं प्रत्यक्ष पाहिलींच पाहिजेत! ह्यांचें वर्णन करणें कसें होणार? ज्या वस्तु नेत्रांनीं पहावयाच्या त्या वाणीनें कशा सांगाव्या ! असो; त्या मेहेरपांच्या प्रारंभीं, मध्य भागीं, व शेवटीं भले लठ्ठ सोनेरी रंगाचे गोंडे डोलत होते; योग्य स्थळीं अनेक रंगांच्या झालरी होत्या; अनेक ठिकाणीं कापडाच्या सुंदर जाळ्या होत्या; मंडपाच्या सभोंवती किनखापी पडदे सोडलेले असून आंत वारा यावा ह्मणून अनेक ठिकाणीं खिडक्या होत्या. ह्या मंडपांत राजवाड्याच्या अगदीं अग्रभागीं रंगभूमि केली होती; हेंच स्थळ त्या शिवधनुष्यास गुण चढविण्याकारितां होतें ! ही रंगभूमि फारच मोठी प्रशस्त असून शृंगारलेली होती; तेथें मंडपांतील इतर भागांपेक्षां पुष्कळ व अनेक जातींच्या रंगांचे ध्वज होते! ह्या रंगभूमीच्या सभोंवताली सुंदर हस्तिदंती कठडा होता ! हें रमणीय व राजपराक्रमाचें स्थान सर्वांस दिसावें ह्मणून मंडपांत बसण्याच्या जागा एकापेक्षां एक उंच अशा अनेक चक्रव्यूहाकृति केल्या होत्या ! अनेकप्रकारच्या वस्त्रांनीं त्या वेष्टिलेल्या होत्या ! पुढील चारपांच वर्तुलाकृति रांगा अर्ध्या राजपुत्रांसाठीं व अर्ध्या ऋषिसमाजाकारितां व ब्राह्मणांसाठीं होत्या. प्रत्येक राजाची जागा ह्मटली ह्मणजे एक बेताचा उत्तम हस्तिदंती मंचक असून त्यावर रेशमी मऊ गाद्या, त्यांवर स्वच्छ पांढरें आस्तरण, आणखी टेंकण्याकारितां दोन तीन मोठाले तक्ये, शिवाय अनेक रंगांच्या गिर्द्या होत्या; मयूरपिच्छांनीं व वाळ्यानें युक्त असे विंझणे होते; प्रत्येक मंचकावर चढण्याकारितां दोन बाजूंला चार चार पायऱ्यांचे तांबड्या वस्त्रांनीं आच्छादिलेले जिने होते; त्या मंचकाच्या बजूला खालीं राजांच्या मनुष्यांकारितां जागा होती. अमुक नृपतीनें अमुकच स्थळीं बसावयाचें असें तेथील व्यवस्थापकमंडळीनें निश्चित केलें होतें. ऋषींचीं आसनेंही उंच असून तीं व्याघ्रचर्मांनीं वेष्टित होतीं, त्यांच्या शिष्यांसही योग्य जागा होत्या ! ह्या चारपांच रांगांच्या पाठीमागील सर्व

रांगा सधन, व्यापारी व सद्गृहस्थ ह्यांकरितां असून त्यांच्या पाठीमागील सर्व रांगा सर्व लोकांकरितां गर्दीनें बसतां येतील अशा होत्या. ह्यांवर मऊ गाद्या होत्या. ह्या सर्व रांगांवर सुखानें चढतां यावें ह्मणून चोहोंकडे सुरेख जिने केलेले होते स्त्रियांनीं यावयाचें तें त्या वाड्यांत यावें, असें होतें. तेथून ती रंगभूमि चांगली दिसत होती, आणखी त्या मंडपांत, शोभतील अशा स्थानीं पाषाणाच्या व लांकडाच्या, त्या काळीं त्या कलेची परमावधि झाली ह्मणून सांगणाऱ्या, व आतां तशा क्वचित् दृष्टीस पडणाऱ्या अशा, देव, मनुष्य, गंधर्व, पशु, पक्ष्यांदिकांच्या मूर्ति होत्या. मधून मधून लहान लहान कारंजीं सुटलेलीं होतीं! सर्वत्र सुवास सुटावा ह्मणून फुललेल्या फुलझाडांच्या अगणित कुंड्या आंत बाहेर ठेविलेल्या होत्या! एवढा मोठा तो मंडप पण त्यांत चोंहोंकडे व बाहेरही सर्पासारख्या लठ्ठ व सुवासीक पुष्पमाळा बांधलेल्या होत्या! अनेक प्रकारचे वृक्षपल्लव शोभार्थ ठिकठिकाणीं टांगलेले होते; मंगल कारक उदकानें भरलेले सुवर्णमय, व मृत्तिकेचे घटही तेथें होते; घडांसह केळीही त्या स्थळीं दिसत होत्या; मोठमोठाले आरसे, अनेक चित्रपट यथास्थानीं होते. आंतील कित्येक स्तंभ वगैरे फारच सुशोभित दिसत होते ह्याचें मुख्य कारण कीं, त्या ठिकाणीं मोठमोठाले हिरे पाच, माणिक, मोत्यें, यांचा हवातसा उपयोग केला होता! मंडपाच्या सभोंवतालची जागा चांगली केलेली असून गोमयानें सारवलेली होती; तेथें अनेक ठिकाणीं झाडांच्या कुंड्या होत्या, व अनेक स्थळीं रंगवल्ली घातलेल्या होत्या. नगरांतही सर्वत्र तोरणें व ध्वज फडकत होते.

अशा ह्या मंडपांत राजेलोक येऊं लागले. ते कोणत्याही द्वारीं आले तरी त्यांस त्या मुख्य राजद्वारांतून आंत नेत. राजाची स्वारी आली ह्मणजे भालदार चोपदार ललकारीत व स्तुतिपाठक त्याची सावकाश व मधुर स्तुति करीत, तेणें करून हा कोठील राजा हें तेव्हांच समजे! मग लगेच त्यांस व्यवस्थापक नेमलेल्या मंचकार नेऊन बसवीत. ह्याप्रमाणें त्या नगरींत आलेले सर्व राजे मंडपांत हळूहळू आले! ऋषीही आले! अशा गर्दींतही आपलें योग्य स्वागत झालें, ह्मणून ते बहुत संतुष्ट झाले! समुद्रास भरती येऊन रिक्त असलेलें वाळवंट पाण्यानें जसें केव्हांच भरून जातें, त्याप्रमाणें तो मंडप सर्व प्रकारच्या मनुष्यांनीं भरून गेला!

आंत अतोनात दाटी झाली. पुढें व्यवस्थापकांचें कांहीं चालेना! सर्वांच्या अंगांतून घामाच्या धारा चालल्या. त्या मंडपाच्या बाहेर आंतल्या पेक्षां फारच मनुष्य होतें. राजे लोकांबरोबर आलेले सर्व लोक बाहेर उभे होते. शिवाय नगरांतील हजारों मनुष्य आंत जागा नाहीं ह्मणून बाहेरीलच मौज पहात राहिलें होतें. रंगविलेले व शृंगारलेले हजारों रथ, तसेच हत्ती, घोडे, व पालख्या ह्यांनीं बाहेरील पटांगणें अगदीं भरून गेलीं! ध्वजांनीं फुलून गेलीं! नानाविध शब्दांनीं गजबजून गेलीं! प्रथमतः मंडपांतील लोकांचीं मनें शोभेनें हरण केलीं व त्यांस तत्संबंधानें गोष्टी बोलण्यासही लाविलें! परंतु बराच वेळ झाल्यावर त्या रंगभूमीवर धनुष्य केव्हां येतें, सीतादेवीचें दर्शन कधीं होतें, कोणता राजा प्रथम पुढें येतो, हें पहाण्याविषयीं लोक अत्युत्सुक झाले होते! मध्येंच कोणी तरी "आलें आलें" ह्मणून ह्मणे, तों लक्षावधि डोळे त्या रंगभूमीकडे लागत! तेथील जनकमंदिरांत पूर्वी शिवधनुष्य आणून ठेविलेलें होतेंच. सीताही आपल्या प्रिय सख्यांसह व दासींसह आली होती. सुमेधा राणी व दुसऱ्या हजारों स्त्रिया तेथें प्रातःकाळींच आलेल्या होत्या. आंत त्यांचीं मंगलपर सुस्वर गाणीं चाललीं होतीं. बाहेरही सुस्वर वाद्यें सुरू झालीं. मूल्यवान् वस्त्रालंकारांनीं सजलेले ते राजे, जटामुकुट धारणकरणारे, भस्मानें चर्चिलेले, व तेजानें शोभणारे ते ऋषि, व दुसरे स्वशक्तीप्रमाणें पोषाक केलेले हजारों लोक, राजवाड्यांतीलही मनोहर वस्त्रभूषणांनीं शोभायमान दिसणाऱ्या सुंदर स्त्रिया इत्यादि सर्वांच्या योगानें तें स्थळ कविवरांच्या वाणीचें विलासमंदिर होऊन गेलें होतें! पृथ्वींतील सर्व पराक्रम, सर्व तेज, सर्व विद्या, सर्व सदाचार, सर्व सौंदर्य, सर्व शहाणपण, हीं सर्व त्या मंडपांत कोंदून गेलीं होतीं! राजाजनक शतानंद उपाध्याय, अष्टप्रधान व दुसरे कामदार तेथें आलेल्या राजांशीं, व ऋषिवर्यांशीं कांहीं भाषणें करीत उभे होते; सीता विजयेसहवर्तमान राजवाड्यांत जेथें बसली होती; तेथून जाळींतून बाहेरील सर्व शोभा पाहत होती. पण आत्म्यांवांचून जसें शरीर असावें तसा तो मंडप रामावांचून तिला भासला! धनुष्यास गुण चढविण्याचा समय आला असूनही अद्यापि रामचंद्र आला नाहीं तेव्हां आतां तो खचित येत नाहीं असें सीतेस वाटलें, व नेत्रांपुढें एवढा

समारंभ असतांही तिला पुढील दुःखसमारंभच प्रत्यक्ष दिसूं लागला ! इतक्यांत ऋषिसमाज बसला होता, तेथें प्रथम फार गलबला झाला ! ते सर्व लोक वर उठले; त्याबरोबर रामेही वर उठून लगेच पाठीमागील सर्व लोक हांहां ह्मणतां स्वस्थानावर उभे राहिले ! कारण त्या ऋषिमंडळामध्यें त्या तेजोनिधि विश्वामित्राचा रामचंद्रलक्ष्मणांसह एके काळीं उदय झाला ! रामलक्ष्मण हे कोण आहेत, ह्यांचे जन्म पृथ्वीवर कशाकरितां आहेत, हे येथें कशासाठीं आले आहेत, सीता ही किमर्थ अवतरली आहे, हें सर्व त्या समयीं न समजणारें गुह्य ज्या कित्येक ज्ञानी ऋषिवर्यांस समजलें होतें, त्यांचीं नेत्रें प्रेमोदकानीं भरून गेलीं व अन्तःकरणें तत्त्वज्ञानानें गढून गेलीं! शतानंद व राजाजनक ह्यांनीं एकदम पुढें येऊन प्रणाम करून त्या ब्रह्मर्षीस,रामलक्ष्मण व दुसरे शिष्य यांसह, ऋषिसमूहांत मुख्यस्थानीं बसविलें ! रामलक्ष्मणांचा पोषाक बहुतेक क्षत्रियांसारखाच होता, पण कांहीं कांहीं ऋषींसारखाही दिसत होता ! विश्वामित्राच्या उजव्या व डाव्या अंगास बसणाऱ्या त्या रामलक्ष्मणांकडे त्या मंडपांतील प्रत्येकाचे डोळे लागले होते. त्यांचें विलक्षण रूप, तेज, सौजन्य वगैरे पाहून त्यांतील प्रत्येक व्यक्ति त्यांविषयीं अनेक प्रकारें अनुकूल भाषणें करीत होती ! ह्यांतून कोणाच्या तरी एकाच्या हस्तें हा दारुण पण खास सिद्धीस जाईल असें सर्व क्षत्रियपुत्रांस वाटलें, व त्यांस धैर्यही बरेंच आलें ! विश्वामित्र दशरथपुत्रांसह येतांच जनकास, सर्व मंत्रिजनास व उपाध्यायादि ब्राह्मणमंडळीस परमानंद झाला. जवळ असलेल्या राजाजनकास व शतानंदास विश्वामित्र मुनीनें कांहीं कुशल प्रश्न करून रामलक्ष्मणांस, हा जनक व हा गौतम-अहल्यापुत्र शतानंद आहे, असें सुचविलें. जनकराजा मोठ्या विनयानें विश्वामित्रमहर्षीस ह्मणाला, "भगवन्, आपल्या आगमनानें मी कृतार्थ झालों, व अग्निकुमारांचा किंवा सूर्यचंद्रांचा भास उत्पन्न करणारे, आपण यज्ञसंरक्षणार्थ अरण्यांत नेलेले हे माझ्या प्रियमित्र दशरथाचे पुत्र बरोबर आणिलेत, तेणेंकरून तर मजवर आपला मोठाच अनुग्रह झाला आहे !" इतक्यांत मध्येंच शतानंद ह्मणाला, "हेच ते त्या पराक्रमी दशरथमहाराजांचे पुत्र. दशरथ तर लहानपणीं अगदीं ( रामाकडे बोट दाखवून ) असाच दिसत होता. ही मूर्ति दृष्टीस

12

पडली तेव्हां मला दशरथाचे बालपणांतील दिवस आठवले! असें बोलत आहे तों ते मुनिराज विश्वामित्र ह्मणाले, "अगा हे याज्ञवल्क्यशिष्य जनका, अगा गौतमपुत्र शतानंदा, आपण ह्मणाल्रांत तोच हा रघुकुलतिलक रामचंद्र, व हा लक्ष्मण. ह्यांच्या मध्यें जे कांहीं पराक्रमादि लोकोत्तर गुण आहेत, ते सांगून समजावयाचे नाहींत. ते समजण्यास ह्यांचा अल्प तरी सहवास पाहिजे. तुला आतां लौकरच ईशकृपेनें माझ्या ह्या सांगण्याचा अनुभव येईल! ह्या लक्ष्मणाची वडील बंधूवर कांहीं अप्रतिमच भक्ति आहे! त्याचे सेवेविषयीं ह्याची तत्परता अगदीं परमावधीस पोंचली आहे! ह्यांचा माझा सहवास दीड महिन्याहून थोडा कमीच असेल. इतक्या काळांत ह्यांनीं पुष्कळ राक्षसांस ठार केलें! रामचंद्रानें त्या निर्दय ताटिकेस क्षणांत मारून सुबाहूचे प्राण हरण केले, आणि अजिंक्य झालेल्या ताटिकापुत्र मारीचास एका बाणानें कोठच्या कोठें फेंकून दिलें, तें अद्यापि समजलें नाहीं! क्षुधातृषा ह्यांपासून ह्यांना कधीं बाधा होऊं नये ह्मणून ह्यांना मीं बलातिबला विद्या पढविली आहे, व अनेक अस्त्रप्रयोगही शिकविले आहेत. ह्यांनीं अनेक आश्रम व वनांतील अनेक स्थळें पाहिलीं आहेत व तत्संबंधानें अनेक जुनेपुराणे इतिहास मजपासून ऐकिले आहेत. थोडक्या अवकाशांत ह्यांनीं माझें महत्कार्य केलें. पुत्रवियोगामुळें फार दुःखी होणारा ह्यांचा पिता दशरथराजा ह्यांच्याकडे ह्यांना घेऊन अयोध्येस मी जाणार होतों, इतक्यांत तुजकडून अत्यंत आग्रहाची स्वयंवराची निमंत्रणपत्रिका मजला येऊन पोहोंचली. मग मोठ्या घाईनें इकडे निघालों, ते आज पराकाष्ठेनें ह्या वेळीं येथें येऊन पोहोंचलों. दुसरा असा चमत्कार झाला कीं, काल एका अफाट किर्रवनांतून मार्गक्रमण करीत असतां, भगवान् गौतममहर्षींची भार्या अहल्या जी हजारों वर्षे पतीच्या शापानें शिला होऊन पडली होती, तिला रामचंद्राच्या चरणधूलीचा स्पर्श होतांच ती दिव्य स्त्री झाली! व त्या अहल्येची व गौतमाची भेट झाली! हें ऐकून शतानंदाचे डोळ्यांतून खळखळ अश्रुधारा वाहूं लागल्या! त्यामुळें त्यास पुढें कांहींच दिसेनासें झालें! कंठ सद्गदित झाल्यामुळें स्पष्ट बोलतांही येईना! तरी आनंदानें व वृद्धत्वानें कांपत कांपत तो रामापुढें आला, व रामचंद्राच्या चरणांवर मस्तक ठेवून हात जोडून मंदस्वरानें

ह्मणाला, " रामचंद्र, आपण साक्षात् परमेश्वरावतार आहां, आपणांस जगांत कांहीं अलौकिक कृत्यें करावयाचीं आहेत ह्मणून हें मानवरूप धारण केलें अहां, ह्यांत तिळभरही संशय नाहीं ! स्वापराधावांचून माझी माता शापाच्या योगें शिला झाली होती, तिचा, हे भगवन्, आपण उद्धार केलात ह्यापेक्षां, आपण भगवदवतार अहां, असें ह्मणण्यास अधिक कोणतें प्रमाण पाहिजे ?" शतानंद ह्याप्रमाणें आणखी स्तुतिपर बोलणार होता, इतक्यांत रामचंद्र ह्मणाला, " महाराज, हें सर्व ( विश्वामित्राच्या चरणांकडे बोट दाखवून ) ह्या भगवच्चरणांच्या कृपेचें फळ आहे. " हें ऐकून त्या उपाध्यायानें प्रेमभरांत येऊन सध्या प्रसंग कोण आहे, समारंभ कसला चालला आहे, वेळ किती झाला आहे, हें कांहींच मनांत न आणतां रामलक्ष्मणांस त्या मुनिश्रेष्ठविश्वामित्राचें इतिवृत्त सांगण्यास आरंभ केला. श्रोतेहो, हें विश्वामित्रवृत्त त्या बंधुद्वयास, जनकास व स्वतःविश्वामित्रासच ऐकूं द्या; तुह्मांस तें ऐकण्यास वेळ नाहीं. आपण आपल्या चारित्रनायिकासीतेकडे जाऊन ती काय करते, काय ह्मणते आहे, तें पाहूं व ऐकूं या.

विश्वामित्ररूपवसंताबरोबर रामलक्ष्मणमदन येतांच, तें प्रमदावन अगदीं चंचल झालें ! तत्क्षणीं सीता ही अशोकलतेप्रमाणें दिसूं लागली ! तिच्या मुखावर आनंद, अनुराग, इत्यादि अगदीं स्पष्ट दिसत होते. इतक्यांत विजया कोठें दुसरीकडे गेली होती, ती जवळ येऊन सीतेस हळूच ह्मणाली, " अग सीते, आतां तो गुणग्राम राजमणि रामचंद्र येईल असें दिसत नाहीं ! आतां आपणांस साहस, अविनय, धैर्य, मदनाग्नि, हीं काम करावयास सांगतील, त्याप्रमाणें तयारी करण्यास लागण्याचा समय आला ! " हें विनोदाचें तिचें भाषण ऐकून सीता ह्मणाली, " विजये, तू आपल्या वाणीला आपल्या नांवाप्रमाणें जय आणिलास ! तूं बुद्धिवैभवानें केवळ सरस्वतीच आहेस ! तुझे मजवर फारच उपकार आहेत, ते कसे फिटतील ते फिटोत ! पण सखि, अग अजून तरी माझा चिताग्नि कुठें विझाला आहे? त्यांच्यानें ह्या जरठ धनुष्यावर दोरी कशीग चढवेल? अग ते राजपुत्र अत्यंत सुकुमार आहेत ह्मणताततना ? " हें ऐकून सखी ह्मणाली, " तूं त्यांना पाहिल्यावांचून काय हें तुझें प्रसन्नवदन दिसत आहे ? तूं त्यांना जरी पाहलें असशील,

तरी मी तुला त्यांना दाखवितें. आपले जनक महाराज उभे आहेत, ते पहा, त्यांच्याजवळ लांब लांब शुभ्र दाढीचे, मस्तकावर उंच जटाभार वहाणारे, व ज्यांच्या तोंडावरील सुरकुत्या येथूनही स्पष्ट दिसत आहेत, जे मोठे तेजस्वी आहेत व ज्यांच्या पाठीमागें दुसरे पुष्कळ ऋषि बसले आहेत, ते विश्वामित्रमुनि असावेत, त्यांच्या बाजूला जे सिंहाच्या बच्चांप्रमाणें शूर दिसत आहेत तेच रामलक्ष्मण ! हे रूपानें एकसारखेच दिसतात खरे, पण ज्यापाशीं आपले शतानंद उपाध्याय मोठ्या नम्रतेनें हात जोडून कांहीं बोलत आहेत, तोच तुझ्या हृदयफलकावर खोदलेला रामचंद्र, ह्यांत संशय नाहीं. तोच कीं काय हें आतां लौकरच तुला समजेल ! सीते, ह्याचें चारित्र ऐकून तुला ह्याचें सुरूप कसें ग कळलें? ह्या पुरुषाच्या दर्शनानें तुझी झाली अशीच अवस्था व्हावी हें योग्यच आहे; तो शंकरब्राह्मण यथार्थ वर्णन करणारा खरा ! तू जें ह्मणालीस कीं, "त्या नररत्नाला मीं अजून प्रत्यक्ष पाहिलें नाहीं आहे, ह्मणून कांहीं तरी माझी स्थिति बरी आहे ! " तेंही आतां खरें आहे, असें माझ्या अनुभवास आलें ! " अशा प्रकारें ह्यांचीं इकडे विनोदाचीं भाषणें चाललीं असून बाहेर शतानंदोपाध्यायांनीं विश्वामित्राच्या चरित्राचें चऱ्हाट लाविलें आहे, इतक्यांत अडीच प्रहरांचा, आकाश भेदून जाणारा त्या स्थळीं शंखनाद झाला ! तो ऐकून शतानंद पुरोहितास आपल्या पुढच्या कर्तव्यास फार विलंब झाला, राजांना येऊन फारच वेळ होत आला, असें वाटून त्यानें विश्वामित्राचें चरित्र सांगण्याचें पुरें केलें, व जनक व उपाध्याय ह्यांनीं त्यांचा निरोप घेऊन तेथील राजमंदिरांत गेले. जातांच तें धनुष्य रंगभूमीवर नेण्याची त्यांनीं आज्ञा केली. तें धनुष्य त्या राजवाड्यांत खालच्या मजल्यावर होतें, त्याच्याजवळ जनकाचा बंधु कुशध्वज हा, दुसऱ्या पांचशें सशक्त मनुष्यांसह तयार होता.

श्रोते हो ! हें धनुष्य आकृतीनें विशेष मोठें होतें असें नाहीं ; त्या वेळीं धनुर्धाऱ्यांचीं जीं धनुष्यें होतीं, त्यांपेक्षां कांहीं मोठें होतें एवढेंच. हें शंकरांनीं स्वतः सर्वदेवतांच्या अंशांनीं बनविलेलें होतें, व त्यामध्यें त्यांनीं असा कांहीं लोकोत्तर गुण ठेविला होता कीं, जो निःसीम परमेश्वरभक्त असून ज्याचें आचरण परमपवित्र असेल, ज्याला गर्वाचा

लेशही नाहीं, परोपकार करण्याविषयीं जो सदासर्वदा झटणारा, साधुजनांस पीडा देऊन त्यांच्या सत्कृत्यास विघ्नें आणणारे जे दुष्ट, त्यांच्या नाशाविषयीं अंतःकरणपूर्वक यत्न करणारा, अशासारख्या क्षत्रियास हें सहज इतर धनुष्यांप्रमाणें वाटावें, इतरांस फारच जड लागावें! हा गुण ह्या धनुष्यामध्यें होता, ह्मणूनच ह्या धनुष्यावर गुण चढविण्याचा पण लाविला होता! आतां मात्र तें धनुष्य रंगभूमीवर लौकर येईल, असें तेथील सर्व लोकांस वाटलें; त्यामुळें सर्वांनीं दृष्टि तिकडे लाविल्या; तत्क्षणीं सर्वांच्या शरीरांचा कल पुढें झाला! इतक्यांत ज्याला लांब लांब पुष्कळ दोऱ्या लाविलेल्या असून प्रत्येक दोरीला अनेक मनुष्यें ओढावयास लागलीं आहेत, असें तें मदनारिशंकराचें धनुष्य, पांचशें सशक्त मनुष्य तोंडांनीं बलसूचक गाणीं ह्मणत, रंगभूमीवर एकाभागीं आणीत होते! व दुसऱ्या भागीं, मूल्यवान् वस्त्रालंकारांनीं व रूपकांतीनें शोभायमान दिसणाऱ्या व मुखानें मंगलकारक गीत गाणाऱ्या अशा शतशः दासी व सख्या ह्यांनीं वेष्टिलेली, जिनें आपल्या उजव्या अंगास असलेल्या विजयेचा, उजव्या हस्तानें, डावा हात धरला असून डाव्या अंगास असलेल्या यशोदेच्या खांद्यावर दुसरा हस्त ठेविला आहे, जिनें उत्तमोत्तम वस्त्रें धारण केलीं असून अलंकार बेताचे घातले आहेत, विनयामुळें जिची गति फार मंद असून जिचें मुखकमल किंचित् खालीं झालें आहे, तें वर करण्यासाठीं जिला विजया वारंवार सांगत आहे, अशी ती जनककन्या सीता—किंवा मदनाचें धनुष्य—बाहेर येऊं लागलें! हीं दोनही धनुष्यें राजसमूहाच्या दृष्टीस पडतांच त्यांच्या कांहीं विलक्षण मनोवृत्ति होऊन गेल्या! शतशः लोकांनीं ओढीत आणिलेलें तें शंकरचाप पाहतांच कित्येकांच्या डोळ्यांपुढें अंधेरी आल्यासारिखें झालें, पण पुष्पासारिखें कोमल असें हें सीतारूप कामाचें धनुष्य दृष्टीस पडतांच त्यांचे नेत्र थंडगार झाले! ह्या शिवधनुष्यानें कित्येकांचीं अंतःकरणें दडपून गेलीं खरीं, परंतु तीं मदनचापदर्शनानें पुनः प्रसन्न झालीं! शंकराचें तें जरठ धनुष्य उचलावयास जाण्याविषयींची कित्येकांची उत्सुकता तेव्हांच लयास गेली, पण अनंगाच्या ह्या स्त्रीरूप शरासनाकडे बघतांच त्यांस त्या धनुष्यापर्यंत तरी जावें असें वाटलें! अशाप्रकारें बहुतेक राजांची मनःस्थिति एकदां एक व एकदां तद्विरुद्ध

होई! उघडच आहे कीं, ज्या वस्तूंच्या आकर्षणशक्तीनें त्यांच्या इंद्रि- यांवर व्यापार व्हावयाचे, त्या दोन वस्तूंमध्यें एकमेकांविरुद्ध धर्म पडले! एक राठ, जड, जुनी, निर्जीव, अरूप, शंकरप्रिय, अशी वस्तु असून, दुसरी कोमल, कृश, नूतन, सजीव, सुरूप, मदनप्रिय, अशी होती! असो; त्या धनुष्याबरोबर राजाजनक, कुशध्वज, शतानंदपुरोहित, सुदामनादि अष्टप्रधान वगैरे थोडी मंडळी त्या रंगस्थळीं आली, आणि जिकडे ति- कडे सामसुम होतांच, तो उपाध्याय सर्वांस ऐकूं येईल अशा मेघा- सारख्या शब्दांनीं, स्पष्ट व शुद्ध वाणीनें ह्मणाला, "अहो, सर्व पराक्रमी कुलीन क्षत्रियपुत्र हो! अहो समस्त राजेहो! ऐका ऐका, हें पहा इकडे पिनाकपाणिगिरजापतिशंकराचें धनुष्य येथें आणून ठेविलें आहे; हें आमच्या सीरध्वजजनकमहाराजांच्या गुणशालीनी सीतानामक कन्यारत्नाचें मोल आहे! तर ज्यांस हें त्रिभुवनैक रत्न पाहिजे असेल, त्यानें ह्या स्थळीं येऊन हें धनुष्य भुजबळानें वांकवून ह्याच्या दोन्ही टोकांवर ज्या चढवून तें हातांत् घेऊन, बाण जोडावा!" तत्क्षणीं पुनः सर्व राजांच्या दृष्टि त्या सीतारत्नाकडे वळल्या! व तिचें म- नांत नानाप्रकारें वर्णन करूं लागले. कोणी ह्मणत, खरोखर रत्न तर हेंच आहे! दगडास रत्नें ह्मणून तीं मुकुटांत घालणारे आह्मीं महा मूर्ख आहोंत! कोणी बोलत, हिनें यौवनरूप सोपानमार्गाच्या पहिल्या पायरीवर नुकताच कोठें पाय ठेविला आहे! कोणी ह्मणत, अशी सुंदर कन्या आह्मीं जन्मांत कीं हो पाहिली नाहीं! कोणी ह्मणत, ही खरोखर सौंदर्योपवनांतील वसंतांतील नवमालिका आहे, हिला मोहून हे सर्व राजमधुप आले आहेत! हिचे अधर हे पल्लव होत, पुष्पगुच्छांप्रमाणें हिचे स्तन शोभत आहेत! कोणी ह्मणत हिनें आप- ल्या कोमलचरणांनीं रक्तकमलांची शोभा तुडवून टाकिली, व लाल व मृदु पल्लवांची कांति हातांनीं कुस्करून टाकिली, ह्मणूनच हिचे चरण व करतल लाल दिसत आहेत! खरोखरच हिनें पोंवळ्याचा रंग पिऊन टाकला, आणि ही दाडिंबाच्या दाण्यांच्या पंक्तीसारख्या आप- ल्या दंतपंक्तींनीं राजहंसाच्या शुभ्रत्वाला हंसत आहे! कोणी ह्मणत, अग सुंदरि, तुझें मुखकमल इकडच्या अंगास फिरीव, ह्मणजे हीं आमच्या हातांतील सरोवरांतील ताजीं कमळें निर्माल्यवत् वाटतील! हिची अंग-

कांति पाहतांच सुवर्णाचा रंग फिकट दिसूं लागला! अधर पाहतांच पिकलेल्या तोंडल्याचा रंग काळसर भासूं लागला! कोणी ह्मणत, जगांतील सर्व रमणीय पदार्थांचीं सत्त्वें काढून त्यांपासून ही रमणीय रमणी बनविलेली आहे! कोणी ह्मणत, हिचें हुबेहूब चित्र कुशल चितार्‍यासही काढतां येणें कठिण! कोणी ह्मणत, हिच्या रूपाचें वर्णन करतां कधींही यावयाचें नाहीं, तें डोळ्यांनीं पाहून तृप्त व्हावें एवढेंच! कोणी ह्मणत, आह्मीं पूर्वीं पाठविलेल्या मनुष्यांनीं जें हिच्या रूपाचें वर्णन सांगितलें, त्यांत आणि ह्यांत महदंतर आहे! त्यांना कांहींच सांगतां आलें नाहीं! कोणी ह्मणत, हिचा प्रत्येक अवयव अनुपम आहे! हिच्या सौंदर्यामृतपंकांत आमची दृष्टि रुतली! कोणी ह्मणत, हिचा लावण्योदधि अपरंपार असून तो अद्यापि कोणीं मंथन केला नसल्यामुळें आंत चौदा रत्नें दिसत आहेत! हिच्या सर्वांगीं लक्ष्मी ( कांति ) दिसत आहे! हिचा प्रत्येक शब्द कौस्तुभ मणि होय! हिचे कर तर प्रत्यक्ष पारिजातक होत! नयनांचे ठिकाणीं मदिरासवच चकाकत आहे! हिचें तारुण्य हाच धन्वंतरि होय! मुख तर शीतकर चंद्रमाच उगवला आहे! हिची वाणी कामधेनूच आहे! ह्या सागरांत ऐरावत नसेल तर हिची गति त्याच्या प्रमाणें कशी असती! रंभादिकांनीं हिच्या मांड्याच्या ठायीं वास केला आहे! ज्याच्या विलक्षण गुणांनीं हिचें मन हरण होऊन जो कोणी भाग्यवान् राजपुत्र हिच्या हृदयांत राहिला आहे, तोच उच्चैःश्रवा! केशपाशांत सर्वत्र हालाहल विष आहे, त्यामुळेंच त्याच्या दर्शनानें आह्मीं सर्व गुंग झालों आहों! हिची प्रत्येक भ्रुकुटि इंद्रधनुष्य आहे! हिचा कंठ शंख नव्हे तर काय! हिच्या अधराच्या ठिकाणीं अमृत स्रवत आहे! कोणी ह्मणत, स्त्रीसारखा सुंदर व मोहक पदार्थ जगांत दुसरा कोणताच नाहीं, हें खरें आहे; ह्याच्याच योगानें तपस्व्यांचें सुद्धां मन चंचळ होतें! मौन एकीकडे राहतें! विचार डळमळतात! ज्ञान थंड पडतें! समाधि थबकते! योगाचा वियोग होतो! व किती काळाचें तप लटपटतें! असो; ह्याप्रमाणें राजांचीं मनें तिच्या सौंदर्यानें चंचल होऊन तन्मय झालीं होतीं! ऋषिजनांसही ब्रह्मदेवाच्या कौशल्याचें कौतुक वाटलें! विश्वामित्र, अगस्त्य, ऋषींना ही लक्ष्मीच अवतरली आहे, असें विदित

असल्यामुळें तिच्या रूपाविषयीं त्यांना विशेषसें वाटलें नाहीं! रामचंद्राची सीतेकडे दृष्टि पोहोंचतांच त्या दृष्टिमार्गानें सीतेचें प्रेम रामचंद्राच्या हृदयांत उतरलें! व कामानेंही तत्क्षणीं त्या मार्गानें तेथें प्रवेश केला! व तो, जणूं आपला शत्रु जो शंकर ह्याचें धनुष्य मोडून टाकून आपलें धनुष्य जें सीता तें हातीं धरण्याविषयीं रामचंद्रास शरण गेला आहे, असें वाटे! सीतादर्शनानें रामचंद्रासही वाटलें कीं, भगवान् विश्वामित्र महर्षीनीं सीतेच्या उत्पत्तीची कथा सांगितली ती यथार्थ आहे! ही खरोखर अयोनिसंभवा आहे, ह्मणूनच हिच्या रूपांत कोठेंही न्यूनता नाहीं! जगांतील सर्व रमणीय वस्तू हिच्या आननरूप आरशांत दिसत आहेत! ही सौंदर्याची खाणच आहे, तेव्हां हिचा प्रत्येक अवयव सुंदर आहे ह्मणून आणखी काय ह्मणावें! हिच्या चरित्र श्रवणानें माझी जी पूर्वीं चंचल वृत्ति झाली होती ती, हिला पाहतांच, योग्यच होती, असें मला आतां वाटतें. ह्या धनुष्यावर जो नृपति गुण चढवून हें तेजस्वी कन्यारत्न हरण करील त्याचें सर्व सुकृत फळास आलें, ह्यांत संशय नाहीं! असे अनेक उद्गार रामाच्या मनांत येण्यास तो हृदयस्थ कामच कारण झाला! ह्याप्रमाणें सीतेला पाहून राजपुत्रादि सर्व प्रेक्षकांचे मनांत, त्यांचा अधिकार, योग्यता, विद्या, प्रभाव, ज्ञान, ह्यांच्या मानानें अनेक प्रकारचे तरंग आले! त्या वेळेस तेथें सर्वत्र मौन असावें, परंतु पूर्वोक्त रीतीचे तरंग त्यांच्या मनांत उचंबळत असतां ते मुखावाटे व हावभावाच्या द्वारें बाहेर पडत, त्यामुळें एकाप्रकारचा तेथें गलबला चालला होता! असा बराच वेळ गेला तरी धनुष्याजवळ जाण्यास कोणास धैर्य येईना! कामाच्या सपाट्यानें लोक देहभान विसरून गेले; त्या मुळें कित्येक आपसांत गोष्टी सांगूं लागले! कित्येक विनोदपर भाषणें बोलूं लागले! कित्येक रंगांत येऊन मोठ्यानें हंसूं लागले! कित्येक बोलत असतां एकमेकांच्या हातांवर टाळ्या देऊं लागले! आपलें कर्तव्य कोणीच करीत नाहींत, वेळ उगाच फुकट चालला आहे, असें पाहून शतानंद महोपाध्याय जनकाज्ञेनें पुनः ह्मणाला, "अहो क्षत्रिय हो, हें शिवधनुष्य येथें आणून बराच वेळ झाला, हें नमविण्यास हा राजपुत्र आतां उठेल, हा नृपति आतां जवळ येईल, हा पराक्रमशाली आतां आपलें आसन सोडील, असें ह्मणतां ह्मणतां बराच

वेळ गेला, तरी ह्या धनुष्याच्या जवळ येण्यास कोणासही वांच्छा होत नाहीं, हें पाहून मोठें आश्चर्य वाटतें ! आतां दिवस थोडा राहिला आहे, तो जाण्यापूर्वी ह्याचा निर्णय झालाच पाहिजे. तर आतां आळसाचें व भीतीचें अवलंबन करणें तुह्मांस योग्य नाहीं. आपल्या पूर्वजांच्या पराक्रमास व यशास साजेल असें कांहीं करा." हें भाषण ऐकून कित्येकांस राग व उत्तेजन आलें ! तेव्हां कोणीएक राजा आपल्या स्थानावरून उठून अस्तन्या वर सारून, अलंकार ठाकठीक करून, कंबर बांधून, मुकुट घट्ट बसवून, दोन तीन सेवकांसह रंगस्थळीं आला. तेव्हां बंदिजन त्याची अतोनात स्तुति गाऊं लागले; त्यांतील सारांश कीं, हे महाराज अमुक देशचे अधिपति, ह्यांचे पूर्वज अतुल पराक्रमी होते, त्यांनीं संपादिलेलें यश लोक सर्वत्र गात आहेत. हे महाराज आपल्या पूर्वजांप्रमाणेंच पराक्रमी असून, ह्यांनीं शत्रूंचा उच्छेद करून त्यांचे स्त्रियांस रडवावयास लाविलें आहे ! ह्यांचें राज्य मोठें असून सर्व प्रकारें समृद्ध आहे. प्रजाजनांचा हा केवळ आत्माच आहे; इत्यादि. नंतर त्यानें धातूच्या लठ्ठ गाड्यावर असलेल्या त्या धनुष्यास स्पर्श केला व जवळच वर चढविण्याची ज्या (दोरी) होती तिकडे एकदां पाहिलें. श्रोतेहो, मधाशीं थोडें तुह्मांस सांगावयाचें राहिलें तें हें कीं, हें धनुष्य रंगभूमीवर आणिलें तें एका सर्व धातूंच्या मिश्रणापासून केलेल्या धातूच्या भक्कम गाड्यावरून आणिलें; अर्थात् ज्या दोऱ्यांना ओढावयास मनुष्य लागले होते त्या दोऱ्या गाड्यास बांधलेल्या होत्या ! असो; त्या धनुष्यास दोन हात लावून वर उचलण्याकरितां त्यानें सर्व बळ खर्चिलें, परंतु कांहीं एक उपयोग झाला नाहीं. तेव्हां तो म्लानवदन होऊन घर्मानें फार भिजला, व अधोमुख होत्साता स्वस्थानीं जाऊन बसला ! दुसरा एक नृपति आपल्या जागीं उभा राहतांच त्याचे बंदिजनांनीं त्याची यथेच्छ स्तुति केली ! तो धनुष्याजवळ गेला, परंतु त्याचे डोळ्यांपुढें अंधार पडल्यासारखें झालें ! लगेच त्याचे सेवकांनीं त्यास हातीं धरून त्याच्या जागेवर बसविलें ! तिसरा एक मोठ्या धैर्यानें व ऐटीनें त्या स्थळीं गेला, परंतु त्याची ही गति पहिल्या सारखीच झाली ! चौथा एक वर उठला, त्याचे स्तुतिपाठक त्याचें असें विचित्र वर्णन करूं लागले कीं, ब्रह्मदेवाचा दिवस करणारा जो सूर्य त्यापेक्षांही हे तेजस्वी महाराज आहेत ! हे महा

तेजस्वी राजे शिवधनुष्यापाशीं जातांच निस्तेज होऊन निघालेल्या स्थानींच अस्ताप्रत गेले ! अशा प्रकारें अनेक राजांनीं धनुष्याजवळ येऊन तें नमविण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यास स्पर्श करण्यापेक्षां कोणाच्याही हातून अधिक कांहीं झालें नाहीं ! तेव्हां सर्वांनीं सीतेची आशा सोडली ! मग कोणीही राजा उठला नाहीं. तेव्हां कित्येक मनांत ह्मणाले कीं, एवढा खर्चकरून आह्मी आपली फजिती करून घ्यावयास उगाच येथें आलों ! कित्येकांस वाटलें कीं, आल्या सारखा एवढा समारंभ व त्रिभुवनैक सुंदर कन्यारत्न दृष्टीस पडलें, हा काय लहान लाभ ! नंतर थोडा वेळ जातांच कोणीच आतां स्वस्थान सोडीत नाहीं, असें पाहून शतानंद पुनः एकदां बोलले, “ राजाधिराज जनक महाराजांनीं केलेला हा पण कोणत्याही क्षत्रियास जिकण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं काय ? एकूण हें पृथ्वीतल आज निर्वीर झालें, हें सांगण्याकरितांच आपण सर्व जमलां काय ? आतां ह्या दिव्य कन्येस कोणी वर मिळत नाहीं असें झालें ! ” हें ऐकतांच रामलक्ष्मण विश्वामित्राच्या आज्ञाक्षरांसाठीं त्यांच्या मुखाकडे पाहत आहेत, तोंच त्या मंडपांत सर्वांस ऐकूं येईल असा ध्वनि निघाला कीं, “ ज्यानें आपल्या बाहुबळानें कैलासासारखा पर्वत कांपविला; लोकोत्तर पराक्रमानें वैश्रवणापासून हें विलक्षणगतीचें पुष्पकविमान हरण केलें; ज्यानें तीन्हीं लोक जिंकले; फार काय सांगूं ज्यानें साक्षात् यमाचाही पराभव केला ! ज्याला काळापासून स्वप्नांतही भीति नाहीं ! लोकत्रयांतील वैभव जो उपभोगीत आहे; इंद्रादि सर्व देवसुद्धां ज्याचे सेवेस जपत आहेत ! अशा अस्मादिकांचा पराक्रमवन्हि पृथ्वीवर जाज्वल्य असतां, हें पृथ्वीतल निर्वीर झालें, असें ह्मणणारा जगांत कूपमंडूक निर्लज्ज कोण आहे ? आह्मी ह्या स्थळीं नव्हतों त्यामुळें तुह्मांस तसें वाटलें असेल, व तसें वाटणें हें अगदीं सत्य आहे ! ” ह्याप्रमाणें शतशः गर्वोक्ति बोलत बोलत त्या स्थळीं चित्रविचित्र आकृतीचा, चालताबोलता डोंगरच काय, असा एक पुरुष आला ! तेथें त्याचें तें अदृष्टपूर्व विलक्षण रूप पाहून त्या ठिकाणीं सर्वत्र भय व आश्चर्य हीं पसरलीं ! त्याच्याकडे पाहून कोणी गवतानें वेष्टिलेल्या मोठाल्या दगडांसारखीं त्याचीं दहा तोंडेंच पुनः पुनः मोजीत ! कोणी वृक्षांच्या स्कंधांप्रमाणें त्याच्या लठ्ठ वीस भुजांकडे साश्चर्य पहात !

कोणी त्याचे कंठ एकमेकांस कसे जोडले आहेत हेंच बघूं लागले! कोणी त्याच्या भयंकर कड्याप्रमाणें लांबच्या लांब व रुंद छातीकडेच पहात होते! कोणी त्याचे वीस हात मोजूं लागले! कोणी ह्मणत ह्याला वीस पाय असावेत, परंतु ते दोन आहेत हें कसें काय! कोणी हा कोठल्या मुखानें बोलत आहे तेंच न्याहाळून पहात! कोणी तें विलक्षण मोठें पोट पाहूनच हसूं लागले! तो जसा वर्णानें कोळशासारखा काळा, तसा आचरणानेंही काळाच होता! शरीराप्रमाणें त्याचें अंतःकरणही फार कठोर होतें! तो जसा बाह्यात्कारीं मळिण होता, तसे त्याचे विचारही मळिण होते! तो केवळ अभिमानाचा पुतळा, पापाचा बाजार, अमंगळ वस्तूंचा खजिनाच असा होता! त्याचा अत्यंत मूल्यवान् पोशाक असून सर्वत्र शरीरीं व दहा मुकुटांत हजारों देदीप्यमान् रत्नें होतीं, परंतु त्यांपासून ह्याचे रूपास कांहींच शोभा आली नव्हती! उलट तीं रत्नेंमात्र त्याठिकाणीं निस्तेज दिसत होतीं! अशा प्रकारचा तो राक्षसांचा राजा रावण ओरडत येत असतां, त्यास पुढील एका रिकाम्या ठेवलेल्या विस्तृत व लठ्ठ मंचकावर जनकाच्या प्रधानानें बसविलें! त्याचे बरोबरचे सेवकही जवळ खालीं उभे राहिले. लगेच लंकाधिपतीनें पहिल्यापेक्षां दुप्पट जोरानें बोलण्यास आरंभ केला! "अहो निर्वीर भूमितल ह्मणणारे, अहो जनकराज, ती कन्या अगोदर माझ्या अधीन करा! तुमच्या बिचाऱ्या पणाची माझ्या पुढें किती प्रौढि! ह्या कांबिटचा मजपुढें प्रभाव तो किती! अहो, तुह्मांस असें समजत नाहीं कीं, ज्यानें शंकरपार्वती, त्यांचे गण, ह्यांसह एवढा कैलासपर्वत हालविला, त्यास हें यःकश्चित् शंकराच्या एका हातांतील जीर्ण झालेलें धनुष्य उचलणें किती सोपें आहे! हा तुमचा पण, मला समुद्र उल्लंघन करणारास लहानसा खळगा ओलांडून जाण्यास सांगण्याप्रमाणें नव्हे काय? कोणी एकानें कोणाला वर उचलिलें तर, त्याचा केंस तुला उचलणार नाहीं, ह्मणणें किती मूर्खपणाचें आहे? त्याप्रमाणेंच ह्या धनुष्याजवळ जाणें हें मला अपमानकारक होय! ह्यांत ह्या माझ्या बाहुबळास नीचत्व आणण्यासारखें होतें. अहो, आजपर्यंत तुह्मीं माझ्या प्रतापसूर्यास पाहिलें नाहीं, तर तुह्मांस दिवाभीताचीच उपमा देणें योग्य होय! माझ्या योग्य असें मला विलक्षण पराक्रमाचें कृत्य सांगा. जनका, तूं काय

समजून ह्या कांविटाला पण लाविलासरे ? आतां मी आल्यावर अग्नीवर जसा कापूस तसें हें धनुष्य मजपुढें कशाला ठेविलें आहेस ? एवढा वेळ ठेविलेंस तें ठीकच केलेंस ! माझ्यामध्यें आणि ह्या मानवांमध्यें किती महदंतर आहे हें तुला समजत नाहीं काय ? अरे पहा, देवदानवगंधर्व ह्यांच्या अनेक सुंदर कन्या मीं ह्या पुष्पक विमानांतून संचार करीत असतां हरण करून लंकेंत ठेविल्या आहेत ! मग ह्या मनुष्यकन्येची काय कथा ? जनका, बऱ्या गोष्टीनें आपली कन्या मला अर्पण कर, नाहींतर मला बलात्कार करावा लागेल ! आण लौकर तर तिला पुढें." ह्याप्रमाणें तो दशमुख पुष्कळ बोलत असतां, ह्या मंगलसमारंभांत हें मूर्तिमंत विघ्न कोठून आलेंसें सर्वांस वाटलें. सर्वांस मोठी काळजी पडली ! ह्या राक्षसराजास पाहून सीतेला तर फारच दुःख झालें. ती हळूच आपल्या प्रियसखीस ह्मणाली, "हा ओंगळ राक्षसांचा राजा ! ह्यानें जरका हें धनुष्य नम्र केलें, तर मोठें कठिण आहे ! एका संकटांतून कोठेंशी मी मुक्त होत आहें तों, हा मजपुढें दुसरा संकटपर्वतच आला ! अग तो मन्मानसराजहंस अद्यापि धनुष्याजवळ कां ग येत नाहीं ? सखि, त्याचे मनांत सर्वांचे खेळ पहावयाचे आहेत वाटतें ? किंवा त्यास अजून विश्वामित्राची आज्ञा मिळाली नसेल ! ह्या दहातोंड्याच्या हातून पण जिंकिला जाऊं नये ह्मणून मी मनांत एक सारखा त्या गिरजापतीचा धांवा करीत आहें ! तो दयासागर आहे. राक्षस हा ! हा कुलीन क्षत्रिय कुठें आहे ? ह्यानें धनुष्यास बाण जोडला तरी काय उपयोग ? हा विघ्नपर्वत पाहतांच माझ्या पोटांत धस्स झालें ! बाबांनाही मोठी काळजी उत्पन्न झाली असेल !" हें ऐकून विजया ह्मणाली, "सीते, तू कांहीं काळजी करूं नको. काळजी दूर करण्याविषयीं परमेश्वर समर्थ आहे ! शतानंद त्या रंगस्थळीं उभा होताच, तो धैर्यानें पुढें येऊन मोठ्या गर्जनेनें ह्मणाला," पूर्वीचे कोणाचे कितीही प्रत्यक्ष सूर्यास ताप देणारे पराक्रम असोत, ते आह्मांस केशाग्रही मान्य नाहींत ! आमच्या प्रतिज्ञेप्रमाणें जो हें धनुष्य वांकवून त्यावर गुण चढवून त्यास बाण जोडून दाखवील, तो कुलीन क्षत्रिय असल्यास, आमच्या धर्मनिष्ठ जनक महाराजांच्या ह्या सीतानामक कन्येचा स्वामी होईल ! आह्मी कोणाच्याही तोंडच्या वल्गना ऐकणार नाहीं ! आह्मी सत्यप्रतिज्ञ

ठाणे

आहों; जसें बोलूं तसें करूं. तर हे लंकेशा, हें कांचीठ अगोदर वांकवून सर्वांस दाखवावें, नंतर हे महाज्ञानी ऋषिजन आपल्या मतीनें विचार करतील! आह्मांस हें कन्यारत्न कांहीं येथें ठेवावयाचें नाहीं. शूराच्या शिरोभागीं हें शोभावें, हाच आमचा हेतु आहे!" हें ऐकून त्यानें सीतेकडे पाहिलें. तिच्या रूपानें तो अगदीं वेडा होऊन गेला. व मनांत ह्मणाला, "ही अग्निज्वालाच काय! आज मला वीस डोळे आहेत त्यांची सार्थकता वाटत आहे; अशी सुंदर सृष्टि माझ्या अजून पाहण्यांत नाहीं. मी ज्या शतशः सुरूप कन्या ह्मणून लंकेंत आणून ठेविल्या आहेत, त्यांनीं, त्यांवर मंदोदरीनें नायिकात्व पतकरून, हिचें दास्यच करावें, अशी ही विलक्षण लावण्यवती आहे! ही जेव्हां माझ्या हस्तगत होईल तेव्हांच माझ्या मंदिरीं पूर्ण लक्ष्मी आली! माझें वैभव पूर्ण होण्यास हिनें माझें करग्रहण केलेंच पाहिजे! ही जर मला ह्या वेळीं कदाचित् न मिळाली तर हिच्यासाठीं मी सर्व राज्य घालवीन! घोर युद्ध करून आंत सर्वांचे बळी देईन! फार काय सांगूं लंकेला सुद्धां अग्नि लावावयाचा प्रसंग आला तरी कांहीं चिंता नाहीं! मला हिच्या संबंधानें कोणी विरुद्ध उपदेश केला तरी मी कोणाचें ऐकणार नाहीं! इच्यामुळें सर्व घालवीन! प्राण गेले, पुत्र मेले तरी बेहेत्तर आहे, पण हिच्या प्राप्तीस्तव मी महान् यत्न करीन! अरे, पण असले भलतेच विचार माझ्या मनांत कां उद्भवतात! हें धनुष्य मी नमविणार नाहीं तर कोण नमविणार? मग मी ह्यांना क्षत्रिय आहें किंवा कोण आहें हें सांगेन!" नंतर मोठ्यानें ह्मणाला, "तुमच्या मनांत असे पोरखेळ करावयाचे आहेत काय? हा पहा उठलों तर! कन्या अगदीं धनुष्याजवळ आणा." असें बोलून तत्क्षणीं तो रागानें रंगभूमीवर धनुष्याजवळ गेला. तेव्हां सर्वांचे डोळे तिकडे लागले व अनेकांच्या मनांत अनेक तर्क आले. कोणी ह्मणत हा धनुष्य सहज वांकवील, हा तसा पराक्रमीच आहे! हा मोठा प्रतापी असावा, असें ह्याच्या शरीररचनेवरूनच दिसत आहे! कोणी ह्मणत अशा कन्यारत्नास हा काजळाचा पर्वत मिळणार ना! तस्मात् विधि मूर्ख आहे, त्याला विचित्र घटना करण्यांतच मोठा आनंद वाटतो! जनकादिक तर परमेश्वरनामस्मरणीं लीन झाले, ऋषींनीं तिकडे पाहण्याचें सोडिलें, व सीता सखीसमुदायांत गुप्त झाली!

त्या धनुष्यास त्यानें प्रथमतः एक हात लाविला; परंतु तें त्या गाड्यावरून तिळभर सुद्धां हाललें नाहीं ! नंतर दुसरा लाविला, तरी-ही तें जशाचें तसेंच होतें ! ह्याप्रमाणें हळूहळू त्यानें दहा हात लाविले, तरी तें स्वस्थानापासून केशाग्रही ढळलें नाहीं ! तेव्हां त्याला फार घाम आला, व आपली ह्या एवढ्या समारंभांत फजिती होणार असें त्याला वाटूं लागलें ! नंतर त्यानें वीसही हातांचा उपयोग केला; तेव्हां त्यानें तें गाड्यावरून भूमीवर जरासें उभें केलें. हें समजतांच सीता मूर्च्छा येऊन खालीं पडली ! धनुष्य तर रावणाच्या हातांत असतां झोले खात होतेंच ! आतां ह्यापेक्षां कांहीं जास्त आपल्याच्यानें कर-वणार नाहीं असें त्यास वाटलें; तरी तो गर्वाचा पुतळा ह्मणाला, " आतां ह्या कांविटावर दोर चढविणें तें काय उरलें आहे ? हातांत माळ घेऊन ती कन्या जवळ येऊं द्या, ह्मणजे मी पुढील कार्यास ला-गतों. " असें ह्मणत आहे तों तें धनुष्य धाडदिशीं खालीं पडलें ! त्याबरोबर रावणाचें बलही पडलें ! तें भूमीवरून पुनरपि उचलण्या विषयीं त्यानें बहुत बहुत श्रम केले; त्या श्रमामुळें एकसारखे त्याचे दहा मुखांतून श्वासोच्छ्वास चालले होते. शेवटीं तें रुद्रचाप ढळत नाहीं असें पाहून तो निराश झाला, व रागानें दांत ओंठ खात लज्जेनें अधोमुख होऊन आपल्या जागीं गेला. अनेक ग्रंथांत, तें धनुष्य त्याच्या उरावर पडलें, असेंही सांगितलें आहे. असो; रावणाचा हा यत्न व्यर्थ गेला असें पाहून सर्वांस परमानंद झाला. सीतेसही हें आनंदाचें वृत्त सखीमुखांनीं कळतांच ती सावध होऊन वर उठली.

नंतर सर्व राजांस व इतर कित्येक प्रेक्षकांस हें धनुष्य आतां कोणा-च्यानें ही नमलें जात नाहीं असें वाटलें. राक्षसांचा राजा महापरा-क्रमी जो दशानन त्याच्या बळाची व वीस हातांची जेथें गति कुंठित झाली, तेथें दुसऱ्याचें काय चालणार, असें कित्येकांच्या मनांत आलें. एवढेसें धनुष्य असून हें कां उचलत नाहीं, हें पाहून सर्वांस परमाश्चर्य वाटलें. व ह्यांत कांहीं तरी खास दैविक सत्ता असावी, अशाविषयीं जो तो बोलूं लागला. इतक्यांत मुनिवर्य विश्वामित्र रामचंद्रास ह्मणाले, " वा रामभद्रा, हें कृत्य तुझ्यावांचून कोणाच्याही हस्तें शेवटा जावयाचें नाहीं. विजयलक्ष्मी सीता ही तुझ्या उठण्याची वाट पहात असेल !

तर हे वीरशिरोमणे, आतां उठावें. व हा पण जिंकून जनकादिकांस व सर्व ऋषिमंडळास चिंतामुक्त करावें." रामानें हें ऐकून "आपली आज्ञा शिरसा वंद्य आहे," असें ह्मटलें व स्वस्थानावरून उठून त्यांस प्रणाम केला, तत्क्षणीं लक्ष्मणही उठला. त्यासमयीं त्याची स्तुति करावयास एकही बंदिजन नव्हता; कारण पुढें तेथील सर्व लोकांसच त्याचे स्तुतिपाठक व्हावयाचें होतें! रामानें तेथूनच मधून मधून दिसणाऱ्या सीतेच्या कपोलरूप आरशांत आपलें मुख पाहून मस्तकावरील तो बहुमोलाचा फेटा व्यवस्थित केला, कंबर बांधली, आपलें धनुष्य यथास्थानीं ठेविलें व ते दोघे बंधु साक्षात् वीररसच काय असे, त्या रंगस्थळीं गेले. रामचंद्रानें तेथून एकदां चोहोंकडे आपली दृष्टि फेंकिली, त्या वेळीं ही अनेक रसांची मूर्ति पाहतांच लोक अनेक प्रकारें बोलूं लागले. "ह्याची मनोहर आकृति, विलक्षण तेज, शौर्यसूचक दृष्टि इत्यादि पाहतांच हें महत्कृत्य ह्याचे हातून पार पडेल," असें कित्येक ह्मणत. कित्येक ह्मणत कीं, "हा सीतेच्या रूपाला अनुरूप पति आहे खरा, परंतु उलट करण्याविषयीं दक्ष जो विधि त्यास ही सर्वमान्य घटना आवडली पाहिजेना!" कित्येक ह्मणत, "रावणासारख्यास जें कृत्य दुष्कर झालें, तें ह्या सुकुमार कुमाराच्या हातून शेवटास कसें जावें!" कित्येक ह्मणत, "हें धनुष्य हाच राजपुत्र नमवील, असें आमचें प्रसन्न अंतःकरणच आह्मांस सांगत आहे!" कोणी ह्मणत, "हा साक्षात् धनुर्वेदच धनुष्य नमविण्याकरितां आला आहे!" इतक्यांत जवळ असलेला राजपुरोहित शतानंद ह्मणाला, "इहलोकींचा केवळ इंद्रच असा जो अयोध्यपति दशरथराजा, त्याचे हे दोन पराक्रमी पुत्र रामलक्ष्मण. हा ज्येष्ट पुत्र रामचंद्र हें शिवधनुष्य नमविण्याकरितां आला आहे! तरी सर्वांनीं इकडे आपलें लक्ष्य लावावें. लोकहो, मला जो ह्याचे लोकोत्तर कृत्याचा अनुभव आला आहे, त्यावरून भुवनत्रयांत ह्यास अशक्य असें कांहींच नाहीं, अशी माझी पक्की खात्री झाली आहे!" रामचंद्र अगदीं धनुष्यापाशीं आला, व बऱ्याच अंतरावर त्याचे समोर लक्ष्मण उभा राहिला, तो रामाचें प्रतिबिंबच कीं काय असें भासे! रामानें नंतर त्या धनुष्यास तीन प्रदक्षिणा करून नमस्कार केला, व शंकराचें ध्यान केलें. पश्चात् त्यानें त्यास

स्पर्श केला. तत्क्षणीं सीतेचें सर्वांग रोमांचानें फुलून गेलें, त्यामुळें तो स्पर्श रामानें सीतेच्या अंगासच केला कीं काय असें तिला वाटलें! हें धनुष्य रामचंद्राच्याहस्तें सज्ज व्हावें ह्मणून ती पार्वतीशाची एकसारखी प्रार्थना करीत होतीच, त्यांत धनुष्यास स्पर्श करतांच ती त्या दयार्णवाची फारच प्रार्थना करूं लागली असावी, असें कोणासही त्या करुणामूर्ति सीतेकडे पाहिलें असतां सहज समजण्या सारखें होतें. हा प्रसंग आपल्या अत्यंत सुखाचा किंवा मृत्यूचा आहे असें तिला वाटलें. विजया, यशोदा, इत्यादि सख्या तिच्याजवळ येऊन ह्मणाल्या, "सीते, हस्तांत माळा घेऊन आतां तयार हो." इतक्यांत तें रुद्रचाप रामचंद्रानें सहज इतर धनुष्यांप्रमाणें एका हातानें वर उचलिलें! तें सर्वांस दाखवून नंतर वांकविलें! त्यावर गुण चढविला, व बाणही जोडला! आणि आकर्षण करून तें ओढावयास लागला तों त्याचेमध्यें दोन तुकडे झाले! तत्क्षणीं जो कांहीं विलक्षण असहनीय आवाज झाला, तेणें करून पळभर पृथ्वी कांपल्यासारखी झाली! तेथील सर्व लोक दचकून क्षणभर भिऊन गेले. मुलांनीं येऊन आपल्या मातांस घट्ट धरिलें! त्या मंडपाच्या बाहेरच्याभागीं असणारे व नगरींतील हजारों घोडे, हत्ती वगैरे भिऊन जाऊन खिंकाळूं लागले, व आपलीं बंधनें तोडण्याचा यत्न करूं लागले! आकाशांतील हजारों पक्षी कलकलाट करून इतस्ततः फिरूं लागले! रानांतील सिंहव्याघ्रादि हिंस्र पशु हे आपल्या गुहांकडे पळत सुटले! हरिणादि दीनपशु ह्यांची पांचावर धारण बसून ते सैरावैरा चोहोंकडे भटकूं लागले! सर्वत्र लोक भयभीत झाले! त्यांस ही अश्रुतपूर्व गर्जना प्रळयकाळीं होणारी गर्जनाच कीं काय असें वाटलें! ह्या भयंकर आवाजाबरोबर जनकाची काळजी निमाली, सीतेचा चिंताग्नि विझाला, सख्यांच्या आनंद समुद्राच्या लाटा जोरानें उसळल्या! रावणासारख्या दुष्टांचा नाश आतां लौकर होणार ह्याविषयींचा सूचक, भार्गवरामाचा अवतार व गर्व संपला ह्मणून सांगणारा, व देवांच्या संकेतार्थाचा द्योतकच, हा भयंकर आवाज झाला असें विश्वामित्रादि महर्षींस वाटलें! क्षणैकानें तेथें शांत होतांच चोहोंकडून पुष्पांची व जयजयकार शब्दांची वृष्टि झाली; आनंददर्शक असा सर्वत्र टाळ्यांचा गजर झाला; लगेच सुस्वर

वाद्यें वाजूं लागलीं, स्त्रियांनीं सर्वत्र मांगल्कि मंजुळ गाण्यास आरंभ केला. जनकमहाराजांचे स्तुतिपाठक स्तुतिपर पद्यें गाऊं लागले. ऋषिजनांनीं वेदघोषास आरंभ केला. बुक्यासारखे सुगंधिक पदार्थ चोहोंकडे वर उधळले! इतक्यांत आनंदसमुद्राच्या लहरीच कांय, अशा सीतेच्या सख्या व दासी गाणीं गात गात सीतेसहवर्तमान, ज्याच्या डाव्या स्कंधावर स्वतःचें धनुष्य असून उजव्या हातांत तें भंगलेलें शिव-चाप आहे, ज्याच्या मुखकमलीं विजयश्री माहेरीं आल्याप्रमाणें दिसत आहे, ज्याच्या डाव्या अंगास लक्ष्मण असून पाठीमागें व उजव्या अंगास जनकराजा, शतानंद, कुशध्वज, अष्टप्रधानादि मंडळी आहे, अशा रामचंद्राच्या संमुख आल्या, व त्यांनीं सीतेला पुढें करून तिच्या हातून त्याच्या कंठांत, मंगलद्रव्यांनीं आरक्त ह्मणून प्रेममालाच काय अशी, पुष्पमाळा घालविली. सीता ती घालीत असतां रामचंद्रानें आपलें मस्तक नम्र केलें, तेव्हां सीता ही भार्या आपणास आवडली असें त्यानें सांगितलं, असें सर्वांस वाटलें. असो; त्या वेळीं सर्वांस फारच आनंद झाला. ब्रह्मदेवाच्या सुघटित घटनेची सर्वांनीं स्तुति केली! परंतु रावण व रावणासारखे जे कांहीं दुष्टात्मे राजे त्यांत होते, त्यांस फार विषाद वाटला. रामचंद्रोत्कर्षानें त्यांचीं शुष्कान्तःकरणें जळून गेलीं! दुष्ट, कृतघ्न, अभिमानी, दुराचारी, वैभवानें उन्मत्त झालेला, व परस्व हरण करणारा जो रावण त्यास आपली फाजिती व रामचंद्राचा विजय हीं सहन झालीं नाहींत! तेव्हां जिच्यामुळें आपणास अधोमुख व्हावें लागलें, अशी जी जनककन्या सीता व तें शंकरधनुष्य उचलणारा सीतेचा प्रियकर रामचंद्र, ह्यांविषयीं त्यानें मोठें वैर धरलें, व हीं दोन मनुष्यें जगांत आपलीं शत्रु होत असें त्यास वाटलें! आणि जेणेंकरून ह्यांस पीडा होईल, तेंच आतां आपणास केलें पाहिजे, असें त्याचे दुष्ट मनानें घेतलें! आपला पराभव करणारा तो आपला महान् शत्रु होय! जेव्हां ह्या शत्रूचा नाश करीन तेव्हांच मी सुखी होईन! अशा सारखे अनेक दुष्ट विचार त्याचे मनांत येत आहेत, तोंच तो दशमुख मुकाट्यानें निघून गेला! व दुसरे कित्येक राजे व लोक निघून गेले. इतक्यांत जगन्मंदिरांतील तेजोमय प्रदीप सूर्यनारायणही तेजोहीन होऊन मावळत चालला. मंडपांत सहस्रशः दीप लागून चोहोंकडे लखलखाट पडला.

सीता रामचंद्राच्या कंठांत पुष्पमाळा घालीत असतां विश्वामित्रादि ऋषि त्या रंगस्थळीं आलेले होतेच. त्यांनीं त्या दंपत्यास अनेक आशीर्वाद दिले. जनकानेंही महर्षींची फार स्तुति गाऊन, "माझ्या आजच्या आनंदास, धन्यतेस, व हा सर्व समारंभ निर्विघ्नपणें शेवटास न्यावयास आपण आदिकारण आहां," असें ह्मटलें; व आपण ह्याविषयीं अत्यन्त कृतज्ञ आहों, असें अनेक प्रकारें त्यांस दर्शविलें. शतानंदाच्या व जनकाच्या आज्ञेनें तो सर्व स्त्रीसमाज, सीतेचें भाग्य गात गात वाड्यांत राणी सुमेधा होती तेथें गेला. तिकडे जात असतां आमची पवित्र चारित्रनायिका सीता आपल्या पराक्रमशाली प्राणनाथाकडे प्रेमदृष्टीनें वरचेवर पहात असे! आंत जातांच राणीनें सीतेला पोटाशीं घट्ट धरून तिच्या मस्तकाचें अवघ्राण केलें व आपल्या प्रेमाच्या उष्ण नयनाश्रूंनीं तिचे केश भिजवून आपली काळजी दूर झाली, असें अगोदर न बोलतां तिला दर्शवून मग ती ह्मणाली. "बाळे, तुला सुंदर, गुणवान्, भाग्यवान्, मनासारखा व तुझ्या हृदयांत वास करणारा असा पति मिळाला, येणें करून आह्मी धन्य झालों आहों! दशरथ महाराज महा पराक्रमी असून मोठे उदार अन्तःकरणाचे आहेत. तुला एकदांचा वर कसा मिळतो ह्या काळजींत आह्मी सर्व सतत एक वर्ष होतों; ती काळजी आज पार्वतीपतीनें दूर केली! आतां दुसऱ्या तुझ्या भगिनींस ह्या दशरथपुत्रासारखेच वर मिळोत ह्मणजे झालें. त्यांच्या विवाहास अजून अवकाश आहे खरा, परंतु आमच्या काळजीस अवकाश नाहीं! सीते, तुझे लग्नसोहाळे आतां लौकरच होतील; विवाहमुहूर्त कधीं ठरवितात तें पहावें. राणीनें तिचा हात धरून तेथें असलेल्या बहुतेक स्त्रियांस सीतेस भेटविलें, सर्वांनीं तिचें कौतुक करून तिला गुणवान् वर मिळाला ह्मणून अत्यानंद दर्शविला, व तिच्या नांवाचा जयजयकार केला.

इकडे विश्वामित्र रामापाशीं गेले व ह्मणाले, "रामभद्रा, तुझा पराक्रम मी जाणतच आहें, मला कांहीं ह्या शिवधनुष्यभंगानें विशेष चमत्कार वाटला, असें नाहीं! आतां हें भंगलेलें धनुष्य हातांत केवढा वेळ कशाला ठेविलें आहेस? तें खालीं ठेव, व जनकमहाराज आह्मां सर्वांस येथें बसावयास सांगत आहेत, तर बसूं या." हें ऐकून रामचंद्र ह्मणाला, "भगवन्, ह्या परमपूज्य शिवचापाचा माझ्या हस्तें भंग झाला ह्मणून

मी देवाधिदेव शंकराचा व पितृतुल्य जनकमहाराजांचा अपराधी आहें असें मला वाटत आहे." विश्वामित्र ह्मणाले, "रामभद्रा, ह्यांत अपराध कसला? तुझें कर्तव्य तूं केलेंस. हा अपराध समजून विषाद मानण्याचें कांहींच कारण नाहीं." जनकानेंही अशाच अर्थाचें भाषण केल्यावर रामचंद्रानें तें धनुष्य खालीं ठेविलें. नंतर सर्व मंडळी त्या स्थळीं बसली. जाण्याचे वेळीं जो मान त्याकाळीं देत असत,तो घेऊन मंडपांतील बरीच प्रेक्षकमंडळी हळू हळू स्वस्थानीं गेली.

तदनंतर राजाजनक विश्वामित्रमुनीस बोलला, "आह्मीं योजिलेला दारुण पण दशरथपुत्र रामचंद्रानें जिंकिला, आतां प्राणांहूनही प्रियकर माझ्या कन्येचा हा प्रियपति झाला, हें स्पष्टच आहे. परंतु यथाशास्त्र व लोकाचाराप्रमाणें सर्व विवाहविधि लौकर झाला पाहिजे ; तर प्रातःकाळींच अयोध्याधीश दशरथमहाराजांकडे दोन तीन प्रधान व शंकरब्राह्मण ह्यांस पाठवावें, ह्मणजे ते इकडील सर्व इतिवृत्त निवेदन करतील व ताबडतोब त्यांला घेऊन येतील. मग त्यांचे माझे अनुमतानें हें विवाहरूप मंगल कार्य लौकर होईल. "इकडे सर्व सिद्धता आहे, आपणास तिकडून कोणत्याही प्रकारच्या तयारीनें यावयास नको,"असेंही त्यांस कळवावयास सांगतों. तर, अहो ऋषिवर्य, ह्या कृत्यास आपण अनुमोदन द्यावें." विश्वामित्रऋषि ह्मणाले, "जनका, तूं उत्तम व्यवहारशास्त्रज्ञ आहेस, तुला आमच्या सारख्यांनीं अधिक काय सांगावें? तुझी योजना उत्तम आहे." असा त्यांचा बेत झाल्यावर आपल्या कर्माला कालातिक्रम होईल ह्या भीतीनें ऋषिजन स्वस्थानीं लौकर लौकर निघून गेले. सर्व प्रेक्षकही मंडपांत घडलेल्या अनेक प्रसंगांविषयीं बोलत बोलत आपापल्या घरीं चालते झाले. नंतर हळू हळू सुमेधा राणीनें आपल्या परिजनांच्या साहाय्यानें आलेल्या सर्व स्त्रियांचा योग्य प्रकारें समाचार घेऊन ती मोठ्या आनंदानें रथांतून सीतेसहवर्तमान आपल्या दररोजच्या राहावयाच्या वाड्यांत निघून गेली. सर्वांच्या अनुमतानें शतानंद उपाध्यायांनीं, त्या स्वयंवरमंडपाजवळच्या वाड्यांतच विश्वामित्रमुनींस रामलक्ष्मणांसह राहाण्याविषयीं विनंति केली. त्या रात्रींही त्यानगरींत दीपोत्सव मोठा झाला. सीता व तिच्या सख्या ह्यांनीं त्या दिवशीं घडलेलें वृत्त व पुढें होणारा लग्नविधि, ह्यासंबंधानें

अनेक प्रकारच्या गोष्टी बोलून ती रात्र घालविली !

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं दोन प्रधान, शंकर ब्राह्मण, वगैरे मंडळी जनकाज्ञेनें अश्व पिटाळीत मिथिलेहून निघाली ती तिसऱ्या दिवशीं रात्रौ दशरथराजाच्या अयोध्यानगरींत पोहोंचली. दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं त्यांनीं दशरथ महाराजांची भेट घेतली. त्यांचीं परस्पर प्रथमतः कुशल प्रश्नोत्तरें झाल्यावर त्यांस राजानें योग्य सन्मान दिला. नंतर घडलेल्या सविस्तर वृत्तांताचें व ज्यांत दशरथराजास सर्व लोकांसह रामचंद्राच्या विवाहार्थ बोलाविलें आहे, असें जनकराजानें, विनयपूर्वक लिहिलेलें पत्र त्यांना त्याच्या हातीं ठेविलें. तें पत्र वाचून व ह्या प्रधानांपाशीं अनेक प्रकारची हकीगत विचारून, राजा दशरथास तिकडील यज्ञयावत् वृत्त कळलें, व रामचंद्राच्या पराक्रमानें त्यास मोठा आनंद झाला आणि विश्वामित्राच्या परोपकारबुद्धीनें तो मोठा कृतज्ञ झाला. आनंदाश्रूंनीं त्याचे डोळे वरचेवर भरून येत होते. वारंवार तो तें पत्र वाची, व अनेक प्रश्न त्या प्रधानमंडळीस पुनः पुनः विचारी ! जनक आपला व्याही होणार व सीतेसारखें कन्यारत्न आपल्या रामचंद्रानें मिळविलें ह्मणून त्यानें त्यांपाशीं अनेक वेळां आनंदोद्गार काढले. रावणासारख्या राक्षसाधिपास जें शिवधनुष्य उचलें नाहीं, तें आपल्या रामचंद्रानें सहज नमवून त्याचे दोन तुकडे केले, हें वृत्त ऐकून त्यास पुनः पुनः आनंद होई, तो अनेक प्रकारें त्याच्या मुखावर स्पष्ट दिसे ! दशरथराजा त्या प्रधानदूतांस ह्मणाला, "त्या रामलक्ष्मणांस प्रेमालिंगन देऊन त्यांचे पराक्रमयुक्त दीर्घ बाहु माझ्या कंबरेसभोंवती मी कधीं गुंडाळीन असें मला झालें आहे; व जनकराजासही ह्या नवीन नात्यानें भेटण्याची मला अत्यंत उत्कंठा प्राप्त झाली आहे. आणि ह्या कुंकुमपत्रांत "विश्वामित्रमहर्षींनीं सांगितल्याप्रमाणें ज्येष्ठ शुद्ध नवमीस पूर्वोत्तराफाल्गुनींच्या योगावर विजयमुहूर्तीं विवाह करावा, असा आमचा मानस आहे," ह्मणून लिहिलें आहे, तेव्हां मी आतां वसिष्ठमहाराजांस विचारून उदयिक द्वितीयेस प्रातःकाळीं निघण्याचें करितों. आपण आमच्याबरोबर आहांच." त्यांतील एक प्रधान ह्मणाला, "महाराजांच्या आगमनाविषयीं जनकमहाराजांस अगोदर आह्मांस कळविलें पाहिजे, तर आह्मांपैकीं कांहीं मंडळीस आज दोन प्रहरीं तिकडे निघण्यास महाराजांनीं

आज्ञा देऊन बाकीच्यांस महाराजांच्या स्वारीबरोबर येण्यास अनुमोदन असावें. " दशरथ राजानें त्यांची विनंति मान्य केली, नंतर जवळ असलेल्या सुमंत्रादि प्रधानांस "उद्यां प्रातःकाळीं निघाव-याचें, आपणांस रामचंद्राचे विवाहास जावयाचें आहे, हें सर्व ध्यानीं आणून स्वारीची सर्वप्रकारें तयारी ठेवावी, जनकराजा जरी माझा परम मित्र आहे, तरी परराज्यांत जावयाचें आहे, हें लक्षांत असू द्या. आपणास कोणत्याही प्रकारें सांगितलें पाहिजे असें नाहीं. " ह्याप्रमाणें दशरथराजा बोलला. नंतर जनकराजाच्या प्रधानादिकांस महावस्त्रें वगैरे देऊन त्यांची योग्य संभावना केली, व पुढील त्यांची सर्वप्रकारची सिद्धता करविली.

अनंतर मुख्यप्रधान सुमंत्र ह्यानें त्या दिवशीं व रात्रौ क्षणभरसुद्धां विश्रांति न घेतां जिकडे तिकडे हुकूम सोडून व मोठी धामधूम करून प्रातःकाळच्या आंत निघण्याची कडेकोट तयारी केली! ह्यावरून दशरथमहाराजांचें राज्य कसें सुयंत्र व नियमानें चाललें होतें हें सहज समजतें. अयोध्येंत संरक्षणास योग्य तेवढे अधिकारी व सैन्य ठेवून, अयोध्याधीश दशरथ महाराजांची स्वारी निघाली. तिजबरोबर दशरथ महाराजांचे भरत, शत्रुघ्न हे दोघे मुलगे, कौसल्यादि सर्व स्त्रिया, अनेक संबंधिजन, संस्थानिक, वसिष्ठ, वामदेव, जाबालि व कात्यायनांसारखे महर्षि व अनेक ब्राह्मण, सुमंत्रादि अनेक अधिकारी, हजारों प्रजाजन असून शिवाय अनेक वारांगना, गवई, नाटककार, वगैरे आपल्या कलांनीं लोकमनोरंजन करणारी मंडळी होती. आणि शतशः हत्ती, उंटें, हजारों घोडे, रथ, गाड्या, पालख्या, द्रव्याचे खजिने, रत्नांच्या व अलंकारांच्या धातुमय पेट्या, हजारों स्वार, पायदळ, वअनेक लहान मोठ्या तोफा होत्या. स्वारीबरोबर असणारा तो सेनासमुद्र इतरलोकांस वाहून नेत आहे कीं काय असें वाटे! रात्रंदिवस चालतां चालतां दशरथराजा, वाहनस्थ मुख्य मुख्य मंडळीसह, चौथ्या दिवशीं ह्मणजे शुद्ध पंचमीस सायंकाळीं दोनतीन घटिका दिवस असतां विदेह देशाच्या मिथिलानगरीच्या अगदीं जवळ येऊन पोहोंचला. तेथें स्वतः सीरध्वज जनकराजा, कुशध्वज, शतानंद, सुदामन वगैरे मंडळी त्यांचें सन्मानपूर्वक स्वागत करण्यास तयार होतीच. प्रथमदर्शनीं दशरथानें जनकास

दृढालिंगन दिलें. त्या समयीं प्रेमातिशयानें दोघांचेही डोळे भरून आले; अत्यंत आनंदामुळें दोघांचेही देह रोमांचित झाले; विधिलीलेनें दोघांचेही कंठ दाटून आले; रामचंद्राच्या विलक्षण पराक्रमाचें तेज दोघांचेही मुखांवर दिसत होतें. तेथून सर्व मंडळी, रामचंद्र व लक्ष्मण हे विश्वामित्रासह जेथें राहत होते त्या स्वयंवरमंडपाजवळच्या वाड्याकडे यावयास निघाली. ते सर्व पायांनींच हळू हळू चालत होते. दशरथ व जनक हे हातांत हात घालून गोष्टी बोलत चालत होते. जवळ वसिष्ठजाबालि वामदेवादिक होते. मिथिलानगरीच्या बाहेरील अनेक सुंदर वृक्ष, पाण्याची सोय, उत्तम मार्ग वगैरे पाहून दशरथास फार आनंद झाला, तो त्यानें जनकास दर्शविला. नंतर जनकानें, आपल्या विनंतीस दशरथानें मान देऊन लौकर येण्याचें केलें, व बरोबर आणावयाची ती बहुतेक मंडळी आणिली, ह्यामुळें फार फार कृतज्ञता व आनंद दर्शविला, व रामचंद्राच्या लोकोत्तर पराक्रमाचें वर्णन सर्वांस ऐकविलें. विश्वामित्राबरोबर ते रानांत असतां त्यावेळेस काय काय शिकले, व त्यांनीं यज्ञसंरक्षण कसकसें केलें, तेंही सर्व त्यानें त्यांस निवेदन केलें. बोलत बोलत ती मंडळी येत असतां त्यांस मिथिला नगरी लागली. त्या नगरींतील अनेक प्रकारांनीं सुशोभित असणाऱ्या राजमार्गानें ते आले. तो नगरीचा सुंदर भाग पाहून दशरथास जें अप्रतिम समाधान वाटलें, तेंही त्यानें जनकास सांगितलें. रस्त्यांतील लोकांचे जयजयकार ऐकत व प्रणाम घेत घेत ती मंडळी रामचंद्राचा जेथें जयजयकार झाला होता त्या रंगस्थळीं आली. पूर्वीं सूचना असल्यामुळें तेथें विश्वामित्र रामलक्ष्मणांसह त्या मंडळीच्या स्वागतार्थ उभे होतेच. भेटतांच नमनाशीर्वाददृढालिंगनहास्यादि झाल्यानंतर, दशरथास विश्वामित्रऋषीनें स्वयंवरादिविशीं घडलेलें सविस्तर वृत्त, तीं तीं स्थळें दाखवून, सांगितलें. शेवटीं तें भग्न झालेलें रुद्रचापही दाखविलें. त्यांतील एक तुकडा तरी आपणास उचलतो कीं काय हें पहावें, असें दशरथाच्या मनांत मात्र आलें, परंतु तें उचलण्याचा त्यानें यत्न केला नाहीं ! नंतर सर्व मंडळी क्षणभर त्या वाड्यांत बसून आपआपल्या आन्हिक कृत्यांस गेली. पायदळावांचून आलेल्या इतर सैन्याची उतरण्याची जनकाच्या प्रधानांनीं सर्व प्रकारची तजवीज लाविली.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं प्रहर एक दिवसास रामलक्ष्मणभरतशत्रुघ्न हे त्या वाड्यांत आपल्या मातांजवळ एकास्थळीं अनेक प्रकारच्या गोष्टी बोलत बसले होते. दशरथराजा वसिष्ठ, विश्वामित्र, वामदेव, काश्यप, जाबालि, कात्यायन, मार्कंडेय व प्रधान, यांसह एका सुंदर दिवाणखान्यांत बसलाहोता; त्या स्थळीं परस्परांमध्यें प्रथमतः प्रस्तावनारूप कांहीं संभाषणें होऊन नंतर जनक हात जोडून दशरथास ह्मणाला, “ दशरथ महाराज, आपल्या अद्वितीय इक्ष्वाकुकुलाशीं आमच्या विदेहकुलाचा संबंध घडत आहे, ह्यापेक्षां मला जगांत अधिक संतोषप्रद ती कोणती गोष्ट असणार? हा संबंध साक्षात् शंकरांनीं किंवा परशुरामांनीं घडवून आणला असें ह्मटलें पाहिजे. अहो, माझ्या मनांत जी गोष्ट आली आहे, ती आपणा सर्वांस मान्य होईल अशा आशेनें बोलतों, तरी तिकडे दुर्लक्ष्य करूं नये. सीतेप्रमाणेंच गुणरूपानें संपन्न अशी माझी प्रिय ऊर्मिळा कनिष्ठ कन्या आहे, ती आपल्या रमचंद्रतुल्य लक्ष्मणास द्यावी असा माझा अंतःकरणपूर्वक हेतु आहे.” ह्या प्रमाणें जनकराजा बोलत आहे तों मध्येंच विश्वामित्रमुनि ह्मणाले, “जनका, ही वरयोजना तुला फारच चांगली सुचली. परंतु आपणां उभयतां नृपतींपुढे माझेंही एक मागणें आहे कीं, सीता व ऊर्मिळा ह्यांच्या प्रतिमाच ज्या त्यांच्या दुसऱ्या भागिनी, ह्मणजे कुशध्वजाच्या मुली-मांडवी व श्रुतकीर्ति-ह्या भरत व शत्रुघ्न यांच्या प्रियपत्नी व्हाव्या. ” हें त्या मुनीचें मत जनकाला तेव्हांच पसंत पडलें, व त्याची त्यानें फार फार स्तुति केली. वसिष्ठादिकांस जनकाचें व विश्वामित्राचें ह्मणणें आवडलें. ह्यावर दशरथानें “ आपल्या सर्वांस जी मान्य गोष्ट ती मला अत्यंत ग्राह्य असून हितपरिणामीही आहे असें मी समजतों, ” इतकेंच ह्मटलें. नंतर त्याच बैठकीस सर्वांच्या अनुमतानें ज्येष्ठ शुद्ध नवमीस उत्तराफाल्गुनीनक्षत्रावरच सर्वांचे विवाह करण्याचें ठरलें. नंतर लौकरच ही वार्ता दशरथस्त्रियांस व जनका कडील स्त्रीमंडळास कळली, व त्या नगरींतही तेव्हांच पसरली.

विवाहाचे पूर्वदिवशीं ह्मणजे अष्टमीस जनकानें देवकप्रतिष्ठा, ग्रहयज्ञ, मातृकापूजन, नांदिश्राद्धादि करून सर्व कुलाचार केले; विवाहाचे दिवशीं करावयाचे तेही सर्व शास्त्रोक्त व लौकिक विधि संपादिले. सीतेनें स्वयंवरमंडपांत रामचंद्राच्या कंठांत माळ घातली त्या दिवसापा-

सूनच तिच्या सख्यांस व दासींस आतां हिच्या मैत्रीचा लाभ व सेवासंबंध आठ दाहा दिवसच राहिला, असें समजून त्या तिचें काम पूर्वीपेक्षां फारच तत्परतेनें व प्रेमानें करूं लागल्या! त्या मंगलदिवशीं तिला न्हावूं घालणें, वस्त्र नेसविणें, कोठें नेणें, हीं कामें त्यांनीं मोठ्या हौसेनें, व सद्गदित अंतःकरणानें केलीं!

इकडे दशरथानेंही अष्टमीस व नवमीस वेदशास्त्रोक्त व आचारमूलक सर्व विधि केले. जनकापेक्षां दशरथानें पुष्कळच दानधर्म केला. हजारों सवत्स गाई ब्राह्मणांस दिल्या, सुवर्णदान केलें, भूमि दान दिल्या व दक्षिणा वांटल्या. नंतर वसिष्ठ व विश्वामित्र ह्यांच्या आज्ञेनें नवमीस चार पांच घटिका दिवस असतां कन्यागृहीं वर जाण्याची तयारि झाली. त्या समयीं ज्या वाड्यांत दशरथराजा उतरला होता त्यांत व त्याचेसभोंवतालच्या विस्तीर्ण अंगणांत स्वच्छ व मूल्यवान् पोषाक केलेले हजारों लोक जमले. अनेक रथ, हत्ती, घोडे, शृंगारून अगदीं सज्ज केले. शतशः सुशोभित केलेल्या पालख्या भोयांच्या खांद्यावर तयार होत्या. पाहावें तिकडे चौऱ्या, सुवर्णाच्या काठ्या, ध्वज, पताका, अबदागिरी छत्रें, हीं दिसूं लागलीं. सर्व प्रकारचें सैन्य यथानुक्रमानें तयार झालें. सर्व गुणांनीं उच्चैःश्रव्याची बरोबरी करणारे असे मोठे उंच, पांढरे, शृंगारलेले, आणि ज्यांवर सुंदर व विस्तीर्ण रेशमी छत्रें धरलीं आहेत असे चार अश्व वरांकरितां तयार होते. उंचीं उंचीं वस्त्रें नेसून व अनेक अलंकार घातलेल्या स्त्रिया वर कधीं निघतात ह्मणून वाट पहात राहिल्या. वारांगनांचीही घाई उडाली! इतक्यांत सर्व प्रकारचीं वाद्यें वाजूं लागलीं. त्यांच्या आवाजांनीं परस्परांचें बोलणें ऐकूं येईनासें झालें! तत्क्षणीं मनोहर व दिव्य पोषाक केलेले अत्यंत, रूपवान् व तेजःपुंज असे रामलक्ष्मण व भरतशत्रुघ्न अनेकांस प्रणाम करीत करीत व अनेकांचे आशीर्वाद व नमस्कार घेत घेत त्या अश्वांवर बसले. तत्क्षणीं चोहोंदिशांकडून जयजयकार शब्द होऊन त्यांवर अतोनात पुष्पवृष्टि झाली. तेणेंकरून दशदिशा दुमदुमून व भरून गेल्या. नंतर ह्या वरांच्या स्वाऱ्या निघाल्या. वरांच्या पाठीमागें व पुढें जो जो लोकसमूह असावा, तोच होता. तो समूह अनेकप्रकाराच्या रत्नांनीं भरलेला, विस्तारयुक्त, उत्साहवान्, व आनंदलहरींनीं परिपूर्ण असल्यामुळें सागराच्या उपमेस योग्य असा

होता. ही वरांची स्वारी मिथिलेंतील अत्यंत विस्तीर्ण व शोभायमान अशा मार्गांतून निघाली. ती सर्व नगरी त्या दिवशीं ध्वज, तोरणें,पुष्पमाला, ह्यांच्या योगानें शृंगारलेली होतीच, पण त्या मार्गानें वरांच्या स्वाऱ्या जावयाच्या हें पूर्वीं ठाऊक असल्यामुळें तो मार्ग फारच मनोहर केलेला होता. मनुष्यांच्या दाटीमुळें तो रस्ता रुंद असतांही अगदीं अरुंद वाटूं लागला! मनुष्यांची इतकी कांहीं गर्दी झाली कीं पुढील मनुष्यानें पाऊल टाकल्याशिवाय मागच्याला पुढें पाऊल टाकतां येईना! त्या मार्गांतील दोन्ही बाजूंच्या खिडक्यांतून वरांस पाहण्याकरितां कोणीच मनुष्य नव्हतें, असें ह्मटलें तरी चालेल! बहुतेक घरांच्या सर्व खिडक्या रिकाम्या होत्या. ह्याचें कारण इतकेंच कीं मिथिलेंतील बहुतेक स्त्रिया व पुरुष राजकन्यांच्या विवाहासाठीं राजवाड्यांत गेले होते. अशा रीतीनें जनकगृहीं शनैः शनैः वर चालले असतां जनकराजाकडूनही अशाच थाटानें पुष्कळलोक स्वागतार्थ सामोरे आले. मग काय विचारतां! वाद्यांचे गजर, घोडे, हत्ती, पालख्या, लोक, सर्व कांहीं दुप्पट होऊन गर्दीच गर्दी झाली! अशा रीतीनें हे वर जनकाच्या वाड्यापुढील सुंदर व विस्तीर्ण मंडपांत आले; तों सूर्यही अस्तास गेला. ते अश्वांवरून उतरल्यावर जनकराजानें व कुशध्वजानें यथानुक्रमें रामलक्ष्मण व भरतशत्रुघ्न यांचे हात धरून संमानपूर्वक, प्रेमपुरःसर व मोठ्या आनंदानें त्या विवाहमंडपांत त्यांच्यासाठीं जीं मनोहर व मृदु आसनें केलीं होतीं, त्यांवर त्यांस बसविलें. दशरथ, विश्वामित्र, वासष्ठादि मंडळींचा व सर्व लोकांचा त्या स्थळीं सादर प्रवेश झाला. मधुपर्क होऊन त्या स्थळीं वरांस सुंदर पोषाक दिले. नंतर त्या मंडपांत सर्वप्रकारच्या यज्ञसंपत्तीनें परिपूर्ण आणि कोमल पल्लव, सुवासिक पुष्पांच्या मनोहर माळा, पुष्पगुच्छ व नानाविध फळांचे झुबके, ह्यांनीं सुशोभित केलेली अशी विवाहवेदिका ( बहुलें ) होती, तिजवर शतानंद पुरोहिताच्या विनंतीवरून, तेजानें अपर अग्नीच अशा वसिष्ठमहर्षींनीं मंत्रपूर्वक अग्नि सिद्ध करून त्यांत हवन केलें. रामचंद्रलक्ष्मणादि वर जवळच समोर बसलेले होते, ते वसिष्ठाज्ञेनें उभे राहिले. इतक्यांत वस्त्रालंकारांनीं भूषित व विनयसंपन्न अशा सीता, ऊर्मिळा, मांडवी आणि श्रुतकीर्ति ह्यांस तेथें

सख्यांनीं आणिलें, व आपण जरा दूर झाल्या. सुमेधा व कुशध्वजाची स्त्री ह्या आपल्या पतींजवळ होत्याच. जनकानें, सीतेला रामापुढें, ऊर्मिळेला लक्ष्मणापुढें अशा उभ्या केल्या, व जनकबंधु कुशध्वजानें आपल्या दोन कन्या मांडवी व श्रुतकीर्ति ह्या भरत व शत्रुघ्न ह्यांच्या समोर उभ्या केल्या. नंतर त्यांनीं त्या प्रज्वलित अग्नीच्या साक्षीनें मुलींचे कर ग्रहण करण्याविषयीं वरांची प्रार्थना केली. आणि ज्याचे नयन अश्रूंनीं भरलेले असून अन्तःकरण सद्गदित झालें आहे, असा तो जनक अति प्रेमामुळें किंचित् अडखळत ह्मणाला, "इयं सीता मम सुता सहधर्मचरी तव । प्रतीच्छ चैनां भद्रं ते पाणिं गृण्हीष्व पाणिना । पतिव्रता महाभागा छायेवानुगता सदा । रामभद्रा, आजपर्यंत ह्या कन्येचें मीं यथाशक्ति आणि यथाबुद्धि पालन केलें. आतां तो अधिकार आपल्याकडे आला. हिला सर्वप्रकारें सुखदाते आपण आहां. आपण कुलशीलपराक्रमानें अनुपम असून माझ्या कन्येचे प्रियकर्त्ते झालां, येणेंकरून मी आज सर्व जगतांत कृतार्थ झालों आहें. हा कालपर्यंत ही कन्यारूप आपली द्रव्याची ठेव मजजळ होती, ती आपल्या स्वाधीन करून मी निश्चिंत झालों. ही आपणांस जशी धर्मकार्यांत तशी व्यवहारांतही सर्वप्रकारें साहाय्य करील. हिला सदुपदेश करून व सुशिक्षण देऊन आपल्या योग्यतेप्रत आणा. प्रत्येक कार्यांत हिचें आपण मत घ्यावें. ही छायेप्रमाणें तुह्मांला अनुसरेल. हिच्यावर आपण सर्वकाळ प्रेम सारखें ठेवावें. " असें बोलल्यावर रामचंद्रानें सीतेचा कर धरला. तत्क्षणीं त्या उभयतांचे मुखांवर नानाविध मनोविकार लिहिल्यासारखे स्पष्ट दिसत होते! स्त्रीचा पुरुषानें व पुरुषाचा स्त्रीनें हस्तावलंब केल्याशिवाय हा संसारसागर तरणें कठिण आहे, असें त्यांनीं सर्वांस त्यावेळीं सांगितलें, असें तेथील मार्मिक लोकांस वाटलें! कित्येक ह्मणाले, लतेला वृक्षाचा आश्रय अवश्य पाहिजे. असो. रामानें पाणिग्रहण करतांच जनकानें रामचंद्राच्या हस्ततलावर विश्वामित्रऋषींनीं सांगितलेल्या कन्यादानमंत्रानें विधिपूर्वक उदक घातलें. त्याप्रमाणेंच ऊर्मिळेचें पाणिग्रहण केलेल्या लक्ष्मणाच्याही हस्तावर घातलें. कुशध्वजानेंही जींत विनयाचे शब्द फार असून अर्थ फार गंभीर आहे आणि जिच्या श्रवणानें अन्तःकरण द्रवून

जावयाचेंच अशी, भरतशत्रुघ्नांची स्वकन्यांच्या परिपालनार्थ प्रार्थना करून त्यांचें करग्रहण करण्याविषयीं पुनः त्यांची विज्ञप्ति केली, व त्यांच्या हस्तावर मंत्रित जल घातलें. तत्क्षणीं वाद्यांचा गजर झाला. चोहोंकडून पुष्पांचा व आनन्दोद्गारांचा वर्षाव झाला. आपलें सांकेतिक कार्य येथपर्यंत निर्विघ्न येऊन पोंचलें ह्मणून विबुधांनींही संतुष्ट होऊन पुष्पवृष्टि केली! तो अपूर्व चमत्कार पाहून पुष्कळांस आश्चर्य वाटलें. ब्राह्मणांनीं वेदमंत्रांस आरंभ केला. बंदिजनांनीं, ह्या दंपत्यांस सदा सुख मिळून ह्यांच्या हातून लोकांवर अनंत उपकार व्हावेत, व ह्यांचें यश सर्वांनीं गावें, अशा अर्थाचीं पद्यें गाइलीं. स्त्रियांनींही आपले कोमल व सुस्वर कंठ गाणीं गाऊन मोकळे केले. नंतर त्यावेळीं लग्नसंबंधानें व्हावयाचे ते सर्व विधि झाले. जनकानें बहुत द्रव्य खर्च करून दशरथराजाचा, राण्यांचा व तत्पक्षीय सर्व मंडळीचा व स्त्रियांचा उत्तम प्रकारें आदरसत्कार करून संमान ठेविला. सर्व प्रकारची त्यांची तजवीज ठेविली. त्यांस कसलाही कमीपणा भासूं दिला नाहीं. त्यांस राग येईल अशी एकही गोष्ट खुद्द जनकाकडून अथवा जनकपक्षाकडून झाली नाहीं. रात्रौ त्या नगरींत चोहोंकडे उत्सव असे; त्यांस ते दिवस महोत्सवाचे वाटले. दशरथानें स्वनगरींत लौकर जाण्याविषयीं फारच उत्कंठा व हेतु दर्शविल्यावरून हा विवाहोत्सव चारच दिवस चालला. ह्या चार दिवसांत भोजनें वगैरे घातलीं. दशरथाकडील जी मंडळी आली होती त्यांतील सर्वांस त्यांचे त्यांचे योग्यतेप्रमाणें जनकाकडून महावस्त्रादि मिळालीं. अशा तेथें घडलेल्या पुष्कळच गोष्टी वर्णन करण्यासारख्या व ऐकण्याला योग्य असूनही त्या विस्तारभयास्तव, श्रोतेहो, तुह्मांस न सांगतां, रामचंद्रादि जामात्यांस जनकानें काय काय दिलें, हें कथन करून जातेवेळीं सीतेस तिच्या मातेनें जो सदुपदेश केला तो थोडक्यांत निवेदन करूं, व दशरथ, रामचंद्रादि पुत्रांस व त्यांच्या सीतादि भार्यांस स्वनगरींत घेऊन गेला, ह्या कथाभागाकडे वळूं.

जनकराजानें त्या पुत्रतुल्य प्रत्येक जामात्यास रोकड असें पुष्कळच द्रव्य दिलें, त्यामुळें कित्येक वर्षांपासून त्याच्या भांडारगृहांत असलेलें शिलक द्रव्य बहुतेक संपलें! स्वराज्यांतील कांहीं प्रदेश त्यांस अर्पण केले; सहस्रशः गाई दिल्या; नानातऱ्हेचे मूल्यवान् पीतांबर, शालजोड्या, व दुसरीं

सुंदर सुंदर हजारों वस्त्रें दिलीं. चतुरंग सैन्य दिलें; अर्थात् त्यांत रथ, हत्ती घोडे वगैरे होतेच. नानातऱ्हेचीं दुर्मिळ व मूल्यवान् रत्नें, मोत्यें हीं देऊन त्यांचे शतशः अलंकार व कुशल कारागिरांनीं केलेले ह्मणून अत्यंत दर्शनीय असे सुवर्णाचेही शेकडों दागिने नजर केले. जनकमहाराजांस पूर्वी लोकांनीं अर्पण केलेल्या व त्यानें अपूर्व ह्मणून संग्रहीं ठेवलेल्या अशा अनेक वस्तु त्यानें मोठ्या प्रेमानें, व उदारबुद्धीनें जावयांस दिल्या. युद्धसामुग्रीही पुष्कळ दिली. प्रत्येक कन्येला अलंकारांसह शंभर शंभर दासी देऊन कांहीं दासही दिले; त्यांच्या खर्चासाठीं निराळी जमीन तोडून दिली.

नंतर विश्वामित्रवसिष्ठादिकांनीं सांगितल्याप्रमाणें दशरथराजानें पांचवे दिवशीं सुमुहूर्तीं निघण्याचें ठरविलें. विश्वामित्रांनीं रामचंद्रादि दशरथपुत्रांस व सीतादि त्यांच्या स्त्रियांस आशीर्वाद देऊन त्यांस सदुपदेश करून उत्तर पर्वताकडे कौशिकीनदीच्या तीरीं गमन केलें. जाण्याचे दिवशीं सीतादि सर्व भगिनी सुमेधाराणीच्या मंदिरीं आल्या. तेथें त्यांच्या सख्या, दासी व दुसऱ्या कांहीं स्त्रिया होत्या. मांडवी व श्रुतकीर्ति यांची माताही त्या स्थळीं होती. त्या वेळीं तेथें जी सर्वत्र अत्यंत उदासीनता भासत होती, ती त्या मंदिरांतील स्त्रियांच्या नयनांतून गळणारें अश्रुजल, मुखांतून वारंवार वाहणारा श्वासवायु, त्यांच्या मुखचर्या म्लान करणारा सीतादिकांचा वियोगाग्नि, मुखांवाटे खेदसूचक शब्द काढणारें आकाश व त्यांच्या केशपाशांतील पुष्पहारांचा परिमळ पसरणारी पृथ्वी, ह्या पंचतत्त्वांपासूनच उद्भवली आहे काय, असें वाटे! सुमेधाराणीनें त्या चार कन्यांस जवळ बोलावून मोठ्या प्रेमानें दृढालिंगन दिलें व सीतेस जवळ घेऊन ह्मणाली, "सीते, ह्या तुझ्या बहिणी लहान आहेत, त्यांना तुझ्या इतकें अजून समजूं लागलें नाहीं. ह्या तुझ्या प्रिय भगिनी आतां तुझ्या जावा झाल्या आहेत. तूंच आतां तिकडे ह्यांना आमच्या ठिकाणीं आहेस, ह्मणून त्यांची आह्मांस विशेष काळजी वाटत नाहीं. तूं शहाणी आहेस, त्यांना वारंवार तूं सदुपदेश करीत जा. तुमचा सर्वांचा एकदम वियोग झाल्यानें जें आह्मांस आतां अतोनात दुःख होणार आहे, तें बोलूनसुद्धां दाखवितां येत नाहीं. किती दिवस आह्मांस संतति नसल्यामुळें फार दुःख होत होतें, तें तुझ्या

कृपेनें दूर झालें; परंतु आजपासून तें तुमच्या वियोगामुळें हजारोंपट पुन: भासणार आहे! असें जरी आहे तरी, तुह्मांस सर्व गुणांनीं संपन्न असे वर मिळाले ह्मणून आह्मांस आनंद होत आहे. सीते, तुला सर्व कांहीं समजत आहेच, पण ह्यावेळेस बोलल्यावांचून राहवत नाहीं, ह्मणून मी बोलतें. बाळे, वडील मनुष्यांचा सर्वकाळ सन्मान ठेवावा; त्यांच्याशीं नम्रतेनें वागावें; त्यांची पडेल ती सेवा करावी; तीं जेणेंकरून संतुष्ट राहतील असेंच सदाचरण त्यांच्याशीं ठेवावें. पतीच्या चित्तास तिळभरही कधीं दुखवूं नको; तो जरी किती रागें भरला, कठोर बोलला, तरी आपण आपल्या शांतस्वभावानें व मधुर भाषणानें त्याला शांत करावें; किंवा त्यावेळीं मौन धरणें बरें वाटल्यास तसें करावें; पतीला जो सुस्वभाव आवडेल, त्याचा ज्या सद्गुणांकडे कल असेल, तिकडेच आपण आपली प्रवृत्ति ठेवावी. त्याच्याशीं क्षणभरसुद्धां प्रतारणा करूं नये; त्याचें आपण हृदयच बनून राहावें; त्याची आज्ञा ऐकणें हेंच आपल्या जन्माचें खरें कर्तव्य समजावें. आपल्या प्रफुल्लित वदनकुमुदानें पतीचा मुखचंद्र सदा उदित ठेवावा बरें! कदाचित् संकटरूप राहु त्यास ग्रासूं लागल्यास आपल्या सच्छीलरूपदानानें व प्रार्थनारूप जपानें तो लौकर प्रसन्न होईल असें करावें! मुली, जी स्त्री आपल्या सद्गुणांनीं दुर्वृत्तपतीसही सन्मार्गी आणिते, तीच पतिव्रता स्त्रियांच्या गणनेस योग्य होते. स्त्रीस आपण आपल्या पतीचें अर्धें अंग आहे, असें समजल्यावर मग त्याच्याशीं आपला किती संबंध आहे हें तिला कळेलच! स्वस्त्रीच्या सद्वर्तनानेंच पुरुषामध्यें पराक्रमादि गुण दृष्टीस पडतात! सुशीलस्त्री हीच सर्व आनंदास व सुखास कारण आहे. सीते, भर्त्याबरोबर सुख भोगण्यास तसेंच दु:ख सोसण्यासही तयार असावें! अग, फार काय सांगूं, तुला नवऱ्याबरोबर ऐन तारुण्यांत भयंकर अरण्यांत जाऊन फलमूलादि खाऊन व वल्कलें नेसून जरी राहण्याचा प्रसंग आला तरी त्यास सोडून घरांत क्षणभरही राहूं नको; अथवा रणांगणीं जरी त्याच्याबरोबर जाण्याचा समय आला तरी तो दवडूं नको. निरुपायास्तव एकटें राहण्याची वेळ आलीच तर पतिचरणीं लक्ष्य ठेवून एकेक दिवस लोटीत असावा. सारांश, स्त्रियांना पति हाच एक प्रत्यक्ष दिसणारा परमेश्वर आहे. हा परमेश्वर कसा आहे, कोठें राहतो, ह्याचें साम-

र्थ्य किती, ह्याची स्तुति कशी करावी, ह्याचें ध्यान कसें करावें, ह्याचें रूप कसें आहे, हा सगुण आहे कीं निर्गुण आहे, ह्याची प्रतिमा हृदयांत कशी आणावी, कोणत्या भक्तीनें हा वश होईल, ह्याच्या प्राप्त्यर्थ किती वर्षे तपश्चर्या केली पाहिजे, हा प्रसन्न कसा होईल, ह्यानें ही सृष्टि उत्पन्न कशी केली, आपण त्याचे पुढें किती दुर्बल, किती अज्ञान, व किती मूढ आहों, इत्यादि परमेश्वरसंबंधी योगिजनांसही विचारांत पाडणारे संशय स्त्रियांस काढावयास नकोत. अथवा त्या परम कारुणिकाच्या अनंत लीलांपैकीं एकही लीला समजण्याचें कोणा मनुष्याचे अंगीं सामर्थ्य नसून तो जसा ईश्वराविषयीं अनेक वल्गना करितो, त्या नास्तिकाप्रमाणें स्त्रियांस कांहींएक बडबडावयास नको! मुली, दया, क्षमा, शांति इत्यादिकांच्या योगानें जशीं कार्ये होतात, तशीं दुसऱ्या कोणत्याही उपायानें होत नाहींत. शांतीपुढें तर हजारों लखलखीत शस्त्रधारा तुच्छ होत! आणखी पहा, जगांतील सर्व सुखें व उपभोग हे विद्युल्लतेप्रमाणें चंचल आहेत असें समजून हृदयीं उदारबुद्धि ठेवावी. सेवक, परिजन, दास दासी ह्यांच्यावर लोभ असावा, त्यांच्यावर रागें भरूं नये, त्यांस समजेल अशा रीतीनें सांगावें. गर्व हा एक महान शत्रु मनुष्याच्या शरीरांत वास करीत असतो; शत्रूस जर आपल्या घरीं बिऱ्हाड मिळालें, तर तो आपला केव्हांच नाश करील हें काय सांगावें? त्या प्रमाणेंच आळस, मत्सर इत्यादि दुसरे घातक शत्रु आहेत, त्यांच्याकडे तूं पाहूं सुद्धां नको. परोपकाराविषयीं दक्षता, दुष्टांस सन्मार्गीं आणण्याविषयीं तत्परता, व साधूंच्या रक्षणाविषयीं उत्सुकता सदा जागृत असावी. फार काय सांगूं? तात्पर्य कीं, सदाचरणानें वागून सर्वांस सुख होईल असें करावें. तूं आतां लौकरच पट्टराणी होशील; तर आपल्या पराक्रमी प्राणपतीला प्रजांच्या सुखार्थ साहाय्य कर बरें." इतकें बोलून ती आणखी ह्मणाली, "ऊर्मिळे, अग मांडवी, अग श्रुतकीर्ति, तुह्मीही हें माझें बोलणें लक्षांत ठेवा. रामलक्ष्मणादि बंधूंमध्यें कांहीं विलक्षणच प्रीति आहे. पण त्यांहूनही प्रीति अधिक असते, असें तुह्मी त्यांस दाखवा."इतकें ह्मणून ती स्तब्ध झाली, कांहीं वेळानें अनेक मनोविकारांनीं मोहित होऊन सीता मोठ्या प्रयासानें, एवढेंच ह्मणाली कीं "आई, तुझा उपदेश फारच गोड व

हितकारक आहे. त्याप्रमाणें आमच्या हातून आचरण व्हावें, ह्यासाठींही तुझाच प्रेमभरित आशीर्वाद आह्मास पाहिजे. " नंतर सुमेधाराणीनें त्या सर्वांस एकदम घट्ट कवटाळून "मुलीनों, तुमचे भर्ते तुह्मांस सुख देवोत, तुह्मी त्यांचे केवळ उल्हासच असें त्यांस वाटो. " इतकेंच ह्मटलें. नंतर त्या मंदिरीं जमलेल्या स्त्रियांस त्यांनीं, त्यांच्याशीं विरहसंबंधानें होणाऱ्या दुःखाविषयींबोलून सखीजनांस सीताआदिकरून दशरथाच्या स्नुषा भेटल्या. त्यावेळीं मंगलविधि करावयाचे ते त्यांनीं यथासांग केले. ह्या वेळीं सीतादि कन्यांस आतां मातांचा, जनकादिकांचा, सुहृज्जनांचा, तेथील सर्व प्रिय पदार्थांचा, मिथिलानगरीचा व त्या रमणीय मंदिराचा वियोग होणार ह्मणून जें वाईट वाटलें, तें त्यांचे कृतींवरून व मुखचर्येवरून व अनेक उद्गार व भाषणें ह्यांवरून स्पष्ट दिसत होतें.

शुद्ध त्रयोदशीच्या पूर्वरात्रीं जनकराजाचा निरोप घेऊन दशरथराजा रामचंद्रादि पुत्रांस व सीतादि चार स्नुषांस घेऊन निघाला. स्वारीबरोबर हजारों मशाली व दुसरे अनेक प्रकारचे विपुल दीप असल्यामुळें दिवसाप्रमाणें जिकडे तिकडे उजेड पडला होता. दशरथराजाचे बरोबर चतुरंग सैन्य असून जनकाचेंही कांहीं सैन्य अयोध्येपर्यंत जाण्याकरितां निघालें होतें. त्याप्रमाणेंच अनेक प्रकारांनीं दर्शनीय अशी ती दशरथराजाची नगरी पाहण्याकरितां निघालेले अनेक लोक बरोबर होते, व कांहीं अंतरापर्यंत त्यांस पोंचविण्यकरितां निघालेल्या जनकराजाबरोबर हजारों मनुष्यें असून सुमेधाराणीबरोबर मोठाच स्त्रीसमाज होता. अशी एकंदर मनुष्यांची गर्दीच गर्दी उडाली. शिवाय आपल्या प्रिय राजकन्यांचा हा समारंभ पाहण्याकरितां मार्गांतील दोन्हीं बाजूंस खालीं, व खिडक्यांतून लोक होते ते निराळेच! अनेक हत्तिणींना उत्तम प्रकारें सजवून त्यांवर बहु मोलाच्या अंबाऱ्या घातल्या होत्या; त्यांतील चोहोंवर राम लक्ष्मणादि आपआपल्या वधूंसह बसले होते. पुढें व मागें अनेक वाद्यें वाजत होतीं. लोक नानाविध राजनिष्ठाप्रदर्शक, कल्याणपर, व जयजयकारसूचक शब्द काढीत होते. अशा थाटानें जातां जातां त्या रात्रीं विशेष पुढें न जातां मिथिलेच्या बाहेर जवळच उदकाच्या

आश्रयानें त्यांना उतरण्याकरितां अनेक मंडप घातले होते, तेथें ते उतरले. त्यांत चोहोंकडे दीपांचा लखलखाट होता; तेथें ज्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें जागा केल्या होत्या. स्त्रियांसाठींही उत्तम सोई होत्या- तेथें त्या रात्रीं सर्वांनीं विश्रांति घेऊन प्रातःकाळींच प्रयाण केलें. जनकादि मंडळीही उदासीन होऊन तेथून स्वनगरींत परत आली.

अयोध्यापति दशरथ राजा ह्याप्रमाणें सर्व मंडळीसह हळूहळू चालला असतांमार्गांत, अत्यंत क्रोधाविष्ट व दिसण्यांत भयंकर अशा जामदग्न्य परशुरामाची गांठ पडली. तेणेंकरून राजा दशरथ व त्याचे सर्व लोक फारच भयभीत झाले; व हा क्षत्रियांचा अन्तक आतां काय करिल कोण जाणे ह्या संकटांत ते पडले. परंतु रामचंद्रानें त्याचा गर्व व सर्व शक्ति हरण करून त्यास स्वस्थानीं ह्मणजे महेंद्रगिरीवर तपश्चरणार्थ पाठविलें.

अमक्या दिवशीं दशरथमहाराज आपल्या मुलांसह व सीतादि- सुनांसहवर्तमान येणार, असें पूर्वीं अयोध्या नगरींत सर्वांस कळलेंच होतें. त्या प्रमाणेंच वाटेंत लागणाऱ्या त्यांच्या राज्यांतील लहान मोठ्या नगरांतील व ग्रामांतील प्रजाजनांनींही दशरथ महाराज मिथिलेहून कधीं निघणार, याचा शोध ठेविला होता. मार्गामध्यें त्या लोकांनीं ह्या महाराजांचें दर्शन घेऊन आपलें राजावरील अतोनात प्रेम अनेक तऱ्हेनें सुचाविलें. तत्पूर्वीं राजाच्या सुखार्थ चोहोंकडे तयारी केली होती. अनेक प्रकारचे आपल्या ग्रामांत उत्पन्न होणारे उत्तम उत्तम पदार्थ राजाला सादर आर्पण केले. आपल्या राज्यांत आमचे सर्व धर्म शांतपणें चालले आहेत ह्मणून विनयपूर्वक आपल्या रक्षणकर्त्यास त्यांनीं कळविलें. आपणांस होणारे त्रासही त्या राजपित्यास विदित केले. आह्मांस कोणत्याही गोष्टीची वाण नाहीं, अशा त्या श्रीमान् अयोध्याधिपतीस समजाविलें. कित्येकांनीं आनंदाश्रुपूर्वक ह्मटलें कीं, " महाराजांचे अलभ्य दर्शनानें आह्मीं कृतार्थ झालों; दर्शन होतांच आमच्या अंतःकरणांत एका प्रकारची प्रेम बुद्धि उत्पन्न झाली आहे, ती या मुखावाटे बोलून सुद्धां दाखवितां येत नाहीं ! महाराजांचा स्त्रीजन, रामचंद्रादि मदनासारखे सुरूप व प्रतापशाली हे पुत्र, ह्या तारकांप्रमाणें तेजस्विनी जनककन्यका व आप-

त्या मुना, हे सुमंत्रादि कीर्तिमान् प्रधान, ह्या सर्वांचें दर्शन आह्मांस एके काळीं स्वप्नामों झाल्यानें तर आमच्या आनंदास पारावार नाहींसा झाला आहे! त्यांतही महाराजांचे गुणवान्, विनयसंपन्न, प्रतापी, अनेक शास्त्रांत निष्णात व दयाळु, असे हे प्रथम पुत्र आमचे युवराज रामभद्र आणि सुशीळवती व रूपवती आमची युवराज्ञी सीता, ह्यांना पाहून तर आह्मी धन्य धन्य झालों आहों. ह्या रामभद्राच्या दयादाक्षिण्यादि गुणांवरून ह्याच्या राज्यांतही आह्मांस आतांप्रमाणेंच, किंबहुना ह्याहीपेक्षां अधिक, सुख होईल ह्यांत संशय नाहीं! ह्या आपल्या कुटुंबाचा वटवृक्षाप्रमाणें मोठा विस्तार होऊन तो दीर्घायु व्हावा व प्रजाजन त्याचे आश्रयछायेखालीं सुखांत असावा, एवढीच आमची परमेश्वरापाशीं विज्ञापना आहे." अशा अर्थाचे अनेक प्रकारचे उद्गार दशरथ राजा स्वराजधानींत येत असतां, त्याच्या प्रजाजनांनीं मार्गांत त्यास कळविले. राजानें आपल्या ग्रामांत येऊन आपली राजनिष्ठा मान्य करण्याकरितां पुष्कळांनीं आग्रह व विनंती केली. परंतु आयोध्यानगरींत प्रवेश करण्याचा मुहूर्त टळेल ह्या एक मुख्य कारणानें व दुसऱ्या अनेक कारणांनीं, त्याच्यानें त्यांची विनंती मान्य करवली नाहीं. तरी रघुकुलोत्पन्न दशरथ राजा आपल्या मधुर वाणीनें ह्मणाला, " माझ्या प्रिय प्रजाजनानों, आपल्या ह्या मनःपूर्वक सत्कारानें व मधुर भाषणानें " राजा " हें पद मला अधिकच प्रिय व भूषणास्पद वाटूं लागलें आहे! आपणा सर्वांस जर सुख आहे, तरच मी सुखी, व आपणांस जर कोणापासून अथवा कशामुळें दुःख होत असेल, तर तें दुःख मलाच होत आहे, असें मी समजतों! ह्मणून तें दुःख मला सांगून मजकडून कमी करविणें ह्मणजे, मलाच आपण होऊन दुःखविमुक्त करीत आहां असें होतें. राज्यांत सर्वत्र शांतता ठेवून प्रजा धर्मानें वागविणें, त्यांच्या पासून अधिक करभार न घेतां त्यांस संतुष्ट ठेवणें, विपत्काळीं त्यांचें पालन करणें, हें राजाचें कर्तव्यच होय. हें केलें असतां राजानें ह्यांत गर्व वहाण्यासारखें कांहीं एक नाहीं. माझा हा राज्यभार खांद्यावर वहाणारा कोणी नव्हता, ह्यामुळें मी केवढा काळपर्यंत किती चिंतामग्न होतों, हें आपणांस ठाऊक असेलच. परंतु भगवंताच्या कृपेनें त्यापासूनही मी मुक्त होऊन आज

माझ्या प्रिय पुत्रांसह ह्या प्रिय कन्याच अशा सीतादि स्नुषांस घेऊन प्रिय अयोध्या नगरींत चाललों आहें ! केवढा आनंदाचा दिवस हा ! ह्या चार पुत्रांवर जें कांहीं माझें प्रेम आहे, तें दुसऱ्यास कोणत्याही प्रकारें कळवितां यावयाचें नाहीं. महर्षि विश्वामित्रांनीं रामलक्ष्मणांस अरण्यांत नेण्याची जेव्हां मजपाशीं गोष्ट काढिली, तेव्हां त्यांनीं मजवर वज्रवृष्टीच केली असें मला झालें ! मग त्यांनीं त्यांस वनांत नेल्यावर माझी काय अवस्था झाली असेल, हें काय बोलावें ! ह्या सर्वांची बंधुप्रीति कांहीं विलक्षणच आहे. हे सर्व पुत्र तर अनेक गुणांनीं उत्तम आहेतच, तरी ह्यांत रामचंद्राची कोणत्या गुणामध्यें ह्मणून अधिक स्तुति करावी ! काय त्याचा प्रखर पराक्रम वर्णावा, किंवा त्याची शांति गावी ! किंवा दयाच कथन करीत बसावें, हें समजत नाहीं ! ह्या रामभद्रावर आतां लौकरच राज्यभार टाकून आपण वानप्रस्थाश्रम स्वीकारावा, असें मनांत आलें आहे. ह्या जनककन्याही पतींला अनुरूप अशाच असून त्यांतही रामभार्या सीता तर अमूल्य स्त्रीरत्न आहे. ह्या रत्नाची परीक्षा आपोआप पुढें होईलच. अस्तु; परमेश्वरानें आपणांस दीर्घायु करून सदा सौख्यांत ठेवावें अशी माझीही त्यापाशीं वारंवार विज्ञापना आहे." अशा सारखें ठिकठिकाणीं त्यानें बोलून प्रजांचें प्रेम वाढविलें व त्यांस योग्यतानुरूप पुष्कळ द्रव्य देऊन मूल्यवान् वस्त्रेंही वांटलीं. ह्याप्रमाणें तो दशरथ राजा दाहाव्या दिवशीं आपल्या बरोबरच्या सर्व मंडळीसह, राज्यवैभवानिशीं व विवाहमंगलवाद्यांसहवर्तमान सुमारें अर्ध प्रहर दिवस असतां आपल्या राजधानीच्या आलीकडे एक कोश, जेथें उतरण्याची सर्व प्रकारची पूर्वी तजवीज केली होती, त्या ठिकाणीं उतरला. तेथेंच राजधानींतील हजारों लोक राजाचें स्वागत करण्याकारितां आले होते. तेथें कित्येकांस राजाची भेट होते न होते आहे तों, त्या राजाधिराजानें लौकर निघण्याविषयीं आज्ञा केली. कारण नगरप्रवेश करण्यास गोरजमुहूर्त उत्तम असें ठरलेलें होतें. नंतर मिरवत मिरवत मोठ्या थाटानें ते सर्व लोक यथानुक्रमानें नगरींत शिरले ! नगरांत घरोघरीं अनेक प्रकारच्या चित्रविचित्र पताका उभारलेल्या होत्या. तोरणें, पुष्पमाळा व दीपमाळा प्रत्येक गृहाला शोभा देत होत्या ! सर्वत्र पाणी शिंपडण्यानें ती नगरी

गारीगार झाली होती. ज्या ज्या मार्गांनीं तीं लग्नवरात जावयाची ठरलें होतें, ते ते मार्ग सर्व लोकांनीं गच्च भरून गेले. अनेक लोक हातांत मंगलकारक वस्तु घेऊन तयार होते. त्या रस्त्यावरील सर्व कनिष्ठ, मध्यम व उंच प्रतीचीं गृहें, भव्य वाडे, सुंदर मंदिरें, यांतील सर्व खिडक्या व सौधशिखरें मुख्यतः स्त्रियांनीं व्यापून टाकिलीं. त्या नववधूंचीं मुखकमलें कधीं दृष्टीस पडतील असें प्रत्येक मनुष्यास होऊन गेलें होतें. सर्व लोक नगरांत शिरतांच अनेक प्रकारचीं, कांहीं सुस्वर व कांहीं कर्कश, वाद्यें वाजूं लागलीं. त्यांचा ध्वनि चहोंकडे हळू हळू पसरत चालला, तेव्हां सर्वांना आतां आपल्यास त्यांचीं मुखें दृष्टीस पडतील असें वाटलें. त्या वरातीची व्यवस्था नीट होती; हजारों मशाली बरोबर होत्या; ज्या रथांत तीं नवविवाहित वधूवरें होतीं, असे चार रथ होते. हे रथ त्या वरातीच्या मध्यभागीं होते. त्यांच्या वरील आच्छादनें काढिलीं होतीं, अशाकरितां की आंत बसणारांचें सर्वांस दर्शन व्हावें; ह्या चार रथांतील पहिल्या रथांत राम व त्याचे डाव्या बाजूस सीता, दुसऱ्यांत भरत व मांडवी, तिसऱ्यांत लक्ष्मण व ऊर्मिळा आणि चवथ्यांत शत्रुघ्न व श्रुतकीर्ति, ह्याप्रमाणें बसलीं होतीं. रथ फारच मंदगतीनें चालले होते. ते इतके कीं हे काय उभेच आहेत असें वाटे! ह्या रथांबरोबर पुष्कळच प्रकाश होता; बरोबर संरक्षणार्थ मोठमोठे संस्थानिक व सरदार पायांनींच चालत होते. ह्याशिवाय दुसरे पुष्कळ रथ भरून चालले होते. ह्याप्रमाणें तें लग्नमंडळ चाललें असतां, त्या चार रथांवर लाह्यांची व पुष्पांची अतोनात वृष्टि चालली होती; जयजयकार शब्दांचा गजर तर कांहीं पुसूंच नका. सीतेच्या निष्कलंक मुखचंद्रमावरून पुष्कळ लोकांनीं तिच्या स्वभावाचें अनमान केलें. त्या प्रमाणें इतर स्त्रियांचेंही केलें. त्यांना पुष्कळ आशीर्वाद दिले. ते सुंदर रथ दृष्टीआड होऊं नयेत, असें प्रत्येकास होऊन गेलें. आपल्या युवराजास भार्येसह पाहत असतां त्यांचीं नेत्रें आनंदाश्रूंनीं भरून गेलीं. अंतःकरणें प्रेमानें पाझरूं लागलीं. कोणी ह्मणत रामभार्या ही साक्षात् लक्ष्मीच आमच्या नगरांत प्रवेश करीत आहे! कोणी बोलत ही चंद्रकलाच काय! कोणी ह्मणत ही विद्यादेवी सरस्वतीच! व सर्व लोक ह्मणाले एकूण आमच्या

राजपुत्रांस त्यांच्या सारख्याच भार्या मिळाल्या, यांत संशय नाहीं. ह्या रीतीनें तो दशरथ राजा आपल्या लोकांचे प्रणाम घेत घेत पुत्र, स्त्रिया, बरोबरचें चतुरंग सैन्य, नागरिकजन व इतर लोक यांसह अतिशय उंच व शुभ्र ह्मणून हिमालयासारखें शोभणारें अशा आपल्या मुख्य मंदिरापाशीं आला, व स्त्रीपुत्र व दुसरी नियमित मंडळी घेऊन आंत गेला. तेथें त्या समयाला योग्य अशी सर्व तयारी केलेली होती. सुगंधिपदार्थांचा तेथें घमघमाट सुटला होता! चोहोंकडे दीपांचा लखलखाट पडला होता! जिकडे तिकडे शुभ्र व सुवासिक फुलांच्या माळांच्या झालरी कौशल्यानें सोडविलेल्या होत्या. आंत गेल्यानंतर कौसल्यादि दशरथस्त्रियांनीं सीतादिकरून सुनांचीं मुखचुंबनें घेऊन प्रेमानें पोटाशीं धरून त्यांस बसावयास सांगितलें. तेथें आलेल्या स्त्रियांना, ही रामाची सहचारिणी, ही लक्ष्मणाची अर्धांगी, ही भरताची प्रियकरणी, व ही शत्रुघ्नाच्या अंकावर बसणारी, असें सांगितल्यावर तेथील स्त्रिया दशरथाच्या मंदिररूप आकाशांत नूतन उदय पावलेल्या तारकांच्या दर्शनांत निमग्न होत होत्या, इतक्यांत तेथें "होमाची सर्व सिद्धता आहे, मुलींकडूनच खोटी आहे," असे एका ब्राह्मणमुखांतून शब्द आलेले तेथें ऐकू आले! तत्क्षणीं सीताप्रमुख चारही भगिनींस सख्यांनीं पीतांबर नेसविले, पूर्वीचे कांहीं अलंकार काढून त्या प्रसंगाला शोभतील असे दुसरे घातले, व जेथें, कोठें मोठमोठ्या विद्वान् व तपस्वी ब्राह्मणांचा समुदाय बसला आहे, कोठें शूर क्षत्रियांचा थाट दृष्टीस पडतो आहे, कोठें अनेक नागरिकजन बसत आहेत, कोठें स्त्रिया आपल्या अपत्यांसह बसल्या आहेत, अशा ठिकाणीं त्यांना आणिलें व वसिष्ठांनीं सांगितल्याप्रमाणें रामचंद्रादिकांकडून यथाविधि गृहप्रवेशसंबंधी होम करविले. ब्राह्मणांनीं वेदोक्त आशीर्वाद दिले व त्यांजकडून गृहांतील देवतांचीं दर्शनें करविलीं. त्या वेळेस दशरथानें ब्राह्मणांस दक्षिणा देऊन आणखी ही कांहीं दानधर्म केला. नंतर भोजनान्तीं सर्वांनीं निद्रा घेतली.

प्रातःकाळीं सूर्योदय होत आहे तों रामचंद्रादि बंधूंचीं स्नानें झालीं, व त्यांचीं संध्यावंदनादि कर्मे अटपलीं. सीता व तिच्या बहिणी स्नानें करून मूल्यवान् वस्त्रें व नानाप्रकारचें अलंकार घालून तयार झाल्या.

नंतर ज्यांबरोबर पुरुषमंडळी अगदींच नियामित असून स्त्रियांचा मात्र मोठा समाज आहे, अशीं तीं नवविवाहित दंपत्यें त्या नगरींतील प्रसिद्ध प्रसिद्ध देवतांचीं दर्शनें घेण्याकरितां निघालीं. त्यांस पाहण्याच्या उत्कंठेनें रात्रीप्रमाणेंच मार्गांत व घरांतून लोक होते. देवालयीं जाऊन त्यांनीं सर्व देवतांचें प्रेमपुरःसर व भक्तीनें वंदन केलें. त्यांस अमूल्य वस्तु समर्पण केल्या. देवदर्शन घेऊन झाल्यावर तीं सर्व पूर्वीच्या मंदिरांत आलीं. असो; ह्या लग्नसंबंधानें दशरथराजानें मिथिलेंत व अयोध्येंत जें जें लोकांस द्यावयाचें तें दिलें; लोकांच्या इच्छेहून व तर्काहून त्यानें अधिक खर्च केला. ह्या मंगलकार्यांत कोणींही त्यास दोष दिला नाहीं.

## उच्छ्वास दुसरा.

श्रोतेहो, येथपर्यंत आपली चरित्रनायिका जी सीता ही नृपवर्य जनकराजाच्या गृहीं कशी आली, तिचें त्यानें लालनपालन कोणत्या प्रकारें केलें, तिचें पाणिग्रहण कोणत्या रीतीनें करविलें, आणि ती सध्या कोठें व कोणाच्या गृहीं आली आहे, हें सर्व आपल्यास सांगितलें. मुलगी जन्मास येते तेव्हां तिच्या पुढील सांसारिक स्थितीचें रूप कळत नाहीं. पिता दरिद्री, श्रीमान्, सत्ताधिकारी, विद्वान् अथवा मुर्ख असला ह्मणजे त्याच्याप्रमाणेंच कन्येची स्थिति असते असें मुळींच नाहीं; तिचें सर्व सुखदुःख पित्याच्या नव्हे, तर पतीच्या सधनतेवर, त्याच्या पराक्रमावर, त्याच्या विद्वत्तेवर, फार काय सांगूं? सर्वांशीं त्याच्या गुणांवर अवलंबून असतें. तेव्हां जनककन्या सीतेच्या सुखदुःखाला कारणभूत जो तिचा पति रामचंद्र याविषयीं येथें तुह्मांस थोडें तरी सांगितलें पाहिजे.

विवाह होतांच रामचंद्राचा सापत्न बंधु जो भरत यास त्याच्या युधाजित मामानें आपल्या घरीं नेलें; त्याबरोबर त्यावरील अत्यंत प्रेमास्तव शत्रुघ्नही तिकडे गेला. अयोध्येंत रामलक्ष्मण दोघेच राहिले. हे दोघे बंधु सर्वदा पित्याचे आज्ञेप्रमाणें वागत; सीतापति रामचंद्र तर अलौकिक गुणवान् होता. मातापित्यांची सेवा, गुरुजनांची भक्ति, संमाननीय व पूज्य पुरुषांशीं विनय, दीनजनांवर दया, तसेंच विलक्षण धैर्य, अप्रतिमशौर्य इत्यादि त्यांच्या गुणांविषयीं वर्णन करावें तेवढें थोडेंच. त्यानें आपला रात्रंदिवसाचा सर्व काळ अगदीं विभागून अमक्या वेळीं अमुक कार्य करावयाचें असे कडक नियम बांधून टाकिले होते. अनृत किंवा विफल भाषण तो कधींच करीत नसे. गर्वाचा त्याला लेशही विटाळ नव्हता; लोभानें त्याला स्पर्श सुद्धां केला नाहीं; क्रोधाचा तर त्यानें कधींच अंगीकार केला नाहीं. कौसल्येप्रमाणें शांतीला तो भजे; दशरथाज्ञेप्रमाणें धर्माज्ञा पाळी ; लक्ष्मणाप्रमाणें सर्वांवर प्रेम ठेवी; त्यानें कधीं श्रुतिस्मृतींचें उल्लंघन केलें नाहीं; त्याची बुद्धि व स्मरणशक्ति कांहीं विलक्षणच होती. कोणतें शास्त्र असो, कोणती कला असो, त्यांत ह्याला कठिण असें कांहींच लागेना! हा जसजसा वाढत होता तस तसा गुणगणहीत्याच्या बरोबर वाढत होता! हा नियमितपणानें व धर्मानें वागत असल्यामुळें ह्याची शरीरसंपत्ति सदा निरोगी असे. जसा हा गुणांनीं तसाच रूपानेंही अद्वितीय होता, त्याच्या विशाल भालानें, मनोहर मत्स्याकृति भव्य भृकुटींनीं, सरळ व तरतरित नाकाच्या योगानें, दीर्घवर्तुलाकार व पाणीदार कमलांप्रमाणें शोभणाऱ्या नयनांमुळें, चंद्रवत् सतेज व रमणीय गालांनीं, इंदीवरच काय अशा वदनानें, लालभडक ओष्ठांनीं, कमलसरोवराकडे धांवमारणाऱ्या भ्रमरपंक्तीप्रमाणें मिशीच्या कोरेनें, व निमुळत्या हनुवटीनें, रामभद्राचा जो कांहीं चेहेरा दिसत होता, त्याची विलक्षण सुंदरता, मनोहरता, मोहकता, व अनुपमता हीं दृष्टानें पाहिल्यावांचून दुसऱ्यानें सांगून कधींही कळावयाचीं नाहींत! तसेच त्याचे काळेभोर लांब केश हे एकीकडून व दुसरीकडून, जसे काय द्वारपाळच असे ते कर्ण त्याच्या मुखसौंदर्यसंपत्तीचें रक्षण करीत उभे आहेत, असें वाटे! ह्या सौंदर्यास अधिक भर घालणारे असेच

त्याचे इतर अवयवही होते. तो पुष्ट कंठ, विस्तीर्ण व भरलेली छाती, मांसल व दीर्घ बाहु, रुंद खांदे, ह्यांना शोभेल असेंच उदर, नेमस्त कंबर, पुष्ट मांड्या, तशाच करभांप्रमाणें दिसणाऱ्या गुडघ्या-खालील पायांच्या पोटऱ्या व तीं चिन्हांकित व सुंदर अंघ्रींनीं युक्त अशीं नेमस्त पावलें, ह्या सर्व शरीरावयवांनीं हा अत्यंत दर्शनीय पुरुष दिसे. त्यांत त्याचा बराच श्यामवर्ण होता; त्यावर पराक्रमसर्यांचें असहनीय तेज चकाकत असून इतर अनेक सद्गुणांचीही मिश्रित छटा त्याचे मुखकमलावर टवटवीत दिसत होती, त्यामुळें तर ह्या रामचंद्रा-ला पाहाणाराची दृष्टि भुलून जाई! त्याचें वयही ह्या वळेस तिशीच्या जवळ जवळ होतें. ह्याच्या गुणैश्वर्याला व रूपसंपत्तीला साजेल असा एकही मानव पुरुष उपमा द्यावयाला नव्हता, ह्मणून असें वाटे कीं त्या काळच्या लोकांच्या मोठ्या पुण्याईनें हा पृथ्वीवर, भरतभूमीवर, आयोध्या नगरींत, दशरथराजाच्या घरीं, वैकुन्ठवासी लक्ष्मीपति वि-ष्णूच अवतरला आहे काय! याप्रमाणेंच सीताही अत्यंत गुणवती व लोकोत्तर रूपवती होती. ती नुकतीच बाल्यावस्थेंतून तारुण्यावस्थेंत प्रवेश करीत असल्यामुळें तिचा प्रत्येक अवयव मनोहर दिसे. तिचा अंगवर्ण तप्त सुवर्णाप्रमाणें पिंवळा धमक होता. सुंदर स्त्रीचें वर्णन कसें करतां येणार! फार झालें तर तिच्या प्रत्येक अवयवाचें नांव घेऊन आपल्या मतें सुचलेल्या तशा सुंदर पदार्थांची उपमा द्यावयाची एवढेंच; अशानें वास्तविक त्या रूपाचें वर्णन न होतां, उलट त्यास न्यूनत्व आण-ण्यासारखें होतें. बरें, त्याविषयीं मौन धरल्यानेंही वर्णन होत नाहीं. तेव्हां कांहीं तरी सांगून तो स्त्रीपदार्थ उत्तम आहे, असें वर्णन करणाराला ह्मणावयाचें आहे, एवढेंच समजावें! असो; हिचें ललाट व चंद्राचा तुकडा ह्यांत कांहींच भेद वाटेना; किंचित् कुरळ व काळ्या तुळतुळीत केशांचा तिचा पाश, हा कोणातरी दुष्टाचे प्राण बद्ध करण्याकरितांच उत्पन्न झाला आहे असें वाटे! ते हरिणछाव्याप्रमाणें चंचल, व वि-स्तीर्ण काळे डोळे, जगांत सज्जनांना कोण त्रास देत आहेत हेंच पाहात आहेत, असें भासे! यौवनवसंतांतील मदनरूप कल्पलतेच्या मंजिऱ्याच काय, अशा तिच्या भृकुटि दिसत! तिचें तें नाक पाहतांच सर्व स्त्रियांचीं नाकें कांहीं तरी दिसत! रामरूपी भ्रमराला अधरमधूकरि-

तां मोह पडावा असेंच तिचें मुखारविंद होतें! तिच्या अधराच्या लाली-सारखा लाल रंग त्यावेळेस कोठें पाहण्यांत नव्हता! दंतांची तुलना निरुपायास्तव हिरकण्यांशीं केली पाहिजे! पतिव्रता स्त्रियांनींच मात्र आपलीं रूपें पहावीं, असे तिचे ते गालरूपी आरसे चकाकत होते! हनुवटीस तर उपमाच नाहीं! कर्णास मोत्यांच्या आभरणांचे भारसे भासत! कंठ बाहेरून काय वर्णावा! त्यांतून जो स्वर निघे तो खरोखर कोकिलेच्या आवाजाला लाजविणारा होता! ह्याप्रमाणें पायांच्या नखांपासून तों केशाग्रापर्यंत तिचा प्रत्येक अवयव फारच मनोहर असल्यामुळें असें वाटे कीं ब्रह्मदेवानें, आपणांस मानवसृष्टि तरी कितपत सुंदर कारितां येईल, हें एकदां पहावें, ह्या हेतूनेंच केवळ बनवलेली ही सौंदर्याची पुतळी होय! आणखी तिच्या ह्या चोवीस पंचवीस वर्षांचे वयांत तिचे गुण तरी किती सांगावे! ती कौसल्यादि तिघी सासवांस आपल्या मातेप्रमाणें मानून, त्यांची सेवा करण्यास तत्पर असे; त्यांच्याशींच काय, तर सर्वांशीं ती नम्रतेनें वागे; परलोकाची भीति मानून धर्म हाच आपला सखा आहे असें समजे; गर्व, लोभ इत्यादि दुष्टांचा तिला वारा सुद्धां नव्हता; तिचें हृदय अत्यंत कोमल होतें; कोणास कधीं ती कठोर शब्द बोलत नसे; सत्य, क्षमा, शांति, इत्यादिक सद्वस्तूनीं तिचें हृदयमंदिर पूर्ण भरलेलें होतें; तिचें पतीवर अतोनातच प्रेम होतें; तिच्या हृदयांत तो सारा वेळ असे; तिच्या नयनांसमोर दिसे, त्याचे भाषणामृताच्या वृष्टीची ती सतत इच्छा करी; भर्त्याचें मन प्रसन्न ठेवण्यासाठीं सदा उद्युक्त असे.

ह्याप्रमाणें ह्या अत्यंत रूपवती व गुणवती सीतेला आपल्या प्रिय कांतासह एकांतीं क्रीडार्थ सरयूनदीच्या तीरीं, मुख्य राजवाड्याहून बरेंच लांब, एक रमणीय उंच मंदिर बांधलेलें होतें. त्यांत हें दंपत्य राहत असे. त्याच्या सभोंवतीं एक उत्तम उपवन होतें. त्या राममंदिरांत प्रत्येक मजल्यावर अनेक लहान मोठे दिवाणखाने होते. त्यांतील भूमि अनेक रंगांच्या पाषाणांच्या होत्या. प्रत्येक दिवाणखान्यांत त्याचे लांबी रुंदी इतका एक मोठा सुरेख व बहुमोलाचा काश्मिरी गालिचा पसरलेला असून वर चित्रविचित्र, सुवर्णमय व पुनः पुनः पाहावेंसें वाटण्यासारखें मनोहर छत होतें! अनेक देशांतील

नानाविध मनोवेधक वस्तु त्या सर्व दिवाणखान्यांत व्यवस्थेनें मांडलेल्या होत्या. रघुवंशांतील पूर्वजांच्या, बहुधा कांहीं तरी शूरत्वाच्या कृत्यांत गुंतलेल्या अशा, सुबक तसबिरी होत्या. पुराणांतील अनेक मनोहारक प्रसंग व अनेक ध्यानस्थ बसलेले महर्षि तेथें हुबेहुब लिहिलेले होते. दशरथाच्या व त्याच्या स्त्रियांच्या लहान मोठ्या वयांच्या लहान मोठ्या प्रतिकृति तेथें ठेविलेल्या होत्या. सर्व जन्म खर्चून एकच काम करून तें राजांस दाखवून सधन झालेल्या अशा अनेक कुशल कारागिरांच्या हातच्या अनेक वस्तु त्या स्थळीं होत्या. रामाच्या बालपणीं अनेक देशांतून व लोकांकडून आलेले खेळ जशाचे तसे तेथें ठेविलेले होते. रामलक्ष्मण व भरतशत्रुघ्न यांच्याही सुंदर तसबिरा त्या रम्य स्थानीं होत्या. आंत बसण्याकरितां नानाप्रकारच्या बैठका, आसनें व मोठमोठे सुवर्णाचे व हस्तिदंती पलंग होते. कोठें कोठें कामोद्दीपक, कामातिशयानें वेड लागलेल्यांचीं व स्वयंवरविधीनें पुरुषांनीं स्त्रियांचे कर धरिले आहेत अशीं चित्रें होतीं. अनेकविध वाद्यें व अनेक विषयांवर नानाविध ग्रंथ होते. रामलक्ष्मणांस विश्वामित्र मखरक्षणार्थ मागत असतां दशरथाची खिन्न मुद्रा झाली आहे, वसिष्ठ त्यास उपदेश करीत असतां उजवा हात त्यांनीं वर उचलला आहे, मिथिलेंतील स्वयंवरमंडपांत रामचंद्रानें धनुष्य भंगिलें त्या वेळेस लोक कसे भ्याले, सीता रामचंद्रकंठांत माळ घालीत आहे, मार्गांत रामचंद्रानें परशुरामाचा गर्व हरण केला, इत्यादि अनेक प्रसंग कुशल चितार्‍यांनीं चित्रपटांवर जशाचे तसे लिहिलेले तेथें होते. अरण्यांतीलही मनोवेधक देखावे भिंतींवर काढलेले होते. अशा त्या रामहृदयाप्रमाणेंच सुंदर राममंदिरांत सीताकांत रामचंद्र सीतेसहवर्तमान कधीं क्रीडा करी, कधीं तिच्याशीं रसभरित भाषण करी, कधीं तिच्या भाषणामृतानें संतुष्ट होई, कधीं तिला अनेक देशांचे इतिहास ऐकवी, कधीं पुराण श्रवण करवी, कधीं तिच्याशीं बुद्धिवलासारखे खेळ खेळे, कधीं मंदिराच्या अति उंच सौधावर बसून तिला नगरींतील शोभा दाखवी, कधीं तेथें स्वच्छ चांदण्यांत बसून अंतरिक्षसंबंधी गोष्टी बोले, कधीं जन्मास येऊन मनुष्यानें काय करावें ह्याविषयीं तिच्या बरोबर भाषण करी, कधीं प्रजारक्षणाविषयीं, कधीं राक्षसांविषयीं, कधीं रानांतील ऋषींविषयीं,

तो तिला कथन करी. ह्याप्रमाणें तें दंपत्य रहात असतां, त्यांच्यामध्यें फारच प्रेम वाढलें. रामचंद्रास सीतेवांचून व सीतेस रामचंद्रावांचून क्षणभरही चैन पडूं नये, असें झालें! कितीही गुप्त गोष्ट असो, कांहींही विचार मनांत येवो, दररोज कांहींही घडो, तो तिला सर्व निवेदन करी. तिच्या अनुपम गुणांस व सौंदर्यास रामचंद्र अगदीं भुलून गेला. तरी तो दशरथपुत्र कामाधीन झाला नव्हता. सर्व कामें जेव्हांच्या तेव्हां करी. बहुतेक कार्यांत सीता त्याला साहाय्य करी. तोही सीतेची मसलत मोठ्या संतोषानें घेत असे. ह्याप्रमाणें हीं उभयतां अत्यानंदानें राहात असत.

दशरथ राजानें बहुतेक कारभार प्रधानांवरच टाकिला होता. रामचंद्र मोठा बुद्धिमान् व गुणवान् पाहून तर त्यानें राज्याकडे मुळींच पाहण्याचें सोडिलें. रामचंद्रच लक्ष्मणाचें साहाय्य घेऊन पुढें सर्व पाहूं लागला. तो प्रजेच्या सुखाकडे फारच लक्ष देई. त्यांच्याशीं बोलून त्यांचीं दुःखें समजून घेई. कोणावर अन्याय न होईल अशाविषयीं तो फार फार झटे. कोणतेंही काम कालावधीवर ठेवीत नसे. लोकांच्या अभ्युदयांतच कायतो आनंद आहे, असें त्यास वाटे. प्रजा अधिक धार्मिक होण्याविषयीं त्याची सदा खटपट असे. सज्जनांस कोणापासून दुःख होऊं नये ह्मणून तो अविश्रांत श्रम करी. रामचंद्राच्या अशा वर्तनानें प्रजाजनांस तो आपला कुटुंबांतील पालनकर्ताच आहे असें वाटूं लागलें. तो कोणालाही पाहिजे त्या वेळीं भेटे. ह्याला राज्याभिषेक कधीं होईलसें प्रजांना वाटत होतें. अशा पुत्राच्या योगानें दशरथासही आपण धन्य व कृतार्थ आहों असें वारंवार वाटे. कौसल्यादि सर्व मातांसही अत्यानंद होई. रामानें दिवसें दिवस सर्वांस आपल्या प्रेमबुद्धीनें वेड लावून टाकिलें. रामाशिवाय प्रेम करण्यास जगांत कांहींएक वस्तु नाहीं, असें जो तो ह्मणे. ह्याप्रमाणें रामानें लग्न झाल्यानंतर सीतेच्या सहवासानें व प्रजांचें हित साधण्यांत सुमारें बारा वर्षें काढिलीं.

रामचंद्राच्या विवाहास ज्येष्ठमासांत पुरीं बारा वर्षें होणार, त्याचे अगोदर एक दोन महिने ह्मणजे चैत्रारंभींच एके सायंकाळीं वृद्ध दशरथराजा आपल्या वाड्याच्या अत्युच्च सौधावर बसून इतस्ततः सर्व

नगरींतील चमत्कार पहात होता. तो ते पहात असतां त्याच्या हृदयांत नानाविध तरंग येऊं लागले. इतक्यांत ज्याच्यामुळें सर्व जगताचे व्यापार चालतात, असा जो भगवान् भास्कर त्याच्या निस्तेज करांकडे त्याची दृष्टि गेली, आणि तो अस्तास कसकसा गेला हा सर्व प्रकार त्यानें पाहिला. लगेच आपल्या गलित शरीराकडे पाहून व रामचंद्राचें रूप व गुणगण आठवून, व त्याच्यावरील प्रजाजनांचें अत्यंत प्रेम स्मरून त्याच्या मनांत आलें कीं, हा सर्व राज्यभार आतां रामचंद्राच्या शिरीं लौकर स्थापन करावा. इतक्यांत जवळ असलेल्या सुमंत्र प्रधानास तो ह्मणाला, “ मला माझ्या जीविताचा आतां क्षणभरही भरंवसा वाटेनासा झाला आहे ! हें केशरहित झालेलें माझें मस्तक राज्यभार वहाण्यास असमर्थ आहे ; ह्या मंद दृष्टीनें प्रजांचीं दुःखें मला कशीं दिसणार ? ह्या बधिर होऊं पहाणाऱ्या कर्णांनीं सज्जनांचे आशीर्वाद व त्यांचे उपदेश मला कसे ऐकूं येणार ? ह्या दंतरहित मुखानें सांगितलेल्या राजाज्ञा तुमच्या सारख्यांनीं कशा ऐकाव्या ? ह्या कांपणाऱ्या हातांनीं त्वरित धर्म किंवा दुष्टांचें हृदयविदारण कसें होणार ? तेव्हां मला असें झालें आहे कीं, अत्यंत लोकप्रिय, गुणनिधान व माझा प्राणच अशा रामचंद्रास कधीं एकदां राज्यासनीं पाहीन ! आणि भरतलक्ष्मण शत्रुघ्न हे ज्याला मनोभावानें साहाय्य करीत असून आपणही ज्याला नम्रतापूर्वक माझ्या वेळच्या व पूर्वजांच्या अनेक अनुभवाच्या व माहितीच्या गोष्टी सांगत आहां, व सर्व राजचिन्हांनीं युक्त असा रामभद्र सिंहासनीं बसलेला पाहून मी कधीं एकदां अरण्यांत स्त्रियांसहवर्तमान जाईन ! तेव्हां ह्याची आजच नगरींत विशेष परिस्फुटता न करितां जितकी त्वरा होईल तेवढी करून रामचंद्रास लौकर राज्याभिषेक करावा. जितका मुहूर्त त्वरित मिळेल तितका मला इष्ट आहे. हें मंगलकार्य करण्यास उद्यां जरी मला कोणीं सुदिन सांगितला तरि मी तयार आहें. त्या संबंधानें उत्सव करणें तो अगोदर अवकाश नसल्यास राज्याभिषेकानंतर करितां येईल. तेव्हां पहिलें काम हें कीं वसिष्ठाज्ञेनें मुहूर्त निश्चित करावा; व मुहूर्तास जसा अवकाश असेल त्याप्रमाणें कोणास त्या निमंत्रणपत्रिका बाहेर पाठवाव्या.” सुमंत्रानें हें सर्व ऐकून घेऊन त्या समयास

योग्य तेंच भाषण केलें व ' हा आपला मनोदय फारच उत्तम आहे; ' असें त्या वृद्ध राजास मोठ्या चातुर्यानें कळविलें !

त्याच रात्रीं स्वतः दशरथानें रामराज्याभिषेकाचा आपला गुप्त मानस वसिष्ठवामदेवादि महर्षींस कळवून, " अगदीं त्वरितचा सुमुहूर्त निवेदन करावा, " ह्मणून त्यांची प्रार्थना केली. तत्क्षणीं त्या युगीं चालणाऱ्या धर्मग्रंथांवरून व ज्योतिषशास्त्रास अनुकूल असा चैत्र शुद्ध नवमीस पुष्यनक्षत्रीं कर्कलग्नावर त्यांनीं मुहूर्त सांगितला. त्या वेळेपासून-च मुख्य प्रधान सुमंत्र व दुसरे अधिकारी तयारीस लागले. मध्यें सर्व पांच सहा दिवसच होते, तरी त्यांनीं मोठी धामधुम करून पुष्कळ अवकाश असल्यानें जेवढें काम झालें असतें तेवढें बहुतेक केलें ! भरतशत्रुघ्नांस समागमें घेऊन त्वरित येण्याकरितां भरताच्या मामास पत्र लिहिलें; परंतु ते त्या समयास येतील अशी आशा मुळींच नव्हती; कारण तेथें अति त्वरेनें गेलें असतांही निदान सात आठ दिवस तरी लागावयाचे! जनकालाही बोलावणें गेलें. अनेक राजांस पत्रें लिहिलीं. आपल्या अयोध्येच्या बाहेर सर्व राज्यांत ही वार्ता कळविली. परंतु कित्येक स्थळीं तर हें वर्तमान मुहूर्तानंतर पुष्कळ दिवसांनीं समजलें असेल! नवमीच्या अगो-दर एकदोन दिवसच कायतें हें वर्तमान सर्व अयोध्यानगरींत कळलें. तेव्हांपासून लोक उत्सवाच्या तयारीस लागले. आदल्या दिवशीं ह्म-णजे अष्टमीस प्रातःकाळीं पांच एक घटिका दिवसास राजवाड्यांतील दिवाणखान्यांत सर्व लोकांची मोठी सभा भरण्याचें ठरलें होतें. त्या-प्रमाणें आपल्या सामर्थ्यानुकूल व आवडीप्रमाणें पोषाक करून लोक नियमित वेळीं वाड्यांत येऊं लागले. ते इतके आले कीं, घटिका अर्ध घटिकेच्या आंत, सर्व राजवाडा भरून गेला ! आणि वाड्यासभोंवतीं व रस्त्यांत लोक उभे राहिले ! ही इतकी दाटी कशामुळें तर आपणांस जो आतां ममताळू, उदार, न्यायी, धर्मज्ञ, विद्वान् रामराजा मिळणार त्यावरील अत्यंत प्रीतिमुळें ! आणखी लोक आपआपल्या घरांतून नि-घत असून रस्त्यांत गर्दी करीतच होते. त्या भव्य, सुंदर, शृंगारले-ल्या व विस्तीर्ण स्थळीं पुढें पुढें लोक योग्यतेप्रमाणें बसले होते; परंतु फार दाटीमुळें मागें ह्मणण्यासारखी व्यवस्था राहिली नाहीं ! जिकडे तिकडे धामधूम होतें, तरी ज्याच्या त्याच्या हातांत अनेक प्रकारचे

पंखे, विंझणे वगैरे डोलत होते. व हें डोलणें रामाच्या अभिषेकार्थच लोकांकडून मिळालेलें अनुमोदन होय असें वाटे! त्या समाजाच्या मध्यभागीं पूर्वाभिमुख एक उंच सिंहासन होतें. त्याच्या जवळच वामदेवादिब्राह्मणमंडळ असून उजव्या अंगास कांहीं व डाव्या अंगास कांहीं असे प्रधान उभे होते. व आणखीही अनेक अधिकारी लोक होते. त्या सिंहासनापाशीं अनेक रमणीय वस्तु होत्या. सर्व लोक बसत आहेत तों, ज्याच्या बरोबर कांहीं बरोबरीचे राजे, संस्थानिक व सरदार आहेत, आणि ज्यानें वसिष्ठ महाराजांचा हात धरला असून सुमंत्रप्रधानाशीं बोलत आहे, असा दशरथराजा त्या सभास्थानीं आला. भालदारांचें अगोदर ललकारणें ऐकतांच सर्व लोक उभे राहिले होते. राजा सर्व लोकांचे प्रणिपात घेत घेत त्या सर्व मंडळीसह त्या सिंहासनाजवळ जाऊन वसिष्ठाज्ञेनें त्यावर बसला. आणि सर्व लोकही स्व स्थानीं बसले. क्षणैकानें तो पराक्रमी दशरथराजा मोठ्या गंभीर वाणीनें ह्मणाला. "अहो समस्तलोक हो, आज आपणांस ह्यास्थळीं बोलावण्याचें कारण एवढेंच कीं, मी आजपर्यंत बहुत कालपावेतों आपलें सर्वांचें बहुधा आमचे पूर्वज मन्वादिक ह्यांनी उपदेशिल्याप्रमाणें पालन केलें. आतां मी अत्यंत वृद्ध झालों आहें; ईश्वरकृपेनें आपल्या सर्वांच्या कल्याणपर इच्छेनें, व महत्पुण्यप्रभावानें मला चार पुत्र झाले असून ते माझ्या आज्ञेंत वागतात. ह्यांत रामचंद्र जो आहे तो सर्वांत ज्येष्ठ असून गुणांनींही श्रेष्ठ आहे. ह्याचा तुह्मांसही अनुभव असेलच. तुह्मी तो आपला पालनकर्ता कधीं होतो आहे ह्मणून वाट पाहत असालच! मनुष्यांमध्यें सर्वथैव दुर्लभ असे ह्याचे ठिकाणीं अनेक गुण दिसत आहेत! हा राजा झालयावर प्रजांस इतकें कांहीं सुख देईल कीं आजपर्यंत आमच्या पूर्वजांत कोणत्याही नृपतीनें असें दिलें नसेल!! ह्या रामभद्रास उदयिक दोनप्रहरीं राज्याभिषिक्त करून सर्व राज्यभार ह्याचे अधीन करावा व आपण वानप्रस्थाश्रमी होऊन कृतकृत्य व्हावें, असें माझ्या मनांत आलें आहे. तरी ही माझी इच्छा आपण सर्वांनीं पूर्ण केली पाहिजे. बिकट मार्गावरून हा राज्यरथ हांकण्यास मला जसें तुह्मीं साहाय्य केलेंत तसेंच किंबहुना ह्या नूतन राजास अधिक साहाय्य केलें पाहिजे. माझ्या राज्यांत माझ्या अज्ञानामुळें किंवा दुसऱ्या कांहीं

कारणांनीं तुह्मांस जें कांहीं न्यून वाटलें असेल तें आतां रामराज्यांत पूर्ण करून घ्यावें. सर्वप्रकारें माझ्या पुत्रावर प्रेम ठेवून ह्या राजाची कीर्ति भुवनत्रयीं पसरेल असें करा ! अधिक काय सांगावें ?" ह्याप्रमाणें तो बोलत असतां त्याचे नयन अश्रूंनीं भरले व पुढें त्यास एकही शब्द स्पष्ट बोलवेना ! राजमुखांतून ही अशी प्रेमवृष्टि होतांच चोहोंकडून आनंदाचा लोट आला ! नंतर कित्येकांनीं राजास विज्ञप्ति केली त्यांतील तात्पर्य कीं, "महाराजांनीं आजपर्यंत यथान्याय प्रजांचें पालन केलें व प्रजांवर अत्यंत प्रेम ठेविलें. आह्मांस महाराजांचा वियोग असह्य वाटेल, तर महाराजांनीं वनांत न जातां आमच्या रामराजास आपल्या अनुभवाचा सदा लाभ देत असावें. आमचा उद्यांपासून होणारा प्रभु रामचंद्र ह्याची अलौकिक बुद्धि, पराक्रम, दया, इत्यादि सर्व गुण कशाही प्रकारच्या मार्गावरून राज्यशकट चालविण्यास योग्य आहेत. राज्यशकटाखालीं गरीब प्रजा चिरडून जावी असा एकही दुर्गुण त्याचे अंगीं नाहीं. तो स्वतः अलौकिक पराक्रमी असून निष्कपट प्रेमानें वागणारे तिघे बंधु त्यास आणखी साहाय्य करणारे आहेत; तेव्हां राज्य सुयंत्र चालून सर्व लोक शांतिसमाधानांत राहून निश्चित होतील, ह्यांत संदेह नाहीं. ह्मणून महाराजांचा हा हेतु सर्वमान्य व प्रशंसनीय होय." अशा प्रकारचीं भाषणें चाललीं आहेत इतक्यांत कित्येक ह्मणाले कीं "ह्या प्रसंगीं ह्या स्थळीं तो रघुकुलतिलक रामचंद्र नाहीं हें कसेंकाय ?" तत्क्षणीं दशरथाज्ञेनें सुमंत्र प्रधानानें रामाच्या मंदिरीं जाऊन त्यास दशरथाज्ञा व प्रजांची इच्छा दर्शविली. लगेच तो सुमंत्रासह रथांतून त्या सभास्थानीं यावयास निघाला. लक्ष्मणही बरोबर होता. रामचंद्राचें दर्शन होतांच मार्गांतील चोहोंकडे जमलेल्या लोकांनीं एकसारखा जयघोष चालविला होता. इतक्या गर्दींतूनही ज्यांला ऐस पैस मार्ग मिळाला आहे असे ते दोघे बंधु पित्यापाशीं आले. व त्यास वंदन करून पित्याजवळच बसले. नंतर दशरथानें उठून रामचंद्रास हातीं धरून ह्मटलें, "वत्सा, रामभद्रा, तूं जरी सर्व गुणांनीं मंडित आहेस, तुला जरी सर्व कांहीं समजतें आहे, तरी मी तुझा पिता ह्या नात्यानें दोन शब्द ममतापूर्वक सांगत आहें. माझ्या पित्यानें माझ्या स्वाधीन केलेलें सर्व राज्य व मीं जें कांहीं न्यायनीतीनें संपादिलें आहे तें सर्व मी उदयिक

तुझ्या स्वाधीन करणार, अर्थात् त्यांतील प्रजांचें हिताहित आतां तुझ्या हातीं आलें. त्यांचें यथान्याय व ममतेनें पालन कर; दुष्टांना उपदेश करून सन्मार्गीं आणण्याचा यत्न कर, तशानेंही ते न ऐकतां इतरांस पीडा देऊन जगांत दुष्ट कृत्यें करतील तर त्यांस कडक शासन दिलेंच पाहिजे. चालत आलेलीं धार्मिक कृत्यें तशींच चालीव. तीं दिवसें दिवस अधिक होतील असें कर. लोकांचीं वेतनें, वर्षासनें हीं अपराधावांचून कधीं कमी करूं नको. लोकांस सत्कार्यीं उत्तेजन द्यावें. राज्यनीति निष्कपट असावी. पक्षपात, लोभ, इत्यादिकांस राज्यांतून घालवून टाक. सर्व अधिकारी पापभीरु व स्वकार्यीं दक्ष असे असावेत. राज्यवैभवांत मग्न होऊन अंध किंवा बधिर होऊं नकोस. सर्वांचें काय ह्मणणें आहे तें संपूर्ण ऐकून घे. क्षुल्लक गोष्टींकडे कधीं मन घालूं नको. शरणागतांस अभय दे. दुष्काळासारख्या भयंकर प्रसंगीं प्रजेचें रक्षण अधिक काळजीनें कर. जो राजा आपलीं इंद्रियें जिंकील तो कसल्याही बळकट शत्रूस जिंकील हें नीट ध्यानांत ठेव. राजाचें मन उदार असावें; त्यानें विचारानें वागावें. ह्या क्षणीं ज्यावर कृपा त्याचीच दुसऱ्या क्षणीं धिंड काढायाला सांगणें, असले चंचलबुद्धीचे राजे केव्हांच नाश पावतात. त्याचे मित्र तेच पक्के शत्रु बनून त्याचे शत्रूंस मिळतात! आपल्या बंधूंवर असेंच प्रेम ठेवून त्यांस मोठ मोठीं कामें सांग बरें. सर्व लोक उद्योगी, धार्मिक, परलोकींची भीति बाळगणारे होतील असें कर. नीतीला अनुसरून, स्वकार्यीं दक्ष राहून, धर्मानें वागून, राजास योग्य ते सर्व उपभोग घे. सज्जनांशीं नम्र राहून त्यांपासून आशीर्वाद ग्रहण कर. तुझी अर्धांगी सीता ही तुझ्या प्रमाणेंच गुणवती आहे. ती तुला सर्व कार्यांत साहाय्य करील. तुला सत्कार्यीं उत्तेजन देईल. मी यथाशक्ति व यथाबुद्धि विद्या शिकलों, विद्वानांशीं समागम केला, त्यांच्याशीं अनेक गूढ विषयांवर संभाषणें केलीं, प्रजापालन केलें, युद्धें केलीं, अन्नसंतर्पण केलें, दानधर्म केला, चिरकाल राज्य करून नानाविध उपभोग भोगिले, यज्ञयागादि करून पंचऋणांतून मुक्त झालों. कोणासही प्राप्त झालें नाहीं, असें पुत्रसुखही अलिकडे भोगिलें, व भोगीत आहें. विश्वामित्रऋषींच्या यज्ञसंरक्षणानें व शिवधनुष्यभंगानें जी तुझी कीर्ति झाली, तेणेंकरून तर मला जी जगांत धन्यता वाटत आहे, तशी पूर्वी

कधींच वाटली नव्हती. मांडलिकांशीं प्रेमानें वाग. त्यांचा अपमान करूं नको. त्यांनीं संग्रहीं ठेविलेल्या द्रव्यावर वक्रदृष्टि ठेवून, तें आपल्यास कधीं प्राप्त होतें आहे असें मनांत आणूं नको. इतर राजांशींही मित्रभावाचें वर्तन ठेव. प्रधानादिकांपासून तों अगदीं लहान अधिकाऱ्यापर्यंत सर्व आपलया कार्यांत निरलस रहातील असें तुझें लक्ष्य असूं दे. त्यांस संतुष्ट ठेवण्याविषयीं झट. सर्वांस नियमित वेळीं वेतन द्यावें. राजाचें सर्व बळ सैन्य होय, ह्मणून तें सर्वदा हुशार राहील असें करावें. राज्यांत दुष्ट व्यसनें नाहींशीं केलीं असतां सर्वत्र शांतता राहून लोक सुखी होतात. भांडारगृह समृद्ध असावें. स्वराज्यांत किंवा परराज्यांत काय चाललें आहे, हें राजास अवश्य कळलें पाहिजे. तूं होऊन परराज्याचा अभिलाष करूं नको. आपल्या हस्तगत झाल्यावर मग तें सुयंत्र चालीव. आपलें राज्य फार मोठें असून लांब लांब आहे; सर्व सिंधु देश, काशीप्रान्त, सौवीर, कोशल, सौराष्ट्र, द्रविड, दक्षिणपथ, अंग, मत्स्य, मगध, हे सर्व लहान मोठे प्रदेश माझ्या अधिकाराखालीं आहेत. विस्तृत राज्य चालविणें मोठें कठिण आहे. आपण कितीही लोकहितार्थ झटलों तरी सर्वच लोकांच्या आपण स्तुतीस पात्र होऊं असें नाहीं. कितीही न्यायानें वागलें तरी तें सर्वांसच पसंत पडेल असें नाहीं. एक गोष्ट सर्वांस कधीं आवडावयाची नाहीं. हें राज्य कसें चालवावें, ह्याविषयीं नियम कधीं सांगतां यावयाचे नाहींत. सर्वदा आपलें शहाणपण व चातुर्य खर्चिलें पाहिजे. पुनः मी सांगतों कीं, तुझ्यासारख्याला अमुक अमुक कर, असा असा वाग, किंवा अमुक टाकावें, अमुक धरावें, हें सांगणें व्यर्थ आहे. तुझा वर्तनक्रम हाच पुढील नीतीनें वागूं इच्छिणाऱ्या राजांस राजनीतीचा ग्रंथ होईल, ह्यांत संदेह नाहीं." रामचंद्र ह्यावर फार कांहीं न बोलतां, "ह्याप्रमाणें शुद्धाचरणानें वागण्याची बुद्धि होण्यास मला महाराजांचाच आशीर्वाद पाहिजे," इतकेंच हात जोडून ह्मणाला. दशरथानें व वसिष्ठादि ऋषींनीं त्यास आशीर्वाद देऊन सभाविसर्जन केलें. त्यासमयीं रामचंद्राच्या जयजयकार शब्दांनीं तें स्थळ दुमदुमून गेलें! नंतर राम लक्ष्मण हे देवतार्चनांत गुंतलेल्या कौसल्येच्या दर्शनास गेले. त्या स्थळीं सुमित्रा व सीता होत्या. तेथें रामानें नुकतेंच सभास्थानीं घडलेलें

सविस्तर वृत्त आपल्या मातेस सांगितलें. तें ऐकून सर्वांस आनंद झाला.

दशरथाच्या तीन स्त्रियांतील कैकेयी ह्मणून जी दुसरी स्त्री होती, ती सर्वांत सुंदर होती. तिचें अंतःकरणही फार कोमल होतें; ती सरळ स्वभावाची होती; हिजवर राजाची अप्रतिमच प्रीति असे; हिला लग्नसमयीं माहेराहून ज्या कांहीं दासी मिळाल्या होत्या, त्यांत एक मंथरा ह्मणून होती. ती अगदीं कुरूपांतील कुरूप होती! त्या कुरूपाला शोभेल असाच तिचा अंगवर्ण कोळशासारखा काळा असून अधर फारच जाड होता! नाक चपटें व कपाळ लहान असून तें सर्व केसांनीं भरलेलें होतें! ही जशी बाहेरून कुरूप तशीच आंतून फार दुष्ट होती. तिच्या पाठीवर एक मोठें कुबड होतें, तें तिनें पूर्व जन्मीं संचित केलेल्या दुर्गुणादिकांचें गाठोडेंच काय ह्या जन्मीं बरोबर आणिलें आहे असें वाटे! अशी होती तरी ती आपल्या स्वामिनीच्या हितावि‌षयीं मोठी दक्ष असे! तिच्या कल्याणार्थ पाहिजेल तें करण्यास ती मागें पुढें पाहणारी नव्हती! अभिषेकाच्या पूर्व दिवसापर्यंत राजवाड्यांत अभिषेकाची लेशही वार्ता कळली नव्हती! राजवाड्यांत तो लोकसमाज पाहतांच हा कशासाठीं आहे, वगैरे तिनें चौकशी करून कैकेयीच्या मंदिराकडे धांव मारिली! व क्रोधानें फणफणून ह्मणाली, "बाईसाहेब, आपण आतां येथें स्वस्थ कां? त्या रामाला राज्याभिषेक होणारना?"

**कैकेयी**—केव्हां? केव्हां?

**मंथरा**—केव्हां, केव्हां काय विचारितां? उद्यां, उद्यां!

**कैकेयी**—वा! फारच आज चांगलें वृत्त ऐकिविलेंस. तूं मजवर रागानें फणफणलेली दिसतेस हेंही आतां योग्यच आहे; कारण माझ्या रामासारख्या सुशील व अजातशत्रु पुत्राला उद्यां राज्याभिषेक व्हावयाचा असतां मी तत्संबंधीं कांहीं वर्तमान जाणलें नसून येथें स्वस्थ बसतें! त्याच्याविषयीं तयारी करण्यास मला आनंदानें झटलें पाहिजे, हें अगदीं साहजिक असून मी येथें रिकामी बसलें आहे! परंतु, मंथरे, हें वर्तमान मला तुझ्या मुखानें आतां कळतें आहे एवढेंच. मला वाटतें कीं हा त्यांचा बेत लुकताच झाला असेल. झटलें असतां त्याचें लग्न होतांच त्याला हा अधिकार दिला पाहिजे होता. त्याची

आठवण झाली ह्मणजे त्याची मूर्ति डोळ्यांपुढें उभी राहते, व त्याचे गुण गावेसे वाटतात! रामासारखा बंधु काय, पुत्र काय, मित्र काय, राजा काय, फार काय सांगूं, शत्रूसुद्धां मिळणार नाहीं! सीता तरी कशी स्त्रीरूपानें रामच अवतरली आहे! मला वाटतें हा राज्याभिषेकाचा बेत ठरतांच माझ्या प्रिय भरतास व शत्रुघ्नास आणण्याकरितां मनुष्य गेले असतील. रामचंद्रासारखा नीतिमान् राजा, व त्याला साहाय्यकर्ते तिघे गुणवान् बंधु, तेव्हां ह्या राज्यांत सर्वांस सुख होईल हें सांगावयास नकोच. त्यांस सांगण्याचें माझ्या कितीदां पण पूर्वीं मनांत आलें होतें कीं, "आतां रामावर राज्यभार टाकून आपण आह्मांसह वनाचा स्वीकार करावा." अग प्रियकरणी मंथरे, ह्या आनंदांत अगदीं निमग्न होऊन गेल्यामुळें, तुला तत्क्षणीं बक्षीस देण्यास मी विसरलें! ह्या प्रियवार्त्तेबद्दल हें माझ्या उजव्या हातांतील बहु मोलाचें प्रिय कंकण तुला देतें. चला आतां आपण तिकडे जाऊं.

**मंथरा**—मला नको बक्षीस, मी काय बक्षिसाच्या आशेनें बाईसाहेबांच्या चरणांपाशीं धांवत आलें! आज आपण सर्वस्वी बुडालां! महाराजांचें तुह्मांवर प्रेम मुळींच नाहीं व तुमच्या पुत्रास तर ते शत्रु समजतात! आपण भोळी पार्वती आहां. महाराजांचें कपट आपल्यास कुठें समजतें आहे! आपल्यावर जर त्यांची प्रीति असती तर हें राज्य भरतास मिळालें नसतें काय? आपला मुलगा त्यांना डोळ्यांसमोर सुद्धां नको, ह्मणून त्यास आज बारा वर्षें आजोळीं ठेविला आहे! तो पराक्रमी पुत्र कदाचित् राज्याभिषेकांत विघ्न आणील ह्मणून त्यास आणिलें सुद्धां नाहीं! अहो, महाराज निष्कपटी असते, तर त्यांनीं हीं राज्याभिषेकासारखी महोत्सवाची वार्ता तुह्मांस अजून कळविली नसती काय? नगरांतील लोकांसही जी बातमी कळून दोन चार दिवस झाले, ती आह्मांस ह्या क्षणापर्यंत कळली नाहीं! ह्यांतलें इंगित काय बरें? ह्यावरून काय ह्मणावयाचें? महाराज फार भोळे, विसराळू आहेत, कीं कपटी आहेत? रामास राज्याभिषेक झाला ह्मणजे ती कौसल्याबाई बाईसाहेबांस निर्माल्याप्रमाणें मानील. राजमातेला कायतो मान! मग आपल्याला कोण पुसणार? आपला स्वभाव बाई फारच भोळा!

कैकेयी—मंथरे, अग पिशाचग्रस्तासारखी होऊन असें काय हें आज भलभलतेंच बरळूं लागली आहेस! रामचंद्र हा वडीलच आहे. त्यालाच राज्याधिकार मिळाला पाहिजे. भरत वडील असता तर त्याला नाहीं का राज्याभिषेक झाला असता? भरत वडील असून तुझ्यासारख्या कोणी वेडीनें जर कौसल्याबाईस असा विपरीत मंत्रोपदेश केला असता कीं— रामासच राज्याभिषेक झाला पाहिजे, व तो रामास होत नाहीं ह्मणून महाराज हे कपटी व खोटें प्रेम दाखविणारे आहेत! तर मग आह्मांस काय बरें वाटलें असतें? भरत काय एकटाच मामाच्या घरीं गेला आहे? शत्रुघ्न नाहीं काय त्याच्या बरोबर? त्याला नेण्याकरितां माझा बंधु युधाजित् मुद्दाम आला होता. भरताला तिकडे ते पाठवीत नव्हते, परंतु मींच पाठविण्याविषयीं त्यांस प्रार्थिलें होतें. हें तुला ठाऊक नाहीं काय? इतक्या काळांतही त्यांनीं पुष्कळदां त्यांस बोलाविणें पाठविलें. परंतु त्या मुलांवर माझ्या बंधूचें फारच प्रेम जडलें आहे त्यामुळें, व इकडेही कांहीं त्यांचें विशेष काम नव्हतें, ह्या कारणास्तव ते आले नाहींत. त्यांस आतां बोलाविलें असेलच. भरत रामराज्याभिषेकास विघ्न आणील अशी शंका घेणें ह्मणजे सूर्योदयानें कमलसमुदाय संकुचित होतो, ह्मणण्यासारखें आहे! पुढें मुहूर्त चांगला नसेल, व त्यांच्या मनांत हें मंगलकार्य लौकर आटपलें पाहिजे असें आलें असेल, ह्मणून त्यांनीं इतकी घाई केली असेल. तुझ्या मनांत जर त्यांना दोषच द्यावयाचा असला तर त्यांना उतावीळ ह्मण. परंतु भलतेंच विचार मनांत आणून माझ्याही मनांत भलतेंच भरवूं पहातेस ह्याचें नांव काय? रामास अभिषेक होणें हेंच योग्य आहे. रामचंद्राच्या वामांगीं सीता असून त्यांवर मोठमोठे ऋषि मंत्रोक्त उदक सिंचन करीत असतां तें डोळ्यांत गेल्यामुळें तीं वारंवार आपलीं मुखकमलें फिरवीत आहेत, अशा त्या दंपत्यास मी कधीं पाहीन असें मला झालें आहे! सर्वांत राम जरी लहान असता तरी तो आपल्या गुणांनींच राज्यपदास योग्य होता. मग तो गुणवान् व सर्वांत श्रेष्ठ आहे, तेव्हां त्यालाच राज्याभिषेक झाला पाहिजे, हें काय सांगावें? तूं अगदीं मूर्ख आहेस, कांहीं तरी बरळतेस. तुला आपलें एक ठाऊक, आपल्या धनिनीचें हित पहावयाचें; मग न्याय अन्याय तुला कांहींएक दिसत नाहीं.

ह्याप्रमाणें ह्या उभयतांमध्यें त्या मंदिररूप रणांगणीं बराच वेळ निकाराचें व अवर्णनीय असें वाग्युद्ध झालें. त्यामध्यें त्या मंथरेनें एकसारखें जें कांहीं तीक्ष्ण व मोहक शब्दबाणजाल सोडलें, त्यापुढें त्या कैकेयीचें कांहींच चाललें नाहीं ! ती अगदीं तिला वश झाली. ह्या घोर द्वंद्वयुद्धांत राणी सर्वस्वी पराभूत होऊन मंथरेच्या ह्मणण्याप्रमाणें तिला तिच्याशीं संधि करावा लागला ! त्यांतील मुख्य व महत्त्वाचें कलम कीं, "आज रात्रीं आपण फार रागावून क्रोधागारामध्यें जाऊन भूमीवर तडफडत लोळत असावें; सर्व दागिने चोहोंकडे फेंकून द्यावे; जवळ कोणास उभें राहूं देऊं नये; तोंड एकसारखें चाललेलें असावें; महाराज आपला शोध करीत आले कीं अगदीं मौन धरून, दीर्घ उष्ण श्वासोच्छ्वास वरचेवर सोडावे. महाराजांच्या कांहीं तरी घोर कृत्यानें आपणांस राग आला आहे, असें त्यांस दर्शवावें. रागाचें कारण ते विचारावयास लागले कीं, पुष्कळच आढेवेढे घेऊन, आपल्या हातून कांहीं व्हावयाचें नाहीं, वगैरे बोलावें. महाराज अगदीं वश झाले ह्मणजे " तूं जें सांगशील तें मी करीन, " असें महाराजांपासून त्रिवार वचन घ्यावें. वचन मिळतांच अगोदर गोडगोड बोलून युक्तीनें असें ह्मणा कीं त्या रामाला उद्यांपासून चौदा वर्षें वनांत पाठवून, भरत येतांच त्यास ह्याच साहित्यानें राज्याभिषेक करा. " आणखी ती मंथरादासी ह्मणाली, " बाईसाहेब, मागें एका भयंकर युद्धांत आपण महाराजांस साहाय्य केलें आहां, तत्प्रसंगीं त्यांनींच प्रसन्न होऊन बाईसाहेबांस दोन वर माग ह्मटलें होतें, परंतु ' पुढें कधीं मागेन, ' असें त्यासमयीं आपण बोलला होतां ना ? तर त्या दोन वरांबद्दल, रामाला वनवास, व भरताला राज्यलाभ, हीं लहानशीं दोन मागणीं मागावीं. ही गुह्य गोष्ट अगदीं कोणास सांगूं नका बरें !" ह्या तिच्या बोलण्याला कैकेयीनें मान तुकाविली व तसें करण्याचें तिनें मंथरेला वचन दिलें !

श्रोतेहो, मनुष्यस्वभाव पाहिलातना कसा आहे तो ! जी कैकेयी दोन घटिकांपूर्वीं न्याय अन्याय जाणणारी होती, ती आतां कठोर अन्तःकरणाची होऊन मनुष्याचे अंगावर रोमांच उभे रहावेत असें भयंकर कृत्य करण्यास तयार झाली ! कोमल हृदयावर उपदेशाचा,

विशेषतः दुष्ट उपदेशाचा, ठसा लौकर उमटतो. तेव्हां सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं, मनुष्यास दुष्ट संगतीपासून जेवढें अलिप्त राहवेल तेवढें राहण्याचा त्यानें यत्न करावा. अथवा कोणा मनुष्याची कशा कारणानें, केव्हां व कशी बुद्धि फिरेल हें कांहीं सांगतां यावयाचें नाहीं, हेंच खरें.

असा त्यांचा ठराव झाल्यावर तीं रात्रीची वाट पहात बसलीं. त्यांना त्या दिवशीं कांहींच सुचलें नाहीं. कैकेयी तर नाटकांतील पात्राप्रमाणें आज रात्रीं महाराजांपासून आपला कार्यभाग साधण्याकरितां काय काय बोलावें, काय करावें, ह्या विचारांत होती. नंतर प्रदोपकाळ आला. तेव्हां वसिष्ठमहर्षीनीं राममंदिरीं जाऊन रामास राज्याभिषेक असल्यामुळें त्यास व सीतेस त्या प्रदोपकाळापासून उपोषित राहण्यास सांगितलें. पुढें रात्र झाली. स्वच्छ चांदणें पडलें. चोहोंकडे नगर शृंगारण्यांत लोक गुंतले असल्यामुळें सर्वत्र गडबड चालली होती. दशरथ राजाही ह्या मंगलकार्याच्या खटपटींत असल्यामुळें नित्यापेक्षां त्याला निजावयास जावयास बराच उशीर झाला. तो कैकेयीच्या मंदिरांत मोठ्या आनंदानें गेला, तों ती त्या रम्य स्थळीं नव्हती! ह्या उत्सवार्थ ती कोठें गुंतली असेल असें त्याला प्रथमतः वाटलें, परंतु शोधांतीं त्याला ती क्रोधागारीं आहे असें कळलें! तत्क्षणीं तो तेथें गेला. तेथें कैकयीच्या अंतःकरणांतील तमामुळेंच काय चोहोंकडे दाट काळोख होता! प्रकाश आणतांच तेथें संतप्त होऊन फूत्कार करणारी नागीणच तळमळत पडली आहे असा भ्रम झाला! राजाला तिला पाहून वाईट वाटलें; ह्या अवस्थेचें कारण विचारण्यासाठीं त्यानें तिजपाशीं पुष्कळ भाषण केलें, त्यांत "मजकडून कांहीं अपराध झाला आहे काय? मी रामास उदयिक राज्याभिषेक करणार आहें, तत्संबंधानें ह्या क्षणापर्यंत तुजशीं कांहीं बोललों नाहीं ह्यामुळें काय तुला राग आला?" अशासारखेही अनेक प्रश्न त्यानें केले. परंतु ती कांहींच बोलली नाहीं. जवळ कोणी चाकर मनुष्यही नव्हतें. "अग, तुझ्या दुःखनिरसनार्थ मी पाहिजेल तें करीन; तेव्हां बोल काय तुला कोणीं केलें तें?" असें दशरथ बोलतांच, तिनें मंथरेच्या उपदेशाप्रमाणें राजाचें अगोदर वचन घेऊन, त्या किल्लीनें आपलें मुख-

कपाट उघडून दुष्ट अंतःकरण त्याच्या पुढें निर्लज्जपणें उघडें केलें! तत्क्षणीं आपल्या काळजाला हजारों कृष्ण सर्प डसत आहेत, किंवा प्रज्वलित निखाऱ्यांची आपणांवर वृष्टि होत आहे, असें त्याला झालें! लगेच तो बेशुद्ध झाल्यासारखा होऊन भूमातेवर धाडकन् पडला! क्षणैकानें उठून दाणदाण हात पाय आपटूं लागला, कपाळ फोडून घेऊं लागला, व संतापानें लाल होऊन दांत करारा चावून तोंडानें "हा दुष्टे, पापिणी, कठोरहृदये! काय हें हा वत्सा रामा! अहो वसिष्ठ महाराज, हें काळ तोंड आतां जगास मी कसें दाखवूं? हा सीते, तुला काय वाटेल! माझा मित्र जनक काय ह्मणेल! आतां जीवंत राहून मी काय करूं! अरे कोण जवळ आहे? आणा तें खड्ग, मी आपला कंठ चिरून ह्या दुष्टेला रक्तस्नान घालतों! ह्या क्षणापर्यंत रणांगणीं मी अद्यापि पराभव कसा तो पावलों नाहीं, पण ह्या एकांतस्थळीं हिनें मला कपटानें जिंकिलें! चांडाळे, वचनानें मला अगोदर बांधून टाकून मला ठार मारण्याकरितां हें जालिम विष माझ्या घशांत ओतलेंस काय! दुष्टे, तुझी माता तुझ्यासारखीच दुष्ट होती, ती आपल्या नवऱ्यास ठार मारण्यास उद्युक्त झाली होती, पण त्या शहाण्या अश्वपति राजानें तिला घरांतून काढून लावून तो सुखी झाला. तेंच करणें त्या आतां मला बरें वाटतें. ह्या साठींच काय, कृतघ्ने, ते दोन वर राखून ठेविले होतेस? तेव्हांपासूनच काय हा तुझा दुष्ट बेत होता! अग, तेव्हां माझा राम झाला सुद्धां नव्हता! आजपर्यंत तूं माझ्याशीं अशी कपटानेंच काय वागलीस? आजपर्यंत मला तूं कसें कसें फसाविलें असशील हें तुलाच ठाऊक! हें कपट अगदीं उघड उघड झालें ह्मणून मला समजलें! दुष्टे, पापिणि, मीं तुला वचन दिलें नाहीं. मी रामाला उद्यां अभिषेक करणार; मग कांहीं होवो. कपट्याला वचन कोणी देतें काय? ते शिक्षेसच पात्र असतात! हाय हाय! हिनें आज माझा सर्वस्वी घात केला! आजच मी मेलों असें समजतों; आतां मी काय करूं? काय हिचा कंठनाळ कापूं, कीं हिच्यापुढें आपला कपाळमोक्ष करून घेऊं" ह्याप्रमाणें त्यानें अनेक उद्गार काढिले. तिचें मन वळून तिनें हा दुष्ट आग्रह सोडावा ह्मणून त्या राजाधिराजानें कैकेयीची पुष्कळ विनवणी केली, आपली फजिती व तिची अपकीर्ति कशी होईल, हें बहुत वेळ तिला

समजावून सांगितलें; तिला ह्याशिवाय पाहिजे तें माग ह्मणून कळविलें. " अगे, माझ्या अत्यंत प्रियकर सुशील रामचंद्रामध्यें तूं काय दुर्गुण पाहिलास ? त्यानें तुझें असें काय वाईट केलें कीं ज्यामुळें त्याला एवढी कडक शिक्षा योजून मला ठार मारीत आहेस व आज रघुकुलाचा विध्वंस करूं पहात आहेस ! ह्या दुष्ट कृत्यानें सर्व लोक तुला निंदितील शिव्या देतील आणि पुढें यावच्चंद्रदिवाकर कर्कश व दुष्ट स्त्रियेस तुझें नाम देतील, ह्याची कांहीं लज्जा धर. " वगैरे त्यानें बोलण्याचें कमी केलें नाहीं. परंतु तिनें तोंड सोडून इतकें कांहीं उग्र रूप दाखविलें कीं, तेणेंकरून त्यास गप्पच बसावें लागलें ! तिची ती भयंकर व अपूर्वदृष्ट मुद्रा पाहून तिला ही दुष्ट बुद्धि कोणीं शिकविली व कलियुगांतही असंभवनीय गोष्ट ती हिला इतकी प्रिय कशी वाटली, ह्याचें त्याला पुनःपुनः मोठें आश्चर्य वाटलें. तो वारंवार क्रोधाग्नीनें प्रज्वलित होई, त्याबरोबर तिला जाळूनच टाकितो कीं काय असें वाटे. ह्याप्रमाणें दशरथ राजानें दुःखानें कण्हून कण्हून ती रात्र घालविली !

काळाच्या नियमाप्रमाणें दुसऱ्या दिवशीं चैत्रशुद्ध नवमी येऊन प्रातःसमय आला. सर्वत्र अयोध्यापुरी आनंदमय दिसूं लागली! चित्रविचित्र हजारों ध्वज, पताका, तोरणें, पल्लव, पुष्पमाला, रंगवल्लि, इत्यादिकें करून; नवीन पोशाक व अलंकार घालून चोहोंकडे फिरणाऱ्या लोकांचे योगानें; सैन्यांतील अनेक प्रकारचे लोक सर्व रस्त्यांतून मोठ्या डौलानें फिरत असल्यामुळें; रथ, घोडे, हत्ती, वगैरे वाहनांच्या गर्दीनें; नानाविध वाजणाऱ्या वाद्यांच्या योगानें व मोठमोठीं प्रसिद्ध स्थळें फारच शृंगारलेलीं होतीं ह्मणून तें सर्व नगर अगदीं फुलून गेलेलें दिसत होतें. मुख्य राजवाडा व मुख्यतः ज्या ठिकाणीं हा मंगलविधि व्हावयाचा होता तो भाग तर फारच सुशोभित केलेला होता. दोन घटिका दिवस आला न आला तों वसिष्ठवामदेवादि ब्राह्मण त्या स्थळीं आले. प्रधानादि सर्व मुख्य अधिकारीही तेथें होते. राजेरजवाडेही आपआपल्या इतमामांसह थाटानें येत होते. मोठमोठे सरदार मानकरी ह्यांनीं आपल्या आगमनानें तें विस्तीर्ण स्थान विराजित केलें. दुसरे हजारों लोक आले होते व येत होते.

अभिषेकास लागणारें नानाप्रकारचें साहित्य तेथें व्यवस्थेनें ठेविलें होतें. सर्वप्रकारें रामराज्याभिषेकाची तयारी झाली असून उशीरही बराच झाला व अद्यापि दशरथ महाराज कसे कोठें दिसत नाहींत, ह्मणून लोकांस मोठें आश्चर्य वाटलें व कित्येक लोकांच्या मनांत कुकल्पनाही आल्या ! नंतर वसिष्ठाज्ञेनें सुमंत्रप्रधान त्यांस पाहण्याकारितां गेला. शोध करीत करीत तो त्या क्रोधागारीं गेला. तेथें बिछान्यावर तळमळत असलेल्या राजाला पाहून तो एकदम दचकला व अनेक कल्पनातरंग त्याच्या मनांत घोळूं लागले ! राजाला त्यानें प्रथमतः बाहेर सर्व सिद्धता झाली, सर्व लोक आपली वाट पहात बसले आहेत, असें हात जोडून सांगून नंतर मोठ्या विनयानें अशा दुःखावस्थेचें कारण काय ह्मणून अनेक प्रकारें विचारिलें; परंतु तो वृद्धराजा एकही शब्द बोलला नाहीं ! वारंवार दीर्घ उष्ण श्वास सोडून आपणांस असह्य दुःख झालें आहे, एवढें मात्र सूचित करी ! शेवटीं निर्लज्जपणें ती कैकेयी मोठ्यानें ह्मणाली, "रामास आज राज्याभिषेक असल्यामुळें त्यांस झालेल्या आनंदानें महाराजांस जागरण झालें आहे ! त्यामुळें त्यांना उठावयास उशीर झाला ! हे ह्यासमयीं रामास पाहण्याविषयीं फार उत्सुक झाले आहेत, तर त्यास ह्या स्थळीं आणावें." राजाकडूनही रुकार मिळतांच तो प्रधान रामाच्या विलासमंदिरीं गेला. तें मुळचेंच सुंदर मंदिर असून त्या दिवशीं आणखी विशेषरीतीनें शृंगारलेलें होतें, त्यामुळें तर फारच रमणीय दिसत होतें. नानाप्रकारचीं सुंदर चित्रें, बैठकी, व ज्याला पाहतांच हस्तानें स्पर्श करून दृढालिंगन द्यावें असें वाटण्यासारखे दगडांचे उंच वर्तुलाकार व भव्य खांब ज्यांत आहेत, असे कित्येक महाल ओलांडून जातां जातां जेथें रामचंद्र सीतेसह बसला होता त्या ऐनेमहालांत त्यास प्रतिहारींनीं आणिलें. तेथें शुभ्र वेषधारी, ह्मातारे कंचुकी हातांतील लांब सुवर्णयष्टयांवर भार देऊन द्वारांत उभे होते. ते मंददृष्टि असल्यामुळें त्या प्रधानाकडे डोळ्यांवर हात धरून न्याहाळून पाहूं लागले. त्यांनीं त्यास प्रणाम करून आंत जाण्याविषयीं विनंती केली. तो आंत जतांच रामचंद्र सीतेसह एका पर्यंकावर बसून तिच्याशीं कांहीं भाषण करीत होता, तें तितकेंच

ठेवून त्यानें झडदिशीं पुढें येऊन प्रधानास मोठ्या विनयानें प्रणाम केला, व ह्याचा हात धरून त्यास त्याच पर्यंकावर बसविलें, आणि आपण जवळ उभा राहिला. सीता तेथून जरा दूर गेली. सर्वकाळ पहात रहावें असें तें सीतारामांचें दंपत्य पाहून त्या वृद्ध प्रधानास फारच समाधान वाटून त्याच्या नेत्रांवाटे प्रेमाश्रु वाहूं लागले. अगोदरच त्यांचें मनोहर रूप, तशांत त्या दिवशीं त्यांस राज्याभिषेक व्हावयाचा ह्मणून त्यांनीं सुंदर पोषाक केला होता, त्यामुळें तर सुमंत्रप्रधानाच्यानें त्यांच्यावरून दृष्टीच काढवेना! त्यानें रामास कुशल प्रश्न करून दशरथ महाराजांचा निरोप सांगितला. लगेच रामभद्र रथांतून त्या प्रधानाबरोबर निघाला. मार्गांत लोकांची फारच दाटी होती. आपला रामराजा अभिषेकार्थ वाड्यांत चालला आहे, असें समजतांच त्या रथापाशीं हजारों लोक रामदर्शनार्थ धावून आले. त्यांनीं त्याच्या नांवाचा जयजयकार केला व आपला आनंद अनेक प्रकारें दर्शविला. अशा रीतीनें तो रथ राजवाड्यापाशीं पोहोंचला. नंतर बंधु लक्ष्मणासह रामचंद्र त्या क्रोधागारीं गेला. बरोबर सुमंत्र मुख्य प्रधान होताच. पित्यास व त्या मातेस साष्टांग नमस्कार करून पित्याच्या आज्ञेकरितां ह्मणून त्यानें त्याच्या मुखाकडे पाहिलें, तों तें दुःखानें निस्तेज झालेलें पितृमुख त्यास दिसलें. तेव्हां त्यास फार वाईट वाटलें व विनयपूर्वक दुःखावस्थेचें कारण त्यानें पित्यास विचारिलें, व 'ह्या अत्यंत उदासीनवृत्तीस मजकडून झालेला कांहीं अपराध कारण आहे काय?' ह्मणून प्रश्न केला. आपलें कसेंही दुःख असलें तरी तें निरसन करण्याविषयीं मी प्रयत्न करीन, असें त्या रामभद्रानें आपल्या पित्यास ह्मटलें. परंतु 'वत्सा रामचंद्रा, हा रामा, माझ्या पंचप्राणा,' ह्याशिवाय त्याचे मुखांतून कांहींच निघेना! त्यानें तितक्यांत प्रधानासही पित्याच्या उदासीनतेचें कारण विचारिलें, परंतु त्याच्याकडूनही कांहीं कळलें नाहीं! तेव्हां त्यानें कैकेयीमातोश्रीस पितृदुःखाचें कारण विचारण्याकरितां तिच्या आरक्त मुखाकडे आपलें मुख नेलें न नेलें तों तीच ह्मणाली, "रामा, तुझ्या पित्यास मोठें ऋण झालें आहे, तें फेडण्यास आतां ते स्वतः असमर्थ झाले आहेत! तूं राजा झाल्यावर त्यांतून त्यांना मुक्त कसें होतां येईल बरें? तर तें ह्याक्षणीं फेडून टाकून त्यांस सुखी

कर. तें कर्ज फारच थोडें आहे. ज्याचें ऋण आहे तो येथेंच आहे, ऋणीही जवळ आहे व ऋणमुक्त करणारा तुजसारखा पुत्रही ह्या स्थळीं आला आहे. ऋणामुळें मनुष्याची काय स्थिति होते, हें, मुला, तुला समजत असेलच. तीच स्थिति ह्यांची झाली आहे. ऋण काढतांना मात्र सुख वाटतें, परंतु तें देतांना वाईट कां वाटावें हें समजत नाहीं ! तें फेडतांना वास्तविक पाहतां सुख मानावें. कारण तो मनुष्य आपल्या वेळेवर जर उपयोगीं न पडता तर आपलें त्यावेळीं महत्कार्य झालें नसतें! " असें कैकेयीचें बोलणें चाललें असतां, रामचंद्राच्या मनांत, ऋण कसलें, ऋण देणारा येथें कोण आहे, त्याविषयीं पित्यास इतकें दुःख कां झालें आहे, ही माता अशी कावरी बावरी रागावलेल्या सारखी, अस्ताव्यस्त स्थितींत कां? इत्यादि अनेक शंका येत होत्याच, त्या हिचें बोलणें झाल्यावर विचारून घ्याव्यात, असें त्यास वाटत आहे; परंतु हिचें बोलणें कांहीं मध्यें थांबलें नाहीं. तिच्या पुढील बोलण्यावरून रामचंद्राच्या सर्व शंका दूर झाल्या! असो. ती दुष्ट बायको पुढें ह्मणाली, "रामा, तुला ठाऊक आहेच कीं मागें एका घनघोर युद्धप्रसंगीं, ह्यांच्या बरोबर मी रणांगणीं गेलें होतें. त्यासमयीं मीं जिवावर उदार होऊन ह्यांना कांहीं विलक्षणच साहाय्य केलें. आणि त्याच साहाय्यामुळें ह्यांना जयप्राप्ति झाली ! त्यासमयीं हे फार संतुष्ट झाले, व ह्यांनीं मला दोन वर मागण्याची विनंती करण्यास सांगितलें. परंतु 'पुढें कधीं आपल्या चरणांपाशीं वर मागेन,' असें मी तेव्हां बोललें. त्यास आज बरींच वर्षें झालीं ! त्या गोष्टीची मला आठवणसुद्धां नव्हती. काल रात्रीं ह्यांचें मीं प्रथम वचन घेतलें, व नंतर काय तें मागितलें. आतां हे सत्यवचनी ह्मणवून घेणारे महाराज तें न देतां वेड्यासारखे दुःखी होऊन, मला अनेक प्रकारें बोलत आहेत ! ह्याशिवाय काय तें माग, ह्मणून हे ह्मणतात ! रामा, ह्यांच्या ह्या विपरीत वर्तनानें राग कसा बरें येणार नाहीं ? रामचंद्रा, माझें मागणें तरी कांहीं विलक्षण, न देण्यासारखें, असंभवनीय, पराक्रम किंवा तपश्चर्यादि करूनच प्राप्त होणारें, आशांतलें आहे असें नाहीं. हे जर आपलें वचन राखीत नाहींत, तर तें तुला पूर्ण केलें पाहिजे. तरच तुह्मी घोर नरकयातनेपासून सुटणार आहां ! माझें मागणें एवढेंच आहे कीं, तू सुंदर कहाणार

धारण करून ऋषींना मोठीं आवडणारीं अशीं पवित्र वल्कलें धारण करून फक्त चौदा वर्षेंच पाहिजे तेथें अरण्यांत राहावें. आणखी राज्याभिषेक तुझ्या बंधूला ह्मणजे भरताला व्हावा! रामा, वनांत राहणें वाईट काय रे? वाईट असतें तर मुनींना कसें आवडतें? राज्य हें मोठें त्रासदायक आहे, नाहीं बरें? वनांत किती बरें शांति? तेथें मोठमोठ्या तापसांचीं दर्शनें होतात; राज्य केल्यानंतर वृद्धपणीं जें राजे इच्छितात—तें वनगमन अर्थात् चांगलें आहे. तेव्हां भरतास वृक्ष दिल्यासारखें होऊन तुला त्याचें मधुर फळ देण्यासारखें नाहीं का होत? ह्या एवढ्याशा मागण्यासाठीं, शूर ह्मणविणारांनीं, तूंच सांग बरें, अबलांसारखें, हाय! हाय! करीत रडावें काय? मीं साहाय्य केलें त्यावेळच्या त्या प्रसंगाला हें मागणें कांहींच नाहीं! ह्या बायकोला कांहींच मागतां आलें नाहीं, असें कोणीही ह्मणेल. परंतु माझ्या तोंडांतून एकदां आलें तें आलें. मी आपलें वचन कधीं फिरविणार नाहीं. जेथें मधुर मधुर फळें खावयास मिळतात, अमृतासारखें स्वच्छ व गोड उदक प्यायला सांपडतें, क्रूर व भयंकर प्राण्यांशीं शौर्य दाखविण्याचे प्रसंग येतात, चित्रविचित्र वनशोभा दृष्टीस पडते, अशा वनामध्यें तुला आजच गेलें पाहिजे! तूं ज्येष्ठ पुत्र असून सुशील आहेस, ह्मणून पित्याचें ऋण, बाळा, तुलाच फेडिलें पाहिजे! जर तूं अरण्यांत न जाशील तर ह्या काळजीनें तुझा पिता लौकर मरेल! तर लौकर जा, जितका तूं विलंब करशील तितका लौकर ह्यांस मृत्यु गांठील!" ह्या कैकयीच्या मुखांतून अग्निज्वालाच निघतात काय! असें दशरथ, सुमंत्र व लक्ष्मण ह्यांस वाटलें. दशरथ तर त्या प्रसंगीं धाडकन् भूमीवर पडला! सुमंत्रास हा प्रकार काय आहे, हें स्वप्न तर नव्हेना असें वाटलें! लक्ष्मण अगदीं क्रुद्ध होऊन लालभडक झाला! व हा चौताळून कैकयीच्या अंगावर धावून जातो कीं काय असें वाटलें; परंतु पित्यापुढें त्याच्यानें कांहींच बोलवेना. "वत्सा, अरे रामचंद्रा, काय प्रसंग हा!" असें दशरथानें एक दोन वेळां ह्मटलें. रामानें तें तिचें बोलणें शांतपणें ऐकिलें. त्याला लवलेशही राग आला नाहीं! पण ही आपल्या पित्यास कठोर कशी बोलली, हिची बुद्धि भ्रष्ट कशामुळें झाली, ह्याचें त्याला फारच आश्चर्य वाटलें व तो ह्मणाला, "प्रियमाते, तुझ्या

इच्छेप्रमाणें वर्तण्यास मी तयार आहें बरें. जर माझ्या वनवासानें तुला संतोष होऊन पितृवचन सत्य होत आहे, तर ह्यापेक्षां गुरुजनांस तृप्त करण्यास पुत्रानें पवित्र कृत्य तें कोणतें करावें? जर ही आपली सेवा करण्याची पुण्यप्रद संधी घालविली, तर पुढें अशी कधीं येणार? जर माझ्या जटाभारानें आपल्या नयनांस आनंद होत आहे, तर ह्यापेक्षां आणखी दुसरा कोणता भार मी मस्तकीं वहावा? वल्कलें नेसून मी यथेच्छ वनविहार करावा, असें, माते, जर तुला वाटत आहे, तर मूल्यवान् वस्त्रें परिधान करून अयोध्येंत रहाणें मला कसें बरें आवडेल? भरतानेंच राज्य करावें, अशी माझीही इच्छा आहे. कारण तो मोठा निस्पृही, न्यायशील, व सत्यप्रिय आहे. त्याच्यापासून प्रजाजनांस फारच सुख होईल. आतां अधिक बोलण्यास अवकाश नाहीं. माते, चौदाच्या ठिकाणीं चौदाशें वर्षें जरी मला वनांत राहावयास सांगितलेंस तरी मी सिद्ध आहें. तुझें मागणें खरोखरच अल्प आहे. आणि हें जर माझ्यानें पूर्ण न झालें तर तुला, "माते," ह्या अत्यंत प्रेमसूचक शब्दानें मीं आजपर्यंत कशाला हांका मारिल्या? शेवटीं, माते, तुझ्या चरणापाशीं इतकीच विनंती आहे कीं, तातांच्या अंतःकरणास दुःख न व्हावें, असें आपण सर्वांनीं वर्तन ठेवावें." अशा प्रकारें रामानें निष्कपट व हृदयद्रावक भाषण केलें. तें ऐकून दशरथ तर प्राकृत जनासारखा मोठ्यानें रडूं लागला. रामचंद्रानें त्याचें बहुत प्रकारें सांत्वन केलें. व मला वनांत जाण्यापासून यत्किंचितही वाईट वाटत नाहीं, असें पित्यास पुनः पुनः सांगितलें. तेव्हां दशरथराजानें क्रोधागारीं झालेला सर्व वृत्तांत सद्गदित होऊन त्यांस सांगितला; व मी मोठा अपराधी आहें, असें सांगून ही एकाएकीं दुष्टबुद्धि कशी झाली, ह्याविषयींही त्यानें आश्चर्य दर्शविलें. मग रामाचा अशा रीतीनें होणारा वियोग आपल्याला क्षणभरसुद्धां सोसणार नाहीं, रामवियोग म्हणजे मृत्यूच होय, असे त्यानें पुनः पुनः उद्गार काढिले; व मजकडून तुला कांहीं दंडकारण्यांत जाण्याला आज्ञा मिळणार नाहीं असें म्हटलें. नंतर पितृचरणीं मस्तक ठेवून पित्यास अत्यंत दुःख व त्या मातेस अत्यंत आनंद देऊन, रामचंद्र तेथून निघाला तो कौसल्यामातेच्या भेटीस गेला. बरोबर रागावलेला लक्ष्मण

होताच; माता तर रामचंद्रास राज्याभिषेक होणार ह्मणून आपल्या मंदिरीं मोठ्या उल्हासवृत्तीनं विष्णुपूजेंत गुंतली होती. तिला रामानें प्रणामपूर्वक नुकतेंच झालेलें सर्व वर्तमान निवेदन करून वनांत जाण्याला तिचा निरोप मागितला! तत्क्षणीं ती मूर्च्छित झाली! पण रामाच्या प्रार्थनेनें थोड्या वेळानें जरा सावध झाली. कैकेयीची फार निर्भर्त्सना करून दशरथासही तिनें फार दोष लाविला. ती ह्मणाली—" वत्सा, तुजवांचून मी येथें कशीरे दिवस कंठूं? अरे, घोर भयंकर अरण्यांत तूं जाऊन राहाशील तरी कसा? तुला तेथें स्नान कोण घालील? जेवायाला तुला कोण हांक मारील? तुझ्याशीं गोड कोण बोलेल? तुला मऊ बिछाना कसा मिळेल? तुला झोंप कशी येईल? कोणाच्या अंकावर मस्तक ठेवशील? आई, माते, अंबे, जननी, हे शब्द तूं विसरून जाशीलना? कंदमूलफलांवर व वल्कलें नेसून तूं निर्वाह कसा करशील? त्या निर्जन प्रदेशांत तुला सुख कसें वाटेल? तेथें दगडांवर झोंप कशी येईल? बाळा, त्या कैकेयीचा तूं कायरे अपराध केलास? पुत्रा, तूं अपराधी नसतां तुला ही चौदा वर्षांची शिक्षा देणारांस काय ह्मणावें? लोक काय ह्मणतील? तुझें जाणें तुझ्या पित्यास तरी कसें आवडलें? लोकांनीं तुझी मात्र कीर्ति गाऊन आमची निंदा करावीना? तूं मात्र सुपुत्र ह्मणवून घ्यावें, आणि आह्मी दुष्ट, नष्ट, निर्दय ह्मणून सर्वत्र गाजावेंना? रामा, तुला राज्याधिकार मिळावयाचा होताना? मग ज्याचें स्वप्नसुद्धां कधीं पडावयाचें नाहीं, असा हा वनांत जाण्याचा निरोप मागतोस हें काय? बाळा, तुझ्या सारखा सद्गुणी पुत्र वनांत धाडून मी रडत बसावें काय? अरे पहा, हें रडें आवरत नाहीं! कंठ वरचेवर दाटून येतो! हृदय जसें काय जळतच आहे असें होऊन गेलें! रामचंद्रा, भरत राज्य खुशाल घेवो, पण तूं वनांत जाऊं नको. रामा, पुत्रावर मातेची सत्ता सर्वांपेक्षां अधिकना? मग मी आज्ञा दिल्याशिवाय दुसऱ्याची आज्ञा काय कामाची? अरे, त्या सुशील भार्येचें दुःख मनांत आण. तिला हें वृत्त कळलें ह्मणजे ती काय ह्मणेल? सुमेधाराणीस काय बरें वाटेल? तुला अरण्यांत जावयास सांगितलें, तर सीता मला राक्षसी ह्मणणार नाहीं काय? पुत्रा, मला तरी बरोबर नेरे. तुजवांचून मी कशी वांचेन? अरे, मला एकदां कडकडून भेटूं दे. तुझें मस्तक हुंगूं दे. भलताच निरोप कसा द्यावा?"

ह्याप्रमाणें ती पुष्कळ बोलली. पुत्रवियोगानें आईस होणारें दुःख, श्रोतेहो, आह्मां पुरुषांस कसें समजणार? असो, नतर रामचंद्र ह्मणाला, " आई, अशी शोकाकुल होऊं नको ग. चौदा वर्षें केव्हांच निघून जातील. मग पित्राज्ञा पाळणारा हा पुत्र ह्याहीपेक्षा तुला अधिक प्रिय वाटेल. गुरुजनाज्ञेपेक्षां राज्य अधिक काय? पित्याच्या इच्छेप्रमाणें आचरण करणें, ह्याहून दुसरें तपश्चरण तें कोणतें? पित्याच्या आज्ञेनें कोणाचें बरें कल्याण झालें नाहीं? पितृवचन न ऐकिल्यामुळें पश्चात्तापांत होरपळणारे हजारों पुत्र जगांत असतील! भगवान् परशुरामानें पित्राज्ञेस्तव मातृहत्या केली! ह्यापेक्षां काय, आई, हा वनवास कठिण आहे? आतां तुला दुःख होणें हें साहाजिकच आहे. पण त्यामुळें तातावर आलेलें संकट दूर करण्यास झटणाऱ्या पुत्रास आज्ञा न देणें बरें नाहीं. माते, पित्याचें वचन ऐकून त्याचें सत्यरक्षणव्रत मला चालवावयास नको वर? पित्राज्ञारूप कामधेनूस न पाळितां तिचा वध करणारास मी दुष्ट खाटिकच समजतों!" लक्ष्मणाचा कोप लवलेशही कमी झाला नव्हता. तो त्यानें ह्या स्थळीं प्रकट केला. त्या भरांत त्यानें कैकयीस व भरतास फार निंदिलें. त्या आवेशांत " अशा पित्यास ठार मारून टाकतों!" असे शब्द त्याच्या मुखावाटे बाहेर पडले! "रामा, हें राज्य तुझें आहे, हें तुलाच मिळालें पाहिजे, आज तुलाच राज्याभिषेक झाला पाहिजे, ह्यामध्यें कोणी विघ्न आणील तर त्याला मी शासन करण्यास तयार आहें. वसिष्ठादि शिष्टमंडळी, अष्ट प्रधान, सर्व सैन्य, सकळ प्रजाजन, हे तुला अनुकूल आहेत. मग ह्या सत्कार्यीं विघ्न कोण आणणार आहे? त्या मातेचें अन्याययुक्त व मतलबाचें मागणें न ऐकिलें असतें तर पित्यास कोणताही दोष लागला नसता." अशाप्रकारें लक्ष्मण रामचंद्रास बोलला. त्याचें रामचंद्रानें मधुर व युक्तीच्या बोलण्यानें समाधान केलें. त्याच समयीं लक्ष्मणानें रामाबरोबर वनांत जाण्याचा दृढ निश्चय केला. रामानें त्यास न येण्याविषयीं बहुत प्रकारें सांगितलें, परंतु त्यानें आपला निश्चय सोडला नाहीं. लक्ष्मणाच्या निश्चयानें कौसल्येस त्यांतल्या त्यांत थोडें समाधान वाटलें. शेवटीं मोठ्या कष्टानें तिचा निरोप व आशीर्वाद घेऊन ते सुमित्रेच्या दर्शनास गेले. राममुखानें सविस्तर वृत्त ऐकून तिचीही स्थिति कौसल्ये-

प्रमाणेंच झाली. लक्ष्मण बरोबर जात आहे, हें ऐकून तिनें त्याची फार स्तुति करून रामचंद्राच्या अर्धवचनांत राहा, वगैरे लक्ष्मणास फारच हृदयंगम उपदेश केला.

नंतर ते आपआपल्या मंदिरीं निघाले. इतक्यांत ही बातमी अनेकरूपानें त्या राजवाड्यांत पसरून सर्व अयोध्यानगरभर ही पसरत चालली! ती ऐकून प्रत्येक मनुष्यास वाईट वाटलें. कैकेयीस व तिजबरोबर दशरथासही लोक फार वाईट बोलूं लागले. ज्याच्या त्याच्या मुखीं रामाची स्तुति चालली होती. ह्या सर्व अनर्थास मूळ कारण दुष्ट मंथरा असावी, असा त्या वाड्यांत कित्येकांनीं तर्क केला व कित्येकांस तर तीच होती असें समजलें. लोक नानाप्रकारें बोलूं लागले:—"रामचंद्राच्या राज्यांत आह्मांस मोठें सुख झालें असतें, परंतु सत्कर्माच्या आड विघ्नें ठेवलेलीं असावयाचींच! राम राजा, आणि तिघे बंधु त्याच्या साहाय्यास तयार, मग किती बरें मजा झाली असती! लक्ष्मणा, तुझी धन्य आहे! त्या वृद्ध राजास हे कैकेयीचे भलतेच खेळ कसे आवडले! अशा दुष्टेला बांधून बंदींत कां घातली नाहीं! कुटुंबकलह माजला ह्मणजे त्याचा परिणाम नाश, अपकीर्ति, ह्यावांचून अन्य काय व्हावयाचा! आह्मांस वाटतें कीं कांहीं तरी करून रामचंद्र वनांत न जाईल असें आतां लोकांनीं करावें. हाय! हाय! आह्मीं आज सर्वथा निराश झालों!" अभिषेकार्थ वाड्यांत जमलेली मंडळी दुःखोद्गार काढीत परत चालली. सर्व प्रधानांस फारच वाईट वाटलें. वसिष्ठादि महर्षींस आश्चर्य वाटून "भवितव्य कांहीं कोणास कधीं सुटलें नाहीं. कदाचित् रामासारख्या सर्वगुणसंपन्न पुरुषानें वनांत जाऊनच कांहीं लोकोपकार करावयाचे असतील! सत्पुरुषाचें पुढील चारित्र कसें समजावें?" अशासारखें ते सन्निध असलेल्यांपाशीं बोलले. सर्व नगरी क्षणांत उदासीन होऊन निरुत्सव दिसूं लागली! प्रत्येक मनुष्यास आपल्या कुटुंबांतील रक्षणकर्ता पुरुषच वनांत चालला आहे कीं काय असें झालें! नंतर ज्याच्या पाठीमागें हजारों लोक असून ते वनांत न जाण्याविषयींचे आपले उद्गार ज्यास मोठ्यानें कळवीत आहेत व आपलें दुःखं निवेदन करीत आहेत, व त्यामुळें ज्याची रामांचित तनु झाली आहे, असा

तो रामभद्र आपल्या मंदिराकडे चालला होता. सीता तर आपण राज्ञी झाल्यावर ज्या रीतीनें लोक आपणास चांगलें ह्मणतील, अनाथांचें रक्षण होइल, धर्मक्रिया वाढतील, सर्व प्रजा आनंदांत व सुखांत राहील, असें वर्तन ठेवण्याविषयीं दक्ष असलें पाहिजे, अशा सारख्या विचारांत होती; व आपल्यास अजून प्राणवल्लभ किंवा वसिष्ठाचार्य अथवा सुमंत्र प्रधान अभिषेकस्थानीं न्यावयास कां येत नाहींत? ह्मणून सचिंत होऊन आपल्या मंदिराच्या खिडकींत मार्गाकडे डोळे लावून बसली होती. रामचंद्र तेथें जातांच त्याच्या खिन्न मुद्रेवरून, मौनावरून, व दुसऱ्या अनेक लक्षणांवरून सीतेच्या मनांत बहुत शंका येऊन ह्मणाली—"महाराज, आजचा दिवस मोठ्या आनंदाचा, थोड्या वेळांत आपण पृथ्वीपति होणार, आतां सर्व प्रजांच्या कल्याणाचा भार तुमच्या मस्तकीं येणार, असें असून खिन्नवदन कां बरें दिसतां? येथून मोठ्या आनंदानें, राजचिन्हांनीं युक्त असे उत्तम रथांत बसून गेलां असून, परत येण्याच्या वेळेस असे कां? ह्मटलें असतां परत येण्याच्या वेळीं आपल्या मुखावर पूर्वीं पेक्षां फारच आनंद दिसावयाचा! बरोबर असणारे ते राजपुत्र कोठें गेले? सारथी कोणाचें सारथ्य करण्यांत गुंतला? सुमंत्र प्रधान कोणास मंत्र सांगत आहेत? बरोबर असणारे ब्राह्मण ह्यावेळीं कोणत्या ब्रह्मकर्मांत निमग्न झाले? राज चिन्हांचा त्याग कां केलात? आपली उत्साहबुद्धि व मजवरील प्रीति अजून कां उदय पावत नाहींत? मुखावरील मूर्तिमंत आनंद कोठें लपला? अद्यापि ह्या चातकीवर आपणदृष्टि कां होत नाहीं? वनांत राहणाऱ्या मुनींचें व्रत आपणांस कसें रुचलें? आपलें असें हें म्लान मुखकमल मीं अजून कधींच पाहिलें नव्हतें! सर्व दुःखास कारण जे कामक्रोधलोभादि दुष्ट विकार ते आपल्यास कधींही स्पर्श करीत नसतां व सर्व सुखाला मूळ जें सदाचरण त्याला क्षणभरही सोडीत नसतां, हें झालें तरी काय? मजकडून कांहीं अपराध घडलेला तिकडे आपल्या लक्षांत आला, किंवा तिकडे गेल्यावर माझ्याविषयीं आपल्यास कांहीं विपरीत कोणी सांगितलें? सर्व कुशल आहेतना? वडील माणसांना कांहीं दुःख झाल्यामुळें आपण दुःखी आहां? किंवा कोणीं आपल्यास बोललें? अथवा राज्याभिषेकास कांहीं अपरिहार्य

विघ्न आलें ? अथवा राज्यभारामुळें काळजी उत्पन्न झाली ? पण ही काळजीची वेळ नव्हे. किंवा एखादें दुर्वृत्त कानीं पडलें ? अहो, चंद्रोदयामुळेंच रात्रीची शोभा ना! सागराच्या शांतपणामुळेंच नाहीं का नदी त्याच्याकडे धांव घेते ? वेलीला मंडपाचा किंवा वृक्षाचा आश्रय नसेल तर ती वाढून फलद्रूप कशी होईल ? सारांश, स्त्रियांचें सौभाग्य, आनंद, सुख इत्यादि सर्व कांहीं पतीवर अवलंबून असतें." ह्याप्रमाणें पतीस प्रसन्न करण्याकरितां तिनें, मधुर, सरळ, निष्कपट व प्रेमळ असें भाषण केलें. रामचंद्रानें नंतर तिला जवळ बसवून त्या मंदिरांतून निघाल्यापासून घडलेलें सर्व वर्तमान सांगितलें. तें ऐकत असतां, क्षणांत तिचे नयन अश्रूंनीं भरून येत होते; क्षणांत तिचा चेहेरा पालटत होता; क्षणांत ती दीर्घ श्वास सोडीत होती; क्षणांत 'फार चांगलें केलेंत,' 'असें काय!' 'अरेरे' 'मातेचेंच दुःख तें' असे उद्गार काढीत होती! नंतर ती ह्मणाली, "प्राणपते, ह्यांत तर आपल्याला खिन्न होण्यासारखें मला कांहीं एक दिसत नाहीं! तेव्हां आपल्या उदासिनतेचें कारण कांहीं निराळेंच असावें. तें हें कीं- जानकीला बरोबर कसें बोलवावें! ती कदाचित् येणार नाहीं! परंतु ही आपली शंका व्यर्थ आहे. आतां खिन्नता सोडून द्या. मी आपल्या बरोबर मोठ्या आनंदानें अरण्यांत येण्यास तयार आहें. आतां विलंब करूं नका; चौदा वर्षांतील आजचा एक दिवस फुकट घालवूं नका; आज सुमुहूर्त आहे." हें ऐकून राम ह्मणाला, "प्रिये, मी सदा प्रसन्न आहें. शोक, मोह, औदास्य हीं मला क्षणभरही स्पर्श करणार नाहींत. जर मी उदासीन आहें, असें तुला वाटतच असेल, तर ह्याचें कारण तूं बोललीस त्याच्या अगदीं उलट आहे! तें हें कीं, तू वनांत येण्याचा हट्ट धरशील! तर तूं येथें स्वस्थ रहा. प्रिये, आतां लौकरच भरताला राज्याभिषेक होईल, तो सुशील आहे. त्यास वाईट वाटेल असें किंवा त्याच्या विरुद्ध कोणाशीं कांहीं बोलूं नको; माझी स्तुति त्याला ऐकूं जाईल अशा रीतीनें करूं नको; त्याला राज्य मिळालें ह्मणून तू असंतुष्ट आहेस असें दाखवूं नको; मधल्या मातेवर आपला राग आहे असें कृतीनें किंवा भाषणानें कधींही दर्शवूं नको. ह्या मंदिरांत तुझ्या सुखास पडणार नाहीं, ह्मणून तूं आणि ऊर्मिळा एकत्र रहा. वडील मनुष्यांच्या

सेवेस आतां तुला अधिक वेळ मिळेल; देवपूजेंत अधिक वेळ घालीव; याचकांस व ब्राह्मणांस दानधर्म करीत जा; कधीं कोणाशीं अप्रिय बोलूं नको; परोपकारा एवढें पुण्य नाहीं; पुराण, पवित्र कथा, संतांचीं चरित्रें ह्यांच्या श्रवणानें अंतःकरण निष्कलंक व उदार होतें, हें तुला ठाऊक आहेच; मजविषयीं काळजी करूं नको; माझ्या वियोगामुळें अन्नपाणी टाकूं नको, चौदा वर्षें भरतांच मी येईन; मग आपल्या प्रेमास अधिक पूर येईल; सेवकजनांवर रागें भरूं नको. तुला सर्व समजतेंच आहे. सारांश, वनांत येऊं नको. पतिव्रता स्त्रियांनीं, त्यांस पतींचा विरह झाला असतां, कसें वागावें, हें तुझ्या आचरणानें शिकावें, असें तू वर्त्तन ठेव.

**सीता**—प्राणनाथ, जर मला येथें रहावयाचें असतें तर मला हा आपला उपदेश योग्य होता आणि मी तो मनःपूर्वक ऐकिलाही असता. आणखी काय करूं, अमकें कसें करूं, हेंही सर्व विचारून घेतलें असतें. ह्या उपदेशांतील प्रत्येक शब्द वलाढ्य शत्रूनें हृदय फोडण्या करितां सोडलेला किंवा आपला बाणच काय असा मला वाटत आहे! मी आपल्या बरोबर येणार, येथें रहावयाची नाहीं. तर वनांत कसें रहावें ह्याविषयीं मला उपदेश करावा.

**राम**—प्रिये, तुं अज्ञ आहेस. बरोबर येणार एवढें तुला ह्मणावयाचें समजतें. परंतु वनांतील हाल तुला कोठून ठाऊक असणार? बालपणापासून अशा सारख्या रम्य स्थलीं तुझें राहणें, नियमित वेळीं जेंजें ह्मणशील तेंतें खाण्या पिण्याला तयार, पर्यंकावर मृदु शय्येवर शयन, सेवकजन सेवेस तत्पर जवळ आहेतच, बोलावयास सख्या सर्व काळ दक्ष असतात, जरा कोठें बाहेर जाणें झालें कीं सुंदर रथ पुढें आला! शिवाय प्रीति, ममता, कौतुक करण्यास वडील मनुष्यें आहेत! आणखी मनोरंजन होण्याचीं हजारों साधनें तुला अनुकूल आहेत! असें कांहीं तुला त्या भयंकर निर्मानुष अरण्यांत मिळेल काय? तेथें सर्व कांहीं ह्यांच्या उलट! ह्या नवपल्लवांप्रमाणें कोमल चरणांनीं कांटे, तृणांकुर, खडे, इत्यादिकांनीं भरलेल्या व उंच सखल अरुंद वाटांनीं, आणि पुष्कळ ठिकाणीं अशा वाटाही नाहींत अशा रानांतून लांब लांब कशी चालशील? सिंह, व्याघ्र, लांडगे इत्यादि क्रूर

व घातक प्राण्यांच्या मुखांकडे तुझ्यानें पाहवेल तरी कसें? सर्पादि प्राणहारक जीवांची तुला भीति नाहींका वाटणार? वृक्षांच्या ढोली, झाळी, कुंज, गुहा, दऱ्या, ह्यांतील किर्र शब्द व निबिड काळोख तुझ्या कर्णांत व डोळ्यांस काय बरें सांगतील? पर्वतशिखरांवरून उड्या टाकणाऱ्या उदकांचे धोधो शब्द, नद्यांचे गोंगाट, पक्ष्यांचा किलकिलाट, सिंहादिकांची गर्जना, अतिवृष्टि, अतोनात थंडी, असहनीय उन्हाचा ताप, इत्यादिकांच्या योगानें, हे भीरु, तुझी काय अवस्था होईल, ह्याचा क्षणभर तरी विचार कर. आणखी मनुष्यांस स्वाहा करून टाकणारे राक्षस टपत बसले असतील ते निराळेच! मनुष्याच्या आयुष्याचा क्षणभरही भरंवसा नाहीं, ह्याची पदोपदीं प्रतीति अरण्यांत येणार आहे! सुंदरि, तरुतलीं किंवा पर्णकुटिकेंत कशी राहशील? तेथें तुझी वेणीफणी कोण करील? सुवासिक तेल कोण देईल? सुग्रास कसा मिळणार? निजशील तरी कशावर? गाद्या, गिर्द्या, पर्यंक, हीं अरण्यांत कोठलीं बरें आणूं? ह्मणून ह्मणतों, प्रिये, तूं मजबरोबर वनचारिणी होऊं नको. न येशील तर मला सुख होईल. नाहीं तर एकाद्या भयंकर प्राण्यानें अथवा राक्षसानें जर का तुझा अंत केला, अथवा कोणीं बलाढ्यानें ह्या अप्रतिम रूपास मोहून तुला हरण केलें, किंवा तुझी कोठें चुकामूक पडली तर मी व लक्ष्मण त्या गहन वानांत काय करूं? कोठें भटकूं? मग आह्मांला कोण तेथें साहाय्य करणार? काय तेथील पशुपक्षी तुझा शोध सांगणार? किंवा वनचरें आह्मांस साहाय्य करणार! मग माझ्या दुःखास सीमाच नाहींशी होईल! अग, तेथें फळें, मूळें खावयाचीं. तीं तुझ्या जिव्हेस कशीं रुचतील बरें? कधीं कधीं तुला उपवासही पडतील! केव्हां केव्हां उदक सुद्धां मिळणार नाहीं! प्रिये, जानकि, अरण्यांत पाय ठेविलास कीं क्लेशास आरंभ झालाच! हें सर्व तुला ठाऊक नव्हतें, त्या वेळीं रानांत बरोबर येतें, ह्मणून ह्मणालीस तें ठीकच. आतां मजबरोबर येण्याची गोष्ट काढूं नको. हट्ट सोड. आज पर्यंत जसें माझें सर्व ऐकून मला सर्वथा आनंद दिलास तसाच आतां ही दे.

**सीता**—प्राणनाथ, हें आपलें भाषण ऐकून मला आज मोठें आश्चर्य

वाटून दुःखही होत आहे! मी जरी कधीं वनांत गेलें नाहीं, आपण ह्मणतां तशा सुखांत जरी मी आज पर्यंत मोठ्या आनंदानें दिवस काढिले आहेत, तरी मी तेथील आपण सांगितलेलें सर्व कांहीं जाणतें. परंतु त्या क्लेशाला भिणारी ही जनककन्या नव्हे; आपल्या वियोगाला भिणारी आहे! सतीचें मुख्य दैवत पति होय. हें तत्त्व मीं कालत्रयीं विसरणार नाहीं. त्यावांचून इतर देवांची आराधना करून त्यांस प्रसन्न ठेवणें नलगे. अन्य देवांस नवस नकोत. त्याच्या सतत दर्शना-पेक्षां साधुजनांचें दर्शन हितप्रद होईल असें मला क्षणभर सुद्धां वाटत नाहीं! पतीचें प्रसन्न मुख पाहणें ह्याहून भागीरथीच्या प्रसन्न उदकाची योग्यता अधिक नाहीं. त्याच्या आज्ञेहून वेदांची आज्ञा अधिक मोलाची नाहीं. त्याच्यावरील निष्कपट प्रेमाहून अमृत चांगलें ह्मणणारे खुशाल म्हणोत! त्याचें सतत दर्शन हेंच आह्मा सारख्यांना जगांत रम्य वस्तु पाहणें होय! त्याचा वियोग होणें ह्या पेक्षां साध्वी स्त्रिला दुसरें विष तें कोणतें भासणार? त्याची सेवा करून त्यास संतुष्ट ठेवणें, तो आपल्या शक्तिप्रमाणें जें अन्नवस्त्र देईल त्यांत समाधान पावणें, हेंच स्त्रीचें खरें व्रत होय. आपण येथें नसतां माझें ह्यास्थळीं राहणें वनवासापेक्षां मला अधिक भयंकर वाटतें. मला बरोबर येऊं नको ह्मणालेत, ह्या बोलण्यानें माझें अंग पहा कसें रोमांचानें भरून गेलें आहे तें! घामानें थबथबलें आहे! व कंप सुटला आहे! प्राणनाथ, आपल्या वियोगाचें भाषण जर नुसतें माझ्यानें ऐकवत नाहीं, तर सबंध चौदा वर्षें माझ्यानें येथें कशीं हीं काढवतील? आपण ज्या मार्गानें जसे चालाल, तशीच मी पाठी-मागून चालेन. आपली चरणसेवा ज्या स्थळीं मला करावयास सांप-डेल, तें स्थळ मला अत्यंत मनोहर व परम पवित्र वाटेल. कारण आपणच मनोहर व पवित्र अहां. तेथें जें उदक प्याल, आपणास जीं फळें गोड लागतील, त्यांचेंच मी आनंदानें सेवन करीन. आपण जर उपवास कराल तर मी नाहींका करणार? आपण नरसिंह असतां त्या रानटी पशुसिंहाचें काय चालणार? आपण माझे मंत्री असतां मला सर्पादिकांचें तिळभरही भय नाहीं! आपण सूर्यवंशांतील प्रतापी राजपुत्र बरोबर असतां मला काळाखाची भीति वाटेल तरी

कशी ? बारा वर्षांपूर्वी राक्षसांस मारून जर विश्वामित्रासारख्यांच्या यज्ञाचें संरक्षण केलेंत, तर माझ्या पतिव्रताधर्माचें रक्षण आज कसें नाहीं होणार ? आपल्या मुखारविंदसुवासापेक्षां येथें तरी कोणाता सुगंध मला प्रिय वाटत आहे ? आपला वट्ट स्नेह जर आहे, तर त्या पातळ स्नेहाची कुणाला गरज आहे ? आपलें मृदु अंग असतां आणखी गाद्या, गिर्द्या कोणाला हव्या आहेत ? अहो, अरण्यांतील भयंकर गोष्टी दिसतात तेवढ्याच मला आपण सांगितल्या, पण हरिणांसारखे गरीब पशु, मयूरांसारखे सुंदर, कोकिल, कीर, ह्यांसारखे मनोहर पक्षी, दर्शनीय व पवित्र असे ऋषि, त्यांचे रम्य रम्य आश्रम, त्यांच्या त्या साध्या व पवित्र व्रत , सज्जनांच्या हृदयांप्रमाणें प्रसन्न व प्रफुल्ल दिसणारीं अनेक सरोवरें, परोपकारिणी नद्या, जलानें तुडुंब भरलेले मेघ, नानाविध ओषधीरूप संपत्तीनें श्रीमान् असे पर्वत, वृक्षस्कंधांवर चढलेल्या, पुष्ट, पुष्पगुच्छांनीं लवलेल्या व फलद्रूप होणाऱ्या लता, हजारों सुंदर पालवलेले लहान मोठे वनस्पति, कमलें, कुमुदें, नानाविध पुष्पें, ह्यांविषयीं मला कांहींच कसें बोललां नाहीं ? वनांत जर सत्वशील मुनि स्त्रियांसह रहातात, तर मलाच राहाण्याला आपल्याकडून कां प्रत्यवाय असावा ? आपण मला भलतेंच करावयाला कसें सांगतां ? मला वनांत न नेण्याचा हट्ट धरूं नका. प्राणनाथ, आपण जवळ नसतां हे पंचप्राण कसे वांचतील ? पुरुषाचें काम बाहेरून मिळवून आणावें व स्त्रियेनें त्याची नीट व्यवस्था करावी. रानांत व्यवस्था कोण करील ? आपलें काम योगाचें व माझें व्रत क्षेमाचें, असें मी समजतें.

**राम**—तू जरी किती बोललीस तरी तूं मजबरोबर यावें हें मला प्रशस्त वाटत नाहीं. तेव्हां मी तुला नेत नाहीं. पतीची आज्ञा जर वेदाज्ञेपेक्षां मूल्यवान् आहे तर मग आज तिला किंमत कां नाहीं ? तूं वनांत येऊं नको. तुझें माझ्यानें तेथें रक्षण होणार नाहीं. तूं मला दुःख देऊं इच्छितेस काय ? येथें तुला गुरुजनांच्या आज्ञेंत राहून त्यांच्या सेवेंत दक्ष असें राहिलें पाहिजे. इच्छा असल्यास मिथिलेस माहेरीं जा. पण मजबरोबर घोर काननांत येऊं नको.

**सीता**—स्त्री जर पुरुषाचें अर्धांग आहे, तर तें अंग येथें ठेवून

आपलें वनांत जाणें कसें होईल ? त्या मधल्या सासूबाईंचा तरी मानस मजसहवर्तमान आपण त्या रम्यस्थळीं जावें असाच आहे ! पाहिजेल तर त्यांना विचारा. डोळ्यांना जर पापण्यांपासून त्रास होत असेल अथवा शरीरास जर हस्तपादादिकांची अडचण वाटत असेल अथवा रथाला जेव्हां चक्रांचा भार सहन होणार नाहीं, तेव्हांच माझ्या येण्यानें आपल्यास त्रास, अडचण व भार होईल ! ' पतीस कधींही सोडूं नको,' असें मला माझ्या मातापितरांचें सांगणें आहे. जसें काय माझ्या मातेला आजचा प्रसंग येणार हें ठाउकच होतें ! व ह्यामुळेंच काय तिनें आपल्याबरोबर अरण्यांत जाण्याविषयीं मला उपदेश केला होता ! पुष्कळ प्रसंगीं सामुद्रिक व ज्योतिषी ह्यांनीं ' हिला वनवास अवश्य घडेल,' असें मजविषयीं माझ्या पित्यापाशीं सांगितलेलें मला चांगलें स्मरतें. तर मला त्या भाललिखितापेक्षां कोणाची आज्ञा किंवा सांगणें बलवत्तर नाहीं ! जर तुह्मांस माझें रक्षण करणें कठिण वाटतें, तर त्यावेळीं धनुष्याचा भंग कशाला केलात ? त्यावेळेसच माझी सर्व भीति भंग केलीत ! माझें जाणें वनांत खचीत होणार, ह्मणूनच विधीनें आपल्याशीं माझा विवाहासारखा पवित्र व अभेद्य संबंध घडविला. आणखी माझ्या जनकानें आपल्यास वनांत उपयोगी पडेल असें लग्नसमयीं आंदण दिलें आहे, तें माझ्यामुळेंचना ! काय दिलें तें आठवतेंना ? तीं कधीं न भंगणारीं दोन धनुष्यें, तें दिव्य अभेद्य कवच, व ज्यांतून कधींही बाण संपावयाचे नाहींत, असा एक लोकोत्तर बाणांचा भाता ! ह्या अप्राप्य वस्तु वरुणराजानें सुप्रसन्न होऊन माझ्या पित्यास दिल्या होत्या. ह्या देणगीवरून आपल्या बरोबर मी वनांत जावें, हेंच माझ्या प्रिय जनकास इष्ट आहे असें होत नाहीं काय ? आपणासही पितृतुल्य अशा माझ्या जनकाचें करग्रहणसमयीं मजविषयींचें " ही छायेप्रमाणें तुह्मांस अनुसरेल, " हें आपल्याला सांगणें जर आपण ऐकत नाहीं, तर मामांजीची तरी ही इच्छा पूर्ण करण्याचें मनांत कशाला आणलेंत ? दोघांचेंही ऐकूं नका. जर एकाचेंच ऐकाल, तर पितृवचन पाळणारा आपल्यासारखा कोणी नाहीं अशी, होणारी आपली कीर्ति खोटी आहे असें नाहींका होत ? गुरुजनाचे सेवेविषयीं आपण मला किती बरें सांगितलें आहां ?

मग आपणाकडूनच तिचा अनादर कां होतो! मी आपल्यास कधीं सोडणार नाहीं. इतकें असून जर मला येथेंच राहावयास सांगाल तर मला आपल्या वियोगावस्थेंत विषपान हेंच येथें सुख देईल!!

ह्या प्रमाणें आमच्या पवित्र चारित्रनायिकेचा पतीस अत्यानंद देणारा दृढ निर्धार पाहून, तिला बरोबर नेण्याचें रामचंद्रानें ठरविलें. सीता व राम त्या मंदिरांतील आपल्या सेवकजनांचा निरोप घेत असतां कित्येकांचे तर तिनें दुःखाश्रु आपल्या वस्त्रानें पुशिले! रामानें पुष्कळांचें सांत्वन केलें. त्यांनीं त्या स्थळीं वसिष्ठपुत्रास बोलावून त्याच्या संमतीनें कधींही ज्याचें विस्मरण होणार नाहीं, असा विलक्षण दानधर्म केला.

सीतादेवी आपल्या प्रिय प्राणनाथासह त्या मंदिरीं ममतेनें पाळलेल्या पशुपक्ष्यांस भेटावयास गेली. त्या अज्ञान प्राण्यांनींही आपल्या स्वामिस्वामिनींवर कांहीं दुःखप्रसंग आला आहे हें आपल्यास समजलें, व त्यामुळें- कित्येकांनीं विक्राळ व दीनवाणें ओरडून, कित्येकांनीं मोठ्यानें हंबारव करून, कित्येकांनीं डोळ्यांतून पाणी काढून, कित्येकांनीं कान उभारून त्यांच्याकडे टौकारून पाहण्यानें, कित्येकांनीं आपलें भक्ष्य खाण्याचें सोडून, कित्येकांनीं तोंडांतील भक्ष्य तसेंच ठेवून, कित्येक निश्चल होऊन, कित्येकांनीं तिच्या जवळ येऊन व तिच्या पाठीस लागून, अशा अनेक भावांनीं- आपल्यास महद्दुःख होत आहे, असें त्यांस कळविलें! त्या सर्वांचा स्नेहपाश आपल्या नेत्रोदकानें ओला करून तें सौन्दर्यगुणशालि दंपत्य तेथून तसेंच निघालें, तें मार्गांतून अनेक प्रकारचे आशीर्वाद, व दुःखोद्गार ऐकत राजवाड्यांत सर्वांचा एकदम निरोप घेण्या करितां आलें. लक्ष्मणही तेथें तितक्यांत आला.

राम, लक्ष्मण व सीता, हीं ज्या विस्तीर्ण दिवाणखान्यांत आलीं, तेथें दशरथाच्या कैकेयीसुद्धां सर्व स्त्रिया जमल्या होत्या. बहुतेक प्रधानमंडळ, वसिष्ठादि मंडळी, अधिकारी लोक व सेवकजन वगैरे त्या स्थळीं आलेले होते. यावरून जाण्याच्या वेळीं सर्वांची त्या स्थळीं भेट घेण्याचा राचंद्रानें किंवा दशरथ महाराजांनीं आपला मनोदय पूर्वी कळविला असावा असें वाटतें.

विद्वानाला जशी विद्या, किंवा शूराला जशी कीर्ति, किंवा साधूला

जशी शांति, तशी आपल्या पतीला जनककुमारी सीतादेवी न सोडितां त्याच्या बरोबर वनांत जावयास निघाली हें ऐकतांच त्या नगरींत सर्वत्र लोकांनीं तिचा नाना प्रकारें धन्यवाद गाऊन ह्या निष्कलंक कोमलांगीस जिच्यामुळें हें वनवासासारखें महद्दुःख भोगावें लागत आहे, त्या कैकेयीस दुःशब्दांची लाखोली वाहिली !

तेथें राम, लक्ष्मण व सीता आल्याची वार्ता दशरथाला सुमंत्रप्रधानानें सांगतांच तो शोकाकुल राजा त्या स्थळीं आला, आणि आसनावर बसतो आहे तों अगोदर रामचंद्र पितृचरणांचें वंदन करावयास निघाला. पुत्र आपल्याकडे येत आहे असें पाहून आदीं आपण त्यास दृढालिंगन द्यावें ह्या हेतूनें "हा प्रिय वत्सा, रामा," असें ह्मणून आपल्या आसनावरून उठून जात असतां तो वृद्ध राजा मध्येंच पडला ! त्याला रामचंद्र सावध करीत असतां ह्मणाला, "महाराज, असें आपल्यास मोठें दुःख वाटण्यासारखें ह्यांत काय आहे ? मला तर ह्यांत कांहींच वाटत नाहीं. बसून रहा, आणि मी, ही जनककन्या व लक्ष्मण, महाराजांच्या चरणकमलीं वंदन करावयास आलों आहों, ह्यांजकडे एकदां कृपादृष्टीनें पाहून आशीर्वाद व निरोप द्या. सत्यप्रतिज्ञ महाराज, आम्हांस आतां लौकर निघालें पाहिजे. अवघा एक प्रहर दिवस राहिला आहे." हें ऐकून दशरथराजा नीट बसून ह्मणाला, "वत्सा, मला सत्यप्रतिज्ञ कशाला ह्मणतोस ? निरपराध्यांना वनांत पाठविणें, ह्यांत सत्याचा लेश तरी सांपडेल काय ? बाळा, मला दुष्ट, निष्ठुर, शठ, नीच, मूर्ख, खाटिक, कामुक, अशीं संबोधनें दे. पुत्रा, तुझ्या अलौकिक गुणांचा ह्या पृथ्वीवर केवळ मलाच रे अनुभव आहे ! स्त्रीच्या मोहपाशांत सांपडून, रामा, तुला मी वनांत पाठवावें हा केवढा अपराध केवढें साहस व केवढा प्रमाद ? हें माझें निंद्य कृत्य कोणास कधीं तरी आवडेल काय ? अरे, अशा ह्या पापी पित्याचा ह्या स्थळीं वध करून तूं खुशाल राज्यपदीं बैस व सर्व प्रजांस सुखदाता हो. उदारशीले, महापतिव्रते, जानकि, अरे रामबंधो लक्ष्मणा, तुम्ही मात्र जगांत यावच्चंद्रदिवाकर कीर्तिप्रकाशांत रहावें आणि, हाय ! हाय ! ह्या अभाग्यानें दुष्कीर्तिकलंकरूप धुरांत डोकें चोळावेना ! रामा, मी आतां जीवंत कसचा रहातों ! जनकनंदिनि, तूं वनांत गेल्याचें वर्तमान

ऐकून मला माझा स्नेही जनक काय ह्मणेल? आपल्या मुलीस शूर वरापासून सुख मिळावें ह्मणून त्यानें शिवचापाचा पण लाविला! पण, माझे बाळे, तुझ्या सासूचा तुला वनांत पाठविण्याचा पण होता व मी असा नष्ट, निर्दय, घातकी, पातकी आहें, हें त्याला पूर्वी कशानें समजणार? जनकनंदिनि, रामचंद्राबरोबर तूं वनांत निघालीस हें वृत्त ऐकून मीं लज्जेनें खालीं मान घातली! तुजसारखी साध्वी स्त्री सर्व जगांत सांपडणार नाहीं. अशा पवित्रदर्शनेस, तिचा लेशही अपराध नसतां, वनांत पाठविणाराला मला धिक्कार असो! अग तुझ्या त्या पाषाणहृदय सासवेचे हे सर्व खेळ आहेत! त्या दुष्टेनें माझा सर्व प्रकारें घात केला! माझ्या तोंडास काजळ फासलें! यावच्चंद्रसूर्य मला निंदापात्र केलें! रामप्रिये, तुझे वनांत फार हाल होतील ह्मणून 'तू वनांत जाऊं नको,' असें जरी मीं ममतापूर्वक तुला वारंवार सांगितलें, तरी रामासारख्या पुत्रास वनांत पाठविणारा जो मी त्याचें सांगणें तुला केवळ कपटमय वाटेल! तू उदारस्वभावाची आहेस, ह्मणून जरी कदाचित् माझें बोलणें तुला खरें वाटलें, तरी हें तुला क्षणभरही रुचणार नाहीं. माझ्या रामचंद्राची तूं चंद्रिका आहेस. तेव्हां चंद्रिकेला त्याच्या बरोबर असलेंच पाहिजे, असें तूं बोलशील; परंतु तुजजवळ मा एवढेंच मागणें आहे कीं, त्या दुष्टेचा केवळ रामानेंच वनांत जावें अ हेतु आहे. तेव्हां निरुपायास्तव रामचंद्र जात आहे. लक्ष्मण ही बंधुप्रेमास्तव चालला आहे, हेंही ठीकच आहे. परंतु तूं आणर जाऊन त्या निर्दयेच्या अन्तःकरणास सुखवून आम्हास दुखवूं नको. वत्सा, तूं तरी तिला सांग. रामा, आतां ह्या वृद्धास ह्या भवसागरा हात कोण देईल? पुत्रा, वनांत जाऊं नकोरे! ह्या समयास तरी नको. आजची रात्र रहा. मला तुझ्याशीं पुष्कळ बोलावयाचें आहे. बाळा, खरोखर सांगतों, तूं माझें जीवित घेऊन जात आहेस! तू माझे प्राण हरण करीत आहेस! रामा, तू माझा जीव आहेस. अर्थात् तुझ्या वियोगानें हा दशरथ प्रेत झाला असें समज! माझ्या प्राणविसाव्या, मला तरी वनांत बरोबर ने! अहो प्रधानजी, माझ्या ह्या पुत्रांबरोबर बरेंच सैन्य, पुष्कळ द्रव्य, विपुल धान्य, व चौदा वर्षें पुरतील इतकीं वस्त्रें, तसेंच वनांत उपयोगीं पडणारें सामान, व

तेथें गेल्यावर राहण्यासारखें लौकर गृह करितां यावें ह्मणून तत्संबंधी सर्व साहित्य देऊन कांहीं शिल्पकारही द्या. ह्यांना तिळभरही तेथें वनवास वाटूं नये असें करा." ह्या प्रमाणें तो राजा दुःखाश्रु गाळीत सद्गदित अंतःकरणानें बोलत आहे, ह्यावर रामचंद्र विनयपूर्वक भाषण करणार, इतक्यांत ती चांडाळीण पुढें येऊन मोठ्या संतापानें व कठोर वाणीनें ह्मणाली, " हांहां! खबरदार!! हें आतां माझ्या प्रियभरताचें राज्य आहे. ह्यांतील एकही पदार्थावर आतां कोणाची सत्ता नाहीं. वनवास ह्याचा आपण अर्थ काय समजतां? त्या स्थळीं जसे ऋषि किंवा किरात राहतात, तसें ह्यांना राहिलें पाहिजे. आपण सुताचा धागाही ह्यांना देतां उपयोगी नाहीं, समजलांत! " नंतर रामचंद्र ह्मणाला- "मातेचें हें बोलणें अगदीं सत्य आहे. महाराज, मला बरोबर सैन्य नको, धन नको कीं कांहीं नको. आपला आशीर्वाद व आज्ञा ह्यांत सर्व राज्य येतें. राजसिंहासनाच्या पायरीवर पाऊल ठेवणें ह्यापेक्षां वनांत संचार करणेंच मला बरें वाटतें! आपण आह्मांविषयीं यत्किंचित्‌ही दुःखी होऊं नका. मला ह्याविषयीं मुळींच वाईट वाटत नाहीं. लक्ष्मण तर पहा कसा सज्ज झाला आहे तो. मी नको नको म्हणत असतांही, मजबरोबर अरण्यांत येणें हेंच आपल्या जन्माचें सार्थक्य समजून ह्या मैथिलीनेंही, आपली मला झालेली आज्ञा शिरसा मान्य केली आहे! " हीं सर्व भाषणें ऐकून सुमंत्रादिप्रधानांनीं कैकयेची फारच निंदा करून ह्मटलें कीं, "महाराजांचें हें कृत्य अगदीं अन्यायाचें आहे. रामासारख्या? सत्त्वशील पुरुषानें म्हणूनच हें तुमचें सर्व प्रकारें अन्यायाचें मागणें कबूल केलें." " निघण्याला विलंब होतो, त्वरा करा, आह्मांस लौकर आज्ञा द्या," असें रामचंद्र बोलतांच सर्व लोक तटस्थ झाले! स्त्रीसमाजांत कैकेयीवांचून सर्वांनीं रडून मोठा आकान्त केला. पुढील कर्तव्य कोणास कांहीं सुचेना. "रामचंद्रा, आतां निघावें," असें कोणाच्याही मुखांतून निघेना! इतक्यांत ह्या दुःखद प्रसंगाची नायिका जी पाषाणहृदया कैकेयी तिनें भर सभेंत येऊन तिघांस तीन मोठालीं वल्कलें नेसावयास दिलीं! तीं ह्यांनीं हातीं घेतांच प्रेक्षकांचीं हृदयें द्रवून जाऊन तो द्रव त्यांचे नेत्रांवाटे बाहेर पडूं लागला! त्यामुळें क्षणभर कोणास पुढें कांहीं दिसेनासें झालें! राम

लक्ष्मणांनीं तीं वल्कलें परिधान केलीं, सीता रामाच्या मुखकमलाकडे पाहून हळूच ह्मणाली " प्राणनाथ, हें मी या सभेमध्यें कसेंहो नेसावें ? किती तरी जाड हें! तेव्हां रामानें तें तिच्या नेसलेल्या पीतांबरावरच गुंडाळलें! तें पाहून बहुतेकांनीं मोठ्यांनीं रुदन केलें. तेव्हां तो विस्तीर्ण दिवाणखाना क्षणभर दुःखसागरच होऊन गेला! सीतेच्या वल्कलावर वसिष्ठांची दृष्टि जातांच त्यांचे डोळे लाल झाले व ते नखशिखान्त कांपूं लागले! तेव्हां त्या दुष्टेचें हे भस्मच करतात काय, असें वाटे! ते ह्मणाले, " दुष्टे, पापशीले, अधमाधमे, निर्लज्जे, आंधळे, अगे ह्या रामाला कां ह्मणून वनांत पाठवितेस ? बरें, तुझ्या दुष्ट हेतूस मान देऊन रामानें वनांत जाण्याचें कबूल केलें, लक्ष्मणही निघाला. इतक्यांत मोठें समाधान मानावयाचें तें सोडून, ही सुकुमारी जनककुमारी तुझें तोंड काळें करून मोठ्या आनंदानें पतीबरोबर वनांत चालली असतां तिला वल्कल नेसावयास देण्यास तुझे हात कसे पुढें सरसावतात! ते आहेत तरी कसले ? एवढ्या सभेंत निष्ठुर वचन बोलण्यास तुझी जिव्हा कशी लुडबुडते ! तुझ्या अंगांत आज संचार कोणीं केला ? रघुवंशप्रदीपावरची कज्जलशिखा होऊन सर्व स्त्रीजातीस कलंक कां लावूं पहातेस ! लोकोत्तर गुणांच्या योगानें ज्यांच्या प्रतिमाही जगतास पूजनीय व वंदनीय आहेत अशीं राम, लक्ष्मण, सीता, हीं प्रत्यक्ष देहधारी येथें असतां, त्यांना वनांत पाठवितेस, ह्या तुझ्या कृत्यास काय ह्मणावें ? असें तूं पूर्वजन्मीं कोणतें अघोर पातक केलें होतेंस— कीं ज्याच्या योगें सर्व जगताच्या निंदेस व रागास तूं पात्र व्हावेंस ! अशा गुणग्राम रामाला अरण्यांत घालवून अनर्थ, तिरस्कार व गालिप्राप्ति ह्यावांचून तुझ्या हातीं काय लागणार ? त्या भरतास तरी हें तुझें राक्षसी कृत्य आवडेल काय ? छे, छे, कधीं आवडणार नाहीं. महाराज, रामभद्र एकटाच वनांत जाऊंद्या. तो येईपर्यंत हें सर्व राज्य ह्या सीतादेवीचें आहे. ह्या पापिणीच्या पुत्रास राज्य दिल्यानें कोणासही संतोष होणार नाहीं. अर्थात् सर्वांचा असंतोष हाच राज्यनाशाला कारण होईल ! नाहीं तर आह्मी सर्व लोक, राज्यवैभव, सर्व धन, सर्व सैन्य, यांसह अरण्यांत चला जाऊं. मग ही व हिचा भरत ही निर्मनुष अयोध्या घेऊन बसूंद्या ! " ह्या प्रमाणें वसिष्ठांनीं व इतर शिष्टांनीं कैकेयीची

अनेक प्रकारें जरी निर्भत्सेना केली तरी अवश्यंभावि कांहीं कोणाला चुकावयाचें नाहीं, हें महत्तत्त्व त्यांच्या हृदयांत जागृत होतेंच! नंतर त्या तिघांनीं दशरथाच्या चरणीं मस्तक ठेवून, वसिष्ठवामदेवादि महात्म्यांची वंदनपूर्वक आज्ञा घेतली. त्यावेळीं वसिष्ठांनीं आपल्या अगाध ज्ञानाला व गहन विचारांला शोभणारें आणि सुश्राव्य असें त्यांच्याशीं थोडक्यांत भाषण करून त्यांस चार उपदेशपरही शब्द सांगितले. तेथून तीं जीं निघालीं तीं थेट कौसल्येपाशीं आलीं. तत्क्षणीं तिनें सीतेला पोटाशीं धरून तिचें मुखचुंबन घेतलें, व तिचे रेशमासारखे मऊ कर कंठांत घालून जानकी आपला मंगलप्रद कंठालंकार आहे असें दाखवीलें ! ती ह्मणाली " पुत्रा, हिला सुद्धां त्या घोर अरण्यांत घेऊन चाललासना ? जेथें न्याय नाहीं तेथें नीति क्षणभरही वास करीत नसते. ती पाहिजे असल्यास न्यायाचा वियोग होऊं देतां कामा नये, हें मी जाणतें. तूंच जर वनांत चाललास मग ही देवता येथें कशी राहील ? जानाकि, मजपाशीं राहतेस काय ? अग रहा. राम गेल्यावर तुझा सहवास मला थोडा बहुत तरी आराम करील ! कायग माझें नाहींना ऐकावयाचें ? बाळा, हिला फार फार जपरे. हिला अरण्यांत ऊन लागेल असें करूं नको. ही फार कोमलांगी आहे. हिच्यानें चालवणार नाहीं ह्मणून हळू हळू व थोडें चाला. हिच्यावर कधीं रागें भरूं नको. बरें येथल्यापेक्षां तेथें अधिक प्रीति कर. हिच्याशीं गोड गोड बोला. पुढें लक्ष्मण, मग ही, व नंतर तूं अशीं चाला. आमच्या कठोरहृदयांच्या गोष्टी काढून हिला दुःख देऊं नका. तहान लागली ह्मणजे पाणी द्या. वरचेवर वृक्षच्छायेखालीं विश्रांति घ्या. उन्हानें हिचे गाल लाल होतील ! घामानें सर्वांग डवडवून जाईल. थंडीनें चालवणार नाहीं, पर्जन्यांत बाहेर पडवणार नाहीं. तेव्हां सर्व ऋतूंत हिला फार फार जपत जा. आपल्यालाही जपा. रामा, अरे लक्ष्मणा, तुह्मी रानांत जाणार आणि प्रकृतीस जपा ह्मणून वेड्यासारखी मी काय सांगत आहें ! पेटलेल्या अग्नींत उडी टाकावयास सांगून भाजून घेऊं नका, अशा सांगण्यासारखेंच नाहीं का हें माझें सांगणें होत? सीते, मंदिरांत ही तुझ्यानें चालवत नाहीं, मग वनांत कसें पाऊल टाकशील ? ह्मणून ह्मणतें, बाळे, येथें रहा. पण तूं

कोठची ऐकणार ! मुली, तूंही ह्यांना जपत जा बरें. ह्यांना आपल्या जवळून कधींही कोठें जाऊं देऊं नको. काय भक्षण करावयाचें तें ह्यांच्या कडून वेळेवर भक्षण करीव. लक्ष्मण हा फार सुशील सौम्य व निष्कपटी आहे. ह्यास कधीं दुरुत्तर बोलूं नको, किंवा ह्यावर कधीं कोपूं नको. तुला किती सांगूं? तूं शहाणी आहेस. सारांश, तुमच्या वियोगानें केवळ देह मात्र धारण करणाऱ्या आह्मांस तुह्मी सुरक्षित येऊन सजीव करावें. रामभद्रा, पण चौदा वर्षे केव्हां रे जाणार ? एवढ्या काळांत काय होईल कोण जाणे ! आह्मा निर्दयां वरचें प्रेम विसरूं नका बरें." नंतर सीता मधुर वाणीनें ह्मणाली, " आपल्या उपदेशाप्रमाणें वागण्यासही वडिलांचाच आशीर्वाद पाहिजे. अहो, ज्यांबरोबर आनंद, शांति, निरिच्छा, प्रेम, पराक्रम, न्याय, सद्बुद्धि, दृढनिश्चय, दया, क्षमा, हें साहित्य आहे, ते कोठेंही जावोत त्यांना राज्यसुखासारखें, किंबहुना त्याहीपेक्षां अधिक सुख प्राप्त होईल. हें सामान असलें ह्मणजे बरोबर सैन्य नको, फारशीं शस्त्रें नकोत, धन नको, धान्याचें ओझें नको, वस्त्रें तरीं काय करावयाचीं ! अलंकाराचा भार तरी कशाला हवा ? मी जें थोडें बहुत नेत आहें, हें सर्वांच्या आग्रहास्तव. सासुबाई, अशा प्रकारची सामुग्री आह्मीं सर्वांनीं बरोबर घेतलेली आहे. ह्यांतील कितीही खर्च केली तरी ही कधीं संपावयाची नाहीं, हिला कधीं चोर भेटावयाचा नाहीं, कीं हिला बरोबर न्यावयाला गाड्यांचीही गरज नाहीं. आम्हाविषयीं तिळमात्र काळजी करूं नका. आपण मात्र सुखानें रहावें. आह्मांस वनवासाचें मुळींच दुःख वाटत नाहीं. माझ्या मातापितरांनीं व आपण जसा उपदेश केला, त्याप्रमाणें मी वागेन. चौदा वर्षांनंतर मग विचारा मी कशी काय वागलें तें ? ह्मणजे मग आपणास आनंद होईल." नंतर रामलक्ष्मणांनीं जेणेंकरून तिचें सांत्वन होईल असें थोडक्यांत भाषण करून ते तिच्या चरणीं मस्तक ठेवण्याकरितां जात असतां सीतादेवी एकीकडे झाली. कौसल्यामातेनें आपले बाहू पुढें करून त्यांस दृढालिंगन दिलें व आपल्या उष्णअश्रुजलानें त्यांस न्हाऊं घातलें. त्यांनीं तिला नमस्कार करून सद्गदित अन्तःकरणानें करुणा मूर्त्ति सुमित्रेची भेट घेतली व तिचा सदुपदेश सादर श्रवण

केला. नंतर तेथील सर्व लहान थोरांचा निरोप घेऊन शेवटीं कैकेयीला त्यांनी नमन केलें! तीं तिघें त्या दिवाणखान्यांतून निघालीं, त्यावेळीं त्यावाड्यांत फारच आकान्त झाला. तो काय वर्णावा!

द्वारामध्यें सुमंत्रानें रथ तयार करून आणलेलाच होता. त्यांत प्रथमतः रामाज्ञेनें सीता जाऊन बसली. तेव्हां असें वाटे कीं, ही साक्षात् द्विभुजा जगदंबा वल्कलरूप कवच घालून महिषासुरासारख्या दुष्टांना पादाक्रांत करून त्यांचा नाश करण्याकरितां निघाली आहे! तशांत तिच्या शेजारीं एक दोन धनुष्यें, कांहीं बाणांचे भाते, व दुसरीं अनेक आयुधें रथांत ठेविलेलीं होतीं, तेणें करून तर ती कल्पना अधिक संभवनीय झाली! " येतों आतां आह्मी. आह्मांवर सर्वांचा लोभ असावा, " असें ह्मणून रामलक्ष्मण रथाजवळ आले! व हळू हळू रथ चालवावयास सांगून आपण चालूं लागणार तों पिता दशरथ व त्यांच्या माता त्यांच्या पाठीमागून येऊन, " वत्सा, रामा, आह्मांस सोडून जाऊं नको रे, " ह्मणून मोठ्यानें ओरडून रडूं लागल्या! हजारों लोक तेथें त्यांच्या सभोंवती जमल्यामुळें रामलक्ष्मणांस पुढें एकही पाऊल टाकतां येईना! तेव्हां ते रथांत बसले. मग काय पुसतां! जिकडे तिकडे हाहाकार उडाला! त्यांनीं रथ चालवावयास सांगितला; परंतु लोकांच्या अतिशय गर्दीमुळें घोड्यांना पाऊल टाकावयाला जागाच नाहींशी झाली! आणखी कित्येकांनीं रथाचीं चाकें दाबून धरलीं, कित्येकांनीं तर घोड्यांचे लगाम घट्ट धरले! कित्येक रस्त्यांत आडवे पडून " न्या पाहूं कसा तो आह्मांवरून रथ! " असें बोलूं लागले! आणि " आह्मी ह्यांना कधीं जाऊं देणार नाहीं. आज राज्यांत एवढे शहाणे प्रधान व वसिष्ठवामदेवांसारखे ज्ञानी पुरुष जीवंत असतां ह्यांनीं हें अन्यायकृत्य कसें करविलें? आह्मांस हें त्या वृद्ध राजाचें आचरण मुळींच आवडलें नाहीं, आह्मीं ह्मणून कांहीं ह्यांस वनांत जाऊं देणार नाहीं. अहो तुह्मा सर्वांची आज सद्बुद्धि कोणीकडे गेली? निस्पृहता, स्पष्टभाषण, ह्यांची काय गति झाली? एकूण अयोध्येंत आतां न्याय नाहींसा झाला! सत्य बुडालें! हाय! हाय!. निरपराध साधुजनांच्या छळास आरंभ झाला! ज्याच्याकारितां महाराज आपल्या पोटच्या निरपराध मुलांला व ह्या सौभाग्यशालिनी आमच्या सीतामातेस

रानांत पाठविण्यास तयार झाले, त्या भरताचें राज्य कसें सुयंत्र चालेल हें दिसतेंच आहे! आमचा येथें आतां सुखानें वास कसा व्हावा! दयाळा रामा, अरे सज्जना लक्ष्मणा, सीताजननि, आह्मांस तरी त्या रानांत न्या. सीतादेवी तूं लोकमाता असतां आह्मास मातृविहीन करून अरण्यांत किमर्थ चाललीस!" असे अनेक तऱ्हेचे लोक उद्गार काढूं लागले. सुमंत्राचा पुढें रथ हांकण्याचा उपाय खुंटला! रामानें मोठ्या नम्रतेनें सर्वांचें सांत्वन करून "कृपा करून आह्मांस मार्ग द्या," अशी त्यांची वारंवार विनंती केली. रामप्रार्थनेमुळें निरुपायास्तव कांहीं लोक एकीकडे झाले. परंतु चोहोंकडून "हें काय, मार्ग देऊं नका, ह्यांना वनांत जाऊं द्यावयाचें नाहीं." असें लोक ओरडले! थोडा मार्ग मिळतांच सुमंत्र रथ चालवावयास लागणार तों ते अश्वच पुढें पाऊल टाकीतना! टापांनीं जमीन खाड खाड वाजवूं लागले! चोहोंकडे टौकारून पाहूं लागले! तें पाहून सर्वांस आश्चर्य वाटलें! व कित्येक ह्मणाले कीं, "अहो, जें जनावरांना सुद्धां कृत्य पसंत पडलें नाहीं, तें शहाण्या ह्मणविणाऱ्या मनुष्यांनीं केलें! तेव्हां आतां ह्यांना काय ह्मणावें" नंतर थोड्या वेळानें त्या कुशल सारथ्यानें रथ हळू हळू चालविला असतां हा आपला सन्मनोरथच वनांत ओढीत नेत आहे, असें तेथें प्रत्येकास वाटलें. लोक रथाच्या पाठीमागून व बाजूनें 'रामा, रामा,' ह्मणून धांवतच होते. खिडक्यांतूनही हजारों नरनारी त्या लोकबंधु रामाचें दर्शन घेत असतां त्यांचे मुखांतून निघालेलीं निराशेचीं व करुणा उत्पन्न करणारीं भाषणें ऐकूं येऊं लागलीं. राम पुनः पुनः पाठीमागें वळून पाही व लोकांना न येण्याविषयीं हातांनीं सांगे. ह्या प्रमाणें लहान मोठ्या मार्गांनीं जातां जातां कांहीं वेळानें मोठ्या कष्टानें तो रथ अयोध्यानगरीच्या दक्षिणदिशेस बाहेर पडला. तरी शतशः ब्राह्मण अग्निहोत्राच्या साहित्यासुद्धां पाठीमागून एकसारखे धांवत सुटले आहेत, असें पाहून रामानें रथ थांबविला व लक्ष्मणासह खालीं उतरून त्यांस "तुह्मी कितीही मनःपूर्वक व दीन स्वरानें माझी विनंती केलीत तरी माझें परत येणें होणार नाहीं" असें बहुत प्रकारें सांगितलें. तरी त्यांची समजूत होईना! नंतर संध्याकाळ होत आहे तों, जिच्या सभोंवती असणारे

हजारों लहान मोठे वृक्ष पश्चिमुखानें ज्याचें स्वागतच करीत आहेत अशा तमसा नदीच्या तीरीं रामचंद्र सर्व मंडळीसह आला. तत्क्षणीं रामचंद्रानें आमच्या चरित्रनायिका सीतादेवीस रथांतून खालीं उतरविलें. तीं सर्व एका वृक्षाखालीं उतरलीं. सुमंत्रानें घोडे सोडून त्यांस उदक पाजिलें, व दाणा देऊन वैरण घातली.

त्या रथांत त्यांस अगदीं अवश्य लागणाऱ्या वस्तूंचें लहानसें गाठोडें सांपडलें; तें सोडून त्यांतील एक दोन भांडीं सुमंत्रानें बाहेर काढिलीं. नंतर त्या नदीवर जाऊन सर्वांनी यथासांग नियमित कर्मे संपादिलीं. त्या रात्रीं कोणीं काहीं खाल्लें नाहीं. लक्ष्मणानें कोमल कोमल पल्लव आणून त्यांची विस्तीर्ण शय्या करून ती वारंवार अश्रुजलानें धुवून तीवर सीतेला निद्रा घ्यावयास सांगितलें. नंतर रामानेंही तेथेंच विश्रांति घेतली. ब्राह्मणादि सर्व निजले. चोहोंकडे स्वच्छ चांदणें पडलें असून वाराही वहात होता. सर्वांस लौकर झोंप लागली. लक्ष्मण व सुमंत्र हे मात्र रात्रभर जागे असून पुनः पुनः रामचंद्राच्या वनप्रस्थानाच्या संबंधानें झालेल्या गोष्टी बोलत होते. सीतादेवीचें वनांत रहाणें कसें होईल ह्याविषयींही त्यांचें बोलणें झालें. चंद्रास्त होऊन बराच वेळ झाल्यानंतर ह्मणजे सुमारें प्रहर एक रात्र राहिल्यावर रामचंद्रानें उठून प्रधानास हळूच अश्व जोडावयास सांगून येथून मुकाट्यानें लौकर निघण्याचा आपला बेत सांगितला. कारण कीं आम्हांस परत नेण्याच्या किंवा आमच्या बरोबर येण्याच्या दृढ संकल्पानें हे श्रेष्ठ ब्राह्मण आह्मांबरोबर आले आहेत. आह्मांस परत तर जातां येत नाहीं. तेव्हां ह्यांनीं आह्माबरोबर विपत्ति भोगाव्या हेंही योग्य नाहीं. ह्मणून त्यांस न पुसतां जाणें हेंच बरें. ह्या योगानें त्यांस फार वाईट वाटेल खरें, पण काय करावें ? हा बेत त्यांसही मानवला. रथ सिद्ध करून झाल्यावर लक्ष्मणानें परमपूज्य सीतावहिनीस उठविलें, व आपण लौकर कां निघालों, हें तिला सांगून रथांत बसविलें. सीतेची झोंप पुरी झाली नव्हती, ह्मणून रथांत असतां डोळे मिटून आपला सर्व भार तिनें रामचंद्रावर टाकिला होता. रथ प्रथम मोठ्या मार्गानें झपाट्यानें नेऊन मग चांगलें दिसावयास लागलें तेव्हां आडमार्गानें नेला. त्या ब्राह्मणांना अशा रीतीनें तेथें निद्रित ठेऊन आपण आलों, हें बरें

झालें नाहीं, असे सीतेनें रामापाशीं पुनः पुनः उद्गार काढिले. रामानेंही 'मला तसेंच वाटतें, परंतु निरुपायास्तव असें करणें भाग पडलें, ह्यास काय करावें ?, असें तिला सांगितलें. प्रभातकाळ झाला, तेव्हां चोहोंकडे पडलेलें दंव पहातांच असा भ्रम झाला कीं, सर्व दिशांनीं, सीतेस होणाऱ्या क्लेशांमुळें सोडलेलें हें अश्रुजलच होय! पक्षी ओरड करून चोहोंकडे भ्रमण करूं लागले. रात्रौ वृक्ष व वल्ली ताज्यातवान्या होऊन अनेकप्रकारच्या पुष्पांनीं व सुगंध वायूंच्या मिषानें आपले मनोविकार प्रकट करीत आहेत कीं काय असें वाटे! त्या मार्गावरून बाजूला असलेले गांव स्वच्छ दिसूं लागले; त्यांतून वर येणारा धूर रामचंद्राच्या वनवासामुळें त्या ग्रामस्थांस झालेल्या दुःखांचा द्योतकच आहे असें भासे! रथ चालत असतां रामचंद्रास सीता अनेक प्रश्न करीत होती. त्यांचीं तिचें मनोरंजन होईल अशा रीतीनें तो आपल्या प्रियेस उत्तरें देत होता. सुमंत्रही वारंवार मागें तोंड करून तत्संबंधानें त्यांस अनेक प्रकारची जुनी माहिती सांगत होता. जातां जातां त्यांस कोसलदेशांतील वेदश्रुति नांवाची नदी लागली. तत्तीरीं त्यांनीं पुष्कळ वेळ विश्रांति घेऊन स्नानसंध्यादि कर्मे व फलाहार केला. नंतर मार्गक्रमण करितां करितां गोमती नांवाची नदी त्यांनीं उल्लंघिली. नंतर बऱ्याच वेळानें आपल्या कोसलदेशाची दक्षिण सीमा जी स्यंदिका नदी तिचें प्रेमाश्रुपूर्वक दर्शन घेऊन तिच्या पैल तीरास तीं गेलीं. नंतर गहींवर येऊन त्यांनीं आपल्या परम पूज्य कोसल देशास नमस्कार केला व सुमंत्रानें वेगानें जो रथ चालविला तो अस्तमानसमयीं शृंगवेरनामक लहानशा नगरांत आणून सोडिला.

श्रोतेहो, कदाचित् ह्यावेळीं कोणास अशी शंका येईल कीं दशरथ हा सार्वभौमराजा असतां त्याचे राज्याची दक्षिण सीमा अयोध्येहून रथगतीनें एकाच दिवसांत संपते, हें कसें ? तर ह्याचें उत्तर हेंच कीं, त्याकाळीं सार्वभौम राजे हे आपल्या ताब्यांत नियमित प्रदेश ठेवून इतर देश दुसऱ्यांच्या अधिकाराखालीं देत, व त्यांपासून ते करभार मात्र घेत. हेच संस्थानिक किंवा मांडलिक होत. अफाट देशाचें राज्य करून त्यांतील कोट्यावधि लोकांच्या रक्षणाविषयीं दुर्लक्ष करून

त्यांचे शाप घेत बमणें ह्यापेक्षां हींच व्यवस्था उत्तम होय, असें मला वाटतें. मांडलिकांवर सार्वभौम राजाचा दाब असतोच असतो. असो.

नंतर त्या नगराच्या बाहेरच्या रस्त्यानें मंदगतीनें अश्व चालवीत, भागीरथीच्या तीरीं तीं सर्व आलीं.अहाहा! त्या स्थळाची अनिर्वचनीय पवित्रता, अप्रतिम रमणीयता, अवर्णनीय शोभा, विलक्षण गंभीरता, व अतर्क्य महती काय सांगावी? हिमालयाचीच ती कन्या! मग तिचें सौंदर्य पित्यापेक्षांही अधिक मनोहर कसें असणार नाहीं? दोन्ही तीरीं लहान मोठे वृक्ष, हिच्या सहवासामुळेंच जणूं डोलत आहेत! झाली निष्पाप झाल्या ह्मणूनच पुष्ट होऊन राहिल्या आहेत! नाना प्रकारचीं फुलझाडें, पुष्पलता, आपल्या सुवासानें आपलें महद्भाग्य जणू सांगत आहेत! मयूर, सारस,क्रौंच इत्यादि अनेक विहंगम आपल्या हृदयंगम शब्दांनीं, आह्मांस तो पापी मानव देह नको, असेंच सांगतात काय असा भ्रम होत आहे! कितीही व कसलेही पातकी येवोत, त्यांस निर्मळ करण्यास मजपाशीं विपुल जागा आहे, असें ती आपल्या उभय तीरांकडील अफाट वाळवंटांनीं दाखवीत आहे, असें वाटत आहे! आणि ह्या जान्हवीची परोपकरार्थ तीन्ही लोकांत गति आहे! खरोखर हिचें दर्शन होतांच सदयहृदय जनांस ही भक्तांची माउली, ऋषींचें विश्रामस्थान, संसाररोगानें पीडितांना दिव्य औषध, अशा प्रकारची आहे, असें वाटलेंच पाहिजे! अशा ह्या नदीच्या कांठीं एक मोठा हिंगणबेटाचा वृक्ष होता, त्या खालीं हीं सर्व उतरलीं. लक्ष्मणानें सीतेला बसावयास नीट जागा करून दिली. रामचंद्रासही येथें बसा, ह्मणून सांगून कांहीं अवकाशानें लक्ष्मण व सुमंत्र बसले. दूतमुखांनीं ह्यांच्या अगमनाचें वर्तमान समजतांच त्या नगरचा गुहनांवाचा कोळ्यांचा राजा त्या स्थळीं आला. हा दशरथाचा फार स्नेही असून रामचंद्रावर तर लहानपणापासून त्याचें अत्यंत प्रेम असे. हा मोठा धार्मिक, विरक्त व ब्रह्मज्ञानी होता. ह्याला रामचंद्रादि चार बंधूंचें व सीतादेवीचें लहानपणापासूनचें सर्व इतिवृत्त माहीत होतें. रामचंद्रानें ह्या एवढ्या ह्मणजे छतीस वर्षांच्या वयांत केलेलीं सर्व कृत्यें, त्याचे अद्वितयि गुण, योगीश्वर विश्वामित्रांनीं त्याला लक्ष्मणासह वनांत नेल्यावर त्यानें तेथें केलेले पराक्रम, त्यांजपासून संपा-

दन केलेल्या विद्या, अहल्योद्धार, रुद्रचापभंग, परशुरामगर्वहरण इत्यादि सर्व कांहीं त्याला पूर्ण विदित असल्यामुळें, व वारंवार साधु, महर्षि, मुमुक्षु ह्यांच्या दर्शनप्रसंगीं निघालेल्या अनेक गोष्टींवरून व त्याच्या प्रत्यक्ष दर्शनानें प्राणिमात्राच्या उद्धारार्थ, सज्जनांच्या रक्षणार्थ, दुर्जनांच्या नाशार्थ व मनुष्याला इहलोकीं कितपत सद्वर्तनानें वागतां येईल हें सांगण्याकारितां, परमेश्वरानें हें मानवरूप धारण केलें आहे, अशी त्याची पक्की खात्री झाली होती! त्यानें मोठ्या भक्तीनें सर्वांच्या चरणांस वंदन करून त्यांस अति नम्रतेनें आपल्या नगरांत येण्याविषयीं फार आग्रह केला, परंतु रामचंद्रानें अयोध्येहून निघण्याचें आपलें सर्व वृत्त कळवून आपले नेमधर्म काय आहेत, तेंही सांगितलें. त्या भक्तिमान् किरातराजानें त्यांस समर्पण करण्याकरितां पुष्कळ जिन्नस आणिले होते. परंतु त्याच्या अत्यंत भक्तिस्तव त्यानें कांहीं फळें व घोड्यांकरितां थोडी वैरण यांचाच मात्र स्वीकार केला. रामाविषयीं ज्याची परमेश्वरावतारिक पुरुष ह्मणून दृढ बुद्धि झाली होती, त्याचें त्या शृंगवेरच्या भोळ्या राजानें फारच स्वागत केलें व त्याच्या पुढें आपण अत्यंत मूढ, मंदमति, पापी आहों ह्मणून वारंवार सांगून आपली निष्कपट भक्ति व प्रेम अनेकप्रकारें व्यक्त केलीं हें काय सांगावें? नित्य कर्में संपादिल्यावर लक्ष्मणानें घालून दिलेल्या विस्तीर्ण तृणशय्येवर सीतेनें, आपल्या विलासमंदिरांतील पर्य्यंकावरील शय्येवर निजावें त्याप्रमाणें, मोठ्या आनंदानें निद्रा घेतली! जवळच दर्भांच्या बिछान्यावर रामचंद्र विश्रांति घेत असतां तो गुहराजा जवळ येऊन रामचंद्र नको नको ह्मणत असतांही, त्याचे चरण चुरूं लागला. त्यांनीं प्रथमतः कांहीं व्यवहारिक गोष्टी बोलून नंतर ब्रह्मस्वरूपाविषयीं फार वेळ भाषण केलें. रामचंद्राच्या अप्रतिम वाक्चातुर्यानें व अनपायि ज्ञानाच्या योगानें तो भ्रमरहित होऊन संतृप्त झाला! तरी तो ह्मणाला "तुह्मांस पित्यानें वनांत पाठविलें, हें कृत्य, तृषार्तानें वाहती गंगा सोडून मृगजलपान करण्याकरितां वनांतरीं भटकावें असें झालें." नंतर तो लक्ष्मणास ह्मणाला, "लक्ष्मणा, अरे एवढा वेळ कशाला जागतोस? माझ्या राज्यांत कोणास कशापासूनही भीति नाहीं. सर्वत्र शांतता

आहे. तूं खुशाल नीज." हें ऐकून त्याचे मोठे उपकार मानून लक्ष्मणानेंही निद्रा घेतली. तो किराताधिपति व त्याचे सेवक मात्र रात्रभर तेथें रामसेवेविषयीं जागृत होते.

ह्याप्रमाणें अयोध्येहून निघाल्यापासून दोन रात्रि गेल्या. तिसरा दिवस उजाडला. सर्वांनीं त्या गंगेच्या थंड, पवित्र व निर्मळ जलांत स्नानें केलीं, व सर्व कर्में संपादिलीं. नंतर, जेथें आपलें कोणी नाहीं व आपला पोषाक जेथें करण्यास फार अडचण पडते, अशा विदेशांत जावयाचें असलें ह्मणजे प्रवासिलोक जसे तद्देशीय वेष धारण करतात, तरी त्यांत स्वदेशीय वेषाची कांहीं तरी छटा असल्या शिवाय राहात नाहीं, त्याप्रमाणें त्या स्थळीं आमच्या ह्या तीन्ही वनप्रवाशांनीं, आपल्या डोक्यांत वडाचा चीक घालून मुनींच्या सारखे आपले जटाभार रचिले! जीं अल्प वस्त्रें होतीं त्यांचें त्यावेळीं गांठोडें बांधून वल्कलें परिधान केलीं! मुनिवेष जरी त्यांनीं स्वीकारला, तरी त्यांनीं धनुष्यबाणांचा त्याग केला नव्हता. सीता जरी ऋषिपत्नी दिसत होती, तरी तिच्या अंगावर थोडे बहुत अलंकार होतेच. कायहो दैवाचे खेळ तरी! मनुष्यदेह प्राप्त झाला कीं त्याच्या विचित्र करणीस क्रीडास्थान मिळालेंच! त्यानें कोणासही सोडिलें नाहीं! नवमीच्या दिवशीं कर्क लग्नावर अयोध्यापुरींत, ज्याच्या सभोंवती हजारों लोक असून सन्निध सीता व लक्ष्मण उभीं आहेत व ज्यानें भरजरी पोषाक केला असून मूल्यवान् आलंकार घातले आहेत अशा रामचंद्रास, हजारों द्विजांच्या हस्तें समंत्रक अभिषेक होऊन राज्यमुकुट प्राप्त होणार होता, व जो प्रजांचे कल्याणाविषयीं चिंतन करणार होता, त्या रामचंद्रानें एकादशीस प्रातःकाळीं मेषलग्नावर शृंगवेरनगरांत कोळ्यांसमक्ष जटाभार बांधून वल्कलें धारण केलीं आहेत! वनवायुच्या गंगाजलाचे तुषार उडवीत असतां द्विजांच्या कलकलाटांत तो जान्हवीच्या पैल तीरास जाण्याचे विचारांत मग्न आहे! केवढें आश्चर्य हें! त्याप्रमाणेंच जिची वेणी घालावी म्हणून शतशः दासी तत्पर असत व जिला ज्यादिवशीं ती घालावयास सांपडे ती त्या दिवशीं आपणास धन्य धन्य मानी, त्या सिता देवीनें स्वहस्तें वनांत आपल्या केशांमध्यें वडाचा चीक घालावाना.

तस्मात् हे नियतिदेवते ! तुझ्या अत्यद्भुत व सर्वांच्या अनुभवास येणाऱ्या अशा नानाविध लीलांनीं व सतत जागरूकतेनें तूंच सर्व देवांच्या अगोदर नमस्कारास योग्य आहेस ! अस्तु; पैलतीरास त्यांची जाण्याची तयारी होतांच रामचंद्र ह्मणाला, " सुमंत प्रधानजी' ही दिव्य नदी तरून गेल्यावर आह्मीं पायांनींच वनांत संचार करणार, तेव्हां हा रथ घेऊन आपण लवकर प्रिय पित्याकडे जावें. ते आमच्यासाठीं तुमची वाट पाहत असतील. त्यांना व मातृचरणीं आह्मी कुशल व आनंदांत आहों ह्मणून सांगा. आपल्या प्रिय स्नुषेची किंवा अह्मांविषयीं तिळमात्र काळजी करूं नका व आपण आमची आठवण करून शोकाकुल होऊं नका, अशी आमची त्यांचे चरणतीर्थीं विज्ञापना कळवा. शरीरप्रकृतीस जपण्याविषयीं आमची इच्छा सांगा. आणखी त्यांना असें निवेदन करा कीं, आपला प्रिय व संमाननीय मित्र शृंगवेराधिप ह्यानें आमचें, आह्मी कधींही विसरणार नाहीं असें, फार फार स्वागत केलें. भरताला राज्य नीतीनें करावयास सांगून शत्रुघ्नास त्यास ह्या महत्कार्यीं कायावाचामनेंकरून साहाय्य कर, ह्मणून निरोप कळवा. अयोध्येंतील सर्व लोकांस आह्मी फार फार पुसिलें आहे ह्मणून सांगावयास विसरूं नका बरें. " हें ऐकून सुमंत्रानें फारच हृदयद्रावक भाषण केलें व शेवटीं " आपली आज्ञा प्रमाण, " ह्मणून " आपण पैल तीरीं गेल्यावर हा आपला दुर्दैवी सेवक निघून जाईल. " इतकेंच तो ह्मणाला. तदनंतर गुहराजानें आपली स्वतःची स्वस्तिका नांवाची सुंदर नाव आणविली. ती हाकारण्याकरितां स्वतः आपण वर चढला. सीतादेवीस प्रथमतः वर घेऊन नंतर त्या बंधुद्वयास चढण्यास सांगितलें. तो किरातांचा स्वामी ज्या उत्तम स्थानीं बसे तेथें तीं तिघें बसलीं, त्यानें लगेच ती नौका चालविली. तेव्हां सुमंत्र ह्मणाला, " रामचंद्रा, आज वनांत चाललासना! हळू जा. लक्ष्मणा मीच तुह्मांस वनांत पोंचविण्यास आलों ! माझ्यानें पुढें बोलवत नाहीं. सीताबाई, मला सर्वांनीं क्षमा करा. माझें स्मरण ठेवा. "

सीतेनें त्या देवतामय नदीची प्रार्थना केली कीं, हे दुःखविमोचनशीले, भागीरथि, मी तुला अनन्यभावें नमस्कार करितें. ह्या अरण्यवासाच्या चौदा वर्षांत आमचें सर्व प्रकारें रक्षण करणारी तूंच आहेस ! मला

प्राणवल्लभ बरोबर आणीत नव्हते, परंतु माझ्या आग्रहावरून त्यांनीं मला आपल्या समागमें घेतलें आहे. तेव्हां त्यांच्यावर माझ्यामुळें अथवा दुसऱ्या कोणत्याही कारणानें संकटें न येतील असें कर. त्रिवर्गांतून क्षणभर सुद्धां कोणाची चुकामुक होईल असें कधीं करूं नको. आह्मांवर कृपादृष्टि ठेव. फलमूलजलतृणादिकांचा आह्मांस कधीं तोटा न पडावा. तेथें माझा पतिशुश्रूषेंत, भगवन्नामस्मरणांत व महान् महान् ऋषिजनांच्या दर्शनांत काळ जावा. तुला आणखी किती प्रार्थूं ? स्त्रीजातीचीं सर्व दुःखें तूं जाणतच आहेस. "अशा आशयाची ती प्रार्थना करीत आहे व गुह त्यांस ह्या ठिकाणीं इतकें पाणी आहे, पर्जन्यांत हिचें पाणी इतकें वर चढतें, हिचें पात्र अमुक स्थळीं फार विस्तृत आहे, अशा त्या महा नदीसंबंधानें गोष्टी सांगत आहे, तों पैल तीर आलें. तीघेंही नौकेंतून पुलिनावर उतरलीं. गुहानेंही उतरून रामलक्ष्मणांस दृढालिंगन दिलें. सर्वांनीं डोळ्यांतून पाणी काढलें. " रामचंद्रा, हळू जा, लक्ष्मणा, फार चालूं नका ! विश्रांति घेत घेत जा ! सीतादेवीला फार फार जपा. " असें गुहानें पुनः पुनः त्यांस सद्गदीत अंतःकरणानें सांगून तीं कोठें जातात, कोठें उतरतात कदाचित् मार्ग चुकलीं तर त्यांना तो सांगावा ह्मणून त्यांच्या आगेंमागें चालणारे आपले दोनतीन गुप्त हेर पाठविले. उत्तर तीराहून आपल्याकडे सतत पाहून " हळू जा, हळू जा, " ह्मणून वारंवार ओरडणाऱ्या वृद्ध सुमंत्रास रामलक्ष्मणांनीं " आपण जावें आतां, आह्मी हळू जातों बरें. " असें मोठ्यानें बोलून व हातांच्या खुणांनीं सांगितलें. आणि त्यांनीं त्या भव्य रथाकडे व दिव्य अश्वरत्नांकडे आणखी एकदां अश्रुपूर्ण दृष्टीनें पाहून शेवटीं तिकडे पाठ केली. पाठीस डोळे नाहींत हें फार चांगलें आहे, असें त्यांस त्या समयीं वाटलें! नंतर त्या गुहराजाचा निरोप घेऊन त्यांनीं अरण्याचा मार्ग धरिला.

## उच्छ्वास तिसरा

पुढें लक्ष्मण मध्यें सीतादेवी व पाठीमागें रामचंद्र ह्याप्रमाणें हीं चाललीं. ह्या वनप्रदेशास वत्स असें नांव होतें. कोश अर्ध कोश दक्षिण दिशेकडे चालून नंतर त्यांनीं पूर्वदिशेकडे जाणाऱ्या मार्गाचें अवलंबन केलें. इतक्या वेळांत सीतेला फार श्रम होऊं नयेत ह्मणून रामलक्ष्मण पुष्कळदां वृक्षच्छायेखालीं बसले. परंतु कोश दीड कोश तीं गेलीं नाहींत तोंच उन्हानें अतिशय आरक्त झालेलें व ज्यावर घर्म बिंदूंचें विस्तीर्ण जाळें पसरलें आहे, असें आपलें मुखकमल सीतेनें रामचंद्राकडे फिरवून ह्मटलें, " प्राणवल्लभा, " अजून किती तरी चालावयाचें आहे ! अरण्य नाहीं का अद्यापि आलें? माझे पाय दुखूं लागले अगदीं !"हें ऐकून रामचंद्र अत्यंत खिन्नान्तःकरण होऊन ह्मणाला, "प्रिये, आपण ज्यामधून चालतों आहों हें अरण्यच आहे. हे मृद्वंगि, आपण अगदीं हळू हळू चालूं बरें. वरचेवर विश्रांति घेऊं, ! तुझे कोमल चरण लाल झालेले मी केवढा वेळ तरी पहात आहें ! सुंदरि, तू लक्ष्मणासह अयोध्येस रथांतून जातेस काय. तुमच्या जाण्यानें अयोध्येंत सर्वांस आनंद होईल." ती साध्वी 'हो मी परत जातें.' असें कशी ह्मणेल? असो; तीं तिघें निबिड छाये खालीं विश्रांति घेत घेत, ठायीं ठायीं शीतळ व स्वच्छ उदक पीत पीत, मधुर मधुर फळांचें सेवन करीत करीत, मंद मंद गतीनें जात आहेत तों त्यांस, जेथें एकापेक्षां एकेक मोठाले उंच जणूं गगनाचें चुंबनच घेत आहेत व कित्येकांना पुष्ट व फलपुष्पांनीं युक्त अशा लतांनीं वेष्टून टाकिलें आहे असे वृक्ष, असून नानाप्रकारचीं लहान लहान झाडें, वेली, ह्यांचीही ज्याठिकाणीं गर्दीच गर्दी होऊन गेली आहे; आणि सूर्य किरणांचा ज्या स्थलीं प्रवेश क्वचितच होत असल्यामुळें अंधकारास निर्भय आश्रय मिळाला आहे. जीर्ण व वाळलेल्या पानांनीं आणि गवतानें जेथील भूमि व्यापून टाकिल्यामुळें बारीक सारीक वाटही कोठें दिसत नाहीं ! कोठेंही दृष्टि फेंकिली कीं पक्ष्यांचीं हजारों घरटीं दृष्टीस पडत आहेत ! अनेक पक्ष्यांचा मिश्रित झालेला किलकिलाट कानांवर आदळत आहे ! मेघागमनभ्रांतीनें वसंतांतही मयूरादि टाहो फोडून सर्व वनवासिप्राण्यांना ह्या त्रिवर्गाचें आगमनच जणूं जाहीर करीत आहेत! आंब्यांचे मोहोर आपल्या परिमळानें दशदिशीं भट-

कणाऱ्या भ्रमरांस मधुस्वादनाकरितां आमंत्रणच करतात काय ! वन-स्वर्गींच्या वारांगनाच काय अशा कोकिला, आपल्या मधुर स्वरांनीं सर्वत्र प्रसन्नता करून सोडीत आहेत; अक्रोड, बोरी, आंबे, बदाम, इत्यादि व ज्यांचीं नावें अजूनही मनुष्यजातीस माहीत नाहींत अशा अनेक वनस्पति, लता, कुंज, पर्णें, पुष्पें, फळें, ह्यांनीं अगदीं नम्र होऊन गेले आहेत! हजारों सुगंधित पुष्पांवरून वहाणाऱ्या वायूनें, मृतांस जणूं सजीव करणारा असा घमघमाट सोडला आहे ! अनेक वनपशूंचे कळप व सर्पादि दुष्ट प्राणी वाटेल तेथें निर्भय संचार करून ही आपली वास्तव्यभूमि आहे, असें सगर्व सांगत आहेत, अशा प्रकारचें अफाट व दाट अरण्य लागलें. अशा ह्या अगनगखग-मृगभुनगप्राणिसत्ताक वीस्तीर्ण काननराष्ट्रांत प्रवेश करतांच रामलक्ष्मण हे बरोबरच्या आयुधांनीं सज्ज झाले. त्यांतून बरेंच चालल्यावर सुमारें प्रहर एक दिवस राहिला असतां तीं एका विस्तीर्ण तरुतळीं उतरलीं. क्षत्रियांना आवश्यक तीं धर्मकृत्यें करून त्यांनीं सायंकाळीं फलाहार केला व उदक प्राशन केलें. लक्ष्मणानें घालून दिलेल्या पल्लव शय्यनावर अगोदर सीतेनें व नंतर रामचंद्रानें, लक्ष्मणाशीं कांहीं गोष्टी बोलून, निद्रा घेतली. लक्ष्मण जागत बसला. पूर्वींच्या दोन रात्रींप्रमाणें ह्या रात्रीं त्याच्यावरोबर बोलण्यास कोणी नव्हतें. ती रात्रच जणूं एकसारखी आपल्याशीं बोलत आहे असें त्याला वाटलें. बंदिजनांच्या मधुरतर गायनानें व मंजुळ वाद्यरवांनीं जें दंपत्य दररोज पंचपंचोषः काळीं अयोध्येंतील सुंदर प्रासादांतील सुवर्णपर्यंकावरील अत्यंत मृदु व पयःफेनाप्रमाणें शुभ्र अशा शयनावरून उठावयाचें तें अनेक पक्ष्यांच्या कर्कश शब्दांनीं व नवपशूंच्या भयंकर ओरडण्यांनीं मध्य रात्रीच्या सुमारास किर्र अरण्यांत जागृत झालें ! मग रामचंद्राच्या अत्यंत आग्रहा मुळें लक्ष्मणानें झोंप घेतली. दुसरे दिवशीं ह्मणजे शुक्ल द्वादशीस प्रातः काळीं तेथून निघालीं तीं पूर्व दिवसापेक्षांही मंदगतीनें चालत चालत तिसऱ्या प्रहरीं एका स्थलीं आलीं. तें स्थान दृष्टीस पडतांच तेथें कोठें तरी जवळच ऋषींचा आश्रम असावा, असें त्यांस वाटलें. कारण, त्या वनप्रदेशीं कोठें कोठें दर्भांच्या जागा दिसत होत्या, चोहोंकडे समिधांचे वृक्ष असून आणखी पिंपळ, वड, पारिजातक, सुरंग, चंपक,

अगस्त्य, इत्यादि लहान मोठे तरु दाटीनें लागलेले होते. त्यांच्या पलीकडे कांहीं शेतजमिनी होत्या. हळू हळू जातां जातां हरिणांचे कळप निर्भयपणें संचार करीत असतां त्या धनुर्धाऱ्यांच्या दृष्टिगोचर झाले! ज्या मार्गानें तीं चाललीं होतीं, त्याच्या बाजूला वल्कलांचे तुकडे, समिधा, फुटलेले रुद्राक्ष, कमंडलूंचीं शकलें, कमरेंतील मौळां-च्या दोऱ्या, तेलकट दगड वगैरे पडलेले होते. शुकादि अनेक जातींचे द्विज-समुदाय वृक्षस्कंधावर बसून कोणी वेदांतील ऋचा, कोणी स्मृतींतील श्लोकार्ध, कोणी पुराणांतर्गत वाक्यें, कोणी परमेश्वराचीं स्तवनपर संबोधनें, कोणी भगव स्तोत्रें, स्पष्टपणें ह्मणतांना ऐकून त्यांना अतिशय समाधान व धन्यता वाटली! आणि तत्क्षणीं त्या आश्रमदर्शनाविषयीं त्यांची उत्सुकता वाढली! पुढें थोडें चालल्यावर दाट व थंड वृक्षच्छाये-खालीं कित्येक गाई डोळे मिटून रवंथ करीत असतां, कित्येक आपल्या माना तरुमूलांशीं घांशीत असतां, कित्येक एकमेकांस प्रेमपूर्वक चाटीत असतां व कित्येक आपल्या वत्सांस पाजीत असतां, त्यांनीं पाहिल्या! आण-खी कांहींसें गेल्यावर लहान लहान सदा फुलणारीं फुलझाडें, प्रफुल्लित लतांचे मनोहर कुंज, आंब्यांचे व फणसांचे वगैरे वृक्ष त्यांस लागले. पुढें पुढें पाण्याचे पाट चोहोंकडे पसरलेले होते. ऋषिशिल्पकारांनीं स्वर्गीं जाण्याला बांधलेला त्या युगांतील लोखंडी पूलच काय असा दाट धूम वर दिसत होता! धूमाच्या योगानें आसमंतात् भागांतील कित्येक वृक्ष, परोपकारासाठीं अत्यंत श्रम करणाऱ्या पुरुषांप्रमाणें, निस्तेज असलेले त्यांना दिसले. अशी अत्यंत मनोहर शोभा पहात पहात तीं चाललीं असतां त्यांस प्रथमतः ऋषिपुत्रांनीं पाहिलें. तत्क्षणीं ते मनांत म्हणाले की, "हीं अलौकिक रूपें कोणांचीं असावींत बरें? ह्यांनीं जटावल्कलें धारण केलीं आहेत एवढ्या कारितांच ह्यांना मुनि ह्मणावें, तर ह्यांचेठायीं क्षात्रतेज चकाकत असून धनुष्यें, बाण, भाते व कवचें, ह्यांच्याजवळ दिसत आहेत! राज्योपभोग भोगून वनवासार्थ आलेले हे कोणी वृद्ध राजे होत, अशी कल्पना करावी तर राज्याभिषेकास योग्य अशीं ह्यांचीं वयें आहेत! हे दोघे बंधु आहेत, हें कोणींही सांगाव-यास नको! ही सौंदर्यलता ह्यांतील कोणत्या कल्पतरूचा आश्रय करणारी आहे हें हिच्या उभें राहण्यावरूनच कळत आहे! हे

धनुष्यबाणधारी कोणी व्याध असून अरण्यांत मृगयार्थ भटकत आहेत, असा तर्क करावा तर ह्यांचेठायीं हें विलक्षण रूप व मुखांवर दिसणारी मूर्तिमती दया कोठून असणार? किंवा आह्मां वनौकसांना पीडा देणाऱ्यांस शासन करावें ह्मणून हे कोणी राजपुत्र वनांत संचार करीत नसतील ना? पूर्वजन्मार्जित कोणत्या तपश्चर्येचीं हीं सुंदर फळें ह्यांच्या जनकांस प्राप्त झालीं असतील बरें!" ह्यांच्या दर्शनानें त्यांच्या मनांत असे अनेक विचार घोळत आहेत तों लक्ष्मणानें त्यांस हात जोडून मोठ्या नम्रतेने विचारिलें, "अहो पवित्र मुनिपुत्र हो, आपलें तपश्चरण निर्विघ्न चाललें आहेना? हा रम्यतम प्रदेश कोणता बरें? हा पुण्याश्रम कोणत्या कुलपतीचा? ते भगवान् ह्या समयीं येथें आहेत कीं? त्यांचें दुर्लभ दर्शन आह्मांस होईल बरें? ह्या प्रसंगीं ते कोणत्या महत्कार्यांत निमग्न असतील!" ते ह्मणाले, "अहो प्रियदर्शन हो, तुमचें सुस्वागत असो! ह्या वृक्षाखालच्या ओंट्यावर बसून व ह्या वाहणाऱ्या शीतोदकानें क्षणभर आपण अगोदर श्रमपरिहार करावे, मग सर्व सांगतों. महाराज, आमचें तप आपल्या सारख्यांच्या प्रतापानें निर्विघ्न चाललें आहे. ह्या विस्तृत प्रदेशास अंतर्वेदी नाम असून ह्या भूभागास प्रयाग असें ह्मणतात. येथें पुढें जवळच गंगायमुनेचा संगम झाला आहे. हा रम्य आश्रम कुलपति भगवान् भारद्वाज महर्षींचा आहे. ते येथें आहेत बरें. तेजोनिधि भगवान् भास्कराचे दर्शनाप्रमाणें केवळ दिवसासच नाहीं, तर रात्रीही ह्यांचें दर्शन सर्वांस सुलभ आहे! ते सांप्रत ह्यासमयीं प्रतिदिवशीं बहुधा वेदार्थचिंतनांत असतात. महाराज, भगवच्चरणारविंदीं आपलें आगमन विदित करितों, मग आपल्यास त्यांचे दर्शनार्थ न्यावयास ठीक पडेल." त्याप्रमाणें करतांच त्यांस त्या महामुनीची संमति मिळाली. ते ह्या त्रिवर्गास भगवान् भारद्वाजांकडे घेऊन येत असतां एक फारच विस्तीर्ण व गोमयानें सारवलेलें हिरवेंचार असें अंगण लागलें. तेथें पाय ठेवतांच त्या अतिथींवर, जणूं आदरार्थच, वृक्षांनीं पुष्पवृष्टि केली! हा विलक्षण योग पाहून, सर्वांना मोठा चमत्कार वाटला! त्या अंगणांत कीरमयूरादिपक्षी, हरिणपाडसें, गोवत्सें, क्रीडा करीत होतीं. चोहोंकडे कृष्णाजिनें, व्याघ्रचर्में, दर्भासनें, पसरलेलीं असून त्यांवर बसून कोणी ऋषि अनेक शास्त्रसंबंधी चर्चा करीत होते; कोणी

औषधीपरीक्षण करीत होते; कोणी ग्रंथवाचनांत निमग्न होते; कोणी नवीन ग्रंथ रचण्यांत गर्क झालेले होते; कोणी वेदपारायणांत गुंतले होते; कोणी याज्ञिक साहित्य तयार करीत होते; कोणी तोंडानें कांहीं ह्मणून दर्भासनें विणीत होते; कोणी वल्कलें कमावून मृदु करीत होते., कोणी कृष्णाजिनें रंगवीत होते; कोणी ब्रह्मसूत्रें करीत होते. कोणी पुष्पें, कोणी दूर्वा निवडीत होते; कोणी कमंडलु तयार करून कोणी रुद्राक्षांच्या माळा ओंवीत होते. कोणी पशुपक्ष्यांच्या पोरांबरोबर खेळून त्यांस किती ज्ञान आहे हें जाणून घेत होते. अनेक ऋषि अनेक शिष्यवर्गास नानाप्रकारचे शास्त्रविषय पढविण्यांत तल्लीन झाले होते. अशा ह्या परोपकाराच्या व मोक्षार्थप्राप्तीच्या अफाट कारखान्यांतून त्या ऋषिकारागिरांस, रामलक्ष्मण प्रणाम करित असतां त्यांस सचकित करून त्यांचे आशीर्वाद घेत घेत सीतेसहवर्त्तमान त्या ऋषिपुत्रांच्या मागून चालतां चालतां लहान मोठ्या अनेक पर्णकुटिकाव अंगणें ओलांडून एका अत्यंत रम्य व विस्तीर्ण पर्णकुटिकेंत आले. तों सूर्याभोंवती जसें ग्रहमंडळ, तसें ज्याच्या सभोंवतीं मोठें मुनिमंडळ असून जो व्याघ्रचर्माच्छादित अशा किंचित् उंच आसनावर बसला आहे; जो अत्यंत तेजस्वी व भव्य असून वार्धक्यलक्षणांनीं शोभत आहे; ज्याच्या उदरावर एक व हातांत एक लहानशी अक्षमाला आहे; जो अस्खलित व मधुर अशा वाणीनें सर्वांला समजेल अशा प्रकारें वेदांतील रहस्यावर कांहीं बोलत असतां, तें सभोंवतालचें मंडळ माना डोलवीत आहे आणि ज्याच्या सान्निध असलेली अग्निदेवताही त्या समयीं आपल्या कांपणाऱ्या ज्वालांनीं तें भाषण आपल्यास मान्य असल्याविषयीं सुचवीत आहे! अशा भगवान् भारद्वाज मुनींद्राचें त्यांस दर्शन झालें! तत्क्षणीं त्यांस सत्यलोकीं वास करणाऱ्या ब्रह्मदेवाची स्मृति झाली. त्यांनीं सर्वांस नमस्कार करून त्या ऋषिवर्याच्या चरणांस वंदन केलें. भारद्वाज महामुनीनें त्यांस आशीर्वाद देऊन जवळच असलेल्या आसनांवर बसण्यास सांगितलें. रामलक्ष्मण त्यांच्या जवळ बसून रामाज्ञेनें किंचित् अंतरावर असलेल्या मृगचर्मावर ती मृगनयना बसली. रामचंद्रानें त्या महर्षीस वनप्रस्थान करण्याचें इतिवृत्त थोडक्यांत सांगितलें. तें ऐकून सर्वांच्या चित्तवृत्ति तटस्थ झाल्या! कांहीं वेळा-

नें कुलपति भारद्वाज ह्मणाले, “ वा रामचंद्रा, तुझें यद्यपि आह्मांस प्रत्यक्ष दर्शन झालें नव्हतें, तथापि तुझा लोकोत्तर पराक्रम, विलक्षण सौजन्य, अनुपम औदार्य, इत्यादि अनेक गुणगण आमच्या कर्णीं पडले होते. अशा सत्पुरुषाच्या दर्शनाविषयीं कोण बरें उत्सुक होणार नाहीं! पण आह्मी पडलों वनवासी. आमचें इतकें लांब येणें कशानें घडतें! रामचंद्रा, भार्या जनकनंदिनी व बंधु लक्ष्मण ह्यांसह अयोध्येहून तू वनवासार्थ निघालास हें मीं योगबलानें तेव्हांच जाणलें होतें. तुझ्या आगमनानें तुझ्या वृद्ध पूज्य पित्यास, उभय मातांस, राज्यांतील सर्व अधिकाऱ्यांस व कोट्यवधि प्रजांस अत्यंत दुःख झालें आहे, व ह्या असह्य दुःखाचा केव्हां काय परिणाम होईल हें जरी आज सांगवत नाहीं, तरी आमच्या सारख्या वनौकसांवर, हे रघुकुलप्रदीपा, तुझे महदुपकार होणार आहेत. ह्या प्रदेशीं जरी फारसा नाहीं, तरी दक्षिणेकडे जसजसा जाशील तस तसा तपोधन मुनिजनांस राक्षसांपासून फारच त्रास होत आहे, असें तुला आढळून येईल. अशा दुष्टांचें पारिपत्य तुझ्या हातून सहज होणार आहे. आणी चौदा वर्षें हा काळ कांहीं थोडा नाहीं. रामचंद्रा, हा महा पराक्रमी तुझा बंधु लक्ष्मण बरोबर असून ही साक्षात् विजयश्री तुला अनुसरून चालली आहे. हिला बरोबर घेतलेंस हें फार चागलें केलेंस.” हें ऐकून रामचंद्र हात जोडून ह्मणाला, तपोनिधे, आपल्या दर्शनानें आह्मी अगदीं कृतार्थ झालों. बाह्य तमाचा नाश करणारे सूर्यचंद्रादिक तेजस्वी पदार्थ कांहीं आहेत, परंतु दर्शन होतांच अन्तःकरणांतील तमाचाही नाश करणारे आपल्यासारखे जगांत दुर्लभ असतात. आपलें अनिर्वचनीय भाग्य, लोकाधिक सामर्थ्य, अशा पवित्र स्थलीं राहूनही जगदुपकार करण्याची उदार बुद्धि, ब्रह्मपदप्राप्त्यर्थ शुद्धाचरण, ह्यांचें किती वर्णन करावें! आपण राक्षसांचें निर्दलन करण्यास असमर्थ आहां कीं काय! नाहीं. परंतु ती सेवा आमच्या सारख्यांच्या हातून घ्यावयाचीच जर आपली इच्छा असेल तर ती सफल व्हावयासही आपलाच आशीर्वाद असला पाहिजे.” अशा आशयाचें त्या मुनिश्रेष्ठाशीं व इतर ऋषिवर्गाशीं रामचंद्राचें व लक्ष्मणाचेंही बराच वेळ भाषण झालें. तपोधनांनीं त्यांचें त्या आश्रमांत फारच आदरातिथ्य केलें. ऋषिपत्न्यांनीं आमच्या पवित्र सीतादेवीशीं भाषण करून, जिनें

एवढें वैभव व सुख सोडून अरण्यांतील दुःखास सुख मानिलें. व पतीच्या अगोदर वनप्रस्थान केलें, ह्मणून तिची वारंवार फार स्तुति केली. तिचा वनांत सुखानें वास व्हावा ह्मणून तिला अनेक आशीर्वाद दिले. नंतर भारद्वाजमुनीनें त्यांस तो सर्व आश्रम दाखवून कोणत्या स्थळीं काय काय होतें, हेंही सविस्तर त्यांस सांगितलें. तो पाहून, हें काय पवित्रता, गंभीरता, सरलता, अनसूया, सद्बुद्धि, निस्पृहता ह्यांचें- आनंद, अक्रोध इत्यादिकांसहवर्तमान क्रीडा करण्याचें मंदिरच आहे, असें त्यांना वाटलें ! पुढें रात्र आली. तेथें त्यांनीं फळांवांचून कांहीं खाल्लें नाहीं व उदकावांचून तीं कांहीं प्यालीं नाहींत. रात्रौ बराच वेळपर्यंत भारद्वाज महर्षीचें व रामचंद्राचें एकान्तीं संभाषण झालें. त्यांत त्या त्रिकालज्ञ ऋषिश्रेष्ठानें—रामचंद्र हा कोण आहे, ह्याचें जन्म किमर्थ आहे, ह्याचें वनांत येणें कशाकरितां झालें आहे, सीता ही कोण, लक्ष्मण हा कोण आहे, हें सर्व त्यास निवेदन करून साधुजन जें पाहावयास इच्छितात, योगिजन ज्याचें ध्यान करितात, अथवा हजारों लोक भक्तिभाव हृदयीं धरून ज्या अनेक मार्गांनीं जेथें जावें ह्मणून योजितात, तें हें वेदानें सांगितलेलें अचिंत्य रूप व स्थल होय, असें ह्मणून रामचंद्राचें त्या योगीश्वरानें अनेक प्रकारें स्तोत्र गायिलें! नंतर त्यांनीं निद्रा घेतली! पहाट होतांच सर्व उठून आपआपल्या नियमित कर्मास लागलीं. आमचीं वनप्रवासींही याच वेळीं उठून प्रातःकालीन सर्व कर्में संपादून सूर्योदय झाल्यानंतर कांहीं वेळानें भगवान् भारद्वाजाच्या दर्शनास आलीं. त्यानीं त्याच्या चरणीं शिरसा वंदन केलें. रामचंद्र मोठ्या नम्रतेनें व मधुरवाणीनें ह्मणला, “ भगवन्, आह्मी आतां हळू हळू पुढें जातों. आमच्या वनवासानें आपल्या सारख्यांना त्रास न होतां, ह्या मैथिलीसही हा प्रवास दुखःदायक न व्हावा असें करावें. आतां आह्मी कोणत्या मार्गानें व कोठें जावें ह्याची आह्मास आज्ञा व्हावी.” ती सांगण्यापूर्वीं वनांत फिरण्यानें सीता देवीस किती श्रम होतील तें सांगून त्यांस निदान कांहीं दिवस तरी आपल्या आश्रमांत राहण्याविषयीं भारद्वाजमुनीनें आग्रह केला. परंतु आपल्या आज्ञे प्रमाणें करितां येत नाहीं. अशी रामचंद्रानें त्यांस अनेक कारणें

सांगन विज्ञप्ति केली. तेव्हां ते त्यांस सांगू लागले. "रामचंद्रा, ह्याच दक्षिणदिशेनें ह्या मोठ्या मार्गानें समोर जा. मध्यें आडव्या तिडव्या कितीही बारीक सारीक वाटा लागल्या, तरी हा सरळ जाणारा मोठा मार्ग सोडूं नको. ठायीं ठायीं पुष्कळ प्रकारची झाडी लागेल. अनेक मनोहर वनभागही दृष्टीस पडतील. बरेंच चालल्यावर, तुह्मांस वनांत जाऊं नका, ह्मणण्याकरितांच काय यमुना आडवी येईल! तींत ह्या दिवसांतही बरेंच उदक आहे. ती मोठ्या सावधपणें उतरून पैल तीरास जा. नंतर कांहीं वेळानें एक मोठा अत्यंत विस्तीर्ण श्याम नांवाचा वटवृक्ष दिसूं लागेल. त्याच्याच दाट छायेखालून तुमचा मार्ग जातो. त्या मार्गानें गेल्यावर बऱ्याच वेळानें एक पर्वत भेटेल. त्याचें नांव चित्रकूट. तो अत्यंत रम्य असून राहाण्यास फारच चांगला आहे. तेथें सर्व कांहीं आहे. कोणत्याही गोष्टीची न्यूनता नाहीं. त्यास्थळीं अनेक ऋष्याश्रम आहेत. आणि आह्मा सारख्यांना अत्यंत प्रिय जें नदीचें सान्निध्य तेंही तेथें आहे! आह्मी त्या पवित्र स्थळीं कधीं कधीं जातों. आह्मी तेथें अर्ध दिवसांत पोंचतों. तुह्मास दीड दोन दिवस तरी लागतील! चित्रकूट येथून दाहाएक कोश तरी येईल." असें बोलून त्यांनीं त्यांस पुनः पुनः जपून व सावकाश जावयास सांगितलें. सीतादेवी ही किती सुकुमार आहे व वनवास किती खडतर आहे, ह्याचा वारंवार विचार करा, ह्मणून त्यांस प्रार्थिलें! त्या ऋषिवर्यांनें तो सांगितलेला मार्ग ऐकून घेऊन त्याचे त्यांनीं प्रेमपूर्ण व सद्गदित शब्दांनीं अत्यंत उपकार मानिले. व त्यांस प्रणिपात करून रामचंद्र, लक्ष्मण व सीता यांसह चित्रकूटाकडे जावयास निघाला. त्यावेळीं प्रहर एक दिवस आला होता. बहुतेक मार्ग गर्द छायेनें व्याप्त होता. मार्गक्रमण करीत असतां "श्रीमद्भारद्वाजाश्रम पाहून मला फारच समाधान झालें. अशी पवित्र भूमि व तींत वास करणारे धन्यतम ऋषि व त्यांच्या पत्न्या, ह्यांचें दर्शन, मला अयोध्येंत ठेवतेत तर अंतरलें नसतें काय?" ह्या प्रमाणें आमची चरित्रविषया सीता बोलली. जातां जातां त्यांस ती यमुनानदी लागली. तीचें पाणी काळेंभोर असून पात्रही बरेंच रुंद होतें. तिच्या तीरीं तीं बराच वेळ बसलीं. नंतर लक्ष्मणानें त्या यमुनातीरीं फिरून कांहीं बळकट वेत व थोडीशीं बांबूचीं काष्ठें आणिलीं. व

चिवट वेली आणून त्यांची एक मजबूद मंडपी तयार केली. तिजवर सीतेनें आपलें वस्त्रालंकाराचें गाठोडें ठेवून रामलक्ष्मणांनीं आपलीं धनुष्यें, भाते वगैरे आयुधें ठेवलीं. नंतर तिजवर तिला बसवून ते बंधु यमुनोदकांतून पैल तीरास घेऊन चालले. तत्प्रसंगीं तिच्या मनांत अनेक विचार येऊन तिला फार वाईटही वाटलें, असें तिच्या नयनांतून वारंवार गळणाऱ्या अश्रुजलावरून दिसत होतें! तिनें शृंगवेरग्रामीं नौकेंत असतां जशी भागीरथीची, तशीच यमुनोदरांत असतां तिची स्तुति करून आपला वनवास सुखानें जावा ह्मणून अनेक नवसही केले. पैल तीरीं जातांच ते कोरडीं वस्त्रें नेसले. तेथें कांहीं वेळ बसून हळू हळू तीं मार्गक्रमणास लागलीं. चालत असतां त्या रम्य वनमार्गांत जे जे मनोहर पुष्पगुच्छ दिसले, जीं जीं पुष्पें सुवासिक भासलीं, जे जे पल्लव सुंदर व कोमल वाटले, जे जे तुरे बरेसे दृष्टीस पडले, जीं जीं फळें सुरेख व मनोरम वाटलीं, तीं तीं सर्व कांहीं लक्ष्मण आपल्या वहिनीस देत असे. असो; यमुना उतरून तिच्याच तीरानें पूर्व दिशेकडे तीं वनविहारीं चाललीं असतां, जो, अनंत पत्रांमुळें, अनेक शाखांच्या योगानें, अनादित्वास्तव फारच पुराणा, अपौरुष व वनजटाधारण करणारा ह्मणून, अत्यंत विस्तारास्तव, सर्वांसच पण विशेषतः द्विजसमूहास आश्रय व सुंदर फल देणारा व अनेक ऋषींनीं पाहिलेला ह्या मुळें, साक्षात् वेदरूपच काय असा, तो भारद्वाज मुनीनें सांगितलेला वटवृक्ष त्यांस लागला. त्याच्या दाट व विस्तीर्ण छायेखालीं तीं विश्रांतीकरितां बसलीं. तेथून यमुनानदी फार दूर नव्हती. तत्तीरवासिपक्ष्यांचे मंजुल ध्वनि त्यांच्या कर्णीं पडत होते. तिजवरून वहाणारा मंद मंद, सुगंध व शीतळ वायु त्यांच्या अंतरात्म्यांस गार करीत होता. रामलक्ष्मण त्या वनप्रदेशासंबंधी कांहीं गोष्टी बोलत होते. इकडे सीतादेवी करद्वय जोडून त्या वटवृक्षाची प्रार्थना करूं लागली हे "वृक्षराज! त्या अचिंत्य, निराकार, अदृश्य, अतर्क्य, परमात्म्याचें चिंतन मला कसें करतां येणार! त्याचें निराकारित्व ह्या हृदयांत कसें उतरणार! दिसत नाहीं त्याविषयीं आह्मां सारख्यांनीं केलेल्या कल्पना किती मोलाच्या असणार! तो विश्वात्मा सर्वव्यापी आहे. अ-

र्थात् तुझ्या ठायींही जागृत आहे. ह्मणून तू तदंश आहेस. त्या विराट स्वरूपाचें अंशमात्र रूप जरी अशारीतीनें जाणलें तरी पुष्कळ झालें! तुझा रम्य आकार माझ्या दृष्टीस पडत आहे. तुझें वर्णन मला कांहीं तरी करतां येइल ह्मणून मजसारख्या अल्पमतीस तूंच परमेश्वर वंदनीय आहेस. आणि तुझ्या मूळाच्या ठिकाणीं दक्षिणा मूर्तींचा वासही आहे. तुझें हें रूप केवळ परोपकारार्थ आहे! तर हे परोपकारदक्ष वृक्षेश्वरा! ह्या जनककन्येचें थोडक्यांत इतकेंच मागणें आहे कीं, तुमच्या ह्या अफाट वनराष्ट्रामध्यें सुखानें आमचीं चौदा वर्षे जावींत. आमच्याकडून उगाच कोणास उपद्रव होऊं नये. आह्मांस अनेक ऋषींचीं व त्यांच्या स्त्रियांचीं दर्शनें व्हावींत! शेवटीं सर्वांस सुख होण्याकरितां आमचें अयोध्येंत जाणें व्हावें."

नंतर तेथून निघून तीं कोशभर गेलीं न गेलीं तों त्यांनीं जवळच त्यांतल्या त्यांत उत्तम जागा पाहून तेथें संध्याकाळचा मुक्काम केला. प्रातःकाळीं संप्रदायाप्रमाणें स्नानादिकर्में करून त्यांनीं त्या चित्रकूटाचा मार्ग धीरला. चालतां चालतां तो जवळ आला! तेव्हां रामचंद्र जानकीस ह्मणाला." हा पहा, प्रिये, त्या मुनिश्रेष्ठांनीं सांगितलेला पर्वतश्रेष्ठ चित्रकूट! पूर्वीं न पाहिलेल्या अशा एकाद्या अफाट व सुंदर नगरीचें लांबून एकदम सर्व रूप दिसून त्या रम्य नगरींत कधीं प्रवेश होऊन तिचें सौंदर्य केव्हां एकदां दृष्टीस पडेल असें होऊन जातें, त्याप्रमाणें ह्या पर्वताच्यादर्शनाविषयीं माझें मन उत्सुक झालें आहे. सध्या ऋतुश्रेष्ठ वसंत असल्यामुळें जसें जसें ह्या पर्वताजवळ जावें तसतसें उत्सवाचें स्वरूप अत्यंत रमणीय दिसत आहे. प्राणप्रिये! हे पहा कसे वृक्ष अगदीं फुलून गेले आहेत ते! ह्यांचें नांव कोणीं अशोक ठेविलें आहे तें अगदीं सार्थ आहे. हे पहा किती प्रकारचे वृक्ष एके ठिकाणीं आहेत ते! हे सर्व फलभारानें लादून गेले आहेत! भिन्नजातीय लोकांनीं एकत्र राहून वैभवयुक्त व्हावें, लोकोपकार करावा, कोणाचा द्वेष करूं नये, असें नाहीं कां ह्या भिन्न जातीय वृक्षांपासून मनुष्यांनीं शिकावें असें होत? जनकनंदिनि, हे पहा कसे इकडच्या बाजूस मोठ मोठे लोकांस नांवें न समजूं देणाऱ्या किंवा कीर्तीची इच्छा न करणाऱ्या पुरुषांप्रमाणें, परोपकारी पादप लागून गेले आहेत! समोर

पहा आपल्या ज्ञातिवर्गांत कोणास येऊं द्यावयाचें नाहीं, असा जणूं बेत करून आम्रतरूंनींच हा सर्व भाग व्यापून टाकिला आहे! प्रिये, आपल्यामध्यें अल्पही विद्वत्ता नसतां विद्वानांचा आश्रय करून त्यांच्या बळावर, लोकांस न समजूं देतां, आपण महा विद्वान् म्हणून जगांत नांदणाऱ्या धूर्त पुरुषाप्रमाणें हा रोडका फलहीन कसलासा वृक्ष, पहा, त्या दुसऱ्या फलद्रूप वृक्षसमूहांत शिरून आपण फल देणारा असें दाखवीत आहे! ह्या लता तरी पहा कशा पुष्ट, हिरव्या व फलपुष्पांनीं सुशोभित दिसत आहेत! ह्या उद्भिजसृष्टीचें खरें रूप अरण्यांतच पाहवें. नगरांतील बागांमधील वृक्षलतादि किती बरें कृश दिसतात! त्याच वेली किंवा तेच तरु येथें अगदीं ओळखतांसुद्धां येत नाहींत! ती त्यांनीं सांगितलेली हीच नदी बरें. हिच्या मंदप्रवाहावरूनच हिचें नांव मंदाकिनी पडलें असावें. ही आतां उतरून आपणास गेलें पाहिजे."

असें ह्मणून ती नदी उतरून तीं तिचे पलीकडे गेलीं. नंतर लक्ष्मण किंचित् पुढें सरसावला. चालत असतां तेथील रम्यता दाखवून आणखी रामचंद्र सीतेस ह्मणला, " संबंधिजन किंवा स्त्री यांवांचून राहाणाऱ्या पुरुषाप्रमाणें हा एकलकोंडा कसला वृक्ष आहे कोणाला माहीत! हा पहा जुनाट जंबु वृक्ष! ह्याच्या सभोंवती, जणू पुत्रच असे हे दुसरे अनेक लहान जंबुतरु दिसत आहेत! ह्या वृद्ध वृक्षाला पाहतांच मला माझ्या वृद्ध पित्याचें स्मरण होऊन अन्तःकरण द्विधा होऊं लागलें आहे." एकटा रामचंद्रच ह्याप्रमाणें त्या पर्वताच्या असपासच्या वनशोभेनें आकृष्ट होऊन तीविषयीं बोलत होता असें नाहीं, तर सीता देवीही मधून मधून आपली रसिकता आपल्या प्रियप्राणपतीस दाखवीत होती. ती एकदां म्हणाली." प्राणनाथ, ही पहा, कसलीशी लता एकटीच भूमीवर लोळत पडली असून अगदीं सुकून गेली आहे! ह्या पादपावरून ही कशी खालीं पडली असावी बरें? तरुणीसाध्व्यांना पतिवियोग किती दुःसह आहे, हें, मला बरोबर न आणण्याविषयीं इछिणाऱ्या आपणांस, ही वल्ली जणू सांगत आहे असें वाटतें! ही समोर मयूरी पहा मयूराकारितां किती मत्त व कावरीबावरी झाली आहे ती! ह्या पक्षिणी, पहा, आपल्या पिलांस कशा भक्ष्य भरवीत आहेत त्या! आपण राजपुत्र ह्या रम्य पर्वतावर आलां ह्मणून आपणास सन्मान द्यावा ह्या हेतूनेंच

काय ह्या पक्ष्यांची सर्वत्र गोंदळ उडाली आहे! हे कोकिल आपले गुण गात आहेत; त्यांस हे पोपट, हे चातकशकुनी आपली जणू संमति व पुष्टि देत असून हे इकडे मयूरादि सर्वपक्षी आपले नीलकंठ वर करून सर्वमान्यता प्रकट करीत आहेत! हे पहा वृक्ष, आपल्या मस्तकीं पुष्पवृष्टि करून आपला पूज्यभाव दाखवीत आहेत! पायांना खडे रुतूं नयेत ह्मणून मार्गांत सर्वत्र. पहा, पर्णरूप वस्त्रेंच पसरलीं आहेत'' नंतर रामचंद्र ह्मणाला," वा! फारच चांगलें तूं वर्णन केलेंस! प्रिये, जरा आतां लौकर पाय उचल. तो पहा, पुढें लक्ष्मण आपली वाट पहात उभा आहे. तो तिकडे एक आश्रम दिसत आहे; त्यांतील महामुनीचें दर्शन घेऊन मग पुढें जाऊं. त्याप्रमाणें तीं त्या रम्य व पवित्र वाल्मीकाश्रमीं गेलीं. त्या मुनिवराच्या पवित्र दर्शनानें व त्यानें केलेल्या सान्तःकरण स्वागतानें संतुष्ट होऊन तीं वनवासेच्छु तेथून निघालीं व त्या आश्रमापासून जवळच एक रमणीय व सोईचें स्थळ पाहून तेथें उतरलीं. लक्ष्मणानें त्या दिवशीं राहण्याकरितां लहानशी एक पर्णकुटिका तयार केली. पुढें थोड्याच दिवसांत त्या राजपुत्रानें त्या स्थळीं सर्व प्रकारच्या सोई करून ती भूमि अत्यंत मनोहर करून सोडली.

राम लक्ष्मण व सीता हीं अयोध्येहून दशरथ महाराजांस सोडून चैत्र शुद्ध नवमीस निघालीं तीं हळू हळू जातां जातां तो दिवस धरून सहावे दिवशीं त्या चित्रकूटपर्वतीं सुखरूप येऊन पोंचलीं. पर्णकुटिका तयार केल्यावर लगेच लक्ष्मण कंदमूलादि भक्ष्य आणण्याकरितां बाहेर गेला. सीतेनें अलंकारांचें व वस्त्रांचें गांठोडें अंगणांतच एकीकडे ठेविलें. रामचंद्रानेंही आपलीं कांहीं आयुधें तेथें समोर असलेल्या एका वृक्षास लटकून ठेविलीं. नंतर रामचंद्र आपल्या प्रियेस ह्मणाला," प्रिये, ह्या वनवासचा अनुभव तुला कसा काय आला? कितीदां बरें तुझ्या पायात कांटे मोडले असतील? किती तरी खडे रुतले असतील! उन्हाचे चटके कसे लागले असतील! सर्वांगास जमीन किती तरी खुपली असेल! पांच सहा दिवसांच्या पूर्वीचें तुझें शरीर आणि आजचें शरीर ह्यांच्यामध्यें केवढें अंतर हें! फळांनीं पोट तें कसें भरणार! सुंदरि, चौदा वर्षांतील आज कोठें साहा दिवस होत आहेत !अजून आपणांस किती तरी भ्रमण करावयाचें आहे!

ग्रंथ संग्रहालय ठाणे

खरोखर वनें व वनवास हीं आतां पुढेंच आहेत. तुजकरितां येथें कांहीं दिवस तरी राहावें असें मनांत आहे. प्रिये, पाहिलेंस? आम्हांकरितां लक्ष्मणास किती कष्ट सोसावे लागतात ते! त्याला गेल्या पांच रात्रीं जागरण करावें लागलें! येथें आल्यावर तरी त्याला विश्रांति आहे काय! आला न आला तों त्यानें ही पर्णकुटिका तयार करून आतां भक्ष्यशोधार्थ कोठें रानांत गेला आहे! त्याला अत्यंत श्रम पडतील ह्मणून वनांत न येण्याविषयीं मी त्यास वारंवार बोललों! परंतु स्वतःच्या देहापेक्षां आह्माला तो अधिक समजतो! एकूण असा बंधु जगांत सांपडणें फारच कठिण! ज्या कधीं काळीं व जेथें असे बंधु निर्माण होतात तो काळ, तो देश इत्यादि धन्य होत!"

**सीता**— प्राणनाथ, आपला सहवास असतां मला हा वनवास कसा बरें वाटेल! मला कधीं खडे रुतले नाहींत किंवा कधीं झोंप आली नाहीं असेंही झालें नाहीं! मला जें खावयास मिळतें त्यापेक्षां जगांत कांहींच मधुरतर वाटत नाहीं! प्राणप्रिया, हे सर्व मनोधर्म ना? जें एकदां मनास आवडलें, तें सर्व इंद्रियांस बरें वाटलेंच पाहिजे. आतां भावोजींस मजकरितां फार फार श्रम पडतात व पडतील हें खरें, पण काय करावें! आह्मी स्त्रिया जरी कोठेंही असलों, कोठें गेलों, तरी सदा परावलंबिनीच? ज्या राजपुत्रानें अयोध्येंत सदा सुखोपभोग भोगावे, त्यानें आह्मांकरितां अरण्यांत जाऊन लांकडें वाहावींना! तस्मात् प्रारब्ध बलवत्तर होय.

अशा तऱ्हेचें आणखी पुष्कळ त्यांचें बोलणें चाललें आहे, तों लक्ष्मणानें कंदमूलफलादि अनेक प्रकारचें भक्ष्य आणिलें. त्या पर्णकुटिकेजवळ स्वच्छोदकाचे मोठमोठे झरे वहात होते. तेथें लक्ष्मणानें तें भक्ष्य धुवून स्वच्छ करून ठेविलें आणि अग्नि आणून सर्व सिद्धता केली. नंतर सर्वांनीं त्या मंदाकिनीजलांत स्नानें करून आल्यावर त्या पर्णशाळेंत यथाविधि प्रवेश केला. नंतर सर्व धार्मिक कृत्यें आटपून सीतेनें पक्क केलेल्या भोज्यपदार्थांनीं रामचंद्रानें सर्वदेवतांस यजनबलिदाननैवेद्यादिकेंकरून संतुष्ट करून यथाशास्त्र वैश्वदेवादिक कृत्यें संपादिलीं. नंतर जपजाप्यमंत्रपठनादि सर्व करून मोठ्या आनंदानें सर्वांनीं तें भक्ष्य भक्षण केलें.

तो दिवस पूर्णिमेचा होता. सायंकाळीं निशापति चंद्रमा साल्हाद मुद्रेनें आपल्या पूर्णतेजोवैभवासह उदयपर्वताच्या वाटे भूतलीं प्रवेश करून सर्व जगतास प्रकाश व आनंद देतदेत रात्रीचा उपभोग घेत असतां अगदीं वर येऊन रात्र जरी ऐन भरांत आली, तरी त्या स्थळीं कमलवनाच्या दुःखाचें स्वरूपच काय असा सर्वत्र काळोख होता. राम व सीता हीं एका पल्लवशय्येवर निजलीं होतीं. त्यांस नुकतीच निद्रा लागली होती. लक्ष्मण जागृत होता. इतक्यांत " वत्सा लक्ष्मणा, प्राणवल्लभे जानकि, अहो प्रियतात, तुह्मी कोठें आहां ?" असें रामचंद्र मोठ्यानें ओरडला! तेव्हां सीता दचकून भिऊन उठली! व लक्ष्मण जवळ येऊन ह्मणाला, " बंधो, हा मी जवळ आहें. ही जनकनंदिनीही आपल्याबाजूस जागी होऊन बसली आहे! महाराज, ही अरण्यांतील चित्रकूटपर्वतावरील पर्णकुटिका आहे. ही ती अयोध्यानगरी नव्हे. येथें तात कसे असतील ? ते हांक कसे देणार ? प्रियबंधो, आपण एवढ्या मोठ्यानें, घाबरत घाबरत आह्मांस हांका कांवरें मारिल्या? अपरिहार्य भयंकर प्रसंगाच्यावेळींही आपल्या मुखांतून असा हृदयविदारक नाभिवणारा स्वर कां आला! कालासही ज्यापासन भीति, त्या तुह्मांस भिवविणारा असा जगांत कोण आहे? आपली अशी अवस्था कधींही झालेली नाहीं! प्रियबंधो, मुखावाटे अजून दीर्घश्वास चाललेच आहेत! घामानें तर अंग स्नान घातल्या सारखें झालें आहे! असें आपल्यास वाटलें तरी काय? माझी दशा पहा काय झाली आहे ती? ही देवीही अगदीं भिऊन गेली आहे! हिच्याकडे पहा. काय आपल्यास अयोध्येंतील विलासमंदिराची आठवण होऊन सद्यःस्थितीविषयीं वाईट वाटलें? पण असें होईल तरी कसें? काय त्या शोकाकुल झालेल्या त्या वृद्ध मातृश्रीची करुणरसाची मूर्ति डोळ्यांपुढें उभी राहिली? किंवा माझ्या मातेच्या नयनांतून खळ खळ वाहणाऱ्या उष्ण अश्रुधारा झोपेंत असतांही आपल्या मस्तकावर पडल्या? किंवा त्या भरतानें स्वप्नांत आपल्यावर शस्त्र उगारलें? झालें तरी काय? अथवा त्या दुष्ट भरतमातेनें ज्याच्या बहिःसर्वस्वावर दरोडा घातला, जो अत्यंत वृद्ध, सरळ व ज्याचे पुत्र हेच प्रियप्राण अशा पूज्यतम पित्याचे ते रोदनयुक्त आर्तशब्द आपल्यास अजून पीडा देत आहेत! किंवा मध्यममाता आणखी कांहीं हट्ट घेऊन आपल्या वृद्ध

पतीस ह्मणजे आमच्या तातास असह्य दुःखोदधींत लोटीत असतां आपण पाहिलत! किंवा मीं आपलें कांहीं ऐकेलें नाहीं? किंवा ह्या जनकनंदिनीविषयीं वारंवार दुःख होत आहे? किंवा एकादें दुष्ट स्वप्न पाहिलेंत? बोला काय तें." असें लक्ष्मण बोलत आहे तों "प्राणेश्वरा, माझें हृदय पहा कसें धडधडत आहे तें! अशा एकाएकी आपण कां बरें हांका मारल्या? बोला लौकर." असें अडखळत अडखळत सीता देवी रामचंद्रास ह्मणाली.

रामचंद्र— प्रियलक्ष्मणा, अग प्राणेश्वरि जानकि, आपण मघाशीं गोष्टी बोलत असतां, माझें मन अयोध्यानगरींत गेलें असून तो निघण्याच्या वेळचा सर्व प्रसंग जशाचा तसा मला दिसूं लागला, त्यामुळें मी तुमच्याशीं मग बोलत नव्हतों. तेव्हां मला झोंप लागली असें तुह्मांस वाटून तुह्मीं गोष्टी बोलण्याचें वर्ज केलेंत. परंतु मला कांहीं केवढा वेळ निद्राच लागेना! डोळ्यांपुढें रुदन करणारी ती तातमूर्ति व त्या आलिंगन देणाऱ्या माता सतत येत! पर्णकुटिकेंत जरी मी पल्लवशय्येवर आहें, तरी जसा काय मी अयोध्येंतच तुह्मांसह वनांत निघण्याचे तयारींतच आहें, असें मला होऊन गेलें होतें! मला तितक्यांतच, कांहीं दिसावयाचें होतें ह्मणूनच काय, थोडी निद्रा लागली! तींत मला जें कांहीं दिसलें तें, लक्ष्मणा, प्रिये चारुशीले जानकि, माझ्यानें सांगवत नाहीं! तरी निरुपायास्तव सांगतों, ऐका. ज्याच्या गळ्यांत लालभडक पुष्पमाळा असून ज्याच्या सर्वांगावरून एकसारखा रक्तचंदनाचा प्रवाह वहात आहे, जो सतत कर्कश व मोठ्यानें ओरडत आहे, असा एकच गर्दभ ज्याला जुंपला आहे, असा एक रथ मीं पाहिला! हाय! हाय! ह्या रथांत कोण बसला होता? तर माझा प्रिय पूज्य वृद्ध तात! आणखी ज्या काळ्या कुट्ट असून वस्त्रेंही पण काळींच नेसलेल्या आणि ज्यांच्या पाठींवर लांबलांब केश सुटले आहेत अशा कित्येक भयंकर स्त्रिया माझ्या तातास एकसारख्या मारीत आहेत व तो गर्दभ दक्षिणदिशेस तो रथ नेत आहे! तें मारणें तातास सहन होत नसल्यामुळें फार दीनवदन होऊन, "हा वत्सा रामचंद्रा, प्रियपुत्रा लक्ष्मणा, सुशीले जानकि, बाळा भरता, अरे शत्रुघ्ना, ह्यावेळीं तुम्ही सर्व कोठें आहां? मला ह्यांतून सोडवा!"

ह्याप्रमाणें एकसारखा ओरडत आहे! बरोबर दुसरें कोणी नाहीं! अशा रीतीनें तो रथ एका उंच पर्वताच्या भयंकर कड्यावर नेला! तेथून ताताला खालीं तेलाच्या भयंकर डोहांत त्या बायांनीं ढकलून दिलें! त्यांत गटंगळ्या खात असतां तात मला एकसारख्या हाका मारूं लागला! असें पाहून मी एकदम दचकून जागा झालों! लक्ष्मणा! हें स्वप्न दुःखपर्यवसायि आहे, ह्यांत संशय नाहीं. अयोध्येंत काय अनर्थ ओढवला असेल तो भगवान् जाणे! आमच्या येथें येण्यानें अत्यंत दुःखी झालेला आमचा तात कुशल असो ह्मणजे झालें! राजासनीं बसलेला प्रियबंधु भरत व शत्रुघ्न हे सुखरूप असून सर्व मातांच्या शरीरीं समाधान असावें हीच माझी इच्छा आहे. वत्सा, ह्या स्वप्नदर्शनानें जें कांहीं वाईट मनांत येतें त्यास सीमाच नाहीं.

**लक्ष्मण**— स्वप्नामधील ताताची अशी अवस्था ऐकून मलाही फार वाईट वाटत आहे. स्वप्नावलोकन हें कधीं कधीं शुभाशुभसूचक असतें खरें, परंतु तें केव्हां— कीं ज्या गोष्टीचा आपणास लवलेशही ध्यास नसतो, तत्संबंधानें कांहीं दिसलें तर! आणखी तेंही उत्तररात्रीं दिसेल तर त्याचा विशेष ठोका येतो, असें ह्मणतात. आतां मोठमोठ्या अनुभवज्ञलोकांनीं सांगितलेलीं सर्व लक्षणें, हें स्वप्न खरें होण्यास जमतात किंवा नाहींत हें जरी मला माहीत नाहीं, तरी अशा सारखी स्वप्नसृष्टि आपल्या पुढें दिसण्याचें मुख्य कारण कीं आपल्या मनांत प्रियपूज्य पित्याविषयीं सतत जागृत असलेली काळजी होय. बरें हें स्वप्न जरी कांहीं अशुभ दाखविणारें आहे असें मानिलें तरी, जेंजें कांहीं ज्या ज्या वेळीं व्हावयाचें तें तें त्या त्या वेळीं होणारच! मग तत्संबंधानें पूर्वचिन्हें होवोत वा न होवोत! होणाऱ्या शुभाशुभाविषयीं हर्ष किंवा विषाद मानणें हें अज्ञ किंवा अविचारी मनुष्याचें लक्षण समजतात. तेव्हां, प्रियबंधो, पूज्यताताविषयीं मनांत वाईट आणून दुःख करणें हें आपल्यास योग्य नाहीं. आपण वनांत प्रवेश करावयास निघालों तेव्हांच संकटें, दुःख, विपत्ति इत्यादिकांनीं आम्हां बरोबर प्रस्थान केलें आहे, असें समजा. परंतु ह्या मंडळीची आपण विशेष पर्वा ठेवतां कामानये. जर आतां आपण धैर्यासारखी अमोलिक वस्तु गमावली, तर ह्या अबलेनें कोणाच्या मुखाकडे

पाहून वनांत चौदा वर्षे काढावींत वरें?

राम— वत्सा, तूं बाललास तें सर्व खरें आहे. परंतु पूज्य पित्याचे गत व भविष्यत् स्थितीचा जसा काय आरसाच मजपुढें उभा असून त्यांत मला हा चमत्कार दिसला! ह्यामुळें ही माझी अशी अवस्था झाली आहे. प्रिये, तूं भिऊं नकोस वरें.

सीता— प्राणवल्लभा, आपण सांगितलेल्या स्वप्नानें माझेंही अंतःकरण चितळून गेलें आहे. माते जगदंबे, हें स्वप्न अमंगलकारक न होवो, हेंच तुझ्या चरणकमलीं ह्या दीनेचें मागणें आहे.

ह्याप्रमाणें चित्रकूटावराल त्यांची ती प्रथम रात्र बहुतेक जागरणानें गेली. दुसऱ्या दिवसापासूनच रामलक्ष्मण व सीता हीं त्या स्थळीं दररोज मोठ्या नियमानें वागूं लागलीं. अमुक वेळीं अमुक झाल्यावर अमुकच करावयाचें असें त्यांनीं बांधून टाकिलें होतें. हीं सर्व मोठ्या पहाटेस उठून मुखमार्जनादि करून भगवन्नामस्मरण करीत. नंतर श्रीमंदाकिनीच्या निर्मळ जलामध्यें सूर्योदयापूर्वींच आपलीं स्नानें आटपून ते बंधू संध्यावंदनजपजाप्यादि अत्यंत पवित्र कर्में तेथें संपादीत. पर्णकुटिकेंत आल्यावर रामचंद्र सीतेसह अभ्यर्चन करी! उपरांत शिवलिंगपूजनांत बराच काळ घालवी. इतकें झाल्यावर ते सीतेसह मुनींच्या दर्शनास जात. मुनिजनांशीं अनेक विषयांवर ते संभाषणें करीत. भाषणप्रसंगीं त्यांच्या अनेक संशयग्रंथिका उकलून टाकून त्यांचें सुसमाधान करीत! ऋषिप्रणीत ग्रंथांचें अवलोकन करून त्यांच्या विलक्षण बुद्धिमत्तेचें, शोधकतेचें, दूरदृष्टीचें, परोपकारशीलतेचें ते बंधु फार फार आश्चर्य मानून अत्यंत आनंदित होत. एक दोन दिवसांतच तेथील सर्व ऋषिसमूहास ह्या त्रिवर्गाचें अद्भुत व पवित्र चरित्र समजलें व ह्यांचा वनवास किमर्थ आहे, हेंही कित्येकांनीं जाणिलें. ऋषिदर्शनानंतर लक्ष्मण बहुधा फलमूलादि भक्ष्य आणण्याकरितां बाहेर स्वारी करी. पश्चात् सीता तें तयार करी व यथाविधि मोठ्या आनंदानें तीं सर्व भक्षीत. नंतर त्यांच्या त्या पर्णकुटिकेंत मोठमोठे तपोधन येत. त्यांच्याशीं बोलण्यांत व त्यांच्या सेवेंत त्यांचा बराच वेळ जाई. उपरांत कधीं वेळ सांपडेल तेव्हां हीं आमचीं वनविहारीं त्या पर्वतावर फिरून नैसर्गिक शोभा पाहून काल-

क्रमणा करीत. नंतर नदीतिरीं येऊन सायंकालीन पुण्यकर्में संपादीत पर्णकुटिकेंत आल्यावर रामचंद्राचें अग्न्यर्चन व शिवपूजन आटोपल्यावर तीं फलाहार करीत व परमात्म्याची ध्यानधारणा करून अयोध्येंतील कांहीं गोष्टी बोलून निद्रा घेत. त्यांस भेटावयास आलेल्या ऋषींनीं —कोणीं कृष्णाजिनें, कोणीं व्याघ्रचर्में, कोणीं कमंडलू, कोणीं दर्भासनें, कोणीं काष्टमयपात्रें, कोणीं खडावा, कोणीं वल्कलें, कोणीं अक्षमाला, कोणीं भस्म, कोणीं पोथ्यापुस्तकें, कोणीं कांहीं, कोणीं कांहीं, ह्या प्रमाणें त्यांस दिलीं. त्यांनीं त्या प्रासादिक वस्तूंचा मोठ्या आदरानें स्वीकार केला.

हळु हळू लक्ष्मणानें ती पुढें पर्णकुटिका वाढविली. एकाद्या राजवाड्यांत जशी गालिचाची बिछाईत पसरलेली असावी, त्याप्रमाणें त्या उटजगृहांत व सभोंवतालच्या विस्तीर्ण अंगणांत कृष्णाजिनें व व्याघ्रचर्में पसरलेलीं असून तीजवळ लहान फुलझाडांचें सुंदर उपवन तयार व केलेलें होतें. एकंदरींत तें स्थान फारच रम्य दिसत असून, त्यांत राहणारीं लक्ष्मण, रामचंद्र व सीता हीं अनुक्रमें साक्षात् वसंत, मदन व रति अशीं भासत होतीं!

एके दिवशीं तिसऱ्या प्रहरीं हीं तिघें ह्या रम्य गिरीच्या शिरोभागीं अनेक प्रकारची शोभा पहात पहात संचार करीत होतीं. एकीकडे लक्ष्मण तेथील मनोहर स्थळें बघण्यांत अगदीं गर्क झाला असून रामसीता हीं जवळच दुसऱ्या एका प्रदेशीं त्या पर्वतरूप बाजारांतील विलक्षण रचना पाहून विश्वकारागिराची धन्यता मानीत होतीं. इतक्यांत ती कोकिलवाणी सीता ह्मणाली“ प्राणवल्लभा, आह्मांस ह्या पवित्र चित्रकूटीं येऊन आज महिना होऊन वर एक दोन दिवस तरी झाले असतील, नाहीं बरें? येथें माझा वेळ फारच सुखानें जातो. ह्या स्थळीं आपल्यास कोणत्याही प्रकारचा तोटा नाहीं. फार काय सांगूं! अयोध्येपेक्षांही ही वनभूमि मला रम्यतर वाटूं लागली आहे. जरा येथें उभे राहून तर पहा काय काय दिसतें तें! ती पहा मंदाकिनी! येथून किती कृश झालेली दिसत आहे ती! ही सागरास मिळण्याचे वेळीं, प्राणनाथ, पुष्ट होईल, नाहीं बरें? ते पहा तिच्या तीरावरील शुभ्र पक्षी लहान पुष्पांप्रमाणें दिसतात! ते ऋषिजनच काय हो अजून तिच्या सांनिध ध्यानस्थ बसले आहेत? ही अशी प्रातः काळापासून तेथें

बसण्याची विद्या त्यांनीं जवळच्या दगडांपासून संपादन केली काय! पहावें तिकडे वृक्ष व लता, पल्लवांनीं व फलपुष्पांनीं युक्त असून पक्षिमुखानें आपला आनंद दर्शवीत आहेत! येथें वारा तरी कसा सुखकारक वहातो आहे! प्रिया, मनाला प्रफुल्लित करणारे असे नगरांत काय बरें प्रकार आहेत? आतां जरा माझे पाय दुखूं लागले आहेत, तर ह्या जवळच्या कुंजांत क्षणभर स्वस्थ बसूंया.'' लगेच रामचंद्रानें सीतेचा कर धरून तिला त्या मनोहर कुंजांत नेलें. नंतर तेथें त्या दंतपत्याचीं जीं भाषणें झालीं तीं आतां, श्रोतेहो, कान देऊन ऐका.

**रामचंद्र**— प्रिये, ह्या जवळच्या विस्तृत शिलातलावर आपण बसूं या. ( बसल्यावर ) प्राणप्रिये, हा कुंज खरोखर रम्यतेचा प्राणवल्लभ आहे! येथें काय बरें कमी आहे? उदक पाहिजे असेल तर हे पहा चोहोंकडून केवढाले स्वच्छोदकाचे झरे झुळझुळ वहात आहेत ते! ह्या नाना प्रकारच्या फुलांवरून, एकमेकांस दृढालिंगन देणाऱ्या ह्या लता तरी वर किती जातींच्या दिसत आहेत, त्या पहा! ही भूमि व ही शिला, पहा, मकरंदानें किती चिकट झाली आहे ती! हे इकडे मधुकर पुष्परसासक्त झाले आहेत! हा प्रफुल्ल व नम्र आम्रवृक्ष आपल्या डाहळ्यांनीं, जन्म देणाऱ्या भूमातेस जणूं नमस्कार करीत आहे! हीं सर्वत्र पक्ष्यांचीं वरटीं किती तरी सुंदर दिसत आहेत! ह्या दीप्तिमान् उष्ण ऋतूमध्येंही ह्यांत विलक्षण थंडी वाजत आहे!

**सीता**—( पतीस दृढ आलिंगन देऊन ) प्रिया, मला आतां मुळींच थंडी वाजत नाहीं!

**रामचंद्र**— प्रिये, तू ह्मणालीस तसाच हा पर्वत उत्तम असून आपल्यास राहावयास योग्य आहे! व ह्या उत्तमपणामुळेंच हा सर्वांत उंच आहे! अग, रानांत जरी किती सोई असल्या तरी तुज सारखीला हें स्थळ राहण्याला कसें बरें आवडावें? वनांत ऋषींनीं अथवा भिल्लांनींच वास करावा. राजकन्येस नगरांतील हवाशीर सुंदर मंदिरच पाहिजे! आतां मला वाईट वाटूं नये ह्मणून त्वां ह्या स्थळाच्या केलेल्या प्रशंसेस नांव कोण ठेवील बरें? पण ही लोकरंजनार्थ केलेली मुखप्रशंसा होय! मंदिरांतील तें सुख जाऊन तुला

येथें भिल्लस्त्रीप्रमाणें दिवस काढावे लागत आहेत, हें पाहून मज-वांचून कोणत्या सहृदय मनुष्यास वाईट वाटणार नाहीं बरें? सुतनु, किती तरी कृश झालीस ही? ह्या मानानें चौदा वर्षांत तुझी काय स्थिति हो-णार? तुझ्या गालांवरील तो टवटवीतपणा आरक्ततेसह वनांत राहावें लागेल, ह्मणूनच कोठें पळाला काय! अधराची लाली कांतीसह निमाली! नयनें किती तरी खोल गेलीं हीं! कस्तुरीचा लेप नसल्या-मुळेंच काय, हाय! हाय! तुझा हाताचा गोंडसपणा तुला सोडून गेला! कृशोदरि, ही तुझी दशा पाहून क्षणोक्षणीं मला वाईट वाटतें. पण काय करूं? ह्यांत मला इतकाच आनंद वाटतो कीं, अशा सारख्या अपत्तींत असतांही तूं मोठ्या संपत्तींत असल्याप्रमाणें मला दाखवीत आहेस! लक्ष्मणाविषयींही वारंवार मला असेच उद्गार काढावेसे वाटतात!

**सीता**— प्राणेश्वरा, आमच्याविषयीं आपण इतके कष्टी होऊं नका. हातापायांस श्रम पडतात ह्मणून उदरानें दुःखी झालें असतां काय बरें परिणाम होईल? आपल्याविषयीं आह्मांस नाहीं का वाईट वाटत? आपली रूपसंपत्ति केवढी? आपला प्रताप किती लोकोत्तर? आपली लोकप्रियता केवढी विलक्षण? आपली बुद्धि किती तीव्र? विद्या तरी किती अलौकिक? आपली कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुंशक्ति किती प्रखर? आपल्या मध्यें जें जें कांहीं बघावें तें तें सर्व अनुपम असून आश्चर्य-चकित करणारें आहे! आपण राजपुत्र अयोध्येंत किती बरें आनं-दानें व सौख्यानें राहत होतां! तें सर्व जाऊन आज रानांत झोंप-डींत रहावें लागत आहे! प्राणनाथ, तुम्हाविषयीं मात्र आह्मांस दुःख वाटत आहे, हें खरें आहे. आह्मांविषयीं तुह्मांस वाटणारें दुःख निर्मूळ आहे. प्रिया, सर्वदुःखपरिहार करणारा आपला सहवास असतां आह्मांपाशीं दुःख कसें राहील? अग्नीची गांठ पडल्यावर कापसाचा केवढा कां ढिगारा असेना! पण त्याचें क्षणांत काय बरें होतें?

**राम**— तुला जर आशा अरण्यांत ह्या कुंजासारख्या स्थळीं समाधान वाटत आहे, तर ठीक आहे. आपणास आतां काय चौदा वर्षें अशींच समाधानाचीं स्थळें मिळावयाचीं! प्रिये, हें खरोखर आनंगाचें वसतिस्थान असावें असें मला वाटतें. कशावरून तर

तो नसतां मी त्याच्या ह्या शिलासनावर बसल्यामुळेंच काय माझ्या अंगांत त्यानें आल्यावर आतां प्रवेश केला!

सीता—ह्मणूनच प्राणप्रिया, आपण ह्या समयीं मला फारच मनोहर केवळ मदनच दिसतां! आणि अशा मदनमूर्तीनें जर मला दृढालिंगन दिलें आहे, तर माझी अवस्था काय बरें झाली असेल? प्राणनाथ, हें एकान्त स्थल फारच रम्य आहे, नाहीं बरें?

राम— प्रिये, तो पहा लक्ष्मण. आह्मी कोठें आहों ह्मणून इकडे तिकडे पहात आहे वाटतें! तर चला, आतां त्यासह स्वस्थानीं जाऊं.

सीता व राम तिकडे जाण्याकरितां उठल्यावर रामानें एकदां सीतेला घट्ट प्रेमालिंगन दिलें. तीं साक्षात् तरुलताच काय त्या कुंजाच्या बाहेर पडलीं असे भासलें! सीतेनें रामहृदयाकडे पाहून किंचित् हसून ह्मटलें, "हे कमलाक्षा, आपल्या विस्तृत वक्षस्थलावर हें काय दिसत आहे?" रसिकश्रोतेहो, सीतेच्या ललाटावरील कुंकुमतिलकाचा तो ठसा कोमल रामहृदयावर वठला होता! नंतर रामही हसून ह्मणाला "प्रिये, इतके दिवस तुझी प्रेमलता माझ्या हृदयभूमींतच होती! तिला ह्या अरण्यामध्यें वसंतांत चांगलें जीवन मिळाल्यामुळें तिचा हा जोराचा अंकुर आतां वर दिसावयास लागला आहे!" ह्याप्रमाणें त्यांचीं भाषणें होऊन तें दंपत्य लक्ष्मणापाशीं जाऊन तीं सर्व मिळून आणखी वर जाऊन तेथें बसलीं. सीतेला रामाजवळ पाहून लक्ष्मण ह्मणाला, "ह्या चित्रकुटाशीं जसा वनश्रीचा संयोग तसा, प्रियबंधो, आपल्याशीं ह्या जगदानंदकारिणी जनकनंदिनीचा संयोग मोठा मनोहर दिसत असून आल्हादप्रद वाटतो!" इतक्यांत, "आपण जेथें एक रात्र सर्व प्रकारें सुखानें काढिली त्या भगवन्भारद्वाजमहामुनींचा आश्रम कोणीकडे आहे बरें? भावोजी, ज्याच्या खालीं आह्मी बहुत वेळ विश्रांति घेतली तो विस्तीर्ण सुंदर श्याम वटवृक्ष येथून दिसतो काय?" असें सीता लक्ष्मणास विचारीत असतां लक्ष्मण उठून लक्ष्यपूर्वक पाहूं लागला! तों त्याचे कानीं मोठा कोलाहल पडला! तत्क्षणीं तो कोठून येत आहे, हें समजण्याविषयीं तो अत्यंत आतुर झाला. तेथून नीट दिसेना ह्मणून एका वृक्षाग्रीं चढून आश्चर्यचकित मुद्रेनें

चोहोंकडे पाहूं लागला. इतक्यांत सेनासमुद्रच काय त्याच्या दृष्टीस पडला! तेव्हां तेथूनच तो ह्मणाला, " प्रियबंधो, आतां येथें विनोदाच्या गोष्टी बोलत स्वस्थ बसण्याची ही वेळ नाहीं! आपल्या उटजेंत चला, आणि युद्धास सिद्ध व्हा. कोणी सेनानायक अगणित सैन्यासह आपल्यावर चालून येत आहे! आपल्यावर ह्या स्थळीं कोण वरें चालून येणार? हांहां आलें लक्षांत! ज्या माउलीनें तुह्मांस वनांत जाण्याविषयीं वृद्धपतीस मसलत दिली, तिनेंच नूतन राज्यपदावर बसलेल्या आपल्या प्रियपुत्रास आमच्या वधाची मसलत देऊन ह्या अफाट सैन्यासह आमच्यावर पाठविलें आहे! कारण, ह्या वेळीं जरी तो तिचा पुत्र राजा झाला आहे, तरी चौदावर्षांनीं तें तुह्मी राज्य अवश्य ध्याल, हें मनांत आणून, हें पुढील भीतीचें मूळच आतां खणून टाकण्याविषयींचा त्या बाईचा आह्मांवर हा पूर्ण अनुग्रह असेल! अगा बंधो, देवीजानकि, आतां तर माझ्या मनांत संशयाची छाया सुद्धां उरली नाहीं! तो सर्वांत मोठा उंच ध्वज फडकतो आहे तो आपलाच आहे. तो पहा, पित्याचा पर्वतप्राय शुभ्र हत्ती! अहो इतकें कशाला? हा प्रचंड हत्ती किंवा तो ध्वज न दिसता तरी हें सैन्य भरताचेंच ह्मणून जाणण्यास अगदीं सुलभ होतें. कारण असा कोणता मूर्ख राजा रानांत एवढें सैन्य पाठविणार आहे? ऋषींचा विध्वंस करूं इच्छिणारा एवढा पुण्यप्रतापी राजा कोणी उत्पन्न झाला असेल काय! व असला तरी तदर्थ एवढा सैन्यभार तो कशाला! ह्यावरून, महाराज, तोच दुष्ट कैकेयीपुत्र आमच्या नाशार्थ आह्मांवर चालून येत आहे, हें निर्भ्रान्त समजा. सैन्यानें पहा सर्व वन जणूं थर थर कांपवून सोडलें आहे! धुळीचे लोटचे लोट आकाशास जाऊन मिळत आहेत! कांहीं लोक पुढें असून सैन्य त्यांच्या पुष्कळच मागें आहे. चला तर. ह्या पर्वतश्रेष्ठाची आतां रमणीयता काय कामाची! हा चित्रकूट वळकट चित्रकोट समजून त्यांतील एकाचाही वर प्रवेश न होईल असें करा. किंवा तुह्मी अगोदर कशाला! मीच एकसारखी त्यांच्यावर शरवृष्टि करतों. "इतकें बोलून तो रामापाशीं खालीं येत आहे, तों रामचंद्रास सीता ह्मणूं लागली, " प्राणनाथ, हें ऐकून आश्चर्यानें मी अगदीं च-

कित होऊन गेलें आहे. आतां क्षणभरही येथें बसूं नका! भावोजींनीं सांगि-तल्याप्रमाणें लौकर युद्धास सिद्ध व्हा. माझ्या पित्यानें दिलेलें तें धनुष्य व तो अक्षय्य भाता बाहेर काढा आतां! काय हो पण पूज्य मामाजींस, भगवान् वसिष्ठांस, सुमंत्रादिक मंत्र्यांस, व स्वतः भरत भावो-जींस हें कृत्य आवडलें तरी कसें! पण ह्यांच्या आवडण्याला विचारतो कोण! आमचा हा वनवास त्या एका सासूबाईवांचून कोणास तरी रुचला होता काय? प्राणनाथ, आपल्या प्रतापाग्नीनें ह्या सर्व सैन्याचें तेव्हांच भस्म होईल, हें मी समजतें आहें. ह्मणूनच मला यत्किंचित-ही भय वाटत नाहीं."

राम०— लक्ष्मणा, हरिणाक्षि, जानकि, चला आपण आपल्या पर्ण-कुटिकेंत जाऊं. जातां जातां माझें ह्यावर काय ह्मणणें आहे हें तुह्मां-ला सांगतों. वत्सा, तू सर्व लक्षणांवरून वत्स भरत येत आहे, ह्म-णून ह्मणालास हें मात्र खरें असेल. परंतु त्याचा इकडे येण्याचा भलताच हेतु समजून मला युद्धास सिद्ध होण्याविषयीं सांगून तू त्यां-च्यावर बाणांचा वर्षाव करण्यास प्रवृत्त झालास, हें मात्र व्यर्थ आ-हे! लक्ष्मणा ,अरे स्वयंवरोत्सव आटपून आपण मिथिलेहून प्रिय अयोध्यानगरींत आल्यावर एक दोन दिवसांतच ते दोघे बंधु आजो-ळीं गेले. त्यास बारा वर्षें लोटलीं. त्यामुळें त्यांचें आह्मांवरील अ-प्रतिम प्रेम तू विसरलास वाटतें? पण मला तें जशाचें तसें आठव-तें आहे! हिला तर त्यांच्याविषयीं विशेष कांहीं ठाऊक नाहीं. आह्मी प्रसंगोपात्त जें कांहीं बोललों असेल तेवढेंच. पण तेवढ्यावरून हि-च्या मनांतही तुजसारख्या प्रिय भरताविषयीं विपरीत कल्पना प्रथम-तः तरी आल्या नसतील! भरतास मातुलगृहीं अथवा अयोध्येंत आमचें हें वृत्त समजतांच परमावधीचें दुःख झालें असेल. त्याला अह्मांवां-चून क्षणमात्रही चैन पडलें नसेल. ह्मणून तो आह्मांस भेटावयास आला आहे, ह्यांत लेशही संशय नाहीं. वास्तविक पहातां तो ह्या पूर्वींच येथें यावा, परंतु मध्यें कांहीं तरी त्यास मोठें विघ्न आलें असावें, ह्यामुळें इतका अवकाश त्यास लागला. अथवा हा अवकाश तरी कसला? मातुलाच्या राजगृहाख्य नगरीहून येऊन ताताज्ञेनें राजपदावर बसू-न इकडे येण्यास इतका काळ अवश्य पाहिजेच. पण लक्ष्मणा,

ह्या त्याच्या आगमनावरून त्यानें राज्याचा तरी स्वीकार केला असेल असें कशावरून ह्मणावें? राजपदाचा अंगीकार करण्याविषयीं कनिष्ठमातेचा अत्यंतउल्हास, ताताज्ञा व वसिष्ठांचा आग्रह हीं त्याच्या बुद्धीस फारच अन्यायमूलक वाटतील. मग तो हें अन्याय्य कर्म कसें करील? बरें, त्यानें राज्यपदाचा स्वीकार केला नसेल असें ह्मणावें, तर आह्मांवरील त्याचें अतोनात प्रेम त्याला इतके दिवस तिकडे कधींही राहूं न देतें. इकडे त्यास येण्यास इतका कालावधि होण्यास दोन कारणें दिसतात. एक त्यानें राज्यस्वीकार केला असेल हें; व दुसरें तो कांहीं तरी मोठ्या विघ्नांत सांपडला असेल! परंतु ह्यांतील पहिलें कारण तर केवळ कल्पनामय आहे; कारण राज्यस्वीकार केल्यावर त्याला आह्मांस भेटावेंसें वाटणार नाहीं. तेव्हां दुसरें कारण मात्र मला खरें व सयुक्तिक दिसतें. लक्ष्मणा, तो बंधु ज्यापेक्षां इकडे आला आहे, त्यापेक्षां आमच्या प्रिय भरतमातेचा हेतु पूर्ण झाला नाहीं, असें दिसतें. ह्या मुळें मला फार फार वाईट वाटत आहे. जिनें अत्यंत वात्सल्य हृदयीं धरून भरतासाठीं एवढी खटपट केली, प्रिय भर्त्यास पश्चात्तापप्रद दुरुत्तरेंही बोलली तिचा हा सद्धेतु निष्फल झाला हें फार वाईट झालें. वत्सा, तो ज्या महत्संकटांत गुंतला असेल,तें संकट जाणण्याविषयीं मला फारच भीति वाटते आहे! आणि त्या दुःस्वप्नाची स्मृति ह्या भीतीला अधिकच पुष्टि देते! असो; खरें काय तें आतां लौकरच समजेल. आह्मांस वनवासामुळें महद्दुःख होत असेल असें समजून तो प्रियबंधु आमचें सांत्वन करून आह्मांस परत नेण्याचे आशयानें किंवा आपणास प्राप्त झालेलें राज्य केवळ अन्यायमूलक आहे, हें सांगण्याकरितां इकडे येत नसेल, असें कशावरून ह्मणावें?

**लक्ष्मण**—आपल्या सारख्या अजातशत्रूपासून अशाच कल्पना निघावयाच्या! परंतु ह्या सर्व कल्पनालहरि आहेत! काय ह्या कल्पनासृष्टींत असतां त्या भरतमातेची समग्र प्रतिमा आपल्यापुढें उभी नव्हती? अहो, राज्यश्रीचा त्याग करून ह्या वनश्रीच्या दर्शनानें मोहून जाणारे जगांत आपल्या सारखे उदारप्रकृति पुरुष क्वचित्च जन्मतात! तो खचित राज्यमदानें प्रमत्त होऊन आपल्या नाशार्थ आला आहे! असें नसतें तर त्यानें हा एवढा सैन्यभार बरोबर कशाला आणिला असता?

**राम**०—त्यांतही त्याचा चांगलाच हेतु असेल. वत्सा, भरतशत्रुघ्नां-विषयीं कांहीं तरी विपरीत कल्पना काढणें ह्मणजे त्या तुझ्याविषयींच काढणें होत, असें समजून मी अत्यंत उदास होतों रे!

**लक्ष्मण**—आतां लौकरच काय तें समजेल. आपण ह्मणतां असें-ही असेल! परंतु पूर्वसंबंध मनांत आणतां, मी ह्मणतों हें विशेष संभाव्य दिसतें.

ह्याप्रमाणें ते बंधु बोलत व सीता तें श्रवण करीत, तीं तिघें त्या उठजेंत आलीं. अनेक प्रकारच्या साधकबाधक विचारांनीं लक्ष्मणाचा चेहरा अगदीं चंचल दिसत होता!

इतक्यांत भरत, शत्रुघ्न, कौसल्या, सुमित्रा, कैकेयी, वसिष्ठ, वामदेव व सुमित्रादि मंडळी पुढें आली आणि रामाच्या वसतिस्थानाचा ऋषिमंडळीमध्यें शोध करूं लागली. रामदर्शनाविषयीं अत्यंत आतुर झालेला भरत सर्वांत पुढें होता. सैन्य तर सर्व मागेंच राहिलें. रामचंद्र त्यांस आणण्याकरितां पुढें जात होता. परंतु लक्ष्मणाच्या आग्रहामुळें तो गेला नाहीं. हें त्रितय कुटिकेच्या अंगणांत बसलें होतें. रामही त्यांच्या भेटीविषयीं फार उत्सुक झाला होता. त्यांचा हा वेळ मंदाकिनीवर जाण्याचा होता. परंतु तीं गेलीं नाहींत. भरतादिकांस दर्शनीय असे कांहीं ऋष्याश्रम लागले. परंतु त्यांच्या दर्शनांत त्यांनीं विशेष काळ घालविला नाहीं! ऋषिजनांचें दर्शन घेऊन भरतानें त्यांच्या पाशीं मागितलें तें हें कीं, "अयोध्याधिपति रामचंद्र आपली सुंदर सुशील स्त्री देवीजानकी व प्रिय बंधु लक्ष्मण ह्यांसह कोठें राहतो? तें कृपा करून सांगा." त्यांच्यासांगण्याप्रमाणें ही मंडळी रामचंद्राश्रमीं आली. अंगणांतील वृक्षावर असलेल्या कित्येक आयुधांवरून हें रामचंद्राचें पवित्र वसतिस्थान आहे, असें वाटतांच त्या त्रिवर्गास— "कृपासागरा रामा, देवी जनकनंदिनि, हे सत्यव्रत लक्ष्मणा, तुह्मी कोठें आहां?" असें मोठ्यानें गहींवर येऊन भरत ओरडला! आधींच तेथें सायंकाळाचा काळोख पसरला होता आणि भरताच्या डोळ्यांतून तर एकसारखा पाण्याचा प्रवाह चालला होता, त्यामुळें त्याला पुढें कांहींच दिसेनासें झालें! तेव्हां त्या मंडळीस रामाचें निवासस्थान दाखविण्याकरितां आलेल्या

एका ऋषिपुत्रानें भरताचा हात धरून त्यास अंगणांत आणिलें. त्याबरोबर त्याला अनुसरणारी मंडळीही तेथें आली. इतक्यांत झटदिशी, तो पित्राज्ञापालक, धर्मशील, उदारधी, कृपाघन, आनंदशाली, निष्कपट, अजातशत्रु, कौसल्याहृदयानंदवर्धक असा रामचंद्र पुढें आला. त्याला पाहतांच भरत प्रेमसागरांतील मत्स्य होऊन रामचरणांवर पडला! "बाळा, भरता वर ऊठ." असे रामाचे त्याच्या अमृततुल्य शब्द कानीं पडतांच तो सावध होऊन वर उठला व लगेच त्यानें रामास दृढालिंगन देऊन रामाचें सर्वांग अश्रुजलानें व प्रेमानें आर्द्र करून सोडलें! त्या आलिंगनानें ते दोघे बंधु एकमय झाले! भरत कोण व रामचंद्र कोण हें ओळखतां येईना! पाषाण, वृक्ष, लता, पशुपक्षी, जनावरें ह्यांसही तो प्रसंग रडविणारा होता! मग तेथें असलेल्या मंडळीस रडवील हें काय सांगावें! ह्या आलिंगनसमयीं त्या बंधूंच्या चित्तवृत्तींची जी कांहीं विलक्षण अवस्था झाली ती वर्णन करण्यास मनुष्यवाणी ही मनुष्येतरांच्या वाणीप्रमाणें निःशब्द होते! असो; भरतानें त्या ऋषिवेषधारी रामाकडे पाहून "प्रियबंधो, काय हें?" असें ह्मणून मोठ्यानें रडण्यास आरंभ केला व तो पुनः मूर्च्छित पडला! भरताचा तो मुनिवेष पाहून रामचंद्रासही फार वाईट वाटलें, असें त्या वेळच्या त्याच्या नयनाश्रु वाहणाऱ्या चेहेऱ्या वरून अगदीं स्पष्ट दिसत होतें. नंतर भरत थोडा सावध होऊन लगेच त्यानें लक्ष्मणास कडकडून आलिंगन दिलें, सीताचरणीं मस्तक ठेविलें आणि तिचा सद्गदितांतःकरणानें धन्यवाद गाइला. लक्ष्मणानें सर्वांस बसण्याविषयीं वारंवार सांगितलें. इतक्यांत सुमंत्रानें मशाला आणवून तेथें उजेड करविला. तेव्हां त्यांना बरोबर मंडळी कोण कोण आहे हें समजलें. त्यांनीं वसिष्ठाचार्यादिकांच्या चरणीं मस्तकें ठेविलीं व मातांस नमस्कार करण्यास ते बंधु व सीता जात असतां त्यांनीं रडून कल्होळ केला. तेव्हां सर्वांचींच अन्तःकरणें विदारून गेलीं. कोणाच्यानें कांहीं पुढें बोलवेना! त्यांस वंदन केल्यावर रामचंद्र ह्मणाला, वत्सा भरता, तुझी ही अशी दशा कशा मुळें झाली? अरे, तूं हा असा कसा वेष धारण केला आहेस? तुला केवळ मी शब्दावरून ओळखलें! बाळा, बैस रे माझ्या

मांडीवर. अरे, वनांत कशाकरितां आलास? असा उदास कां? मुखावरचें तें तेज कोठें आहे? क्षत्रियाला कधींही न सोडणारें ओज तुझ्या ठिकाणीं कसें दिसत नाहीं? तुझ्या येण्याचें कारण कांहींही असलें, तरी ह्या मंडळींना कशाला व्यर्थ श्रम दिलेस? एवढें सैन्य कशाला बरोबर आणिलेंस? मला वाटतें सर्व अयोध्यानगरी तुझ्या पाठीमागून येत आहे! ह्यावरून अल्प काळांत तूं चांगलीच लोकप्रियता संपादन केलीस, हें पाहून मला फार आनंद झाला आहे. अरे, पूज्य पित्याला एकाकी तेथें ठेवून तुह्मी सर्व कसे आलां? काय त्याच्याच आज्ञेनें तुम्ही येथें आलां? "हें ऐकून सर्वांस वाईट वाटलें. कौसल्यादिकांच्या शोकास अधिकच भरतें आलें. तरी रामचंद्राचें त्यास प्रश्न करणें चाललेंच होतें. "अयोध्यापते, राजाचें मुख्य कर्तव्य जें न्यायानें प्रजारक्षण करणें, तें चांगल्या प्रकारें चाललें आहेना? त्यांना तू केवळ पिताच आहेस असें वाटूं देतोसना? सर्व लोक सदाचरणानें वागण्याविषयीं तुझे यत्न चालले आहेतना? त्यांपासून योग्य तेवढाच कर घेतोसना? आपल्या सुखार्थ द्रव्य पाहिजे, ह्मणून प्रजांस पिळून काढून त्यांचे शाप घेणें हें तुला इष्ट वाटत नाहींना? प्रजांच्या गाऱ्हाण्यांकडे लक्ष्य देऊन त्यांस दुःखविमुक्त करणें ह्यांत तुला आनंद होतो कीं नाहीं? कांहीं तरी कारण शोधून काढून दुसऱ्या निर्बल राजांचें राज्य हरण करण्याविषयीं इच्छा धरून, ती पूर्ण करण्यासाठीं प्रजांपासून द्रव्य हरण करणें हें चौर्यकर्म समजतोस कीं? रघुकुलप्रदीपा, प्रजाजनांचे ठायीं असंतोष वाढविणें हें राज्यनाशाचें आदितत्त्व आहे, हें तुला ज्ञात आहेना? महामान्यलोकांचा कधींही अवमान करीत नाहींसना? प्रधानादि सर्व लहानमोठे अधिकारी आपआपलीं कामें लक्ष्यपूर्वक व पापभीति धरून करितातना? तुझ्या गुप्त मसलती कोणास समजूं देत नाहींसना? राज्यांत जे जे शाहाणे आहेत, त्यांचे विचार घेतोसना? तुझा चोहोंकडे दरारा आहेना? असत्य भाषण, उत्कोचग्रहण, बलात्कार इत्यादि अनेक अपराधांबद्दल क्षमा किंवा पक्षपात न करितां कडक शिक्षा देणें हेंच आपलें कर्तव्य होय, असें तुला वाटण्याचा कधीं प्रसंग आला आहे काय? अधिकारांवर योग्य मनुष्यांची योजना केल्याशिवाय राज्यरथ नीट चालावयाचा नाहीं, ह्या पितृवचना-

चो तुझा स्मृति आहेना? तुझें सैन्य सदा सज्ज असतें ना? युक्तिमान् व बुद्धिमान् लोकांचे श्रम फलद्रूप करितोस कीं? स्वधर्मानें वागणें ह्यांतच सर्व हित आहे, हें सर्व प्रजांस समजतेंच आहे, तरी पण सांप्रत नास्तिकमतवादी तुझ्या भीतीमुळें आपलें मत कोणास उपदेशीत नाहींतना? रोगग्रस्त, व्यंग, निराश्रित, ह्यांची व्यवस्था पूर्ववत् चालली आहेना? मांडलिकांचा अपमान करणें, ह्यांत तुला भूषण वाटत नाहींना? प्रजाजनांस किंवा संस्थानिकांस अत्यंत अनिष्ट होईल अशा आचरणानें त्यांचा आपल्या ठिकाणीं अविश्वास किंवा असंतोष उत्पन्न करून आपल्यामध्यें निर्बलता आणून बिचाऱ्या प्रजांचीं शस्त्रें हरण करणें, किंवा संस्थानिकांना आपलें सैन्य कमी करण्याविषयीं त्यांच्यावर बलात्कार करणें, किंवा त्यांच्या वित्तसंचयावर चौर्यदृष्टि ठेवणें, आशासारखीं कलियुगांतील राजांसच केवळ शोभणारीं नीचकर्में करण्याची कल्पनासुद्धां तुझ्या शुद्ध अन्तःकरणास विटाळूं पाहात नाहींना? सदा सर्व काळ संस्थानाधिपति बालराजे असावे अशी दुर्बुद्धि कोणीं सांगितली तर तुला ती कळत नाहींना? विश्वासानें विश्वास वाढवितोसना? सर्व प्रजा सारख्या लेखितोसना? विद्वानांना उत्तेजन, साधुसंतांचे ठायीं नम्रता, सर्वकाळीं सावधानता, हीं तुझ्या राज्यांत नांदत आहेतना? पाहिजे त्यावेळीं व पाहिजे त्यास्थळीं तूं जवळ नसतां प्रजा तुझ्या धन्यवाद गाऊन तुला आशीर्वाद देतातना? राज्य हें कपटमय आहे, हें तुला माहीत आहेना?" ह्या प्रमाणें रामचंद्रानें लहान मोठे अनेक प्रश्न केले. हे ऐकत असतां भरत एकसारखे दीर्घ श्वास सोडीत होता! तो हात जोडून ह्मणाला, "प्रियबंधो, हाय! हाय! मी उगाच प्रिय ह्मणालों. ज्यांच्या ह्या दुःखास मी मूर्तिमंत कारण असतां ह्यांवर माझें प्रेम आहे, असें दर्शविणें कपटमय होत नाहीं काय? रामचंद्रा, माते जानकि, अरे लक्ष्मणा, ह्या मातेच्या पोटीं जर माझें जन्मच नसतें, तर तुह्मांवर हा भयंकर व अश्रुतपूर्व प्रसंग कधीं तरी आला असता काय? तेव्हां तुमच्या ह्या अत्यंत दुःखद स्थितीस मीच कारण आहें. माता असून मी जर नसतों, तर पित्याकडून ही कडक शिक्षा तुह्मां निरप-

राध्यांस मिळती काय? तेव्हां मीच आपला सर्वस्वी अपराधी असून निरपराध्यांना शिक्षा देणारास जी कांहीं धर्मशास्त्रांत परमावधीची कडक शिक्षा असेल ती ह्या देहास देणें योग्य आहे! हाय! हाय! ज्याच्या मुळें हें वनवासरूप भयंकर शासन आपण भोगीत आहां, असा हा मी मातेच्या पोटांतच कां मेलों नाहीं! अथवा जन्मतांच कां प्रेत झालों नाहीं! किंवा आजोळीं असतां मजवर विद्युत्पातादिक कां झाले नाहींत! अथवा जिनें पतीकडून हें अधमाधम कृत्य करविलें तिचाच कां अगोदर अंत झाला नाहीं! हिनें एक तुह्मां तिघांसच दुःख दिलें असें नाहीं तर राज्यांत सर्वांसच दिलें आहे. रामचंद्रा, तुझें नांव उच्चारितांच तुझे सर्व गुण जणूं माझ्या हृदयांत प्रवेश करून अंतःकरणाची स्थिति कांहीं विलक्षणच होते! रामचंद्रा, हा महापापी, निर्लज्ज, तुह्मी निघून आल्यानंतरचें वृत्त आपल्यास कळवीत आहे, ह्यावरून माझी माता व मी आपली किती घोर अपराधी आहोंत, हें समजून मी येथें कशाकरितां आलों आहें हें ही विदित होईल!

ऐका तर, केकयदेशीं गिरिव्रज अथवा राजगृहाख्य नगरींत शत्रुघ्नासह अयोध्येंत असल्या प्रमाणें मी राहत होतों. तेथें जाऊन आम्हांस सुमारें बारा वर्षें झालीं! आपल्या सर्वांच्या भेटीविषयीं आह्मी आलीकडे फारच जरी उत्सुक झालों होतों, तरी आजोबा अश्वपति व युधाजित् ह्यांच्या आम्हावरील अत्यंत प्रेमास्तव व त्या रम्य नगरींत आह्मांस जीं अनेक सुखसाधनें होतीं त्यांमुळें ती राजधानीही सोडूं नयेसें वाटत असे! अयोध्येपेक्षांही तेथें आमचें मन अधिक रमलें होतें. त्या स्थळीं नानाप्रकारच्या सद्व्यवसायांत आमचा सर्व वेळ जाई. नुकतेंच ह्मणजे आपण ह्या पर्वतावर आल्यानंतर सुमारें आठवे दिवशीं प्रातःकाळींच अयोध्येहून आह्मांस नेण्याकरितां कांहीं दूत आले. ते येण्याचे अगोदर सुमारें प्रहर दीडप्रहर मी निजलेला असतां मला एक दुष्ट स्वप्न पडलें होतें. तेणेंकरून मी जागा झाल्यापासून फारच उदासीन झालों होतों. ह्या स्वप्नासंबंधी उदासीनतेचें मला विस्मरण व्हावें ह्मणून गायन, वादन, वारांगनांचें नृत्य, हास्यविनोदपर गोष्टी, खेळ, मित्रांच्या भेटी इत्यादि नानाप्रकारांनीं माझें

चित्तरंजन करूं लागले. दुःस्वप्ननाशार्थ दानधर्मही मजकडून बहुत करविला. परंतु हें सर्व चाललें असतां माझें मन त्या अयोध्यानगरीकडे होतें! ह्या दुष्ट स्वप्नाचें फल ह्मटलें ह्मणजे आप्तजनमरणवार्ताश्रवण होय, अशी माझी पक्की खात्री झाली होती. त्या मुळें त्या नानाविध रंजनप्रकारांनीं माझें औदास्य लेशाही कमी होत नव्हतें. त्या दूतांस प्रथमतः त्यांचें कुशल पुसून मग पितृचरणांपासून प्रत्येकाचें नांव घेऊन सर्वांचें कुशल विचारिलें, तेव्हां त्यांनीं सर्व यथास्थित आहे, असें सांगितलें. तरी पण त्यांच्या त्या मुखचर्यांवरून व अडखळत, जपून व अल्प बोलण्यानें अयोध्येंत कांहीं तरी अनर्थप्रद वृत्त घडलें असावें असें मला वाटतच होतें. नंतर त्यांनीं मला, कालावधि न करितां तावडतोब निघण्याविषयीं वसिष्ठादि महामुनि व सुमंत्रादि प्रधान यांचा निरोप निवेदन करून त्याच अर्थाचें पत्र मला दिलें. पण पूज्य ताताची आह्मांस काय आज्ञा आहे, हें त्यांस मी विचारावयास विसरलों; व कोणी त्याचें कुशल वृत्त ऐकतांही म्यां श्रवण केलें नाहीं. असो; नंतर त्यांनीं वेगवान् अश्वांच्या आश्रयानें व रात्रंदिवस चालतां चालतां गिरिव्रजनगरांत येण्यास आपल्यास सवंब सात दिवस लागले ह्मणून सांगितलें. ह्या वरून हे फारच लौकर आले असें मला वाटून तेथें कांहीं तरी मोठें अरिष्ट घडलें असावें, असें जें मला वाटत होतें, त्यांत ही आधिकच भर पडली! नंतर त्यांनीं आह्मांस आमच्या आजोबांस व मामास दिलेल्या अत्यंत मूल्यवान् देणग्या दिल्या! हें वृत्त मातामह व मातुल यांस कळतांच त्यांनाही फार वाईट वाटलें. व अयोध्येंत कांहीं तरी विलक्षण दुःखप्रद प्रसंग आला आहे, असा त्यांनींही मज सारखाच तर्क केला. मग त्यांनीं आमच्या निघण्याची लौकर तयारी केली. आजोळच्या प्रत्येक मनुष्याचें आमच्यावर अतोनात प्रेम जडलें होतें, त्या मुळें आमचा वियोग त्यांस फारच कष्टप्रद वाटला. त्यांनीं आह्मां बरोबर नानाप्रकारच्या मूल्यवान् वस्तु दिल्या व पुष्कळ सैन्य पाठविण्याचें सज्ज केलें. आह्मी तेथील सर्वांचे निरोप घेऊन मोठ्या कष्टानें निघालों, ते शीघ्रगति अश्वांवर स्वार होऊन बहुधा रात्रंदिवस चालून सातवे रात्रीच्या पहाटेस अयोध्येच्या समीप आलों.

मराठी

सर्व सैन्य मागें राहिलें. आह्मांस अहोरात्र मार्गांत क्षणभरही चैन नव्हतें. अन्नपाणी घेण्याचें सुद्धां सुचेना. काळजी व कुतर्क ह्यांनीं अगदीं व्याप्त होऊन गेलों. कुतर्कांनीं तर आपल्या अस्तित्वाची अगदीं परमावधिच केली! एकदां वाटे तुह्मावर कांहीं तरी भयंकर प्रसंग गुदरला असेल. एकवेळ असें मनांत येई कीं लक्ष्मणास कांहीं तरी झालें असेल. पुनःपुनः असें वाटे कीं सुशीलवती सीता देवी कोणत्या तरी महत् संकटांत पडली असेल. एकदां तर मनाचा दृढ निश्चयच होऊन बसला कीं वृद्ध पित्याचा अन्त झाला असावा! मधून मधून असें वाटेकीं, माझ्या मातेनें कांहीं तरी संकट उपस्थित केलें असेल व त्या संकटाग्नींत सर्वांची आहुति पडली असेल! कधीं कधीं दुसऱ्या मातांविषयीं विपरीत कल्पना येई. कोणाच्या तरी मृत्यूनें राज्यांत घोंटाळा झाला असावा, किंवा स्वयंवरांत वाईट वाटल्यामुळें अनेक राजे एकत्र होऊन आह्मांस आतां त्रास देऊं लागले असावेत! अशा नानाविध संभाव्यासंभाव्य कल्पनातरंगांनींच काय वाहत वाहत आह्मी अयोध्येस लौकर येऊन पोंचलों! अयोध्येच्या असमंतात् भागीं किंवा आंत मला सर्वत्र उदासीनतेचें पक्कें स्वरूप दिसलें! प्रातःकाळीं नगरींत मंगल विधि व्हावयाचे ते कोठें दिसले नाहींत. मी इतक्या वर्षांनीं आलों, परंतु उत्सुकतेनें मला पहावयास एकही कोणी घराबाहेर आलेला दिसला नाहीं! उपवनादि रमणीय स्थलें अगदीं शून्य दिसलीं! कोठें गायन किंवा वाद्य ह्यांचा स्वरही ऐकूं आला नाहीं, एवढेंच नाहीं, तर प्रातःस्मरणीय ईश्वरस्तुतिपर मंजुळ शब्दही माझ्या कर्णांत आदळला नाहीं! नगरांतील देवालयांत अरुणोदयीं वाजणारीं सुस्वर वाद्येंही वाजत नव्हतीं! घरांपुढें रंगवल्लीही कोठें दिसल्या नाहींत! नगरांतील मार्गही फार अस्वच्छ होते! मी नगरीच्या जयन्त दरवाज्यापासून तों मातेच्या वाड्याच्या दरवाज्यापर्यंत आलों, पण तितक्या अन्तरावर एकही साल्हाद मद्रेनें मजकडे पाहणारा मला भेटला नाहीं! जो तो दुःखी दिसला! सर्व राजधानी जणू सुतकी आहे अशी भासली! मातेच्या मंदिरींही चित्तास आनंददायक असें कांहीं भासलें नाहीं! तेव्हां माझी काय मनःस्थिति झाली असेल ह्याचा आपणच विचार करावा. नंतर मातेजवळ गेलों. ती तर

गाढ निद्रेंत होती. मी तीला जागृत केलें. पण तिला नमन केलें किंवा नाहीं हें मला त्या वेळच्या स्थितीमुळें आतां स्मरत नाहीं. ती दचकून उठली, पण मला पाहातांच फार हर्षित झाली. तिच्या प्रफुल्ल मुखचंद्रावरून मलाही थोडें समाधान वाटलें. परंतु तें पुढें फार वेळ टिकलें नाहीं. तिनें मला अंकावर घेऊन आपल्या पितृगृहाकडील कुशल समाचार विचारिला. परंतु अयोध्येंतील उदासीनतेचें कारण समजल्यावांचून तिकडील सविस्तर वृत्त माझ्यानें सांगवलें नाहीं. माता विचारी तेवढ्याच प्रश्नाचें कसें तरी मी उत्तर देई. संशय, औदासीन्य, भीति, आतुरता, हेच काय ते माझ्या अन्तःकरणाचे धर्म होऊन राहिले होते! नंतर मीच होऊन तिला ह्मटलें, "माझे प्रिय बंधु रामलक्ष्मण आपल्या भार्यांसह कुशल आहेत ना? अगोदर त्यांची भेट घेऊन मग पितृचरणांस वंदन करून नंतर इतर मातांचे आशीर्वाद घेऊं." तेव्हां तिनें निर्लज्ज होऊन, मला विशेष आनंद व्हावा ह्मणून आपल्या मतें शहाणपणानें व मोठ्या रसभरित वाणीनें ह्मणून सर्व वृत सांगण्यास आरंभ केला. त्या लांबलचक, बाष्कळ, स्वार्थपरायण, निर्दय, अन्याययुक्त, हृदयास छिद्रें पाडणाऱ्या भाषणाची नुसती स्मृति झाली कीं सर्वांगाची लाही होऊन जाते, मग तें तिचें वरळणें तुह्मांपुढें माझ्यानें पुनःकसें सांगवेल? असो; चैत्र शुद्ध अष्टमीपासून शुद्ध एकादशीच्या प्रातःकालपर्यंतचें तिनें तुह्मसंबंधी सर्व अशुभ वृत्त माझ्याकडून ऐकवून पुढें द्वादशीपासून पौर्णिमेच्या मध्य रात्रीपर्यंतचा इतिहासरूप तप्त लोहरस माझ्या कर्णांत ओतला! त्या तेवढ्या काळांत मला कितीदां मूर्च्छा आली, मी कितीदा रडलों, मातेला कसकसें वाईट बोललों, तिला गालिप्रदान कसें केलें, स्वतःला किती निंदून घेतलें, ह्याचें मला भान नाहीं. हाय! हाय!! रामचंद्रा, लक्ष्मणा, अगे शुभांगी जानकि! आमचा प्रिय तात तुमच्या वियोगरूप महाव्याधीनें ग्रस्त होऊन पौर्णिमेच्या मध्य रात्रीं तुह्मांस मोठमोठ्यानीं हांका मारीत इहलोक सोडून गेला! अहो, पौर्णिमेचा तो चंद्रमाच अवेळीं मावळला! ह्या सर्व अनर्थाचें मूळ मला दुष्टाला प्रसवणारी माझी माता होय!" दशरथाची मृत्युवार्ता त्यांच्या कानीं पडतांच तेथें सर्वांनीं फारच विलाप केला.

राम ह्मणाला, "प्रिय तात, आह्मी वनात आलों न आलों इतक्यांत तुला आह्मांस सोडून लोकान्तरीं कसें जावेंसें वाटलें? आह्मी असा तुझा कोणता अपराध केला, कीं मरणसमयीं एकाही पुत्राचें तोंड बघूं नये असें तुला वाटलें? काय चौदा वर्षें वनांत राहण्याविषयीं सांगितलेली आज्ञा मी पूर्ण करणार नाहीं असें समजून पित्राज्ञापालन न करणाऱ्याचें तोंड न पाहण्याच्या हेतूनें त्वां परलोकीं प्रयाण केलें! तुझ्या अदर्शनानें याचक लोक शोकसागरांत पडले असतील! ऋषिवर्गासही बहुत उदासीनता वाटली असेल! सर्व प्रजा अन्नोदक टाकून रडत असतील! दीनजन निराश्रित होऊन वक्षःस्थळें बडवीत असतील! असा योद्धा आतां जगतांत निर्माण होणें कठिण, ह्मणून स्वर्गींचे देवही उद्गार काढीत असतील! हाय! हाय!! इंद्रदेवताही, आतां पृथ्वीवर यज्ञयाग व्हावयाचे नाहींत, ह्मणून, चिंतातुर झाली असेल! इंद्रास आतां साहाय्य कोण देणार? अरे! आतां अयोध्यापुरींतून धैर्य, पराक्रम, शहाणपण, मंत्र, तेज, बल, अनुभव, विद्वत्ता, वक्तृत्व हीं सर्व एकदम पित्याबरोबर गेलींना? ताता, पांच सहा दिवसांतच आह्मावरील प्रेम विसरलास काय? आतां आह्मास उपदेशामृत कोठून मिळणार? पितृप्रेम हा पवित्र शब्द आह्मास आतां परकीय झालाना? मरणसमयीं शय्येवर असतां पित्यानें सद्गदितान्तःकरणानें पुत्रांस सांगावयाच्या व पुत्रांनीं, जणूं सजल नेत्रांनींच ऐकावयाच्या, हृदयद्रावक व अत्यंत गुप्त गोष्टी, हे प्रियताता, कोणास सांगितल्या? हाय! हाय! ह्या आमच्या माता चंद्राविणें जशा रात्री, तशा दिसत आहेत! महाराज, आपण जिवन्त असतां आपल्या भयानें सर्व भूमंडलांत शांतता होती; पण आतां न जाणों एकमेकांमध्यें कलह करून सर्व राजे नाश पावतील! प्रिय पूज्य ताता, आह्मी वनांत निघाल्यापासून आपलें प्राणोत्क्रमण होईपर्यंत आह्मांस त्वां मोठमोठ्यानीं हजारों हांका मारिल्या, परंतु आह्मां पितृभक्तिविहीनबधिरांना ते पवित्र शब्द कोठून ऐकावयास येणार? तात, आतां आह्मीं काय करावें? कोठें जावें? कोणाला पुसावें? आमची गति काय होणार? आह्मी जगांत कसें राहावें? आह्मांस आतां आनंद, सौख्य, हीं सोडून गेलीं!! तुझ्या परलोकगमनानें आह्मांवरील आतपत्र गेलें! आह्मी

आतां ताप कसा निवारण करावा ? हाय! हाय!! आज आमच्या विस्तीर्ण आशामंडळाला मध्यबिंदु नाहींसा झाला! "ह्या प्रमाणें रामचंद्रानें तसाच लक्ष्मणानेंही पितृगुण आठवून बहुत शोक केला. सीतेनेंही अपरिहार्य आक्रान्त मांडला. तेव्हां कौसल्या सुमित्रा, ह्या शोकसागरांत असतांही, त्यांनीं तिला आपल्याकडे ओढिलें. भरतशत्रुघ्नही त्यावेळीं पुष्कळ रडले! त्या सर्व मंडळीचें सांत्वन करण्याकरितां वसिष्ठवामदेवसुमंत्रादि वृद्ध व अनुभवलेलीं माणसें पुढें झालीं. तेव्हां मोठ्या प्रयासानें तेथें थोडी शांतता होतांच भरत पुनः पुढील हृदयविदारक प्रसंग सांगूं लागला.

तो ह्मणाला, "बंधो, पुढें ऐक. पितृमरणवार्तारूपविषधारा माझ्या कर्णरंध्रांत पडून मीं क्षणभर मूर्च्छित पडलों होतों. तरी क्रोधातिशयानें अनावर होऊन जें कांहीं तोंडाला आलें तें भकलों! करकरा दांत चावले, कपाळ फोडून घेतलें! मनुष्यजन्माची, त्यांत स्त्रीजातीची, त्यांतही त्यांच्या विलक्षण लोभाची यथेच्छ निंदा करून त्यांच्या अज्ञानाविषयीं फार दुःखी झालों. नंतर विचार करूं लागलों, तेव्हां एका राज्यलोभांत जगांतील सर्व अनर्थ व पापकर्में येतात, अशी त्या समयीं माझी पक्की खात्री झाली! ह्या मानलेल्या महत्पदास धिक्कार असो, असें वारंवार बोललों! पहा, ह्या राज्यतृष्णेनें तुमच्या सारख्या पवित्र मनुष्यांस क्षुत्तृषाकुल करून डोक्यांत चीक घालून अरण्यांत महत्संकटें भोगण्याचें कडक शासन दिलें व शस्त्राचे व्रण न करतांही असह्य दुःख देऊन युद्धांत ज्यास कधींही पराजय ठाऊक नव्हता असा एक पराक्रमी सार्वभौम राजा सात आठ दिवसांतच कालाधीन केला!! रामा, मला राज्यप्राप्ति होण्यासाठीं आपण काय काय प्रयत्न केले, राज्यापासून काय काय सुख होतें, वगैरे आणखी माझी माता पुष्कळ बोलणार होती, परंतु पुढें तिचें बोलणें माझ्यानें ऐकवेनासें झालें, ह्मणून तिला तशीच तेथें सोडून, अत्यंत क्रोधायमान, विचारशून्य, दीन व हताश होत्साता जगतांत आपलें आतां कोणी नाहीं, मला तोंड दाखविण्यास आतां कोठें जागा नाहीं, माझ्या अंतःकरणास आतां जगत्त्रयांतही समाधानस्थान नाहीं, आपलें जन्म निरर्थक असें मला वाटून मी मोठमोठ्यानें रडत ज्येष्ठ मातेजवळ गेलों.

तिच्या चरणमूलीं पडलों व आपल्या वनगमनसंबंधानें व पितृनिधनानें मी फार शोकाकुल झालों आहें, असें तिला मीं वारंवार सांगितलें; परंतु मी कैकेयीपुत्र, ह्मणून माझें हें सर्व आचरण तिला कपटमय व खोटें वाटलें. पण मीं नानाप्रकारें तिची समजूत केली. नाहीं नाहीं त्या शपथा वाहिल्या, दुर्धर प्रतिज्ञा केल्या, माझा ह्यांत लवलेशही अपराध नाहीं, ह्मणून वारंवार स्पष्टपणें सांगितलें. तेव्हां ह्या अत्यंत अघोर व अधमाधम कृत्यांत मी मातेचा कोणत्याही प्रकारें विभागी नाहीं, अशी तिची खात्री झाली एवढेंच नाहीं, तर आपणा सर्वांवर माझें प्रेम व पूज्यबुद्धि असून आपण रानांत गेलां, ह्याविषयीं मला असह्य दुःख झालें आहे, हें तिला खरें वाटलें व पतिमरणास कैकेयीच कारण होय, असे तिच्या सारखे माझे-उद्गार निघालेले तिनें ऐकिले, तेव्हां तर माझ्याविषयींची तिची-संशयबुद्धि दूर झाली. मग तिनें अतिशय शोकाधीन होऊन मला घट्ट आलिंगून माझें मस्तकावघ्राण करून पुनः पुनः तुमच्या वनगमनाचा व तातमरणाचा सविस्तर वृत्तांत सांगितला. तेव्हां माझ्या मातेनें आपल्या पतीस कसकसें छळिलें व त्यामुळें ताताची कशी अवस्था झाली, निघण्याचे त्या प्रसंगीं ह्या दुष्टाच्या आईनें आपणास वल्कलें कशीं दिलीं, तीं पाहून तेथल्या लोकांस काय वाटलें व तिला लोकांकडून काय बक्षीस मिळालें, तातमहाराजांची असह्य शोकानें कशी दीनावस्था झाली होती, सर्व लोकांनीं ह्या अनर्थरूप-भरताच्या जननीस कसकसें निंदिलें तें सर्व, अगोदर माझ्या मातेनें मला न सांगितलेलें, वृत्त तिनें सांगितलें. तेव्हां तर मी कोपाग्नीनें दग्धच होतों काय असा झालों. ज्येष्ठमाता दीनवदन होऊन मोठ्यानें रडूं लागली. तेव्हां मी तिचें समाधान करीत आहें, तों तेथें शोकमूर्तीच अशी मध्यम माता आली. तिनेंही हाच दुःखद वृत्तान्त सांगितला. तिला ज्येष्ठमातेनें माझ्या निष्कपटबुद्धीविषयीं वारंवार सांगितलें. तेव्हां मला तिनेंही घट्ट पोटाशीं धरून आपल्या उष्णाश्रूंनीं स्नान घातलें! पुढें काय करावें, कोठें जावें, ह्याविषयीं शून्यान्तःकरण होऊन मीही मातांप्रमाणेंच बराच वेळ मूर्च्छित पडलों असतां त्या स्थळीं वसिष्ठ

महर्षि व सुमंत्र प्रधान आले. त्यांनीं मला समाधानपर दोन गोष्टी सांगून पुढील अवश्यकर्तव्याविषयीं सदुपदेश केला. गत कांहीं कधीं प्राप्त होत नाहीं, हें नानाप्रकारें मला निवेदन केलें. ह्या सर्व प्रसंगीं शत्रुघ्न मजबरोबर होता. त्याचीही ह्या असह्य शोकानें व माझ्या मातेच्या सर्वतोपरि अन्याय्य व कपटमय आचरणानें मजसारखीच स्थिति झाली होती. हा दिवस चैत्रामावास्येचा होता. प्रहर एक दिवस येतांच तेथें सर्व वरिष्ठ अधिकारी व मोठ मोठे लोक जमले. जवळ कोणी पुत्र नसल्यामुळें ज्या स्थळीं तें पितृशव तेलाच्या कढईत ठेविलें होतें, त्या स्थळीं मला नेलें. नंतर त्या सुवर्णपात्रांतून तें बाहेर काढलें. पंधरा दिवस तो पितृदेह अशा स्थितींत असल्यामुळें बराच विरूप होऊन अतिशय पिंवळा दिसत होता. तरी त्या वरील स्वाभाविक तेज अल्पही कमी झालें नव्हतें. तें शव पाहून मी त्या स्थळीं पुनः फारच शोकवश झालों. तत्क्षणीं ताताचें सर्व पवित्र चरित्र आठवलें. आह्मावर त्याचें किती विलक्षण प्रेम होतें, आह्मासाठीं त्यानें काय काय केलें तें सर्व मनांत घोळत होतें. मी शोकाकुल होतांच तेथें सर्वांची तशीच अवस्था झाली. नंतर लोकोपदेशानें मी प्रेतविधीस लागलों. पूर्वीं प्रसिद्ध केल्याप्रमाणें नियमित वेळीं लक्षावधि लोक वाड्याजवळ आले. मला वाटतें कीं अयोध्येंत एकही पुरुष तेव्हां घरीं राहिला नसेल! मोठमोठे मांडलिकही आमच्या दुःखविभागार्थ आले होते. लहान मोठे अधिकारी दुःखित मुद्रेनें व हताश अन्तःकरणानें ह्या दुःखमयकार्यांत गुंतले होते. सर्व तयारी झाल्यावर पूर्वसंप्रदायाप्रमाणें तें शव पालखीमध्यें घालून सर्व राजकीय थाटानें व पूर्वरीतीस अनुसरून आह्मी सर्व जानपदांसह सरयूतीराभिमुख झालों. सर्व मार्ग लोकांनीं गच्च भरून गेले. एक जव भरही जागा रिकामी नव्हती! लक्षावधि सुवर्णाचीं फुलें उधळलीं. व गरीबांस अतोनात द्रव्य वाटलें. सर्व माताही पालख्यांतून प्रेतयात्रेबरोबर होत्या. हो, अगोदर थोडें सांगावयाचें राहिलें. ज्येष्ठ व मध्यम मातांनीं सहगमन करण्याचा फारच आग्रह धरिला. परंतु आमच्या अत्यंत शोकास्तव व सविनय आग्रहामुळें आमची त्यास दया येऊन व वसिष्ठगुरूंच्या उपदेशानें त्यांनीं मोठ्या कष्टानें आपला

दृढ निश्चय फिरविला! सुमारें प्रहर एक दिवस असतां आह्मी स्मशानस्थळीं आलों. तेथें शास्त्रोक्त व राजकीय सर्व विधि झाले. प्रेत चितेवर ठेविलें! त्यावेळीं तर पिता जणूं अश्रु सोडीत तुह्मास हाका मारीतच आहे काय असें मला भासलें! तेव्हां तर माझा शोक अनावर झाला. घटकाभर पुढील विधि तसाच राहिला. माझें सांत्वन चाललेंच होतें. सरयूनदीचीं दोन्ही तीरें लोकांनीं गच्च भरून गेलीं होतीं! महाराजांचें शव सरणावर ठेवतांच त्यांचें शेवटचें दर्शन घेण्याविषयीं लोक फार उत्सुक होऊन पुढें येत असतां जी त्यांची तेथें अवस्था झाली ती सांगतां येत नाहीं. फार काय सांगू! सरयूसुद्धां शोकानेंच जणूं तप्त झाली होती! शेवटीं तें पितृप्रेत अग्न्यर्पण केलें. त्या बरोबर सर्वांचीं अन्तःकरणेंही जळूं लागलीं! त्या क्षणापासून, जरी पितृमूर्ति ह्या जगांतून अदृश्य झाली, तरी मला ती एकसारखी दिसत आहे! त्याचे मुखांतील शब्दरत्नें जरी आतां दुर्लभ झालीं आहेत, तरी तीं माझ्या कर्णांत जणू सतत पडत आहेत असा भास होतो! त्याच्या विशाल कीर्तीनें, अनुपम पराक्रमाच्या योगानें, अत्यंत धर्मौदार्यानें, अनेक प्रकारच्या सत्कृत्यांनीं व्यापून गेलेलें हें जगत् मज पुढें असतां मला क्षणमात्र तरी पितृचरणाचें विस्मरण कसें व्हावें? असो. नंतर त्यास्थळीं स्नानें वगैरे करून सूर्यास्त झाल्यावर आह्मी सर्व दुःखितान्तःकरण नगरींत परतलों. पुढें आचार्यांनीं सांगितल्याप्रमाणें सर्व उत्तर क्रिया केली. ह्याप्रमाणें तेरा दिवस गेले. इतक्या कालांत माझी काय अवस्था झाली होती, ती बंधो, माझी मलाच ठाऊक. अन्नाकडे पहावेना, रात्रीं झोंप नाहीं, केव्हां लागलीच तर स्वप्न आपलें आहेच पुढें! त्यांत दिसे काय तर महाराज व आपण. मी असा शोकार्त व वैराग्यशील झालों, तेव्हां मला जे लोक भेटावयास आले त्यांनीं माझी नाना प्रकारें समजूत केली. अनेक ज्ञानवान् ऋषींनीं ज्ञानाच्या गोष्टी सांगितल्या; सुहृदांनीं सदुपदेश केला; संबंधिजनांनीं सांत्वन केलें; अनेक मांडलिक माझ्या शोकनिवारणार्थ भेटीस आले; कित्येकांकडून दुःखप्रदर्शक पत्रें आलीं. प्रजाजनांनीं व प्रधानादिकांनीं, "महाराजांच्या वियोगानें अह्मासही आपल्या सारखें दुःख झालें आहे, पण आह्मी तें गट करून आपआपल्या व्यवसायांस लागलों

आहे, सृष्टीचे व्यापार कांहीं झालें तरी रहात नाहींत, पोटानें कांहीं कोणाला सोडिलें नाहीं, तें आहे तों पर्यंत जगताच्या ह्या संस्था चालल्याच पाहिजेत. तशांत राजानीं तर असें शोकाधीन व वैराग्यवश होऊन कधींही चालावयाचें नाहीं. त्यांच्या आचरणांवर लक्षावधि लोकांचें सुखदुःख अवलंबून असतें." म्हणून सांगितलें. "जननमरण हा जगताचा अबाधित क्रम चालावयाचाच. दृश्य तें सर्व नाशवंत आहे. आम्हा तुम्हा सर्वांस कधीं तरी मृत्युपंथें इहलोक सोडून जावयाचेंच आहे. मग जें व्हावयाचेंच, जें अन्यथा कधींही घडावयाचें नाहीं, त्याविषयीं व्यर्थ दुःख करून नैसर्गिक स्थितीच्या विरुद्ध आचरण करूं पाहणें, ह्या सारखें दुसरें अज्ञान तें कोणतें?" अशा सारखेंही सांगून पुष्कळांनीं माझें समाधान केलें. आणखीही "मनुष्य मात्राला जर हालोक सोडून जाणें अवश्य आहे, तर महाराजांचें त्या नियमाप्रमाणेंच परलोकीं गमन झालें, ह्यांत शोक करण्यासारखें तें काय आहे? तशांत ते योग्य कालींच लोकान्तरवासी झाले. आतां, मरणसमयीं तुम्हां चार पुत्रांतून एकही पुत्र जवळ नाहीं, ह्यामुळें आपणास वाईट वाटतें, हें साहजिकच आहे. परंतु भवितव्यापुढें काय कोणाचें चालते?" असें पण कित्येकांच्या बोलण्यांतील सार होतें. अशा प्रकारें आमचें दुःखनिरसन होऊन आम्ही पुढील कार्यास लागावें, ह्या हेतूनें हें सर्वांचें सांगणें असून तें जरी अगदीं सत्य होतें आणि कोणीं जरी अशासारख्या गोष्टीचा विचार केला तरी हेंच निःसंशय तत्त्व निघावयाचें. तथापि तें सर्व वैराग्य, तो उपदेश, तें सांगणें, तें समाधान तो विचार हीं सर्व कांहीं खोटीं आहेत, असें त्यावेळीं मनाला वाटून माझा शोक तिळमात्रही कमी होईना! तर तो उलटा दुणावे! रामा, मला तर वारंवार असें वाटे कीं उपदेश करण्याचें काम फार सोपें आहे. पण ज्या अभाग्यावर हा असा दुःसह प्रसंग येतो, त्याची सर्व विचारदृष्टि जाऊन त्याला पुढें सर्व निराशामय, निरुत्साहमय, उदासीनतामय व वैराग्यमय दिसतें! त्याचें अन्तःकरण करपून जातें! सर्वशक्ति नष्टप्राय होतात! त्यामुळें त्याला कांहीं सुचत नाहीं! रामचंद्रा! एक पुत्र आणि तो गुणी असून जेव्हां तारुण्यांत आपल्या वृद्ध मातापितरादिकांना किंवा पति आपल्या तरुणीला, यावज्जीव देह जाळणाऱ्या शोकाग्नींत

ढकलून जातो, किंवा अशा सारखीं ज्यांच्यावर अनेक दुःखें येऊन पड-तात, तेव्हां त्यांनीं जगांत आयुष्याचे शेष दिवस कसे कंठावे, हें समजत नाहीं! अशा सारखे जगांतील अनेक दुःखद्प्रसंग मजपुढें उभे राहत. असो; चौदावा दिवस उजाडला! तेव्हां सर्वांस मीं बोलावून स्पष्ट सांगितलें कीं, हें अन्यायानें, कपटानें व सर्वतोपरि अशास्त्ररीत्या माझ्या गळ्यांत पडणारें राज्य मला नको. ह्याचा मीं क्षणभरही स्वीकार करणार नाहीं. तर ज्याचें हें राज्य आहे, त्या पुण्य पुरुषापुढें आपला अपराध कबूल करून त्याची क्षमा मागून त्याचे चरणमूलीं पडून त्यास " हें राज्य आपलें आहे, ह्याचा आपण स्वीकार करावा," अशी विनंती करण्या-कारितां मी आपण असाल तेथें जाण्याकारितां वनसंचार करण्याचा माझा दृढनिश्चय सर्वांस कळविला. माझें मन वळवून मला राज्याधिकारी करण्या-कारितां पुष्कळांनीं नाना तऱ्हेचे यत्न केले, परंतु कोणाचाही सफल झाला नाहीं. जिनें माझ्याकारितां महाराजांस भयंकर मृत्युमुखीं दिलें, तिनें तर मीं राज्यस्वीकार करावा ह्मणून उपदेशाची पराकष्ठा केली. परंतु मला तो लेशही रुचला नाहीं, एवढेंच नाहीं, तर तिच्या त्या दुष्ट उप-देशामुळें मला इकडे येण्याची फार त्वरा करावी असें वाटूं लागलें! मग सर्व प्रकारची तयारी होऊन मी ह्या मंडळीसह निघालों, आणि आपण ज्या मार्गानें आलां, जेथें उतरलां, जेथें निजलां, तीं सर्व स्थळें अत्यंत पवित्र तीर्थें मानून मींही त्यांचा मोठ्या प्रेमानें स्वीकार केला. तर आपण अयोध्याधीश होऊन आपल्या लोकोत्तर गुणांनीं सर्वांस महाराजांचें विस्मरण पडेल असें करावें. आपल्यावर जें कांहीं लोकांचें अप्रतिम प्रेम आहे तें सांगतां पुरवत नाहीं. आपल्या वनगमनानें लोक फारच दुःखी झाले आहेत. त्यांस कांहीं सुचत नाहीं व कांहीं रुचत नाहीं. प्रियबंधो, मी कैकेयीतनय असल्यामुळें मला बहुतेक लोक आपला महान् शत्रू समजून मी अरण्यांत आपल्या नाशार्थच निघालों आहे, असें पुष्कळांस वाटलें! रामचंद्रा, शृंगवेर नगरींत तर ह्याचा मला चांगलाच प्रत्यय आला! तेथील राजा आपला निःसीम भक्त आहे. तो तर प्रथ-मतः मजबरोबर युद्धास प्रवृत्त झाला होता! परंतु मग त्याचा संशय दूर झाला! आपण भागिरथीतीरीं जेथें हा मुनिवेष घेतला, तेथेंच ज्यां

ही हा धारण केला. भारद्वाजाश्रमांतील कित्येक मुनीही माझ्या वन-गमनाच्या हेतुसंबंधानें साशंक झाले होते!"

नंतर वारंवार शोकाकुल होणाऱ्या रामलक्ष्मणादिकांचें वसिष्ठांनीं सांत्वन करून त्यांस पुढील कर्तव्यास लाविलें. पश्चात् नदीवर जाऊन सर्वांनीं स्नानें केलीं व त्यांच्या सांगण्याप्रमाणें मृतपितृसंबंधानें त्यासमयीं करावयाचें तें कर्म करून प्रातःकाळींही कांहीं करावयाचें योजिलें। ती-बहुतेक रात्र भरतानें रामलक्ष्मणांशीं बोलून घालविली। त्याचें सर्वच भाषण प्रेमप्लुत, निश्चयार्थक, न्यायाचें, बोध घेण्यासारखें, हृदयद्रावक असून आवेशाचें होतेंच, पण त्यांतही त्यानें "तेराव्या दिवशीं मी स्मशानांत पित्याची रक्षा शरयूंत टाकून ती दहनभूमि शुद्ध करण्याक-रितां ह्मणून गेलों असतां, तें कर्म झाल्यावर शोकवन्हीनें फारच विव्हल होऊन पित्याच्या त्या चिताशयनभूमीवर गडबडां लोळलों." ह्मणून जें सविस्तर सांगीतलें तें तर अन्तःकरणाचें पाणीच करणारें होतें. त्या प्रमाणेंच उभय मातांचा विलाप, भरताचा कैकेयीवरील विलक्षण राग, त्याच्या मनांत आपल्या मातेस ठार मारण्याविषयीं उद्भवलेला वि-चार व तो त्यानें निष्कपटपणें रामचंद्रास सांगितला तो प्रकार, ह्या सर्व अनर्थाचें आदिकारण जी दुष्ट पापिणी बटिक मंथरा तिच्या केशाव्या धरून तिला जमिनीवर पाडून तिची अनेक प्रकारें निर्भर्त्सना व विटं-बना करून शेवटीं तिचा कंठनाल छेदावयास उद्युक्त झालेल्या क्रुद्ध शत्रुघ्नाची कैकेयीनें केलेली विनवणी व पुत्रांस सांगण्याकरितां वसिष्ठ व सुमंत्रादि प्रधान यांजपाशीं दशरथ राजानें मरणसमयीं काढलेले उद्गार, इत्यादि सर्व प्रसंग अन्तःकरणांत अनेक भावना उत्पन्न करणारे होते ह्यांत संशय नाहीं.

प्रातःकाळ झाल्यावर रामानें करावयाची ती पितृक्रिया केली. नंतर संधि पाहून रामापुढें भरत येऊन करद्वय जोडून अति नम्रतेनें ह्मणाला, "प्रियबंधो, माझा ह्या वनांत येण्याचा हेतु व दृढनिश्चय तुला काल कळविलाच आहे. तर त्वां अयोध्येस येऊन स्वराज्यस्वीकार करावा. त्या उच्चपदाला मी सर्व प्रकारें अनधिकारी आहें. रघुकुलांत ज्येष्ठाला सोडून कनिष्ठानें कधीं तरी राज्योपभोग भोगिले आहेत काय? दुष्टस्त्री-च्या कपटपाशांत सर्वप्रकारें जखडून गेल्यामुळें निरुपायास्तव सत्यप्रतिज्ञ

पित्याच्यानें तुला वनांत जाऊं नको, असें स्पष्ट ह्मणवलें नसेल. परंतु त्यास हा प्रकार मुळींच रुचला नाहीं, हें तुला ठाऊकच आहे. अहो तुह्मी चित्रकूटीं आलां न आलां तों त्यानें स्वर्गाचा मार्ग धरला! ह्यांत त्यानें काय बरें दाखविलें? रामचंद्रा, तूं वनांत न जातास तर त्याला खचित खचित इतक्यांत मृत्यूनें गांठिलें नसतें! तेंव्हां तुमचें वनगमन हें आमच्या प्रिय तातास क्षणभर ही प्रिय नव्हतें, हें त्यानें आपले प्रिय प्राण देऊन तुह्मास व जगतास सांगितलें! तेंव्हां आतां तुला पूज्य पित्याला प्रिय तेंच ह्मणजे अयोध्यागमन केलें पाहिजे. संमाननीय पिता जीवन्त असो वा मृत असो, त्यास जें इष्ट, त्यास जें प्रियतम तेंच सत्पुत्रानें आचारिलें पाहिजे. अशानेंच ताताला इहपरत्र सुख, संतोष व समाधान होतें. पितृमुखांतून निरुपायास्तव ह्मणजे त्याची लेशही इच्छा नसतां आलेले शब्द अ.ज्ञास्थानीं समजून ते शिरसा वंद्य करून जर तुला हा वनवास प्रिय वाटला, तर त्यानें आपला अत्यंत प्रिय देह मृत्युमुखीं देऊन तुला अयोध्येस येण्याविषयीं सुचविलें असतां तुला ही सूचना अधिक मान्य, अधिक प्रिय व अत्यंत हृदयद्रावक वाटावी हें उघड आहे. तर आतां लौकर निघावें व सर्वांस आनंद द्यावा. व रामचंद्रा, काल मला आपण केलेल्या प्रश्नांचीं उत्तरें आपणच राज्यपदीं बसून द्यावीं.

वसिष्ठादि अयोध्येहून आलेली मंडळी तसेच तेथील आलेले ऋषिजन ह्यांस हें भरताचें भाषण फारच न्यायाचें, मधुरतर, करुणरसानें भरलेलें, युक्तियुक्त, अंतःकरणास प्रसन्न करणारें, विचारणीय, श्राव्य, निस्पृह, निष्कपट, गंभीर, प्रेमार्द्र, व मनोहर असें वाटून फार आनंद, आश्चर्य व समाधान झालें. ते ह्मणाले, असे बंधू आह्मी अद्यापि कोठें ही पाहिले नाहींत, एवढेंच नाहीं, तर अशा सारखें कोणाचें पवित्र चारित्रही आमच्या अवलोकनांत किंवा ऐकण्यांत आलें नाहीं. रामचंद्रा, ह्या सत्वशील, निर्लोभ, निष्पाप भरताचें ह्मणणें त्वां मान्य करून अयोध्येस जाऊन राज्यस्वीकार करावा व ह्याच्या निर्मल अन्तःकरणास सुख द्यावें. हेंच आतां ह्या प्रसंगाला व बंधुप्रेमाला करणें तुला उचित होय! रामा किती तरी ह्या भरताचें गुणवर्णन करावें! अरे ही सर्वतोपरि दुसरी तुझीच प्रतिमा! ह्मणून त्याला जें कांहीं वाटणें तें तुलाच वाटणें होय! तर आपल्या वाटण्याप्रमाणें

कर, ह्मणजे अयोध्येस जाऊन राज्यलक्ष्मीचा उपभोग घे" नंतर सीतावल्लभ रामचंद्र ह्मणाला, "प्रियभरता, अहो पूज्य ऋषिवर्यहो, आपल्या भाषणामृतानें मी संतृप्त झालों. आपल्या सान्निध्यानें व उपदेशानें माझा सर्व पितृशोक निवून गेला. भरता, लोकांनीं तुझें नानाप्रकारें समाधान केलें म्हणून सांगितलेंस तेंच खरें आहे. प्राणी जन्मास आला, तो मरणारच! तेंव्हां मनुष्यमात्रानें ह्या नाशवंत संसारांतच काय तें सार आहे, असें न समजतां जेणें करून आपलें परलोकीं परम हित होईल असें, सर्व काळ आचरण करावें. परलोकसाधनार्थच हा मनुष्य-देह आहे, हा सिद्धांत क्षणभरही मनुष्यानें न विसरतां इहलोकांतील व्यवहार करावे. सुखप्राप्तीच्याच आशेनें जगांत मनुष्यानें अश्रान्त श्रम करीत अरण्यांत मृगजलार्थ मृगासारखें भटकणें योग्य नाहीं! असो; वत्सा, तुझें भाषण फारच हृदयंगम खरें. पण तूं तिकडील तातमरणाचें वर्त्तमान सांगत असतां वारंवार मातेची केलेली निर्भर्त्सना माझ्यानें ऐकविली नाहीं. आणि तिच्या घाताविषयीं तुझ्या मनांत आलेला दुष्ठ विचार ऐकून तर मी रोमांचिततनु होऊन तटस्थ झालों. अरे, कशी झाली तरी ती जननीना? मातेचे जे मुलावर अनंत उपकार असतात, ते कशानेंही फिटत नसतात. जर तुला तिचें कृत्य आवडलें नाहीं, तरी तिची शांतपणें तू समजूत घालावी होतीस. तुजसारखा सज्ञान पुत्र जर मातेवर अशी कोपाग्नीची वृष्टि करूं लागला तर मूढांनीं मग काय करावें! पहा बरें, तुझ्याविषयीं तिची किती हितबुद्धि ती. तुझ्या साठीं एवढें तिनें राज्य मागून घेतलें. बाळा, तिच्या हेतूकडे पहा. आतां तुझ्या मतें तिचें तें कृत्य योग्य नाहीं. ह्मणून तिला दोष कां देतोस? तुझ्या मातेचे आम्हावरही कमी उपकार आहेत, असें नाहीं. अरे, वनांतही राज्यलाभापेक्षां प्राप्त होणारे मोठ मोठे लाभ आहेत. तू म्हणतोस कीं पिता हिच्या ह्या कृत्यामुळेंच परलोकवासी झाला. परंतु ही केवळ भ्रांतिमूलक समजूत आहे. अरे, मी राजा झालों असतों तरी त्याला मृत्यूपासून सोडविणार होतों काय? भरता, माझ्या वनवासामुळें पित्याला अपरिहार्य दुःख झालें, हें खरें, परंतु त्याच्या मृत्युला हें कारण नव्हे. पित्राज्ञा मला मान्य आहे. तीच केवळ सुखदात्री आहे. आतां तर ती मला त्याच्या जीवन्त मूर्त्तीप्रमाणें वाटत आहे.

वत्सा, तो सत्यसंध पिता जीवंत असता तर, चौदा संवत्सर झाल्याशिवाय, आज मला परत बोलावून असत्यवादी झाला असता काय? बंधो, तूं ह्मणतोस कीं पित्यानें आपल्या मरणानें मला परत बोलाविण्याचें सूचित केलें! पण माझें तर ह्यावर असें ह्मणणें आहे कीं, आमच्या भेटीविषयीं अत्यंत आतुर होऊन पित्यानें आह्मांस पुष्कळ हांका मारिल्या, "मला त्यांच्याकडे वनांत न्या," ह्मणून तो वारंवार म्हणाला, परंतु मृत्युसमय अगदीं जवळ आला असतांही, त्या सत्यप्रिय राजर्षीनें अह्मांस अयोध्येंत बोलावण्याकरितां कोणालाही न पाठवितां किंवा तशा प्रकारचे उद्‌गारही न काढतां लोकांतराचा मार्ग धरला! तेव्हां अह्मांस परत बोलाविण्यापेक्षां त्याला मृत्यूच फार इष्ट वाटला, असें होत नाहीं काय? व अह्मांसही अशा आपल्या आचरणानें,मृत्यु आला तरी पुरवला, परंतु कधींही सत्यपालन सोडूं नका, असें प्रियतातानें शिकविलें, असें होत नाहीं काय? तेव्हां मला पित्राज्ञाच पित्याचे ठिकाणीं आहे. मी तिचा कधींही त्याग करणार नाहीं. अशानेंच मला अपूर्व कीर्तिलाभ होणार आहे! राज्य करून जें कांहीं लोककल्याण व्हावें ह्मणून मी सतत चिंतीत आहें, तें अशा रानांत राहूनही माझ्याहातून होण्याचे प्रसंग येतील. तेव्हां, बाळा भरता, मला परत नेण्याचा आग्रह सोड. पवित्र पित्राज्ञेचा म्यां भंग करावा असें तूं मजकरवीं करवूं नको. मला जशी ताताज्ञा ही सर्व सुखाची जननी वाटत आहे, तशीच तुलाही वाटो. मला ह्या पवित्र कार्यीं तूं साहाय्य कर. तेव्हां पित्याचे इच्छेप्रमाणें त्वां अयोध्यापति होऊन सर्वांस सुख द्यावें. पितृमरणासारख्या असह्य शोकानें व आम्हावरील अत्यंत प्रेमामुळें, त्या वेळेस तुला वैराग्य उत्पन्न होणें, हें साहजिकच आहे. परंतु आतां तें सोडून राज्यदंड धारण कर. व आपल्या राजशासनपद्धतीनें सर्वांस सुख दे. चौदा वर्षें होतांच मीं येतों. वसिष्ठवामदेवांसारखे ज्ञानी, सुमंत्रादिकांसारखे अनुभवी व शाहाणे मंत्री असतां, असा भितोस कां! हें राज्य करण्यांत कोणत्याही प्रकारचें पाप नाहीं. पाप असेल तर मग पित्राज्ञेंतच पाप आहे, असें ह्मणावें लागेल. कारण तूं राज्य करावें अशी पितृचरणाज्ञा आहे. न्यायानें राज्य चालीव, ह्मणजे झालें. जा तर ह्या सर्व मातांस घेऊन. ह्यांच्याशीं शुद्धाचरण ठेव. आमचें स्मरण करून इतकें दुःखी

व्हावें, अशासारखी काहीं आमची स्थिति नाहीं. जा तर मग बाळा. आह्मांस पुनःपुनः परत नेण्याविषयीं आग्रह धरूं नको. तुझ्या आग्रहपर भाषणानें मला फार वाईट वाटतें." हें ऐकून खिन्नान्तःकरण होऊन भरत ह्मणाला, "रामचंद्रा, माझ्या मातेनें मला राज्यप्राप्ति होण्यासाठीं एवढी खटपट केली खरी, परंतु तिला पूर्ण पश्चात्ताप होऊन त्यावेळची आपली सर्व कृति अविचाराची होती, असें तिला आतां वाटूं लागलें आहे! "रामाला व त्यामुळें लक्ष्मणास व सीतेस मीं फार दुःख दिलें आहे, तर त्यांच्यापुढें मी पदर पसरून, क्षमा मागेन, असें ह्मणून, रामा, तूंच तें राज्य भोगावें," असें तुला सांगण्याकरितां ती मजबरोबर आली आहे. तर अशा अत्यंत अनुतप्त होऊन शरण आलेल्या स्वजनाची विनंती तुला ऐकणें भाग आहे. पतीस शरणागत होऊन त्याच्याशीं पदर पसरून क्षमा मागण्याविषयीं हिला झालेली सुबुद्धि आतां काय कामाची? माझी माता ह्या अघोर पापाचें कारण शोधीत असतां, तिला एकदम स्मरल्यासारखें होऊन त्याचवेळीं मला ह्मणाली, "मी लहानपणीं पितृगृहीं असतां घरीं आलेल्या एका ऋषिवर्याचा माझ्या हातून अपमान झाला होता. त्यामुळें त्यानें मला शाप दिला होता. तेणें करून मी मूढ होऊन अशा दुष्ट कर्मास प्रवृत्त झालें. नंतर ऋषीच्या उश्शापामुळें हा अनुताप झाला." तेव्हां, रामचंद्रा, तुझ्या क्षमेस ती सर्व प्रकारें पात्र आहे. शापप्रभावानें झालेला हा अपराध आहे. चैत्र शुद्ध अष्टमीपर्यंत हिचें मन तुझ्या विषयीं असें कधींही कपटमय असेल असें मला वाटत नाहीं. तर जिच्यामुळें पित्यानें निरुपायास्तव तुला निरपराधाला वनांत पाठविलें, तीच जर आतां माझी माता तुला दीन होऊन घरीं बोलावीत आहे, तर त्या पित्राज्ञेची थोरवी ती आतां काय उरली? पिता जीवंत असून जर हिची अशी अंतःकरणस्थिति झाली असती तर, तोच स्वतः मोठ्या आनंदानें तुह्मांला परत नेण्याकरितां आला असता, ह्यांत संशय नाहीं. परंतु दैवदुर्विलासानें तसा योग आला नाहीं, ह्यास उपाय नाहीं. तें पित्याचें काम मी करावयास आलों आहें, असें समजून त्वां अयोध्याभिमुख व्हावें. ज्या कारणास्तव तुला वनवास भोगावा लागत आहे, तें कारणच सर्वतोपरी आज नष्ट झालें. मग वनवास कां ह्मणून अंगीकारि-

तोस? ज्यामध्यें जो गुण असेल त्याचा त्यानें योग्य उपयोग करून परोपकार करावा. ह्मणून मी ह्मणतों कीं, प्रजापालनीं योग्य अशा सकल गुणांनीं मण्डित तूं क्षत्रिय असतां, अरण्यांत ऋषीसारखें भटकत फिरण्यांत तुला काय लाभ होणार! मी आतां कांहीं अधिक बोलत नाहीं. एवढेंच सांगतों कीं, ह्या राज्याचा मालक तूंच एक आहेस. ह्याचा स्वीकार तुलाच केला पाहिजे. लोक तुजवर संतुष्ट आहेत. मला हें अन्यायानें प्राप्त झालेलें राज्य नको मी तें चालविण्यास सर्वतोपरि अयोग्य आहें. अन्यायपथानें जाणें ह्यासारखें दुसरें पाप मी गणीत नाहीं. आतां तूं जर माझी विनंती अमान्य करशील, तर मीही तुझ्या बरोबर लक्ष्मणासारखा तुझ्या सेवेंत तत्पर राहीन. अर्थात् शत्रुघ्नही तोच मार्ग धरील. मग ह्या माता तरी परत कशाला जातील? आह्मी तेथें कोणीच नाहीं, तर वसिष्ठादिकांस तरी तेथें राहणें कसें रुचेल? प्रधानांस तरी आपला अधिकार चालवावा, असें कसें वाटेल? मग प्रजाजन तरी तेथें कसे राहतील? वनवासाप्रीत्यर्थ मला कांहींही तयारी करावयास नको. हीं वल्कलें धारण केलींच आहेत. मला बरोबर येण्याचीही तुह्मांकडून जर आज्ञा न मिळेल, तर तुमच्या वनवासामुळें मीं कोणता मार्ग स्वीकारावा, हें मला पित्यानें शिकविलेंच आहे!" भरतानें ह्याप्रमाणें बोलून रामास परत नेण्याविषयीं अनेक प्रकारें विनविलें. वसिष्ठानींही त्याचें ह्मणणें यथार्थ आहे, असें ह्मणून त्यास अनुकूल असेंच रामाशीं भाषण केलें. दुसऱ्या ऋषींनींही रामास परत जाण्याविषयीं आपलें मत कळविलें.

जाबालिनामक ऋषीनें तर "वडील, गुरु, श्रेष्ठ ह्मणजे काय! त्यांच्यांत एवढें तें काय विलक्षण आहे! अगोदर झाले ते वडील! त्यांचें कसेंही ह्मणणें असलें तरी लहानांनीं ऐकावें, ह्यांत पुण्याचा तो काय संबंध बरें! अगोदर पुण्य तरी कशाला म्हणावें! अमुक पाप हें कशावरून गणावयाचें? ईश्वरप्राप्ति ह्मणजे काय! स्वर्गसुख, मोक्ष ह्मणजे अमुक हें कशावरून कोणीं ठरविलें! अमुक तऱ्हेनें वागलें असतां मरणोत्तर विलक्षण सुख मिळणार ह्या केवळ कल्पनामय आशेनें, मनुष्यानें इहलोकीं प्राप्त होणाऱ्या सुखास मुकावें, ह्यापेक्षां मनुष्य अज्ञ आहे, असें ह्मणण्यास आणखी कोणतें बलवत्तर प्रमाण पाहिजे? भस्म, मृत्तिका

किंवा विष्ठा हा देहाचा धडधडीत परिणाम दिसत असतां, मग त्या परलोकीं मानलेल्या पुण्यपापाला धनी कोण? कांहींएक नाहीं त्याला आत्मा ह्मणून त्याचें मोठें स्तोम माजविणें, ह्मणजे केवळ शब्दांचें युद्ध मांडणें होय! देहाला उगीच पीडा देणें, परलोकाच्या नांवावर उपवासादि करणें, मृतांची क्रिया करणें, ईश्वर ह्मणून कोणी कल्पून त्याचे ठिकाणीं सर्व-गुणसंपन्नता लादणें, त्यानें वेद केले,पवित्र शास्त्रें लिहिलीं, किंवा अमुक अमुक ईश्वरप्रणीत आहे असें ह्मणणें,व त्यांत कितीही दोष दिसत असले तरी, ते गुणच ह्मणून आग्रहानें प्रतिपादणें,आणि त्यांत सांगितल्या प्रमाणें सर्वांनीं वर्तावें,व जो वर्तेल तोच धार्मिक,तोच,नीतिमान्, तोच सदाचारसंपन्न होय,अशी दृढ समजूत होणें,हा निवळ भ्रम आहे! तेव्हां पित्राज्ञेचा एवढा, रामा, तुला बाऊ तो काय वाटतो! राज्यसुखासारखें प्रत्यक्ष अनुपम सुख टाकून पित्राज्ञेनें मरणोत्तर परम लाभ होईल ह्मणून वेड्यासारखें आशा करीत बसणें ह्यास काय ह्मणावें? असा पुरुष गंगाजलापेक्षां मृगजलास अधिक समजतो, असें म्हणावें लागतें! परलोक कोणीं पाहिला आहे काय? व तो आहे तरी कशावरून? निश्चिताचा लाभ टाकून सर्वप्रकारें संशयिताच्या पाठीस लागणाऱ्या पुरुषास काय ह्मणतात!" असा नास्तिकमतोपदेशही केला! अशाकरितां कीं रामचंद्रानें कोणत्यातरी प्रकारें भरताची ती सान्तःकरण विज्ञापना ऐकावी. परंतु रामचंद्रानें आपल्या विशालज्ञानानें व मधुरभाषणानें सर्वांचें समाधान करून आपला पित्राज्ञापालन करण्याच्या दृढाग्रह सोडिला नाहीं.

श्रोते हो, ज्याग्रंथाधारें हें जाबालिऋषीचें भाषण आपणांस सांगितलें,तें अनेक विद्वानांच्या मतानें त्या मूळ ग्रंथांत नाहीं! त्या पवित्र व पुराण वाल्मिकीच्या कृतींत कोणीं वेदनिंदक, निरीश्वरवादी,पाखांडी, बुद्धधर्माभिमान्यानें हें घुसडलें आहे! कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुंसमर्थ असा प्रभु रामचंद्र जाबालीच्या पुढें असतां त्याच्या मुखांतून असले उद्गार येतील तरी कसे? मग त्याच्या मननशीलत्वास काय ह्मणावें? तेव्हां हें अलीकडे कोणीं अज्ञाणी बुद्धधर्मीयानें आमच्या ह्या पुराणग्रंथरूप अमूल्य महावस्त्रास, कांहीं गरज नसतां, घोंगडीचें ठिगळ लावण्याचा व्यर्थ यत्न केला आहे! तो आपणास समजावा म्हणून त्यानें जाबालीच्या मुखांत घातलेल्या भाषणाची दिशा आपणास सांगितली.

रामाचा असा दृढ निश्चय झालेला पाहूनही भरतानें आपल्या प्रिय ज्येष्ठ बंधूस परत नेण्याविषयीं नाना तऱ्हा केल्या. त्याचे घट्ट पाय धरिले व दीन होऊन प्राकृत जनासारखा ढळढळां रडला. रामासही हा सर्व प्रकार पाहून फार वाईट वाटलें.त्यानें अनेक प्रकारें बोलून, त्यास मांडीवर घेऊन त्याची नीट समजूत पडेल असें केलें. रामाच्या प्रत्यागमनाविषयीं भरत सर्व प्रकारें निराश होऊन अडखळत ह्मणाला, "माझ्या प्रार्थनेनें तर प्रभु रामचंद्र अयोध्येस येत नाहीं.तर हे मातांनो, अहो मंत्रिजनहो, अहो सर्व लोकहो, तुह्मी ह्या नरश्रेष्ठास अयोध्येस नेण्याविषयीं यत्न करावा. नंतर कैकेयीनें निर्मलान्तःकरणानें, अश्रुपरिपूर्ण नयनांनीं व सद्गदित वाणीनें प्रथमतः आपल्या अपराधाविषयीं लज्जित होऊन त्याची क्षमा मागून नंतर "पुत्रा, तूं जर क्षमाशील असशील, तर परत येशील," हें ज्यांतील मुख्य सार आहे असें सविस्तर भाषण केलें. नंतर दुसऱ्या मातांनींही प्रयत्न केला. परंतु भरताप्रमाणेंच त्याही निराश झाल्या. प्रजाजनांनींही रामाची बहुतप्रकारें विनंती केली, पण तीही त्याच्याकडून मान्य झाली नाहीं. रामाची जशी चौदावर्षेपर्यंत वनांत राहण्याची प्रतिज्ञा होती, तशीच भरताचीही राज्य न करण्याविषयींची दृढ प्रतिज्ञा होती. शेवटीं सर्व प्रकारें निरुत्साह व हताश होऊन रामाच्या सुवर्णमयपादुका होत्या, त्यांवर भरतानें रामाला एकदां उभें राहून भार द्यावयास सांगून, त्याच रामाच्या ठिकाणीं समजून डोकीवर प्रसाद ह्मणून घेतल्या व रामास सांगितलें कीं, "ह्या तुझ्या प्रतिनिधि असें मी समजतों. राज्याच्या मालक ह्या होत. शत्रुघ्न व इतर मंडळी ह्यांच्या नांवें अर्थात् ह्यांच्यावर अभिषेक करून व छत्रचामरादि ह्यांवरच धरून राज्य चालवितील. मी तर चौदा संवत्सर तुझ्याप्रमाणेंच वल्कलधारी व जटामंडित होऊन अयोध्येच्या बाहेर नंदिग्रामीं, तुझी चातकाप्रमाणें वाट पहात राहतों. नियमित वेळीं जर मला तू न भेटशील तर मात्र खचित खचित मी प्राणत्याग करीन." असें बोलून त्या त्रिवर्गाचा निरोप घेऊन भरत मंडळीसह यथावकाश रामास सांगितल्याप्रमाणें करावयास निघून गेला. ह्या अखेरच्या निरोपाच्या प्रसंगींही कौसल्येनें रामास सद्गदित होऊन "रामा, आतां ह्यापुढें कोठें जाऊं नको. ह्या पर्वतावरच बाळा, राहा. ह्मणजे तुमची भेट घेईनशी वाटली तर ह्या पवित्र स्थळीं लौकर याव-

याम सांपडेल. लक्ष्मणा, इतक्यांतच पहा तुमचीं शरीरें कशीं कृश झालीं आहेततीं! सीतेला फार फार जपत जा, " असें सांगितलें.

श्रोते हो, आपल्या पवित्र चरित्रनायिकेच्या चारित्राशीं भरतभेटीचा विशेष संबंध आहे, असें आपणांपैकीं कित्येकांस कदाचित् वाटणार नाहीं, कित्येक ह्मणतील हा संबंध आणावयाचाच होता. तर "भरतानें चित्रकूटीं येऊन रामास परत नेण्याचा पुष्कळ यत्न केला. परंतु तो निराश होऊन रामपादुका घेऊन त्यांचीच राज्यपदीं स्थापना करून आपण रामविरहानें वल्कलजटाधारी होऊन नंदिग्रामनिवासी झाला." इतकेंच सांगून आटपावयाचें होतें. एवढा त्याचा पाल्हाळ तोकशाला? पण प्रिय ऐकणारे हो, सीताचरित्राशीं अशा सारखा बंधुप्रेमाचा संबंध आणावयास सांपडला, हें मी माझें महद्भाग्य समजतों. हा कथाप्रसंग येथें येणें फारच आवश्यक होता. आह्मा चरित्रकारांचा लोकांस अशा सारख्या कथा सांगण्याचा मुख्य उद्देश हा आहे कीं, ज्यांच्या श्रवणानें लोकांत धर्म, नीति, उदारबुद्धि, सत्य, परदुःखदुःखितता, न्याय, आत्मसंमान, अपक्षपात, पातिव्रत्य, स्वस्त्रीपरायणता, बंधुप्रेम, गुरूविषयीं पूज्यबुद्धि, पापभीरुता, निष्कपट, शौर्य, क्षमाशीलता, वसुधैवकुटुंबकत्व, आस्तिकबुद्धि, स्वामिभक्ति, मित्रत्व, शरणागताभय, सदाचारसंपन्नता, इत्यादि अनेक सद्गुणांचा विस्तार व्हावा; आणि दुष्ट, शठ, पापात्मे, कर्तव्याकर्तव्य न जाणणारे, व्यसनी, कामी, कोपी, लोभी, सत्समागमपराङ्मुख, दुराग्रही, अधर्मी, अशांचा परिणाम कसा भयंकर होता, हें जगतास समजावें. आतां हा भरतभेटीचा भाग जशाप्रकारें सांगावयास पाहिजे होता, तसा मला थोडक्यांत सांगतां आला नाहीं, ह्यास उपाय नाहीं. हें कथानक इतकें कांहीं प्रेमळ व हृदयंगम आहे कीं, ह्याचें सत्यस्वरूप कुशलग्रंथलेखकांस, अस्खलित वक्त्यांस सहृदय कविजनांस किंवा हुशार चित्रकारांस, कधींही लोकांपुढें मांडतां यावयाचें नाहीं! आलीकडे बंधुप्रेमाचें स्वरूप तर धनुष्याकार पहाण्यांत येतें! त्यांतून निघणारे प्रखरतर वाग्बाण खरोखर अंतःकरणविदारण करणारे असतात! अहो, वीतभर जमिनीच्या तुकड्यासाठीं जगांत आपण मोठे लढवय्ये ह्मणवून घेण्यासाठीं ह्या न्यायी राज्यांत वकिलांच्या व सरकारच्या पायीं

वित्त वाहणारे व शेवटीं जटाधारी व दिगंबर होऊन भिक्षाटन करीत होतइसाते कलियुगांतील अत्यंत बंधुप्रेम दाखविणारे असे हजारों सहोदर, साधु बनलेले पाहण्यांत येतात! तर श्रोते हो! तुह्मांस ह्यांतील कोणतें प्रेम आवडतें बरें? असो; पुढील कथापथावलंबन करूं.

---

# उच्छ्वास चौथा.

प्रिय श्रोते हो, कथारंभींच तुम्हांस थोडीशी राक्षसांविषयीं माहिती सांगितली आहेच. ऋषींना नाना प्रकारें त्रास देण्याविषयीं, त्यांच्या तपश्चर्येंत अनंत विघ्नें आणण्यांत, त्यांची यज्ञयागादि कर्मे समाप्तीस न जातील असें करण्यांविषयीं ते सदा उद्युक्त असत! ह्यांतील कित्येकांस पाहिजेल तें रूप घेतां येण्याची विद्या माहीत असल्यामुळें ते नानाविध रूपांनीं ऋषिजनांस फसवून आपले दुष्ट हेतु सिद्धीस नेत! त्यांस उगाचे उगाच मारून त्यांचे रक्तमांस खात! त्यांस मारून त्यांचा त्रास चुकाविण्याविषयीं ऋषिजन असमर्थ होते असें बिलकूल नाहीं. परंतु असे प्रसंग कमी येतील अशाच उपायचिंतनेंत ते सदा तत्पर असत. ह्मणजे ज्यास्थळीं ते आपणावर जुलूम करितात, असें त्यांस आढळून येई, तें स्थळ सोडून ते दुसऱ्या कोठें एकांतस्थळीं जात. राक्षसादिकांस मारणें हें काम तें क्षत्रियांचें समजत. व अशा कृत्यानें राजांला पुण्यप्राप्ति आहे अशी क्षत्रियांची व ऋषिजनांचीही दृढ समजूत होती. आपल्या हातून राक्षस मेला असतां, आपलें संचित पुण्य कमी होतें, असें ते वारंवार ह्मणत. ज्याचें कर्म त्यानेंच करावें, अशांतच विलक्षण भूषण, असाम्य कीर्ति व महत्पुण्य आहे, असें त्या काळीं सर्व लोकांस वाटे. ऋषि तपश्चरणाच्या बलानें आपला नाश क-

रण्याविषयीं समर्थ होतात, हें राक्षसांस पक्कें ठाऊक असल्यामुळेंच त्यांच्या त्या पवित्र कृत्यांस ते सदा अडथळा आणीत! चित्रकूटावर फार काळ पर्यंत ऋषि निरुपद्रव असे राहून मोठे सामर्थ्यवान् झाले आहेत, असें ऐकून व तेथें कोणी मनुष्य सुंदर स्त्रीसहवर्तमान राहत आहेत, असें कळल्यावरून राक्षससमुदायाचें ह्या ठिकाणीं विशेष लक्ष्य गेलें. मग ते दुष्ट बहुत प्रकारें ऋषींना पीडा देऊं लागले! तेव्हां ते पुण्यपुरुष हळहळू तों मोहंरूपच काय असा चित्रकूटपर्वत सोडून दुसऱ्या ठिकाणीं जाऊं लागले. आमच्या रामचंद्रादि त्रिवर्गास त्यांनीं विशेष त्रास दिला होता असें नाहीं. परंतु एकेक ऋषि तें पवित्र स्थान सोडून जाऊं लागल्यामुळें, आणि तेथें राहून पांच साहा महिने झाले होते, व पर्जन्याचे दिवस जाऊन प्रवासास शरदृतु योग्य आहे असें त्यांस वाटून, आणखी अयोध्येंतील पुष्कळ लोक आपल्या भेटीस येतात, त्यांपासून एकान्तवासप्रिय ऋषींना थोडा बहुत तरी त्रास होत असेल असें समजून, व आपले बंधु, माता वगैरे मंडळी तेथें येऊन त्यांनीं आपल्यास परत नेण्याविषयीं जेथें अतोनात प्रेम दाखविलें, व ज्यास्थळीं भरतानें अत्यंत करुणस्वरानें पितृमरणाचें वर्तमान सांगितलें, तें शोक उत्पन्न करणारें स्थळ दररोजदृष्टीस पडे व त्यामुळें तो सर्व प्रसंग आठवे ह्यास्तव, व दुसरेही अनेक वनप्रदेश पहावे ह्या उत्सुकतेनें, त्यांनींही ह्या रम्य पर्वताचा संबंध मोठ्या दुःखानें तोडून दक्षिण दिशेस प्रयाण करण्याचें योजिलें. त्याप्रमाणें जातां जातां कांहीं दिवसांनीं त्यांस प्रथमतः भगवान् अत्रिऋषीश्वराचा आश्रम लागला. तेथें जाऊन त्या पुराण व पवित्र मुनीचें त्यांनीं दर्शन घेतलें व त्यास आपला इतिहास निवेदन केला. त्यामुनिराजानें त्यांचें फारच आदरातिथ्य करून त्यांच्या भेटीनें आपणांस महल्लाभ झाला, असे उद्गार काढिले. व साक्षात् तपश्चरणदेवताच काय अशा आपल्या अत्यंत वृद्ध भार्येची त्यांजपाशीं स्तुति करून तिनें, ज्या काळीं दाहा वर्षे अनावृष्टि होऊन सर्वत्र फलमूलें नाहींतशीं होऊन उदकसुद्धां मिळेनासें झालें होतें त्या काळीं, आपल्या विलक्षण तपःप्रभावानें सर्व प्राणिमात्रांना तीं कशीं पुरविलीं, व गंगोदकानें त्यांचे अन्तरात्मे कसे थंडगार केले, व आपल्या एका मैत्रिणीवर येणाऱ्या दुःसह वैधव्यापासून तिला कसें मुक्त केलें, हेंही अत्रिऋषीनें त्यांस सविस्तर रीतीनें सांगि-

तलें व तिच्यापाशीं त्या अतिथींस नेलें. त्यांनीं त्या वृद्ध तापसीमातेस वंदून करून आपण तिच्या दर्शनानें कृतार्थ व पवित्र झाल्याविषयींचें रामचंद्रानें फारच सुरस भाषण केलें. तेव्हां ती ऋषिपत्नी अनसूया ह्मणाली, "रामचंद्रा, तुमच्या दर्शनानें आज आमचे तपश्चरणसंबंधी सर्व श्रम सफळ झाले, असें मी समजतें. ह्याप्रमाणेंच सर्वांचे श्रम फळद्रूप करावयास आपण वनांत सर्वत्र संचार करालच. रामा, तुमच्या सारख्यांचें पृथ्वीवर जन्म किमर्थ आहे व स्त्रीबंधुसहवर्तमान वनांत येण्याचा आपला हेतु काय, हें सर्व केव्हांच समजण्यासारखें आहे. बा रामा, आह्मां तपस्व्यांना राक्षस फार पीडा देऊं लागले आहेत. दक्षिणदिशेस तर त्यांनीं फारच अनर्थ मांडला आहे. तेव्हां दुष्टांस सन्मार्गास लावणें किंवा तसें नच होईल तर त्यांचें निर्दलन करणें, हें आपल्यासारख्या क्षत्रियांचें मुख्य कर्तव्य होय." हें ऐकून राम ह्मणाला, "ऋषिजनांस हें काम अशक्य आहे असें मी मुळींच समजत नाहीं. परंतु तो अधिकार आपण आह्मांस दिला आहे, तो आमच्या हातून पूर्ण होण्यास आपलीच कृपादृष्टि पाहिजे. आपल्या तपःप्रभावानेंच आह्मां क्षत्रियांस जय मिळत असतो. जेव्हां कधीं ऋषि व त्यांचा तपःप्रभाव ही द्वयी जगतांतून नाहींशी होण्याचा दुष्ट काल येईल, तेव्हांच क्षत्रिय व त्यांचा विजय ही द्वयीही जगांतून जाईल !" इतकें बोलून ते दोघे बंधु त्या ऋषींबरोबर दुसरीकडे गेले. नंतर सीतेनें "हे तपोजननि, मी जनकसुमेधाकन्या अयोध्याधीश दशरथमहाराजांची स्नुषा सीता आपल्यास नमस्कार करितें," असें ह्मटलें. तेव्हां ती ह्मणाली " कन्ये जानकि, रामभार्ये, जवळ ये, ह्या आसनावर—अग आसनावर कां माझ्या अंकावर बस ये. ह्मणजे, बाळे, तुझ्या सारख्या महासाध्वीच्या दर्शनानें माझे नेत्रच केवळ तृप्त होतील, असें नाहीं, तर सर्वेंद्रियांस समाधान होईल! सीते, काय हें तुझें सौंदर्य! किती हें सौकुमार्य तरी! तुजसारखीनें चौदा वर्षें वनांत काढणें फारच अवघड आहे. रामभार्ये, आह्मांसारख्यांवर किंबहुना सर्व जगतीवर उपकार करण्याकरितां आपलें जन्म आहे, व हें पतिसह तुझें वनांत आगमन हेंही एक मुख्य परोपकारांग आहे, हें सर्व मी जाणतें. अशा आचरणानें तूं सर्व स्त्रीजातीस स्त्रीधर्मनीति काय आहे, हें

सांगत आहेस, ह्यांत संशय नाहीं. पृथ्वीवर सौंदर्य व सद्गुण हीं बहुधा एकत्र वास करीत नाहींत, असें ह्मणतात. परंतु हा संयोग तुझ्या ठिकाणीं तर प्रत्यक्ष दिसत आहे! मुली, तुझी किती स्तुति करावी? तूं जनकराजकन्या व अयोध्यास्वामिनी असतां तुला पतीबरोबर रानांत फिरणेंच इष्ट वाटलें. पुष्कळ स्त्रिया पतींबरोबर सुख भोगण्यास मात्र तेवढ्या तयार असतात, परंतु थोडासा का त्यांवर दुःखप्रसंग आला तर तेच पति त्यांस विपरीत वाटूं लागतात! साध्वींचीं चारित्रें कांहीं निराळींच असतात, त्यांच्या श्रवणानें कर्ण तृप्त होऊन पवित्र होतात. त्यांचें दर्शन झाल्यावर मग कोठें कांहीं पहावयाचें राहिलें आहे, असें वाटत नाहीं. त्यांच्या भाषणानें अमृताची काय गोडी असेल, ह्याची कल्पना सहज होते! तूं ह्या वर्तनानें सर्व स्त्री जातीस भूषवीत आहेस. अग, तुजसारख्या स्त्रिया ज्या देशांत निर्माण होतात, तो देश अन्यप्रकारें कितीही दरिद्री असला तरी तो समृद्धच आहे! तो कितीही विपत्तींत असला तरी सुखी होईल! तो सर्व प्रकारें निराश झाला असला तरी परमेश्वरकृपेनें तेथें निरंतर सरस्वती व लक्ष्मी वास करूं लागतील. मग अर्थात् सर्वप्रकारचे गुणगण तेथें दिसतील! तेथील पुरुष मोठे धार्मिक शूर निपजून जगतास "त्राहि त्राहि" करून सोडतील. अस्तु; कसाही पति असो, तो आपल्या आदरास, सेवेस व प्रीतीस योग्य असून इहपरलोकीं तोच आपल्यास सुख देणारा आहे, असें प्रत्येक स्त्रीनें समजलें पाहिजे. परमेश्वर ज्या स्थितींत ठेवील, तींतच सुख मानून स्वस्थ असावें असें जें ह्मणणें आहे, तें विशेषतः स्त्रियांनीं ध्यानांत ठेवावें. आपला पति आपल्या रूपाला किंवा स्वभावाला योग्य नसून तो आपल्यास किंवा मुलाबाळांस नानाप्रकारें त्रास देणारा आहे, ह्मणून जर ती स्त्री त्रासून सुखार्थ सैरावैरा जगतांत भटकूं लागेल, तर तिची तळमळ जाऊन तिला सुख किंवा समाधान याचा लेश तरी कोठें मिळेल काय? ह्मणून आपल्या शुद्ध आचरणानें त्यासच सन्मार्गावर आणण्यास झटावें, हेंच श्रेयस्कर आहे. रामांगने, सामान्य स्त्रीनें वाईट पतीलाही जर मनोभावानें भजावें असें माझें ह्मणणें आहे, तर तुझ्यासारख्या गुणवती स्त्रीनें रामासारख्या गुणनिधान प्रियतमाशीं सर्वकाळ त्यास संतोष उत्पन्न होईल असेंच वागावें, असें सांगितल्यास आश्चर्य तें कोणतें? परंतु हें माझें तुला सांगणें ह्मणजे

तूं वागतेस तशीच भर्त्याशीं वाग, अशा सांगण्या सारखेंच आहे, हें मी जाणतें. पण मीं दुसरें तुलाकाय सांगावें ? सज्जनांना तुझी कोणत्या मार्गानें जा ह्मणून सांगावें? तुह्मी जातां तसेच जा, ह्मणून सांगावयास नको काय? तुह्मी चित्रकूटावर असतां तुमचें सर्व वृत्त आह्मांस समजलें होतें. दशरथ राजाच्या मृत्यूनंतर तेथें भरत येऊन तो आतां नंदिग्रामांत मुनिवेषानें राहूं लागला आहे, हेंही चरित्र आह्मांस ठाऊक आहे. पतिसहवर्तमान अरण्यांत यावयास निघालीस, तेव्हांच तुझ्या दर्शनाविषयीं आह्मी आतुर झालों होतों. मग आजचा केवढा सुदिन बरें? मुली, तुझ्या स्वयंवराचा इतिहास हा मोठा कौतुक उत्पन्न करणारा आहे, तर सांगण्याला कांहीं प्रत्यवाय नसेल तर तो सविस्तर ऐकावा, अशी माझी इच्छा आहे. अशा सारखे प्रसंग आह्मा अरण्यवासिजनांना पहावयास मिळत नाहींत, ह्मणून ते ऐकावेसे वाटतात. तुझ्या स्वयंवरसंबंधें तूं जेवढें यथार्थ सांगशील तेवढें दुसरें कोण बरें सांगणार आहे?" नंतर आमच्या सीतादेवीनें फारच रसाळ वाणीनें जो स्वयंवरवृत्तान्त तिला सांगितला, तो, श्रोतेहो, तुह्मास ठाऊक असल्यामुळें त्याची पुनरुक्ति करणें नलगे. त्या कथानकानें अत्रिभार्या अनसूया फारच संतुष्ट झाली व ह्मणाली, "रामांगने, तुमचें जें एकंदर चरित्र म्यां ऐकिलें आहे, एवढ्यानेंच जें मला कांहीं त्याचें सार वाटतें तें तुला आतां स्पष्ट सांगतें कीं, तुमचा प्रथमतः वनांत येण्याचा हेतु हा आहे कीं, पृथ्वींतील दुष्ट राक्षसांचा वध करून मग सर्वांस सुख देण्याकरितां राज्यपद स्वीकारावें. जनककन्यके, तूं मला आपल्या सदाचरणानें इतकी कांहीं प्रिय वाटतेस कीं, तुझी सर्वकाळ मला संगति असावी असें वाटतें! आणि तुला काय देऊं आणि काय न देऊं असें झालें आहे. तर तूं कांहीं तरी मजपाशीं, बाळे, माग. तूं असें समजूं नको कीं ही अरण्यवासिनी देऊन काय देणार! परंतु जगांत अप्राप्य तें तपश्चरणानें प्राप्त होतें, हें तुला ठाऊक आहेना? आह्मांस सर्व सुसाध्यच आहे. परंतु नाशवंत सुखार्थ आह्मी व्यर्थ तपोव्यय करीत नाहीं. तर मग काय पाहिजे तें बोल, बाळे." सीता ह्मणाली, "माते, आपल्या सामर्थ्याविषयीं भलतीच शंका मला येईल, अशी आपल्यास शंका तरी कशी आली! मला आपल्या प्रसादानें सर्व कांहीं अनुकूल आहे. प्राणवल्लभाच्या समागमापेक्षां जगांत प्रियवस्तु ती को-

णती असणार? मग दुसरें म्यां आपल्या चरणांजवळ काय मागावें?" तेव्हां अनसूया ह्मणाली, "क्षणाक्षणाला तुझे अलौकिक गुण बाहेर पडत आहेत. काय तुझी पतिचरणीं दृढ निष्ठा ही! अस्तु; मित्र अस्तास चालल्यामुळें पक्षी किलकिलाट करूं लागले आहेत, संध्याकालीन कर्माचा समय होत आला आहे. तू कांहीं मागत नाहींस तर मीच होऊन तुला देतें, त्याचा स्वीकार कर ह्मणजे झालें." असें ह्मणून तिनें तिला एक दिव्य माला, एक वस्त्र, कांहीं आभरणें व अंगास लावावयाचें उटणें देऊन सांगितलें कीं, ह्या वस्तूंचा तुला ह्या घोरतर प्रवासांत फारच उपयोग होईल." सीतेनें त्या वस्तूंचा मोठ्या नम्रतेनें व कृतज्ञतापूर्वक स्वीकार करून महाप्रसाद ह्मणून तत्क्षणीं त्यायोगें आपलें अंग अलंकृत केलें. नंतर त्या वृद्ध तापसीस नमस्कार करून सीता देवी रामलक्ष्मणापाशीं आली. तिनें त्यांस अनसूयेपाशीं झालेलें सर्व वृत्त सांगून तिच्या दयादाक्षिण्यादि गुणांची फार स्तुति केली. त्यांनीं ती रात्र त्या पवित्र स्थलीं भगवान् अत्रिऋषि व भगवती अनसूया यांच्याशीं नाना प्रकारच्या गोष्टी बोलून मोठ्या आनंदानें घालविली. प्रातःकालीन सर्व कर्मे आटपून तीं त्यांचा निरोप घेऊन त्यांनीं सांगितल्याप्रमाणें दक्षिण दिशेकडे दंडकारण्यांत जावयास निघालीं. त्यानंतर त्यांस जीं अरण्यें लागलीं तीं एकापेक्षां एकेक भयंकर अशीं होतीं. पायांखालीं वाटही नाहीं अशा मार्गानें तीं अयोध्यावासि वनवासि होऊन चाललीं असतां, कांहीं दिवसांनीं एका घनघोर काननांत मेघाप्रमाणें ध्वनि त्यांचे कर्णीं आदळला! तत्क्षणीं सीतादेवीनें फार घाबरून पाठीमागून येत असलेल्या आपल्या प्राणप्रियास डोळे झांकून घट्ट मिठी मारिली. रामानें, न भिण्याविषयीं तिला सांगून तिच्याशीं व लक्ष्मणाशीं शौर्यसूचक बोलून तेथेंच स्वस्थ राहण्याविषयीं आपल्या बंधूस सांगितलें. इतक्यांत ज्याचें तोंड विक्राळ असून नांगराच्या फाळांसारखे आंत दांत दिसत आहेत; डोळेही लहानशा डबक्यां सारखे असून कपाळ तर एखादा लांब रुंद चिराच बसविलेला आहे असें वाटे! सर्वांगाचा रंग कोळशाच्या रंगापेक्षांही काळा असून, ओंठ फारच जाड, मानेचा गडदा मोठ्या सागवानाच्या खोडा सारखा, छाती विस्तीर्ण, हातही वृक्षाच्या खांद्यांप्रमाणें लठ्ठ व लांब, मेघा-

कारामप्रमाणें उदर, पायही एखाद्या भक्कम इमारतीच्या खांबांप्रमाणें उंच व मजबूत आहेत, प्रत्येक अवयव रांठ, भयंकर व ओबडधोबड, असून सर्वांगावर विशेषतः मस्तकावर जळके रूक्ष केश आहेत, असा एक भयंकर प्राणी त्यांच्या समोर येऊं लागला! त्याचें सर्वांग चर्बीनें व रक्तानें माखलेलें होतें! त्याच्या हातांत लोखंडाचा त्रिशूळ असून त्यावर जनावरांचीं व मनुष्यांचीं मुंडकीं लटकलेलीं होतीं! गळ्यांत हाडांच्या मोठमोठ्या माळा होत्या! तो एक सारखा गर्जना करीत त्यांच्या बराच पुढें येऊं लागला. तेव्हां सीता तर अधिकाधिक भिऊन प्राणेशास दृढालिंगन देऊं लागली. रामाला त्या राक्षसाचें बळ किती आहे हें माहीत असून ह्यास मारणें कांहीं कठिण नाहीं असें जरी वाटत होतें, तरी लक्ष्मणाचा प्रतापाग्नि पेटविण्याकरितां तो ह्मणाला, " लक्ष्मणा, हा प्रसंग मोठा कठिण दिसतो! तूं जो एकदां ह्मणाला होतासकीं, "कैकेयी मातेचा आह्मांस वनांत पाठविण्याचा उद्देश हाच आहे कीं चौदा वर्षांत कोणी तरी ह्यांस ठार मारणारा राक्षस भेटेल. मग अर्थात् भरतास पुढेंही राज्य मिळेल ! " त्याप्रमाणें आज प्रथम वर्षींच हा प्रसंग येत आहे! " हें ऐकताच लक्ष्मण ह्मणाला " ह्या राक्षसास कां एवढें भ्यावयाचें ! आपण विश्वामित्रमहर्षींबरोबर अरण्यांत होतों, त्या वेळेस अशा किती राक्षसांस आपण मुक्ति दिली आहां बरें ! मारीचासारखा तर हा भयंकर नाहींना? मग त्याला एकाबाणानें कोठच्या कोठें पाठविलांत बरें? ह्याची ती मग काय कथा! मीच ह्याला यमसदनाचा मार्ग दाखवितों. " अशा प्रकारें ह्यांचें भाषण होत आहे, तों राक्षस त्यांच्या अगदीं जवळ येऊन बोलूं लागला. तेव्हां सीतादेवीनें तर त्याच्या घाणीमुळें नाक दाबून धरलें होतें! तो म्हणाला, " अरे तुह्मीं कोण आहां? माझ्या ह्या रम्य व विस्तीर्ण दंडकारण्यांतील प्रिय क्रौंचावट प्रदेशामध्यें हातांत हीं भिकारडीं आयुधें घेऊन, ह्या सुंदर स्त्रीरत्नासहवर्तमान संचार करणारे तुह्मी कोणी मुनि अहां काय? अहो, जर हें अपूर्व रत्न मला अर्पण करण्या करितां आणलें असाल व त्याच्या रक्षणार्थ ह्मणून हीं आयुधें तुह्मीं बाळगलीं असाल तर ठीक आहे. व ह्याच सत्कृत्यामुळें तुह्मीं ह्या वनांत आलां ह्मणून तुमचें मीं मनःपूर्वक स्वागत करितों. हें रत्न येथें

ठेवा, आणि आल्या मार्गानें परत जा. ही स्त्री मजकरितांच आणितां आहां, असें समजून ह्या अरण्यांत तुह्मांस कोणीं उपद्रव दिला नाहीं व ह्मणूनच तुह्मीं येथपर्यंत जीवन्त आलां. परंतु परत जातांना हें स्त्रीरत्न तुह्माबरोबर नसल्यानें तुह्मास परत जाणें कठिण आहे. तर मी स्वतः तुह्मांस इष्टस्थलीं पोंचवितों. आपण दिलेल्या ह्या अमूल्य रत्नाबद्दल मला आपलीही सेवा केलीच पाहिजे. सांगा तर मज विषयीं एवढी पूज्यबुद्धि धारण करून माझा अप्राप्य प्रसाद व्हावा ह्मणून ह्मटणारे तुह्मीं कोण अहां? व मजपासून काय इच्छून हें रत्न घेऊन आलां अहां? आपला इष्ट हेतु मीं तेव्हांच पूर्ण करावा, अशा सारखी ही भेट आहे, ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. तुमचा अभीष्ट हेतु मी पूर्ण करण्यास तयार आहें. काय तो बोला मात्र. अगोदर विनंती करून मग भेट देणें हें योग्य आहे, तर तसें करा. परंतु विलंब करूं नका. माझ्यानें आतां धैर्य धरवत नाहीं. मग ह्या स्त्रीविषयीं तुह्मांस सर्व वृत्त विचारीन. ही कोणाची स्त्री? तुह्मीं कशी पळवून आणिली? स्त्रीच आहे ती, तिचा तुह्मीं उभयतांनींही उपभोग घेतला असाल. परंतु त्याविषयीं मी तुह्मांस क्षमा करितों. तुह्मीं कांहींही अपराध केले असले तरी त्याची ह्या एका रत्नार्पणानें मी क्षमाच करीन. मी ह्या सर्व अरण्याचा राजा आहें, माझें नांव विराध. परराज्यांत प्रवेश करणारांनीं राजास कांहीं तरी अपूर्व वस्तू अर्पण करून त्याची मर्जी संपादन केली पाहिजे. ती तुह्मीं केली ह्मणून मी वारंवार ह्मणतोंच आहें."

असें तो बोलत आहे इतक्यांत रामानें धनुष्य सज्ज करण्याकारितां आलिंगन दिलेल्या सीतेला जवळ उभी राहण्यास सांगितलें, तों त्या राक्षसाधमानें तिला स्पर्श केला. तेव्हां राम ह्मणाला "लक्ष्मणा, मला राज्यलाभ झाला नाहीं, स्वजनांचा व प्रजाजनांचा वियोग घडला, पिता परलोकास गेला, भरत दुःखानें परतला, ह्याबद्दल मला महद्दुःख ह्मणून वाटत होतें, परंतु ह्या पवित्र जनकनंदनीस ह्या अधमानें स्पर्शकेल्यामुळें व त्याच्या ह्या निरर्गल प्रलापांच्यायोगें जें दुःख झालें आहे, ह्यापुढें तें कांहींच नाहीं. तर लक्ष्मणा, ह्या दुःखाचें मूळ जगांतून दूर केलें पाहिजे."

"अरे राक्षसाधमा, इंद्रासही न आटपणाऱ्या दुष्ट दैत्यांस ज्यानें रणांगणीं ठार केलें, ज्याची कीर्ति त्रिभुवनांत वायूप्रमाणें भरून राहिली आहे;

ज्याचें नांव ऐकतांच तुझ्या सारख्या दुष्टहृदयाचें हृदय वितळून जावयाचेंच, अशा अत्यंत पराक्रमी अयोध्याधिपति दशरथमहाराजांचे आह्मी पुत्र आहोंत, समजलास? तुझ्यासारख्या दुष्टांचा विध्वंस करून सर्वांना सुख द्यावें, हें परम पवित्र व प्रिय कार्य आतां आह्मांवर संपवून ते महामान्य नुकतेच लोकांतरीं गेले आहेत. अशा पित्याच्या आज्ञेनें व रणशूर मातेच्या उत्कट इच्छेनें आह्मी विपिनविहारी झालों आहों. ज्या निष्कलंक तेजोमय स्त्रीरत्नाला तूं आपल्या घाणेरड्या खांद्यावर घेतलें आहेस हें,जगद्विश्रुत मिथिलेचा सांप्रतचा राजा जो सीरध्वज,ज्यास प्रजा पिता समजून जनक ह्मणतात, त्याला लोकोत्तर पुण्य प्रतापानें प्राप्त झालेलें कन्यारत्न होय. हिच्या प्राप्त्यर्थ स्वयंवरकालीं पृथ्वींतील हजारों राजे आले होते. शिवधनुष्याचा भंग करून ही कन्या मिळवावी हा पण होता. तो सर्व राक्षसांचा अधिपति जो रावण ह्याच्यानेंही सिद्धीस गेला नाहीं. ह्यामुळें तो लंकापति फार क्रुद्ध होऊन तेथून निघून गेला. तो पण जिंकून हें अमूल्य रत्न मिळविणारा जो मी त्या मजवर त्यानें त्याकाळीं यथेच्छ दांत ओंठ खाल्ले, व जणूं माझा कोणत्या तरी रीतीनें सूड उगवलाच पाहिजे असें मनांत आणून तो भयंकर मुद्रेने मजकडे पाहून सलज्ज होऊन त्यारंगस्थलाहून एकदम निघून गेला. त्यास आज तेरा चौदा वर्षे झालीं! ही माझी सहचारिणी मजबरोबर वनांत आली आहे.साधुजनांस त्रास देणाऱ्या तुझ्यासारख्यांचा वधकरणें ह्यांत हिला महदानंद वाटतो. हिचा प्रभाव असा आहे कीं,ही जर कोणा अपराध्याकडे रागानें पाहील तर त्याचें तत्काल भस्मच होईल. परंतु ही फारच दयाळू व क्षमाशीलवती आहे, त्यामुळें तूं अद्यापि जीवंत आहेस मातापितरांनीं आह्मांस अशा सारख्या घोर अरण्यांत पाठविण्याचा त्यांचा हेतु अह्मास अजून मुळींच समजला नव्हता. परंतु तो तूं आंता स्पष्ट सांगितलास. आणखी चौदाच वर्षे मातेनें काळ कां सांगितला, तर तुह्मासर्वांचें निर्मूळ होण्यास इतका काळ अवश्य पाहिजे, इतके तुह्मी पुष्कळ आहां हेंही स्पष्ट झालें. विराधा, ही पाहिलीस आमची युद्धाची सामुग्री? पण तुझ्याशीं इतकें बोलून तुझें आयुष्य वाढाविलें,हें मींबरें केलें नाहीं. तूं एकअधमाधम असून सर्वांस त्रास देणारा आहेस. तुझें नांव विराध, इतकें मला समजलें. ह्यापेक्षां तुजविषयीं कांहीं अधिक नको

आहे. हें भाषण ऐकून सीतेला एकदम खालीं टाकून देऊन त्याच्यावर पिसाळलेल्या वाघाप्रमाणें आकरून धावला. त्यांनीं त्यांच्यावर बरीच बाणवृष्टि केली तेणेंकरून तो विव्हळ मात्र होई पण क्षणभरानें पुन्हा सावध होई. आपल्या बाणांचें येथें कांहींच चालत नाहीं, तेव्हां ह्याला कोणाचा कांहीं तरी वर असावा, असें रामास वाटलें. तरी ते त्यावर बाण सोडीतच होते. इतक्यांत त्यानें त्या दोघांस दोन खांद्यांवर घेऊन दुसऱ्या अरण्यांत निघतो आहे, असें दाखविलें. ते बंधु त्याचे बाहू बुकलूं लागले. सीता देवी तर त्याप्रसंगीं फारच घाबरून गेली. व ह्मणाली "हे राक्षसा, ह्यांना सोडून दे. हे निरपराधी आहेत." "अहो प्राणेश्वर, अहो भावोजी, मला सोडून तुह्मी कोणीकडे चाललां? मी आपल्या इच्छेविरुद्ध वनांत येऊन आपल्यास महत् संकटांत पाडिलें. हें मी कबूल करून तुह्मांजवळ त्याबद्दल क्षमा मागतें. तेव्हां माझा अपराध विसरून मला ह्या संकटांतून सोडवा. त्यांनीं इतके कांहीं त्याचे बाहू बुकलले कीं ते अगदीं मोडूनच गेले! लगेच तो शक्तिहीन झाला. ते खालीं उतरले. तो अगदीं विव्हल होऊन भूमीवर पडला. एकसारखे दीर्घ श्वास सोडून मोठ्यानें ओरडावयास लागला. तेव्हां त्यास पूर्व शापाचें स्मरण होऊन त्यानें तो वृत्तांत रामास सांगून आजचा दिवस हा आपल्या उद्धाराचा होय, असें ह्मटलें. आणि रामाचे मोठे उपकार मानून तो गतप्राण झाला. नंतर त्यांनीं त्यास मोठ्या खाचेंत पुरलें. सीतेनें तत्क्षणीं आपल्या प्राणवल्लभास प्रेमानें दृढालिंगन देऊन उभयताच्या शौर्याची फारच स्तुति केली. व जोंपर्यंत हे दोघे शूर बंधु आपल्याबरोबर आहेत, तोंपर्यंत आपल्यास कोठें कसलीही भीति नाहीं, अशी तिची खात्री होऊन निर्भय होत्साती वनांत संचार करण्याविषयीं पूर्वीपेक्षां अधिक उत्सुक झाली. त्यास्थळींच कांहीं वेळ त्या राक्षसच्या बळाविषयीं गोष्टी बोलत त्यांनीं विश्रांति घेऊन पुढील मार्ग धरिला. हळू हळू जातां जतां तेथून सहा कोशांवर असलेल्या अत्यंत पुराण व महान् तपस्वी शरभंगनांवाच्या महर्षीच्या दिव्याश्रमांत तीं आलीं. एकमेकांच्या दर्शनानें एकमेकांस फारच आनंद होऊन परस्परांस आपण धन्य व कृतार्थ झालों, असें वाटलें. त्या महर्षीनें तर "आज माझ्या तपश्चरणाची सांगता झाली, आतां ह्या लोकीं माझें

राहण्याचें कांहींच कारण राहिलें नाहीं." असें अनेक गोष्टी बोलत असतां, ह्मणून दाखविलें. त्यावेळीं दंडकारण्यांत राक्षसांनीं तर मुनिजनांस फारच त्रास दिलेला होता. त्यांचें कांहींच चालेनासें झालें होतें. त्यांना त्या अरण्यांत निरुपद्रव असें एकही स्थळ मिळेनासें झालें. तेव्हां ते दीन होऊन राक्षसांपासून होणारी पीडा दूर करण्याच्या उपाययोजनेंत होतेच.

इतक्यांत अयोध्याधीश दशरथ याचा अत्यंत पराक्रमी पुत्र राम हा, भार्या व बंधु यांसह अरण्यांत आल्याचें त्यांस कर्णोपकर्णी वर्तमान कळलेंच होतें; व त्यानें चित्रकूट सोडल्याचीही वार्ता बहुतेकांस समजली होती. तेव्हां ह्या शूरक्षत्रियास भेटून आपणांस राक्षसांपासून होणारी असह्य पीडा निवेदन करावी, व त्यास शरण जाऊन "जेणेंकरून आमच्या कर्मास विघ्नें न येतील, असें आपण करण्यास समर्थ आहां," अशी विनंती करावी, अशा हेतूनें त्या दंडकारण्यांतील बहुतेक भागांतील अनेक ऋषि रामचंद्र येण्यापूर्वींच त्या आश्रमीं येऊन राहिले होते. कारण त्यांस पक्कें ठाऊक होतें कीं दशरथपुत्र हा ह्या भगवान् शरभंग महर्षीचें दर्शन घेतल्यावांचून कधींही राहणार नाहीं. ह्या सर्व ऋषींचें येथें येण्याचें कारण त्या ऋषिश्रेष्ठानें रामचंद्रास अगोदर सांगितलेंच होतें. तरी त्यांतील कित्येकांनीं पुढें येऊन राक्षसांपासून होत असलेल्या त्रासाचें यच्चयावत् स्वरूपवर्णन केलें. तेणें करून त्या अत्यंत दयार्द्र बंधूंस व सीतादेवीस फार फार वाईट वाटलें. ते ऋषि आणखी ह्मणाले, " राजांचें खरें कर्तव्य जें प्रजांचें कल्याण, त्याविषयीं सदा तत्पर असणारे राजे, ज्याप्रमाणें आपल्या राज्यांतून प्रजांची खरी स्थिति जाणण्याकरितां फिरतात, कधीं कधीं तर ते वेषान्तरानें भटकतात, व प्रजांचीं दुःखें पाहून दुर करितात, त्याप्रमाणें आपण महिपति, ह्या अफाट वनराष्ट्रांत दीनजनांस कोण पीडा देत आहेत, हें समजून घेऊन त्या दुष्टांचें पारिपत्य करून आमचें औदासिन्य दूर करावें, अशाकरितां सर्वायुधांसह आलां आहां, असें आह्मीं समजतों. हे अयोध्याधीश, प्रजारक्षणार्थ जसा लोकांपासून आपण कर घेतां, तसा आह्मांपासूनही तुह्मांस आमच्या तपश्चरणाचा चतुर्थांश लाभ मिळतो. तो कर प्रजांजवळून घेण्याबद्दल तुह्मांस फार खटपट पडते, परंतु आह्मांपासून

तेव्हांच प्राप्त होतो." नंतर रामानें ज्यांत गर्वाचा लेशही नसून सर्वत्र नम्रता भरली आहे, व "हा दासजन आपली सेवा करण्यास सदा आतुर आहे," अशा प्रकारचे ज्यांत वारंवार उद्गार आहेत, असें मधुरतर भाषण केलें. व कित्येकांबरोबर जाण्याचें निश्चित करून कित्येकांस नंतर येण्याचें दृढ आश्वासन दिलें. प्रातःकाळीं त्या वृद्ध तापसाचा निरोप घेऊन तीं तिघें निघालीं. तीं बरोबरच्या ऋषींसह अनेक लहानमोठे डोंगर चढत, उतरत, नद्या ओलांडीत, निबिडारण्यें मागें टाकीत टाकीत, अनेक सरोवरें पहात पहात, सृष्टिसौंदर्य अवलोकन करीत, सुतीक्ष्ण नांवाच्या ऋषीच्या आश्रमस्थानीं आलीं. तें आश्रमस्थळ तर त्यांना वैराग्याचें घर, शांतीचें स्थान, गंभीरतेचें मायबाप, पुण्याचें क्षेत्र, शारदेचें सदन, तेजाचें आदिकारण, पवित्रतेचें मित्र, धर्माचें स्वरूप, अशासारखें वाटलें. त्या पुण्यभूमीच्या स्पर्शानेंच त्यांची चित्तवृत्ति कांहीं विलक्षण होऊन गेली! तेव्हां राम ह्मणाला, "बा लक्ष्मणा, तपश्चर्येसारखें समाधानस्थान दुसरें कांहीं नाहीं. जगांत कोठें सुख आहे, असें ह्मणावयाचें असेल तर तें अशा भाग्यवान् भूभागीं आहे." नंतर त्याचें त्यांनीं दर्शन घेऊन ती रात्र त्या पुण्यपुरुषाच्या सहवासानें, अनेक प्रकारच्या गोष्टी बोलत घालविली, प्रातःसमयीं बरोबरच्या ऋषिमंडळीसह राम, लक्ष्मण व सीता निघालीं. चालत असतां त्या ऋषींना हा अमुकअमुक पर्वत, हा अमुक डोंगर, ही अमुक नांवाची नदी, ह्यास्थळीं अमुक महर्षि होऊन गेले, येथून अमुक कोशांवर राक्षसांनीं अमुक अमुक अनन्वित कृत्यें केलीं, ह्यास्थाळीं अमुक घडलें, येथून अमुकाच्या आश्रमास जाण्याचा मार्ग आहे, वरचेवर दिसणारे पांढरे ढीग हे राक्षसांनीं मारून खाललेल्या ऋषींच्या हाडांचे होत. अशा प्रकारची त्यांना विपुल माहिती सांगून अश्रुतपूर्व असा इतिहासही ऐकविला. तो ऐकत असतां त्यांनीं दुःखविस्मयमिश्रित असे अनेकविध उद्गार काढिले. भिन्नभिन्न दिशांकडून आलेल्या सर्व ऋषींकडे रामचंद्रानें यथाकालीं जाऊन त्यांस पीडा देणारांचें पारिपत्य केलें. तेव्हां रामलक्ष्मणाची त्या वनराष्ट्रांत ऋषिमंडळामध्यें सर्व दिशाभर फार कीर्ति पसरली. व हे राक्षसादिकांस मारून आह्मांसारख्यांचें दुःख दूर करण्याकरितांच जन्मले

आहेत, अशी त्यांची खात्री झाली. ऋषिजनांनीं अत्यंत कृतज्ञ होऊन त्यांची फार स्तुति गाइली. व "परदु:खविमोचन करणें हें जें मनुष्यजन्माचें मुख्य कर्तव्य तें आपल्या हातून एकसारखें चाललें आहे," अशा अर्थाचें प्रेमळ भाषण केलें. ह्याप्रमाणें त्या विस्तीर्ण अरण्यामध्यें ऋषींच्या सान्निध्यानें त्यांनीं कोठें घटिका, कोठें प्रहर, कोठें रात्र, कोठें एकादा दिवस, कोठें दोन दिवस, कोठें आठवडा, कोठें पंधरवडा, कोठें महिना, कोठें दोन महिने, कोठें षण्मास, कोठें वर्ष, अशा रीतीनें राहून वनवासांतील चौदावर्षांतील बराच काळ ह्मणजे सुमारें दहा बारा वर्षें लोटिलीं. इतक्या काळांत त्यांनीं बऱ्याच राक्षसांचा फडशा उडविला. नंतर फिरतां फिरतां तें दंपत्य व लक्ष्मण दक्षिणेस श्रीगोदावरीनदीच्या आलीकडे सुमारें आठ दहा कोशांवर असलेल्या अगस्त्याश्रमीं आले. अगस्त्यमुनि आपल्या महामान्य लोपामुद्रा भार्येसह व अनेक दुसऱ्या ऋषींसह तेथें राहत होता. ह्या क्षत्रियातिथींच्या आगमनानें त्यांस अत्यानंद होऊन आपण भाग्यवान् आहों असें वाटलें. अतिथींनींही त्या कीर्तिमान् मुनिराजाच्या दर्शनानें आपलें जन्म सफल झालें असें मानलें. हा अरण्यप्रांत त्यांस फारच मनोरम वाटला, व तेथें जवळच कोठें तरी पर्णकुटिका बांधून रहावें, असें त्यांच्या तत्क्षणीं मनांत आलें. त्या मुनिश्रेष्ठाचें व रामचंद्राचें अनेक विषयांवर संभाषण झालें. रामचंद्रानें त्या महर्षीस अनेक संशयांतून मुक्त केलें. भगवान् अगस्त्यानें त्या अतिथित्रयाची फारच स्तुति करून ह्मटलें कीं, "रामचंद्रा, तुझी खरी योग्यता, व चारित्रकथा जाणणारे जगांत धन्य होत. तूं अरण्यांत येऊन मदोन्मत्त व अजिंक्य अशा असंख्य राक्षसांस मारिलेंस, ह्यावरून वनांत येण्याचा तुझा हेतु व अतुल पराक्रम हे स्पष्ट दिसतच आहेत. मनुष्यजन्म हें केवळ स्वोदर भरण्यासाठीं नव्हे, तर जगताच्या कल्याणार्थ आहे. असें मानून त्यासाठीं आपणांवर कितीही व कशीही संकटें आलीं तरी न भितां, जे आपला सदुद्योग अप्रतिहत चालवितात, तेच पुरुष सर्वत्र वंद्य व कीर्तनीय होत. स्वहितासाठीं रात्रंदिवस मरमर श्रम करून शेवटीं मरून जाणें, ह्यांत लौकिक, समाधान, शांति किंवा पुण्यप्राप्ति, काय असेल हें तेच जाणोत! अशा मनुष्यांमध्यें व पशुपक्ष्यांमध्यें मग अंतर तें काय? वसुधैवकुटुं-

बकबुद्धि धरून ह्या भूगोलतलावर सतत अश्रान्त श्रम करणाऱ्यां-पासून इहलोकीं काय सिद्ध होणार नाहीं! ते जगतांत सर्व स्वर्गसुख आणतील! परंतु असे पुरुष कधीं झाले तरी थोडेच जन्मतात. जेव्हां केवळ स्वहिततत्त्वसंशोधकच सारे लोक उपजतात, तेव्हां त्या का-ळाला, त्या लोकांना, त्यांच्या त्या कृत्यांना, त्यांच्या विचारांना, त्यांच्या परलोकप्राप्तीच्या इच्छेला, ह्या सर्वांना, फार काय सांगूं? त्यांच्या अशा प्रत्येक कृतीला धिक्कार असो! असो; तूं भार्येला बरोबर आ-णिलेंस हें फार चांगलें केलेंस. येणेंकरून तिच्या अंगीं असलेले अनेक गुण अधिक प्रफुल्ल झाले असतील, ह्यांत संशय नाहीं. रामा, स्त्रीसारखें पुरुषास दुसरें साहाय्य कोठें मिळणार बरें! स्त्रीवांचून पुरुषा-ची योग्यता कमी आहे. पुरुषास सदाचारसंपन्न करणारी एक स्त्रीच आहे. पुरुषानें सदाचरणानें राहून तिचें सदुपदेशानें मन उदार करावें. स्त्री ही सर्व सुखाची खाण आहे. जे आपण महान् महान् पुरुष किंवा साध्वी स्त्रिया पाहतों किंवा त्यांच्या सत्कथा ऐकितों, तीं सर्व प्रथमतः लहान बालकेंच होतीं. त्यांचें लालनपालन कोणीं केलें? त्यांस बोलाव-यास कोणीं शिकविलें? विचार करण्यास कोणीं लाविलें? त्यांस सदुप-देश कोणीं केला? तेव्हां बालकांची जी आद्यगुरु जननी ती सद्गुणांनीं मं-डित नको काय? स्त्रिया सद्गुणी निपजाव्या, ह्मणून त्यांचे पित्यांनीं, बां-धवानीं व पतींनीं सदा तत्पर असावें. तरच ह्या निःसार संसारांत त्यांना समाधान वाटेल. गुणवती स्त्रीला आनंदित ठेवावें, असें मग, कोणाला बरें वाटणार नाहीं? ज्या कधीं काळीं लोक स्त्रीवर्गाविषयीं अशी तत्प-रता बाळगणार नाहींत, त्यांस कमी लेखून आपल्या अंगच्या बळावर वाईट वागवितील, किंवा त्यांस सर्व प्रकारें अज्ञान ठेवून त्यापासून सुखाची अपेक्षा करतील, त्याकाळीं ते इहलोकींच्याच सर्वप्रकारच्या सुखास केवळ मुकतील असें नाहीं! तर सर्व सुखास कारण ज्या भार्या त्या अज्ञ असल्यामुळे पारलौकिक सुखासही आंचवून त्यांचें मनुष्यजन्म नि-रर्थक जाऊन त्यांला मनुष्येतर योनींत पडावें लागेल!" लोपामुद्रेनेंही सीतेचा धन्यवाद गाऊन तिच्याशीं प्रेमपूर्वक पुष्कळ भाषण केलें. एकमे-कांचा समागम एकमेकांस फारच सुखावह वाटला. नंतर जाण्याचा निरोप मागण्याचे वेळीं त्या मुनीस त्यांनीं जवळच कोठें तरी आश्र-

म बांधून राहण्याचा आपला हेतु कळवून तदर्थ रम्यस्थान कोणतें तें सांगण्याविषयीं विज्ञप्ति केली. तेव्हां भगवान् अगस्त्यऋषीनें सानंद होऊन किंचित् स्मरण केल्यासारखें करून ह्मटलें, "येथून सुमारें दोन एक योजनांवर श्रीगोदावरीच्या तीरीं पंचवटी नांवाचें एक अति रमणीय स्थान आहे. तें प्रत्यक्ष पाहिल्यावांचून तेथील रम्यता समजावयाची नाहीं. तें स्थान सर्व सामुग्रीनें युक्त आहे. ह्या वाटेनें अशींच जा, म्हणजे कांही वेळानें तुह्मांस मोहांच्या वृक्षांची दाट झाडी लागेल. ती संपून थोडें चालल्यावार विस्तीर्ण असा एक वटवृक्ष भेटेल. त्याच्या छायेखालीं क्षणभर तरी विश्रांति घ्यावी असें वाटावयाचेंच. नंतर तेथून निघल्यावर सपाट, ओसाड व निर्वृक्ष अशी बरीच भूमि निरूत्साहानें चालल्यावर तुह्मांला लहानशी टेंकडी चढावी लागेल. ती उतरून थोडें गेलांत ह्मणजे तो मनोरम प्रदेश लागेल तेथें गगनचुंबित असे अनेक वृक्ष तुह्मांस दिसतील. तेथें गेल्यावर मीं सांगितलेलें स्थान हें तुम्हांस सहज ओळखतां येईल. कारण तेथें जवळ जवळ पांच वडाचे वृक्ष असून ते अगदीं गोदावरीच्या तीरीं आहेत." हें ऐकून रामानें त्या महामुनीस दृढालिंगन देऊन, लक्ष्मणानें त्याचे चरणीं मस्तक ठेवून व सीतादेवीनें नमस्कार करून तीं सर्व ऋषीनें सांगितलेल्या त्या सन्मार्गास अनुसरून चालत असतां त्या पंचवटींत आलीं.

छाया देणारे हजारों लहान मोठे तरु तेथें असून गोदावरीचा सदा सहवास, ह्यामुळें तर तें स्थान त्यांस फारच रम्य वाटलें. त्या ठिकाणीं मोठी पर्णकुटिका बांधून त्यांत राहून तीं सुखानें काळ घालवीत होतीं. तेथें त्यांस स्वतःला राक्षसांनीं उपद्रव दिला नाहीं एवढेंच नाहीं, तर "आपणांस राक्षस पीडा देत आहेत, ह्या करितां आपण त्यांस मारण्याकरितां चलावें," अशी रामचंद्रापाशीं कोणी दीन होऊन विज्ञप्तीही केली नाहीं.

आपली चरित्रनायिका रामांगना ही जरी पतिसहवासानें पंचवटींत सुखांत व समाधानस्थितींत होती, तरी चौदावर्षें पूर्ण होऊन, आपल्या प्रियपतीस राज्याभिषेक कधीं होईल, शत्रुघ्न भावोजींचें काळजीनें निस्तेज झालेलें मुखकमल, प्रफुल्ल असें कधीं दृष्टीस पडेल, सासूबाईंच्या चरणीं मस्तक केव्हां ठेवीन, बहिणी अथवा जावा ह्यांना कवटाळून सविस्तर वनवृत्तांत कधीं सांगेन, आपल्या जनकजननीच्या करपाशांत कधीं पडेन,

इत्यादि प्रकारांनीं ती आतुर झाल्यामुळें, तिला अयोध्येस रामलक्ष्मणांसह कधीं जाईनसें झालें होतें. पंचवटींत आल्यापासून तर अयोध्येंत जाण्यास आपणास किती अवकाश आहे, तो काळ ती वारंवार मोजीत असे। तेथें आल्यावर तिनें स्वराजधानींत नेण्याकरितां ह्मणून अनेक वस्तु संचित केल्या होत्या. जेवढें ह्मणून चमत्कारिक व कौतुक उत्पन्न करणारें तिला वाटे तें संग्रहीत करण्याचे उद्योगांत ती होती. ल्हान मोठ्या सवत्स हरिणी, अनेक रंगांचे ससे, स्वतः ताल धरून मयूरीसह नाचावयास शिकविलेले मयूर, पढविलेले पोपट वगैरे नानातऱ्हेचे पक्षी, मोठमोठीं व्याघ्रचर्मे, मृगाजिनें, कांहीं वनगजांचे व राक्षसांचे दांत, अशा अनेक वस्तूंचा तिनें संग्रह करून ठेविला होता. आणि आपण अयोध्येंतून निघाल्यावर वनांत काय काय केव्हां घडलें, काय काय केव्हां पाहिलें, वगैरे सर्व गोष्टी तिनें नीट लक्षांत ठेविल्या होत्या.

ज्यावेळीं घनतुहिनवृष्टीनें सर्व वन आच्छादून जातें, जलाशयांतील व नद्यांतील उदक शुभ्र बर्फमय होतें, मनुष्याचे मुखावाटे शब्दही धड उमटत नाहीं, दंतवादनक्रिया एकसारखी चालते, वस्त्रांनीं तृप्ति नहोतां अग्नि हाच ज्यावेळीं मित्र वाटतो. आळस वाढतो, बसल्या जागे वरून उठवत नाहीं. उन्हाची जो तो इच्छा करितो, उदकस्पर्श करवत नसल्यामुळें अस्वच्छतेचे आचार उत्पन्न होतात, पक्षी पटापट मरतात, वृक्ष, वेली, वनस्पति, इत्यादि पत्रपुष्पफलविंहीन होऊन जातात, कमलिनी मरून पडतात, पृथ्वी धूम्रमय दिसते, अशा प्रखर हिवाळ्यांत सहस्त्ररश्मि भगवान् भास्कर हा जगतीतलावर येऊन बराच वेळ झाला होता, तरी त्या वनस्थलीं त्याची दाद हीं नव्हती. अशा एके दिवशीं त्या पर्णकुटिकेच्या अंगणीं व्याघ्रचर्माच्छादित एका विस्तृत शिलातलावर रामचंद्र सीतेसह बसला असून लक्ष्मणही जवळच कांहीं अल्प कार्यांत गुंतला होता. सर्वांनीं कृष्णाजिनें पांघरलीं होतीं. ते पाळलेले पक्षी आपलीं शरीरें व पंख संकुचित करून सीतेला लगटून बसले होते. कित्येक हरिणी त्या हरिणनयनेच्या नयनांकडे पहात होत्या. सीता रामचंद्राला अनेक प्रकारच्या भाषणांनीं रिझवीत असतां ह्मणाली, " प्राणनाथ, आपणांस व भावोजींस मजकरितां ह्या अरण्यांत किती कष्ट सोसावे लागले व आपणांवर मजमुळें किती मह-

रसंकटें आलीं हीं मीं प्रत्यक्ष पाहिलीं आहेत. मला त्यासाठीं वारंवार वाईट वाटतें. परंतु मला जर बरोबर न आणतेत, तर हें वनभूमीचें विलक्षण सौंदर्य किंवा हें तिचें अविनाशि ऐश्वर्य कधीं तरी माझ्या दृष्टीस पडलें असतें काय? ही पंचवटी तर मला साक्षात् माझी जननी वाटत आहे. येथें आल्यापासून आम्ही आनंदांत आहों. हे वृक्ष माझे जणूं बंधूच होत असें वाटतें. ही गोदावरी माझ्या प्रिय विजयेप्रमाणें समाधान करणारी मला सखी दिसत आहे. ह्या लता मला प्रेमपाशांत बद्ध करणाऱ्या सख्या भागिनीच भासतात. सारांश, येथील स्थावरजंगमात्मक सर्व सृष्टि केवळ आप्ताप्रमाणें दिसत आहे. प्राणप्रिया, तुमच्या चरणप्रसादानें व भावोजींच्या सदिच्छेनें इतका काळ वनांत चांगला गेला. महान् महान् प्रसंगांतून तुह्मी मला सोडविलें. असाच आतां बाकी राहिलेला काळ, ह्मणजे वर्ष सवा वर्ष, सुखानें जावो. प्रियतमा, मला वाटतें कीं आतां आपण येथून परत जाण्यास निघावें. आपणास इतके दिवस हळुहळू जावयास लागतीलच. ती प्रिय अयोध्यानगरी येथून फार दूर आहे, नाहीं बरें? भरतभावोजींस भेटावयास एकही क्षण अधिक होता कामा नये, हें आपणास माहीतच आहे. सासूबाई तर आपल्या मस्तकावघ्राणाकरितां अगदीं बुभुक्षित होऊन राहिल्या असतील! धाकटे भावोजी राज्यभारानें अगदीं दमून गेल्यामुळें आपल्या येण्याचा एकेक दिवस मोजीत असतील! माझ्या बहिणी अश्रुपूर्णनेत्रांनीं माझ्या दृढालिंगनाविषयीं आतुर होऊन त्या क्षणाची वाट पाहत राहतील! वसिष्ठादि मंडळी आपणांस "धन्योऽसि" असें ह्मणावयाकरितां त्या शुभ लग्नाची प्रतीक्षा करीत अयोध्येच्या बाहेर उभे राहतील. सुमंत्रादि प्रधान मंडळी तर कांहीं दिवस शृंगबेर नगरांत "हीं आलीं, हीं आलीं," ह्मणून म्हणत बसतील! गुहराजा चित्रकूटीं येऊन चोहोंकडे हेर पाठवून वाटेकडे डोळे लावून राहील! भगवान् भारद्वाजही कोणत्या गणितमानानें कमी दिवस वनांत राहावें लागेल, ती गणना करून तो निश्चित दिवस कधीं येतो, ह्मणून त्या दिवसाचाच जणूं जप करीत असतील! प्रजाजन तर आमच्या स्वागतार्थ केव्हांपासून तयारीस लागावें ह्मणून वरचेवर पंचांगांतील आंकडे पहात राहतील! अत्यंत क्षीण व उदासीन झालेलीं माझीं मातापितरें आमच्या भेटीसाठीं, मिथिलेहून अयोध्येस

जाण्याकरितां कधीं निघावें, ह्या विचारांत असतील! हें ऐकून रामचंद्र म्हणाला "लक्ष्मणा, ऐकिलेंसना हें प्रियेचें मधुर भाषण? काय ह्यापेक्षां अमृत गोड असेल? जनकनंदिनि, ह्या सर्व कल्पनालहरींनीं मला ओढल्यामुळें मी सध्या दुःखसागरांत तरंगतच आहेकीं काय असें वाटतें! कारण कीं, त्या येणाऱ्या आनंदप्रसंगीं, आह्मांस मोठ्यांनीं हांका मारणारा आमचा अत्यंत दयाळू व प्रिय तात नाहींना? प्रिये, तातस्मरणानें माझें हृदय द्विधा होऊन जातें ग. त्याची आज्ञा पूर्ण केल्यानें आह्मांस वनांतही कसकसें यश आलें, हें सर्व ऐकून त्याला किती संतोष झाला असता बरें? लक्ष्मणा, मला वाटतें कीं, हिचें ह्मणणें योग्य दिसतें, तर दोनचार दिवसांतच येथून निघावें. प्रिये, हें स्थळ सोडतांना आम्हांस महद् दुःख होणार आहे. सर्व दुःखास मूळ कारण जें प्रेम तें आमचें ह्यास्थळीं फारच आहे. ह्यावर लक्ष्मण "ठीक आहे, मला आपली आज्ञा शिरसा प्रमाण आहे." इतकेंच ह्मणून तो गोदावरीतिरीं गेला.

मंगलाचरणानंतर पडद्यांतून सुशोभित रंगभूमीवर जशी सजून नटी यावी, त्याप्रमाणें त्यांचें मंगल व मधुर भाषण झालें तोंच त्या झाडींतून त्या भूस्थळीं एक दिव्य स्त्री येतांना त्या दंपत्याचे दृष्टीस पडली! ती फारच रूपवती असून अलंकारांनीं सजली होती. तिनें वेणीमध्यें सुवासिक व सुंदर अशीं तऱ्हेतऱ्हेचीं पुष्पें घातलीं होतीं, चालण्याच्या झोंकामुळें त्यांतील थोडथोडीं खालीं गळतच होतीं! तिचा अंगवर्ण गोरा असून प्रत्येक अवयव मोहक होता. तिचें नेसलेलें वस्त्र व कंचुकी, ह्यांतच क्षणभर मन रमावें अशीं तीं होतीं! स्तनावरून सरणारा पदर ती वरचेवर सांवरीत असे; परंतु उदर, त्रिवळि, पाठ, पोटऱ्या इत्यादि पुरुषांस कामविकार उत्पन्न करणारे अवयव दाखवून नयनकटाक्ष फेंकीत फेंकीत त्या स्थळीं येत असतां तिला पाहून सीता ह्मणाली "प्राणनाथ, ही अत्यंत रूपवती स्त्री कोण असावी बरें? आपल्या बरोबर जशी मी तशी ही आपल्या कोणी विपिनविहारी प्रियतमाबरोबर फिरत असतां त्याचा हिचा वियोग होऊन आतां ह्या थंड व राक्षसप्रदेशांत एकटीच भ्रमण करीत आहे काय! अशा स्थितींत ह्या अनाथेस सर्व प्रकारें आपण साहाय्य करून अभय दिलें पाहिजे. हिच्या चांचल्यावरून व हिची अत्यंत सुरूपता पाहून, ही

खरोखर ह्या रम्यस्थळीं ही रमा किंवा शारदाच अवतरली असावी, असें वाटतें! अहाहा! काय हिची मनोरमाकृति तरी ही! पतिविरहित भटकणारी ही अबला ह्या दुष्ट राक्षसभूमीमध्यें स्वधर्मापासून भ्रष्ट न होवो म्हणजे झालें! प्राणनाथ, आपल्या प्रियतमाची चुकामूक होऊन ही इतस्ततः संचार करीत आहे असें म्हणावें, तर हिच्या मुखावर दुःखाचा किंवा भीतीचा लेशही दिसत नाहीं, हें आश्चर्य आहे! ही दिसण्यांत सत्कुलीन दिसते खरी, पण हिच्या ठिकाणीं विनयलज्जादि मुळींच दिसत नाहीं, हें कसें! प्रियतमा, ही आपल्या कडेसच येत आहे. तेव्हां ही कोण, येथें कशासाठीं आली आहे,हें सर्व कांहीं समजेलच. अथवा आम्ही जाणार म्हणून ही कोणी वनदेवता आमच्या सत्काराथे येथें आली आहे? किंवा ह्या वनांत निर्भय संचार करणारी ही कोणी कामरूपिणी कपटी राक्षसी तर नव्हेना! ही जसजशी जवळ जवळ येत आहे तसतसें हिच्याकडे पाहूं नये, असें वाटूं लागलें आहे! अरेरे! ही स्त्रीधर्मनीति कांहींच जाणत नाहीं!" असें सीता रामापाशीं हळु हळू बोलत आहे, तों ती रामचंद्रापुढें येऊन उभी राहिली व एकदम बोलूं लागली.

**स्त्री**—महाराज, आपण कोण आहां, हें मला सांगितल्याशिवाय समजलेंच आहे. मी कोण हें आपल्यास सांगण्यापूर्वी, मी आपल्या चरणांपाशीं कशाकरितां आलें आहें हें सांगतें. कारणकीं आपल्या पादमूलापाशीं माझ्या येण्याचें कारण मजपेक्षां अधिक महत्त्वाचें आहे. कोणाची कशीही समजूत असो, परंतु माझें तर साफ असें म्हणणें आहे कीं, स्त्रिया ह्या सर्वदा परतंत्र म्हणजे पुरुषाधीन आहेत. पुरुष हेंच त्यांचें बल, पुरुष हेंच त्यांचें सुख व पुरुष हेंच त्यांचें जीवित आहे. जेव्हां कधीं त्यांना अत्यंत पीडा अथवा कांहीं तरी त्रास होत असेल, तर तो पुरुषसंबंधानेंच होत असेल, ह्यांत संशय नाहीं. सामान्यतः स्त्री कोणत्याही वयांत असली तरी ती पराधीन म्हणजे पुरुषाधीन असणार, मग यौवनावस्थेंत तर ती किती पुरुषावलंबिनी असणार, ह्याविषयीं बोलावयासच नको. मला जी कांहीं सध्या पीडा होत आहे, अथवा माझ्याठायीं जी कांहीं अत्यंत आतुरता उत्पन्न झाली आहे, व जी कांहीं मनाची अनेक विकारांनीं विलक्षण स्थिति झाली आहे, ती अपल्या पुढें

लज्जेमुळें निवेदन करतां येत नाहीं! युवतींना कांहीं सुचूं देऊं नये, त्यांना आतुर कराव्या, त्यांना पाहिजे तिकडे भटकत फिरवावें, त्यांचे विनयलज्जादि नैसर्गिक अलंकार हरण करावे, त्यांच्यावर महत्संकटें आणावीं, त्यांना निराश व उदासीन करावें, त्यांच्या मुखांतून हवें तें वदवावें, त्यांस कधीं गाढ निद्रा येऊं देऊं नये, आलीच तर त्यांत भलभलतींच स्वप्नें पडावींत, त्यांच्या मनाला भ्रमण करण्यास हें जगत् जगत् कां सर्व विश्व-मोहरी एवढें करावें, अपरिचिताचा परिचय करून द्यावा, इत्यादि करविणारा कोणी कामदेव आहे असें ह्मणतात. तो सदा धनुर्धारी असून आणखी त्रिभुवनाचा राजा आहे ! तो आपल्या कामांत मोठा दक्ष आहे. त्याच्या चरित्रकथा अनंत असून आश्चर्य, विस्मय, साहस, इत्यादिकांनीं भरलेल्या आहेत! त्याच निर्दयानें मजवर एकसारखी बाणवृष्टि चालविली आहे! ह्या प्रसंगीं तर त्यानें पराकाष्ठा करून सोडिली आहे. कोठें गेलें तरी तो जगन्निवास आपलें कर्म सोडीत नाहीं ! त्याचें निवारण करणें मोठमोठ्यांच्याही शक्तिबाह्य आहे, मग आमच्या सारख्या अबलांनीं काय करावें ? त्या दुष्टदेवाचा मार चुकविणें मोठें असह्य होऊन त्यालाच शरण जाण्याकरितां ह्मणून त्याच्या शोधार्थ मी निघालें. तो कोठें राहतो, त्याची भेट कशी होईल, हें आपल्याला विचारावें ह्मणून आपल्याजवळ आलें. व हें वृत्त सांगत असतां, आपल्या मुखकमलाकडे वारंवार दृष्टि देत असतां तो कामदेव आपणच आहां, अशी आतां माझी खात्री झाली! कामाचीं म्यां ऐकिलेलीं सर्व लक्षणें आपणांमध्यें पाहत आहें. हें त्रिभुवनांतील स्त्रियांस मोहून टाकणारें रूप अन्य पुरुषाच्या ठिकाणीं कसें संभवेल? ज्या धनुष्यानें जगतास त्राहित्राहि करून सोडिलें आहे, तेंच हें आपलें धनुष्य मला दिसत आहे. आणखी आपल्याजवळ येतांच मला अधिकच पीडा होऊं लागली आहे! आपली ही स्त्री रति, मीं ऐकिल्याप्रमाणेंच सौंदर्याची खाण आहे. आपण कोण हें खरें समजण्यापूर्वीं आपल्याविषयीं आलेल्या दुष्ट कल्पना खोट्या होत, अशी माझी आतां खात्री झाली. आपणास दुष्ट, निर्दय ह्मटलें ह्याविषयीं मला आतां संकोच वाटत आहे. अशा पुरुषाची निंदा करणारा जगांत कोण अभागी आहे! तर हे त्रिभुवनैकनाथ, कामदेव, ह्याशरण आलेल्या आर्तजनावर दया करावी. आपली बाणवृष्टि फारच हो तीक्ष्ण!

राम—अग हे बहुभाषिणी, तूं कोणीही अस. तुजसारखी धीट बायको मीं अजून पाहिली नाहीं. तुझें हें वक्तृत्व पाहून मला मोठें आश्चर्य वाटत आहे. तूं ज्याला समजून शरण आली आहेस, तो मी कामदेव नव्हे. अर्थात् ही माझी आर्धांगी रति नव्हे. तेव्हां त्याच्या शोधार्थ तू जा. ह्याशिवाय जर तुझें कांहीं दुःख असेल तर मला सांग. तन्निवारणार्थ यथाशक्ति मी यत्न करीन.

स्त्री—आपण मदनराज नाहीं, व ही रूपसुंदरी रति नव्हे, ह्मणतांच मला हें आपलें ह्मणणें खरें वाटलें. कारण कीं ह्या सुंदर मुखांतून कधीं तरी असत्य वाणी निघेल काय? आपण कोणीही असा; त्या कामदेवानेंही सर्व जगांत भटकत आपला शोध करीत करीत आपल्या पायांपाशीं येऊन दुःखविमुक्त व्हावें, अशी आपली योग्यता आहे. मग मी आपलें दुःख दूर करण्याकरितां आपल्यापुढें दासी होऊन आलें असतां आश्चर्य तें कसलें? तेव्हां निरुपायामुळें ज्याला मी शरण जात होतें, तें शरण जाण्याचें काम आपण येथें केलें, तर मजसारखी जगांत आणखी कोण भाग्यवती असेल बरें? आपणास पीडा देणारास शरण केव्हां जावें लागतें? तर ती पीडा आपणास स्वतः जेव्हां दूर करतां येत नाहीं, किंवा ती दूर करणारा कोणी दुसरा भेटत नाहीं तेव्हां. उत्तम पक्ष हा कीं आपण स्वतः होऊन तें दुःखनिवारण करावें. दुसऱ्याच्या साहाय्यानें पीडा दूर करणें हा मध्यम पक्ष. आणि अधम पक्ष हा होय कीं पीडा देणाऱ्याच्या सर्वतोपरि अधीन होणें. तेव्हां मी मध्यमपक्षाचें अवलंबन करीत आहें. ह्मणून त्या दुष्टदेवाकडून ह्या अनाथेवर होणारा जुलूम आपण दूर करावा. पुनः पुनः मी ह्मणतें कीं आपण कोणीही असा. मला एवढें दिसतें कीं आपण मजसारखीला आश्रय देण्यास योग्य आहां. माझें मन आपण अगदीं वेधून टाकिलें आहे. व आपल्याठायीं सर्वांचें मन रमावें, असें आपलें कांहीं विलक्षणच रूप आहे! महाराज, मी कोण हें समजल्यावांचून जर माझा अंगीकार करावयाचा नसेल, तर अगोदर एवढेंच सांगतें कीं, मी एक ब्राह्मणी असून माझा प्रियतम परलोकवासी झाल्यानें अत्यंत तापप्रद अशा वैधव्यांत एकेक दिवस कंठीत आहें. मी सर्व प्रकारें अनाथ अबला आहें. तेव्हां हे, दयाळा, मजवर दयादृष्टि करावी. आपण सुज्ञ व सदय

आहां. व प्रसंग आला ह्मणूनच बोलतें, राग नसावा. अहो, पुरुषांनीं मात्र आपल्या स्त्रिया मृत झाल्या असतां पुनः पुनः पाहिजेल तितके विवाह करावे, किंवा एकसमयींही हव्या तितक्या स्त्रिया कराव्या. आणि आमच्या सारख्यांनीं भर तारुण्यांतही पतिसुखास मुकावें, हें आपल्या धर्मशील, सदय, न्याययुक्त व सृष्टिनियमज्ञ अन्तःकरणास कसें वाटतें? आपल्यास हा पक्षपात कधींही आवडावयाचा नाहीं. तर प्रियतम साहाय्य नसल्यामुळें मला होणारी ही असह्य पीडा दूर करून आपले दयाशीलत्वादि गुण प्रकट करावे.

**राम**-(मनांत)ही कोणी विलक्षण बायको दिसते!(उघड)तूं जर ब्राह्मणस्त्री ह्मणवितेस तर ह्या भयंकर राक्षसी विचारांनीं तूं कशी अगदीं वेडी होऊन गेली आहेस.निर्लज्जत्व,साहस,विषयलंपटता,बहुभाषण,नटणें,धाष्टर्य, पुरुषनिंदा,हेच काय विधवांचे गुण तुला वाटतात!कुत्सित विकारांनीं जिचें अन्तःकरण दूषित झालें आहे, अशा स्त्रीशीं धर्मविचार काय किंवा दुसरा कोणताही विचार, काय करावयाचा? धर्माधर्म,न्यायान्याय जाणण्यास अगोदर अन्तःकरणाची समता किंवा शुद्धि पाहिजे. तेव्हां तुझ्याशीं मी कांहीं अधिक बोलण्यास इच्छीत नाहीं. तू आपल्या आल्या मार्गानें जा. तूं कोणीही ऐस. तुझ्या भाषणाची मी फार स्तुति करितों. परंतु ह्या भाषणास भुलणारा मी नव्हे.

**स्त्री**–अहो प्राणनाथ, माझ्यानें परत कसें जाववेल? पाठीमागून जसा काय तो मेला कामदेव मला खेंचून आपल्या अंगावर आलिंगनार्थच किंवा आश्रयार्थ पाडणार, अशा दुःसह स्थितींत मी आहें. मला कांहीं ह्मणा. माझा स्वीकार आपण केलाच पाहिजे. मी पहा अगदीं शक्तिहीन झालें आहें! सर्वांग घर्मानें भिजून रोमांचित झालें आहे! अधर स्फुरत असून अंगलतिका थर थर कांपत आहे! स्पष्ट बोलतां सुद्धां येत नाहीं! तर हिचें संरक्षण करा. (असें ह्मणून अगदीं रामा जवळ जाते. )

**राम**–(मनांत)प्रियेनें ह्मटल्याप्रमाणें ही खचितकोणी कपटवेष धारण करणारी कामातुर झालेली राक्षसीच आहे. ह्या रानांत निर्भय संचार करणारी आणखी कोण असणार? ही कोण आहे, हें आपल्यास कळलेंच पाहिजे. ( उघड ) अग स्त्रिये, तूं परत जा. अशी कामांध हो-

ऊन भलत्याच मार्गानें जाऊं नको. इंद्रियाधीन होऊन असन्मार्गी जाणारांचें कधींही आजपर्यंत कल्याण झालेलें नाहीं.

स्त्री.— ( रागावून ) अरे अभाग्या, तूं मला ओळखिलेंस नाहीं वाटतें? माझा तूं अंगीकार न केलास तर तूं घोरतर संकटांत पडशील, समजलास? स्त्रिया सर्वथा परतंत्र व पुरुषाधीन आहेत असें ह्मटलें, ह्यामुळें तूं चढून गेलास काय? तर बाबा, स्त्रिया तशा नाहींत. त्या सर्व प्रकारें स्वतंत्रच आहेत.त्या पुरुषांपेक्षां मोठमोठीं कामें करितात! असो;दाक्षिणेस फार लांब सागरांत, अत्यंत विस्तीर्ण, लोकवसतीनें फारच गच्च भरलेली, वैभवानें परिपूर्ण, जेथें अमुक एक कमीपणा आहे असें नाहीं, अशी लंकानांवाची एक फारच सुंदर नगरी आहे. तेथें जो काळाचाही काळ, मोठमोठे लोकही ज्याचें दास्य करीत आहेत, असा राज्य करणारा जो दशानन त्याची मी अतिशय लाडकी भगिनी आहें. माझें नांव शूर्पणखा. माझा पति विद्युज्जिव्ह लढाईमध्यें मेल्यामुळें, मी ह्या विस्तीर्ण दंडकारण्यातील जनस्थानामध्यें, माझा अत्यंत पराक्रमी बंधु खर व दुसरे हजारों राक्षस यांसहवर्तमान राहत असतें. माझें किंचित् कोणीं अप्रिय केलें,असें त्यांच्या कानीं पडलें पुरे कीं त्यांनीं त्याचें पारिपत्य केलेंच समज. तेव्हां,हे महाभगा,तूं मला वश हो. ही तुझी स्त्री कुरूप असून हिचें हें एकच रूप आहे. मी कामरूपिणी आहें. दररोज नवें नवें रूप घेऊन तुला तृप्त करीन. विहाराला योग्य अशा नानाविधस्थळीं तुला मी घेऊन जाईन. मग सर्व राक्षस तुझ्याशीं सेवकांप्रमाणें वागतील. अरे! ह्या स्त्रीचें लचांड तुला वाटत असेल, तर मी हिला तुजजवळून दूर करितें. ( असें ह्मणून सीतेच्या अंगावर धावूं लागली इतक्यांत— )

राम.— ( मनांत ) हिला आतां असें सांगितलें पाहिजे. ( उघड. ) अग सुंदरि, तुह्मीं दोघींनींही मजबराबर असावें, असें मी इच्छितों. तर मी युक्ति सांगतों ती ऐक. माझा कनिष्ठ भ्राता लक्ष्मण मजबरोबर आहे. तो अत्यंत रूपसंपन्न असून अगदीं तरुण आहे. त्याच्याकडे जाऊन आपलें काय ह्मणणें आहे तें कळीव. त्याची स्त्री जवळ नाहीं. तो कोठें येथें जवळच गोदावरीतिरीं असेल.

रामाशीं ह्यासंबंधें ती पुष्कळ बोलली. परंतु शेवटीं सीतेस

मारून रामासही वश करून घेतां येईल, असें मनांत आणून ती लक्ष्मणाकडे अनेक प्रकारचे हावभाव करीत गेली. आपल्यास अनुकूल तेवढे रामाजवळ झालेलें वृत्त व आणखीही कांहीं खोटेंनाटें त्यास सांगून ती ह्मणाली. "प्राणनाथ, माझ्यानें आतां धैर्य धरून कांहीं बोलवत नाहीं. मदनाचा मार आतां मला अगदीं सोसवत नाहीं हो! तर हें स्वच्छ व मृदु पुलिन शय्या समजून माझी मनःकामना अगोदर पूर्ण करा. मी अगदीं विव्हल झालें आहें तुह्मांस लाज वाटत असेल तर, प्राणनाथ, मी आपला हात धरून नेतें." असें ह्मणून त्याचा हात धरावयास गेली. परंतु ही कोणी तरी कपटी स्त्री असून आपल्या ज्येष्ठ बंधूनें हें कपट मला ओळखतां येतें किंवा नाहीं हें पहावें, ह्या हेतूनें हिला विनोदानें मजकडे पाठविली असेल. असें मनांत येऊन तो ह्मणाला. "अग, माझा हात धरूं नको. जिकडून तूं आतां आलीस त्या पराक्रमी रामचंद्राचा मी धाकटा बंधु असून मी त्याच्याशीं सेवकाप्रमाणें वागतों. तूं माझी स्त्री झालीस असतां, तुलाही दासीप्रमाणें त्या रामाची व सीतेची सेवा करावी लागेल. पण तुझ्या ह्या रूपाला व तुझ्या ह्या अतिशय नाजुकपणाला, हें फारच योग्य. तेव्हां तूं रामांगनाच होऊन मजपासून सेवा घ्यावीस!" अशा अर्थाचें आणखी त्यानें भाषण केलें. तेव्हां ती कामविव्हला कपटी राक्षसी रामाकडे जाऊन "मला तूंच वरिलें पाहिजेस. बोल, वरितोस कीं नाहीं तें? अगोदर थांब! ह्या तुझ्या स्त्रीस खाऊनच टाकितें, ह्मणजे अर्थात् तूं मला वरशील!" इतकें ह्मणून तिच्यावर धांव मारणार, तों तिच्या मागोमाग आलेल्या लक्ष्मणानें तिला धरून खालीं पाडिलें! तेव्हां तिनें लगेच आपलें भयंकर रूप धरिलें! मग रामाज्ञेनें तिचें त्यानें नाक व कान छेदून तिला कुरूप करून सोडून दिलें. नंतर ती विक्राळ राक्षसी रक्तबंबाळ होऊन भयंकर किंकाळ्या फोडीत आपल्या स्थानीं गेली. व खरादि राक्षसांस कांहीं तरी सांगून शेवटीं ह्मणाली कीं "त्या तिघा मानवांचें ज्या वेळेस मला रक्तप्राशन करावयास मिळेल, तेव्हांच मला कांहीं समाधान वाटेल."

इकडे रामलक्ष्मण व सीता हीं तिच्या कपटाविषयीं कांहीं गोष्टी बोलून आपल्या कर्तव्यास लागलीं. आतां राक्षस वगैरे आपल्यावर चालून येतील हें त्यांना ठाऊकच होतें.

नंतर कांहीं काळ लोटल्यावर खर राक्षसानें शूर्पणखेबरोबर मोठे बलाढ्य असे चौदा राक्षस पाठविले. तिनें त्यांस त्यांचें वसतिस्थान दाखविलें. उभयपक्षीय युद्धास सिद्ध झाले. युद्धांत गर्वोक्तीचीं अनेक प्रकारें भाषणें झालीं. परंतु रामलक्ष्मणांपुढें त्यांचें कांहींच चाललें नाहीं. ते केव्हांच समरांगणीं बळी पडले. नंतर ती राक्षसी क्रोधाग्नीनें प्रदीप्त होऊन खरराक्षसाकडे गेली. तिनें त्याची अनेक प्रकारें निंदा केली. तेव्हां तो वीर चौदा हजार राक्षसांबरोबर आला. तो युद्धप्रसंग फारच वर्णनीय झाला. अद्भुत बाणांच्या सामर्थ्यानें व अनेक अस्त्रांच्या साहाय्यानें त्या तितक्याही राक्षसांचा रामलक्ष्मणांनीं संहार केला. मग आखेरी केवळ काळपुरुषच असे पांचहजार राक्षस आले, परंतु तेही पूर्वींच्या चौदाहजार चौदांच्याभेटीस गेले! मगस्वतः राक्षसराज खरमहाराज क्रोधानें लाल होऊन त्यांच्या अंगावर धावले! तो मोठा पराक्रमी होता. त्याचें सामर्थ्य शत्रूनें सुद्धां वर्णन करण्यासारखें होतें. त्याचें युद्धकौशल्य इतिहासकारांनीं बरेंच सविस्तर लिहावें असें होतें. शेवटीं तोही भूतळीं निश्चेष्ट पडून यमराजाचा प्रिय अतिथि झाला! नंतर दुःख, अपमान, राग इत्यादि अनेक विकारांनीं जिचें अंतःकरण भरलें असून तिच्या चेहऱ्यावरही त्यांचें स्पष्ट चित्र दिसत आहे, अशी ती शूर्पणखा आपला बंधु जो रावण त्याजकडे तिच्यानें जितकें लौकर जाववेल तितकी लौकर गेली. व हें सर्व वर्तमान त्याला खुलवून सांगितलें. व आपलें नाक व कान दाखवून त्यास ह्मटलें, "अरे लंकानाथा, ती स्त्री तुला मिळावी, ह्मणून माझा हा सर्व यत्न होता! तर हे तुझेच अवयव त्या मानवानें छेदून टाकिले, असें मी समजतें. अरे! ती स्त्री किती रूपवती व कोमलांगी आहे ह्मणून सांगूं? स्त्रीजातीसही मोह पाडणारी ती तरुणी आहे. अरे ती जोंपर्यंत ह्या लंकेंत आली नाहीं, तोंपर्यंत ही लंका मी ओसाड समजतें. तोंपर्यंत मी तुला पराक्रमहीन, दुर्दैवी, दीन व लक्ष्मीहीन मानतें. तर त्यांना मारून तें स्त्रीरत्न आपल्या अंतरंगरूप कोंदणांत बसीव." ह्याप्रमाणें ती बोलत असतां लंकापति ह्मणाला "भगिनी, हें सर्व यच्चयावत् वृत्त मला अगोदर अकंपनाकडून कळलेंच आहे. त्याक्षणापासून मला चैन नाहीं एवढेंच नाहीं, तर त्या जनकनंदिनी सीतेचें स्वयंवर झालें त्या दिवसापासून आज पं-

पचीस वर्षें मला चित्तस्वास्थ्य नाहीं! परंतु काय करूं? ते मानव कसे मारावे ह्या विचारांत मीं आहें. परंतु मला कांहीं उपाय सुचत नाहीं. तुला अशी विरूप करून खरादिक हजारों राक्षस त्यांनीं मारिलें, हें पाहून व ऐकून मी फारच क्रोधाविष्ट झालों आहें. आतां त्यांचा नष्ट समय जवळ आला असें समज! मला त्यांस मारणें ह्मणजे विशेष आहे असें नाहीं. माझें सैन्य पाहूनच ते मरतील. त्यांच्याशीं उघडरीतीनें वैर करण्यास आतां मला हरकत नाहीं. भगिनी, इतक्यांतच ते दशरथ-पुत्र मेले व सीता लंकेंत आली हें शुभवर्त्तमान तूं ऐकशील. हें वृत्त घडून येण्याकरितां कोणतीही युक्ति लढविण्यास, कसलाही उपाय योजण्यास, कोणत्याही प्रकारचा पराक्रम करण्यास, किंवा कितीही लोकांचे प्राण खर्चण्यास, मी मागें होणार नाहीं." तेव्हां ती राक्षसी ह्मणाली. "ते आपोआप मरतील अशी मी थोडक्यांत तुला युक्ति सांगतें. ती ही कीं, ती सीता रामाची केवळ प्राण होऊन राहिली आहे. तिचा व त्याचा क्षणभरही वियोग होत नसतो. तर असें कर-जेणेंकरून रानांत ते दोघेही तिला सोडून कोठें गुंततील! ह्मणजे मग पर्णकुटिकेंत तिला पकडून लंकेंत आणावी. नंतर अर्थात् ते तिला शोधतां शोधतां निराश होऊन आपोआपच मरतील." हें तिचें भाषण त्या मदांध व कामासक्त रावणास मानवलें. व त्या प्रयत्नास तो लागला.

रावणासारखा पराक्रमी राजा! लक्षावधि पराक्रमी राक्षस व दुसरे महानमहान् विद्वान पदरीं! पाहिजेल तें रूप घेऊन हवें तें करण्यांत तरबेज अशी त्याच्याजवळ मंडळी! सर्वानुकूल करणारी जी संपत्ति ती त्याचे सेवेस हात जोडून उभी! अनेक मंत्री मंत्र सांगणार! हजारों लोक ज्याच्या आश्रयानें राहणारे! इत्यादि सर्व कांहीं त्याला अनुकूल असतां प्रतिकूल असें त्याला जगांत काय असणार? त्याची युक्ति सिद्ध होण्यास कितीसा आवकाश? परंतु त्या लंकेंत रामाच्या विलक्षण पराक्रमाची कीर्त्ति ऐकून पदरचे कित्येक लोक साशंक होऊन रामही कोणी लोकोत्तर मूर्ति आहे, असें त्यांस नुकतेंच वाटावयास लागलें होतें. असो. त्या वेळेपासून रावणाचें स्वास्थ्य मोडलें, त्याला चैन पडेना, निद्रा नाहींशी झाली, भक्ष्य गोड लागेना, तो कामाधीन झाला. त्याचें सर्वचिंतन काय तें जनककन्या लंकेंत कशी व केव्हां येते हें होऊन राहिलें.

असें ह्मणतात कीं, तो माघशुद्ध चतुर्दशीचा दिवस होता. त्यादि- वशीं, सूर्य आपल्या गगनमार्गाच्या अगदीं मध्यबिंदूवर आला होता, तरी थंडीचा अंमल त्या पंचवटींत कमी झाला नव्हता! पर्णकुटिकेच्या बाहेर अंगणांत असलेल्या एका आम्रवृक्षाखालीं बांधलेल्या स्वच्छ ओं- ट्यावर व्याघ्रचर्मे पसरलेलीं होतीं. त्यावर पडून राम विश्रांति घेत असतां, सीता मंदमंद बोलून हळूहळू त्याचे चरण चुरीत आहे, लक्ष्मणही जवळ मधून मधून त्यांच्याशीं कांहीं भाषण करीत आहे, इतक्यांत एक हरिण त्या हरिणाक्षीच्या दृष्टीस पडला. तत्क्षणीं तिच्या मनांत कौतुक, मोह, उत्सुकता, लोभ, हीं सर्व एकदम उभीं राहून ती ह्मणाली, "प्राणनाथ, अहो भावोजी, तो पहा पहा मृग! किती तरी चमत्कारिक व सुंदर आहे हा! अरेच्चा! हा इकडे जवळ जवळ येत आहे! ह्याचें अंग सुवर्ण- मय असून त्यावर अनेक रंगांच्या रत्नांप्रमाणें टिपके दिसत आहेत! पुढील चेहराही आतां व्यक्त दिसतो. तोंड पहा तोंड! अहाहा! दंत- पंक्ति किती तरी शुभ्र व स्वच्छ ही! जणूं मोत्यांचे हारच! जीभ पहा शुद्ध वीज दिसते! उड्या तरी कशा मारीत आहे हा! ह्या झाडींत हा पुनः लपतो, पुनः बाहेर दिसतो! प्राणप्रिया, असा विलक्षण सुंदर मृग मीं कधीं पाहिला नाहीं, इतकेंच नव्हे, तर असा असेल असें मला कधीं वाटलेंही नाहीं! परमेश्वराच्या अफाट सृष्टींत काय काय अद्भुत वस्तु आहेत, हें को- णाला कळणार! प्राणनाथ, पाहिलांतना तो आतां तेथच्या तेथेंच उड्या मारीत इकडे वळून पहात आहे! त्याला हा ऋषींचा आश्रम वाटल्या- मुळें असा अगदीं जवळ आला आहे. शेंपूट तरी किती सुरेख! पाठी- मागचा भाग, पहा, किती पुष्ट आहे तो! ह्यावरून दृष्टि काढूं नयेशी वाटते. ह्यानें मला मोह उत्पन्न केला. काय ही विलक्षण मृगकान्ति! काय हा कोणी पूर्वजन्मीं महान् तपस्वी असून तपोभंगामुळें व शापाच्या योगें मृग झाला! प्राणनाथ, ब्रह्मदेवानें हा हरिण निर्माण करून आपल्या कौश- ल्याची परमावधि करून सोडिली! भावोजी, आपलीं धनुष्यें, बाण, वगैरे ह्याचे दृष्टीस न पडतील असें क्षणभर करा. नाहीं तर हा चपलपशु भीतीनें कोठच्या कोठें पळून जाईल. अहो, हा अजून किती तरी जवळ येणार! मी जाऊन धरतेंच आतां याला! आतां जरा लांब गेला. शहाणा आहे तो! ह्यानें माझें मन अगदीं वेधून टाकिलें, दृष्टि ओढून घेतली, सर्व इं-

द्रियें तटस्थ केलीं! प्राणप्रिया, हा मृग-सर्व सृष्टीचें सौंदर्य-मला पाहिजे, ह्याला धरून आणा हो. मी ह्या वत्साला ममतेनें पाळीन. अयोध्येंतील सर्व लोक ह्याला कौतुकानें पहातील. तर उठा. आजपर्यंत मीं आपल्याशीं अशी आग्रहाची विनंती कधीं केली नव्हती. एवढा हट्ट माझा पूर्ण करावाच. प्राणेश्वरा, तो जीवन्त नच सांपडेल तर त्याचें चर्म तरी आणावें. ह्याची कंचुकी फार चांगली दिसेल!" असें हें तिचें बोलणें चाललें असतां ते दोघे बंधु त्या बालमृगाकडे पहात होते, त्यांनाही हें मोठें आश्चर्य वाटलेंच,परंतु सीता त्याचें यथातथ्य वर्णन करीत असतां तर त्यांना विशेष आनंद होत होता. ते एकूणीसहजार व चौदा राक्षस मारल्यापासून ह्या वनांत हे राक्षस आतां काय काय कपट करून आपल्यास फसवतील ह्याचा नेम नाहीं असें त्यांस वाटतच होतें. तेव्हां लक्ष्मण ह्मणाला, " बंधो,हा कनकमृग दिसतो खरा, पण हा कपटमृग कशावरून नसेल? अनेक रूपें घेणाऱ्या राक्षसभूमीवर आपण राहत आहों, हें ध्यानांत आहेना? असा विलक्षण देहधारी आपण कधीं तरी ऐकिला आहे काय! तेव्हां आपल्या पुढें हें मूर्तिमंत अरिष्ट आलें आहे, असें समजून ह्याच्या नादीं लागूं नका. सीतावहिनी, ह्या प्रसंगीं आपल्या ठिकाणीं काय लोभ व मोह हा, कीं ज्याच्या पायीं आपण प्राणप्रियाशीं असें निग्रहाचें मागणें मागितलेंत! पतीपाशीं अशी आग्रहाची याचना केलेली मीं कधींही आपल्या मुखांतून ऐकिली नाहीं, ती आज ऐकून मी आश्चर्यचकित झालों आहें! व ह्यामुळेंच माझें मन अनेक तरंगांत बुडून गेलें आहे!" सीतेला हें लक्ष्मणाचें बोलणें मुळींच रुचलें नाहीं. पुनः तिनें रामाला फार आग्रह केला! तेव्हां तो जावयास निघाला व ह्मणाला, "लक्ष्मणा, तुझें भाषण मीं सर्व ऐकिलें. तुझें ह्मणणें अगदीं खरें असेल, परंतु जानकीचें वचन कसें मोडावें? मी मृगानुसारी न झालों तर तिला किती बरें वाईट वाटेल? ह्या निर्जन वनांत तिचें कोड आह्मीं नाहीं पुरविलें तर कोण पुरविणार? प्राणप्रियेनें मजपाशीं अशा रीतीनें कधीं कांहीं मागितलें नाहीं. तेव्हां तिच्या मागण्याचा निषेध करणें हें महा पातक माझ्या हातून कसें होणार? बा लक्ष्मणा, हा वनवास सर्व प्रकारें दुःखमय आहे, असें तिला ठाऊक असतांही जी मोठ्या आनंदानें वनांत आली, तिचें मन

दुखविणें माझ्या हातून कालत्रयीं होणें नाहीं. माझ्या मुखांतून तिच्या ह्या इच्छेविरुद्ध एकही शब्द निघणार नाहीं. प्राणप्रिये, हा पहा सज्ज होऊन चाललों. आतां त्याला पकडतों. लक्ष्मणा, आतां आपणास फार जपलें पाहिजे हें तुला विदित आहेच. तर हिला एकटीला ठेवून कोठेंही जाऊं नको. मृगनयने, जावयाला उठलों खरा, परंतु तुझ्याजवळून जाऊं नयेसेंच वाटतें! तुझ्या मुखचंद्राच्या आड सर्व अंधकारमय आहे असें भासतें! हें तुझें काम मीं मोठ्या उल्हासानें करावें,परंतु मला तिळभरही उल्हास वाटत नाहीं! पायांत जशी काय बेडीच अडकवलेली आहे! येथें दोन पावलें जाऊन मृगाला आणावयाचें काम, परंतु जसा काय मी फार लांब, फारादिवस देशान्तरासच जात आहें, असें मनांत येऊन तुझा विरह होऊंनये असें वाटतें! लक्ष्मणा, हिला सांभाळ बरें. देहानें मी तिकडे जाण्यास निघालों, पण मन कांहीं तसें करूं देत नाहीं. सुंदरि, मी तुझ्याकरितां जातोंच. सावध ऐस. जेथें आह्मीं हजारों राक्षस मारले आहेत, असें हें राक्षसस्थान आहे!" असें ह्मणून तो सीतापति रामचंद्र पुनःपुनः वळून सीतेचें मुखकमल पहात पहात, मोठ्या कष्टानें, हरिणाच्या पाठीमागें गेला. धनलोभी जसा द्रव्यार्थ तसा रामचंद्र त्या चपल पशूस जीवन्त पकडण्यासाठीं त्या स्थळीं चोहोंकडें फिरला. परंतु शेवटीं निराश होऊन त्यास ठार मारण्याचा त्यानें निश्चय केला. व त्याच्या पाठीमागून फारच लांब गेल्यावर त्या वीरश्रेष्ठानें त्या हरिणावर बाण सोडला. तेव्हां "लक्ष्मणा, धांव लौकर धांव, मी मोठ्या संकटांत आहें," असें बोलून त्या हरिणरूप घेणाऱ्या राक्षसानें आपला प्राण सोडिला! तत्क्षणीं तो देह मारीचराक्षसाचा होता, म्हणून रामचंद्रानें ओळखिला! हें एकंदर कपट पाहून रामचंद्रास मोठें आश्चर्य वाटलें. व दुसरी लगेच काळजी उत्पन्न झाली कीं, ह्या दुष्ट कपटमय राक्षसानें माझ्या सारखी वाणी उच्चारली, त्यामुळें लक्ष्मण माझ्या शोधार्थ इकडे धांवत येईल, आणखी जानकी एकटी तिकडे राहील! तरी तो प्रियबंधु ह्मणत होता कीं हें सर्व कपटमय दिसत आहे!परंतु सीतेच्या मधुरशब्दामुळें मला इकडे यावें लागलें. ही वाणीही त्याला कदाचित् कपटमय वाटून तो कांहीं इकडे येणार नाहीं, असें वाटतें. पण त्या प्रियेच्या कर्णांत,

मी मोठ्या संकटांत आहें, अशा अर्थाचे हे कपटमय शब्द पडतांच लक्ष्मणास तीतेथें क्षणभरही राहूं देणार नाहीं! काय तिकडे होईल कोण जाणे! आमच्या नाशार्थ ह्या कपटी राक्षसांनीं काय नाटक आरंभिलें आहे, कोणाला माहीत! लक्ष्मण तिला जरी बरोबर घेऊन येईल तरी चागलें होईल. काय हा हेमवर्ण हरिण माझ्या हेमवर्ण स्त्रीस हरणरूप होणार!

इकडे ती भय उत्पन्न करणारी वाणी सीतेच्या कर्णरंध्रीं पडतांच ती म्हणाली, " भावोजी, धांवा लौकर! ऐकिलतना हे प्रणनाथाचे शब्द! प्राणनाथ आपल्याला तिकडे हांका मारीत आहेत. तेव्हां ते निःसंशय महत्संकटांत सांपडले आहेत! जा लौकर! तुह्मी ही हांक ऐकून अजून अगदीं स्वस्थ कां? मी अगदीं भयभीत झालें आहें. सर्व शरीर कांपत आहे. स्पष्ट बोलतां येत नाहीं. अंतःकरण अगदीं दाटून गेलें. धांवा तर मग! मला कांहीं सुचत नाहीं!

**लक्ष्मण**—मातृश्री, मींही ते शब्द ऐकिले. ते माझ्या प्रियबांधवाच्या मुखांतील शब्द असते तर मी ह्या स्थळीं क्षणभर तरी उभा राहिलों असतों काय? हे कोणा कपटीराक्षसाचे शब्द आहेत, अशी माझी पक्की खात्री आहे. माते, तू रामाचें लोकोत्तर सामर्थ्य जाणतेस. मग त्याला विपत्तींत घालणरा असा त्रिभुवनांत तरी कोणी असेल असें तुला वाटतें काय? रामचंद्रानें हजारों राक्षसांचा फडशा उडविल्यामुळें आह्मास ते दुष्ट कपटजालांत गुंतविणार आहेत. तेव्हां आतां फार सावध राहिलें पाहिजे. बुद्धि भ्रष्ट होऊं देतां नये. मोहाला लांब ठेविलें पाहिजे. हट्टाचा विटाळ मानला पाहिजे. तेव्हां मी तीकडे जात नाहीं. तुझ्या रक्षणार्थ मी येथेंच राहतों. रामचंद्राविषयीं तू किंचितही काळजी करूं नको. त्यानेंही मला सांगितलें आहे कीं ह्या पर्णशाळेच्या बाहेर कोठें जाऊं नको. आतां माझा प्रियबंधु येईल. रामचंद्राचा पराक्रम मी पूर्णपणें जाणतों, तेव्हां मी तिकडे जात नाहीं. वाहिनी, ह्याबद्दल तू मला क्षमा कर.

**सीता**—( रागानें ) प्रत्यक्ष प्राणनाथ तुह्मांस " मी मोठ्या संकटांत आहें, धांव लौकर धांव " ह्मणून दीन होऊन साहाय्यार्थ हांक मारीत असतां तुह्मांस हें बोलणें कसें रुचतें? अहो, प्रत्यक्षापुढें व्यर्थ तर्क काय कामाचे? तुह्मी लौकर जा येथून. धांवा धांवा, मी येथें एकटी राहतें.

प्राणनथाच्या रक्षणार्थ नजातां माझें येथें रक्षण करणें करतां ! मी आपलें रक्षण करीन. मला भीति कसली! अहो, तुह्मी बंधूना? हेंच काय तें तुमचें बंधुत्व! हेंच काय तुमचें लोकोत्तर व निरुपम बंधुप्रेम ! हेंच काय तुमचें साहाय्यतें ! व आशा करितांच काय अयोध्येहून प्राणनाथाबरोबरें रानांत निघालां! आतां बोलूं नका. निघा लौकर. मी आतां तुमचें कांहींही भाषण ऐकावयाची नाहीं.

**लक्ष्मण**—मातृश्री, आपण मजवर किती जरी रागें भरलां, तरी मला त्यापासून मुळींच वाईट वाटावयाचें नाहीं. ज्याच्या योगानें आपणावर भयंकर प्रसंग गुदरणार, असें मला स्पष्ट वाटत आहे, तें कृत्य मीं कसें बरें करावें? तेव्हां तुह्मी कांहीं ह्मणा, मला येथून जाणें निर्भय दिसत नाहीं. त्यामुळें मी जात नाहीं.

**सीता**—(रागानें लाल होऊन) अरे शून्यहृदया, निर्दया, दुष्टमते, तुझ्या ज्येष्ठ बंधूवर असा भयंकर प्रसंग गुदरला असतां, येथें लांब लांब गोष्टी कसल्या सांगतोस? अधमाधमा, नरपशो, आज तुझा आह्मांबरोबर वनांत येण्याचा खरा हेतु मीं जाणला! कामांधा, माझा अभिलाष धरून येथें आलास,नाहीं? तो अभिलाष पूर्ण करण्यास हा योग्य प्रसंग आहे असें,नीचा, तुला वाटतें काय? तेव्हां बंधूवर संकट येऊन त्या संकटाला ते वश व्हावे ही तुझी मनःपूर्वक इच्छाना? अरे! माझ्या ठिकाणीं कामबुद्धि धरून बंधूचा वध व्हावा, असें इच्छिणें हेंच काय, कपट्या, तुझें सर्वत्र गाजणारें अनुपम भ्रातृप्रेम! व माझ्यावर असणारी मातृबुद्धि! कपटपटो, तुझ्या हृदयांतच सर्व कपट भरलें असल्यमुळें तूं सर्व जगत् कपटमय पाहतोस! तो हरिण कपटमय ! त्यांनीं हाक मारली ती सुद्धां कपटमयना! अरे ह्या रामांगनेला हात लावील,असा जगांत आपलें तळपट इच्छिणारा कोण नांदत आहे! तूं तिकडे जा किंवा न जा, माझ्या दृष्टीसमोर उभा राहूं नको!

**लक्ष्मण**—माते, आपल्यासारख्या पवित्रान्तःकरण स्त्रीच्या मुखांतून अशी कधीं न ऐकिलेली कर्णकठोर वाणी कशी निघाली! खरोखर आज धेनूच्या कासेंतून वत्समुखीं विषधारा पडली! आजचा दिवस कांहीं विलक्षणच वाटतो. भवितव्याप्रमाणें बुद्धि सुचणार. त्याला कांहीं कोणता उपाय नाहीं. देवि, ज्या विलक्षण मोहाच्या योगानें तूं रामाला हरिणामागें

पाठविलेस तोच तुझा मोह रामापाठीमागें मला पाठवीत आहे. गृहामध्यें विरोधभाव उत्पन्न होणें, हें नाशाचें कारण होय, असें व्यवहारचतुरांचें ह्मणणें आहे. असो; तुझी फारच इच्छा आहे ह्मणून मी प्रियबांधवाकडे जातों. पण मातृश्री, आपण सावध असावें. कोणत्याही कारणानें पर्णकुटिकेच्या बाहेर जाऊं नका. कोणी आल्यास रामचंद्र आतां येतील, बसा, ह्मणून सांगा. वहिनी, पण "लक्ष्मणा, जानकीला टाकून तूं इकडे कां आलास?" असें राम ह्मणणार नाहीं काय? पण आतां शंका काढीत नाहीं. तुमच्या आग्रहामुळें मी तिकडे जातों. कोणाचाही विश्वास धरूं नका. तुह्मी जें मला बोललांत तेणें करून मला वाईट वाटावें हें खरें, परंतु ह्या बोलण्यानें आपले प्राणप्रियावरील अप्रतिमप्रेम आपण व्यक्त केलेंत, ह्मणून मला आनंदच झाला आहे. खोटा ग्रह फारवेळ टिकत नाहीं. मी आतां विशेष बोलून आपली आणखी अवकृपा करून घेत नाहीं.

असें ह्मणून तो निष्पाप लक्ष्मण जानकीला नमस्कार करून कांहीं पावलें चालल्यावर पुनः परतून "माते सावध ऐस. रामाविषयीं काळजी करूं नको" असें बोलून निघाला.

ह्याप्रमाणें लक्ष्मण गेल्यावर त्या पर्णशाळेंत सीतादेवी एकटीच राहिली. प्राणप्रियाला यावयास बराच वेळ लागला, व लक्ष्मण भावोजींवर जी तिनें आग पाखडून अपशब्दांची वृष्टि केली, त्यामुळें पश्चात्तापानें तिच्या मनाची फारच विलक्षण स्थिति झाली! तिला चैन पडेना! क्षणांत बाहेर अंगणांत येई, क्षणांत आंत जाई, तिला क्षणांत आपण महदपराध केला असें वाटे. क्षणांत आपल्याला वेड लागणार असें म्हणे, क्षणांत बुद्धि भ्रष्ट झाल्याचा तिला संशय येई, क्षणांत डोळ्यांतून उष्ण अश्रु काढी, क्षणांत रामलक्ष्मण आले किंवा नाहींत तें पाही, क्षणांत मी आज काय केलें हें, असें तिला वाटे, क्षणांत चकित होऊन इकडे तिकडे पाही! अशा अनेक वृत्ति तिच्या चेहऱ्यावर क्षणोक्षणीं दृष्टीस पडत आहेत! व त्या प्रमाणें तिच्या हातून कांहीं व्यापारही होत आहेत. इतक्यांत "आंत कोण आहे?" असें विचारणारा कोणीएक मध्यमावस्थेचा भिक्षु तेथें आला! त्याचा तो जटाभार, बेंबीवर पडणारी लांब लांब दाढी, तिच्याखालीं लपणाऱ्या त्या अनेक रुद्राक्षांच्या

माळा, हातांतील लाल कमंडलु व स्मरणी, पायांतील खडावा! अंगावरील विस्तीर्ण व्याघ्रचर्म, ह्यांचे योगानें तो तेव्हांच दर्शनीय व आपल्याविषयीं पूज्यभाव उत्पन्न करणारा असा दिसे! तो प्रश्न संपतो आहे, इतक्यांत जनकनंदिनी बाहेर येऊन मोठ्या औत्सुक्यानें " यतिमहाराज, ह्या आसनावर बसावें. उदक पाहिजे आहे काय? अथवा फलाहाराची इच्छा आहे काय? आपण कोण व आपलें किमर्थ इकडे आगमन झालें?" असें ह्मणाली. त्याच्या तोंडांतून त्यावेळा वेदपठन चाललें होतें, व त्याचा जसा काय अर्थच तिला पाहतांच त्याच्या मनांत आला! तो हा कीं—ही तेजानें खरोखर विद्युल्लता आहे! त्रिभुवनजठरांतही हिला उपमा द्यावया सारखी दुसरी स्त्री नाहीं! काय ही हिची लोभनीय रूपसंपत्ति तरी! ह्या हिच्या संपत्तीपुढें दुसरें सर्व वैभव तुच्छ आहे! पंचवीस वर्षांपूर्वी मिथिलेमध्यें स्वयंवरसमयीं जें हिचें रूप दिसलें, त्यापेक्षां आतां ही किती तरी मनोहर दिसते! हिचा प्रत्येक अवयव सुंदर आहे. अर्थात् ही सर्वांगसुंदरी आहे. अहाहा! हें मानवरत्न भोग्य आहे. अरेरे! हें भलत्याच्याच हातीं गेल्यामुळें भलत्याच ठिकाणीं पडलें आहे! जनकाच्या घरीं माझी मानहानि झाली तिचें कारण हीच स्त्री होय. हिला पाहतांच अन्तःकरण अगदीं भ्रमिष्ट होतें. अशी ही एकान्तांत मिळणें कठिण. ह्मणून जो हेतु धरून मी येथें आलों आहें, तो पूर्ण केलाच पाहिजे. तो ह्मणाला " हे स्त्रिये, तूं कोण आहेस, हें मला समजलें आहे. दशरथपुत्र रामलक्ष्मण येथें तुजसहवर्त्तमान राहतात, हें मला ठाऊक आहे. त्यांचे दर्शनार्थ किती दिवस येणार ह्मणून ह्मणत आहें, तो योग आज सहज आला. परंतु ते कोठें दिसत नाहींत. ते कोठें गेले आहेत? आणि केव्हां येतील? हें कृपा करून सांगावें. अजून हा आपला वनवास संपला नाहीं काय? मला वाटतें आतां संपला."
ती ह्मणाली. " ते मृगयार्थ बाहेर गेले आहेत. लौकर येतील. तेथपर्यंत बसावें. यतिराज, मला वाटतें वनवास अजून वर्ष सवा-वर्ष आहे. तोच आतां कठिण व त्रासाचा आहे." तो ह्मणाला " असें कां बरें! जनकनंदिनि, तुझ्या ह्या रूपाला वनांत वास, असें एकटें राहणें, वेळेवर भोजन नाहीं, राजविलास नाहींत, दगडांच्या शेजारीं मृगाजिनावर शय्या, सर्वकाळ काळजी, हें सर्व पाहून आ-

ह्मांसारख्यांनाही फार वाईट वाटतें. चारुवदने, तुझ्याच दर्शनानें मी कृतार्थ झालों. जानकि, जेथें भयंकर राक्षस राहतात, तेथें तुला एकटीला राहणें कसें आवडतें! सुंदरि, मला थोडी क्षुधा लागली आहे. तर कांहीं थोडा आहार करावा अशी इच्छा आहे." असें ह्मणतांच तिनें कांहीं चांगलीं चांगलीं फळें व आपल्या अन्तःकरणाप्रमाणें स्वच्छ उदक, त्याच्यापुढें ठेविलें. तेव्हां त्यानें तिच्याकडे पाहतांच तिला हा भिक्षु कपटी राक्षस असावा असें वाटलें, व आपण भिक्षु नव्हे असें आतां हिला वाटलें असेल असें त्यासही वाटले. नंतर आहारवगैरे कांहीं न करितां, तो ह्मणाला "जानकि, क्षणांत तुझी अशी साशंक व कावरीबावरी मुद्रा कां दिसते बरें? मी कोण व कशासाठीं आलों आहें, हें तुला समजलें ह्मणजे तुझी सर्व भीति जाईल. मी लंकाधीश, राक्षसांचा राजा दशानन रावण आहें. तुला त्या सुंदर नगरींत न्यावयाला आलों आहें. रामलक्ष्मणांला बाहेर घालवून तूं येथें अशी एकटी राहावी, ही युक्ति कोणीं काढिली? मींच. तो कांचनमृग नव्हे. तर तो माझा सेवक मारीच राक्षस आहे. तुला आतां मी लंकेंत नेणार. तुजसाठीं जवळच माझें सुंदर पुष्पकविमान तयार आहे. त्यांत बसून जावयाचें बरें! विमानविहार तुला कधीं तरी ठाऊक आहे काय? आतां मी अधिक कांहीं बोलत नाहीं. आकाशमार्गक्रमण करीत असतां मी तुला माझ्या मधुर वाणीनें तृप्त करीन व तूंही मला कर. प्रिये, अग हे सौंदर्यलतिके, स्वप्नांतही न दिसणारें सुख तुला त्या वैभवयुक्त नगरींत मिळेल! मग तुला गतायुष्याचा पश्चात्ताप होईल." असें बोलून तो तिला धरावयास जाणार इतक्यांतः—

**सीता**—मूर्खा, अधमा, चोरा, चांडाळा, निर्लज्जा, तूं कपटी आहेस, असें समजतांच मीं तुझ्या बोलण्यांकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं. मी पतिच्या चिंतनेंत व लक्ष्मण भावोजी केव्हां येतात, ह्मणून मनन करीत होतें. चोरा, हाच काय तुझा पराक्रम तो-कीं पति जवळ नसतां त्याच्या स्त्रीचें हरण करावें! दुष्टा, तुझ्याशीं अधिक काय बोलावें? मी बऱ्या गोष्टीनें सांगतें कीं, मला स्पर्श करूं नको. ह्यांत तुझें कल्याण आहे. मदांधा, आपल्या वैभवास व जीवितास कां कंटाळलास! लंकेला कां अग्नि लावीत आहेस? आपल्या कुळाचा कां उच्छेद करितोस? मला

स्पर्श करणें ह्मणजे मृत्युदेवतेला बळकट कवटाळणें अथवा विषवल्लीच्या रसाचें सेवन करणें अथवा रखरखीत इंगळांनीं भरलेल्या होमवेदींत उडी टाकणें होय. विचार कर, विचार कर, विचार कर! मन आवर, विभवश्रीस प्रस्थान करूं देऊं नको. काळाचें आमंत्रण अजून परतीव. सिंहपत्नीला डंवचून जंबुक कधीं तरी जीवन्त राहील काय?

**रावण.**–तूं मोठी वाचाळ आहेस. तूं आपल्या वाणीनें मला संतुष्ट करशील ह्यांत संशय नाहीं. राज्य सोडून वनांत बायको घेऊन भटकणें, हाच काय तुझ्या पतीचा पराक्रम तो?

असें ह्मणून त्यानें तिला स्कंधावर घेऊन, जवळच जेथें रानांत विमान ठेविलें होतें, त्यास्थानीं नेलें व त्यांत तिला बसविलें. त्याची आज्ञा होतांच विमानचलकांनीं तें एकदम गगनमार्गें चालविलें. विमान तेथून वर उडवितांच त्या विस्तीर्ण व निबिड अरण्यांत पक्ष्यांनीं किलकिलाट करून सोडला व ते हिकडे तिकडे भ्रमण करूं लागले! सिंहव्याघ्रादिप्राण्यांनीं तें रान आपल्या भयंकर गर्जनांनीं दुमदुमित केलें! वनगजांचे कळपही चोहोंकडे धांवत असतां वनाचा विध्वंस करूं लागले! हरिणांसारखे पशु भयभीत होऊन सैरावैरा पळूं लागले! सारांश, तेथें फारच धामधूम उडाली. तेव्हां सीतेनें निराश होऊन फारच शोक मांडला. "अहो दशरथात्मज प्राणनाथ, अहो निष्पाप लक्ष्मणभावोजी, तुम्हीं यासमयीं कोठें आहां? मला आपणांस दुष्ट हरिणाच्या मागें घालविण्याची कशी दुर्बुद्धि उपजली? व तुह्मीं ती कशी ऐकिली? भावोजी, तुह्मांस बोलूं नये तें मीं बोललें. त्याचाच काय हा तत्काळ परिणाम! अहो बंधूंनो, ह्यावेळीं ह्या अबलेचे शतशः अपराध असले तरी त्यांची क्षमा करून ह्या दुष्टापासून मला सोडवा हो! मग तुह्मीं मला माझ्या अपराधाबद्दल काय ती कडक शिक्षा करा. मी ती आनंदानें भोगीन. भावोजी, जर तुह्मांस वाटत होतें कीं "मीं गेलों असतां जानकीवर कांहीं अरिष्ट येईल," तर मग तुह्मीं तिकडे कां बरें गेलां? काय ही बायकांची बुद्धि! मला वाटतें तुह्मी प्राणनाथाकडे गेलां नसाल! माझ्या रक्षणार्थ पर्णकुटिकेच्या जवळपास कोठें तरी असाल व हिच्या दुष्ट वाणीस हीच शिक्षा पाहिजे असें ह्मणून रागानें थोडा वेळ स्वस्थ बसले असाल! परंतु भावोजी, स्वस्थ बसण्याची ही वेळ नव्हे. थोडा वेळ निघून गेला. तुह्मांस हात जोडितें. माझा अन्त पाहूं नका. मला गाईला, ह्या खाटिका-

च्या हातून सोडवा. खालून ह्या विमानावर करा बाणवृष्टि! हाय! हाय! ह्या पश्यतोहरानें विमान मोठ्या झपाट्यानें चालविलें आहे! प्रातःकाळापासून माझी मनोवृत्ति कांहीं विलक्षणच झाली होती! आज कांहीं तरी अनर्थ व्हावा असाच आजचा उदासीन दिवस दिसत होता! प्राणनाथ, माझ्या प्राणांचे तुह्मी नाथ ना? मग हा दुष्ट माझे प्राण घेऊन चालला ना! उद्यांच कींहो आह्मी मोठ्या आनंदानें अयोध्येस जावयास निघणार होतों! परंतु आजच तिघांचा वियोग झाला! दैवदुर्विपाकापुढें काय चालणार! प्राणनाथ, अहो भावोजी, मी पर्णशाळेंत नाहींशी पाहून तुमची काय दशा होईल बरें? काय काय तुह्मी कल्पना काढाल? काय ह्मणाल? कोठेंजाल? माझा कसा शोध लागेल? माझा शोध लागल्यावर मी कोठेंही असलें तरी मला तुह्मी न्याल, असें लोकोत्तर सामर्थ्य व पराक्रम आपल्यामध्यें आहे, हें मीच पूर्णपणें जाणतें असें नाहीं, तर हा चौर्यकर्म करणाराही जाणतो. आणि ह्मणूनच तुह्माला भिऊन तुमच्या परोक्ष ह्यानें हें नीचतम व निंद्य कृत्य केलें! मी इतकी निरपराधिनी आहें व आपण इतके शुद्ध अहां कीं ह्या रानांतील पशुपक्षिकीटकवृक्षसुद्धां तुह्मांस मला अमुक चोरानें नेली म्हणून सांगतील! माझी तुह्मी मुक्तता करालच, पण लौकर करा हो. ह्या चोराला आतां जगांत राहणें इष्ट वाटत नाहीं. आपल्या प्रजा सुखांत नसाव्या अशी ह्याची इच्छा आहे. आप्त, संबंधी, पुत्र, पौत्र, ह्यांचें तळपट कधीं होईल, तो सुदिन समजून तो कधीं येतो ह्मणून हा वाट पहात आहे! जी नगरी आज मंगलवाद्यांनीं दुमदुमत असेल ती विधवांच्या विलापशब्दांनीं कधीं एकदां नादित होते आहे, ह्या काळजींत हा घातकी आहे! अहो! मी वनांत आलें ह्मणून तुह्मांवर हे अनर्थ गुदरले व अनेक संकटें आलीं. परंतु काय करूं? वनांत आलें ह्मणून आजपर्यंत तरी मी जीवन्त राहिलें! हाय! हाय! प्राणप्रिया, पतिवियोगाग्नीच्या ज्वाला मला एव्हांच ताप देऊं लागल्या! आतां पुढें काय होणार? प्रियप्राणनाथ, मी आतां डोळे झांकून तुमची मूर्ति पाहतें, आणि मुख उघडल्या शिवायव कोणास ऐकूं गेल्यावांचून हवातितका शोक करून तुह्मांस हांका मारितें." ह्याप्रमाणें ती शोकाकुल होऊन बोलत असतां अनुकूल वारा नसल्यामुळें विमान मंद गतीनेंच चाललें होतें. तें विमान फारच मोठें ह्मणजे दोन चार मज-

त्याच्या घराएवढें विस्तीर्ण व उंच होतें. त्यांत अनेक सोई असून पुष्कळ लोक बसतील असें होतें. तें फार सुंदर व शृंगारलेलें होतें. त्याचें कौशल्य पहाण्यासारखें होतें. त्यास अनेक गवाक्षें होतीं. किणकिण वाजणाऱ्या त्याला लहान लहान सुवर्णघंटिका होत्या. त्या वेळेस हवेंतून विमान नेण्याची युक्ति पूर्णत्वाप्रत पोंचली होती, असें दिसतें. वातावरणांतील नानाविध वायूंचे नानाप्रकारचे प्रवाह,त्यांच्या सूक्ष्म गति,ह्यांचें त्या वेळीं यथास्थित ज्ञान असल्यावांचून अंतरिक्षमहासागरांतील ही विमाननौका,वाटेल त्या गतीनें,ह्मटल्या ठिकाणीं,अमुक वेळीं, कशी नेतां आली असती? श्रोतेहो, इतक्या शीघ्र गतीनें जाणारें वाहन ह्या यांत्रिक काळांतही अद्यापि झालें नाहीं,परंतु विमान तयार करून तें उडविण्याचे प्रयत्नांत हे परद्वीपस्थ लोक आहेत, असें मी नुक्तेंच कोठेसें ऐकिलें होतें! असो. हें पुष्पकनांवाचें विमान चाललें असतां त्याच वनांत एका पर्वताच्या शिखरावर असणाऱ्या गृध्रराज जटायूची त्याजकडे दृष्टि गेली. हा पक्ष्यांचा राजा फारच मोठा असून ह्याचे अंगीं विलक्षण सामर्थ्य होतें. हा फारच वृद्ध असल्यामुळें साक्षात् तपस्वीच भासे! ह्या विमानावर त्यानें मोठ्या जोरानें झडप घालतांच तें भूमीवर आदळलें. रावण बाहेर येतांच त्यास आपल्या तीक्ष्ण शस्त्रासारख्या चोंचीनें जर्जर केलें! तेव्हां असें वाटलें कीं हा पक्षिराज रामचंद्राचा कोणी आप्त,संबंधी किंवा जिवलग मित्रच आहे! ह्मणून तर सीतेस सोडविण्याकरितां यानें हा प्रयत्न चालविला आहे! श्रोतेहो, बुभुक्षित सिंहांनीं सुद्धां आपल्यावर उपकार करणाऱ्या मनुष्यांस न मारतां त्यांचे पाय चाटले आहेत, अशा ह्या युगांतही नुकत्याच झालेल्या गोष्टी आपण ऐकिल्या आहेत! त्या दोघांची बराच वेळ खटपट चालली! शेवटीं त्या युद्धांत रावणानें त्या पक्ष्याचे पंख तोडून त्यास आसन्नमरण करून सोडिला. त्या स्थितींत असतां दयाशीलवती रामस्त्री त्यास ह्मणाली, "हे पक्षिराजा, तूं धन्य आहेस, हें अधमाधम कृत्य तुलाही आवडलें नाहीं! मला ह्या चोराच्या हातून मुक्त करण्याकरितां आपले प्राणही खर्चिलेस! साधो, तुला मरणोत्तर मोक्षसुख मिळो! शेवटीं, हे परोपकारिन्,माझी इतकीच तुला विनंती आहे कीं, माझे प्राणनाथ व भावोजी माझ्या शोधार्थ क्रोधयुक्त व शोकाकुल होऊन फिरत असतील, त्यांस हें सर्व वृत्त कळीव." असें ती बोलत आहे

तों त्या दशाननानें तिला पुन: विमानांत घालून तें विमान झपाट्यानें चालविलें! तिला पर्णकुटिकेंत खांद्यावर घेण्यापूर्वीच त्यानें भिक्षुरूप सोडलें होतें! वारा अनुकूल ह्मणजे उत्तरेकडून वहात असल्यामुळें तें शीघ्रगतीनें चाललें होतें. आपली पवित्र चारित्रनायिका मधून कधीं मधीं डोळे उघडी, तरी ती अधोमुख असे. कधीं गवाक्षांतून आपल्या वसुमतीमातेकडे पाही. विमान पृथ्वीतलापासून फारच ऊंच व कधीं जवळ असे. विमानवेग केव्हां शीघ्र केव्हां मंद असे. मंदवेग असतां एक पर्वत तिच्या दृष्टीस पडला. त्यावर कोणी तरी मनुष्य रहात असतील असें तिला वाटलें. ह्मणून तेथें तिनें थोड्याशा अलंकारांची जवळ असलेली पुरचुंडी खालीं टाकिली! अशा करितां कीं, रामलक्ष्मण ह्या भूभागीं सुदैवें करून आल्यास त्यांस हे आपला थोडा बहुत तरी शोध सांगतील. नंतर तें विमान वायूसारखें जलद चाललें असतां रावण तिला बोलूं लागला " अग हे सौंदर्यसरिते, त्या वेळेस तूं रागांत होतीस ह्मणून अविचारानें काय पाहिजेल तें बडबडत होतीस! परंतु त्या बोलण्याचा आतां तुला पश्चात्ताप होत असेल, नाहीं बरें? तूं कोणतेंही कृत्य रागाच्या सपाट्यांत करितेस आणि मग तुला पश्चात्ताप होतो असें दिसतें! लक्ष्मणाच्या संबंधानें तुला अनुताप वाटला, तसाच माझ्या संबंधानेंही आतां तुला होतअसेल! साधारण स्त्री जरी असली तरी प्रथम प्रसंगीं तिनें असें प्रतिकूलच भाषण केलें पाहिजे. त्यांत तूं तर पतिव्रता ह्मणून जगांत गाजलेली आहेस, मग तुला कांहीं वेळ तरी प्रतिकूलता दाखविणें योग्यच आहे. परंतु तुझ्या पातिव्रत्याची व प्रतिकूलतेची सीमा दशाननदर्शनापर्यंतच होती हें खास समज. अग, माझें वैभव तुला क्षणांत अनुकूल करील! शेवटीं वश होणें असलें तरी अगोदर ओढून ताणून धरणें, हें कामशास्त्रांतील मुख्य तत्व आहे काय? भामिनी, विद्युल्लता कडाडली ह्मणजेच उदकप्राप्ति होते, हें मला कळतें. तर आतां औदासीन्य टाक. तुला लंकानाथ प्रसन्न झाला आहे, काय पाहिजे तें माग. आपली इच्छा पूर्ण करून घे. तुझा आज वनवास सरला. विपत्तीचे दिवस लयास गेले. आतां खेद करूं नकोस. दुर्दैवानें सर्वांसच ग्रासिलें आहे. पहा तुजसारखें स्त्रीरत्न आणि त्या पराक्रमविहीनाला-अरण्यांत भटकणाऱ्याला प्राप्त होऊन त्याची ही दुर्दशा व्हावी!

काय? सुंदरि, त्या अरण्यांत भ्रमण करणाराच्या संगतीनें तुझ्या मधील रसिकता, औत्सुक्य, इत्यादि गुण अगदींच अस्ताप्र गेले आहेत. त्यांचा हे चंद्रानने, आतां रमणीय लंकाप्रदेशावर प्रकाश पाड. तेंच स्थळ तुला प्रभा पाडण्यास योग्य होय.

**सीता**—निर्लज्जा, तूं आपला कोडगेपणा अजून सोडीत नाहींस! तुझ्या बरोबर बोलणें म्हणजेच मोठें पातक होय! तूं तरी काय करशील? तुझी नष्टदशाच आली. तुझ्या शत्रूंचें आतां पुण्य उदेलें. तुझी ही विपरीत बुद्धि तुझ्यावर काय काय भयंकर प्रसंग आणील ह्याचा आज तर्क सुद्धां करितां येणार नाहीं! मुखा, ह्या नखाचासुद्धां तुला लाभ होणें नाहीं, मग सर्व शरीराची गोष्ट कशाला? मला वाटत होतें कीं, माझा प्रियपति व विमलचित्त दीर लक्ष्मण ह्यांनीं, वनांत येऊन करावयाचें तें कृत्य केलें. नाहीं. परतु त्यांचें कर्तव्य अद्यापि पुष्कळ राहिलें आहे. तुज सारखे अजून दुष्टबुद्धि व मदांध जगांत जीवंत आहेत, त्यांचा नाश करणें हेंच त्यांचें वनांत येण्याचें मुख्य कारण दिसतें. आजपर्यंत त्यांनीं हजारों राक्षस मारिले, हें कर्म तुझ्या नाशरूप महाग्रंथाचें प्रथम पृष्ठ होय! मतिमंदा, आतां माझ्याशीं बोलूं नको. मी मोठ्या कष्टानें व महद्दुःखानें तुझ्याशीं भाषण करितें.

**रावण**—विमानाच्या अत्यंत वेगाची तुला कधीं सवई नसल्यामुळें, हे मृद्वंगि, तूं अत्यंत श्रांत झालेली दिसत आहेस. त्यामुळें तूं हें असें बोलत आहेस एकदां कां ती विलासनगरी लंका तुझ्या दृष्टीस पडून माझ्या त्या कामोद्दीपक, विस्तीर्ण, सुंदर व रमणीय मंदिरांत तूं प्रवेश केलास, म्हणजे मग तुझीच कोमल विनंती मला ऐकावी लागेल! आणखी पहा, असा स्वभावच आहे कीं नवें वस्त्र परिधान करावयास मिळालें तरी जुन्याचा लोभ सुटत नाहीं! कारण कीं त्या वस्त्राशीं फार दिवसांचा संबंध असतो. त्याप्रमाणें अजून त्या वनांत भटकणाऱ्याचा लोभ तुला सुटत नाहीं! परंतु तो आतां लंकादर्शन होतांच अपोआप सुटेल.

ह्या प्रमाणें तें विमान अनेक पर्वत, नद्या, सरोवरें वगैरे भूभाग ओलांडून नंतर दक्षिणसमुद्रावरून जातां जातां लंकाप्रदेशीं प्रातःकाळीं आलें. नंतर तें केव्हांच मुख्य लंकानामक राजधानींत येऊन उतरलें.

# उच्छ्वास पांचवा.

श्रोतेहो, ही पहिली प्रत्यक्ष कुबेराची राजधानी असून रावणानें त्याच्या पासून हरण करून आपल्या अतुल पराक्रमाच्या योगानें आणखी तिला फारच वैभववती करून सोडिली होती. तेथील फारच उंच घरें, विस्तीर्ण रस्ते, अनेक व्यापारस्थळें, उंच उंच शिवमंदिरें, नानाविधक्रीडास्थानें, विस्तीर्ण उपवनें, अनेक उच्च द्वारें, मोठमोठे तट, इत्यादिकांच्या योगानें फारच मनोहर दिसणाऱ्या त्या नगरीकडे ज्यापेक्षां आपल्या परमदुःखित चरित्रनायिकेनें पाहिलें नाहीं. तेव्हां मीही ह्यावेळीं तिच्या वैभवाकडे व तेथील लोकांकडे लक्ष न देतां पुढील सीतावृत्तनिवेदनास मोठ्या दुःखानें प्रारंभ करितों.

लंकानगरीच्या ह्या प्रदेशीं विस्तीर्ण मैदानांत तें विमान उतरतांच तेथें अनेक अधिकारी व सेवकगण आले. सेवकवर्गामध्यें स्त्रियाही पुष्कळ होत्या. नंतर तेथें तयार असलेल्या एका सुंदर रथावर सीतेला स्त्रीसेवकांनीं राजाज्ञेनें बसावयास सांगितलें. ती निरुपायास्तव त्यांत बसली. तेथें असलेल्या मंत्रिजनांस रावणानें " ही स्त्री त्या रामाची होय. खरादिराक्षसांस ह्यानेंच मारिलें. " इतके सांगतांच त्यांनीं आपल्या महाराजांच्या पराक्रमाची फार स्तुति केली. त्यांची ह्या रावणाच्या सांगण्यावरून त्या बंधूंस मारून ह्यानें ही स्त्री येथें आणिली, अशी तत्क्षणीं समजूत झाली. व ही समजूत चोहोंकडे हां हां ह्मणतां पसरली! रथ नगरींतून चालला असतां दशानन महाराजांचें प्रजांनीं स्तोत्र चालविलें होतें. तरी कित्येकांस त्या अधोवदन शोकाकुल व असाहाय्य विदेशीं आलेल्या स्त्रीस पाहून फार वाईट वाटलें! व हिजवर कामवासना ठेवणाऱ्या आपल्या महाराजांवर केव्हां काय प्रसंग येईल ह्याचा नेम नाहीं, असेंही कित्येकांचे अंतःकरणांत आलें. कित्येकांचे तर तोंडांतून असे उद्गार निघाले, कीं " ही स्त्री आपल्या महराजांनीं चौर्यकर्म तर करून आणिली नसेलना?" ह्या प्रमाणें तो रथ त्या नगरीच्या मध्यभागीं असलेल्या अत्यंत मनोहर अशा एका उपवनांत येऊन थडकला. तेथें मोठमोठे उंच प्रासाद, अनेक विलासमंदिरें, क्रीडागारें व अंतःपुरें होतीं. अगोदर स्त्रीसेवकांनीं जानकीला उ-

तरून नंतर रावण रथांतून उतरला. नंतर त्यानें तिला एका विस्तीर्ण व रम्य मंदिरांत न्यावयास सांगून अनेकदासी तिच्या सेवेस ठेविल्या. त्यांस अशी आज्ञा केली कीं "ह्या स्त्रीची तुह्मीं उत्तमप्रकारें सेवा करा; ही जें कांहीं काम सांगेल तें तत्क्षणीं ऐका. जें कांहीं मागेल तें विलंब न करितां द्या; जें कांहीं विचारील तें तेव्हांच सांगा; हिचा वेळ आनंदानें जाईल अशारीतीनें हिच्याशीं वागा; माझ्या वैभवाविषयीं, माझ्या पराक्रमाविषयीं, वारंवार हिला कथन करा; हिला कोठें कांहीं पाहावेसें वाटलें तर लगेच दाखवा; ऐकण्यासारखें ऐकिवा; उपभोग्य वस्तू देत जा; अनेक अलंकार दाखवा व मागेल ते विलंब न करीतां द्या; खाण्याला कांहीं कमी करूं नका; मऊशय्या, अनेक सुवासिक पुष्पांचे हार, नानाविध सुगंध द्रव्यें ह्यांचा हिला येथेच्छ उपभोग घेऊं द्या. सारांश, हिची प्रसन्नता जेणेंकरून होईल असें हिच्याशीं आचरण ठेवा. कोणीही पुरुष इकडे येणार नाहीं अशी मी तजवीज करितों. जर कांहीं हिनें तुमच्या संबंधानें मजपाशीं कुरकुर केली तर तुह्मांस मी कडक शिक्षा करीन. हिच्या शरीरप्रकृतीस फार फार जपत जा. हिला ह्या परकीय स्थळीं थोडे दिवसही वाईट वाटेल असें करूं नका." ह्या प्रमाणें तो दासींस सीतेसमक्ष सांगत असतां, ती क्रोधानें लाल होऊन गेली होती! परंतु क्षमा, शांति इत्यादि ज्या तिच्या अदृश्य दासी तिजबरोबर होत्या त्यांनीं तिला सांगितलें कीं, " ह्यादुष्टाबरोबर वारंवार बोलण्याचा प्रसंग आणूं नको. ह्याला शिक्षा करणरा परमेश्वर सर्वज्ञ व समर्थ आहे. ह्याचे पूर्ण अपराध होतांच, तो पारिपत्य करीलच करील." नंतर रावण निघून गेला.

नंतर कांहीं वेळानें कांहीं चांगल्या सदयांतःकरणाच्या दासी जानकीजवळ येऊन त्यांनीं तिला तिचें इतिवृत्त पुशिलें. तिनें तें सर्व यथातथ्य सांगितलें. तेव्हां ही स्त्री मोठी साध्वी असून निरपराधिनी आहे, असें त्यांस वाटलें. व त्या ह्मणाल्या कीं "अह्मांस आपली दया येते, पण सेवाधर्मामुळें आमचा निरुपाय आहे." दुसऱ्या दुष्ट राक्षसीही कांहीं वेळानें तेथें आल्या. त्यांना हिजवर रावणाची कृपादृष्टि अर्थात् कामदृष्टि आहे, असें पाहून त्याला तिला वश होण्याकरितां अनेक बोधपर गोष्टी सांगितल्या. परंतु तिनें "ह्यासंबंधानें जर कांहीं कधीं मजपाशीं बोलाल तर

ह्याचा काय परिणाम होईल ह्याचा नेम नाहीं." इतकेंच बोलून मग त्यां च्याशीं तिनें मौन धरिलें.

ज्या मंदिरांत ती होती तें सर्व प्रकारें चांगलें होतें. तरी तें केवळ तुरुंगाप्रमाणें तिला वाटलें. त्यांत चांगला प्रकाश असता तिला सर्व अंधकारमय भासे; त्या सुंदर चित्रविचित्र भिंती तिला ढेकणांनीं भरलेल्या कुंडांप्रमाणें वाटत! ते दुष्ट दासींचे शब्द तिला चाबकाचे जणूं फटकारेच बसत! तिनें दोन चार दिवस स्नानाशिवाय कांहीं केलें नाहीं. "राम, राम " ह्या पतीच्या पवित्र नामावांचून ती कांहींच मुखांतून शब्द काढीना व भक्षण कांहींच करीना!

हें वर्तमान रावणास कळतांच आपल्या पुतणीस ह्मणजे बिभीषण-कन्येस तिच्या कुशल समाचारास पाठविलें. ती येतांच तिच्या अल्प भाषणांवरून व तिची ईश्वराचे ठिकाणीं अतोनात भक्ति, पतिचरणीं अप्रतिम प्रीति, परदुःखानें दुःखित होणें, सत्समागमेच्छा, इत्यादि तिच्या ठायीं असलेले गुण पाहून सीता देवीनें तिला, " प्रियसखि " असें संबोधन देऊन तिला मन मोकळें करून आपलें सर्व वृत्त सांगितलें. तें ऐकून बिभीषणाची कन्या ह्मणाली. "प्रियसखि जानाकि, तुझें इतिवृत्त ऐकून मला फारच गडे दुःख झालें आहे. पण काय करावें? परमेश्वर तुमच्यावर सुद्धां असले प्रसंग आणतोना! दुष्ट, निर्दय, कामानें गांजलेले अशांच्या लीलाजाळांत बिचाऱ्या सज्जनांनीं सांपडायाला त्यांनीं काय पातक केलें आहे? मला वाटतें जगतास आपल्या सारख्यांचीं पवित्र चरित्रें गातां यावींत ह्मणूनच तो जगदीश असे खेळ करितो! नाहींतर सदाचरणापासून कोणाचें कल्याण झालें व पापाचरण करून कोणाचा नाश झाला, हें जगतास दाखवायाचें असल्यास कसें दाखवावें! सखि, जो प्रसंग येईल तो मोठ्या धैर्यानें काढिला पाहिजे. तुझा पति व दीर महान पराक्रमी दिसतात. ते तुला ह्या संकटावस्थेंतून सोडवितील. भिऊं नको. ग्रहदशा संपली पाहिजे. ज्या पुरुषसिंहाबरोबर तू रानांत फिरत होतीस तो चौताळून येथें धांवत येईल! ह्मणून त्याच्यासाठीं तुला प्राण धारण केले पाहिजेत. तेव्हां तुला जीवितरक्षणार्थ कांहीं तरी थोडा बहुत आहार केलाच पाहिजे. ह्मणून उपवास काढू नको. तुला भक्षणीय वाटेल तेंच खा. फळें व उदक ह्यांस तर कोठेंही दोष नाहीं.

व त्यावरच तूं बहुतेक बारा वर्षे काढलीं आहेस! तर आपल्या प्राणपतीच्या प्राणरक्षणार्थ तुला कांहीं तरी खाल्लेंच पाहिजे.

सीता—प्रियभगिनी, मला वाटत होतें कीं, लंका ह्मणजे सर्व पापांचा बाजार! येथें सज्जनाची वसति कोठून? परंतु तसें नाहीं. तुजसारखीं येथें रत्नें आहेत. मला तूं जें आतां निर्मळ, मधुर व खरें असें भाषणामृत पाजिलेंस तेणेंकरून मीं तृप्त झालें आहें. ह्यापेक्षां दुसरें त्यां प्राणधारणार्थ तें काय भक्षावें? किंवा काय प्यावें! अशीच तूं मजवर नित्य कृपा कर, ह्मणजे मला फळें नकोत व उदकही नको. प्रियसखि, लंकेंत माझें येणें हें मी आपल्या अघोर पातकांची शिक्षा भोगणें समजत होतें, परंतु तें आज तुझ्या दर्शनानें अतुल पुण्याचें फळ मानितें! सखि, फलभक्षणाविषयीं व उदकपानाच्या संबंधानें जें मला तूं अत्यंत ममतेनें सांगितलेंस तें मला सर्वथैव मान्य आहे. व तूंच मला आप्त, मित्र, गणगोत व प्रियजन यांहून अधिक वाटत आहेस. कारण कीं अशा विदेशांत जिजवर राजाची वक्रदृष्टि आहे, तिजवर कोणीही कृपाकरणारें नसावयाचें. तुझें भाषण अत्यंत मनोहर असून हितप्रद आहे. सखि, तुझ्याजवळ गुप्त ह्मणून कांहींच ठेऊं नयेसें वाटतें! तुझे मजवर अनंत उपकार आहेत. अगे, तुझ्या ह्या कृपादृष्टीमुळें तुजवर जर लंकापतीचा राग होणार असेल, तर ह्या भानगडींत तूं पडूं नको. माझ्यामुळें तुला आणखी दुःख नको. मला मोठें आश्चर्य वाटतें कीं, चौर्यकर्म करणाऱ्या ह्या रावणाचा एक बंधु व त्याचें सर्व कुटुंब, हीं सर्व सत्वशील व न्यायी कशीं निघालीं? अथवा आश्चर्यासारखें तरी ह्यांत काय आहे? कालकूट व अमृत ह्यांची उत्पत्ति एकाच स्थळापासून आहे. बिभीषणराजकन्ये, मी तुझे पुनः पुनः उपकार मानितें.

बिभीपणकन्या—माझे एवढे उपकार मानायला, किंवा माझी एवढी स्तुति करायला, जानकि, मीं तुझें असें काय तरी हित केलें? काय मीं तुझ्या प्रियप्राणनाथाची भेट करून दिली? कीं ह्या स्थळाहून, तुला तुझा पति मुक्त करीपर्यंत, अन्य कोठें निर्वेधस्थळीं तुला नेऊन ठेविलें? कीं तुला राक्षसाधिपतीकडून होणारा त्रास कमी केला? केलें तरी काय? तुझ्या सद्गुणाला भुलून एखादा शब्द मीं तुला गोड

बोललें असेन, ह्याबद्दल काय ह्या राक्षसराज्यांत राहणारीचा—माझा एवढा गौरव करावयाचा? एवढें स्तोत्र गावयाचें? किंवा आप्तांहूनही प्रिय आप्त मला ह्मणावयाचें? जानाकि, ह्या तुझ्या भाषणानें तूं मात्र आपलें उच्च कुलशील प्रकट केलेंस! तें असो; आपलें वृत्त कथन करीत असतां शेवटीं जें तूं बोललीस कीं " ह्यानें दररोज माझी अगदीं पाठ पुरविली आहे. तेव्हां मला काय करूंसें झालें आहे. प्राण देण्याला सुद्धां कांहीं साधन दिसत नाहीं! " तर असें कांहीं भलतेंच साहस करूं नको. धैर्य न धरितां साहसच करावयाचें असतें तर भगवती अनसूयेनें तुला अंगास लावावयाचा अंगराग दिला असता काय? तेव्हां असलें साहस त्या महर्षिस्त्रीलाही संमत नाहीं. तूंच आतां ह्मणालिसना " जें कांहीं येथें माझ्या अंगीं विलक्षण धैर्य आलें आहे, तें त्या भगवतीच्या सर्व प्रसादाच्याच योगानें! " तर मी तुला एवढें गुह्यतम सांगतें कीं, ह्या महाराजांच्या हातून कालत्रयींही परस्त्रीवर बलात्कार म्हणून आतां व्हावयाचा नाहीं! कारण "दशानना, परस्त्रीवर बलात्कार करशील तर तत्क्षणीं तूं मरशील, "असा एकाप्रसंगीं अप्सरेनें ह्याला शाप दिलेला आहे. व तूंही महान् साध्वी आहेस. तेव्हां ह्याच्यानें तोंडानें बोलण्यापलीकडे कांहीं एक होणार नाहीं. आतां महाराजांचें बोलणें ऐकवणार नाहीं, हें खरें. परंतु तें धैर्य धरून ऐकिलें पाहिजे. जगांत कीर्तिकर असेंच तुझ्या हातून आचरण होईल, ह्यांत संदेह नाहीं.

**सीता**—प्रियसखि कले, तुझा हा उपदेशच मला आतां ह्या महत्संकटांत तारणारा आहे, असें मी समजतें. सखि, कधीं वेळ सांपडेल तेव्हां ह्या असाहाय्य मैत्रिणीस भेटत ऐस, बरें.

असें त्यांचें भाषण चाललें असतां बिभीषणकन्येनें कोणालाही जवळ येऊं दिलें नाहीं. नंतर ती कला तिचा निरोप घेऊन निघून गेली. तिनें सीतेचें माहात्म्य आपल्या पित्यास सांगितलें व तिकडे दररोज जाण्याची परवानगी मागून घेतली. पित्यानेंही रामाच्या पराक्रमाविषयीं व त्याच्या अनेक गुणांविषयीं तिला सांगून, " हिला लंकेंत आणल्यामुळें आपल्यावर विलक्षण अनर्थ गुदरून आपला सर्व प्रकारें नाश होईल, " असेंही आणखी तिला भविष्य सांगितलें.

नित्यशः प्रातःकाळीं तो दशानन त्या मंदिरांत येऊन दासीं-

पाशीं प्रथमतः सीतेच्या तब्बेतीविषयीं विचारपूस करून नंतर ति-च्याजवळ जाऊन तिला प्रसन्न करण्याविषयीं बोले. ती त्याला पाहतांच डोळे मिटी व राममूर्ति ध्यानांत आणी. आणि मुखानेंही तत्स्तुति करी. ह्यामुळें तोच काय वाटेल तें बोलून विमनस्क होऊन परत जाई.

अशी त्याची निराशा होई तरी सीताप्राप्तीविषयीं तो सर्वकाल चिंतनांत असे. त्याला कांहीं सुचेना. तो कामानें अगदीं वेडा झाला. राज्यसंबंधींही पाहण्याचें त्यानें सोडिलें! सर्वदा त्याला डोळ्यांपुढें जानकीची प्रतिमा दिसे. ती आपल्याशीं मधुर कधीं बोलेल, आपल्याला अनुकूल कधीं होईल, ह्या एका प्रसंगाविषयीं तो सर्वदा मनांत आणी. सर्व मिळवावयाचें, सर्व जिंकावयाचें, सर्व चिंतावयाचें, सर्व इच्छावयाचें, अथवा जेथें सर्वस्व खर्चावयाचें, असें एक त्रिभुवनांत काय तें सीताप्रेम आहे, असें त्याला होऊन गेलें! त्यामुळें इतर सर्व विलास त्याला विषवत् वाटूं लागले. मंदोदरीचे मंदिराकडेही दररोज जाण्याचें त्यानें सोडिलें. इतर स्त्रियांला मग कोण विचारतो! प्रधानादिकांसही महाराजांची भेट दुर्लभ होऊं लागली! राज्यव्यवस्थेच्या संबंधानें त्याला कांहींच कळेनासें झालें. तो कोठें फार फिरेनासा झाला. रात्रंदिवस एकान्तांत सीताचिन्तनांत असे. एखादें राजकीय वृत्त त्यास कळविलेंच पाहिजे, असें जेव्हां होई, तेव्हां अधिकाऱ्यांस कांहीं तरी विलक्षण युक्ति योजावी लागे! त्याची प्रकृतीही दिवसें दिवस क्षीण होत चालली! वैद्यांनीं कामरोगसंबंधानें बहुत थंड उपाय करण्यास सांगितले. त्यांपैकीं त्यानें जेवढे करावयास दिले, तेवढे सेवकांनीं केले. परंतु कामाग्नीच्या अत्यंत दाहापुढें ते सर्व थंड उपचार थं... ...दत! त्याच्या अंगाची काहली कशामुळें व कोणत्या प्रकारची! व त्यावर उपचार कसले! दोहोंत कांहींच मेळ नाहीं. ह्या भयंकर कामरोगास बहुतेकांना हें स्त्रीरसायनच गुणावह औषध आहे असें वाटलें. परंतु हें रत्न एकट्या रावणाचेच प्राण घेईल एवढें नाहीं, तर सर्व राक्षसांचे प्राण हरण करण्यासाठीं महाराजांनीं लंकेंत आणिलें आहे, असें मनांत आणणारेही रावणाच्या पदरीं कांहीं लोक होते. त्यांस ह्या सीतारूप विषवल्लीचा अधररस पिऊन आपण तृप्त होऊं मानणाऱ्या आपल्या महाराजांनीं हिला जेथून आणली त्यास्थळीं नेऊन ठेविली पाहिजे, तरच महाराज व

आह्मीं सर्व प्रजा सुखानें कालक्रमणा करूं, असें वाटलें. सीतेच्या जवळ असणाऱ्या बहुतेक सर्व राक्षसी रावणास आपल्या दृढ आलिंगनादिकांनीं संतुष्ट करून आपल्या जन्माचें साफल्य कर, ह्मणून दररोज सांगत असत. परंतु ह्या निर्लज्ज स्त्रियांशीं ती बहुधा कधीं बोलत नसे. सीता वश होऊन महाराजांची प्रकृति नीट व्हावी ह्मणूनच कित्येक मोठमोठ्या अधिकाऱ्यांनींसुद्धां परंपरेनें कांहीं युक्त्या व अनेक उपाय करून पाहिले, पण त्यांच्या योगानें तिचा लोकोत्तर दृढ निश्चय व मनाचा पवित्रपणा इत्यादि त्यांना कळून येऊन त्यांसही वाटलें कीं, हिच्या योगानें लंकेंत खचित महान् अनर्थ होणार! परस्त्रीभोगेच्छा अथवा परदारसंभोग, ह्यांचे योगानें कीर्तीची हानि, आयुष्याचा क्षय, वित्तनाश, कुलाचा संहार, महारोगादिप्राप्ति, पुण्यक्षय, उदरनिर्वाहाच्या साधनाच्याठायीं दुर्लक्ष्य, दैन्य, दारिद्र्य, सर्वदा औदासिन्य, व मरणोत्तर भयंकर यातना, इत्यादि निश्चयानें होतात, असें त्या वेळींही आतां प्रमाणेंच लोकांस वाटत होतें. ह्मणून महाराजांला दोन उपदेशपर शब्द बोलवित असें कित्येक पदरच्या लोकांस वाटे, व ते त्या हेतूनें राजाजवळ जाण्याचा यत्न करीत, परंतु भीतीनें मागच्या मागेंच वळत! प्रत्यक्ष मंदोदरीनेंहीं ह्यावेळपर्यंत आपल्या प्राणनाथापाशीं ह्या संबंधानें चकार शब्द काढिला नव्हता!

कांहीं महिने होऊन गेले तरी अजून प्राणनाथाकडून आपल्या मुक्ततेविषयीं कांहींच उपाययोजना होत नाहीं, तेव्हां तिकडे तरी त्यांची कशी स्थिति असावी, ह्या संबंधानें जानकीचें बिभीषणकन्येशीं नुकतेंच हृदयद्रावक भाषण झालें होतें, व त्यावर योग्य भाषण करून तिचें समाधान करून ती कलाबाई गेली न गेली, तों त्यास्थळीं बऱ्याच दिवसांनीं रावण आला. श्रोतेहो, इतके दिवस तो जें कांहीं बोलला, त्यावर आमच्या पवित्र चारित्रनायिकेनें विशेष सांगण्यासारखें उत्तर केलें नव्हतें, ह्मणून मींही त्या रावणाच्या अपवित्र भाषणाविषयीं कांहीं एक तुह्मांस कळविलें नाहीं, परंतु आज त्यावर सीता देवीनें उत्तर केलें तें तुह्मांस सांगण्याकरितां त्याचेंही बोलणें मला सांगतलें पाहिजे.

**रावण**—त्रिभुवनसुंदरि, अद्यापि तूं ह्या पराक्रमी लंकानाथाला वश होत नाहींस, ह्या तुझ्या मूर्खत्वाला काय बरें ह्मणावें? सर्व विबुधजन

माझ्या जवळ कसे राहिले आहेत, माझी आज्ञा ते कशी शिरसामान्य करितात हें तुला समजलें असूनही माझी इच्छा पूर्ण कां करीत नाहींस? इतके दिवस हें माझें विलक्षण वैभव पाहून व ऐकून तुझें अन्तःकरण अजून दगडासारखें कसें राहिलें आहे? हा रानांत राहिल्यापासून तुला गुण लागला काय? अग, भिन्न भिन्न स्त्रियांची भिन्न भिन्न रुचि असल्यामुळें त्यांस संतुष्ट करण्याचे उपायही भिन्न भिन्न असतात, तो तुला रुचणारा उपाय मला माहीत नसल्यामुळें तूं रागावली असशील, तर तो मार्ग मला तूंच सांग, मी त्या रस्त्यानें येईन. माझ्या अज्ञानाबद्दल इतकावेळ राग धरणें योग्य नाहीं. तूं माझी इच्छा पूर्ण करणारी झालीस ह्मणजे तुला काय बरें कमी आहे? माझें अत्युच्च पद, माझे अकुंठित अधिकार, माझी अप्रतिहत सत्ता, हीं सर्व तझ्या आधीन करून मी केवळ तुझा दास बनून राहीन! अग, मी जेथें असा वागेन तेथें इतर सर्व लोक तुझ्याशीं किती नम्रतेनें वागतील, हें काय सांगावें! तुझ्या अधरामृताविषयीं मी अत्यंत आतुर झालों आहें. तर तें यथेच्छ मला पिववून जगांत आपली विमल दातृत्वकीर्ति पसर. तूं आपल्या सौंदर्यानें मला अगदीं वेड लावून टाकिलेंस, मन आकर्षून टाकून माझी निद्रा घालविलीस! त्या गिरिजापतीचें ध्यान जाऊन हें तुझें सुंदर ध्यान माझ्या अन्तःकरणांत उतरलें! तर हे देवि, प्रसन्न हो, व ह्या कृपण व दीन झालेल्या जनाची तुझ्या ठिकाणीं अतोनात भक्ति पाहून माझी ती मनःकामना पूर्ण कर. दशाननाच्या संगतीपासून होणाऱ्या लाभाविषयीं क्षणभर जर मनांत विचार करतीस तर तूं इतका हट्ट न धरतीस! रोगग्रस्त पोरास माता खाऊ देऊं लागली असतांही तें तें औषध समजून घेत नाहीं. त्याप्रमाणें विपद्ग्रस्तेला तुला झालें आहे. तुला प्राप्तानुभवारून जगांत कोठें सुखच नाहींसें वाटतें! जानकि, तुझा जनक मोठा शिवभक्त असल्यामुळें माझा परमस्नेही आहे. त्याला आपली मुलगी मजपाशीं सुखांत आहे असें ऐकून फार फार आनंद होईल. तूं माझ्याशीं रममाण होऊं लागलीस ह्मणजे माझ्या त्या अप्रतिम विमानांत तुला बसवून जगतावरील अनेक रम्यस्थळीं नेईन, अनेक प्रदेश तुला दाखवीन. अग, ज्याची सत्ता आज त्रिभुवनांत असून ज्याला सर्व लोक थरथर कांपत आहेत, तो आज तूं सांगशील तसें ऐकण्यास त-

यार असतां, हे दुर्भाग्ये, तुझें असें कोणतें दुष्कर्म तुझ्या सुखाच्या आड येतें? अजून तुझा तो अरण्यवासी जीवन्त असेल काय? असल्यास तो मानव, समुद्रांतून चारशें कोश दूर कसा येईल? तो ह्मणाला असेल कीं, ही दुःख देणारी स्त्री मला नको. तूं होऊनच कोणास वश झालीस, असें समजून त्यानें तुझें नांवही सोडलें असेल! आतां त्याची आशा सोड. आणि आपल्या सुखोपभोगाचा एक एक दिवस फुकट घालवूं नको. जन्मास प्राणी आला तो सर्वकाळ सुखार्थ यत्न करीत असतो! मग तूं विपत्तींत अशी कां? तूं फारच कृश झाली आहेस व मीही अत्यंत कृश होत आहें. ह्या वरून जी माझी इच्छा तीच तुझी आहे, हें उघड होतें. परंतु स्त्रीस्वभावामुळें तुला ती इच्छा दाखवितां येत नसेल! तर लज्जा सोड. लज्जेनें कोणासही कधीं सुख झालें नाहीं. लज्जा ही पश्चात्ताप उत्पन्न करणारी आहे. ती सोडून तूं जेव्हां प्रसन्नवदनानें मजकडे पाहशील, व मी तुला जेव्हां वीस भुजांनीं दृढप्रेमालिंगन देईन, तेव्हां तुला आपल्या जन्माचें सार्थक्य झालेंसें वाटेल! तेव्हांच तुला माझ्या ह्या बोलण्याची यथार्थता भासेल! तर आतां विलंब करूं नकोस. तुझ्या कल्याणार्थ मी इतकें सांगत असतां, तुजसारख्या सुज्ञ स्त्रियेस कांहींच समजूं नये, हा कोणाचा तरी तुला जन्मान्तरींचा शाप असावा. त्या मोहामुळेंच तुझी अशी भ्रमिष्ट बुद्धि झाली आहे! आतां तुझा शापसमय संपला. तर ये, ह्या शंकरारि मदनानें मला अत्यंत त्रास दिलेल्या शैवाला आलिंगन दे. येथें कोणी नाहीं. सर्व सेवकजन दूर गेला. मी तुला वारंवार किती प्रार्थूं?

**सीता**— नीचा, निर्लज्जा, धिक्कार असो तुला व ह्या तुझ्या बोलण्याला! मला तर हीं तुझीं दहा तोंडें, जिव्हासर्पिणींचीं भयंकर बिळें दिसतात! ह्यापेक्षां तूं मुका कां झाला नाहींस? परमेश्वरानें प्रसन्नतेनें तुला अप्रतिम वैभव दिलें असतां तें सतत कसें राहील ह्या चिंतेंत तूं असावें तें आपणच होऊन बाहेर लोटूं कां पहात आहेस? मूर्खा, हे तुला नाशाचे डोहळे कोठून सुचले? अरे, कामाचा ज्यानें अंगीकार केला त्यानें अवदशेस दृढालिंगन दिलें असें समज. कामानें ज्याचा सर्वस्वी नाश झाला अशीं हजारों उदाहरणें तुझ्यापुढें ठेविलीं असतां, परंतु सध्यां तूं बधिर व विचारशून्य झाला आहेस, तेव्हां तुला त्यांचा काय

उपयोग? अरे कमांधा, परस्त्रीचा अभिलाष धरणें हें अघोर पातक होय. ह्याच्या योगानें इहलोकीं मोठमोठे अनर्थ घडून परलोकीं ही घोर नरकवासप्राप्ति होते. परदारलंपटाला कधीं चांगली झोंप नाहीं, अन्न गोड लागावयाचें नाहीं, आपणाला कधीं काय कोण करील ह्या भितींत तो सतत असावयाचा! तो कधीं सत्य भाषण बोलावयाचा नाहीं, अर्थात् त्याला थोरपण नाहीं, लज्जा नाहीं, लोकांत मान कसा तो नाहीं, तो कवडीच्या किंमतीचा होतो, त्याच्याशीं कोणीही व्यवहार करीत नाहीं. त्यास शत्रु पुष्कळ होतात, तो संकटांत कधीं एकदां येतो आहे, ह्मणून सारे वाट पहात असतात, त्याची कोणाला दया येत नाहीं, त्याला कोणी साहाय्य करीत नाहीं, त्याची संपत्ति लौकर नाश पावते, आत्महत्या करण्यासारखे त्यावर भयंकर प्रसंग येतात, तो सर्वदा उदासीन, दीनवाणा, अशक्त, अतृप्त, विचारशून्य, साहसी, असंतुष्ट, भ्यालेला असा असतो! घरचीं मनुष्यें व आप्तसंबंधीही त्याच्याशीं गोडीनें वागत नाहींत! तो सर्व सज्जनांच्या शापास पात्र होऊन दरिद्री होत्साता अकाळीं भयंकर रोगांनीं ग्रस्त होतो व अनेक यातना भोगून बहुधा पश्चात्ताप पावून मरून जातो! त्याच्या मरणापासून तादृश कोणास वाईटही वाटत नाहीं! सर्व विपत्तींचें बीज जें ऋण तें आपल्या कुटुंबांत पेरून मरणोत्तरही त्यांस दुःखांत ठेवून जातो! त्यास संतति असलीच तर ती रोगी, अशक्त, व दरिद्री होते! अधमाधमा, तूं आपली एवढी थोरवी सांगतोस, परंतु मी तुला अगदीं कस्पटाप्रमाणें मानितें, ह्याचे कारण केवळ परस्त्रीच्या ठिकाणीं तुझी दुष्टबुद्धि हेंच होय! दशानना, तूं जिचा अभिलाष धरिला आहेस ती कोणाची पत्नी, ह्याचा विचार केला नाहींस! अहाहा! काय त्या दशरथमहाराजाच्या ज्येष्ठपुत्राचें अद्वितीयरूप, त्याचा लोकोत्तर पराक्रम व त्याचे अवर्णनीय गुण! अशाच्या पवित्र संगतीनें जिनें आजपर्यंत दिवस काढिले तिच्या नयनास हें पापरूप व हें वैभव तुच्छ वाटल्यास अथवा तिच्या कर्णांस हें अपवित्र भाषण विषाप्रमाणें भासल्यास आश्चर्य तें कोणतें? माझ्या स्वयंवरसमयीं मंडपांत तुझ्या उरावरील शिवधनुष्य काढून तुला जीवदान कोणीं दिलें? तुह्मां सर्वांस तेथें लज्जा कोणीं आणिली? राजहंसीस कावळ्याचा समागम कधीं तरी प्रिय वाटेल काय? बाबा, तुझें वैभव मोठें असलें, तुझा पराक्रम अ-

तुल असला तर तेणें करून आपल्या सुशील साध्वी मंदोरीस सुखदाता हो. तिला अशाकृत्यांनीं असंतुष्ट ठेवूं नको. तिच्या कोपमुद्रेस भीत जा! राक्षसाधमा! तूं ह्या अशा आचरणानें आपला स्वतःचा आपल्या सर्व-कुळाचा किंवा आम्हांचा केवळ नाश करून घेशील असें नाहीं. तर आपल्या सर्व प्रजांस रडवावयास लावून शेवटीं अनंतकालपर्यंत परमावधीच्या दुःखांत पडशील! मूर्ख, मदोन्मत्त, अजागळ, व्यसनाधीन, राजे आपल्या दीन प्रजांवर मोठीं संकटें आणतात. त्यांस स्वदेशांत अविश्रांत श्रम करून पोटभर खावयाससुद्धां मिळूं नये अशी, आपल्या मूर्खपणानें स्थिति आणितात. ह्मणून तुजसारखे मूर्ख राजे नसावेत! अशा राजांना प्रजांनीं तेव्हांच ठार मारून राज्यपदीं शहाण्यास योजून दीर्घकालपर्यंत होणाऱ्या यातनांपासून आपली सुटका करून घेतल्यास त्यांस लवलेशही पातक लागणार नाहीं. माझ्या प्राणनाथाचा अतुल पराक्रम मी पूर्णपणें जाणतें. त्यानें खरासारखे हजारों राक्षस किती अल्पकाळांत मारिले, हें मीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. ह्यावरून तुझाही प्राणान्त तो क्षणांत करील, हें मला पूर्ण समजतें आहे. सारांश, तुझें मरण अगदीं जवळ आलें. त्यामुळें ही तुला दुर्बुद्धि आठवली! जर तुला वांचावयाची अजून इच्छा असेल, जर कुलाचा नाश होऊं द्यावयाचा नसेल, जर मोठमोठे आश्रित लोक जीवंत रहावे असें तुला मनःपूर्वक वाटत असेल, लक्षावधि स्त्रियांची भावी स्थिति मनांत येऊन त्याविषयीं जर लवलेश तुला दुःख होत असेल व सर्व प्रजांची मनांत कल्याणेच्छा वागत असेल, तर मला माझ्या प्रियप्राणनाथाच्या स्वाधीन कर आणि कृतापराधाबद्दल त्याच्या पवित्र चरणारविंदीं दीन होऊन पश्चात्तापपूर्वक क्षमा माग. तो क्षमाशील आहे. त्याचें अन्तःकरण उदार व कोमल आहे. तो तुला क्षमा करील. नाहीं तर माझा व माझ्या त्या प्राणाचा वियोग कारणरा जो तूं, त्या तुझा व तझ्या पंचप्राणांचा तो चिरकाळचा वियोग करील! काळानें आमंत्रण केलेल्यास हें बोलणें कसें रुचेल! मूर्खा, तुझा पिता कसा व त्याच्या पोटीं तूं हा क्रूरकर्मा कसा! वेदांचीं ज्यानें खंडें केलीं, त्या त्वां अशीं भयंकर कृत्यें करून आपल्या देहाचीं खंडें खंडें करून घ्यावींना? कामातुर झालेला पुरुष कितीही विद्वान् असो, कितीही कलाकुशल असो, अथवा कितीही गुणवान् असो, त्याचें कांहीं तेज पडत नाहीं. कलियुगांतील पापपुरुषांसही लाजविणारें

ह्मायुगांतील हें तुझें भयंकर आचरण पाहून त्यावेळचेही लोक तुझा धिक्कार करतील! त्या पार्वतीरमणाची अशाकरितांच काय तूं भक्ति करीत आहेस! मूर्खा, त्या शंकरास शरण जा आणि "अशी दुष्टबुद्धि देऊं नको," ह्मणून त्या महादेवाची अनन्यभावें प्रार्थना कर. पुनःपुनः तुला हें सांगतें कीं, तुझ्याशीं बोलणें हें मी महापातक समजतें. परंतु बोलण्याचा प्रसंग येतो ह्मणून उपाय नाहीं!

**रावण**—वेडे, तुझें अज्ञान पाहून मला फार फार वाईट वाटतें. अज्ञानाच्या बोलण्याचा मग राग कसा यावा? परदारलंपटाची इहपरलोकीं होणारी स्थिति मला लावूं पहातेस काय? छे छे! ह्मणूनच मी ह्मणतों कीं—माझ्या वैभवाविषयीं, माझ्या पराक्रमाविषयीं, माझ्या कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं शक्तीविषयीं तुला लेशही माहिती नाहीं! अग, सर्व जगताचे नियम निराळे व माझे एकट्याचे निराळे! म्हणजे जें जें मी करीन तेच माझे नियम! समजलीस. आह्मी एकापेक्षां एकेक पराक्रमी असे-मी, कुंभकर्ण, व बिभीषण, असे सख्खे तिघे बंधु असून महापार्श्व, महोदर, कुबेर, असे आणखी कीर्तिमान् मला सापत्न बंधु आहेत. मी गोकर्णक्षेत्रीं दीर्घकाळपर्यंत असें कांहीं विलक्षण व अश्रुतपूर्व तप केलें होतें कीं, त्याच्या योगानें हें अपार वैभव व ही अप्रतिहत सत्ता, मला प्राप्त होऊन, देव, दैत्य, किंवा अन्य कोणाच्याही हातून मला मरण येऊं नये, असें मीं करून ठेविलें आहे! मनुष्यापासून मला मृत्यु न यावा, हें मग मी आणखी कशाला त्या शंकरापाशीं मागूं! तेव्हां मला काळाचें ह्मणून कालत्रयींही भय नाहीं. काळही ज्यानें आपल्या सत्तेंत ठेविला, त्याला बिचारा शंकरानीं भस्मीभूत केलेला कुसुमधन्वा काम काय करणार? ही लंका प्रथमतः कुबेराची नगरी होती, पण त्याला मला निमुटपणें द्यावी लागली! हिच्यापुढें त्याची अलकावती कांहींच नाहीं! अत्यंत पराक्रमी जो मयासुर त्याची गुणरूपवती कन्या मंदोदरी माझी मुख्य स्त्री असून तिनें माझ्या समागमानें जे सुखविलास भोगिले व भोगीत आहे, तसे त्रिभुवनांत कोणत्याही स्त्रीनें भोगिले नसतील! ते तुला मिळावे ह्या हेतूनें, हे भाग्यवती, मी तुजवर प्रसन्न झालों आहें! माझा कोणत्याही स्थळीं अद्यापि पराभव ह्मणून झालेला नाहीं! देव सध्या कोठें काय करीत आहेत, हें तुला ठाऊक आहेच. अग मुग्धे, अग हे भीरु, कैलास कोणीं

कांपविला हें तुला तुझ्या पतीनें आश्चर्यचकित होऊन सांगितलेंच असेल! मला इंद्रजित, अक्ष, देवान्तक, नरान्तक, त्रिशिरा, अतिकाय, असे महान् पराक्रमी पुत्र आहेत. इंद्रजिताच्या नांवावरूनच त्याचा अप्रतिम पराक्रम व्यक्त होतो. श्रीमच्छुक्राचार्य ह्यांचा तो पट्टशिष्य असून मंत्रास्त्रविद्येंत त्याची बरोबरी करणारा आज त्रिभुवनांत कोणी नाहीं! तसेच प्रहस्त, धूम्राक्ष, अकंपन, प्रजंघ, जंबुमाली, प्रतपन, प्रघस, विरूपाक्ष, अग्निकेतु रश्मीकेतु, मित्रघ्न, यज्ञकोप, कुंभ, निकुंभकिती नांवें घेऊ? असे हजारों पराक्रमी इच्छारूपें घेणारे माझे आश्रित माझ्या कल्याणाविषयीं सदा जागरूक असतात! ह्या प्रमाणें आणखी लक्षावधि सैन्य तयार आहे. अशी माझी बलसंपत्ति असून द्रव्यसंपत्तीही अपार आहे. प्रिये, ह्या सर्वांची स्वामिनी आतां तूं होशील! तर डोळे उघड व विचार कर.उपभोगार्थ आणलेल्या हजारों कन्यांतही तुज सारख्याच प्रथम कांहीं हट्टी निघाल्या. परंतु शेवटीं त्यांनीं विचारकरून विचाराचें फळ जें सौख्य तेंच त्यांस मिळालें!

**सीता**—मूढा, मी तेंच तेंच पुनः तुझ्याशीं काय बोलूं! अरे, सृष्टींतील नियमही कदाचित् अगदीं उलटतील, पण साध्वीस्त्रियांचीं मनें लेशही कधीं ढळणार नाहींत! अशा स्त्रियांच्या व्रतास मी अनुसरणारी आहें. मग मजपुढें अरण्यरोदन कशाला चालविलें आहेस? अरे, प्रत्यक्ष जगताचा निर्माणकर्त्ता परमेश्वर जरी तूं असलास तरी मला काय करावयाचें आहे? तूं पुनः पुनः आपली प्रतिष्ठा, सत्ता, संपत्ति, ह्यांविषयीं मला दुःख व्हावयाला कशाला बोलतोस! हाय! हाय!! एकूण आतां लौकरच क्रोधाग्नीनें पेटलेल्या युद्धकुंडांत तूं सांगितलेलें सर्व बलरूपद्रव्य माझा प्राणनाथ यजमान होऊन धनुष्यरूप कलत्राच्या साहाय्यानें हवन करणारना? नंतर पशूप्रमाणें तुझाही तेथें घात होणार! शेवटीं सर्वांच्या स्त्रियांच्या कोलाहलांनीं ही लंकानगरी शोकमूर्ति दिसणार! वस्तू वर कोठें जरी फेंकिली, तरी तिचा ओढा ज्याप्रमाणें भूभागावर असतो, त्याप्रमाणें मला आकर्षण करणारा तो एक कौसल्याहृदयानंद आहे. पुनः पुनः तुला मी सांगतें कीं,वावा माझा अभिलाष धरूं नको. मला प्राणपतीच्या स्वाधीन कर व तूं आपल्या वैभवातिशयाचा सुखेनैव उपभोग घे. परंतु तूं आजप-

र्यंत जीं हजारों पातकें केलीं आहेस, तीं तुझ्या बुद्धीस भ्रंश कसा पाडणार नाहींत? तीं तुला सुखानें वरीं राहूं देतील! तेव्हां आपल्या कुकर्मासारखी दुष्टबुद्धि तुला झाली आहे, ती आशा उपदेशानें अन्यथा कशी होणार?

**रावण**—मूर्खे, ह्या दशाननानें आजपर्यंत अशी दीन होऊन कोणाचीही प्रार्थना केली नाहीं! तुझ्या ठिकाणीं मी अत्यंत आसक्त झालों असें जाणून माझा तूं उपमर्द करितेस, नाहीं! तूं काय समजली आहेस! हा लंकाधिपति आपली इच्छा पूर्ण केल्याशिवाय कधीं तरी स्वस्थ राहील काय? एतदर्थ तो पाहिजेल तें करील! तूं आतां असें समजूं नको कीं, मी पूर्वी बोललें तशी पुढेंही बोलेन. मीं आपलें तूं काय ह्मणतेस तें ऐकावें, ह्मणून आजपर्यंत तुला यथेच्छ बोलूं दिलें. (दासींस जवळ बोलावून त्यांस) हिला आतांच्याआतां आपल्या अशोकवनिकेंत नेऊन ठेवा. व ही हट्टी जेणें करून मला अनुकूल होईल असेंच हिच्याशीं तुम्हांस वाटेल त्याप्रमाणें आचरण ठेवा.

असें सांगून तो कालप्रेरित रावण त्या स्थळाहून निघून गेला.

रावणाज्ञेप्रमाणें त्या राक्षसींनीं सीतेला लगेच अशोकवनिकेंत नेलें. तेथें साहाही ऋतु एकसारखे काम करीत होते. मग तीमध्यें काय कमी असणार? ती वनिका खरोखर आपल्या नांवाप्रमाणेंच शोक दूर करणारी होती. पण कोणाचा? सीतेसारखीचा नव्हे. जिचा शोक जावयास रामचरणदर्शन हाच एक उपाय होता, तिला हजारों असलीं उपवनें श्मशानतुल्यच भासणार, हें काय सांगावें? ह्या अति रमणीय स्थळीं गेल्यावर राक्षसींच्या उपदेशानें, त्यांच्या नाना प्रकारच्या भेवडावण्यानें व अनेक प्रकारच्या जाचानें, रामपत्नी आपल्यास वश होईल असें रावणास वाटलें होतें. परंतु सृष्टींतील नियमही कदाचित् फिरतील, परंतु आपलें कालत्रयींही मन फिरणार नाहीं, अशा दृढ निश्चयाच्या स्त्रीचे पवित्र मुखांतून रावणास अनुकूल अशी एक मात्रा तरी निघेल काय? मग सुशब्द किंवा मधुर वाक्यसमूह कोठला? रावण त्या स्थळीं पुष्कळदां आला व त्यानें नानाप्रकारच्या तिच्या विनविण्या केल्या, क्रोध दाखविला, परंतु ती आपल्या कुशल वक्तृत्वानें केव्हांच त्याला निरुत्तर व क्रोधाविष्ट करून परत पाठवी. ह्या स्थळीं बिभीषणकन्या कला ही वारंवार येऊन त्यांचें एकमेकांस आवडणारें असें

संभाषण होत असे. असो.

असा बराच काळ लोटल्यावर एके वेळीं मध्यरात्र उलटून जिकडे तिकडे शांतता होऊन गेल्यावर त्या स्थळीं तो दशानन आला ! व अगदीं कामांध होऊन तिनें वश व्हावें ह्मणून त्यानें फार वेळ भाषण तिच्याशीं केलें. त्यावर आमच्या शुद्धान्तःकारण नायिकेनेंही योग्य, मार्मिक, व संशयच्छेदक असें उत्तर केलें. तीं परस्परांचीं भाषणें, श्रोतेहो, सांगितलीं असतां कथाभाग वाढतो, ह्मणून त्यांविषयीं विशेष तुम्हांस न सांगतां, शेवटीं तो लंकानाथ प्रतिज्ञेसारखें काय बोलला, तेवढेंच तुह्मांस थोडक्यांत ऐकवितों.

**रावण**— जानकि, जर तूं मला थोड्या दिवसांत माझ्या इच्छेप्रमाणें वर्तन केलें नाहींस, जर मला धिक्कारयुक्त वाणीनें बोलशील, तर तुझ्या ह्या शरीराचे तुकडे तुकडे करावयास सांगून त्या मांसाचा पाक मी यथेच्छ भक्षीन. ह्याप्रमाणें कोणत्या तरी प्रकारानें तुझ्या ह्या कोमल शरीराचा मी उपभोग घेतल्याशिवाय कदापि रहाणार नाहीं !

असें बोलून तो अत्यंत क्रोधायमान होऊन पाय आपटीत तेथून निघून गेला !

---

## उच्छ्वास पांचवा.

नंतर कांहीं वेळानें “ अग हे भूमिकन्ये, जनकसुमेधानंदिनि, दशरथनृपस्नुषे, सीते, ज्यानें बंधुलक्ष्मणासह भगवान् विश्वामित्रमहर्षींबरोबर अरण्यांत प्रवेश करून तेथें अनेक राक्षसांचा संहार केला. नंतर मिथिलानगरीस ते सर्व जात असतां ज्यानें मार्गांत गौतमपत्नी व शतानंदमाता अहल्या हिचा उद्धार करून आपली कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुंशक्ति प्रकट केली व सर्व जगत् आश्चर्यचकित केलें. पुढें त्या नगरींत रंगमंडपामध्यें शिवधनुष्यास गुण जोडीत असतां त्याचे तुकडे तुकडे

करून तेथें मिळालेल्या सर्व राजांचीं व ह्या रावणाचीं तोंडें लज्जेनें ज्यानें काळीं केलीं, व ज्याच्या प्राप्तीस्तव तुला विलक्षण चिंता पडली होती, ती इतकी कीं, तातानें योजिलेला पण सुद्धां तुला अगदीं भयंकर वाटला होता! पण शेवटीं ज्याचे कंठांत तूं प्रेममाला घातलीस, तसेंच त्या प्रसंगीं तुझ्या इतर भगिनींचें लक्ष्मणादि त्रिवर्गबंधूंनीं पाणिग्रहण केलें. नंतर त्या सीरध्वजराजधानींतून सर्व मंडळी तुह्मां-सहवर्तमान अयोध्येस निघाली असतां ज्यानें वाटेंत क्रुद्ध झालेल्या भार्गवरामाचा गर्व हरण केला! पुढें स्वनगरींत बंधूंसह व तुझ्या संगतीनें बारावर्षें सुखांत जात आहेत, तों ज्याला ज्या मुहूर्तावर राज्याभिषेक व्हावयाचा ठरला असून त्याच सुमुहूर्तावर ज्यानें चौदावर्षें वनवासच करावा असें दैवानें पूर्वींच ठरविलें होतें! तदनंतर जो ताताज्ञेनें मोठ्या आनंदानें वनांत जाण्याकारितां निघाला असतां ज्यास तूं व लक्ष्मण प्रेमपूर्वक अनुसरलांत. पुढें तुह्मांसह चित्रकूटीं राहत असतां ज्यास न्यायमूर्ति भरतानें तातमृत्यूचें अत्यंत दुःखद वृत्त कळवून अयोध्येस येऊन राज्य स्वीकार करण्याविषयीं विज्ञप्ति करण्यांत पराकाष्ठा केली. परंतु पित्राज्ञा हीच एक इहपरत्र सुख देणारी आहे, हें एक तत्त्व हृदयीं धरून इतर सर्व मोहपाश खाडकन् तोडून जो तुह्मांसह वनांत संचार करीत असतां अत्रि, सुतीक्ष्ण, शरभंग, अगस्त्य, इत्यादि महर्षींच्या दर्शनानें आपणास कृतार्थ मानिता झाला. ऋषींना नाना प्रकारें पीडा देणाऱ्या हजारों दुष्ट राक्षसांचा ज्यानें संहार केला. व शेवटीं कांहीं काळ आपण तिथें गोदावरीतीरीं मोठ्या आनंदानें राहत असतां थोड्या दिवसांतच अयोध्येस परत जाण्याचें ज्यानें तुझ्या विनंती-वरून ठरविलें होतें. परंतु तितक्यांतच कपटी शूर्पणखेच्या विरूप-करणानें खरादि हजारों राक्षसांशीं ज्यास युद्धप्रसंग आणावा लागून त्यांस मृत्युमुखीं द्यावें लागलें! इतकें झाल्यानंतर, हे देवि, तुला मोह पडणारा एक सुवर्ण मृगच दिसला! त्याच्या पाठीमागें ज्याला तूं लावून–जात नसतांही अत्यंत तीक्ष्ण वाग्बाणांनीं लक्ष्मणास घायाळ करून, त्या-सही त्या पर्णकुटिकेंतून कोठच्या कोठें घालविलेंस! व आतां ज्याचें सर्व जीवित तुझ्या सुखदुःखरूप वार्त्तेवर अवलंबून राहिलें आहे, अशा दशरथात्मज गुणनिधान रामचंद्राची तूं अर्धांगी असतां हें असें साहस

करून त्याचेही पुढें लौकरच प्राण हरण करण्याची इच्छा करितेस काय? एकूण तूं पक्की स्वकार्यसाधक आहेस! पतीच्या जीविताविषयीं किंवा त्याच्या स्थितीविषयीं तूं कांहींच काळजी वहात नाहींस, असें नाहीं का ह्यातुझ्या सहसावरून होत?" असें रामचरितानें ह्मणून अमृतानेंच काय युक्त असें भाषण तिच्या कर्णरंध्रांत पडलें! तत्क्षणीं ती विस्मयाश्चर्यादिकांनीं क्षणभर अगदीं तटस्थ झाली! तिला थोडी बहुत हुशारी आली. प्राणप्रियाची मूर्तीच पुढें उभी आहे, असें तिला क्षणभर भासलें. ती फार आतुर झाली. तिची उत्कंठा वाढली. क्षणोक्षणीं पालटणारे असे अनेक विकार तिच्या चेहेऱ्यावर मूर्तिमंत दिसूं लागले! ह्या प्रमाणें तिची कांहीं विलक्षण स्थिति होऊन ती इकडे तिकडे दशदिशांभर पाहूं लागली. परंतु हें भाषण कोणीं केलें व कोठून आलें, हें हिला कांहीं कळलें नाहीं. तेव्हां ती हताश होऊन हें आपल्याला फसविण्याकरितां कोणाचें तरी कपट आहे, असें तिला वाटलें. ही राक्षसनगरी कपटमय आहे असें ती वारंवार ह्मणतच असे. ह्या ठिकाणीं आपलें आगमन हें ह्या दुष्टाच्या कपटविषवृक्षाचेंच फळ होय, असे तिच्या मुखांतून त्यावेळीं उद्गार आले. पुनः पुनः आशाबद्ध मुद्रेनें त्या भाषणामृताची कुपी कोठें आहे ह्मणून शोधण्याकरितां ती चोहोंकडे पाही. परंतु शेवटीं शांत व दीनवदना होऊन जरा मोठ्यानें ह्मणाली. "हें अमृतमयभाषण प्रसवणारा जर माझा कोणी खरोखर हितकर्त्ता असेल, तर त्यानें ह्याक्षणीं मजपुढें यावें. नाहीं तर ज्या कृत्यास मीं प्रवृत्त झालें आहें, तें शेवटास नेल्यावांचून मला कदापि सुख होणार नाहीं. ह्या ओंगळ राक्षसनगरींत पतिविरहानें मला एकेकक्षण युगाप्रमाणें भासत आहे! आज मला येथें येऊन पुष्कळ दिवस झाले. अजून मीं किती वाट पाहावी! ते दशरथनंदन माझा शोध करीत नाहींत, असें मला आतां खास वाटूं लागलें आहे. इतके दिवस मीं आपलें जीवित आशापाशानें कंठांत राहूं दिलें, परंतु तो आतां सुटल्यामुळें हा केशपाश कंठांत घालून त्याला त्याचा मार्ग धरावयास सांगत आहें. आतां ह्या उपरांत जर ह्या तुच्छ जीविताचा मी लोभ धरीन तर मजवर काय काय अनर्थ गुदरतील हें सांगवत नाहीं! ह्या अधम राक्षसराजनगरींत मला पळवून आणण्यास कारण माझें जीवित होय! ज्याच्या साठीं ते दोघे

बंधु रानावनांत दीन होऊन भटकत असतील त्यास कारण माझें हें जीवितच आहे. ज्याचें मुख पाहूं नये, असा तो निर्लज्ज दशमुख मज पुढें वारंवार येऊन कर्णकटु भाषण करून मला फार राग आणितो, ह्याला कारण हें माझें कोडगें जीवितच होय. आतां तो राक्षसाधिप माझे देहाचे भयंकर तुकडे करणार ह्मणून प्रतिज्ञावचन बोलून गेला, ह्याला हेतु तरी हें जीवितच आहे. असे ह्या माझ्या जीवितामुळें अनेक अनर्थ उत्पन्न झाले आहेत व पुढें ही किती उद्भवतील ह्याचा नेम नाही! तेव्हां सर्व अनर्थांचें मूळ जें एक माझें जीवित ह्या कंठात राहिलें आहे, त्याला ह्या केशांच्या फासानें घालवावें असा मीं निश्चय केला आहे! ज्यांना कोणाचें साहाय्य नाहीं असे ते दोघे बंधु अगाध सागरांतून ह्या राक्षसी द्वीपांत कसे येणार बरें? आल्यावर ते ह्या अधमास निःसंशय मारतील, पण त्यांचें येथें येणेंच सर्वथा असंभाव्य आहे. ते काय कपटी राक्षस आहेत कीं पाहिजेल तें रूप घेऊन येथें येतील! अथवा उडून येण्यास त्यांना पंख थोडेच आहेत! किंवा त्यांना साहाय्य कोणाचें थोडेंच मिळालें आहे? पण ते दोघे बंधु तरी एकमेकांस भेटले असतील काय? किंवा प्रियप्राणनाथ "हा लक्ष्मणा, हे जानकी, तुह्मी कोठें गेलां?" असें ह्मणत भटकत आहेत! व भावोजी "हे प्रियबांधवा, हे कठोरहृदये दुष्टे," अशा हाका मारून अह्मांस शोधीत आहेत!" असें बोलत ती आपल्या लांब व काळ्या केशांचे दोन विभाग करून दोन हातांत घेऊन ह्मणाली. " ह्या माझ्या कृत्यास परमपवित्र सतीश्रेष्ठा अत्रिभार्या अनसूया हिचें पूर्ण अनुमोदन आहे, असें अतां मला समजून आलें. तेव्हां तिला जें संमत कार्य तें परमपवित्र ह्मणून आचरिलें पाहिजे. तीच ब्रह्मवादिनी मला हें साहस करवयास सांगत आहे! कारण त्या आश्रमांत येईपर्यंत, ह्या केशांच्या जटा होत्या तेथें आल्यावर त्या माउलीनें चांगलें उटणें लावून हे केश मोकळे केले! " असें ह्मणून ती केशांचा फास लावून घेणार इतक्यांत तिच्या पुढें साक्षात् वामनावतारच काय असा एक द्विज बटु मोठ्या नम्रतेनें करद्वय जोडून उभा राहिला व ह्मणाला.

बटु—अहो देवि, मी आपल्या प्रियभर्त्याचा अनेक सेवकांपैकीं एक लहानसा सेवक आहें. आपल्या पवित्रदर्शनानें मला फार आनंद होऊन मी अगदीं कृतार्थ झालें आहें. आजच्या ह्या प्रसंगाला कसलीही

उपमा नाहीं, असा हा सुप्रसंग मी समजतों. तर, हे देवि, आपण अगोदर हा हातांतील केशपाश सोडावा व स्वस्थ बसून माझा साष्टांग प्रणिपात स्विकारावा.

**सीता**–( हातांतील तो फास सोडून ) अगा हे द्विजशिशो, तुझें हें मनोहर रूप, तुझी ही अमृतमयवाणी व तुझें दर्शन होतांच माझ्या अन्तःकरणांत उत्पन्न झालेली विलक्षण प्रसन्नता, हीं तूं जें कांहीं सांगतोस, तें ह्या हतभाग्येला खरेंच भासावितात ! परंतु ह्या कपटमयनगरींत सत्यासत्य जाणणें फारच कठिण आहे ! तुझें वय, ज्ञाति, रूप इत्यादि गोष्टींचा विचार केला असतां व माझ्या वियोगानें प्राणनाथाची झालेली स्थिति क्षणभर मनांत आणली ह्मणजे, आणखी कोठें तें अरण्य व कोठें ही लंका, ह्यांविषयीं थोडी कल्पना केली असतां, व प्राणनाथांचे अनेक सेवक कोण, ह्याविषयींही थोडा बहुत सूक्ष्म विचार केला ह्मणजे तूं प्रत्यक्ष दशानन किंवा त्याचा कोणी आज्ञाधारक सेवक, ह्या रूपान्तरानें कांहीं तरी कार्यभाग साधावयाच्या आशयानें येथें प्रकट झाला आहेस, असें मला वाटतें. प्राणनाथाचा तूं सेवक हें होईल तरी कसें? मला ह्या राक्षसनगरींत येऊन वर्ष होत आलें; तत्पूर्वी कोणी त्यांजवळ नसतां आतां मजसाठीं दीनवदन, शक्तिहीन व उत्सवरहित होऊन वनांत भटकत फिरणाऱ्यांना सेवक तरी कोण मिळणार? काय ते दोघे बंधु अयोध्येस गेले ! व तेथून त्यांनीं तुला पाठविलें? परंतु चौदा वर्षें झल्याशिवाय ते सत्यप्रतिज्ञ अरण्यांतून कधींही नगरींत पाय ठेवणार नाहींत ! तूं त्यांचा सेवक आहेस असें जरी क्षणभर मानिलें, तरी तूं नवा आहेस हें तर खचित. परंतु नव्या सेवकाला ते मजकडे कशाला बरें पाठवितील? व तुझें येथें येणें तरी कोणत्या मार्गानें होणार ! खाचित तूं लंकेंतील कोणी कपटी राक्षसाधम आहेस अशी माझी खात्री झाली ! माझ्याशीं आतां बोलूं सुद्धां नको. शिशो, मी तुझ्याशीं मुखानें असें बोलतें आहे खरें, पण अनेक कारणें, तर्क, संभावना, शक्यता, संशय, अनुमान, इत्यादि कांहीं मनांत न येतां तूं प्राणनाथांचा सेवक असून त्यांजकडून आला आहेस असेंही अन्तःकरणांत वाटतें! तूं खरा सेवक असून मी तुला कपटी राक्षस मानतें, ह्मणून तुला होणाऱ्या दुःखाबद्दल मलाही परम दुःख होत आहे ! तूं कोणीही अस, माझी अन्तःकरणवृत्ति

दोन प्रकारची कशी झाली आहे, हें मीं तुला निष्कपटबुद्धीनें कळविलें. ब्राह्मणपुत्रा, तूं प्राणनाथांकडून मजकडे आला आहेस, त्यापेक्षां त्यांचा तूं परममित्र किंवा फार विश्वासू सेवक असावास. त्यांनीं तुला मजविषयीं पुष्कळ सांगितलें असेल. तेव्हां " तूं माझा सेवक नाहींस, असा प्राणप्रियेला तेथें बळकट संशय येईल, " अशासारखे ते कांहीं तुजपाशीं ह्मणाले असतील ! ह्मणाले असल्यास जेणेंकरून तूं त्यांचा सेवक, अशी माझी दृढ बुद्धि होण्याकरितां त्यांनीं एकादी खूण दिली असेल अथवा तुजपाशीं कांहीं गुह्य गोष्ट सांगितली असेल, ती मला, हे प्रियदर्शना, माझा संशय जाण्याकरितां अगोदर सांग. आणि मग तिकडील वृत्त काय तें ह्या अत्यंत आतुरेला लौकर कळीव. अथवा तूं कोणीही ऐस, तुजजवळ कांहीं खूण असो वा नसो. मला प्राणनाथाचे पाय अंतरल्यावर प्राणनाथाविषयींचें काय वर्तमान कळवितोस तें अगोदर कळीव. त्या वृत्तकथनावरूनच मी तुझें कपट ओळखीन. (असें ह्मणून ती खालीं बसली, व त्यासही बसावयास तिनें सांगितलें. )

बटु—स्वामिनि, अशा स्थळीं व अशा समयीं संशयादिकांनीं आपली अन्तःकरणवृत्ति अशासारखी होणें हें अगदीं साहजिकच आहे. अशी न होती तर मात्र आश्चर्य होतें. आपल्या स्वयंवरसमयापासून तों श्रीरामलक्ष्मण पंचवटीमध्यें कांचनमृगानुसारी झाले, येथपर्यंतचें इतिवृत्त आपण जाणतच आहां.पुढें ऐका तर. ह्मणजे त्यांचा मी सेवक कसा झालों वगैरे सर्व समजेल. हो! पण आपल्या प्रियप्राणनाथानें आपला मजविषयींचा संशय दूर व्हावा ह्मणून आपल्या करांगुलींतील सीताराम-नामांकित ही सुंदर मुद्रिका दिली आहे.ही घ्या.(असें ह्मणून त्यानें ती अंगठी तिच्याहातांत दिली व आपण लांब उभा राहिला.

सीता—( मोठ्या प्रेमानें तिजकडे पाहून व तिचें वारंवार चुंबन घेऊन ) द्विजसुता, ही मुद्रिका माझ्या हातांत पडतांच जसा काय मला प्राणनाथाचा करस्पर्श झाल्यासारखा होऊन माझी तनू रोमांचित झाली! व क्षणभर उदासीनता निघून जाऊन थोडी लज्जाही प्राप्त झाली आहे ! हो हो, हीच ती मुद्रिका त्यांच्या करांगुलींतील. ही माझ्या अनामिकेंत होत असे. पण हाय! हाय!! आज दोन हातांच्या मिळून मधल्या अंगुलींतही सैल होते ! मुद्रिके, मी एक अभागिनी ह्म-

णून मला प्रियकराचा दुःसह विरह झाला. व तो मी होऊन त्यांस दूर घालविल्यामुळें झाला! पण तूं त्याचे अंगुलीस अगदीं चिकटून अ-सणारी असतां हा तुला लंकेंत आणणारा दुसरा दशमुख कोणग भेटला? प्रिये मुद्रिके, प्राणनाथ माझ्या वियोगानें अत्यंत कृश झाले आहेत, हें सांगून तद्विरहानें मी किती कृश झालें आहें, हें पाहण्याकरितांच काय येथें आलीस! अगा हे मत्प्राणनाथसेवका, बा असा जवळ बैस ये. अतां तुझा त्यांचा कांहीं तरी संबंध आहे, असें मला खास वाटतें. पण कामरूप घेणारांना अशी मुद्रिका बनविणें काय कठिण आहे! मीं तुझ्यावर पूर्ण विश्वास ठेविला. मग तुला जें कांहीं कर्तव्य असेल तें खुशाल कर. तर, हे प्रियकर दूता, तूं कोण? तुझें नांव काय? त्यांचा तुझा सेव्यसेवक-संबंध कसा जुळला? तूं येथें कसा आलास? तुला येथें कशाला केव्हां व कोणीं पाठविलें? प्राणनाथ सांप्रत कोठें काय करीत आहेत? लक्ष्मणभा-वोजी कोठें आहेत? ते काय ह्मणतात? ते उभय बंधु मजवर कितपतसे रागें भरले आहेत? मला काय ह्मणतात? त्यांची मला काय आज्ञा अथवा नि-रोप आहे? ते कोणत्या स्थितींत आहेत? ते काय खातात? कोठें बस-तात? त्यांस निद्रा येते कीं नाहीं? पर्जन्याचे दिवस त्यांनीं कोठें घालविले? माझी आठवण ते काढितात कीं नाहीं? मी येथें आहें हें त्यांस कसें, कोठें व केव्हां कळलें? ते मला येथून नेण्याविषयीं कोणत्या उपाययोजनेंत आहेत? इत्यादि सर्व कांहीं, ह्या विदेशीय विरहिणीस्त्रीला कृपा करून सांग. मी त्यांचें कुशल वृत्त जाणण्या-विषयीं अत्यंत आतुर झालें आहें.

**बटु**—स्वामिनि, मी आपल्या पवित्र चरणांचा सेवक आहें. आ-पणांस सर्व सांगतों. आपलें चरित्र व रामकथा हीं फारच हृदयं-गम आहेत. धर्म, नीति, सदाचरण, मातृपितृभ्रातृपतिपत्नीप्रेम, भक्ति, दया, क्षमा, शांति, अलोभ, नम्रता, समबुद्धि, बंधुप्रीति, दृढनिश्चय, विलक्षण पराक्रम, अद्भुत चमत्कार, इत्यादिकांनीं हीं ओतप्रोत भरलेलीं आहेत. ह्यांच्या श्रवणानें, कथनानें किंवा मननानें अन्तःकरण पवित्र होऊन बुद्धि उदार होते. कुमार्गापासून मन वळतें. कामक्रोधादिरिपु सहज ह-स्तगत होतात. जगांत आपलें खरें कर्तव्य काय तें समजतें. अर्थात् आपलें उभयतांचें चरितामृत प्राणिमात्रास उभय लोकीं सद्गति देणारें

आहे, अशी माझी दृढ बुद्धि झाली आहे. व अशीच माझ्याप्रमाणं पुढें अनंत कालपर्यंत लोकांची दृढबुद्धि राहो व ते आपलें उभय लोकीं खरें हित साधून घेवोत! असो. आपले प्राणनाथ व दीर लक्ष्मण ह्यांची व माझी गांठ पडल्यावर रामचंद्रांनीं आपलें सर्वांचें मुळापासून कळविलेलें सविस्तर वृत्त, त्याचप्रमाणें आपला विरह झाल्यापासून माझी भेट होईपर्यंत त्यांनीं अत्यंत सदयहृदय होऊन अश्रुपूर्वक सांगितलेली आपली स्थिति, नंतर त्यांच्या सहवासानें असणाराला मला त्यांची ठाऊक असलेली वृत्ति व रामचरणारविन्द सोडून येथें येईपर्यंत मार्गांत घडून आलेले प्रसंग, हीं सर्व मला यथातथ्य सांगतां कशीं येणार! कोठें रामचंद्रजींची मधुर, शुद्ध, अस्खलित, वर्णनपर व करुणायुक्त वाणी! व कोठें ह्या सेवकांची तद्विरुद्ध वाणी! तशांत हा समय व हें स्थळ, सविस्तर वृत्तान्तकथनाला सर्व प्रकारें अयोग्य आहे, ह्मणून तिकडील वृत्त अगदीं थोडक्यांत आपल्यास निवेदन करितों. ह्यावरून सविस्तर वर्तमानाची आपण कल्पना करालच.

सीता—बटो, ह्या अबलेवर जेवढी कांहीं कृपावृष्टि करशील तेवढ्यानेंच ही तृप्त होईल बरें!

बटु—देवी, ऐकावें तर. श्रीरामचंद्र अनुत्सुक असतांही आपल्या आग्रहास्तव त्या हरिणामागें गेले. त्या चपलपशूस धरण्याचे हेतूनें प्रथमतः रामचंद्र हलके हलके जाऊं लागले! ह्याप्रमाणें जातां जातां बराच वेळ गेल्यानंतर तो पशू मोठ्यावेगानें पळूं लागला! रामचंद्रही त्याप्रमाणें त्यास अनुसरूं लागले!! शेवटीं ‘ हा सुंदर हरिण आपल्या प्राणप्रियेच्या इच्छेप्रमाणें जीवन्त सांपडत नाहीं, ” असें ते ह्मणाले, व लगेच त्यांनीं धनुष्यास बाण जोडला. तत्क्षणीं त्या कनकमय, सुंदर व आपणास मोह पाडणाऱ्या हारिणानें “लक्ष्मणा, धांव, लौकर धांव. मी मोठ्या संकटांत आहें!” असे रामवाणीप्रमाणें शब्द उच्चारिले! व रामचंद्रानीं बाण सोडतांच तो हरिण, कांहींसें अस्पष्ट बोलून, मरण पावला! मरणसमयीं त्यानें आपलें राक्षसीरूप घेतलें होतें. तें रूप पाहतांच हा ताटकापुत्र मारीच होता, असें त्यास कळलें! त्या संबंधानें मला त्यांनीं सविस्तर इतिहास सांगितला, त्यांतील सार इतकेंच कीं, हा पूर्वीं आपली माता व बंधु सुबाहु ह्यांसहवर्तमान मलद व क-

रूपक ह्या प्रांतांच्या मध्यें राहात असे, व ऋषींस अनेक प्रकारें पीडा देई. महान् तपस्वी विश्वामित्र ह्यांच्या यज्ञांत विघ्न आणणारांपैकीं हीं तिवें प्रमुख होतीं. रामचंद्रांनीं त्यावेळीं, अर्थात् आपल्या स्वयंवरापूर्वी, ताटकेस व सुबाहूस ठार मारिलें व हा एवढा बलवान् असतांही रामबाणाच्या पिसाऱ्यानें तेव्हां कोठच्या कोठें उडून गेला होता! एके दिवशीं पंचवटींत आपण तिघे वनविहार करण्याकरितां फिरत असतां "हे तीन-हरिण दिसतात हे खचित राक्षस आहेत," असें रामचंद्रांनीं आपल्यास सांगून तिघांवरही बाण टाकिले होते. पैकीं दोघे तत्काळ मेले. व हा राक्षस रूपानें पळत सुटला. मग त्याच्यावर त्यांनीं दया केली. तोच हा कनकमृग-रूपधारी मारीच.

सीता—बटो, आणखी ह्या राक्षसाविषयीं इकडे आल्यावर मला इतकें कळलें कीं, प्राणनाथाचें विलक्षण सामर्थ्य व लोकोत्तर पराक्रम पाहून ह्या राक्षसास असें वाटलें कीं प्राणनाथाचें जन्म केवळ राक्षसांच्यात्र संहरणार्थ आहे! दुसऱ्यावेळीं प्राणनाथांनीं त्याच्यावर दया केल्यावर तो मोठ्याभक्तीनें वनांत तपश्चरण करूं लागला. परंतु माझ्या मतीस भ्रष्ट करून मला मोह उत्पन्न करणारें जें त्यानें हरिण रूप घेतलें तें केवळ चौर्यकर्म करणाऱ्या दशाननाच्या आग्रहास्तवच होय. रावणानें त्याच्या आश्रमांत येऊन, मला मोह पाडण्याकरितां कनकमय हरिणरूप घ्यावें ह्मणून त्या तपश्चर्या करणाऱ्या मारीचास नाना प्रकारें विनविलें असतां, त्यानेंही प्राणनाथांचे पराक्रमाविषयीं बोलून त्यास फारच हृदयंगम उपदेश करून तसें रूप घेण्यांचें नाकारलें. तो जें कांहीं रावणास बोलला, त्यावरून तो राक्षस प्राणपतीस किती भीत होता तें पहा. तो ह्मणाला, "दशाननमहाराज, रामालाच मी केवळ भितों असें नाहीं, तर त्या रामनामाला सुद्धां भितों! अहो केवळ रामशब्द उच्चारतांच मी भयानें कंपित होतों असें नाहीं, तर र-नें प्रारंभ असणारे रथ, रत्न, राज्य, रमणी-असे यच्चयावत् शब्द मला अत्यंत भीति उत्पन्न करितात!" नंतर रावणानें, जेव्हां त्यास स्वतः ठार मारण्याची भीति दाखविली तेव्हां सुवर्णमृग होऊन प्राणनाथाच्याच हस्तें मरण्याचा त्यानें दृढ निश्चय करून तो मारीच अशा रीतीनें मेला.

बटु—असें काय? असो. पुढें—हें एकंदर त्या राक्षसाचें कपट पाहून

रामचंद्रास मोठें आश्चर्य वाटलें, व तत्क्षणीं त्यांस मोठी काळजी उत्पन्न झाली कीं, " माझ्या वाणीसारखी राक्षसानें उच्चारलेली ही भयप्रद वाणी ऐकतांच लक्ष्मण इकडे लांब माझ्या शोधार्थ धांवत येईल! व जानकी एकटी तिकडे राहील! तरी तो दूरदृष्टि बंधु ह्मणत होता कीं, हें सर्व कपटनाटक आहे! परंतु प्राणप्रियेच्या मधुर शब्दामुळें, मला इकडे यावें लागलें! ही हांक माझी नव्हे, कपटाची आहे, असें लक्ष्मणाला वाटून तो कदाचित् इकडे येणार नाहीं. परंतु प्रियेच्या कर्णांत मी मोठ्या संकटांत आहें, अशा अर्थाचे हे कपटमयशब्द पडतांच लक्ष्मणास ती त्यास्थळीं क्षणभरही राहूं देणार नाहीं, किंवा त्याचें कांहीं ऐकणारही नाहीं! काय तिकडे होईल कोण जाणे. आमच्या नाशार्थ ह्मणून ह्या मायावी राक्षसांनीं काय संविधानक रचिलें आहे, कोणाला ठाऊक! लक्ष्मण तिला जरी बरोबर घेऊन येईल तरी फार बरें होईल! परंतु तिला यावयाला उशीर लागेल ह्मणून ती कदाचित् येणार नाहीं. एकूण हा हरिण माझ्या प्रियेस हरणरूप होणारना!" ह्याप्रमाणें त्यांची अन्तःकरणस्थिति होऊन अत्यंत श्रांत झाले असतांही कोठें विश्रांति न घेतां तिकडून आपल्याकडे यावयास रामचंद्र निघाले. व इकडून आपल्या वाग्बाणजालानें अत्यंत पीडित व म्लान झालेला तो विमलान्तःकरण लक्ष्मण आपल्या ज्येष्ठ बंधूकडे मोठ्या जुलुमानें मग जावयास निघाला. त्यांची बराच वेळानें मार्गांत गांठ पडली! तेव्हां रामचंद्रानीं अगोदर " अरे! प्रिया कोणीकडे आहे? " हा प्रश्न करून मग " अरे काय केलेंस हें? तिला एकटीला टाकून मूढासारखा कसा इकडे आलास? तिला कोणी राक्षस नेणार नाहींत का? किंवा कोणाच्या भक्ष्यस्थानीं ती पडेल तर? अरे तुला एकटें यावें असें वाटलें तरी कसें? सध्या राक्षसांनीं काय कपटप्रकार चालविले आहेत, हें तुला ठाऊक असूनही तूं कसा असा भ्रांत झालास? ती माझ्या सारखी कपटमय हाक ऐकून तूं आलास काय? अरे! त्या हरिणरूप घेणाऱ्या मारीचाची ती हांक होती! मी तुला स्वरक्षणार्थ कशाला हांक मारणार? अरे आलास तर आलास, पण माझ्या प्राणप्रियेला घेऊन यावें कीं नाहीं! आज सर्वांच्याच बुद्धि कशा गुंग झाल्या!" हें ऐकून लक्ष्मण ह्मणला "प्रियबंधो, आपलें बोलणें अगदीं सत्य आहे. आपल्या मुखांतून कधींही अशी दि-

नवाणी निघणार नाहीं, हें मला पक्कें माहीत आहे, ही खचित राक्षसवाणी असें मला तेव्हांच वाटलें. परंतु वहिनीबाईला तसें वाटलें नाहीं! ह्यास उपाय काय? मी इकडे येत नाहीं, ह्मटल्यामुळें त्यांनीं मजवर अश्राव्य शब्दांची बहुत वृष्टि केली! ह्मणून त्यांचें थोडक्यांत सांत्वन करून मला इकडे येणें भाग पडलें. बंधो, ती जे कांहीं शब्द बोलली त्यांहून जगांत कठोर असें कांहीं नाहीं, तिनें जें भाषण केलें, त्यापेक्षां आपला बाणही तीक्ष्ण नाहीं! तिच्या वाक्यांतील अर्थ, कल्पना व आशय हीं सर्व कांहीं अमंगळ व अनर्थोत्पादक होतीं. त्यावेळेस मजवर हा विद्युत्पातच झाला काय असें भासलें! त्यावेळचें तें तिचें भयंकर रूप काय सांगावें! आतां इकडे येण्याचे वेळेस मी अगदीं शुद्धींत नव्हतों, त्यामुळें तिला बरोबर घेण्याचें मला सुचलें नाहीं हें खरें. परंतु मी इकडे येण्याविषयीं तिची प्रार्थना केली असती तरी ती खचित आली नसती, असें मला त्या वेळच्या तिच्या स्थितीवरून खास वाटतें. प्रियबंधो, पर्णकुटिकेहून मी हिला, संभाळून रहा वगैरे सांगून निघालों होतों. तरी कित्येक वेळां जाऊं नयेसें वाटून मागें फिरलों! परंतु जानकीनें पाहिलें तर तिला फार वाईट वाटेल, असें समजून तिला दिसल्याशिवाय पुनःपरतलों! जेव्हां मला अपशकुन झाले व मनालाही इकडे येण्याविषयीं उल्हास नव्हता, तेव्हां तर आपण परत येईपर्यंत जवळच एका वृक्षाखालीं लपून रहावें असेंही मनांत आलें! परंतु तिच्याशीं असें कपट करणें महापाप वाटून आपल्याकडेसच यावयास निघालों." ह्याप्रमाणें ते आपल्याविषयीं बोलत बोलत पर्णकुटिकेकडे येत होते. रामचंद्रांनीं लक्ष्मणापाशीं आपल्या संबंधानें "माझी प्रिया फार फार भोळी असून तिच्या मुखांतून असे अत्यंत कठोर शब्द कसे निघाले! मला हें वृत्त ऐकून फार वाईट वाटलें आहे!" इत्यादि जे अनेक उद्गार काढिले त्यांत हाही आणखी एक होता कीं "लक्ष्मणा, अरे तू निघून येतांच त्या शुद्धान्तःकरण स्त्रीला फारच अनुताप झाला असेल, त्यामुळें ती आतां काय करील नकळे! आतां ह्यांना हें मुख दाखवावें कसें? असें ह्मणत असेल!"

**सीता**—द्विजसुता, अरे खरोखरच तत्क्षणीं मला तसा पश्चात्ताप झाला. व अजूनही तो जशाचा तसाच आहे. त्यांना तोंड दाखवि-

ण्याची मला इतकी कांहीं लाज वाटत आहे कीं, मरण आलें तर बरें. असें मला त्या समयाची आठवण झाली ह्मणजे वाटतें. व तो समय तर डोळ्यांपुढून एक क्षणही दूर होत नाहीं!

वटु—खरें आहे तें. पश्चात्तापानें अशी स्थिति व्हावयाचीच. पुढें असें झालें. ते त्या पर्णकुटिकेंत आले तों आपण आंत नाहींशा पाहून त्यांच्या अन्तःकरणांत चर्र झालें! मुखांवर लगेच उद्विग्नता ठळठळीत दिसूं लागली! नयन अश्रूंनी व्याप्त झाले! वाणीमध्यें फेर पडला! त्यांस शक्ति नाहींशी वाटूं लागली! धैर्य गळूं लागलें. आपण वाढविलेले व आपल्या संगतीनें अत्यंत सुख भोगणारे ते हरिणमयूरादि मुके प्राणी भिऊन इकडून तिकडे फिरत असतां त्यांच्या दृष्टीस पडले. ते आपल्यास तितक्यांत शोधीत असतां हे प्राणीही त्यांचे सभोंवती दुःखितमुद्रेनें फिरत होते! कित्येक तर अश्रु गाळीत रावणानें आपणास ज्या दिशेनें नेलें तिकडे जाऊं लागले! आपण कोठें नाहीं असें पाहून रामचंद्र एकदम करुणायुक्त व रोदनमिश्रित स्वरानें मोठमोठ्यानें ह्मणाले, "हा वत्सा लक्ष्मणा! स्वयंवरामध्यें हजारों राजांस टाकून जिनें प्रेमानें ह्या कंठांत माळ घातली, ती आज माझी प्रिया जनकनंदिनी कोठें गेली? जी अयोध्येंत असतां मन्मातृप्राण होऊन राहिलेली व सर्वांस मातृप्रेमानें पाहणारी ती माझी प्रिय प्राणेश्वरी कौसल्यास्नुषा व लोकमाता आज कोणीकडे रममाण झाली? माझा पिता जीवर जनकाप्रमाणें ममता करून 'अग कन्ये जानकी' ह्मणून हांक मारी, तिनें ह्या समयीं माझ्या प्रिय पित्यास भेटण्याकारितां स्वर्गीं गमन केलें काय? मजबरोबर वनांत येऊं नको, ह्मणून मी ह्मणत असतां, जिनें मला पतिव्रताधर्म सांगून मला पुढें "तूं वनांत येऊं नको," असें बोलूं दिलें नाहीं, त्या पतिव्रताश्रेष्ठेनें, माझी ज्यांत गरज नाहीं असें आज कोणतें तरी व्रत आरंभिलें? लक्ष्मणा, जिच्यानें वनांत चालवेना, ती माझी कोमलचरणा स्त्री कोठें आहे? जी आपल्या मधुर वाणीनें मला सदा संतुष्ट ठेवी, ती कोकिलवाणी ह्या शिशिरऋतूमध्यें कोणत्या वनांतरीं गेली? वत्सा, जिच्या संगतीनें हा वनवास आह्मांस अयोध्यावासापेक्षांही सुखकर झाला होता, ती सर्व सुखाची खाण कोणीं हिरावून नेली? हाय! हाय! तिला खचित राक्षसांनीं कोठें लांब नेऊन भक्षिली

असेल ! सीते, जानकी, मत्प्राणेश्वरी, तूं ह्या रामाला वरून अशी क-ष्टतम दशा भोगावीसना? ह्या अभाग्यानें तुला सुखाचा लेश सुद्धां दिला नाहीं! अग, प्रिये, तूं कोठें लपून बसली आहेस काय? ब-सली असशील! मी मोठ्यानें तुला हांक मारितों, मला ओ रूप अमृत पाजग! ह्मणजे त्या स्थळीं मी येऊन कडेवरून तुला ह्या उट-जांत आणीन! गुणसरिते, सौंदर्यलते, भामिनी, तूं आह्मांस कोठून तरी पहात असशील, पण तें मृगचर्म मजजवळ नसल्यामुळें तूं रागा-वली असशील! परंतु प्रिये अगोदर मजजवळ ये.तो सर्व हरिणवृतान्त ऐक म्हणजे मग तूं आह्मांवर रुसावें किंवा आह्मीं तुजवर रागवावेंस हें तूंच सांगशील.अग सीते,अग जानकी,मत्संतापहारिणी,मनोहारिणी अग शुभदर्शने, चंद्रानने,कमलनयने,तुला कोठें पाहूं? अग,ह्या दीन रामभी-नाचें तूं जीवन आहेस. अग ये लौकर, ह्याला दृढालिंगन दे." ह्याप्रमाणें रामचंद्रांनीं तुह्मांसाठीं दुःखी होऊन फारच शोक केला. त्या दोघांनीं प्रथमतः गोदावरीतीरावरील तुमचीं जाण्याचीं सर्व स्थळें शोधिलीं. त्यांबरोबर ते मुके प्राणीही भटकत होतेच! त्यांजकडे पाहून रामचंद्र ह्मणाले, "प्रिये, अगे ज्यांचें तूं पुत्रवत्पालन केलेंस ते दीन पशुपक्षी आपली माता कोठें गेली ह्मणून पाहत आहेत,त्यांची तरी तुला दया येऊं दे." नंतर लौकरच सूर्य अस्तास गेला. ती पर्णकुटिका जवळ होती,तरी ते त्या रात्रीं तेथें गेले नाहींत.ती रात्र त्यांनीं एका वृक्षाखालीं जागून मोठ्या दुःखानें आपल्या गोष्टी बोलून घालविली. प्रातःकाल होतांच पुनः ते त्या पर्णशालेंत जाऊन वल्कलें वगैरे घेऊन तेथून आ-पल्या शोधार्थ भटकत फिरूं लागले. ते दोघेही बंधु फारच शोका-कुल होऊन गेले. परंतु लक्ष्मणानें आपला शोक बाहेर विशेष व्यक्त केला नाहीं. तो रामाचें वारंवार सांत्वन करावयास जाई व त्यांस धैर्य धरण्याविषयीं सांगे. आपल्या शोधार्थ त्यांनीं हजारों स्थळें पा-हिलीं. अनेक तर्क केले. अनेक प्रकारें आपले गुण आठविले. त्यांना कांहींच सुचेना. पाणी प्यावयाचें सुद्धां त्यांनीं कांहीं दिवस सोडिलें होतें! ते अगदीं वेड्यासारखे झाले. रामचंद्र तुमच्या संबंधानें हवें तें बोलत व अनेक प्रिय संबोधनें देऊन मोठमोठ्यानें तुह्मांस हांका मारीत! व पुढें वृक्षलागो, दगड दिसो, पशुभेटो, पक्षि असो त्यास कडकडून

आलिंगन द्यावयास जाऊन " माझी प्रिया मिथिलेशकुमारी कोठें पाहिलीत काय? " ह्मणून त्यांस प्रश्न करीत. एकया स्थळीं प्रफुल्ल लाल वृक्ष त्यांस दिसले. तेव्हां तर " लक्ष्मणा, माझ्या प्राणप्रियेचें जीवित हरण करणारे हेच ते रक्तानें माखलेले राक्षस, " असें ह्मणून रागानें त्यांवर बाण सोडीत असतां लक्ष्मणानें त्यांचें निवारण केलें ! आणखी अरण्यवासी जनावरांशीं " हे हरिणा, माझी हरिणाक्षी कोठें आहे? हे मयूरा, माझी चित्रविचित्र वेष करणारी मज्जीवन जानकी कोणत्या दिशेस गेली ? कोकिले, प्रिया कोकिलवाणी कोणीं बंदींत ठेवली? हे हंसा, ती हंसगति कोठें आहे? हे गजेंद्रा, ती गजगमना माझी प्रिया ह्यावेळीं कोठें आहे बरें? अरे सिंहा, अरे व्याघ्रा, तुह्मीं जर तिला भक्षिलीत असाल तर तसें खुशाल सांगा. ह्मणजे मीही तुमच्या भक्ष्यस्थानीं पडेन! मात्र खरें बोला. नाहीं तर ती जीवंत असल्यास मोठा अनर्थ होईल. अहो सर्ववनवासिप्राणीहो, मी तुह्मांस कांहीं शिक्षा करणार नाहीं. तिच्याविषयीं कांहींही दुःखद वर्त्तमान असलें तरी मला खुशाल सांगा. " ह्याप्रमाणें ते भाषण करीत. अहो, हें वृत्त ऐकून आपल्या नयनांतून वरचेवर पडणाऱ्या अश्रुबिंदूंनीं, श्वासोच्छ्वासांच्या योगानें व आपल्या मुखचर्येवरून आपणांस फार दुःख झालें आहे, हें मला समजलें. परंतु ह्या सेवकाच्या हें दुःखमूलक-वर्त्तमान सांगण्याचें नशिबीं आलें आहे. ह्यास उपाय नाहीं. परंतु मला एवढाच आनंद वाटतोकीं, मी जें त्यांचे मुखांतून वृत्त ऐकिलें आहे, त्याच्या शतांशही मला आपल्यापुढें सांगतां येत नाहीं! आणखी ऐका. " लक्ष्मणा, तूं वनांत माझी पुष्कळ सेवा केलीस, मला नानाप्रकारें साहाय्य केलेंस, मजसाठीं व माझ्या प्रियेसाठीं तूं महान् महान् कष्ट सोशिलेस. तुजसारखा सत्वगुणी कोणी कधींही मिळणार नाहीं. तुजसारखा उदारप्रकृति, निष्कपट, स्वसुखनिरभिलाष व पुण्यशील असा पुरुष क्वचित् दृष्टीस पडेल. बंधुप्रेम हें तुमच्याच ठिकाणीं पूर्णत्वानें रहात आहे. वत्सा, तूं आतां अयोध्येस परत जा. मी ह्या विरहरोगानें वांचत नाहीं. अरे हा रोग सर्व प्रकारें असाध्य आहे. जा माझ्या प्रियभरतास सांग कीं, " चौदा वर्षें होतांच मी येत नाहीं, त्याचे अगोदरच प्रियपित्यास भेटावयास जाणार! ह्या रामाच्या संगतीनें जो कोणी राहील तो सदा दुःखविभागीच होईल! भरता, तूं मजसाठीं फार फार रे शोक

कैलास! मजसाठीं वल्कलजटाधारी वनवास! राज्य टाकलेंस, प्रियमातेला बोलूं नये तेंसुद्धां बोललास. परंतु हाय!हाय!शेवटीं माझ्याहातून तुझी इच्छा पर्ण होत नाहीं! प्रियबंधो, तुझी इच्छा तरी काय! तर चौदावर्षें होतांच नंदिग्रामीं मीं तुला भेटावें व तुजसह मीं अयोध्येचें राज्य करावें, हीच काय ती होती! तुह्मीं आतां तिघांनीं मिळून एक विचारें राज्य करा आणि प्रजांस व मातांस सुख द्या.भरतशत्रुघ्न व माता आह्मांसाठीं फार शोक करतील, तरी त्यांस नीट समजावून सांग. तूं मोठा धैर्यशील आहेस. दुःखिताच्या अन्तःकरणास कसें सुखवावें हें सर्व तुला कळतें आहे. वसिष्ठमहाराजांना माझे अनंत प्रणिपात सांगून ही दुःस्थिति निवेदन कर.अरे, दैवाच्या सुगतीनें जर जनकजेचा व माझा संयोग झालाच, तर मी खचित अयोध्येस येऊन राज्य करीन. परंतु लक्ष्मणा, सीतेची भेट आतां कशानें रे होणार? जानकीच्या ह्या पुढील वृत्तान्तानें आणखी असह्य दुःखभरानें दडपून जाणाऱ्या तिच्या मातापितरांच्या अन्तःकरणास आतां समाधानकारक होईल,असें भाषण तरी तूं काय करशील! जा सर्व प्रजांस सांग कीं, राम जर तुमचा राजा होता, तर तुह्मां सर्वांस त्यामुळें महद्दुःख झालें असतें. कारण विधीनें त्याच्या सहवासाचें फळ आपत्तीच लिहिलेलें आहे! मला अशा स्थितींत ठेऊन जाण्याला तुला कांहीं एक दोष नाहीं. जा तर जा." असें रामचंद्र बोलत असतां लक्ष्मणाचा भव्य मुद्राप्रदेश अनेक मनोविकारांच्या रंगांनीं मिश्रित झाला! व क्षणभर तो तटस्थ झाला! त्याच्या तोंडांतून शब्द निघेना! बोलावयाचा यत्न करी,परंतु त्याला रडें कोसळे! तें आटपायाला जाई तों श्वासोच्छ्वास जोरानें चाले! अशा अवस्थेंत असतां तो ह्मणाला "प्रियबंधो, असें काय आपण बोलतां हें? मला अयोध्येंत जावयास सांगतां? मी कसा बरें जाईन? तें सर्व असो.आपण जानकीसाठीं असें दुःख करणें योग्य नाहीं. अहो जानकीच्या केशाग्रास तरी धक्का लावील असा भुवनत्रयांत कोण समर्थ आहे? आपला अत्यंत तापप्रद प्रतापसूर्य सदा उदित असतां, जानकी कोठें आहे, हें शोधून काढणें मोठें कठिण आहे काय? आपली ज्यावेळीं ती नव्हती,त्यावेळेस तिला मिथिलेंत स्वयंवरमंडपांत शोधून काढलीत. आतां तर ती आपली प्राणेश्वरी आहे.मला सांगा मी आपल्या चरणप्रसादानें तिला, ती असेल तेथून घेऊन येतों. महाराज धै-

र्य धरा. प्राकृत पुरुषाप्रमाणें शोक करणें आपल्यास शोभत नाहीं. आपल्यास प्रताप दाखविण्याचा हा एक सुप्रसंग आला आहे, ह्मणून आपण एकप्रकारें आनंदांत असावें! अत्यंत प्रेमामुळें ही आपली अशी अवस्था होणें हें बरोबरच आहे. प्रेमामुळें मनुष्य काय करील ह्याचा नेम नाहीं.परंतु विचार व धैर्य यांचें अवलंबन केल्याशिवाय शोक कधीं नाहींसा होणार नाहीं. शोकसागर आहे तो. त्याला अवकाश मिळेल तसतसा तो वाढणार!तर पुनः पुनः मी हात जोडून सांगतों कीं, धैर्य धरा. धैर्यानें सर्व कांहीं प्राप्त होतें. तपश्चरण तरी काय आहे? तर हें एका प्रकारचें धैर्यच आहे. प्रियबंधो, आपण पुरुष, आह्मी दोघे एकत्र व एकमेकांस साहाय्यकर्ते असून आपली जर अशी अवस्था होते, तर मग सर्व प्रकारें असाहाय्य झालेल्या आणि कोठच्या कोठें महत्संकटांत पडलेल्या त्या जनकनंदिनीनें किती शोक करावा बरें?" नंतर राम ह्मणाले, "अशा प्रसंगीं धैर्य व विचार ह्यांचें अवलंबन करावें ह्मणतोस,हें अक्षरशः खरें आहे.परंतु हीं जेथें उत्पन्न व्हावयाचीं तें माझें अन्तःकरणच माझ्या प्रियेनें आपल्याबरोबर नेलें आहे! माझ्या प्रियेतमेचे किती ह्मणून गुण आठवावे!स्त्री हें पुरुषाचें अर्धांग ना?मग अर्धांग गेल्यावर तो रोगी होऊन त्याला वेड नाहीं का लागावयाचें? ह्या विस्तीर्ण जगांत त्यास क्षणोक्षणीं आपण पंगु,दीन,अनाथ असें नाहीं का वाटणार? लक्ष्मणा, अरे ती पहा, पहा, प्रिया धांवत आहे अशी मला वाटते! ही पहा माझ्या डोळ्यांसमोर दिसते! कोठें गेलीशी वाटत नाहीं! एक कांहीं बोलते आहे! प्रिये ये! एकदां मला दृढालिंगन देग!" हें ऐकून लक्ष्मण ह्मणाला, "प्रियबंधो,हा तुमचा अत्यंत शोक ह्या सकल अचेतन सृष्टीसही रडवावयास लावील! मग माझी आपल्या ह्या विलापरवानें व उन्मत्तपणानें काय बरें स्थिति होईल? अत्यंत प्रेमामुळें प्राणिमात्राची काय स्थिति होईल ह्याचा नेम नाहीं! प्रियबंधो,आपलें स्वस्त्रीच्याठायीं जें कांहीं प्रेम आहे, तें कशानेंही स्पष्ट करतां यावयाचें नाहीं, त्याला उपमा नाहीं,इयत्ता नाहीं, तें वाणीला अगोचर आहे, तें अभेद्य,अकथनीय व अत्यंत पवित्र ह्मणून जणूं ब्रह्मरूपच असें आहे! आपण अरण्यांत कितीही फिरलांत, कसेही रडलांत, पाहिजे तितके ओरडलांत, हवें तें बोललांत, कितीही दैन्य दाखविलेंत, तरी जानकीवरील प्रेम आपल्यानें लवलेशही

प्रकट व्हावयाचें नाहीं, हें मी जाणतों. मग हा शोक करून आपण काय करणार? व काय दाखविणार?" "लक्ष्मणा" रामचंद्र ह्मणूं लागले. "तर मी काय रे करूं? प्रियेसाठीं मला शोकसुद्धां तूं करूं देत नाहींस! अरे स्त्रीच्या प्रेमाचा अद्यापि तुला चटका नाहीं, ह्मणून मला आशा गोष्टी सांगतोस! वत्सा, तिला लग्नापासून माझा वियोग कसा तो ठाऊक नाहीं. अयोध्येंत असतां कोठें फिरावयास गेलों, ह्मणजे तिनें "कोणत्या वेळीं परत येणें होईल?" ह्मणून विचारावें. आणि एकादे वेळेस कार्यान्तरामुळें यावयाला थोडा जरी उशीर झाला तरी ती किती घाबरी होत असे ह्मणून सांगूं? तिचा माझा विवाहसंबंध घडून पंचवीस एक वर्षे झालीं. ह्या एवढ्या काळांतील प्रत्येक दिवसाचें तिचें पवित्र चारित्र मला डोळ्यांपुढें दिसत आहे! अशी स्त्री ह्मणून व्हावयाची नाहीं. काय तिची पतिपरायणैकता सांगावी! वत्सा, अशा स्त्रीचा पतीला वियोग म्हणजे, काया व आत्मा ह्यांचाच वियोग होय! लक्ष्मणा, आपण होऊन ती खचित कोठें गेली नाहीं. तिला बलात्कारानें कोणीं तरी अर्थात् राक्षसानें नेलें असेल! हाय हाय! ती आतां जीवन्त कशी राहणार? अग हे मन्नयनकर्पूरिके, चंद्रानने, पतिव्रताहृदयानंदकारिणी, तूं ह्यावेळीं कोठें आहेस? वत्सा, मला जानकी दाखीव. तिच्यावांचून जगतांत आतां काय पाहूं? काय करूं? कोणाशीं बोलूं? कोणाला दृढालिंगन देऊन अन्तःकरणशुद्धि करूं? तिच्या वांचून ह्या रामाला अमृतपान कोण करविणार? ती अत्यंत शोकाकुल होऊन हा जीवलोक सोडून गेली असेल! लक्ष्मणा, ती प्रेतरूप जरी एकदां माझ्या दृष्टीस पडती तरी मी अत्यंत कृतार्थ होतों. प्रिये, तुजवांचून ह्या जगांत मला एक पाऊलसुद्धां ठेववत नाहीं. लोक ह्मणत कीं ह्या रामाच्या कपाळीं सदा दुःख! राज्य गेलें, वनवास भोगावा लागला, पिता सोडून गेला, भरतास, मातांस व तुला दुःखित केलें. परंतु जानकीच्या सहवासानें मला जगांत दुःख ह्मणजे कांहीं आहे, असें वाटत नव्हतें. लक्ष्मणा, मी अगदीं श्रान्त झालों! येथें क्षणभर बसतों. तूं त्या अरण्यांत जाऊन जानकीला पहा. सौमित्रे, माझ्यावरील अत्यंत प्रेमास्तव ती अगदीं वेडी होऊन सदा बोलूं नये तें बोलली, परंतु ती पश्चात्तापानें आपल्यापुढें आतां येत नसेल! ह्यामुळें जवळपास कोठें ती लपून बसली असेल! तर तूं तिला मो-

ह्यानें ओरडून मांग कीं, "माते, तुजविषयीं माझ्या मनांत अल्पही द्वेषबुद्धि नाहीं. हें अरण्य आहे. येथें लज्जा, पश्चात्ताप, राग, हीं सर्व वेताचींच असलीं पाहिजेत! वहिनी, तर लौकर येऊन माझ्या ह्या शोकाकुल बंधूस दृढालिंगन देऊन मला अत्यानंद दे पाहूं." त्याप्रमाणें बंधुप्रेमास्तव लक्ष्मणानें खरोखर केलें. परंतु आपण कोठें दिसलां नाहीं, ह्मणून रामचंद्र व लक्ष्मण मार्ग क्रमीत पुढें चालले. बाईसाहेब, ह्या विरहावस्थेंत लक्ष्मण जर आपल्या प्रियभर्त्याबरोबर नसता, तर मला वाटतें कीं, मला त्यांचा सेवक होऊन आपल्याजवळ येण्याचा हा, वाईट ह्मणा बरा ह्मणा, प्रसंग आला नसता!

**सीता**—द्विजसुता, प्राणनाथाचा हा विलाप माझ्यानें आतां ऐकवत नाहीं! हृदयावर जसा काय मोठा दगड ठेवावा असें झालें आहे. तरी तो मला सांग. मी ह्या राक्षसनगरींत अत्यंत कठोर व दुष्ट राक्षसीच झालें आहें!

**बटु**—ह्याप्रमाणें त्यांनीं पुष्कळ दिवस पुष्कळ शोक केला! एकह्यानेंच काय तें समजा. त्यांनीं सांगितलेली आपली स्थिति मला कशी सांगतां येईल! आपणांस ही त्यांच्याच मुखांतून ऐकली पाहिजे. तरी तशा वेळींही आपल्या भेटीमुळें झालेल्या अत्यानंदाच्या योगानें पुनः रामचंद्रांनाही तुह्मांस यथास्थित सांगतां येणार नाहीं! असो.

नंतर त्यांस एक पर्वत लागला. त्याला पाहतांच रामचंद्र ह्मणाले, "हे पर्वतश्रेष्ठा, तुला रामभार्या जनकसुमेधानंदिनी, दशरथस्नुषा कोठें आहे, हें ठाऊक असलेंच पाहिजे. कारण तुला सर्व अरण्यप्रांत दिसत आहे. तर सांग तिची काय स्थिति झाली ती! न सांगशील तर ह्या बाणानें तुझी धूळ करून टाकीन! मग हजारों वर्षेंपर्यंत तूं प्रतिबंध केलेल्या वायूस तिला दशदिशांभर फेंकण्यास अगदीं सोपें पडेल! जर तूला हा स्थूल देह प्रिय असेल व शत्रूपासून पराजित होण्याची इच्छा नसेल तर, माझ्या प्रियेचा शोध लावून दे. लक्ष्मणा, हे वृक्ष पर्णरूप अश्रुबिंदु आह्मांपुढें ढाळीत आहेत! हे नानाविध पक्षी रडत आहेत! ही नदी शुष्क दिसते! ह्यावरून माझी प्रियकरणी खचितखचित जिवन्त नाहीं!" ह्याप्रमाणें अनेक कल्पना काढीत, हजारों तर्क करीत ते, निराशालहरींनीं युक्त शोकसागरच काय, दक्षिणदिशेकडे वळले व रम्यपर्वताग्रावर चढून आले!

नंतर रक्तानें स्नान केलेलाच काय, असा एक भयंकर मोठा प्राणी त्यांच्या दृष्टीस पडला. तत्क्षणीं ह्या राक्षसानें आपली प्रिया भक्षण केली असे उद्गार काढून रामचंद्र त्यावर बाण सोडणार इतक्यांत, लक्ष्मण पुढें जाऊन ह्मणाला, "हाच आपल्याला पूर्वी भेटलेला गृध्रराज जटायु! ह्याच्याविषयीं अगस्त्यमहर्षींनीं आपल्यास सर्व इतिहास सांगितलाच आहे! बंधो, ह्याचे कोणीं दुष्टानें पंख उपटून ह्याला मरणोन्मुख केलें आहे. ह्याचा श्वासोच्छ्वास बंद होत आला! हा पक्षिराज जणू प्राण सोडण्यास आमचीच वाट पाहत आहे! तर आपण अगदीं जवळ यावें.

सीता—माझ्या साठीं ज्यानें ह्या चौर्यकर्म करणाराशीं घटिकाभर युद्ध केलें, ज्याच्या विषयीं माझी अत्यंत पूज्य बुद्धि आहे, तो गृध्रराज अजून जीवन्त आहेना?

वटु—ऐका पुढील वृत्त. रामचंद्र व लक्ष्मण जरा पुढें गेले, तों तेथल्या आसमन्तात्भागाच्या दर्शनावरून तेथें ह्या पक्षिराजाचें दुसऱ्या कोणाशीं तरी बरेंच युद्ध होऊन तो येथून ह्याची अशी दशा करून निघून गेला असावा.आणि ह्या वृद्ध व अत्यंत बळकट पक्ष्याचा पराभव करणारा मोठा बलाढ्य शत्रु असला पाहिजे ह्यांत संशय नाहीं,असें त्यांस वाटलें! तेव्हा रामचंद्र अगदीं सदयान्तःकरण होत्साते त्याच्या संमुख जाऊन त्याच्या अंगावर हात फिरवुन ह्मणाले, "बा जटायो, तुझी ही अशी अवस्था कोणीं केली? तूं कोणाचा अपराध केलास किंवा कोणाचा अपराध तुला अक्षम्य वाटला?पक्षिराज,माझी प्रिया जानकी ह्या पर्वतशिखरावरून कोणीं नेत असतां तू त्या चोराशीं युद्ध केलेंस तर नाहींना? मला वाटतें होय!व हें सकल वृत्त अह्मांस कळविण्याकरितां अद्यापि कंठीं प्राण धारण केले आहेस! लक्ष्मणा, पहा ह्याच्या डोळ्यांतून सतत अश्रु निघूं लागले व हा मान हालवूं लागला! खचित ह्यानें प्रीयेसाठीं जीवदान केलें! हाय! हाय! हा मरण पावला! वत्सा, ह्याचे आह्मांवर महदुपकार आहेत. इतक्यांत लक्ष्मणास एक मूल्यवान् कर्णभूषण व दोन लहान सुवर्णघंटा बऱ्याच अन्तरावर दिसल्या. त्या अलंकारावर शिवमूर्ति असून त्यावर दशमुखाचें स्पष्ट नांव होतें. त्यावरून त्यांनीं तर्क केला कीं, तुह्मांला हरण करणारा दशानन होय.

व ह्या घंटा त्याच्या विमानाच्या असाव्यात, अशी त्यांच्या मनांत तत्क्षणीं कल्पना आली ! आणि ह्या दोघांचें द्वंद्वयुद्ध बराच वेळ झालें, असेंही त्यांनीं अनुमान बांधिलें ! त्यावेळीं त्यांनीं त्या परोपकारी पक्षिराजाची उपकारबुद्धि स्मरून त्याच्यासाठीं बराच शोक केला. व हा केवळ आपणास वडिलांसमान होय असें समजून त्या प्रेतास अग्नि दिला !

**सीता**—अहाहा ! काय त्या पक्षिराजाचें सत्यशील तरी ! मीं त्याप्रसंगीं दीनवदन होऊन हें वृत्त प्राणनाथास सांगण्याला हात जोडून त्याची विनंती केली होती. त्याप्रमाणें त्यानें केलें, हां ! शाबास ताता ! माझ्या प्राणप्रियास व भावोजींस हें वृत्त एकूण तेथें कळलें ! मित्रा, मला ह्या पक्षिराजाचें मरणवृत्त ऐकून फारच दुःख झालें आहे. माझ्या साठीं ज्यानें आपले प्रियप्राण सोडिले, त्याचे मीं उपकार कसे व केव्हां फडावे ? ज्यांचे मजवर उपकार आहेत, अथवा मजकडून ज्यांचा अपराध झाला आहे, अशांचें तत्संबंधी वृत्त जेव्हां माझ्या कर्णीं पडतें, तेव्हां अन्तःकरणाचें अगदीं पाणी होतें, व काय बोलावें हें समजत नाहीं ! हे द्विजशिशो, सांग पुढें काय झालें तें मीं सर्व निमुटपणें ऐकतें.

**बटु**—नंतर, आपल्यास रावणानें नेली असावी असें त्यांस वाटतांच लक्ष्मण ह्मणाला, “ प्रियबंधो, मिथिलेंत स्वयंवरमंडपात आपण ज्याच्या उरावरील तें शिवधनुष्य काढून ज्यास प्राणदान दिलेंत, तोच हा कृतघ्न दशानन बरें ! आपल्यास त्यावेळीं सीतारत्न प्राप्त झालें नाहीं ह्मणून आह्मीं पर्णकुटिकेंत नसतां, हें त्यानें चौर्यकर्म केलें ! हाच त्या शूर्पणखेचा भ्राता ! हा सर्व राक्षसांचा राजा आहे. मला वाटतें कीं राक्षसांचा विनाशकाळ आतां अगदीं जवळ आला ! आणि ह्मणूनच जानकीला त्यानें स्पर्श केला ! मी असें ऐकिलेलें आहे कीं, हा मोठा मायावी असून फार दुराग्रही आहे. आपल्या विलक्षण व अनुपम वैभवाचा त्याला अतोनात गर्व झाला आहे. त्यामुळें तो जगतास नानाप्रकारें त्रास व पीडा देत आहे ! त्याचें हें जानकीस्पर्शरूप पापकर्म आतां शेवटचेंच होय !” “ लक्ष्मणा, माझ्या प्रियेस कशा प्रकारें त्या अधमाधमानें नेलें असेल बरें ! अशा अमूल्य रत्नास त्या चोरानें स्पर्श तरी कसा केला ! त्यावेळेस त्या नीचास कांहींच भीति वाटली नाहीं

काय ? मतिमंदा, तुला जें रत्न वाटलें, तें रत्न नव्हे. तर तो स्वरूपीत अग्नि आहे अग्नि! व आपणा सर्वांस जाळून घेण्याकरितां त्याला तूं स्पर्श केला आहेस! मूर्खा रावणा, ह्या अग्नीला नेऊन आपलें सर्व प्रकारचें वैभव धुमसत ठेविलें आहेस नाहीं! तर आतां आह्मीं लौकरच त्या लंकानगरींत येऊन फुंकर घालून प्रज्वलित करितों! रावणा, ही माझी अमृतवल्ली तुला विषवल्लीप्रमाणें होऊन तुझा सर्वस्वी घात करील! अरे विंशतिभुजा! ज्या हस्तांनीं तिला स्पर्श केलास ते हात किंवा, हे दशानना, तिच्याशीं ज्यामुखांनीं अनीतीचें भाषण केलें असशील तीं मुखें, तोडून टाकण्यास हे पहा आम्ही लंकेंत आलों! तुला एकट्याला मारण्यासाठीं सर्व लंकेचा फडशा उडवावा लागेल! लक्षावधि स्त्रिया अनाथ होऊन तुला शाप देऊन तुझ्या ह्या कृत्यामुळें मलाही त्या नानाप्रकारें बोलतील! रावणा, आह्मीं दोघे तुझे मृत्युरूपच काय! त्या मुढाला माझ्या प्रियेला माझ्या स्वाधीन कर ह्मणून सांगून माझी पश्चात्तापपूर्वक क्षमा मागण्याविषयीं उपदेश करणारा त्या राक्षसनगरींत कोणीच शहाणा नाहीं काय! बरें वत्सा, माझ्या प्रियेला घेऊन तो चौर्यकर्मदक्ष कोणत्यास्थळीं बरें गेला असेल? त्याचा संचार चोहोंकडे आहे! असें म्यां ऐकिलें आहे! वत्सा, मग त्या जगत्सुंदरीचें दर्शन कशानें रे होणार! अरे कोठें ते कोट्यावधि मायावी राक्षस! व कोठें आह्मीं सर्वप्रकारें असाहाय्य दोघे बंधु! आतां त्या प्रियेला मी व मला ती सर्वप्रकारें मुकली. प्रिये, मला त्या हरिणापाठीमागें घालविण्याची तुला कशी तरी कुबुद्धि उपजली? आणि त्याहीपेक्षां ह्या सत्वशील वत्सास भयंकरशब्दांनीं ताडन करण्याची अत्यंत दुष्टबुद्धि तुला कशी प्रिय वाटली? मूढे! तुझा आणि रावणाचा आह्मांस ह्याप्रकारें दूर घालविण्याचा पूर्वी संकेतच ठरला होता काय? असली दुष्ट घातकी स्त्री, बरें झालें दूर झाली ती! हाय! हाय! स्त्रीविरहानें, मनोविकारास वश होऊन, मी वेडा झालों. ह्यामुळें माझ्या पवित्र अर्धांगावर मीं असा भयंकर आरोप केला! वत्सा, माझें व तिचें अंतःकरण एक आहे! अर्थात् तिला दोष देणें तो मलाच घेणें होय! प्राणेश्वरी, तुजविषयीं मुखांतून निघालेल्या दुष्ट उद्गारांविषयीं मला क्षमा, कर! सौमित्रे, माझ्या प्राणप्रियेकारितां मी आतां काय करूं? काय बोलूं? काय ऐकूं? कोणास भेटूं? कोणाचें साहाय्य

मागूं? कोणाला ममलत विचारूं? कोणाला शरण जाऊं? काय युक्ति योजूं? कोणता मार्ग स्वीकारूं? माझी कोणास दया येईल? जगतांत मजसारखा असा स्त्रीविरही अभागी दुसरा कोणी असेल काय? असल्यास त्यास मी यथाशक्ति अगोदर साहाय्य करीन! नंतर त्याचें कार्य पूर्ण झाल्यावर मला त्यानें साहाय्य करावें! परंतु त्याच्यापासून साहाय्य मिळावें एवढ्यासाठीं "मला जगतांत वास्तव्य नको, ह्यापेक्षां मरण चांगलें," असें ह्मणविणारा हा प्राणेश्वरीचा वियोग कोणास असावा, असें क्षणभरही मी इच्छीत नाहीं." ह्याप्रमाणें रामचंद्र नानाप्रकारें आपल्या विरहाच्या संबंधानें बोलत असून लक्ष्मण अन्तःकरणांत अत्यंत दुःखी असतांही बाहेरून धैर्य धरून त्यांचें सांत्वन करीत असे! देवि, आणखी ऐका त्यांचा थोडा विलाप. "लक्ष्मणा, फलपर्णपुष्परहित दिसणारी ही लता खचित सीता आहे! वत्सा, माझी प्रिया इतक्यांत कोठें तरी खास असली पाहिजे! ती अगदीं जवळ असूनही आह्मांस दिसत नाहीं, ह्मणूनच काय ह्या वेली आह्मांस हंसत आहेत! हा कोणी पक्षी समोर येऊन "तह्मी कोण?" अशासारखें कांहीं विचारीत आहे वाटतें! तर ह्याला सर्व स्पष्ट सांगितलें पाहिजे. तरच हा माझ्या प्राणप्रियेविषयीं शोध सांगणार! एकतर हे परोपकारी पक्ष्या." सूर्यवंशांत इक्ष्वाकु, रघु, दिलीप, अज, असे महान् महान् यशस्वी राजे होऊन गेले. त्याचे वंशांत जगद्विश्रुत अयोध्यापति दशरथमहाराज झाले. त्यांचा मी ज्येष्ठ पुत्र रामचंद्र. मी त्यांच्याच आज्ञेनें, हा प्रियबंधु लक्ष्मण व प्रिया जनकनंदिनी सीता, ह्यांसह तुमच्या सुसंगतीनें चौदा संवत्सर वनांत राहावें ह्मणून आलों. त्यास सुमारें तेरा वर्षें होत आलीं! तुमच्या सहवासानें बहुतेक काळ आह्मीं मोठ्या सुखानें घालविला. ज्या राक्षसांनीं ऋषींस व आह्मांस पीडा दिली, त्यांचें आह्मांस पारिपत्य करावें लागलें. पंचवटीमध्यें गोदावरीतीरीं, आह्मीं मोठ्या आनंदानें पर्णकुटिकेंत राहत असून एक दोन दिवसांत स्वनगरींत जावयास निघणार होतों, इतक्यांत माघशुद्ध चतुर्दशीस दोनप्रहरांनंतर आह्मी दोघेही आपल्या वसतिस्थानाहून कांहीं अन्तरावर कांहीं कार्यांत गुंतलों होतों. प्रिया पर्णशाळेंत एकटी राहिली. असा तिला एकटी राहण्याचा हा प्रथमच प्रसंग होय! आह्मीं तिकडून स्वस्थानीं आलों, तों ती पर्ण-

शाला शून्य होती. प्राणप्रिया कोठें आहे,ह्मणून आज किती दिवस एकसारखा शोकपूर्वक तिचा शोध चालविला आहे, परंतु तिच्याविषयीं कोणी कांहींच सांगत नाहीं. तूं दयाळू व परोपकारी दिसलास, व तूं होऊन आह्माविषयीं शोध केलास, ह्मणून तुला थोडक्यांत हें इतिवृत्त कळविलें. तर प्रियेची भेट करून दे, ह्मणजे मग मोठ्या आनंदानें माझें सर्व वर्त्तमान तुला निवेदन करीन !पक्षिश्रेष्ठा, ती प्रिया सुवर्णवर्णा, चारुदर्शना, कुटिलकेशा, सरलनासिका, मधुरवाणी, आलोलायतलोचना, सुहास्यवदना, कुंददंती, बिंबौष्ठी, कंबुग्रीवा, कृशोदरी, वलित्रयान्विता, मृगराजकटी, पृथुनितंबिनी, कोमलकरा, करभोरु, ताम्रपदपद्मा, लज्जावती, मितभाषिणी, मत्प्राणेश्वरी, अशी आहे." हाय! हाय! इतकें ऐकून घेऊन हा आमची कांहींच परवा न करितां पाठमोरा होऊन उडून गेला! लोक परदुःख इतकें शीतळ मानितात काय! अहो सर्व वनवासी हो, आज इतकीं वर्षें कृपा करून जसें आह्मांस साहाय्य करून सर्वप्रकारें आह्मांस रक्षिलेंत तसें ह्याही प्रसंगीं आम्हांवर दयालुत्व दाखवावें." हें ऐकून लक्ष्मण ह्मणला, "त्या गृध्रराजाकडून तेथें जें कर्णकुंडल व घंटिका सांपडलीं, त्यांवरून मैथिलीस रावणानें नेली, असें आपल्यास समजलें असतां, आतां वनांत जें कांहीं दिसेल त्यास प्रेमानें आलिंगन देऊन दीनवाणें होऊन सीताविषयीं काय पुसत बसतां? व त्यांजकडून कांहीं कळलें नाहीं ह्मणजे निराश व म्लानमुख होऊन फारच शोक करतां! हें पाहून माझेंही धैर्य नाहींसें होतें. हाय! हाय! अपणांस चेतनाचेतन, सज्ञान, अज्ञान कांहींच समजेनासें झालें! रात्रिदिवसांतील अंतर कळत नाहीं! रात्रीला सुद्धां दिवस समजून जानकीच्या शोधार्थ निघतां? चांदण्यास ऊन समजून चंद्रास ताप देणारा सूर्य मानतां! जें कांहीं रम्य, सुंदर, किंवा आनंदप्रद वाटेल तेथें व उदासीन किंवा ओसाड दिसेल त्याठिकाणींही सीता, असेल अशी कल्पना करून तिला नानाप्रकारें संबोधून हाका मारितां व वारंवार मूर्च्छित होतां! अशी आपली स्थिति झाली तर आपणांस जें कांहीं कर्तव्य आहे तें कसें होणार? बंधो, असें मनांत येऊन फार वाईट वाटतें! जानकीला ह्मणजे त्या राक्षसाधमानें लंकेंतच नेली आहे असें निश्चयानें जरी ह्मणतां येत नाहीं, तरी आह्मीजवळ येतांच त्या जटायूच्या प्राणत्यागावरून व ह्या भूषणांव-

रून अन्यप्रकारें विश्वसनीय शोध लागेपर्यंत ती लंकेंतच आहे,हा संभवनीय प्रकार खरा समजून आपला प्रयत्न तदनुरूप ह्मणजे लंकेंत जाण्याचा असावा! उगाच आतां रडून काय होतें? तर हा शोकजाण्यास लंकागमन केलें पाहिजे. तेव्हां दक्षिणेकडील मार्ग धरला पाहिजे. ज्याच्यापाशीं कांहीं माहिती मिळेल, अशापाशीं कांहीं पृच्छा केली तर चालेल. परंतु जें कांहीं पुढें येईल त्यास कांहीं तरी विचारीत सुटणें,येणें करून आपल्या कार्यास विलंब होतो. आपला पराक्रम मी जाणत आहें. जगांत आपल्यास असाध्य असें कांहीं एक नाहीं. तेव्हां आतां शोकाधीन न होतां धैर्यावलंबन करून दक्षिणदिशाभिमुख व्हावें." रघुवंशभूषण रामचंद्रांनीं लक्ष्मणाच्या ह्या भाषणाची फार स्तुति करून शोकसंबंधानें पुष्कळ भाषण केलें. तें ह्यासमयीं सर्व सांगितलें असतां सूर्योदय होण्याची भीति आहे. त्यांतील सर्व भाषणाच्या एका वाक्यांत नवनीतांश हाच कीं," प्रियेसाठीं जें मीं कांहीं करतों तें माझ्या कडून साहजिक होतें."

जनस्थानापासून ते दोघ बंधू तीन एक कोश गेले. नंतर त्यांस एक भयंकर अरण्य लागलें. त्याचें नांव क्रौंच. त्यांतील मोठमोठ्या गुहांत आपण असाल ह्मणून त्याही शोधिल्या. तेथें एक अत्यंत कामातुर राक्षसी लक्ष्मणास भेटली. तिलाही त्यानें विरूप केली. नंतर एक मोठा कबंध नांवाचा आंधळा राक्षस भेटला. त्यास त्यांनीं मारिलें. मरणसमयीं त्यानें अ.पला चमत्कारिक वृत्तान्त सांगितला. त्यांतील सार कीं, तो विश्वावसु गंधर्व असून एका ऋषीच्या शापानें राक्षस झाला होता. रामचंद्राच्या हातून शापविमुक्त होण्याचा हा समय होय, असें जाणून त्यानें अत्यानंद दर्शवून त्यांस पंपासरोवराजवळ असणाऱ्या मातंग पर्वताकडे जा, ह्मणजे तुह्मांस तेथें सर्व प्रकारें साहाय्य मिळेल. मग त्या साहाय्याच्या योगानें सीताशोध लागून तिची सुटका होईल, असें मला वाटतें, ह्मणून सांगितलें. त्यानें सांगितलेल्या मार्गानें ते जात असतां रामचंद्राचा शोक चाललाच असून लक्ष्मण त्याचें यथायोग्य सांत्वन करीत होता. ह्याप्रमाणें ते अनेक अरण्यें तुडवीत पंपासरोवराच्या पश्चिम तीरीं आले. तें सरोवर अत्यंत विस्तृत आहे. त्या ठिकाणीं साक्षात रमणीयतादेवताच वास करीत आहे असें वाटतें. त्याच

अगदीं जवळ व सभोंवतालच्या प्रदेशीं अनेक प्रकारचे लहान मोठे वृक्ष, नानाविध लता, अनेक कुंज, मोठमोठ्या गुहा, डोंगरांचे कडे, इत्यादि असल्यामुळें सर्व प्रकारच्या वनपशूस, सर्व जातींच्या पक्ष्यादिकांस व जलचरांस राहण्यास व उदरनिर्वाहास हें स्थळ फारच चांगलें आहे. ह्मणून ती पंपा त्या वनराष्ट्राची जणूं मुख्य राजधानीच आहे, असें ह्मटल्यास प्रत्यवाय नाहीं! ह्यास्थळीं सर्व प्राणी एकविचारें राहून सर्वांस तसें राहण्याचा जणूं उपदेशच करतात काय असें भासतें. त्या सरोवरांतील उदक फारच स्वच्छ व मधुर आहे. ह्याच्या आश्रयानें अनेक मुनिजन राहतात. जेव्हां ते बंधु त्यास्थळीं आले, तेव्हां वसंतऋतु असल्यामुळें तर तेथील शोभा परमावधीस पोंचली होती. तेथें आल्यावर मातंगऋषीचा आश्रम लागला. त्याऋषीस दिव्यलोकीं जाऊन बारावर्षें होऊन गेलीं होतीं. ह्मणजे त्यावेळीं रामलक्ष्मण चित्रकूटपर्वतावर होते. त्या आश्रमांत त्या महर्षींची शबरीनांवाची दासी—जातीची भिल्लीण होती. ती साक्षात् तापसीच होती. महर्षींनीं परलोकीं जातांना, रामचंद्र हे कोण आहेत, ह्यांचें इहलोकीं जन्म किमर्थ आहे, इत्यादि सर्व कांहीं गुह्यतम तिला सांगून ठेविलें होतें. त्यांचें दर्शन होतांच तूं कृतार्थ होशील, असें तिला आश्वासन देऊन ते अयोध्येस जाण्याचेपूर्वीं ह्मणजे चौदावर्षांचे आंत त्यांचें ह्यास्थळीं आगमन होईल असेंही तिला निश्चयात्मक कळविलें होतें. ह्या शुभदिवसाची ती शबरी वाटच पाहत होती! जगांत काय चमत्कार आहे पहा! आपल्यावर हा असा दुःखद प्रसंग आला, ह्मणून त्या तापसीस तो शुभ दिवस उगवला! एकूण पृथ्वीवर सुखदुःख सारखेंच आहे काय! असो. आपल्या गुरुमहाराजांनीं सांगितलेले ते हेच दोने बंधु होत, अशी त्यांचीं परस्पर भाषणें होतांच तिची खात्री झाली. नंतर तिनें त्यांची मोठ्या भक्तीनें पूजा व सेवा केली. त्यांस परम श्रद्धेनें फलाहार घातला. रामचंद्रानीं तिची आपल्या ठिकाणीं विलक्षण व अनन्य भक्ति आहे असें पाहून तिच्याशीं, आपलें वियोगजन्य दुःख विसरून, फारवेळ भाषण केलें. तिनेंही रामलक्ष्मणांपाशीं अनेक गहन विषयांवर बोलून त्यांस तेथील व आस्मन्तात् भागांतील माहिती कळविली गुरुमहाराजांनीं सांगितल्याप्रमाणें रामाविषयीं तिची खात्री होऊन रामदर्शनोत्तर जगांत कांहीं

ही पहावयाचें राहिलें नाहीं, तेव्हां येथें आतां राहाण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं असें तिला वाटलें! ती केवळ सुवर्णाची भक्तिप्रतिमाच सद्गदित अंतःकरणानें राम सन्निध असतां अग्नि प्रदीप्त करून तद्द्वारा दिव्य लोकीं गेली! ह्या पवित्र स्त्रीरत्नाविषयीं बोलावें तेवढें थोडेंच.हिचा सविस्तर मनोवेधक इतिहास त्यांनीं मला ऐकविला,परंतु तो येथें सांगण्याचें कारण नाहीं.असो.नंतर ते बंधु अगदीं पंपातीरीं आले. तों तेथील रम्यदर्शनानें व वसंतवायूनें रामाचा शोकाग्नि पुनः प्रज्वालित झाला! व जसा काय आपला नुकताच विरह झाला असें त्यांस होऊन रामचंद्रांनीं पुनः विलापास आरंभ केला! ते म्हणाले " लक्ष्मणा,हे भ्रमरांचे थव्यांचे थवे पाहून प्राणप्रियेचे काळेभोर व लांब केश माझ्या डोळ्यांपुढें येतात! ह्यांचे गुंजारव तिच्या एकान्तांतील अस्पष्ट व मधुर भाषणाची आठवण देतात! हे मीन थेट तिच्या भ्रुकुटी होत! हीं प्रफुल्ल कमलें पाहतांच तिचें सुवासिक मुख व नयन यांची एकदम स्मृति होते! ह्या पुष्पांच्या कळ्या व हे कोमल पल्लव तिच्या नाकाची व अधराची भ्रांति उत्पन्न करितात! तिचें हास्य बकमिषानें येथें राहिलें आहे! हा मंद मंद मातरिश्वा तिच्या मुखांतील श्वास होय! हें चक्रवाकयुग्म तिचें हृदय दाखवितें! ह्या उदकांत तिचें अंतःकरण दिसून त्या सुधाकरमुखीचें सध्या वदन किति निस्तेज झालें आहे तें तो पहा सर्वद्रष्टा चंद्रमा सांगत आहे! तिच्या नितंबभागाचें अनुकरण करणारे हे येथें उपल पहा पडले आहेत! ती नेसलेल्या वस्त्रांचें व वल्कलांचे रंग,हीं नानातऱ्हेचीं पुष्पें पुढें मला विदित करण्याकरितां पुढें झालीं आहेत! ही लतिका तिची खास तनुलतिका होय.ह्याकरितां तरी अग हे केतकी,आपलीं पुष्पें मला न दाखवितीस तर बरी. ह्या पिंवळेपणात व तिच्या अंगवर्णांत लेशही भेद नाहीं! ह्या पुष्ट लता वृक्षावर वेढे देऊन चढलेल्या पाहून प्रियेच्या दृढालिंगनाचें स्मरण होऊन आतां माझ्या व तिच्या मध्यें असलेलें हजारों कोशांचें अन्तर दूर होऊन तिचें मला आलिंगन मिळणें सर्वथैव दुर्लभ आहे असें वाटतें. वत्सा, इत्यादि सर्व प्रकारांमुळें ह्या सीतारूप पंपासरोवराच्या सन्निध बसावेंसें वाटतें खरें,परंतु बसल्यानें फारच दुःख होतें,म्हणून येथून उठून दुसरीकडे जाऊन बसावेंसें मनांत येतें." तेथें ते बंधु आपल्या संवादानें आणखी कांहीं बोलत

बराचवेळ बसले.नंतर त्यांनीं तेथील कुंज,शिलातलें,वृक्षसमूह हीं सर्व आपण तेथें असाल ह्या आशेनें शोधून पाहिलीं. परंतु निराश होऊन ते पुनः सरोवराच्या दुसऱ्या बाजूस आले. तेथेंही रामचंद्रांनीं इकडे तिकडे भ्रमण केलें. त्यावेळीं अनेक पशु व पक्षी त्यांच्या दृष्टीस पडतांच अमुक पशूपासून मनुष्यानें अमुक ग्रहण केलें आहे,अमुकापासून तो अमुक शिकला,मनुष्य जें जें अमुक करितो,तें तें अमुक पक्ष्याचें अनुकरण करितो, वगैरे असें कांहीं त्यांनीं हृदयंगम भाषण केलें कीं, पशुपक्ष्यांस जर वाचा असती तर त्यांनीं रामचंद्राची फारच स्तुति केली असती , व आपल्यापासून मनुष्यांनीं अनेक प्रकारचें ज्ञान घेऊनही आह्मी अज्ञान व मनुष्यमात्र ज्ञानी असें जगांत गाजत आहे. हें केवढें आश्चर्य आहे,ह्मणून त्यांस विचारिलें असतें! पुढें त्या निर्मळ जलांत त्यांनीं स्नानें करून आन्हिक क्रिया संपादिल्या व तेथें अल्प फलाहारही केला.

तदनंतर अर्धा मुनिवेष व अर्धा क्षत्रियांचा वेष धारण करणारे ते विपिनविहारी क्षत्रिय तेथील सपाट भूमीवरून फिरत असतां त्यांस, जवळच्या पर्वतावरील ऋष्यशृंग नांवाच्या स्थळीं, तेजानें जणूं दुसरा रवीच अवतरला असा, सुग्रीव नांवाचा वानरलोकांचा राजा आपले थोडे अनुयायी व कांहीं सेवक ह्यांसह राहत होता त्यानें पाहिलें. हा वानरराजा मोठा पराक्रमी,बलाढ्य,धर्मभीरु, न्यायनीतीनें वागणारा असा होता.ह्याचा वडील भाऊ वालि दुसरा इंद्रपुत्र जयंतच काय,असा असून तो जवळच किष्किंधानगरींत राहून सर्व वानरप्रजेवर राज्य करीत होता. हा सुग्रीवापेक्षांही बलाढ्य होता. ह्यानें मोठमोठ्यांचे पराजय केले आहेत.असें ह्मणतात कीं,ह्या रावणासच त्यानें काखेंत घेऊन तो कोठच्या कोठें फिरून आला होता! हे पराक्रमशाली दोघे बंधु पूर्वीं फारच प्रेमानें वागत असत. ह्यांचा सविस्तर इतिहास ऐकण्यासारखा आहे व त्यापासून मथितार्थही घेण्या सारखा पुष्कळ आहे. परंतु,स्वामिनी, अवकाश नसल्यामुळें रामचरिताशीं जेवढा त्याचा संबंध आहे तेवढाच सांगतों. वालि जरी राजा होता तरी त्यानें सर्व कारभार सुग्रीवावर टाकिला होता. वालि कांहीं एक पाहत नसे. तो बाहेर फिरून अनेक पराक्रमाचीं कामें करी.सुग्रीवाची राज्यनीति पाहून तो फार संतुष्ट होत असे. असा पुष्कळ काळ गेला. परंतु एकदां गैरसमजुतीनें

त्याच सुग्रीवाविषयीं भलताच ग्रह झाला. अशा खोट्या ग्रहांनींच जगांत हजारों अनर्थ उद्भवतात! तो त्याचा विपरीत ग्रह कांहीं केल्यानें फिरेना. त्या दुष्ट ग्रहांतील सार हेंच कीं, वालीनें मरावें आणि आपण स्वतंत्र राजा व्हावें! हीच सुग्रीवाची इच्छा आहे. ह्याकरितां त्याचा प्रयत्न सतत चालला आहे, असा वालीचा विपरीत ग्रह होऊन त्यानें सुग्रीवास आपल्या राजधानींतून घालविलें व तो जेथें जेथें राहे, तेथें तेथें त्याचा वडील बंधु पाठलाग करून त्यास तेथून घालवून टाकी! त्यास सर्व पृथ्वीवर राहण्यास कोठें स्थळ नाहींसें झालें. शेवटीं ऋष्यशृंग पर्वतावर सुग्रीवास निर्भय स्थळ मिळालें! कारण ह्यास्थळीं वालि आला असतां त्यास मरण येईल, असा त्यास मातंगमहर्षींचा कडक शाप होता. सुग्रीवाच्या रुमानामक स्त्रीचेंही त्यानें हरण केलें! असा तो स्त्रीविरहा सुग्रीव थोड्या विश्वासु अनुचरांसह वालि आपणांवर कोणत्या रीतीनें काय भयंकर प्रसंग आणील नकळे, अशा भीतीनें तो राहत असे. त्याच्या दृष्टीस हे धनुष्यबाण घेतलेले क्षत्रियवीर पडतांच ह्यांना आपल्या बंधूनें आपल्या वधार्थ पाठविलें आहे, असें त्यास वाटलें. व अशी त्याची समजूत होणें हें साहजिकच होतें. ह्मणून सुग्रीव व त्याचे दुसरे अनुयायी, वानरपरिवारांसह भयानें प्राणरक्षणार्थ जिकडे तिकडे फिरूं लागले! परंतु हे कोण आहेत, कशाकरितां आले आहेत, ह्याचा शोध करून मग काय इष्ट वाटेल तें करावें, असा विचार त्या चपलज्ञातींतील एकानेंही केला नाहीं! जो उठला तो पळत सुटला! नंतर सुग्रीवाज्ञेनें त्याचा एक वानर प्रधान तरुण ब्राह्मणवेषानें त्यास्थळीं आला, कित्येक वानरलोकांनाही इच्छारूप घेण्याची विद्या साधली आहे. त्या प्रधानानें रामलक्ष्मणांस मोठ्या नम्रतेनें प्रणिपात करून आपण कोण? येथें कशाला आलां? असा हा मिश्रवेष कशा करितां धारण केला आहे! इत्यादि अनेक प्रश्न केले. रामचंद्रांनीं तेवढ्यावरूनच त्यास ह्मटलें कीं "हे ब्राह्मणा, तूं जें आता अल्पभाषण केलेंस, तें फारच मधुर, स्पष्ट, रसिक, गांभीर्ययुक्त, शुद्ध व व्याकरणनियमानुबद्ध असें आहे. हें ऐकूनच तुला कांहीं न विचारतां आपलें वृत्त सांगण्यास तूं सर्व प्रकारें योग्य श्रोता आहेस, अशी आमची दृढ भावना झाली." असा अगोदर उपोद्घात करून रामचंद्रांनीं प्रथमतः त्यांस आपल्या पूर्वजांचा थोडक्यांत इति-

हास सांगून आपलें जन्मचरित्र सांगतां सांगतां पंपासरोवरीं त्यांची गांठ पडली, येथपर्यंत सर्व सांगितलें. अर्थात्, स्वामिनि, आपलाही सर्व वृत्तांत त्यांनीं सांगून प्रियेकरितां माघ शुद्ध चतुर्दशीपासून असे शोकाकु होऊन वेड्यासारखे भटकत अहों ह्मणून सांगितलें! त्या ब्राह्मणप्रधानासही तें वृत्त ऐकून फार वाईट वाटलें! त्यानेंही त्या शोकाकुल बंधूंस सांत्वनपर दोन गोष्टी सांगितल्या. नंतर आतां मीं आपल्यास सुग्रीवराजाचा थोडक्यांत सांगितलेला इतिहास त्यानें रामलक्ष्मणांस सविस्तररीतीनें सांगितला. तदनंतर त्या सुग्रीवमंत्र्यानें त्या क्षत्रियवीरांस आपल्या राजाशीं सख्य करण्याविषयीं विज्ञप्ति केली. "त्याच्याशीं सख्य करून वालिराजाशीं युद्ध केलें पाहिजे व त्यानें हरण केलेली सुग्रीवाची स्त्री रुमा ही त्याच्या स्वाधीन केली पाहिजे. स्त्रीविरहानें सुग्रीवाची कशी अवस्था झाली आहे, ती आपल्यास सांगणें नकोच. अर्थात् आपण त्या वालीस ठार मारून सुग्रीवास किष्किंधेंत आपल्या हातें राज्याभिषेक केला पाहिजे. सुग्रीव आशा रीतीनें पृथ्वींतील सर्व वानर लोकांच्या शास्ता झाला ह्मणजे त्याच्या अतुल सहाय्यानें सीतादेवीचा शोध करून तिला हरण करणाऱ्या चोराचा नाश केव्हांच होईल. जर आपल्या तर्काप्रमाणें ती लंकेंत असेल तर तेथें आपल्यास जावयास वानरमंडळीचें साहाय्य अवश्य पाहिजे." असें त्या प्रधानानें त्यांस सांगून रामाच्या बाणाची शक्ति किती आहे ही त्यानें आपल्या मतानें युक्तीनें ह्मणून, जाणून घेतली. तेव्हां रामचंद्र हा कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुंसमर्थ आहे, ह्याला असंभाव्य ह्मणून कांहींच नाहीं, अशी त्याची पक्की खात्री होऊन त्यांच्या सख्यानें सुग्रीवास स्वस्त्री प्राप्त होऊन राज्यलक्ष्मी मिळेल, ह्याविषयीं किंचितही संशय राहिला नाहीं, नंतर त्या ब्राह्मणानें त्यांचे चरणीं वंदन करून आपलें वानररूप प्रकट केलें, व त्यांस "मी सुग्रीवमहाराजांचा मुख्य प्रधान आहें," असें सांगून, आणखी "मी आपल्या पायांचा आजपासून नम्रसेवक झालों. ह्यापासून पाहिजेल ती सेवा करून घ्यावी," अशी त्यानें करद्वय जोडून त्यांची विनंती केली व तत्क्षणीं त्यांस आपल्या खांद्यांवर घेऊन सुग्रीव महाराजांपाशीं नेलें, व तेथें झालेलें सर्व वृत्त त्यांस निवेदन केलें. तें ऐकून सुग्रीवास जो कांहीं अत्यानंद झाला, तो त्याचा त्यालाच माहीत.

त्याचें वर्णन करणें कठिण. त्याला तर हे प्रत्यक्ष हरिहर आपल्यास साहाय्य करण्यास आले आहेत, असें वाटलें! नंतर सुग्रीवराजानें रामलक्ष्मणांच्या हातांत हात घालून, " आपलें आतां सख्य झालें, एकमेकांस आपण अकपट साहाय्य करावें, " अशाविषयीं सर्वांसमक्ष त्यांच्यामध्यें चालीप्रमाणें आणाशपथा झाल्या. सख्य होतांच रामाच्या विलक्षण सामर्थ्याची सुग्रीवानें आपली खात्री करून घेतली व तत्क्षणींच त्यास वालिपराजयरूप आपलें महत्कार्य ह्यांच्या साहाय्यानें केव्हांच शेवटास जाईल असें वाटलें. असो. नंतर हा चौर्यकर्मकुशल रावण विमानांतून आपणांस नेत असतां, जी अलंकारांची पुरचुंडी आपण खालीं फेंकिली होता, तींतील सर्व अलंकार सुग्रीवराजानें आपल्या ह्या नूतन संमान्य मित्रांस दाखविले. ते पाहून रामांनीं त्यासमयीं फार शोक केला. त्यावरून तेथील सर्व वानरमंडळीस, स्त्रीविरहानें रामचंद्र अत्यंत दुःखी आहेत, असें वाटल. सुग्रीवमहाराजांस तर त्याचा अनुभवच होता!

सीता—मीं अलंकारांची पुरचुंडी फेंकिली, ती ह्याच ऋष्यशृंगपर्वतावर काय? प्रारब्धवशेंकरून प्राणनाथ व भावोजी तेथें आल्यास त्यांस कांहीं तरी शोध लागावा, एतदर्थ मीं ते अलंकार त्या पर्वतश्रेष्ठावर फेंकिले. तर त्यानेंही त्या परोपकारी जटायूप्रमाणेंच माझें इष्ट कार्य केलें!

बटु—हां, त्यानें बरेंच काम केलें. हे कोठले व कोणाचे अलंकार हें अगोदर त्यांस कांहींच समजेना. रामचंद्रांनीं जेव्हां आपली चारित्रकथा सांगितली, तेव्हां ह्या भूषणांचा व सीतारत्नाचा कांहीं तरी निकटसंबंध असावा, असें त्यांच्या मनांत आलें. कारण हे अलंकारही माघ शुद्ध चतुर्दशीसच तेथें मिळाले होते. तेथें आपणास रावणानें नेलें, असें अनुमान सर्वांनीं केलें. मग तो लंकेंत नेवो किंवा दुसरीकडे कोठें नेवो. नंतर सुग्रीवराजानें रामलक्ष्मणाच्या साहाय्याच्या योगानें आपल्या ज्येष्ठबंधूकडे " माझी स्त्री परत दे, नाहीं तर युद्धास सिद्ध हो, " असा निरोप पाठविला. पुढें त्यांच्यामध्यें लौकरच युद्धप्रसंग घडून आला! दोघेही महाबलाढ्य! दोघेही क्रोधानें लालभडक झालेले! युद्धाचीं सर्व अंगें, प्रत्यंगें पूर्वीं झालीं. शेवटीं दोघां बंधूंमध्यें युद्ध सुरू झालें. ज्या दोघां बंधूंमध्यें पूर्वीं असें कांहीं प्रेम होतें कीं, त्याला

उपमा ह्मटली ह्मणजे एक रामलक्ष्मणांच्याच प्रेमाची! पण ते बंधु समोरासमोर दांत ओंठ चावीत व एकमेकांस मर्मभेदक भाषणें बोलत बाणांची वृष्टि करीत असतां सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें, व कित्येकांच्या बुद्धीची गति तर कुंठित झाली! असो. ते बंधु मोठ्या निकरानें लढूं लागले. कोणाला कोणी आटपेना! पुनःपुनः प्रत्येकाला नवें उत्तेजन येत होतें. ते युद्धाचे अगदीं भरांत आले, तों तो वालिराजा एका बाणानें भूमीवर पडला! तेव्हां त्याच्या सैन्यांत हाहाकार उडाला. सुग्रीवपक्षाकडे जयघोष झाला! स्वामिनी सितावाई, ज्या बाणानें तो बंधुजायेशीं अनन्वितकर्म करणारा वालि भूमिमातेवर मरणोन्मुख होऊन पडला, तो बाण रामचंद्रांनीं आडून सोडला होता! तत्क्षणीं त्या प्रेतवत् पडलेल्या वालीपाशीं रामचंद्र गेले. रामचंद्रांनीं असें अन्याय कर्म करून आपल्यावर बाण सोडला ह्मणून त्यानें त्यांची फारच निंदा केली, व ह्मटलें कीं, "आपल्यासारख्याशीं मी मैत्री करून आपल्या इच्छेप्रमाणें वागलों असतों." रामचंद्रांनीं त्याच्याशीं नीतिसंबंधानें बरेंच भाषण केलें. त्यांतील मुख्य सार कीं, बंधुजायेशीं रत होणाऱ्या तुजसारख्या समोर युद्धास राहणें ह्मणजे अघोर पातक होय. व अशा पाप्यांचा क्षय तर झालाच पाहिजे; ह्मणून आडून मीं तुजवर बाण सोडला! मृत्युकाल मोठा कठिण आहे! त्यावेळेस उदासीनता, वैराग्य, अंतःकरणशुद्धि, पश्चात्ताप, नम्रता, भय, हींच सर्वत्र दिसतात! वालीनें सुग्रीवास आपल्याजवळ बोलाविलें व कृतापराधाबद्दल त्याची क्षमा मागून, पतीचे गुण आठवून तेथें अत्यंत हृदयद्रावक शोक करणारी त्याची स्त्री तारा व पुत्र अंगद ह्यांचे हात, रामचंद्रांची स्तुति करून त्यांचे व सुग्रीवराजाचे हातीं दिले. व ह्यांचें रक्षण करण्याविषयीं तो आसन्नमरण वालिराजा विनंती करीत असतां त्याचे हस्तांवर अश्रुजलाचा अभिषेक चलला होता! नंतर बंधूच्या मरणानें सुग्रीवासही फार वाईट वाटलें. रामाच्या अंतःकरणास फार द्रव आला! हा वृत्तांत ज्येष्ठ कृष्णपक्षांत घडला. ह्या रामचंद्रांच्या कृत्यानें कित्येक वालिपक्षाचे लोक त्यांस दोष देतात; परंतु ते केवळ मूढ होत असें मी समजतों.

नंतर रामाज्ञेनें सुग्रीव पृथ्वींतील सर्व वानरप्रजांचा राजा झाला. तो राज्यपदारोहणाचा समारंभ मोठा प्रेक्षणीय व सदास्मरणीय झाला. त्यानें

अत्यंत कृतज्ञ होऊन "सीताशोध करण्याविषयीं आह्मी सर्व तयार आहोंत, आह्मी केव्हांपासून ह्या कार्यास लागावें, ह्याविषयीं आह्मांस आज्ञा व्हावी" ह्मणून रामचंद्रांची विनंती करून तोंपर्यंत त्या बंधूंस स्वनगरींत येऊन राहण्याविषयीं फार आग्रह केला. तेव्हां रामचंद्रांनीं "आतां पर्जन्यकाळ जवळ आहे, तेव्हां तूं चार महिने सुखानें राज्य कर. ते होतांच माझ्या कार्यास लाग. विषयोपभोगांमध्यें निमग्न होऊन राज्यलक्ष्मीच्या ताव्यानें ह्या गोष्टीचें विस्मरण पडेल, असें मात्र होऊं देऊं नकोस." असें त्यास सांगून आपला कोठल्याही नगरींत न राहण्याचा नियम त्या कोळ्याच्या गुहराजास पूर्वीं सांगितल्याप्रमाणें ह्या वानरराजासही निवेदन केला. तेव्हां, "मला विस्मृति वगैरे कांहींएक होणार नाहीं, आतां आज्ञा कराल तरी मी आपल्या कार्यास तत्पर आहें. माझ्या हातून जेव्हां आपली थोडीबहुत सेवा होईल, तेव्हांच मजवरचा आपला अत्यंतोपकाराचा भार लेश तरी कमी होऊन मला चैन पडेल!" अशा आशयाचें सुग्रीवानें मोठ्या नम्रतेनें फार वेळ भाषण केलें. व त्यांस राहण्यास जवळच माल्यवान् पर्वतावर एक चांगली पर्णकुटिका बांधून दिली. ह्या पर्वतास प्रवर्षण किंवा प्रस्रवणही ह्मणतात. तेथें सर्वप्रकारची सोई आहे. त्या बंधूंनीं आपल्या विरहानें अत्यंत दुःखी असतां मोठ्या कष्टानें चारमास काढले. पर्जन्यकाळांत विरहाग्नि फारच ताप देतो, असें ह्मणतात. त्याप्रमाणें त्यानें त्यांसही दिला! सुग्रीवाचे प्रधान वगैरे वरचेवर येऊन रामलक्ष्मणांची काय आज्ञा ह्मणून विचारीत. चार महिने गेले. कार्त्तिक महिना आला. त्याचा दुसरा पक्ष लागला. तरी सुग्रीव आपणास भेटत नाहीं! व आपल्या कार्याच्या संबंधानें एक चकारशब्दसुद्धां काढीत नाहीं! हें पाहून त्यास परमावधीचें आश्चर्य वाटलें. सुग्रीवास वारंवार त्याचे प्रधान रामचंद्रांकडे जाण्याविषयीं प्रार्थीत होते, परंतु त्यांच्या बोलण्याचा तो धिक्कार करी! हें पाहून त्यांस फारवाईट वाटून भीतीही वाटली! राज्यमद हा कांहीं विलक्षण रोग आहे! ह्याच्या योगानें ज्ञानेंद्रियाची शक्ति क्षीण होते. अर्थात् त्याला कर्तव्याकर्तव्य कांहींच समजत नाहीं! हिताहित कशांत आहे, हें दिसत नाहीं. पडदेश कोणता, आपणास वाईट मार्गास कोण ओढतो, हें जाणण्याची त्याची बुद्धि लयास जाते! खरा मित्र किंवा शत्रु कोण हें त्यास ओळखतां येत नाहीं! आह्म

किंवा मूढ ? त्यांचें रूप कसें असतें तें कळत नाहीं! पथ्यवचन कडू लागतें, व अपथ्यावर काय ती सर्वदां रुचि जडते! पूर्वपुण्यप्रतापानें, लोकांच्या साह्यानें अथवा राजकुलांत जन्म ह्मणून बनलेल्या अशा महाराजांस मजसारखा कोणी ज्ञाता नाहीं, कल्पक नाहीं, शूर नाहीं, बलवान् नाहीं, शहाणा नाहीं, असें वाटून बाकी जगांतील सर्व लोक मूर्ख, असा त्यास शेवटीं भ्रम होतो! अशा भ्रमांत तो पाहिजेल ते चाळे करतो व हवें तें बरळतो. मग त्यापासून सज्जन दूर होतात. मग त्यांचे अमृततुल्य शब्द त्याचे कर्णरंध्रांत कसे पडणार? अशानें तो कधींही शुद्धीवर येत नाहीं! अशा ह्या राज्यमहारोगग्रस्त राजाचा प्रजांस फार वीट येतो! अशासारखी सुग्रीवमहाराजांची स्थिति झाली होती. आपणावर रामचंद्रांनीं किती महदुपकार केले, त्यांच्याविषयीं आपण किती कृतज्ञताबुद्धि बाळगिली पाहिजे, आपण त्या सत्यप्रतिज्ञ पुरुषापाशीं काय बोललों, रामचंद्राची योग्यता केवढी, त्यांचें बल किती अद्भुत, इत्यादि गोष्टींचा विचार त्या चार पांच महिन्यांच्या राज्यमदानें त्याला कांहींच सुचला नाहीं! तो विषयांत अगदीं गुंग झाला. वृक्ष जसा वेलींनीं तसा तो स्त्रियांनीं वेष्टून टाकिला. त्याची बुद्धि त्यांनीं मलिन केली. असो. असें त्याचें आचरण पाहून रामचंद्रापेक्षांही लक्ष्मणास फार राग आला!

तो रामाज्ञेनें धनुष्यास बाण जोडून व बाणांचा भाता बरोबर घेऊन किष्किंधानगरींत शिरला व मुख्य राजप्रासादाजवळ गेला. तो त्या दशरथात्मजाचा विलक्षण आवेश व ती अत्यंत भयंकर मुद्रा पाहतांच सर्व वानरमंडळीस हा आपला संहार करण्याकरितां साक्षात् रुद्रावतारच आला, असें वाटलें! त्यानें एकसारखा धनुष्याच्या दोरीचा टणत्कार चालविला होता. तेव्हां सर्व वानराधिकारीही फार भिऊन गेले! त्यांनीं हें महाराजांस वर्त्तमान कळविलें. त्यावेळेस तो शुद्धान्तांत होता! त्याच्या सभोंवती कामिनींचा गराडा पडला होता! तो फार भ्याला! व किंकर्तव्यतामूढ होऊन गेला! तेव्हां तो सर्व प्रधानमंडळीसह पश्चात्तापपूर्वक क्षमा मागून लक्ष्मणास शरण गेला! लक्ष्मणानें प्रथमतः त्याच्याशीं क्रोधयुक्त भाषण करून तुझा हा अपराध क्षमेस अगदीं पात्र नाहीं असें सांगितलें. परंतु शेवटीं त्याची अंतःकरणपूर्वक

विज्ञप्ति ऐकिली. नंतर तें सर्व राजमंडळ लक्ष्मणाबरोबर त्या प्रस्रवण टेकडीवर रामचंद्रापाशीं गेलें. लक्ष्मणानें आपल्या प्रिय भ्रात्यास किष्किंधेंतील सर्व हकीगत कळवून ही सर्व मंडळी पुढील कर्तव्यतेचा विचार करण्याकरितां आपल्या चरणांपाशीं आली आहे, ह्मणून सांगितलें. रामचंद्र शान्त झाले. नंतर तत्संबंधीं पुष्कळ मतांतें न मतांतें होऊन शेवटीं सर्वानुमतें असा ठराव झाला कीं, पृथ्वींतील सर्व बलाढ्य वानरवीर आपल्या मंडळीसह त्या स्थळीं दीड महिन्याचे आंत आले पाहिजेत. ते आल्यावर सीताशुद्ध्यर्थ पाठविण्याविषयीं तजवीज करावयाची. नंतर सुग्रीव महाराजांनीं रामचंद्रांच्या अनेक गुणांचें वर्णन करून आतां आपल्या हातून असा अक्षम्य प्रमाद व्हावयाचा नाहीं, असें करद्वय जोडून मोठ्या नम्रतेनें सांगून रामाचा निरोप घेतला व सर्व मंडळीसह स्वनगरींत गमन केलें, आणि तेथें ठरल्याप्रमाणें तो त्वरित त्या कार्यास लागला.

राजाज्ञा पोंचतांच हजारों वानरवीर नियमित वेळीं किष्किंधानगरींत जमले. त्यांची त्या राजानें सर्व प्रकारची व्यवस्था ठेविली. नंतर त्या प्रवर्षण पर्वताच्या पायथ्याशीं सपाट मैदानांत त्या वानरराजानें मोठी सभा भरविली. तेथें रामलक्ष्मणही आले. त्या सभेची शोभा काय सांगावी? कवींच्या प्रतिभेस तो एक उत्तम विषय होता! असो. सभा भरविण्याचें कारण सांगण्यापूर्वीं वालिराजाचा मुख्यप्रधान, ह्मणजे ज्यानें प्रथमतः त्या बंधुद्वयाची भेट घेऊन त्यांचें व सुग्रीवाचें सख्य केलें, त्यानें उच्चस्वरानें रामलक्ष्मणांचें इतिवृत्त सर्वांस निवेदन केलें. तें एथपर्यंत कीं "ह्मणून ही सभा भरली आहे," इतकें सांगेपर्यंत. त्या भाषणानें सर्व लोक तटस्थ झाले. कित्येकांच्या अंतःकरणांत दया उत्पन्न होऊन कित्येकांचे बाहु स्फुरण पावूं लागले. कित्येकांचे मुखांवर वीरश्री दिसूं लागली. नंतर महाराजांनीं उठून रामलक्ष्मणांच्या अद्भुत शक्तीविषयीं व पराक्रमाविषयीं वर्णन करून सर्वांस मोठ्या नम्रतेनें जें सांगितलें त्याचा सारांश कीं, पृथ्वीच्या निरनिराळ्या भागीं आपणांस श्रीमती जनककुमारी रामचंद्रपत्नी सीतामाता, यांच्या शोधार्थ गेलें पाहिजे. सर्व भूगोल शोधून जणू उलथून टाकिला पाहिजे! आतां कोणीं केव्हां कोणत्या स्थळीं जावयाचें, ह्याविषयीं उद्यांपासून प्रधानमंडळी व

दुसरे अधिकारी लोक ह्यांच्या अनुमतानें ठरेलच. नंतर रामचंद्रांनीं-ही सुग्रीवाविषयीं आपली कृतज्ञता बोलून दाखवून, जानकी जीवन्त असल्यास तिची मुक्ति आपल्या सर्वांच्या साहाय्यानें होईलच, वगैरे फारच मनोहर व हृदयद्रावक भाषण केलें. शेवटीं दक्षिणेकडे लंकानगरींत जे शूर वानर जावयास निघतील, त्यांनीं मला अगोदर भेटावें, ह्मणून सुग्रीवराजापाशीं सांगितलें.

दुसऱ्या दिवसापासून थोडथोडे वानर बाहेर पडले. जे ज्या देशांत राहणारे, ज्यांस तिकडील उत्तम माहिती, त्यांस बहुधा तिकडे पाठविण्याची योजना झाली! दक्षिणदिशेकडे व ह्या दूरस्थ लंकाद्वीपांत येण्याकरितां ज्यांस राजाज्ञा झाली, त्यांत अंगद प्रमुख होता. हा वालिराजाचा पुत्र, अर्थात् किष्किंधाधिपति सुग्रीवमहाराजांचा पतण्या व युवराजा होय. हा वयानें लहान असून फारच शहाणा, विलक्षण बुद्धिमान्, वक्तृत्वकुशल,—जणूं भूलोकीं बृहस्पतीच अवतरलेला! नीतिज्ञ, हातीं घेतलेलें काम शेवटास नेल्यावांचून ज्याला विश्रांति गोड वाटत नाहीं, विश्वासू, मोठा युक्तिवान्, मसलती व स्वामिसेवेविषयीं तत्पर असा आहे. ह्याच्याबरोबर जी मंडळी होती, त्यांत जांबवान्, नील, उल्कामुख, सुहोत्र, गंधमादन, शरारि, द्विविद, शरगुल्म, मैंद, सुषेण, गवय, वृषभ, आणखी दुसरी बरीच मंडळी होती. ही सर्व मंडळी निघण्याचे वेळीं सुग्रीवराजासह त्या उभयबंधूंच्या चरणांपाशीं गेली व त्यांची आज्ञा, निरोप व आशीर्वाद मागूं लागली. त्यावेळेस रामचंद्रांनीं आपल्या विरहानें आपली कशी अवस्था झाली आहे, हें अश्रुपूर्वक व सद्गदित स्वरानें सांगून आपण किती कृश झालों आहों, हें त्यांस दाखविलें. त्यावेळेस त्या मंडळीलाही फार वाईट वाटलें. रामांनीं अंगदाच्या हातीं आपली दुसरी प्राणप्रियाच काय अशी आपली करांगुलींतील मुद्रिका दे. असतां तिचें अनेकदां चुंबन घेतलें. जिच्या विरहानें त्यांस अत्यंत दुःख होत आहे, असें त्यांच्या मुखमुद्रेवरून वानरमंडळीस कळतें आहे तों तिला तरी आपल्या प्राणप्रियेची भेट होईल, असा विचार त्यांच्या मनांत आल्यामुळेंच जणु त्यांची मुखचर्या क्षणभर प्रफुल्ल दिसली! आणखीही रामचंद्रांनीं त्याच्या कानांत कांहीं गुह्य गोष्ट सांगितली. व त्यांस "वाटेनें हळू जा, शरीरप्रकृतीस जपत असा, आहार

वेळेवर करा, सर्वकाळ सावध राहा, भलत्याच ठिकाणीं विश्रांति घेऊं नका,तरी पण अविश्रान्त श्रम करूं नका.कोठें कार्यान्तरांत गुंतूं नका, जेथें जाल तेथें गोड बोलून सर्वांशीं स्नेह संपादून माझ्या प्रियेविषयीं त्यांस विचारपूस करा. कामास विलंब नलावता चांगलें करा. कोणाशीं कलह करूं नका किंवा कसला गर्व धरूं नका.अनेक देशींचे आचारविचार चालचलणूक सूक्ष्मरीतीनें समजून घ्या. कोण राजा कसा आहे, त्याच्या राज्यांत ग्राह्य काय, त्याज्य कोणतें, प्रजा सुखी आहे कीं दुःखी आहे, त्यांच्या दुःखाचीं कारणें काय असावींत,इत्यादि सर्व अवलोकन करा. कोण योगी कोणत्या पवित्रस्थानीं राहतात, हें नीट ध्यानांत ठेवा. त्याप्रमाणेंच दुसऱ्या परोपकारी,दयावन्त, शुद्धाचरण व धर्मनिष्ठ लोकांचीं चरित्रें समजून घेऊन मला परत आल्यावर सांगा. आणि हें मात्र चांगलें लक्षांत ठेवा कीं, माझी कृशांगी प्राणेश्वरी भेटल्यावर ती आमचें इतिवृत्त ऐकण्याविषयीं अत्यंत आतुर होईल, तर जेणेंकरून ती कोमलहृदया अत्यंत शोकाकुल होऊन वरचेवर मूर्च्छा पावेल,अशा तऱ्हेनें तिला कांहीं सांगू नका. तरी तिला शोधण्याला विलंब कां झाला, हें तिला सविस्तर कळवा. व तुझी आतां लौकरच मुक्तता करितों,ह्मणून सांगून त्या हरण करणारास कोणती कडक शिक्षा द्यावी,हेंही तिला पुसून या.” असा हितोपदेश करून त्यांस आशीर्वाद देऊन, तुमचें कार्य सफल होईल, ह्मणून सांगितलें. ज्याचा मध्यबिंदु युवराज अंगद आहे असें तें सर्व वानरमंडळ मोठ्या आनंदानें रामलक्ष्मणांस व आपल्या राजास वंदन करून निघालें. ह्यांच्या नंतर मग आपल्या शोधार्थ कोणीही निघाला नाहीं. हेच लोक शेवटचे होत. ह्याप्रमाणें आपल्या शोधार्थ त्या वानरराजानें हजारों लोक सर्व जगत् धुंडाळण्याकरितां पाठविले. त्यानें ह्मणजे अमुक एक खंडांतील अमुक एक देशांत, त्यांतील अमुक एक नगरांत, किंवा अमुक एक ग्रामांत, किंवा अमुक एक द्वीपांत, अथवा अमुक एक अरण्यांतील अमुक एक आश्रमांत, किंवा तपोवनांत, किंवा अमुक एकपर्वतावर, किंवा हिमालयांतील अमुक एक स्थानीं आपले लोक पाठविले नाहींत असें नाहीं.

सीता—हे प्रियदर्शना वालिपुत्रा युवराजा, अंगदा,तुला मजसाठीं फार-

च श्रम पडले तर! बाकीची तुजबरोबर आलेली मंडळी कोठें आहे?

बट—बाबासाहेब, पुढील वृत्तान्त ऐका. मी तो महात्मा वालिपुत्र नव्हे. त्या वानरमंडळीनें युष्मद्रूपरत्नाकरितां तो दक्षिणदेश मोठ्या काळजीनें रात्रंदिवस शोधिला. आपण अमुक स्थळीं असालच असे अनेकविध तर्क करून नानाप्रकारच्या कल्पना काढून, अनेक भूभाग शोधिले. परंतु ते निराश झाले. त्यांना रामचरण सोडून महिना होऊन गेला, तरी आपणांस रामपत्नीचा शोध लागत नाहीं, असें जेव्हां झालें तेव्हां युवराज अंगद ह्यास फारच वाईटवाटलें. आपण जन्मास व्यर्थ आलों, असे त्यानें वारंवार उद्गार काढिले. त्या आशाबद्ध बसलेल्या बंधूंस आपला शोध लागत नाहीं, असें सांगून त्यांस हताश करून आपल्या मध्यें कांहींच पराक्रम अथवा शक्ति नाहीं असें त्यांच्या मनांत कसें येऊं द्यावें? एकांपक्षां एक एक भयंकर अशा अनेक मनस्तरंगांमुळें त्यानें रामचरणापाशीं परत जाण्याचें नाकारलें. तो म्हणाला "सीतामाईचा जेव्हां शोध लागेल. तेव्हांच आपण किष्किंधेला जाऊं. नाहीं तर मरून जाऊं! पण अपल्यापैकीं कोणी तरी तें चिंतातुर सीतामुख पाहिल्याशिवाय मी ह्मणून आपलें प्रफुल्ल मुख रामाला कदापि दाखविणार नाहीं." अशा दृढ निश्चयानें पुनःपुनः आपला शोध करीत असतां त्यांना अगदीं दक्षिणसमुद्रकाठीं, पाताळीं जाण्याचा जणू जवळचा मार्गच अशी एक, फारच मोठी गुहा लागली. तींत आपण असाल ह्या आशेनें अंगदाज्ञेनें एक वानर शिरला. त्या पवित्रस्थळीं दशमुखानें आपणास खास लंकेंतच नेलें ह्मणून शोध लागला. हा शोध त्या जटायूच्या दुसऱ्या संपातिनामक बंधूच्याद्वारा लागला! मला वाटतें हे गृध्रपक्षी पूर्वजन्मींचे आपले कोणी संबंधी होते. असो; नंतर हें आनंदकारक वर्त्तमान त्या वानरानें अंगदादि सर्व मंडळीस सांगितलें. तेव्हां त्यांस फारच समाधान झालें. त्यांची सर्वप्रकारची उदासीनता जाऊन त्यांच्या मुखावर टवटवी आली. त्याबरोबर त्यांस उत्तेजन आलें. रामचंद्राला हा एवढाच समाचार जाऊन सांगावा, असें हीं कित्येकांस वाटलें! सीताशुद्धीचें काम आपल्याकडूनच निश्चयानें होणार, अशा आनंदानें ते पुढील कार्यास लागण्याकरितां अगदीं समुद्रतीरीं आले. व इतक्या लांब कोण वीर जातो व इतकें ह्मणजे चारशें कोश समुद्रोल्लंघन करणार आपल्यामध्यें कोण समर्थ आहे, अशा विचारांत त्या मंडळींतील

कांहीं लोक होते. तरी आपण लंकेंत आहों, एवढा निश्चयात्मक शोध लागला, ह्मणून त्यांचे मुखावर औत्सुक्य, धैर्य, तत्परता, आनंद इत्यादि दिसत होतीं. जो तो आपलें बल व आपण केलेलीं अनेक पराक्रमाचीं कृत्यें सांगून, "मी लंकेंत जाणार, मी लंकेंत उड्डान करणार," असें ह्मणे! शेवटीं ज्यावर वायुदेवतेची पुत्राप्रमाणें पूर्ण कृपा आहे, ज्याला त्रिभुवनांत असाध्य ह्मणजे कांहीं आहे, असें क्षणभरही वाटत नाहीं, ज्याची रामचरणीं अत्यंत श्रद्धा असून राम हे इहलोकीं किमर्थ आले आहेत व कोण आहेत, हें ज्यानें पूर्णपणें जाणिलें होतें, असा कोणी एक वानर ह्या समुद्रोल्लंघनकार्यास प्रवृत्त झाला! व 'रामप्रसादानें हें कार्य मी सहज करीन,' असें ह्मणाला. तेव्हां त्या वानरमंडळीनें प्रेमातिशयानें त्यास दृढालिंगन देऊन, तूंच ह्या कार्य्यास योग्य आहेस, तुझ्याशिवाय आह्मांमध्यें हें महत्कार्य करण्यास एकही समर्थ नाहीं, असें ह्मणून त्याची स्तुति व गौरव करून त्यास निरोप दिला. त्यानें अभीष्ट देवतेचें कांहीं वेळ चिंतन करून व सागरानेंही साहाय्य मागून सर्वांचा निरोप घेतला. नंतर तो एकदम अंतरिक्षांत गेला! त्या बरोबर धरणिकंप व्हावा तशी चोहोंकडे स्थिति झाली! आसपासचे शेंकडों वृक्ष समूळ उपटून पडले! पशुपक्षी, सर्व कीटक व सिंहव्याघ्रादि प्राणी भीऊन गेले! समुद्र खवळून जाऊन आंतील जलचरें घाबरून गेलीं! बाकीच्या मंडळीनें तो वानर लंकेतून जानकीचा समाचार घेऊन येईपर्यंत त्याच स्थळीं असावें, असा सर्वानुमतें संकेत ठरला. लंकेंत येत असतां पवनमार्गांत त्याला बरींच विघ्नें आलीं. परंतु परमेश्वरकृपेनें ज्यांनीं तीं विघ्नें आणिलीं, त्यांनींच मग त्यावर प्रसाद करून त्यांचा नाश केला. आणि त्या प्रसादांच्या योगानें त्या वानराला पंख नसतांही, तो गरुडपक्षासारखा वेगानें एक सरखा उडत चालला! तेव्हां परमेश्वरचरणीं ज्याचें दृढ चित्त असून जो स्वामिकार्यार्थ मनःपूर्वक साहस करतो, त्यास तो जगन्नियंता स्वतः साहाय्य करून त्यानें योजिलेलें कितिही दुर्घट कार्य असलें तरी पूर्ण करतो! हें तत्त्व त्याच्या पूर्ण अनुभवास आलें. ह्याप्रमाणें तो वानर सूर्योदयीं निघाला तो सुमारें प्रहर रात्रीं लंकानगरीजवळ आला. तेथून ह्या नगरीची कांहीं विलक्षणच शोभा त्यास दिसली.

ह्या विशाल नगरीच्या सभोंवतालचे ते अतिशय उंच, रुंद, फारच बळकट, अत्यंत मनोहर व अदृष्टपूर्व असे तट पाहून त्यास फारच आश्चर्य वाटलें ! ह्या एका प्राकारभित्तीवरूनच त्यानें दशमुखाच्या आपार वैभवाचें अनुमान केलें. नंतर तो पुरद्वार शोधूं लागला. तें सांपडल्यावर त्या द्वारदर्शनानें त्यास सचकित करून सोडिलें! तेथें त्यास बरेंच सशस्त्र राक्षससैन्य दिसलें. तेथून जाणें जरी त्यास अशक्य वाटलें नाहीं, तरी त्या द्वारानें प्रवेश करणें त्यास इष्ट वाटलें नाही. नंतर त्यानें कांहीं रात्र होऊं दिली. व त्या प्राकारभित्तीवरून त्यानें आंत प्रवेश केला. तो लंकादर्शनानें अगदीं गोंधळून गेला ! सर्व मार्ग, व सर्व प्रासाद, त्यास एक सारखे दिसूं लागले. एवढा विस्तीर्ण महासागर तो उल्लंघून आला, पण रात्रीच्या रात्रीं आपला शोध कसा लागतो, ह्या विचारसागरांत तो शेवटीं पडलाच! सीतामाता कोठें आहे, ती दिसेपर्यंत सर्व नगरी पहावयाची, असा त्यानें दृढ संकल्प करून लहान रूप घेतलें ! व तो वायुप्रसादानें हवेंतून भ्रमण करूं लागला ! ही नगरी त्या रामसेवकास स्पष्ट दिसावी ह्मणूनच काय काल माघ शुद्ध नवमी असतांही पूर्णिमेच्यापेक्षांही भगवान् शीतरश्मी चंद्रमानें आपली कान्ति अधिक केली होती ! किंवा ह्या नगरींत तो सदा असाच प्रकाश देतो, ह्यांतील सत्य त्यास कांहींच समजेना ! आणखी सर्व मार्गांत लक्षावधि दीपांचा प्रकाश होता, तो निराळाच ! तेव्हां प्रकाशाच्या संबंधानें त्याला रात्र व दिवस एकच वाटलीं ! व त्यास आपला शोध लावण्यास विशेष हौस उत्पन्न झाली ! अशा ह्या सर्वांगसुंदर नगरींत आपल्या दर्शनार्थ तो फिरत असतां नाना प्रकारच्या शोभा व अनेक प्रसंग पाहून आपण येथें कोणत्या कार्यास आलों आहें, हें सर्व घटिकाभर विसरून गेला ! कोठें सैन्यांतील हजारों राक्षस शस्त्राभ्यासांत गुंतले होते, कोठें आपलीं अंगें मेहनत करून कमावीत होते, कोठें आपला युद्धाभ्यास कोणत्या इयत्तेपर्यंत पोंचला आहे, हें पाहण्याकरितां परस्परांमध्यें संग्राम चालला होता. कित्येक मंडळीस गुरु महाराज युद्धसंबंधी हजारों खुब्या व गोष्टी सांगून शत्रूपासून जय कसा मिळवावा, पराजय कां होतो, ह्याविषयीं बोलत होते ! तेथें नाना प्रकारचीं लखलखित शस्त्रें पडलीं होतीं. अनेक स्थळीं हजारों राक्षस अनन्वित कर्मे

करतांनाही त्याच्या दृष्टोत्पत्तीस आले. कोठें त्यांचें मद्यमांसयुक्त भोजन चाललें आहे, कोठें मद्यपानातिशयानें स्त्रीपुरुषें लज्जाविहीन व वस्त्रविरहित होऊन कलहभरांत आहेत, कोणी आपल्या स्त्रियांस मारीत असतां त्या विक्राळ ओरडत आहेत, कोठें कोठें विवाहकार्यें चाललीं आहेत, कोठें पुत्रजन्मोत्सव, कोठें कोणी मेलें म्हणून विलाप चालला आहे, कोठें कोणी आपल्या मुलास रूपान्तरविद्या पढवीत आहेत, कोणी कोठें देवगंधर्वनागमनुष्यांच्या अनेक कथा बोलत आहेत, कोठें सांप्रतच्या अनेक भूभागांतील गोष्टी सांगत आहेत, कोठें मनास वाटतील त्या गप्पा मारीत आहेत. कोठें लंकेंत नूतन घडलेल्या व त्या दिवशीं झालेल्या अनेक प्रसंगांविषयीं वाच्यता व चर्चा करीत आहेत! कोणी अमक्याला चांगला, अमक्याला वाईट ह्मणून त्याची स्तुति व निंदा करीत आहेत! कोठें कोणी चिंतेंत निमग्न आहेत! कोणी रावणाच्या संपत्तीचें वर्णन करीत आहेत! कोणी त्याचे पराक्रमाविषयीं गाणीं गात आहेत! कोणी त्याच्या विद्वत्तेची थोरवी सांगत आहेत! कोणी त्याच्या राज्यांत चाललेल्या अधिकाऱ्यांच्या व खुद्द राजाच्या जुलुमांविषयीं कोणास ऐकूं न येईल अशा रीतीनें बोलत असतांही त्यानें ऐकिलें! आणखी कोठें राक्षस वेदाध्ययन करीत आहेत, कोणी परमेश्वरस्तवनांत गर्क झाले आहेत! अनेक स्थळीं श्रीशंकराच्या नाना प्रकारें लीला गात आहेत, असें त्यानें पाहिलें. आणखी कोठें स्त्रियांचीं मधुर गाणीं चालली आहेत! अनेक ठिकाणीं कोणी नानापरीचीं मंजुल व मनोहर वाद्यें वाजवीत आहेत! अनेक सुंदर स्त्रिया आपल्या पतींशीं प्रेमयुक्त भाषणें करून नानाविध क्रीडा करण्यांत दंग आहेत! लंकेंतील स्त्रियासारख्या सशक्त व सुंदर स्त्रिया दुसरीकडे क्वचित सांपडतील असेंही त्यास त्याक्षणीं वाटलें! एका वाड्यांत कोणी एक वृद्ध राक्षस दुसऱ्या राक्षसास, तो बहुधा त्या घरीं पाहुणा आला असेल, आपल्या विषयीं बोलत असतां, त्यास फार समाधान वाटून आपण सीता शोधनार्थ आलों आहें, असें त्यास लगेच स्मरण झालें! तो वृद्ध राक्षस सांगत होता कीं, "रामचंद्रनांवाच्या कोण्या महापराक्रमी मानवराजाची अत्यंत रूपवती स्त्री सीताबाई आमच्या महाराजांनीं कपटवेषानें हरण करून आणिली आहे. तिचें पातिव्रत्य भंग करण्याविषयीं ते ती येथें आल्यापासून ए-

कसारखे यत्न करीत आहेत! परंतु तिचें मुवृत्त काय हो सांगावें?पतिव्रता जगांत कशी असावी, तिजवर कितीही दुर्धर प्रसंग आले असतां तिनें धैर्य कसें धरावें व कसें आचरण करावें, हें सांगण्याकरितांच ही पृथ्वीवर अवतरून लंकेंत अशा बलात्कारानें आली आहे! अशी पवित्र स्त्री महाराजांस कालत्रयीं तरी वश होईल काय? तिच्या प्राप्त्यर्थ महाराजांचे हजारों यत्न निष्फळ होत असल्यामुळें ते अगदीं वेडे होऊन गेले आहेत! त्यांना कांहीं सुचत नाहीं. कर्तव्याकर्तव्य ते कांहींच जाणत नाहींत! राज्यव्यवस्थेकडे मुळींच लक्ष्य देत नाहींत. कोणाची भेट घेत नाहींत. आपल्या महाराजांस हें वर्ष फार कठिण आहे, असें म्यां ऐकिलें आहे. त्या पवित्र स्त्रीच्या शापानेंच हे कामांध दग्ध व्हावयाचे, परंतु तिच्या मुखांतून शापाक्षेर अजून येत नाहींत, ह्यावरून ती किती शांतप्रकृति आहे बरें! तो राजा रामचंद्र फार पराक्रमी आहे. अर्थात् त्यानें महाराजांच्या नाशार्थ यत्न चालविले असतीलच. शेवटीं "जिकडे धर्म तिकडे जय," हा आपला सिद्धान्त आहेच. तेव्हां ह्या लंकानगरीच्या सौभाग्याचें थोड्याच काळांत काय होणार हें दिसतेंच आहे. सीतेला तिच्या पतीच्या अधीन करावी, ह्मणून महाराजांस पुष्कळांनीं उपदेश केला, साध्वी महाराज्ञी मंदोदरी तर सांप्रत त्यांना प्रत्यक्ष मधुरतर अमृतच पाजीत आहेत. परंतु तें विष समजून महाराज त्याचा आव्हेर करतात. महाराज्ञी चिताग्नीनें अगदीं दग्ध झाल्या आहेत! तेव्हां राजाचा ह्मणजे आह्मां सर्वांचा विनाशकाळ अगदीं जवळ आहे." इत्यादि पुष्कळ बोलला. ह्यावरून आपण व दुसरे सज्जन लंकेंत आहेत अशी त्याची खात्री झाली. मात्र कोणत्या स्थळीं आपण आहों व ह्यांत तथ्यांश किती आहे, हें त्यास मुळींच कळलें नाहीं. रात्र बरीच होत चालली, तेव्हां विशेष कांहीं न पाहतां, लंकानाथ कोठें राहतो तिकडे जावें, असें त्याच्या मनांत आलें. रात्र झाली होती तरी कांहीं कांहीं रात्रिंचर अनेक व्यापारनिमग्न होऊन रस्त्यांतून फिरत होतेच. मोठासा प्रासाद किंवा एकादें रमणीय किंवा विलक्षण स्थळ त्याच्या दृष्टीस पडलें कीं, तो तेथें आपल्याकरितां जाई. असे अनेक प्रकारें अवर्णनीय व अविस्मरणीय चमत्कार पहात पहात तो आपल्या शोधांत गुंतला होता. विस्तीर्ण व रम्य अशीं बहुतेक शिवमंदिरें

त्यानें पाहिलीं. परंतु तेथेंही आपलें त्यास दर्शन झालें नाहीं. ह्यामुळें तो खिन्नान्तःकरण झाला. त्याचें मन अनेक वाईटवाऱ्या विचारांनीं भरून गेलें. मग तो आपल्याशींच ह्मणाला कीं "समुद्रोल्लंघनासारखें कधीं न केलेलें कार्य रामचंद्रप्रसादानें सिद्ध झालें अजून लंकेंत असलेल्या सीतामातेचें दर्शन होत नाहीं. हें मोठेंच आश्चर्य होय ! जर त्या लोकमातेला पाहिल्याशिवाय, तिची भेट घेऊन तिच्याशीं दोन शब्द तरी बोलल्याशिवाय, तिला मुद्रिका दिल्याशिवाय, तिला रामलक्ष्मणांचें संक्षिप्त वृत्त ऐकविल्याशिवाय, वानरांचा इतिहास सांगितल्याशिवाय, तिची स्थिति जाणून घेतल्याशिवाय किंवा तिचा निरोप व आज्ञा घेऊन तिला वंदन केल्याशिवाय, जर रामचंद्रांच्या चरणकमलांपाशीं मी गेलों, तर सीतादेवी लंकेंत आहे, असें मीं किती व कसेंही सांगितलें, तरी त्यांस तें खरें वाटणार नाहीं! व मीं 'कांहीं प्रत्यक्ष तिला पाहिली नाहीं,' असें त्यांना सांगतांच, ते अनेक कुतर्क व शंका काढून आपल्या जीविताचा सुद्धां नाश करतील ! मग अर्थात् ह्या दुःखप्रद वार्तेनें भरतशत्रुघ्नही आपले प्राण देतील! मग त्यांच्या माता व स्त्रिया क्षणभरही जीवंत राहणार नाहींत ! ह्याप्रमाणें प्रख्यात रघुकुलाचाच केवळ माझ्या हातानें विध्वंस होईल एवढें नाहीं, तर जनकवंशाच्या छेदासही मीच करण होईन. मग त्यांच्या प्रियप्रजांच्याही स्थिति फार वाईट होतील! मग त्या परकीय राजाच्या सत्तेंत आल्या ह्मणजे त्यांच्या दुःखास पारावार नाहींसा होईल ! त्यांच्या गुणांस, शौर्यास, बुद्धिवैभवास, सदाचरणास किंवा त्यांचे वाणीस कोणीही पुसणार नाहीं ! त्यांचे अधिकार, सत्ता, मान आचार ह्यांना परकीय राजे मुळींच लेखणार नाहींत! त्यांच्या जीविताचें मूल्यही अशा राजांस तुच्छ वाटणार ! त्यांस यथाकालीं न्याय मिळणें कठिण होईल! त्यांच्या सत्याची किंमतही ते मानणार नाहींत ! अश्रांत श्रम करूनही त्यांना पोटभर अन्नसुद्धां मिळण्याची मारामार पडेल, अशी त्यांची दुर्दशा होईल! "तेव्हां कांहीं होवो, रामभार्येचें चरणावलोकन केल्यावांचून मी कधींही रामचरणावलोकन करावयाचें नाहीं!" असा त्या वानरानें दृढ संकल्प केला. व तदनुरूप नवें धैर्य धरून तो आपल्या अन्वेषणास लागला. थोड्यावेळानें येथून जवळच असलेल्या एका अत्यंत विस्तीर्ण व सर्वांगमनोहर अशा मंदिरांत तो रूपांतर केलेला वानर शिरला. तेथील अतुलवैभव व अपार शोभा पा-

हून तो आश्चर्यचकित झाला. त्यानें पूर्वी असें स्थळ कधींही पाहिलें नव्हतें. तेथें अनेक प्रकारचे हजारों मणिमयप्रदीप जळत होते. त्यांच्या अतिशय प्रकाशानें तेथील अल्प व सूक्ष्म वस्तूही दुरून व्यक्त दिसत होती. भिंतींवर कुशल चित्रकारांनीं रावणपराक्रमद्योतक व दुसरीं अनेकविध चित्रें लिहिलेलीं होतीं. वरील विस्तृत छतें नाना रंगांच्या रत्नांनीं व मौक्तिकांनीं जडित होतीं.खालील भूमीही वरील मूल्यवान् छतांस शोभेल अशीच मनोहर होती. मोठमोठ्या सुंदर व मुक्तामणिमय झालरींनीं सुशोभित अशा अनेक वातायनांतून जवळचा उपवनसंबंधी मंदमंद व सुगंधमिश्रित वायु वहात होता. मला वाटतें हेंच तें उपवन तेथपर्यंत लांब गेलेलें आहे! त्या सुंदर मंदिरांतील तो दर्शनीय व नयनमनोहर वस्तूंनीं अगदीं परिपूर्ण असा सभामंडप ओलांडून तो गेला, तों ह्याहीपेक्षां मनोरम असे कित्येक सभामंडप त्याला लागले! ह्या प्रत्येक स्थळीं स्त्रीसैन्य होतें! त्यांतील कांहीं स्त्रिया निद्रावश झाल्या असून दुसऱ्या कित्येक शस्त्रांनीं सज्ज होत्सात्या आपले नियमित कामांत व्यग्र झाल्या होत्या.तेथील वैभवातिशयानें अत्यंत विस्मित व प्रसन्नान्तःकरण होऊन, हें अनुपम वैभव लंकाधिपतीचेंच असावें असें त्यास तेव्हांच वाटलें, व ह्याचा त्यानें असाच सतत उपभोग घ्यावा असें त्याच्या मनांत येऊन आपलें दर्शन होतांच किंवा अगदोरही त्या दशाननास भेटून त्यास रामचंद्रांच्या पराक्रमाच्या अत्यद्भुततेविषयीं सांगावें, व ज्याचें त्यास हरण केलेलें स्त्रीरत्न परत देण्याविषयीं जितका सदुपदेश करवेल तितका करावा, असा दृढ निश्चय करून हळुहळू तो वानर संचार करीत असतां, खरोखर लक्ष्मीविलासमंदिरचकाय, असें एक रम्य स्थान पाहता झाला! तें सर्वत्र पुष्पमय होतें, ह्मणून त्रिभुवनास जिंकणाऱ्या मदनराजानें बाणांनीं वेधून टाकिलेलेंच काय, असें दिसत होतें! रणशूर योद्ध्यांच्या स्फुरण पावलेल्या भुजभुजंगांप्रमाणें लठ्ठ व लांब असे अनेक प्रकारच्या फुलांचे हजारों हार तेथें चोहोंकडे कुशलतेनें टांगलेले होते. वरचीं छतेंही कुसुमांनीं परिवेष्टिलेलीं होतीं.तेथील मूल्यवान् व मनोरम पर्यंक पुष्पमालांनीं शृंगारलेले होते.त्यांवर स्वच्छ, शुभ्र व मृदु शय्या असून अनेक रंगांचीं सुंदर व सुवासिक फुलें पसरलेलीं होतीं. ठायीं ठायीं मोठमोठे मणिमय आदर्श होते. मनोवेधक पोशाक केलेल्या कित्येक दासी मौनव्रत धारण

करून कोणा तरी देवतेच्या सेवेंत गुंतल्या आहेत असें वाटे! तेथें अनेक प्रकारच्या मधुर पुष्पसुवासांचें व नानाविध सुगंध द्रव्यें व तेलें यांच्या परिमलांचें मिश्रण होऊन जो कांहीं एक घमघमाट सुटला होता, त्या योगानें मृत प्राणीसुद्धां जीवन्त व्हावा, असें वाटे! त्यानें तेथील बहुतेक पलंग पाहिले, परंतु ते सर्व शून्यच होते. एका पलंगावर मात्र एक अत्यंत सौंदर्यशालिनी स्त्री निद्रावश झालेली त्यानें पाहिली. तिच्या सभोंवती त्या रूपाला अनुरूप अशा अनेक दासी तद्रूप रक्षणार्थच जणू जागृत होत्या! एका बाजूला एक व दुसऱ्या बाजूला एक अशा दोन दासी हातांत मूल्यवान् व सुंदर विंझणे घेऊन त्या निद्रित स्त्रीला मंद मंद वारा घालीत होत्या. तें अद्वितीय व अत्यंत मोहक स्त्रीरूप त्याच्या दृष्टीस पडतांच त्यास फार वाईट वाटलें! व एकदम त्यास फार राग आला! तो सेवकजन त्यास शत्रुसमुदाय भासला! आणि आपण अभागी, दुष्ट, नष्ट, पापी, असें त्यास पुनः पुनः वाटूं लागलें! त्या स्त्रीकडे तो अधिक अधिक निरखून पाहूं लागला! तेव्हां तर ह्या अशा अपूर्व प्रकाशाचें व ह्या सुगंधाचें मूळ हें आननच असावें असें त्यास क्षणभर भासलें. "आतां आपल्या स्वामीस जानकीचें वर्तमान काय कळवावें! ती लंकेंत पतीच्या विरहाने काय करीत आहे ह्मणून सांगावें? ती कोठें पाहिली ह्मणून निवेदन करावें? तिची काय स्थिति वर्णावी? प्रथम काय बोलावें? ते काय पृच्छा करतील? तिला निद्रा येत नसेल? असा दुःखित होऊन त्यांनीं मला प्रश्न केल्यास मीं मंदभाग्यानें काय उत्तर द्यावें! ती फार कृश झाली असेल! कोठें तरी भूमीवर लोळत असून दीनप्रमाणें एकएक दिन कंठीत असेल! अगदीं निराश झाली होती, नाहीं बरें? इत्यादि अनेक प्रकारें त्या जानकीजिवनानें विचारल्यास त्यास आपण उत्तर तरी काय द्यावें!" असे अनेक तरंग त्याच्या मनांत उद्भवले. तो निराश, निरुत्साह, असमर्थ व अत्यंत दीन झाला. वरचेवर तो रागानें पुच्छ तुडविलेल्या सर्पासरखा होई. त्याला पुढें काय करावें हें कांहींच सुचेना! भर्त्यावर प्रेम दाखवूनही शेवटीं त्याच्या तोंडास काळिमा लावणाऱ्या ह्या स्त्रीचें मुख जगातून नाहींसें करावें व भोळ्या त्या स्त्रीप्रेमान्धास आपलें मुख दाखविण्याचा प्रसंग आणूं नये, असा दृढ निश्चय करण्याचें त्यानें मनांत आणिलें. "जर हिचें यथा तथ्य

वृत्त त्यांस कळविलें, तर तिचा त्या स्थळींच शिरच्छेद कां केला नाहीं? ह्मणून मला ते ह्मणणारच. व ह्या दुर्वृत्तश्रवणानें ते प्राणत्याग करतील. तर जेणेंकरून ही दुष्ट स्त्री जगांतून जाईल व ते प्रिय परोपकारी बंधु वांचतील असें करण्यास हाच दृढ संकल्प पूर्ण केला पाहिजे." असें मनांत योजून तो क्षणभर तेथें विचारशून्य राहिला! क्षणैकानें, ही रावणस्त्रीच असावी, जिचे अगणित गुण आठवून जिच्याकरितां रामचंद्रासारखा ज्ञानी पुरुष भ्रान्तबुद्धि होऊन अरण्यांत रोदन करीत आहे व पाहिजेल तें साहस करण्यास सिद्ध आहे व जिच्या पतिभक्तिपरायणतेच्या कथा ऐकत असतां, शांति व समाधान वाटून क्षुधाही निवते, अशी जनकनंदिनी ह्या पर्यंकरूप नागफणावर क्षणभरही पाय ठेवणार नाहीं, मग सुखानें त्यावर ती निद्रा कशी घेईल? तेव्हां ही सीता देवी नव्हे. अशासारखेही अनेक विचार त्याच्या मनांत आले नाहींत, असें नाहीं. पण ज्या विलक्षण रूपाकरितां स्वयंवरांत हजारों राजे धांवत आले, आज राम शोकाकुल झाले आहेत व रावणानें यदर्थ चौर्यकर्म केलें, तेंच हें ब्रह्मांडांतील अद्वितीय रूप! ह्यापेक्षां जगांत आणखी चांगलें रूप तें कसें असणार? ह्या एका तर्कानें ते सर्व विचार तेव्हांच विलयास गेले! हिचा वध व आपण पुनः रामदर्शन न घेणें, ह्या दोन गोष्टी करावयाच्याच, ही बुद्धि मनांत दृढ ठेवून तो जरा पुढें गेला. तों तेथें अशा सारख्याच पर्यंकावर तो दशाननन तीं वीस नेत्रें झाकून पडला होता! तो जागृतच होता. त्याला त्यास्थळीं पाहून तर ह्याचा तो संशय अगदीं दृढ होऊन तो फारच क्रुद्ध झाला. त्याला काय करूंसें झालें. ह्याक्षणीं ह्या दशकंठाच्या छातीवर बसून याला देहान्त शिक्षा करावी किंवा ह्या मंदिरास किंबहुना सर्व लंकेस अग्नि लावून रामचंद्रचरणांकडे धांव मरावी, ह्या विचारांत तो क्षभणर निमग्न झाला! मग पुनः त्या सुंदरस्त्रीच्या शयनाजवळ आला. व ही निद्रित असतां हिला "तूं कोण आहेस?" असें विचारून तिजकडून प्रत्युत्तर मिळाल्याशिवाय व मी अमुक अमुक आहें, हें हिला सांगितल्या शिवाय, ह्या पापिणीला परलोकास पाठविणें उचित व न्याय्य नाहीं, असें त्यास वाटून तो तिला जागी करणार होता, इतक्यांत ती स्त्री मोठ्यानें ओरडली व उठूनबसली! तेव्हांही तिचें सर्व रूप पाहून

तो रामदूत फारच दुःखी झाला. पण ती काय बोलते तें ऐकण्यावि- षयीं फार उत्सुक झाला होता. ती स्त्री भीतीनें अस्वस्थचित्त होऊन ब- सली. तेव्हां तिच्यापाशीं चोहोंकडून अगणित दासी आल्या! त्या स्त्रीचें ऊर धडधडत होतें! अधर सतत स्फुरण पावत होते! नेत्रें अश्रुज- लानें भरून गेलीं होतीं! ती वारंवार श्वास टाकीत होती. व तें मुख- कमल क्षणांत कोमेजलेलें दिसूं लागलें. तिला अत्यंत नम्रतेनें व मर्यादेनें एका दासीनें मधुर वाणीनें तिच्या त्या वेळच्या अवस्थेचें व रूपाचें अगदीं यथास्थित वर्णन करून तिला ओरडून दचकून उठण्याचें कारण विचारीत असतां, तिला अमुक झालें काय? तमुक झालें काय? असे अनेक प्रश्न केले. तेणें करून त्या भाषणकुशल दासीनें त्या स्त्रीवरील आ- पलें अत्यंत प्रेम व बुद्धिवैभव उघड केलें. त्या पर्यंकस्थस्त्रीनें जरी कांहीं उत्तर केलें नाहीं, तरी तिचें वदन अधिकाधिक म्लान दिसूं ला- गलें. वारंवार येऊं पाहणाऱ्या रोदनाचें ती निवारण करीत आहे, असें सूक्ष्मदृष्टीनें पहाणारास स्पष्ट दिसत होतें. त्या स्त्रीनें जवळच पलं- गावर असलेल्या मणिमय आरशाकडे हात केला, तों एका दासीनें झ- टकन् तिच्या हातांत तो दिला. तो घेऊन तिनें आपला कुंकुमतिलक, मं- गलसूत्र, हृदय वगैरे पाहून, केशपाशास हस्तस्पर्श करून करांतील कंकणें पाहिलीं! तेव्हां ती जशी काय लुटलेलीच, ताडलेलीच, असाहाय्य, दी- नवदना, निराश, दुःखमूर्ति व पश्चात्ताप करणारी अशी दिसली! तेव्हां तर त्या वायूप्रमाणें संचार करणाऱ्या किष्किंधापतीनें सीतान्वेषणार्थ पाठविलेल्या वानराच्या अन्तःकरणांत कुतर्कांना व क्रोधातिशयाला जागा नाहींशी झाली, इतकी त्यांची तेथें गर्दी उडाली! नंतर ती मु- काट्यानें पर्यंकावरून खालीं उतरली. तेव्हां परिजनांनीं तिचा दशा- ननाकडे जाण्याचा हेतु जाणून तिला तिकडे नेलें. ती आपल्याकडे येत आहे, असें पाहून तो लंकाधिपति तिच्या आदरार्थ उठून उभा रा- हिला. नंतर तिचा तो मृदुल हस्त धरून त्यानें तिला पर्यंकावर घेऊन आपल्या अंकावर बसविलें! तेव्हां तेथील सर्व परिजन दूर झाला. ह्या वेळेस ह्या पापाचरण करणाऱ्या दोघांसही एकदम ठार करण्यास ही उ- त्तम संधि आहे, असें त्या संशयग्रस्त रामदूताला वाटतें आहे, तों ह्यांचें अगोदर एकान्तिक भाषण ऐकावें असें त्याच्या मनांत आलें. नंतर

तिच्या अस्वस्थ व सभय मुद्रेचें कारण तो दशानन नानाप्रकारें तिला विचारीत असतां ती स्त्री आपणच आहां, असें त्या वानरास वाटून त्यास अगोदर परम दुःख झालें होतेंच, त्यांत आणखी त्या स्त्रीनें बोलण्यास प्रारंभ करण्यापूर्वी " अहो प्राणनाथ, " ह्या संबोधनानें त्यास हांक मारून तिनें एकदम रडण्यास आरंभ केला! ती स्त्री आपण असून रावणाच्यापर्यंकावर त्याच्या अंकावर बसलां आहां, व त्यास 'प्राणनाथ' ह्मणून हांक मारीत असतां, त्या रामचंद्राच्या सेवकाच्या अन्तःकरणाचें काय झालें असेल, ह्याचा तुह्मीच विचार करा, ह्मणजे त्याविषयीं कांहीं सांगावयास नको. असो; नंतर त्या दशाननानें तिचें मृदुभाषणानें सांत्वन केलें, तो यच्चयावत् प्रकार आपल्यास सांगितल्यास फार तिरस्करणीय वाटेल. व आतां रात्रही हळू हळू संपत चालली आहे, ह्मणून तत्संबंधें मी कांहीं बोलत नाहीं, एवढेंच नाहीं, तर त्या रावणांकास्थित स्त्रीनें अत्यंत भीतीतें व दीनवदन होऊन जें त्यास सविस्तर स्वप्नकथन केलें त्यांतील अगदीं थोडक्यांत सार अपाल्यास निवेदन करतों. तें स्वप्न सांगण्यास आरंभ करतांच त्याला समजलें कीं ही रावणाची स्त्री होय. त्यावेळेस त्याला फार आनंद झाला. रावणस्त्री अत्यंत रूपवती व सर्व स्तुत्य गुणांनीं सुसंपन्न असतां ह्याला हें स्त्रीचौर्यकर्म ज्यापेक्षां इष्ट वाटलें त्यापेक्षां तो ह्या अतुल वैभवासच कंटाळला आहे, असें ह्मणावें लागतें. रावणाच्या ह्या दुष्ट कृत्यानें ह्या सदाचरणप्रिय स्त्रीवर थोडक्याच अवकाशांत आतां फारच अनिष्ठ प्रसंग येणार, हें पाहून तो फार खिन्नान्तःकरण झाला. तिनें सांगितलेल्या स्वप्नवृत्तांताचें तात्पर्य हेंच कीं, तें दंपत्य सुखानें एका प्रासादसौधावर मोठ्या प्रेमानें गोष्टी बोलत असतां, तेथें कोणी एक भयंकर पर्वताकार वानर आला! त्यानें रावणाला त्या उंच स्थानावरून खालीं दुर्गंधमय पदार्थांत ढकलून दिलें! तेव्हां त्याचे हातपाय वगैरे मोडून जाऊन तो सर्व प्रकारें असमर्थ होऊन तेथेंच मोठ्यानें आक्रोश करूं लागला. व तो भयंकर वज्रदेही वानर 'मी रामदूत आहें,' असें रावणस्त्रीला सांगून तिच्या उरावर बसला! व त्यानें तिचें सर्व सौभाग्यद्योतक अलंकार तोडून फोडून पुसून टाकिले! व रामभार्येला सोडून देण्याविषयीं तिला पुष्कळ बोलला. तिची त्यानें नानाप्रकारें विटंबना केली! तिची कंचुकी फाडून टाकिली. केशपाश उपटूं लागला! व तिला ताडन

करूं लागला! तेव्हां ती जागृत होऊन ओरडली! हें स्वप्न जसें तिला दिसलें, तसें ती आपल्या प्राणेशाला मोठ्या दीनवदनानें, करुणस्वरानें, आर्जवानें व रडरडत सांगत असतां, शत्रूंच्या नेत्रांतूनही खळखळा अश्रुधारा वहाव्या असा तो त्यावेळचा त्या रामप्रेषितवानराला प्रसंग दिसला व भासला! व स्वप्नकथन केल्यावर आपणास रामचंद्राधीन करून त्याची क्षमा मागण्याविषयीं जो उपदेश तिनें केला, तो केवळ अमृताचा वर्षावच होत होता! तो आपल्यास निवेदन करण्यासारखा होता, परंतु दुराचरणानें दुष्ट लोकांची वैभवश्री ज्याप्रमाणें नष्ट होते, त्याप्रमाणें ही रात्र नष्ट होत चालली आहे,हेंच जणूं सांगणारे, हे वरचेवर काल-द्योतक शंखनाद, डंके वगैरे होत आहेत, ह्मणून माझा निरुपाय आहे! स्वामिनि,त्या सुग्रीवराजदूताला असें वाटलें कीं,"मी जेव्हां हें लंकेंत पाहिलेलें सर्व वृत्त रामचंद्रास कथन करीन,आणि जेव्हां रावणस्त्रीचें सदाचरण व तिची इच्छा ह्याविषयीं त्या परम कारुणिकास कळेल, तेव्हां ह्या एका साध्वीकरितांच रावणाचा नाश न करण्याची कल्पना त्या सदयहृदयाच्या मनांत सहज भरणार आहे! व त्याचा नाश केल्याशिवाय, सीतादेवीची येथून मुक्ति कशी व्हावी? तेव्हां ही गोष्ट फार वाईट होणार आहे. हें स्वप्नवृत्त वगैरे त्यांस कथन न करितां एकदम पुढील वृत्तांत त्यांस सांगणें,माझ्यानें कदापि होणार नाहीं. तेव्हां काय करावें?" असो; त्या स्त्रीचा राक्षसाधिपतीपाशीं तो उपदेश "न्युब्जकुंभे यथा जलं" ह्या ह्मणी प्रमाणें झाला! रावणानें तिच्याशीं लांबलचक भाषण केलें. तें सर्व गर्वानें भरलेलें असून "त्या मानवाचें ह्या ठिकाणीं अगोदर आगमनच दूरापास्त आहे, व कदाचित् तो आलाच तर त्याचा पराजय करणें ह्मणजे कांहींच नाहीं," ह्या दोन मूलतत्वांवर होतें! आणखी स्वप्नदर्शन हें कांहीं शुभाशुभद्योतक नाहीं, असेंही त्यानें सांगितलें. त्याच्या त्या भाषणांवरून आपण कोणीकडे तरी दुसरीकडे निष्कलंक आहां, रावणानें आपल्या वशीकरणार्थ बहुत यत्न चालविले आहेत, इतकें त्या दूताला तेथें समजलें. मग त्या स्थळीं विशेष न राहतां त्यांस तेथें तशींच बोलत ठेवून मोठ्या आनंदानें आपल्या शोधार्थ निघाला. तो मग लौकरच ह्या रम्योपवनांत शिरला. त्याचें विलक्षण मनोरमत्व व विशालत्व पाहून त्यास मोठें आश्चर्य वाटलें! ही वनिका फार बेळ

धुंडाळली. शेवटीं ह्या शिशवाच्या वृक्षावर तो विचार करीत बसला. तों त्यास तेथून आपलें अशा रामचिंतनमग्नावस्थेंत दर्शन झालें. त्यास तत्कालीं अत्यानंद झाला. परंतु संशयानें तो फारवेळ टिकूं दिला नाहीं. कारण कीं ही राक्षसनगरी, कपटविद्येचें आद्यपीठ होय. ही कोणी राक्षसी सीतावेष घेऊन रामचिंतन करीत नसेल कशावरून? अशी त्यास दृढ शंका आली. रामांगनेस तो राक्षसपति अशा स्थळीं ठेवणार नाहीं, असें त्यास वाटून तो विस्मयाकुल झाला! त्यास पुढें कांहींच सुचेना! ही कपटमय जानकी असून जर आपण हिला भेटून सर्व गुप्त वृत्त सांगितलें, तर शत्रूंच्या हातांतच मान दिलीशी होणार! व ह्या प्रथम प्रसंगावरूनच हे लोक आमच्या शहाणपणाची किंमत लेखणार! बरें, ही खरी रामांगना असली तरी, मी रामप्रेषित आहें, हें तिला सांगितलें असतां व रामनामांकित मुद्रिका अभिज्ञानार्थ दिली असतांही, ह्या कपट-बाजार नगरींत तिला कांहीं एक खरें वाटणार नाहीं! अपणाला ही कोणी कपटी निशाचरच आहे, असें समजेल! तेव्हां हिला भेटून हिच्या दुःखितान्तःकरणाला अधिक त्रास देणें योग्य नाहीं. असा त्यानें विचार करून सीतादेवी अमुक ठिकाणीं आहे, मीं तिला प्रत्यक्ष पाहिली, परंतु अशाअशा कारणामुळें तिला भेटलों नाहीं, असें रामचंद्रचरणारविंदीं त्यानें जाऊन सांगण्याचा दृढ निश्चय केला! तों ह्यास्थळीं तो कामांध लंकाधिपति येऊन त्यानें आपल्यास वश करण्याकरितां आपल्यापाशीं काय काय अश्राव्य भाषण केलें, त्यावर आपण अत्यंत क्रुद्ध होऊन निर्भर्त्सनापूर्वक रामांगनेला योग्य आणि सत्पुरुषांनीं व साध्वी स्त्रियांनीं माना डोलवून सर्व जगतानें सर्वकाळ स्तुतीच करावी असें काय बोललां, नंतर ज्याला अवदशेनें प्रेमालिंगन दिलें आहे, व काळाचा जो क्रीडामृग होऊन राहिला आहे, असा तो रावण निघून गेल्यावर जवळ दुष्ट राक्षसींनीं आपल्यास किती त्रासविलें व आपण जिला "त्रिजटे" म्हटलें, त्या—राक्षसींस अपवाद आणणाऱ्या—स्त्रीनें आपलें [illegible] जिनें सांभाळलें, हें सर्व कांहीं त्यानें पाहिलें व ऐकलें. ह्या एका प्रसंगावरून दशाननानें आजपर्यंत आपणास किती त्रास दिला असेल, व त्या सभोंवतालच्या दुष्ट राक्षसस्त्रियांनीं किती गांजलें असेल, हें त्यानें तेव्हांच जाणलें. आणखी त्रिजटेसारखी

परदुःख जाणणारी स्त्री आपल्या जवळ आहे व ती ही अशी एखादी असेल, असें आपल्या बोलण्यांतील संदर्भावरून त्यास वाटलें. त्यानें आपल्यास पाहून हा प्रसंग स्वतः डोळ्यांनीं व कानांनीं अनुभवला, तेव्हां त्याची खात्री झाली कीं, आपणच आहां. जनकनंदिनि, आपण रूपानें व गुणांनीं अद्वितीय असून रामचंद्रांस जो आपला वियोग असह्य झाला तो अगदीं यथार्थ आहे! एके समयीं तो रघुकुलोत्पन्न दशरथनंदन तुह्माकारितां प्राणत्याग करण्यासही तयार झाला होता! परंतु लक्ष्मणानें तो प्रसंग टाळला, ह्मणून जें राममुखांतून त्या रामदूताला कळलें होतें तें केवळ खरेंच आहे, आतां एवढेंच नाहीं त्याला वाटलें, तर हें सकल वसुधेचें सौभाग्य नाहींसें झालें असतां, रामचंद्र आद्यापि जीवन्त कसे राहिले आहेत, ह्याचेंच त्याला फार आश्चर्य वाटलें!

**सीता**—तर मग, हे द्विजशिशो, तो पराक्रमी, शहाणा व समर्थ इतका जवळ येऊन अद्यापि मला दर्शन देत नाहीं हें कसें? तो तसाच परत गेला काय? हे परोपकारिन्, तूं त्याच्या बरोबर लंकेंत आलेला कोण? त्यानें तुला ही मुद्रिका केव्हां दिली. तूंही मत्प्राणनाथाचा मित्र कसा झालास? तो मला कां भेटला नाहीं? तूं आपलें वृत्त मला कांहींच सांगितलें नाहींस ह्यास काय ह्मणावें? साधुलोक आपलें पवित्र चारित्र स्वमुखानें कधीं वर्णीत नाहींत हें खरें, परंतु तें मला सर्व कथन कर.

**बटु**—माई साहेब, तोच मी आपल्या पद्कमलीं लीन होणारा आपला अत्यंत आज्ञाधारक सेवक. रावण निराश व रागावून तें प्रतिज्ञावचन बोलून गेल्यावर, राक्षिसींनीं आपल्यास कांहीं वाक्ताडन केल्यावर त्या त्रिजेटेनें थोडें समाधान केलें. नंतर येथें सर्वत्र सामसुम झालेंसें पाहून जेव्हां आपण हताश होऊन केशपाशानें प्राण द्यावयास सिद्ध झालां, तेव्हां मग ह्या वेषानें मी आपल्यापुढें आलों. तर आतां आपण निर्भ्रान्त होऊन निष्कपटानें मजपाशीं काय बोलणें तें बोलावें. स्वामिनि, आपल्या दर्शनानें आज मला जन्मास आल्याचें सार्थक्य वाटत आहे. आज मी कृतकृत्य झालों. आज माझ्या पुण्यसंचयाचें फळ प्राप्त झालें. माझ्या विद्येचा उदय झाला. पराक्रमाचा आज मला अभिमान वाटत आहे. मी पुनः पुनः सांगतों कीं आपल्या विरहानें झालेली आपल्या

प्रियप्राणनाथाची स्थिति जशाची तशी सांगणें असंभाव्य तर आहेच, परंतु ती अशा स्थळीं अल्पकाळांत विस्तार केल्याशिवाय सांगणें तर फारच कठिण आहे. आपल्या विरहानें ते अत्यंत कृश झाले आहेत, "हे जानकी, मला तुझें प्रफुल्ल मुखारविंद स्नाइ ध्यावयाला कधीं मिळणार," हें व अशासारखीं प्रेमानें भरलेलीं अनेक वाक्यें दिवसांतून ते हजारों वेळ उच्चारितात! श्वासोच्छ्वास इतका कांहीं सोडतात कीं जगताच्या श्वासोच्छ्वासाचें हेंच मूळस्थान आहे असें भासतें! मीं जें संक्षिप्त रामवृत्त सांगितलें, त्यांत आपल्या प्राणनाथांनीं किंवा लक्ष्मणांनीं आपल्याकरितां अमुक एक केलें नाहीं, असें जेथें तुम्हांस वाटत असेल, तेथें तें मी सांगण्यास विसरलों असें समजा. किंवा मजसाठीं अमुक त्यांनीं कमी केलें असें जें कांहीं मनांत आणाल, तें मला निवेदन करतां आलें नाहीं असें माना. सारांश, आपल्यावरील अप्रतिम प्रेम मनुष्यदेहाला जेवढें व्यक्त करतां येईल, तेवढें रामचंद्रांनीं व्यक्त केलें. असो. तुमचा शोध मला लागला म्हणून मी आपल्याला मोठा भाग्यवान् व कृतार्थ समजतों!

**सीता**—अद्यापि, हे पराक्रमशालिन्, हे परोपकरदक्ष, तुला प्रीतीनें संबोधन द्यावयास मला तुझें नांव समजत नाहीं! जांबवान्, नील, उल्कामुख सुहोत्र, गंधमादन, शरादि, द्विविद शरगुल्म, मैंद, सुषेण, गवय, वृषभ, ह्यांतील तुझें कोणतें पवित्र व मधुर नांव तें सांगून, ह्या राक्षसनगरींत राहून दूषित झालेल्या सर्वेंद्रियांपैकीं हें माझें कर्णेंद्रिय तरी पावन कर. तुझा पराक्रम, तुझें भाषण, तुझें सच्छील, इत्यादि आपल्या अपूर्व व निर्मल गुणांनीं तूं मत्प्राणनाथाला प्राणप्रिय झाला आहेस, ह्यांत नवल नाहीं. तुझ्या दर्शनानें मी जशी काय अमृतोदधींत डुंबतच आहें, असें मला वाटतें. तूं प्राणनाथाचा केवळ एक प्राणच येथें आला आहेस ह्यांत संशय नाहीं! तूं मला माझा बंधु, पिता, सर्व कांहीं दिसतोस! पुत्रवात्सल्य कशाप्रकारचें असावें, ह्याची मला कल्पना तुझ्या दर्शनानेंच आली! प्रियपुत्रका, मी कां, किती निरुपायस्तव व कोणत्या साहस कृत्यास प्रवृत्त झालें होतें. हें तूं प्रत्यक्ष पाहिलेंच आहेस. ह्या एका प्रसंगावरून मी येथें कसा काळ कंठीत आहें, हे सुज्ञा, तुला समजलेंच आहे! मला कोणी प्राणनाथाचा वृत्तांत सांगणारा भेटला तर त्याजपाशीं मी अमुक सांगेन, तमुक सांगेन, असें किती तरी मनांत येई. परंतु ईश्वरकृपेनें तसा

सुप्रसंग आला असतांही आतां अत्यानंदामुळें मला कांहींच सुचत नाहीं! आतां प्राणनाथ भेटतील अशी मला आशा उत्पन्न झाली. अथवा तूं शहाणा, व सकलगुणोपेत असल्यामुळें, मला कांहीं एक प्राणनाथाला सांगावयास नको. ह्मणून कांहीं एक सुचत नाहीं.

बटु—आपणास माझें नांव समजण्याची इच्छा आहे, ती केवळ पूर्ण करण्याकरितांच माझें नांव सांगतों. आतां जीं नांवें आपण घेतलींत त्यांत माझें नांव नाहीं. माझी योग्यता त्यांहून फार कमी आहे. माझें नांव हनुमान. माझ्या मातेचें नांव अंजनी. पित्याचें नांव केसरी. तो वायुदेवतेची आराधना करणारा होता व मीही त्याच देवतेचा निःसीमभक्त असल्यामुळें मला वायुपुत्र, मारुति ह्मणतात. वायुदेवतेचा मजवर पूर्ण अनुग्रह आहे. तिच्या कृपेनें व रामचंद्राच्या अनुग्रहानें मी तो समुद्र उल्लंघून ह्या स्थळीं आलों. मी ब्रह्मचारी आहें व असाच पुढें ब्रह्मचर्यांतच माझा काळ जावा अशी फार इच्छा आहे. ब्रह्मचर्यव्रतासारखें पवित्र, समाधानकारक व परोपकार करण्यास योग्य असें दुसरें व्रतच नाहीं. पंपासरोवरीं प्रथमतः सुग्रीवाज्ञेनें ज्यानें रामलक्ष्मणांपाशीं येऊन सुग्रीवाचें व त्यांचें सख्य करविलें, तोच मी हा आपला नम्र सेवक. आतां ही त्या किष्किंधापतीनें मला आपलें प्रधानत्व दिलें आहे. स्वामिनि, सीतामाई, आपण प्राणपतीच्या विरहव्याधीनें किती कृश झालां आहां, हें मला दिसतेंच आहे. आपणांस येथें किती दुःख होत आहे व आपलें वर्त्तन कसें आहे, हें मीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. ह्यावरून मला सर्व समजतेंच आहे! मला जरी रामाज्ञा नाहीं तरी आपल्यास त्यांचे चरणमूलापाशीं आता नेतों. कारण आपणास इतकें असह्य दुःख भोगावें लागत आहे, ह्याची त्या सदयहृदय पुरुषास कल्पनाही नसल्यामुळें किंवा तुमचें मलाच दर्शन होईल, असा भरंवसा नव्हता ह्मणून, अथवा विस्मृतीनें त्यांनीं मला अशी कांहीं आज्ञा केली नसेल. परंतु स्वामीची आज्ञा नसली ह्मणून सेवकानें त्यास आवडेल असें सत्कृत्य करण्यास कोणता प्रत्यवाय आहे? तेव्हां आपण मजबरोबर यावें. मी तुम्हास मालतीपुष्पाप्रमाणें नेऊन आपल्या प्रियप्राणनाथांच्या चरणीं वाहीन! येणें करून उभयतांचा शोकाग्नि लौकर शमेल.

सीता—वत्सा मारुते, तूं तिकडील इतिवृत्त सांगत असतां तें

मी अगदीं एकाग्रचित्तानें ऐकत होतें. तरी तत्तत्प्रसंगीं, ज्यानें प्रथमतः माझ्या प्राणनाथांस व भावोजींस भेट देवून, त्यांचें व सुग्रीवमहाराजांचें सख्य केलें, व जो फार परोपकारी शहाणा, वाक्कुशल, पराक्रमी, स्वामिभक्त, अत्यंत लीन असून प्राणनाथांनीं ज्याच्या व्याकरणशुद्ध व रसाळ भाषणाची स्तुति केली, तोच हा लंकेस आलेला वानरश्रेष्ठ होय, असें मला वाटत होतेंच. ह्या दक्षिणेकडे आलेल्या नाममालिकेंत ह्याचें नांव पदकस्थलीं यावें, असें असतां ह्या महाशयानें आपलें नांव त्यांत ओंवलें नसेल, अशीही एकदा मला शंका आली होती! असो, पवनात्मजा-तुलाही ह्या अभाग्येनें बहुत क्लेश दिले. अरे, आणखी माझ्यामुळें कोण कोणत्या सत्पुरुषांना काय काय दुःखें भोगावीं लागणार आहेत, कोणास माहीत? हनुमन्, तूं मला आईबाप, संबंधी, इष्टजन, ह्यांच्या-हून अधिक वाटत आहेस. तुझे मजवर अनंत उपकार आहेत. तुझ्या आगमनानें व दर्शनानें माझी जो कांहीं अंतःकरणवृत्ति झाली आहे, ती कांहीं केल्यानें व्यक्त होणार नाहीं. हें स्वप्न तर नव्हेना, असें पुनः पुनः मी आपल्या मनाला विचारीत आहें! तुझ्या भेटीनें प्राण, नाथच भेटले असें मला झालें आहे. मारुते, माझी दुःखावस्था जाणून मला नाथचरणांपाशीं नेण्याचा जो हेतु तूं दर्शविलास, तो तुझ्या पराक्रमाला योग्यच आहे. परंतु हा भडकलेला शोकाग्नि असाच थंड व्हावा, हें तुला तरी बरें दिसतें काय? ह्यांत होमद्रव्य कांहींच नको का? अरे ह्यानें एक चौर्यकर्म केलें, ह्मणून माझ्या शूर प्राणना-थानेंही तेंच करावें काय? मग सांप्रतचे व पुढें अनंत कालपर्यंत हें कथानक ऐकणारे लोक आपल्यास काय बरें ह्मणतील! हे पराक्रम-शालिन्, तूं हें मनापासून बोलला नसशील. माझ्या दुःखामुळें असे हे उद्गार तुझ्या मुखांतून बाहेर पडले! संग्राम करून रावणासारख्या दुष्टास ठार मारून मला त्यांनीं न्यावें, ह्यांतच त्यांना अक्षय्य कीर्तिलाभ होणार आहे. आणि ह्या प्रमाणेंच त्यांचा मला नेण्याचा हेतु असावा. ह्मणूनच मला आणावयाला तुला सांगितलें नाहीं! त्यांनीं तुझें बल शौर्य इत्यादि केव्हांच जाणिलें असेल! त्यांस विस्मृति कधींही व्हाव-याची नाहीं. तेव्हां मला अशा रीतीनें नेण्याचा तुझा हेतु मला मुळीच मान्य नाहीं.

नंतर सीतादेवीनें, पर्णकुटिकेंतून लक्ष्मण गेल्यावर रावणानें कोणत्या वेशानें तेथें येऊन आपणाला ह्यास्थळीं कसें आणलें,वगैरे सर्व वृत्त अगदीं थोडक्यांत सांगितलें. व ती ह्मणाली, "प्राणनाथांस कपटमयकांचनहरिण-मागें जाण्यास मीं भाग पाडलें,ही तर माझ्या हातून मोठी चूक झालीच,परंतु हें सर्व कपट आहे असें जाणून, मला एकटीला टाकून लक्ष्मणभाओजी जात नसतांही मीं त्या निष्कपट पुरुषाशीं जें आचरण केलें, त्या प्रसंगाची आठवण झाली पुरे कीं, सर्वांग रोमांचित होऊन नेत्र अश्रूंनीं भरून जतात, पश्चात्ताप होऊन कांहीं सुचेनासे होतें, अन्तःकरण करपून जातें व मी पापिणी जगांत अजून कशी राहिलें आहें,असें वाटतें! तो भयंकर प्रसंग सदा सर्व काळ डोळ्यांपुढें दिसतो.तेव्हां,हे मारुते,त्या उदारमनस्क व परमपवित्र पुरुषापाशीं,मी फार फार अपराधिनी आहें, ह्मणून निवेदन कर. आणि माझा अक्षम्य अपराधही क्षमा करून, प्राणनाथांला मला येथून नेण्याचे कार्यीं पूर्ण साहाय्य करा. तुम-चें साहाय्य अवश्य पाहिजे. साह्याचे वेळीं, माझें वाक्पारुष्य वि-सरून जा. आणखी त्या महा अपराधाबद्दलच मी हा कडक कारागृहवास भोगीत आहें. इतकी शिक्षा मला पुरे. आतां ह्यां-तून मला सोडवा.भावोजी,ह्या उदारधी व पराक्रमी केसरिपुत्र मारुतीची अगोदर भेट होऊन नंतर सुग्रीवराजाशीं आपलें सख्य झालें, व आज मी आनंददुःखमिश्रित अंतःकरणानें ह्या दूतापाशीं जीं संदे-शाक्षरें सांगत आहें, ह्याचें आदिकारण केवळ आपण प्राणनाथांबरो-बर आहां हेंच होय! इत्यादि त्यांस भेटतांक्षाणीं माझा निरोप हात जोडून सांग."

**मारुति**—मी इकडील सर्व इतिवर्त्तमान व आपली स्थिति निवेदन करून जेणें करून त्यांचें इकडे लौकर आगमन होईल, असा उपाय योजीन बरें. तरी पण,देवि, मी येथें आलों होतों,ह्याबद्दल त्यांची खात्री व्हावी ह्मणून आपणही मला कांहीं खूण दिली असतां बरें होईल. आपला निरोप काय तोही कळला पाहिजे. स्वामिनि, रामचरण सोडून आह्मांस बहुत दिवस झाले आहेत. ते फार चिंतातुर व शोकनिमग्न असल्यामुळें हें आनंदपर वर्तमान मी त्यांस केव्हां जाऊन सांगेन, असें मला झालें आहे। आतां येथें क्षणैकही राहवत नाहीं.आपण आपल्यास नेण्याच्या

संबंधानें जें कांहीं आपलें मत सांगितलेंत तें, रामांगनेस व जनककन्येस शोभण्यासारखेंच आहे. तेव्हां त्याविषयीं मी आतां अधिक कांहीं बोलत नाहीं. अहो, मला आपल्या चरणांपाशीं पूर्वींच विज्ञप्ति करण्याची होती, पण राहिली, ती ही कीं, मी आपल्यास पवित्र रामचरित्र सांगत असतां, किंवा लंकेंत आल्यावर माझ्या मनांत जे कांहीं वाईट बरे विचार आले, ते आपल्यापाशीं निष्कपटभावानें बोलत असतां. माझ्या भाषणांत ज्ञाताज्ञात जे कांहीं दोष झाले असतील, त्यांबद्दल ह्या नम्रसेवकावर आपण क्षमा करावी.

**सीता**—शिशो, क्षमा मागण्यासारखें तुझ्या हातून काय झालेंआहे? जिच्यासाठीं तूं इतके परिश्रम घेतलेस तिनें मात्र वास्तविक पाहतां, तुझ्यापाशीं वारंवार क्षमा मागावी, हें योग्य आहे! प्राणनाथांना सांग कीं, आपली अत्यंत दीनावस्था ऐकून माझें अंतःकरण अगदीं विदारून गेलें आहे. आपली ही स्थिति व्हावयास मीच कारण आहें! ह्या दासीला पुढें असें होणार ह्याची लेश जरी कल्पना मनांत आली असती तर हिनें आपले चरण कधींही सोडिले नसते. असो; झाल्याविषयीं आतां कांहीं एक मनांत आणूं नका. निदान मी येथें कारागृहांत आहें, तोंपर्यंत तरी माझ्याकडे, सर्व अपराध क्षमा करून कृपादृष्टीनें पहा. मला एकएक क्षण युगा युगाप्रमाणें भासत आहे. बिभीषणपत्नी सरमा, तिची कन्या कला, आणखी तूं जिचें भाषण ऐकलें ह्मणतोस, ती महामान्या त्रिजटा व स्वतः रावणस्त्री मंदोदरी, ह्या लंकेंत आहेत, ह्मणून मी अद्यापि येथें जीवन्त आहें. प्रिय मारुते, दोन महिने होतांच रावण माझ्या देहाचें काय करणार आहें हें तूं ऐकिलें आहेसच. हें त्यांना कळविण्यास विसरूं नको बरें. आतां मला मुक्त होण्याची काळजी वाटत नाहीं. परंतु मुक्तता केव्हां होईल, इकडे माझें आतां लक्ष वेधलें आहे. प्राणनाथांस एवढें पुनःपुनः सांग ह्मणजे झालें कीं, चौदावर्षें येत्या वैशाखमासीं पहिल्या पंचमीस किंवा षष्ठीस पूर्ण होतात. तिला आतां थोडाच अवकाश राहिला आहे. आजपासून जर महिना दिडमहिन्याचे आंत तुमचें ह्या स्थळीं येणें न होईल, तर मग माझ्या प्राणांचें स्वामित्व त्या काळाकडे राहील! वायुपुत्रा, जेणें करून ते तुह्मां वानरमंडळीसह इकडे युद्धार्थ लौकर निघतील, असा मीं तुजबरोबर काय बरें निरोप पाठवावा? कोणतीं हृदय-

श्रावक वाक्यें त्यांत असावें? त्यांत कशी शब्दयोजना असावी! इत्यादि कांहीं एक मला समजत नाहीं. माझ्या मनांतील हा भावार्थ समजून जेणें करून त्यांचें हृदय मजसारखें द्रवून जाईल असें इकडील वर्तमान त्यांस कथन कर. तूं येथील सर्व स्थिति पाहिलीसच आहेस. तुझ्यांत रसिकता, शुद्धत्व, संवेदना, यथास्थित वर्णन करण्याची शक्ति, इत्यादि सर्व आहे, ह्मणून मारुते, तूंच माझा मुर्तिमान् संदेश आहेस! मुद्रिकेबद्दल खूण मागतोस, तर हा माझ्या मस्तकावरील दिव्य मणि घे. हा विवाहसमारंभांत माझ्या प्रिय मातेनें माझ्या जनकापाशीं मला देण्याकरीतां दिला होता, त्यानें तो मामंजीपाशीं दिला. त्यांनीं "मुली," अशी हाक मारून मला आपल्यापाशीं बोलाविलें. त्यांच्याजवळ तेव्हां प्राणनाथ तिघां बंधूंसह उभे होते. मी जवळ जातांच हा चूडामणि त्यांनीं प्राणनाथांचे हातीं देऊन त्यांस माझ्या शिरोभागीं केशांत गुंतविण्यास सांगितलें. त्याचवेळीं ह्या अमूल्य रत्नाचा सर्वांस थोडक्यांत इतिहासही सांगितला होता. ह्या मण्याचें दर्शन होतांच प्राणनाथास ह्या सर्व गोष्टींचें स्मरण होऊन त्यांस फार वाईटही वाटेल. आणखी एक. स्वयंवरांत प्राणनाथांनीं शिवधनुष्य भंगिल्यावर मीं पुष्पमाळा त्यांच्या कंठांत घालीत असतां, ते किंचित् वांकले. तेव्हां माझी प्रियसखी विजया मजजवळ होती, ती कांहींसें विनोदानें, पण भीतीनें, अस्पष्ट बोलली. तें त्या वेळीं प्रियकरास सर्व समजलें नाहीं. मग लौकरच जवळ कोणी नाहीं अशी संधी पाहून, "ती काय बोलली?" ह्मणून प्राणनाथांनीं मला विचारिलें. मग मीं त्यांस तिचें बोलणें सांगितलें, तें, मारुते, त्यांनीं तुला कदाचित् सांगितलें नसेल. तर त्या माझ्या चतुर सखीच्या बोलण्याची त्यांस स्मृति कर. ती असें ह्मणाली होती कीं, "आपण शिवधनुष्य जरी नम्र केलें, तरी आपल्यास आमच्या प्रियजानकीरूप धनुष्यानें नम्र केलें!" मग त्यांनीं विजयेच्या वाक्चातुर्याची स्तुति करून हास्य केलें.

असें सांगून तिनें त्या चूडारत्नाचें चुंबन घेऊन "प्राणनाथांस इकडे लौकर यावें ह्मणून तुला मी माझा दूत समजून पाठवितें बरें," असें ह्मटलें. नंतर तिनें तो शिरोलंकार मारुतीच्या हातांत दिला. मारुति त्याचा फांसा आपल्या अंगठ्यांत अडकावून हात जोडून कांहीं बोलणार, इतक्यांत सीता देवीच बोलूं लागली कीं, "श्रीमान भारद्वाजांच्या आश्रमांतुन

चित्रकूटावर आह्मीं तिथें येत असतां,मला यमुनोदकांतून पलीकडे उभय-तांनीं कसें नेलें ह्याची व चित्रकूटावरील त्या मंगलतिलकाची त्यांस स्मृति दे. मारुते,हे सर्व प्रसंग त्यांस डोळ्यांपुढें दिसूं लागले ह्मणजे व ह्या शिरोभूषणांचें दर्शन होतांच,ह्या सर्वांशीं माझा संबंध असल्यामुळें,माझी सबंध प्रतिमा त्यांच्यापुढें उभी राहील.अर्थात् माझ्या स्मरणानें ह्या दशाननावर क्रुद्ध होऊन ते लंकेंत निघण्याची लौकर तयारी करतील.प्राणनाथांस ह्या अपराधिनी स्त्रीच्या शतशःप्रणति सांगून महाशय लक्ष्मण भावोजींसही फारफार पुशिलें आहे,ह्मणून कळीव.किष्किंधापति सुग्रीवमहाराजांस व अंगदप्रमुखादि सर्व वानरमंडळीस अनेक अशीर्वाद सांगून माझा हा सर्व वृत्तांत, हीं सर्व वीरमंडळी प्राणनाथांजवळ बसली असेल अशा समयीं निवेदन कर. बा हळू जा. तुला मजसाठीं फार फार रे श्रम पडले. एवढ्या थोड्या वेळाच्या सहवासानें, तुझें जसें कांहीं बाळपणापासूनच माझ्याशीं प्रिय मित्रत्व आहे असें वाटतें. सज्जनाच्या संगतीचें फळ असेंच आहे.

मारुति—स्वामिनि, आपण कांहीं एक काळजी करूं नये. जेणेंकरून त्या प्रळयकाळच्या सूर्यांचा, ह्या लंकानगरीचा नाश करण्याकरितां, इकडे लौकर उदय होईल, अशा रीतीनें मी त्यांचें अरुणत्व करितों. रामचंद्रविरहानें झालेली आपली अवस्था यथावत् आपल्या प्राणनाथास कळवितों बरें. बाईसाहेब, रामलक्ष्मण हे लोकोत्तर पराक्रमी आहेत. ह्यांस जगांत अशक्य अशी कांहीं एक गोष्ट नाहीं. आह्मांला मोठेपणा द्यावयाचा व आमची जगतांत कीर्ति पसरावयाची त्यांच्या मनांत आली आहे, ह्मणून आह्मांस त्यांनीं हातीं धरिलें आहे. वस्तुतः ते दोघे बंधु पाहिजेल तें शूरत्वाचें कृत्य करण्यास समर्थ आहेत. आमच्या वानरमंडळींतही मोठमोठे साहसी, पराक्रमी,सततोद्योगी, स्वावलंबनप्रिय व बळकट असे पुष्कळ आहेत. त्यांच्यामध्यें कार्यतत्परता हा गुण मोठा आहे. ह्या सर्वांची रामलक्ष्मणांविषयीं देवतुल्य पूज्यबुद्धि आहे. आणखी वानरसैन्यही असंख्यात आहे. आह्मांमध्यें कित्येक वैद्यक्रियेंतही फार उत्तम आहेत. विषानें जसें हटकून मरण येतें, त्याप्रमाणें कांहीं ओषधीनें हटकून संजीव होणें, अशा कांहीं दिव्य ओषधि आमच्यामधील वानरश्रेष्ठ सुषेणास माहीत आहेत ! जगतांतील महान् महान्

पर्वतांवरील प्रत्येक वनस्पतीचा गुणावगुण त्याला माहीत असून निरनिराळ्या वनस्पतींच्या मिश्रणानें काय काय चमत्कार होतात, हें सर्व त्याला समजतें आहे! ही लंका जरी दूर समुद्रांत आहे, तरी आमच्या येण्याला प्रतिबंध करील असा कोणी समर्थ नाहीं. आह्मांमध्यें असे एकेक आहेत, कीं, ते आपल्या विद्येच्या प्रभावानें, अचाट बुद्धि व अतुल बल ह्यांच्या योगानें, विलक्षण कुशलतेनें, ह्या ठिकाणीं सर्व मंडळीसह केव्हांच येतील! असें पुनः पुनः आपल्या चरणीं सांगितलें असतां, ही अभिमानोक्ति होईल असें आपण समजूं नये.

सीता—वा मारुते, तुझ्या एकट्याच्या आगमनानें मी सर्वांच्या अतुल पराक्रमाचें अनुमान केलें आहेच. व ह्यांच्या नाशार्थही अशीच असामान्य सेना पाहिजे. मारुते, महिना दीड महिन्याचे आंत आलें पाहिजे बरें. हें नीट लक्ष्यांत ठेव.

मारुति—मीं आपला निरोप तर घेतलाच. पण कोणी यःकश्चित् रामदूत लंकेंत आला आहे, असें येथें कळलें पाहिजे. ह्मणजे रामचंद्राच्या बळाचें, पराक्रमाचें, साहाय्याचें येथील लोक अनुमान करून रामचंद्रास शरण जाण्याविषयीं रावणास आणखी उपदेश करतील. ह्या सुंदर लंकेचा नाश करून, येथील वीरांस ठार करून, रावणाच्या कुलाचें उन्मूलन करावें व ह्या नगरींतील लक्षावधि स्त्रियांस शोकसागरांत ढकलावें, असा कांहीं त्या दयाळू व उदाराशय पुरुषाचा हेतु नाहीं. तो होऊन शरण आला असतां रामचंद्र त्यास अजूनही क्षमा करतील.

असें बोलून सीतादेवीस त्यानें नमस्कार केला व भव्य वानररूप धारण केलें! सूर्योदय होण्यास थोडा अवकाश होता, असा हा समय होता. त्यानें प्रथमतः त्या अशोकवनिकेंत जाऊन तेथील नानाविध फळें खाल्लीं. नंतर त्या बागेचा नाश करण्यास आरंभ केला! घटिकार्धांत त्यानें ती अशोकवनिका शोकवनिका करून सोडिली! मेघनादाप्रमाणें वारंवार भुभुःकार करून लंकानगरींतील मोठमोठालीं रम्य शिखरें व शोभास्थानें ह्यांचा तो विध्वंस करूं लागला! त्याला पकडण्याकरितां पुष्कळांनीं यत्न केले. परंतु केवढा वेळ कोणाचें कांहीं चाललें नाहीं. ह्यानें तेवढ्या काळांत हजारों राक्षस मारिले व रावणपुत्र अक्ष ह्यासही

ठार केलें. नंतर ह्यास रावणास भेटावयाचें होतें, ह्मणून तो रावणपुत्र इंद्रजित ह्याचे हस्तगत झाला.

श्रोतेहो, मारुतीच्या पराक्रमाचा इतिहास ह्यास्थळीं पुष्कळ वर्णन करण्यासारखा आहे. परंतु विस्तारभयास्तव त्याविषयीं कांहीं विशेष न बोलतां इतकेंच सांगतों कीं, तेथें ह्या प्रतापी वानरास रावणापाशीं धरून नेल्यावर त्यानें ह्याचा सर्व वृत्तांत विचारिला. मारुतीनें तो सर्व धिठाईनें सांगीतला. आपल्या रसभरित वाणीनें रामप्रताप वर्णन करून रावणाची त्याच्या पुढें किती अल्प योग्यता आहे, हेंही स्पष्ट सांगण्यास तो वीर रामदूत क्षणभरही भ्याला नाहीं. ही लंका लौकरच प्रेतभूमि होणार, ह्मणून त्यानें त्यास साफ कळविलें! मारुतीच्या एकंदर भाषणाचा रावणास अर्थात् सर्व प्रधनादिमंडळीस फार राग आला. व सर्वानुमतें त्यास ठार मारण्याचा निश्चय झाला! परंतु रावणबंधु बिभीषणानें त्यांस राजनीत्युपदेश करून त्यांचा तो बेत रहित करविला! तेव्हां त्याच्या पुच्छास हजारों वस्त्रें गुंडाळून त्यावर तेल ओतून व दुसऱ्या अनेक ज्वालाग्राही पदार्थांचा त्याशीं संयोग करून अग्नि लावण्याचा तेथें निश्चय ठरला! व लगेच तसें केलें! मारुतीनें तें प्रज्वलित पुच्छ घेऊन वायूच्या साह्यानें लंका नगरीचा बराच भाग जाळून टाकिला! ह्या आगींत रावणाचेच केवळ कित्येक सुंदर प्रासाद जळून गेले असें नाहीं, तर दुसरेही हजारों वाडे वगैरे जळून खाक झाले! अग्नि शमविण्याविषयीं त्यांचे सर्व यत्न विफल झाले! तेव्हां चोहोंकडे हाहाकार उडाला! जो तो शोकाकुल होऊन रावणास निंदू लागला! व सीतेच्या कोपाग्नीची ही उगीच एक ठिणगी पडली आहे, तिच्या योगानें हा सर्व अनर्थ उद्भवला आहे. जेव्हांका तो अग्नि चोहोंकडून पेटेल तेव्हां आपली अवस्था काय होणार हें दिसतच आहे. आह्मी मुळीं अग्नींतच आहों! ह्याप्रमाणें नानाप्रकारें आपल्या राजास जो तो निंदून त्याच्या दुष्कृत्यांविषयीं व आपल्या भावी स्थितीविषयीं बोलूं लागला! साक्षात् अग्निरूपच काय असा तो मारुति त्या भयंकररूपानें रामपत्नीपाशीं आला. व नुकतेंच झालेलें वृत्त तिला सांगून तिला नमन करून तिची रामचरणांपाशीं जाण्याची आज्ञा मागत असतां ह्मणाला, "स्वामिनी, रावणाशीं जो पुढें संग्राम होणार आहे, त्यास आज प्रारंभच झाला असें समजा."

**सीता**–मारुते, ह्या तुझ्या भयंकर पराक्रमानें मला मोठें आश्वासन प्राप्त झालें हें खरें, परंतु ह्यामुळें आणखी मला अधिकाधिक त्रास सोसावा लागेल हा भविष्यत् विचार तुझ्या मनांत आलेला असूं दे. मारुते, बरें जा आतां. तुह्मी सर्व लंकेंत येतांच हरएक प्रकारें मला आल्याचें वर्त्तमान कळवा.

**मारुति**–आह्मी लंकेंत आल्यावर आपल्यास कळल्याशिवाय कसें राहील? येथें आल्यावर लौकरच ह्या रावणाचा वध होईल. व आपल्यास प्रणपतीची भेट करण्याचें मंगल कार्य मजकडे येईल, अशाविषयीं मी तत्पर राहीन.

**सीता**–आतां मी अधिक बोलत नाहीं.

**मारुति**–हा आपल्यास मी आपल्या प्राणनाथांकडे जाण्याकरितां प्रणिपात करतों. ( असें ह्मणून त्यानें तेथून प्रस्थान केलें. )

---

## उच्छ्वास साहावा.

जी जनकनंदिनी सीता गेल्या ऐन रात्रीं अगदीं निराश होऊन प्राणत्यागास तयार झाली होती, तिला मारुतिरायापासून सविस्तर रामवृत्त कळतांच, प्राणनाथ, लक्ष्मण व वानरमंडळी आतां लौकर येऊन सर्व राक्षससैन्यासह रावणाचा वध होऊन आपली ह्या कारागृहांतून लौकर मुक्तता होईल व रामचरण दृष्टीस पडतील अशी अशा उत्पन्न झाली. आतां रावणापासून आपणास फार त्रास होईल ह्मणून तिला भीति वाटत होती; पण तसें कांहीं घडून आलें नाहीं एवढेंच नाहीं, तर त्रिजटा व दुसऱ्याही कांहीं राक्षसस्त्रिया तिच्याशीं अधिक प्रेमानें वागूं लागल्या! मंदोदरीचीही ह्या साध्वीच्या दुःखनिवारणार्थ योजना असे. मारुतीला जाऊन किती दिवस झाले, ती वारंवार मोजीत असे.

असा काळ कंठीत असतां, एके दिवशीं बिभीषणपत्नी सरमा आपल्या-कलानामक कन्येसह तेथें आली. त्यांस पाहून आनंदातिशयानें सीता म्हणाली, " अहो सरमाबाई, आज आपण फारच दिवसांनीं येथें आलां? प्रकृति वगैरे ठीक आहेन? कांहीं तरी आपल्या अन्तःकरणांत चिंता आहे, ह्मणून इतके दिवस मला तुह्मी दर्शन दिलें नाहीं, असें मला वाटतें. आपली ही गुणवती कला तरी यावयाचीच; असें चिंतातुरतेचें कायं कारण असावें बरें?"

सरमा—सीताबाई, तुह्मी ह्मणतां तसा विलंब झाला खरा, परंतु मी जें आतां आपणास वर्तमान सांगणार आहें, तें ऐकिल्यावर ह्या थोड्याशा विलंबाबद्दल मी आपल्या क्षमेस पात्र आहें, असें आपणास वाटेल.

सीता—आपण माझ्या क्षमेस पात्र? असें कसें होईल? मी आपल्यास फार दिवसांनीं आलां असें ह्मटलें, ह्याबद्दल मीच आपल्यापाशीं क्षमा मागावी हें मात्र अगदीं उचित आहे. हें आतां विनोदपर भाषण पुरे. तें अगोदर वृत्त काय आहे तें सांगा.

सरमा—ऐका तर. आपल्या सेवकानें ह्मणजे त्या मारुतिवानरानें अल्पकाळांत ह्या लंकेंत जो महा प्रळय करून सोडला, त्यामुळें सर्व लोक जागृत झाल्यासारखे झाले! आपणास येथें आणल्याबद्दल आतां रामचंद्राकडून कांहीं तरी उद्योग होऊं लागला, असें सर्व प्रधानांस व दशानन महाराजांस वाटूं लागलें. तेव्हां महाराजांच्या आज्ञेनें सात आठ दिवसांपूर्वीं राक्षसेंद्रभुवननामक अत्यंत विस्तीर्ण स्थळीं एक मोठी सार्वजनिक सभा भरली होती. तींत महाराज सर्व बंधूंसह व पुत्रांसह आले होते. सर्व प्रधान व सेनापति तेथें विद्यमान होते. शिवाय हजारों लहानमोठे अधिकारी तेथें जमले होते, आणखी हजारों नागरिक सधन लोक असून व दुसरेही अगणित राक्षस त्या स्थळीं होते. प्रथमतः महाराजांनीं भाषण केलें. त्यांत त्यांनीं मुख्य मुख्य वीरांस संबोधनें देऊन, हा एवढा समारंभ करण्याचें कारण सांगितलें. भाषणांत आपला उद्देश फारच चांगल्या रीतीनें व्यक्त केला. आपल्याला अनुकूल अशीं अनेक उदाहरणें व कारणें सांगून आपलें ह्मणणें त्यांनीं सर्वांच्या मनावर चांगलें ठसविलें. त्यांच्या त्या आवेशयुक्त वक्तृत्वानें सर्वांचीं मुखें वीरश्रीनें प्रफुल्ल दिसूं लागलीं! सीताबाई, तें लांब लचक भाषण आप-

त्याम सांगितलें असतां आवडणार नाहीं, ह्मणून दोनच शब्दांत त्याचें सार सांगतें. तें हें कीं, "रामनामक कोण्या मानवाची स्त्री रानांत भटकत होती, ती मीं येथें आणली आहे. तें स्त्रीरत्न ह्या लंकानगरीच्या वैभवास संग्राह्य आहे. हें रत्न परत देण्याविषयीं कित्येक भीरु लोकांचा मानस दिसतो. ह्यामुळें पुढें अनेक अनर्थ ओढावून लंकेचा नाश होईल, ह्मणून कित्येक बोलतात ! रामचंद्र हा अत्यंत पराक्रमी आहे, ह्मणून कित्येक बडबडतात! त्याला साह्यार्थ वानरराजा सुग्रीव मिळाला आहे! एक वानर येथें आला, त्यानें बहुत विध्वंस केला, तेव्हां सर्व वानरसैन्य लंकेची केव्हांच रांगोळी करून सोडील, असें कित्येक अदूरदृष्टि लोक अनुमान काढतात ! परंतु ते आमची योग्यता, पराक्रम, बल हें कां च मनांत आणीत नाहींत! ह्या लंकानगरींत त्या नरांचा किंवा वानरांचा कधींही प्रवेश व्हावयाचा नाहीं, हें त्यांस कोठें समजतें आहे !" सीताबाई, हें तुह्मास त्या बोलण्याचें तात्पर्य सांगितलें, ह्मणून त्यांतील ह्यांत मर्म किंवा आवेश कांहींच आलें नाहीं! तें रावणाचें भाषण संपतांच मोठमोठ्या वीरांनीं गर्जना करून भाषणें केलीं, तीं सर्व दशाननमहाराजांस अनुकूल अशींच झालीं. त्यांत सर्व आवेश व शौर्य भरलेलें होतें. रामपत्नी सीतेला परत देऊं नये, युद्धाचीच तयारी करावी, असा तेथें निश्चय सर्वांनीं केला. कुंभकर्ण भावोजींनीं महाराजांच्या भाषणानंतर भाषण केलें; त्यांत अगोदर परस्त्रीहरण हें फारच वाईट आहे, असें प्रतिपादन केलें; पण ज्यापेक्षां आतां तें कृत्य अपल्या हातून झालें आहे, त्यापेक्षां आतां युद्ध करणें हेंच उचित आहे, असें शेवटीं सांगितलें. दशाननपुत्रांनींही युद्धार्थ आपली तयारी किती आहे व आणखी काय काय करूं, तें सांगून पित्याच्या अंतःकरणास अत्यानंद देऊन त्याजकडून वाहवा व धन्यता ह्मणवून घेतली. कित्येक राक्षसवीर तर आपण किष्किंधेंत जाऊन त्या वानरराजाचें व रामलक्ष्मणांचीं शिरें घेऊन येतों ह्मणून ह्मणाले! सर्वांचेंच राजास अनुकूल भाषण पाहून माझ्या प्रिय भर्त्यास तें सर्वांचें करणें बरें वाटलें नाहीं. तेव्हां ते न्यायमार्गानुगामी आपल्या ज्येष्ठ बंधूस प्रणाम करून ह्मणाले " प्रियबंधो, आपण हा एवढा समाज जमवून ह्यांतील प्रत्येकास आपलें खरें खरें अंतःकरण विचारीत आहां, येणेंकरून आपली सत्यावर निष्ठा आहे, हें उघड आहे. आपणास जो

कोणी सत्य व हितप्रद बोध सांगेल तोच आवडेल. मग आपल्या मनाचा जरी कांहीं ग्रह झाला असला, तरी तो सोडाल,असें मला वाटतें. एवढा वेळपर्यंत जीं मोठमोठ्या वीरांनीं भाषणें केलीं, तीं केवळ महाराजांच्या मनाचा कल पाहून केलीं असावींत,असें मला तर वाटतें.पुष्कळ शाहाणे ह्मणविणारे लोक आपल्या मनाविरुद्ध बोलले आहेत, हें त्यांच्याशीं ह्यापूर्वीं झालेल्या माझ्या भाषणांवरून मी स्पष्ट व सत्य समजून सांगतों. राजाच्या विरुद्ध प्रतिपादणें ह्मणजे त्याचा आपल्यावर क्रोध करून घेणें होय,असें स्वकार्यदक्ष लोक समजतात. अर्थात् राजाची प्रतिकूलता आपल्या नाशास कारण होय,असें ते ह्मणतात. तेव्हां अशा समयीं खरें असलें तरी,राजाच्या विरुद्ध बोलून आपला नाश करून घेण्यास कोण आत्महिततत्पर प्राणी इच्छिणार बरें? यथाकाळीं राजास जे सत्योपदेश करीत नाहींत,तेच राजाचे खरे शत्रु होत! स्वहितनिरभिलाष व स्पष्टवक्ते अशा लोकांचें राज्यांत दुर्भिक्ष्य झालें, ह्मणजे त्या राजाचा विनाशकाळ अगदीं समीप आला, असें खुशाल अनुमान करावें. तें कांहीं असो. मला येथें निर्भीडपणें एवढेंच सांगावयाचें आहे कीं,हे ज्येष्ठबंधो, त्या अत्यंत शुद्ध अशा परस्त्रीरत्नाचा अभिलाप नधरितां, तें ह्या क्षणीं ज्याचें त्यास द्यावें! ह्यांतच आपलें, अर्थात् आह्मां सर्वांचें, हित आहे! आपण केलेलें हें अत्यंत नीच कर्म आहे.त्या वेळेस कदाचित् आपणास तसें वाटलें नसेल,पण एवढ्या अवधींतही आपल्यास पश्चात्ताप होऊं नये, हें मात्र महदाश्चर्य होय! परापहार हें महापाप असतां,हे मोठमोठे लोक आपल्या वाक्चातुर्यानें युद्धास प्रवृत्त होण्याची महाराजांस मसलत सांगतात! तर बंधो, हा माझा साधा उपदेश ऐका. ह्यांत सर्वांचें कल्याण आहे. युद्धांत लक्षावधि प्राणाहुति व्हाव्या, हें सर्वांस इष्ट कां वाटावें,हें मला समजत नाहीं. किंवा अवश्यंभावीप्रमाणेंच सर्वांस ही बुद्धि सुचली! अन्यायानें व पापकर्म करून मिळविलेल्या ह्या स्त्रीरत्नार्थ हें युद्धासारखें भयंकर कर्म आपल्यास कसें हितप्रद वाटतें? व ह्यांचे बाहु कसे स्फुरण पावतात? ह्या निर्दोष व सुंदर रत्नाचा उपभोक्ता रामचंद्र मोठा पराक्रमी असून अत्यद्भुतकर्मकर्त्ता आहे! मदांध लोकांचा गर्व हरण करून त्यांचा विध्वंस करण्याकरितांच तो सक्षात् भगवदवतार आहे,असें तत्त्वज्ञ लोक आतां स्पष्ट ह्मणूं लागले आहेत! व ह्या ह्मणण्यास त्याचीं

विलक्षण व अत्यद्भुत कृत्यें साक्षीभूत होत. शिवधनुष्याचा भंग, परशुरामाचा पराभव, राज्याचा त्याग, पंचवटीमध्यें हजारों राक्षसांचें अल्पकाळांत निर्दलन, ताटिकावध, शूर्पणखाविडंबन व मारीचाचा मृत्यु, हीं लहानसान कृत्यें काय? अहो, ज्यानें आपल्यासही जर्जर केलें होतें, अशा वालीस क्षणांत स्वर्ग दाखविला, त्याशीं तुह्मी वैर करून ह्या लंकानगरीस वैधव्य आणूं कां पाहतां बरें? तशांत आपला अपराधिपक्ष आहे. जर तो खचित दुष्टांच्या नाशार्थच परमेश्वरावतार आहे, तर त्यास जगत्रयांत असाधनीय असें काय आहे बरें? मग त्याचा लंकेंतच प्रवेश कां नाहीं होणार? जर तो परमेश्वर आहे, तर ही सीता आदिशक्ति आहे. मग तिचें सतीत्व भ्रष्ट करण्याची इच्छा करणाराचें कल्याण तरी कसें व्हावें? तिला आपण फार पीडा देत असतांही, तिनें अद्यापि, शापानें आपलें भस्म केलें नाहीं, हेंच आपलें थोर नशीब समजावें. अहो, सर्व दिवस कांहीं सारखे नसतात. कधीं तरी कृतपापाचा प्रायश्चित्त भोगण्याचा दिवस उगवतो. तो समय आला, ह्मणजे आपलें पूर्ववैभव, आपला पूर्वींचा पराक्रम, आपली कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुंशक्ति, आपली मानमान्यता, ह्या सर्वांचा क्षणांत विध्वंस होतो! यास्तव अशा विपरीत काळानें कधींही आपल्याला ग्रासूं नये, ह्मणून फार सावधानचित्तानें रहावें. पापाचरण हें त्यांस आमंत्रण करणें होय. मीं आतां फार बोलत नाहीं. माझें सांगणें एवढेंच कीं, ती स्त्री ज्याची त्यास देऊन कृतकर्माबद्दल त्या उभयतांपाशींही पश्चात्ताप दाखविला पाहिजे. ह्या एका आचरणानेंच आपलें हें असाम्य वैभव राहणार आहे. एका वानरानें दोन घटिकेंत जर एवढा प्रळय करून सोडिला, तर रामलक्ष्मणांसह येथें असंख्य वानरसैन्य येऊन ठेपलें म्हणजे फारच आकान्त उडेल, असें जें कित्येकांस वाटत आहे तेंच खरें आहे! आपलें बल कमी आहे, असें माझें मुळींच ह्मणणें नाहीं, परंतु "यतो धर्मस्ततो जयः" हा सिद्धांत सर्वदा सारखा आहे. तेव्हां, प्रियबंधो, आतां दुराग्रह सोडून त्या रामाला स्नेहबुद्धीनें शरण ह्मा. असे भ्रान्तचित्त होऊन कर्तव्यविमुख होऊं नका. माझ्या बोलण्याचा क्षणभर विचार करा. मला जें हितकर वाटलें तें निष्कपटभावानें आपल्या चरणांपाशीं सादर केलें आहे. व असा हितोपदेश करण्याचा माझा आपल्याशीं निकट संबंधही आहे. लंकेच्या नाशाचें चि-

त्रत जसें काय मला डोळ्यांपुढें दिसत आहे, ह्मणून मला जें वाटलें तें सांगितलें. उपरांत आपली इच्छा बलीयसी."

हें प्राणनाथाचें भाषण आपणास आवडलें,असें एकानेंही त्यासमेंत बाह्यात्कारें जरी बोलून दाखविलें नाहीं,तरी न्यायान्याय,सत्यासत्य,शुभाशुभ, जाणणाऱ्या अशा कोणाच्य'ही स्वयंप्रकाश हृद्यस्थ आत्मारामास तें मानवेंल नाहीं, असें मात्र नाहीं. त्या सभारूपलंकेंत माझ्या प्राणनाथरूप रामसेवकानें (मारुतीनें) ह्या भाषणाग्नीनें पुनः आगच लाविली काय, असें तेथें होऊन गेलें! हें भाषण चाललें असतांच त्या सभास्थानीं चोहोंकडून श्वासोच्छ्वासांची गर्दी चालली होती ! त्यामुळेंच जसा काय तो अग्नि लौकर पेटला! भाषण संपतांच महाराजांचा अत्यंत पराक्रमी, मंत्रशास्त्रांत निपुण व यथार्थनामा जो इंद्रजित त्यानें उठून आपल्या पित्यास अनुकूल, वीरश्रीयुक्त, रसभरित, सूचक व उत्तेजक असें वक्तृत्व केलें. त्यांत त्यानें प्राणनाथांची यथेच्छ निंदा केली. त्यांस भीरु, कुलकलंक, आत्मशत्रु, शत्रुहितैषी, विश्वासघातकी अशीं अनेक निंद्य विशेषणें देऊन व शतशः कुत्सित कोट्या लढवून त्यानें,आपल्यामतें, त्यांचें बोलणें मोडून काढिलें.ह्या युवराजाच्या वाक्शक्तीचा तेथें फार जयजयकार होऊन त्याचा लोकांनीं अतोनात धन्यवाद गाइला.प्राणनाथांनींही,तो अद्यापि बाल आहे असें समजून,त्यावर न रागावतां,थोडक्यांत त्याचें पुष्कळ समाधान केलें. नंतर बहुतेक मोठ्या राजाधिकाऱ्यांनींही प्राणनाथांचें तें बोलणें कपर्दीच्याही मोलाचें नाहीं असें केलें! शेवटीं स्वतः महाराजांनीं प्राणनाथांची अनेक प्रकारें निर्भर्त्सना केली. ती अश्राव्य व मनास टोंचणारी होती.त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ इतकाच कीं, "आमचें वैभव तुला सहन होत नाहीं! आह्मी उपभोग्य वस्तूंचा उपभोग घेतला तर तुला फार दुःख होतें! मत्सरबुद्धीमुळें तूं कांहीं तरी बरळतोस! आह्माला जयप्राप्ति होऊं नये, ही तुझी मनांतील सर्वदा दृढेच्छा! तूं कृतघ्न असून आमचा समूळ नाश केव्हां होईल, असें इच्छिणाऱ्यांपैकीं तूं पहिला आहेस. अनेक प्रसंगीं असा हितोपदेशाचा व निस्पृहतेचा बाणा दाखवून आह्मांस तेजोहीन व पराक्रमविमुख करण्याचा यत्न केला आहेस. परंतु आज तर आपल्या मत्सराचा तूं कळस केलास. त्या मानवाची आश्राव्य स्तुति करून व मनमानेल तसा त्याचा थोरपणा गाऊन

तें मोठ्या यत्नानें संग्रह केलेलें अद्वितीय रत्न त्यास द्यावयास सांगतोस! परंतु तुला मूढाला असें समजत नाहीं कीं, जगांत एकंदर अमुक एक वस्तु असक्याचें, असें काय कोठें आहे? पराक्रमी पुरुषाचें सर्व जगत् आहे. त्यांतील प्रत्येक पदार्थावर त्याची सत्ता आहे! त्यास जो नको, तो पदार्थ दुसऱ्याचा. सहोदराचेंच नातें ह्मणून तुझे अपराध मी वारंवार क्षम्य मानितों. ह्यामुळें तुला आणखी अपराध करावेसे वाटतात काय! आतां असें भाषण पुनरपि कधीं करूं नको. तुला जर युद्धाची भीति वाटते, तर तूं आपल्या मंदिरीं स्त्रीसहवर्तमान खुशाल क्रीडा करीत बैस! पण असलें अपमानकारक, आत्माभिमानशून्य व अपौरुष भाषण बोलूं नको." ह्यावर प्राणनाथ एवढेंच बोलले कीं, "मला सत्य, हितकारक, व समयास योग्य जें वाटलें, तें कोणासही न भितां स्पष्ट बोललों. आतां आपणास आवडलें नाहीं, आपणास क्रोध आला, व मीं आपल्या निर्भर्त्सनेस पात्र झालों, ह्यास माझा उपाय नाहीं. असें पुढें होईल, हें सर्व मीं पूर्वींच जाणलें होतें. मला तर माझें बोलणें रोग्याला गुणावह औषधाप्रमाणें वाटतें. आपल्या बुद्धीचा ओघ जेथून निघणार, तें आपलें मानस अगदीं गढूळ होऊन गेलें आहे! महाराज, ज्या उपदेशानें, किंवा ज्या संमतीनें, अथवा ज्या युक्तीनें, अथवा ज्या कृतीनें किंवा मसलतीनें सर्व राक्षसांचा अवश्य नाश होऊन हें सुंदर नगर श्मशानस्थान बनणार, तो उपदेश, ती संमति, ती युक्ति व ती कृति किंवा मसलत, ह्यांचाच आपण परम आदर कराल, व ह्यांलाच हृदयांत दृढ वागवाल! विनाशकालीं जशी बुद्धि सुचावी, तशी आपल्यास सुचली आहे. तेव्हां माझ्या सारख्याच्या सदुपदेशानें आतां काय होणार? तरी मी करद्वय जोडून महाराजांच्या चरणकमलीं मस्तक ठेवून हेंच पुनः पुनः सांगतों कीं, त्या शुद्धचित्त जनकनंदिनीला रामाच्या अधीन करा. ह्यांतच सर्वांचें सदा कल्याण आहे."

ह्या भाषणानें राक्षसेंद्र फारच क्रुद्ध झाले. त्या भरांत त्यांनीं प्राणनाथांवर अपशब्दांचा भडिमार चालविला! व शेवटीं हातांतील तीक्ष्ण शस्त्रानें माझ्या प्रिय प्राणनाथांचे प्राण हरण करण्याच्या हेतूनें ते त्यांच्या अंगावर धावले! तेव्हां त्या जनसमूहसमुद्रांत क्षणभर तुफान झाल्या सारखें झालें! मोठमोठ्या लोकांनीं मध्यें पडून लंकेश्वराच्या क्रोधातिशयाचें निवारण केलें, व असें आपसांत, शत्रूस प्रिय वाटणारें युद्ध करणें योग्य

नाहीं, अशा अर्थाचा उपदेश त्यांच्यापुढें विज्ञापिरूपानें ठेविला. प्राणनाथासही त्या प्रसंगीं राग कमी आला होता असें नाहीं, परंतु त्यांनीं अधिक प्रसंग येऊं दिला नाहीं. ते कोणासही न भीतां, मोठ्या गंभीर स्वरानें एवढेंच शेवटीं ह्मणाले कीं, "ज्येष्ठबंधो, माझ्या अल्पबुद्धीस, जो आपल्या लोकोत्तर गुणांनीं, दुष्टनाशार्थ भगवदवतार ह्मणून दृढ वाटत आहे, त्या मानवास मी आतां शरण जातों. त्याचें परमपवित्र नाम रामचंद्र. ह्याच सत्कृत्यानें माझ्या जन्माचें साफल्य होऊन मला अतुल कीर्तिलाभ होईल. असत्पथगामि मातापितरांचाही त्याग करावा, मग इतरांविषयीं काय सांगावें?तरी मी,प्रियबंधो,पुनः एवढेंच प्रार्थितों कीं, "तें सीतारत्न रामचंद्राच्या हस्तगत करा." असें ह्मणून त्या सभागृहांतून प्राणनाथ निघाले ते अनल, पनस, संपाति आणि प्रमति ह्या चार अत्यंत विश्वासु सेवकांबरोबर, सीताबाई, तुमच्या प्राणनाथांकडे जावयास निघाले. परंतु त्या सेवकांच्या अत्यंत आग्रहामुळें त्यांनीं माझी थोडा वेळ भेट घेतली. सभेंत झालेलें हें वर्तमान मला सांगून, पुढील शरणगमनाचाही उद्देश कळविला. तो ऐकून मला फार फार दुःख झालें. मीं बरोबर येतें ह्मणून त्यांची विनंती केली. परंतु माझें त्यांनीं कांहीं तरी समाधान करून आह्माला पुढें विशेष बोलूं न देतां, ते त्या सेवकांसह तिकडे गेले. सीताबाई, मी जरी त्या वेळीं अत्यंत दुःखी होतें, तरी मला त्या प्रसंगीं एक फारच नामी गोष्ट सुचली. त्याप्रमाणें मीं ती केलीही. तिचें आज मला फळ प्राप्त झालें. त्यामुळें मला अत्यानंद होऊन आज तुमच्याकडे यावेंसें वाटलें.

**सीता**—अशी कोणती तरी गोष्ट ती?

**सरमा**—सीताबाई, प्राणनाथ आपल्या प्राणपतीकडे गेले खरे, परंतु ते दशाननाचे बंधु. ह्यांनीं कांहीं सांगितलें तरी त्यांस तें खरें वाटून ते अशा शरणागताचें संरक्षण करतील असें मला वाटलें नाहीं. आणि तिकडे आश्रय मिळाला नाहीं ह्मणजे मग ते "इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः" झाले,ह्मणजे काय साहस करतील ह्याचा नेम नाहीं, असें माझ्या मनांत येऊन मीं,ते निघून जातांच,त्यांच्या मागोमाग एक हेर तिकडे पाठविला. त्याचें एवढेंच काम होतें कीं, तिकडील इत्थंभूत वृत्त त्यानें मला कळवावें. तो आजच प्रातःकाळीं आला. त्यानें तिकडील सविस्तर वृत्त

मला सांगितलें, तें तुह्मांस जाणण्याची उत्सुकता असेलच, तर तें अगदीं थोडक्यांत सांगतें, ऐका.

प्राणनाथ चार सेवकांसह अशासमयीं व अशास्थळीं पोंचले कीं, ज्या समयीं रामलक्ष्मण हे आपल्या असंख्यात शूर वानरसैन्यासह दक्षिणसमुद्रतीरीं येऊन राहिले होते. हा सेनासागर ह्या समुद्राशीं जणूं युद्धार्थ आलेला असून विजयी झाला असा दिसत होता! असो; तेथें गेल्यावर प्राणनाथांस आपल्या भर्त्याचें दर्शन व्हावयास बराच वेळ लागला. कारण,ठायीं ठायीं वानरसैन्याकडून त्यांस प्रतिबंध होत होता. त्या शरण्य पुरुषाचें दर्शन होतांच प्राणनाथ रोमंचिततनु होऊन प्रेमानें वारंवार नेत्राश्रु ढाळूं लागले व सद्गदित वाणीनें ह्मणाले, "प्रभो रामचंद्र, मी लंकानाथ दशाननाचा कनिष्ठ बंधु; आपल्या चरणीं शरण आलों आहें. शरणागताचें रक्षण करणें हा आपला धर्म आहे. आपण कोण आहां, आपण काय काय अत्यद्भुत पराक्रम केले आहां, आपण वनांत किमर्थ आलां, इत्यादि सर्व गोष्टींचा मीं वारंवार साधकबाधक प्रमाणांनीं विचार केला आहे, त्यावरून आपण सर्व जगतास शरण्य आहां, असा माझ्या मनाचा पूर्ण ग्रह झाल्यामुळें व दुसरें मी जें आतां कारण सांगणार आहें त्यामुळें, मी आपले अनन्यभावानें चरण धरीत आहें. तर, अहो प्रणतवत्सल, ह्या दीन सेवकाचें अभीष्ट पूर्ण करावें." असें ह्मणून, त्यांनीं त्या महाशयाचे चरण घट्ट धरिले, व येथील सभावृत्त त्यांस सांगण्यास आरंभ केला. त्यावेळीं .रामचंद्रांजवळ मुख्यमुख्य तरी हजारों वानर होते; त्यांस हें शत्रुपक्षाकडील शिश्वसनीय व सविस्तर वृत्त फारच मनोवेधक वाटलें. सर्वांस समजेल अशा रीतीनें मोठ्यानें सांगावें ह्मणून जवळ असलेल्या आपल्या लक्ष्मणभावोजींनीं प्रथमतःच प्राणनाथांची विनंती केली. त्यांनीं तें त्यांस सभावृत्त यथास्थित सांगून आणखीही दशाननांची आपल्यास न आवडणारीं अशीं अनेक पापकर्मे सांगितलीं. तेव्हां ह्यांच्या निष्कपट, प्रेमानें भरलेल्या, सत्य व न्यायप्रचुर भाषणानें त्या सदयहृदय पुरुषाच्या विमल मानसास प्रेमाचें भरतें आलें. तत्क्षणीं तो दयाघन मत्प्राणेश्वरचातकाकडे वळणार, असें पाहून लक्ष्मणानें अगोदर सुग्रीव, मारुति व अंगदादि सर्वांचें ह्या संबंधानें कसें काय मत आहे हें विचारावें ह्मणून रामचंद्रांस सुचविलें. तेव्हां

त्या मंडळींत प्राणनाथांची विनंती मान्य न करण्याविषयीं कित्येकांनीं आपलीं सकारण मतें कळविलीं. कित्येक म्हणाले कीं, हे दशमुखाचे बंधु. हे आपल्या बंधूच्या सांगण्यानें शरण येण्याचे मिषानें अमच्या कडील सर्व कांहीं जाणून घेण्याच्या गुप्त हेतूनें आले असावत! मारुतीनें सांगितलें कीं, "सीतादेवीस त्या कारागृहांत जें थोडें कधीं काळीं समाधान वाटतें, त्यास मुख्य कारण ह्यांची स्त्री व कन्या होय. त्या वारंवार तेथें जाऊन देवीला नानाप्रकारच्या गोष्टी सांगून तुह्मी ह्या संकटांतून लौकर मुक्त व्हाल, असें सांगतात. सीतामाईनें तर ह्या दोघींची मजजवळ फारच स्तुति केली होती. ह्यावरून व ह्यांची मुखचर्या, आपण व ह्यांनीं शरण येण्याचीं सांगितलेलीं कारणें, इत्यादिकांवरून ह्यांच्या मनांत कपटहेतु असेल, असें मला तर वाटत नाहीं. आणखी शत्रुपक्षाकडील गुह्यतम समजावयास अशा सारख्यांची फार आवश्यकता असते. तेव्हां हे दशाननबंधु सर्वदृष्टीनें आश्रयास पात्र आहेत." सीताबाई, आह्मांविषयीं त्या दूतापाशीं आपण काय तरी सांगितलेंत. आमची उगीच खोटी स्तुति त्यापाशीं केलीत! अणखी ती निरुपायानें मला आपल्याच तोंडानें आपल्यापुढें सांगावी लागली. असो; तेथें बहुत वेळ भवति न भवति होऊन शेवटीं असें ठरलें कीं, अयोध्यानरेश जो रामचंद्र ह्यास कसाही कोणी शरण येवो, तो कधीं हताश होतां कामा नये. नंतर एकमेकांचें हस्तावलंबन होऊन दृढालिंगन देणें वगैरे सख्य झाल्याचे सर्व विधि तेव्हांच झाले. रामचंद्रांनीं त्या सर्व मंडळीसमक्ष प्राणनाथांस सांगितलें कीं, "त्या अधम राक्षसराजास मारून तुह्मांस लंकेचा राजा करूं." त्या दिवसापासून माझे प्राणनाथ आपल्या वल्लभाचे एक मुख्य मंत्रीच झाले आहेत. त्यांस त्यांच्याशिवाय चैन पडत नाहीं! प्राणनाथ त्यांच्या जवळून क्षणभरही दूर होतां कामा नये! त्यांनीं प्राणनाथाला आपलें सर्व चरित्र सद्गदितान्तःकरणानें सांगून समुद्रतीरीं आल्यापर्यंतचे सर्व वृत्त कथन केलें. तो माझा दूत सांगत होता कीं, "सीतावियोगचरित्र सांगत असतां, रामचंद्रांची जी कांहीं विलक्षण स्थिति झाली होती, ती तेव्हां पाहाणारांसच समजली. पाहणें व सांगणें ह्यांच्यामध्यें मूळ वस्तु व त्याची छाया, यांच्या मध्यें जितकें अंतर असतें, तितकेंच असतें."

सीता—सरमाबाई, आतां तर आपण मला माझ्या प्रिय भगिनी·

शा वाटतां! भगिनी, जें आणखी वृत्त समजण्याविषयीं मी अत्यंत उत्कंठित झालें आहें, तेंही आपल्यास समजलेलें असेलच.तर तें कृपा करून मला सांगा तें हें कीं- तो पराक्रमी मारुति येथून निघून गेल्यावर, ढे काय काय झालें?

**सरमा**—तुह्मांला तें सविस्तरवृत्त आतां लौकरच पतिमुखानें समजणार आहे. तरी मीं ऐकिलेलें अगदीं थोडक्यांत सांगतें.तो केसरिपुत्र हनुमान आपल्यास नमस्कार करून गेला, तो येथील अरिष्टनामक पर्वतावर उभा राहिला.त्यानें अत्यंत मोठें रूप धारण करून जें उड्डान केलें, तो समुद्रापलीकडे महेंद्रपर्वतावर जाऊन उभा राहिला! तेथें अंगद,जांबुवान्,सुषेण, द्विविद, मैंद, गंधमादन वगैरे वानर,ह्या वानरश्रेष्ठाची वाट पाहत बसले होतेच. त्यांनीं त्याला पाहतांच त्याच्या प्रफुल्ल मुखमुद्रेवरून हा खचित कार्यसिद्धि करून आला असें अनुमान केलें, व प्रत्येकानें त्यास प्रेमालिंगन देऊन त्याचे विलक्षण बलाची स्तुति केली. त्यानें त्या मंडळीस इकडील सर्व वृत्त कथन केलें. तें ऐकून त्यांनीं मारुतीच्या पराक्रमाचा धन्यवाद गाइला.ते ह्मणाले " जर सीतामातेचा तूं शोध न लावितां परत आला असतास,तर आह्मीं सर्व प्राणत्याग करावयास तयार झालों होतों! " नंतर ते मोठ्या आनंदानें किष्किंधानगरीकडे निघाले. जेव्हां ते त्या वानरनगरीसमीप आले, तेव्हां सुग्रीवराजाच्या सुंदर"मधुवन " नामक उपवनांत शिरले. तेथें त्यांनीं यथेच्छ आहारविहार केला. ही वानरमंडळी आल्याची बातमी सुग्रीवराजास त्या उपवनांतील रक्षकराक्षसांच्या द्वारें अगोदर कळली.नंतर थोड्यावेळानें ही विजयी मंडळी रामचंद्रचरणांस व सुग्रीवराजास वंदन करण्यास आली. त्या वेळीं सुग्रीवराजा आपल्या मोठमोठ्या मंडळीसह रामलक्ष्मणांपाशीं होता.त्यानें ही दाक्षिणात्य मंडळी मधुवनापर्यंत आल्याचें वृत्त आपल्या प्राणनाथांस व देवरास कळविलें होतें.आपल्या शुद्धीचें सविस्तरवर्त्तमान हे येतांक्षणीं समजावें ह्मणून,त्या प्रस्रवणपर्वतावर ही राजसभा अगदीं उत्सुक होऊन बसली होती.हे सर्व लोक तेथें गेले.त्यांनीं यथानुक्रम ज्यांस जसें वंदन करावयाचें तसें केल्यावर"श्रीमद्रामचरणप्रसादानें व महाराजांच्या अतुल पराक्रमकीर्तीनें,विमलगुणैकसरिता जी श्रीमती जनककुमारी सीता रामांगना तिचा आह्मी शोध लावून आलों."हें वाक्य त्या सभेंत सर्वांस ऐकूं आलें! त्यावेळीं

त्या [illegible]मुहूर्तांत चोहोंकडे अश्रुतपूर्व असा आनंदघोष झाला! कित्येकांस तेव्हां असें वाटलें कीं, हा त्यांचा कीर्त्तिदुंदुभिरव यावच्चंद्रसूर्य असाच सतत दुमदुमत राहणार! त्या वीरमंडळीस तो आनंदरव आपल्या पराक्रमास योग्य बक्षीस आहे, असें वाटलें. नंतर वृद्ध जांबुवानानें आपण अंगदादिकांसह निघून गेल्यापासूनचें सर्व वृत्त सांगण्यास आरंभ केला. त्यानें, मारुतिरायानें उड्डान करून लंकानगरीस गमन केलें, एथपर्यंत ह्मणजे सुमारें एक महिन्यांत घडलेलें सर्व कांहीं प्रवासवृत्त सांगितलें. नंतर वीरशिरोमणि हनुमानानें पुढील सर्व वृत्तांत सांगितला. त्याची वाणी किती रसाळ, सरळ व शुद्ध आहे, ह्याविषयीं मला आपणच सांगितलें आहां. सगळ्या चार प्रहर रात्रींत आपण लंकेंत काय काय पाहिलें तें तो सांगत असतां, ती सभा निःशब्द व निश्चळ झाल्यामुळें, चित्रसभा भासत होती! तो वार्ताहर सांगत होता कीं, रामचंद्रांच्या मुखांतून मीं जें लंकावर्णन ऐकिलें, तें अगदीं खरें होतें! सीताबाई, ह्यावरून त्या मारुतीनें अल्पकाळांत जें कांहीं पाहिलें, त्याचें हुबेहुब चित्र श्रोत्यांच्या मनांत ठसविलें. ह्यावरून त्याची बुद्धि किती ग्राहक व तीक्ष्ण असावी बरें? स्वामिचरणीं त्यानें जी कांहीं लंकेची स्तुति केली, त्यावरून ही नगरी त्यास फार अवडली असें वाटतें! तो म्हणाला "तरी दशाननाचा तो एक योजन लांबीचा व अर्ध योजन रुंदीचा सुंदर प्रासाद म्यां सर्व पाहिला नाहीं! तेथील अनेक सधनांच्या सुशोभित व बळकट वाड्यांत मीं प्रवेश केला नाहीं! सर्व विस्तीर्ण मार्ग मीं अवलोकन केले नाहींत! रावणपुत्रांच्या मनोरम क्रीडामंदिरांत मीं शिरलों नाहीं! मीं काय तो एकाच अशोकोपवनांत संचार केला. त्याशिवाय त्या नगरीला हजारों भूषणभूत उद्यानें आहेत, तीं कोणीं पाहिलीं आहेत? त्या चंद्रप्रकाशांत त्या नगरीचें जें कांहीं, सौंदर्य दिसलें, तें कसें वर्णन करावें? तींत अनेक मनोहर शिवमंदिरें दिसलीं. त्यांचें विशालत्व व मनोहरत्व पहातांच अंतःकरणाची झालेली विलक्षण स्थिति ही सर्व दुसऱ्यांस सांगणें सर्वथैव अशक्य आहे! त्या नगरींत हजारों सुंदर व पतिव्रता स्त्रिया आहेत. हजारों विद्वान, विचारी व धर्मशील पुरुष आहेत. तींत सर्व लोक सुखी व सतत उद्योगी आहेत. हजारों पराक्रमी आहेत! ह्या नगरीस सुवर्णाची लंका ह्मणतात, तें अ-

क्षरशः खरें आहे! कुबेराच्या वेळची अगणित गृहें [illegible] तीत आहेत. ह्यांचें पुराणत्व तेव्हांच ओळखतां येतें. तेथें जें कांहीं हस्तकौशल्य पाहिलें, तसें कोठें पाहावयास सांपडणार नाहीं. तेथें सहस्रशः दर्शनीय राक्षसी कृत्यें आहेत. दशाननाचा पुस्तकसंग्रहही पाहून मी अगदीं विस्मयाभिभूत झालों! व त्याच्या विद्वत्तेचीही कल्पना मनांत आली. त्या उज्वल व शोभादायिनी लंकानगरीच्या दर्शनानें जो कांहीं एकाप्रकारचा माझ्या मनांत ग्रह उत्पन्न झाला आहे, तो व्यक्त करणें माझ्या वाणीच्या शक्तीच्या बाहेर आहे." ह्याप्रमाणें, सीताबाई, त्या वक्तृत्वकुशल मारुतीनें पूर्वी लंकेचें वर्णन केलें तें कथाप्रसंगानें, रामचंद्र प्राणनाथांस सांगत असतां अगदीं गहिंवरून आले व ह्मणाले, "प्रियवयस्य बिभीषणा, अशा सुंदर नगरीचा एका रावणाच्या ह्या अनन्वित कृत्यामुळें एक मासाच्या आंतच विध्वंस होणार!" सीताबाई, त्यानें जसे लंकेंतील चांगले प्रकार सांगितले तसे वाईटही सांगितले! असो. मारुतीनें नंतर इकडील सर्व वर्तमान कळविलें. आपण दिलेला चूडामणि यथाकालीं त्यांस अर्पण केला. आपल्या एकांतांतील खुणेच्या गोष्टीही रामचंद्रांनीं माझ्या प्रिय प्राणनाथास सांगितल्या! ह्यावरून ते किती सरलान्तःकरण आहेत बरें? रामचंद्रांस ह्या कथानकप्रसंगींही आपला शोक दूर करवला नाहीं! असो.

ह्याच सभेंत, सर्व सैन्यासह दशाननाचें पारिपत्य करण्यास कधीं प्रस्थान करावयाचें तें ठरून नंतर लौकरच सुमुहूर्तावर विजयप्राप्तीस्तव ईश्वरप्रार्थनादि विधि करून सर्ववानरमंडळी निघाली. सुग्रीवराजानें स्वराज्यसंरक्षणार्थ थोडे लोक तेथें ठेविले. निघालेल्या सैन्याचे योग्य विभाग, प्रतिभाग, करून त्या प्रत्येक विभागप्रतिभागावर योग्य वानराधिकाऱ्यांची योजना केली. एकंदर सर्व सेनानेतृत्व युवराज अंगदानें अंगीकारिलें होतें. मारुतिप्रभृति प्रधानांनीं अशनादिसामग्रीची सुव्यवस्था ठेविली होती. सुग्रीव राजानें व इतर वानराधिकाऱ्यानीं उत्तम उत्तम पोषाक केले होते!! आनंद, ईर्ष्या, औत्सुक्य, तत्परता, अभिमान, विनोद, स्वामिभक्ति ह्या मनोभावांनीं भरून तें वानरसैन्य चाललें होतें! रामचंद्र मारुतीच्या स्कंधावर व लक्ष्मण अंगदाच्या स्कंधावर बसले होते. तो क्षुब्ध होणारा सेनासागर जणूं लंका बुडवावयास शीघ्र गतीनें चालला आहे,

असें वाटे ! त्यांना निघतांच उत्तम शकुन झाले. ह्याप्रमाणें किष्किंधेहून निघाले ते चौथे पांचवे दिवशीं दक्षिण समुद्रीं आले ! त्या समुद्रतीरींही रामचंद्रांनीं आपल्यास उद्देशून बहुत शोक केला. तेथें येऊन त्यांस एक दोन दिवस झाले न झाले, तों मत्प्राणनाथ त्यास्थलीं रघुरामचंद्रांच्या सख्यसंपादनार्थ गेले. नंतर काय झालें तें तुह्मांस संक्षेपतः सांगितलेंच आहे. मीं पाठविलेला हेर एवढेंच वृत्त घेऊन येणार होता, परंतु हा एवढा विस्तीर्ण समुद्र तरून हा योधसमूह लंकेंत कसा येणार, तदर्थ ते काय युक्ति योजणार, हें समजून घेतल्याशिवाय, मी चिंतामग्न असलें तरी मला भेटणें उचित नाहीं, असें त्याला वाटलें. तो ह्मणाला, "त्यांतलि कांहीं प्रतापी वानर प्रसंग पडेल तेव्हां दाहा, वीस, तीस, किंवा शंभर योजनें उड्डान करणारे आहेत खरे, परंतु बाकीच्या असंख्यात वानरांनीं काय करावें ? रामलक्ष्मणांनीं कसें यावें ? सर्वांस सुलभ मार्ग लावून देणारे तेच पुरुष जगतांत पूजनीय व वंदनीय होतात ! नाहीं तर आपणच काय ते मोठे समजून, सामान्यजनांविषयीं जे दुर्लक्ष्य करितात, ते आपल्या इष्ट कार्याच्या नाशाची प्राणप्रतिष्ठाच करितात, असें समजावें. लंकेंत कोणत्या साधनानें जाणें सुलभ पडेल, ह्या उपाययोजनेंत त्यांतील विचारी लोक होतेच. अनेकांनीं आपपल्या बुद्धीप्रमाणें अनेक युक्त्या सांगितल्या. शेवटीं सर्वानुमतें तेथपासून लंकाद्वीपापर्यंत सेतु बांधावा, असें ठरलें. "ही युक्ति साधल्यास उत्तमच आहे. सेतुबंधनासारखें समुद्र तरण्यास उत्तम साधन दुसरें नाहीं," असें बिभीषण महाराजांनींही रामचंद्रचरणीं कळविलें. सेतु बांधावयास प्रारंभ करावयाचा असें ठरतांच त्या वानरसैन्यानें कमालच केली! मारुतीनें व त्याच्या सारख्या वीरांनीं जगूं सर्व पृथ्वीवरील दगड व माती तेथें आणून टाकिली! ते असंख्य वानर, नल वानर सांगेल त्याप्रमाणें काम करूं लागले ! ह्याच्या सारखा शिल्पज्ञ कोणी नाहीं ! अनुकूल कालाच्या योगानें, व त्या नल शिल्पकाराच्या विलक्षण कुशलतेनें, व रामलक्ष्मणांच्या पुण्यप्रतापानें, व सीतामातेच्या लोकोत्तर पातिव्रत्यामुळें, व दशाननावर विनाशकाळाला अनुग्रह करणें आहे ह्मणून, तें सेतुबंधनाचें काम सुसाध्य झालें ! नाहीं तर असें असंभाव्य कृत्य कधीं तरी झालें असतें काय? हा शंभर योजनें ( ४०० कोश ) लांब आणि दाहा योजनें ( ४० कोश ) रुंद सेतु

बांधण्यास त्यांस अवघा पांच दिवसांचा अवधि पुरे झाला! पहिल्या दिवशीं चौदा, दुसऱ्या दिवशीं वीस, तिसऱ्या दिवशीं एकवीस, चौथ्या दिवशीं बेवीस व शेवटच्या दिवशीं तेवीस योजनें त्यांनीं सेतु बांधिला. त्या शिल्पकाराच्या नांवावरून त्या सेतूस "नलसेतु" असें नांव ठेविलें आहे." इतकें त्या वार्ताहरानें सांगून शेवटीं "तें अफाट सैन्य आतां एक दोन दिवसांतच लंकेंत येऊन थडकेल व येथें आल्यावर बिभीषण महाराजांच्या सांगण्यावरून, बहुधा तें सुवेलाचलीं तळ देईल, असें वाटतें," हें वृत्त त्यानें मला कळविलें. तें अमृत समजून मी आपल्याकडे घेऊन आलें. सीताबाई, त्या पक्षास माझ्या प्राणनाथांनीं दशाननवधार्थ सर्व प्रकारें साहाय्य करण्याची प्रतिज्ञा केली आहे.

**सीता**—सरमाबाई, आज खरोखर मला आपण अमृतस्नानच घातलेंत.

**सरमा**—हो, बरी आठवण झाली! मध्यें एक सांगण्याचें राहिलें. मत्प्राणनाथ रामचरणीं शरण जाऊन त्यांना आश्रय मिळाल्यानंतर व सेतुबंधनास प्रारंभ करण्यापूर्वीं, दशाननमहाराजाज्ञेनें तेथें एक शुकनांवाचा दूत गेला होता. हा त्यांचा शुकप्रधान आहे तो नव्हे. ह्या दूतानें सुग्रीवराजाची भेट घेऊन त्यास सांगितलें कीं, रावणमहाराजांची अशी इच्छा आहे कीं, तूं ह्या सर्व सैन्यासह रामलक्ष्मणांस साहाय्य करूं नकोस. कारण कीं, जनककन्या सीता दशास्यमहाराजांनीं हरण केली, ह्यांत तुझा कांहीं एक संबंध नाहीं! तेव्हां तूं सर्व मंडळीसह परत जावेंस. लंकाधिपतीशीं वैर संपादन करून नाश पावणें हें तुला योग्य नाहीं. राक्षसेंद्राशीं मित्रत्वानें वागल्यास तुझें कल्याण आहे. अशा भावार्थाचा त्यानें निरोप सांगितला! त्याचें हें बोलणें होतें न होतें आहे, तों वानरमंडळी त्यास धरून मारूं लागली. तेव्हां दयानिधि, महाशय व सर्वत्रसमचित्त अशा रघुकुलभूषणभूत रामचंद्रांनीं त्यास सोडून देण्याविषयीं वानरांस सांगितलें! तेव्हां त्याचे अंतःकरणांत रामाविषयीं परमपूज्यभाव उत्पन्न झाला. सीताबाई, शत्रुपक्षानेंही रामचंद्राचें स्तोत्र गावें असा तो पुण्यपुरुष आहे. "पापाचरण करणारास शासन करण्यास जो कोणी प्रतापशाली पवित्रान्तःकरण पुढें होईल, त्यास साहाय्य करणें हें माझें आदिम कर्त्तव्य

होय, असें मी मानितों. ह्या कर्त्तव्यानुसार सीताहरणाशीं माझा सर्व प्रकारें संबंध आहे. अनन्वित कर्मांमुळेंच माझ्या ज्येष्ठ बंधू वालीच्या वधाला मीच कारण झालों. लंकाधिपते, रामचंद्राच्याच हातून तुझें मरण आहे! मी जर रामचंद्रापाशीं सख्य करूं नये व तुझ्याशीं स्नेहानें रहावें अशी तुझी मनःपूर्वक इच्छा असेल, तर अद्यापिही त्या त्रिभुवनैकभूषणभूत रामांगनेला मुक्त करून रामचरणयुगुलीं दीन होऊन शरण ये." हा सुग्रीव राजाचा निरोप घेऊन रामलक्ष्मणांस वंदन करून तो शुकदूत इकडे आला. तेव्हां, जानकीबाई, आतां आपण दुःखी होऊं नका. आपले क्लेश लौकर संपतील. मला मोठी काळजी होती कीं, रामचंद्र प्राणनाथांला आश्रय देतात कीं नाहीं! ती आपल्या कृपेनें दूर झाली. मी फार चिंतातुर होतें, ह्मणून इतके दिवस कोठें बाहेर पडलें नव्हतें. आतां खचित युद्ध होणार! युद्धाचा कांहीं नेम आहे? त्यांत कोणाचा जय होतो तो. ही तर आतां मोठीच काळजी आहे.

**सीता**—सरमाबाई, तेंच मी आतां ह्मणणार होतें. युद्धाचा कांहीं नेम का आहे? तशांत हे राक्षस मायावी. असो. प्राणनाथांच्या चरणप्रसादानें काय होईल तें खरें. आतां कृपा करून आपणांस जें जें कांहीं वृत्त समजेल तें ह्या आपल्या दुर्दैवी मैत्रिणीस सांगण्याची कृपा होऊं द्या.

**सरमा**—मला, पहा त्या दशाननस्त्री मंदोदरीबाईविषयीं वारंवार फार फार वाईट वाटतें! काय त्यांची पतिपरायणता सांगावी तरी! जोंपर्यंत ह्या जगच्चक्राची गति अकुंठित राहील अथवा जोंपर्यंत जगांत भाषाव्यवहार अबाधित चालेल, तोंपर्यंत, ह्या साध्वीच्या उज्ज्वल कीर्त्तीस भंग नाहीं. पतिव्रतानाममालिकेंत ह्या अग्रगण्य होत. सीताबाई, जशा आपण तशाच ह्या आहेत. ह्यांचा थोरपणा, उदारशीलता सदयता, इत्यादि गुणगणांविषयीं बोलावें तेवढें थोडेंच. माझे प्राणनाथ आपल्या प्राणनाथांकडे आश्रयार्थ गेले, हें जेव्हां त्यांनीं ऐकिलें, तेव्हां त्या स्वतः माझ्या समाचारास माझ्या मंदिरीं आल्या. त्यांनीं माझें सदयान्तःकरणानें गोडगोड शब्दांनीं अनेक गोष्टी सांगून सांत्वन केलें. आपल्या मंदिरीं राहावयास मला बोलाविलें. परंतु मी आपल्या भेटीला वारंवार येईन, ह्मणून मीं त्यांस सांगितलें. आपल्याविषयीं त्यांचें माझें पुष्कळदां बोलणें झालें आहे. त्यांना

आपल्याविषयीं फारच वाईट वाटतें. पतिव्रतेचा छल करणें हें समूळ नाशाचें कारण होय. अशा छलापासून कोणाचेंही कधीं हित झालें नाहीं. वगैरे त्यांनीं पतीला नानाप्रकारें सांगून आपणास सोडून देण्याविषयीं त्यांची पुष्कळदां प्रार्थना केली! परंतु सर्व व्यर्थ! बायकांचें पुरुषांपुढें काय चालतें? एकूण बाईसाहेबांसारखी स्त्री क्वचित् मिळेल! अशा निरपराधिनी स्त्रीवर सुद्धां परमेश्वराचा आतां कोप होणारना! मंदोदरीबाईच्या, भाविदुःखाविषयीं विचार केला ह्मणजे पोटांत कळमळून येतें, मन उदासीन होतें. व सर्वत्र निराशेचें भयंकर स्वरूप दिसतें. असो, आपल्या बरोबरच त्या विनाशकाळानें ह्या लंकानगरींत पाय ठेविला आहे. त्याच्या खेळास आतां आरंभ झालाच. आह्मी तुह्मांकडे वारंवार येतों, ही बाईसाहेबांचीच कृपा होय! बरें आतां आह्मी त्यांच्या मंदिरीं जातों.

**सीता**—सरमाबाई, आह्मी ह्या महासाध्वीची विमलकीर्ति अयोध्येंत असतांच ऐकिली आहे. व तुमच्या मुखांतूनही तिचें उदार चरित श्रवण केलें आहे. अशा दर्शनीय सुपतिव्रतेवर ईश्वरी कोप होणें, ह्यापासून कोणासही वाईट वाटल्याशिवाय रहाणार नाहीं! परंतु दैवदशा कोणाला ही सोडीत नाहीं. असें ह्मणून समाधान केलें पाहिजे.

**सरमा**—बरें तर आह्मी जातों.

असें ह्मणून ती सरमा व कला दोघी निघून गेल्या.

---

# उच्छ्वास सातवा.

प्रिय श्रोते हो, आमच्या चरित्रनायिकेचा प्राणवल्लभ जो रघुरामचंद्र त्यानें आजपर्यंत जीं अनेक अद्भुत कृत्यें केलीं, त्यांत ह्या विलक्षण सेतुबंधनाची गणना सर्वांच्या अगोदर केली पाहिजे! पांच दिवसांत ४०० कोश लांब व ४० कोश रुंद पूल बांधावयाचा व तो

ही अफाट समुद्रांत! काय हा प्रभाव! ह्या प्रभावास काय ह्मणावें! मनुष्य कितीही उन्नतावस्थेस पोंचला, त्यास पदार्थमात्राचे जरी सर्व कांहीं गुणधर्म कळूं लागले, तो कसाही संयोगधर्मशास्त्रज्ञ बनला, किती कला-कुशल झाला, तरी हें सामर्थ्य त्याच्यामध्यें दृष्टीस पडेल काय! नाहीं, नाहीं, खचित नाहीं. एवढें सामर्थ्य तो परमात्मा सामान्य मनुष्याला कधींही देणार नाहीं. भगवद्भक्तांची गोष्ट निराळी. त्यांची व जगांत गर्दी करून सोडण्याऱ्या उदरंभरणासक्त मानवांची आह्मी साम्यता कधींही करणार नाहीं. अशीं अत्यंताद्भुत कृत्यें परमेश्वराच्याच हातून होतात, व तोही, मी अनेक रूपानें जगांत आहें, असें, मंदबुद्धि, नास्तिक, मदोन्मत्त, अनाचारासक्त व संसारनिमग्न लोकांस सांगण्या करितां कधीं काळीं असे साक्षात्कार दाखवितो. तेणेंकरून पापाभिमुख मानवप्राण्यांस बराच काळ धक्का बसल्यासारखें होऊन ते जगांत आपलें खरें कर्तव्य काय आहे, ह्या शोधास लागतात! असें कांहीं झालें तरी नास्तिक किंवा दुराचारी लोकांचें बीज जगांतून कधींही नाहींसें व्हावयाचें नाहीं. त्यांचें पीक दिवसेंदिवस अधिकच व्हावयाचें. श्रोतेहो, ते वानर व रामलक्ष्मण, हे जसे काय संकेतच करून ह्या भूतळीं कांहीं लोकोत्तर कृत्यें करण्याचे हेतूनें कोठून तरी यावे तसे आलेले दिसतात! असो. ह्याविषयीं मनांत आलेले अनेक उद्गार व आणखी येणारे विचार, ह्यांस आतां येथें स्थान न देतां आपण आपल्या पुढील अफाट व सरळ कथामार्गास लागूं.

हें वृत्त घडून एक दोन दिवस झाले असतील नसतील तों एके दिवशीं प्रातःकाळीं तो लंकाधिपति परिचारकगणांसह त्या अशोकवनिकेंत शोकनिमग्न असलेल्या रामांगनेजवळ आला! सीतादेवी तर रामलक्ष्मणांचें त्या वानरसैन्यासह लंकाप्रदेशीं आगमन झाल्याचें मंगल वर्त्तमान कधीं एकदां कानांवर पडतें आहे, ह्मणून समुत्सुक झालेली होती. तिनें आपलें सर्व अन्तःकरण रामास अर्पिलेलें होतें, ह्मणून तिचे नयन उघडे होते तरी, पुढें आलेल्या त्या निर्लज्ज कज्जलपर्वताकडे तिची प्रथमतः दृष्टि गेली नाहीं! "त्रिभुवनैकभूषणसुंदरि," ह्या संबोधनानें तिला हांक मारून तो रावण ह्मणाला, "अग, आतां तुला जें मी वर्तमान सांगणार आहें, तेणें करून तर तुला अत्यंत आनंद होईल! ह्या भाग्यवान् दशाननमहाराजांस दृढालिंगन देऊन ह्यांचे मनोरथ पूर्ण

करण्यास जो सुप्रसंग तूं मनांत योजीत होतीस, व त्या प्रसंगाच्या अभावामुळें तूं माझा बाह्यतः अनादर करून आपल्या अंतःकरणास असह्य दुःख देत होतीस, तो सुप्रसंग आज-अनायासें ह्मण, कष्टानें ह्मण, किंवा तुझी शंकरास दया आल्यानें ह्मण, किंवा आजपर्यंत त्वां भोगलेल्या असह्य विपत्तींचा आज नाश झाला यामुळें ह्मण, किंवा तूं जें आजपर्यंत मौर्ख्य दाखविलेंस तें साक्षात निसर्गालाही आवडलें नाहीं, ह्मणून ह्मण, आला आहे! तो तुला विदित करण्याकारितां मी स्वतः आलों आहें! जनकनंदिनी, काय तुझें भाग्य हें! स्वतः लंकाधिपति, तुझ्या अग्रभागीं वृत्तनिवेदकाचें काम करतो आहे! अहाहा! तुझ्या भाग्यास एकूण सीमाच नाहीं! मृद्वंगि, जें आतां मीं तुला आनंदप्रद वृत्त कळविणार आहें, तदर्थ वास्तविक पहातां तूं मला गाढालिंगन द्यावेंस व नंतर तें ऐकावें, असें कोणीही ह्मणेल. परंतु तूं इच्छिलेला तो सुप्रसंग समजेपर्यंत मला दृढालिंगन न देण्याची जर तुझी दृढ प्रतिज्ञाच असेल, तर तीही मला पूर्ण केली पाहीजे. कारण कीं, आतां ह्या क्षणापासून सर्व कांहीं तुझ्या इच्छा तृप्त करणारा मीच आहें. हे रमानने, हे पृथुनितंबिनि, लंकाधिपति दशाननमहाराजांच्या विलक्षण बलवैभवाधिकारांविषयीं क्षणभरही विचार न कारितां त्या मूर्खशिरोमणिसुग्रीववानराच्या नादीं लागून, ज्याला तूं मुर्खत्वानें "पति, पति," ह्मणून ह्मणत होतीस, तो राम लंकेस यायास निघाला! ही राक्षसराजनगरी अगम्य व अस्पर्श्य आहे, हें त्या मानवाला समजलें नाहीं! माझा मूर्ख बंधु बिभीषण मला तुझ्या संबंधानें अविचारानें कांहीं दुरुत्तर बोलल्यामुळें मजपासून अत्यंत भयभीत होत्साता त्या वनांत संचार करणाऱ्या नराधमास शरण गेला! रक्षणार्थ ज्याला तो शरण गेला, त्याला त्याच्या मातेनें व बापानें वनांत हांकलून लाविलें! ह्याला जर कांहीं सामर्थ्य किंवा ज्ञान असतें, तर हा वनांत वेड्यासारखा कंदमूळें खात भटकता काय! शेवटीं बायकोसाठीं रडून रडून वनचरांच्या साहाय्यानें येथें आला! त्या रामाला जर अल्प तरी ज्ञान असतें, तर तो तुजसाठीं येथें येता काय! त्याला इतकें देखील समजूं नयेना कीं, लंकाधिपतीचें अपार वैभव व अकुंठितसत्ताधिकारित्व पाहून सीतेला आपल्याकडे परत यावें असें कसें वाटेल? खडतर डोंगरापासून निघालेली नदी, मध्यें किती कांना

भेटली, तरी शेवटीं तिची धाव तिला भरती आणणाऱ्या सागराकडेच असते, त्यांत मिळल्यावर परत निघावें, असें तिला क्षणभर तरी वाटेल काय ! व वाटलें तरी तो महासागर तिला जाऊं देईल काय ! असो. सुंदरि, शत्रुप्रताप न जाणणारा तो राम त्या वानरांस व माझा दुष्ट व विश्वासघातकी बंधु ह्यास घेऊन येथें सुवेलाचलीं आला ! त्या स्थळाहूनच माझी भयंकर नगरी व सैन्य पाहून तो अगदीं भयत्रस्त झाला! सीतेच्या नादीं लागून, आपण सर्वथा फसलों, असें त्यास वाटलें. येथें जयाचा मुळींच संभव नाहीं, अशी त्याची पदोपदीं खात्री झाली. राजाधिराज दशानन महाराजांस शरण गेल्यावांचून आतां गत्यंतर नाहीं, असें त्यास वाटलें, व हा सद्धेतु तो वानरमंडळीस कळविणार होता. परंतु भवितव्यापुढें कोणाचा उपाय नाहीं. काल मध्यरात्र उलटून गेल्यावर माझ्या आज्ञेनें बरेच राक्षस वानरांचीं रूपें घेऊन त्या निद्रित वानरसैन्यांत शिरले. तेव्हां चोहोंकडे असावधपणा दिसला ! हें वर्तमान क्षणैकांत त्यांनीं मला कळविलें व माझ्या आज्ञेनें आणखी लक्षावधि राक्षसांनीं तेथें जाऊन त्या मृतप्राय पडलेल्या सैन्यावर छापा घातला ! मग काय विचारतां ? गोसमूहावर जसा व्याघ्रांचा कळप पराक्रम करितो, तसा त्यावेळीं अगणित राक्षसांनीं आपला पराक्रम गाजविला ! तेव्हां वानरसैन्याची अगदीं दाणादाण उडाली ! त्यांतील मुख्य मुख्य वानरांस त्यांनीं ठार केलें. लक्षावधि वानर मरून पडले आहेत. हजारों भयंकर जखमांनीं पीडित होऊन ओरडत आहेत. रक्तानें स्नातच काय, असे असंख्य धुळींत रडत लोळत आहेत. विगतेंद्रिय होऊनही सहस्रशः कण्हत धडपडत आहेत. त्यांतून आल्या मार्गानें कित्येक पळत सुटले ! लंकादहन करणाऱ्या त्या मरकटास हाल हाल करून सर्वांत अगोदर मारलें! सुग्रीवाची ग्रीवाच मोडली! तेव्हां तो कोठच्या कोठें पळाला ! जांबुवान तर तळमळत होता, त्यास मग सावकाश ठार केलें. रामचंद्रासही पंचत्वाप्रत पोंचविलें ! लक्ष्मण शस्त्रांनीं घायाळ होऊन कित्येक वानरमंडळीसह माघारा गेला. रामाला व सुग्रीवाला यथेच्छ गालिप्रदान देत रडत व ओरडत त्या स्थळीं लक्षावधि वानर पडले आहेत. तो भयंकर प्रकार, हे भीरु, तुला पाहावयाची इच्छा आहे काय? सौभाग्यशालिनि, तुझ्या सुखाचा केवळ शत्रु जो राम त्याचा कंठनाळ ज्यानें

छेदिला तो माझा प्रधानश्रेष्ठ प्रहस्त होय. आज ह्या प्रहस्ताचे तुजवर तसेच मजवरही वहुत उपकार आहेत. तो आज तुला मनकाचे ठिकाणीं आहे. कारण आतां प्रत्यक्ष इंद्राणीसही दुर्लभ असे सुखोपभोग तुला प्राप्त व्हावयाला तो प्रहस्तच कारणभूत झाला आहे. प्रहस्ताचे हस्त आज धन्य होत! प्रिये, तो राम मरण पावला ह्मणून मी आतां त्याविषयीं कांहीं वाईट बोलत नाहीं, पण साधारणही ज्याला ज्ञान नव्हतें, अशा मूर्ख नराशीं त्या रानांत रममाण होऊन तुला सुख तरी कसें होत होतें? मला तर असें वाटतें कीं, तुजसारखें अद्वितीय रत्न माझ्या उपभोगार्थ आणावें व नंतर प्राण सोडावे, अशाकरितांच त्याचें इहलोकीं जन्म होतें! अरे रामा! हें तेजोमय रत्न मला अर्पण केलेंस, ह्याबद्दल मजकडून कांहीं बक्षीस सुद्धां तूं घेतलें नाहींस! तूं जिवन्त असतास तर खरोखर ह्या दिव्यरत्नार्पणामुळें मीं तुला तुझें अयोध्येचें राज्य मिळवून दिलें असतें!"

हें त्याचें बोलणें चाललें असतां ती संतापनें अगदीं तप्त झाली होती. तिला पुढें काय करावें, ह्या मूर्खाशीं काय बोलावें, हें कांहींच सुचेना. तरी ती ह्मणाली, "अरे अधमाधमा, हें तुझें वाक्पांडित्य मला क्षणभरही खरें वाटत नाहीं. हाय! हाय! सत्य बोलण्याचें सुद्धां आतां सोडलेंस ना? असत्य हें सर्व नाशाचें आदिकारण होय. तेव्हां तुझ्या नाशाचा समय अगदीं जवळ आला आहे! माझ्या प्रिय भर्त्याचा विशाल पराक्रम, दूरवरदृष्टि, सदा सावधानचित्त, इत्यादि अनेक जागृत गुणांस तुझें हें सागणें अगदीं विरुद्ध अर्थात् खोटें आहे! दुष्टा, माझ्या प्रिय भर्त्याचें जन्म हजारों राक्षस मारण्या करितांच आहे, हें गुह्यतम जर आतां अगदीं सूर्यप्रकाशासारखें स्पष्ट होऊन गेलें आहे, तर माझ्या प्रियास रात्रौ कोणीं प्रहस्तानें मारलें, हें सांगणें किती खोटें दिसतें! त्याप्रमाणेंच इतर पराक्रमी मंडळीविषयींही तूं जें आतां बोललास तें अगदीं असत्य होय. तो पराक्रमी हनुमान आणि त्याचें एकाएकीं मरण! अरे, असत्य बोलावयाचें तर बोलावयाचें, तें चांगलें शोभेलसें तरी बोलावें कीं नाहीं! तर काय सांगतोस कीं, ते निजले असतां राक्षसांनीं त्यांना कपटानें मारिलें! हे कपटपटो! हे कामांधा, हें तुझें भाषण सर्व प्रकारें खोटें असल्यामुळें माझ्या चित्तास कांहीं एक विकार न होतां तुझ्या मूर्खपणाविषयीं मात्र

अधिकाधिक अनुभव येतो! तुझें हें सर्व बोलणें जरी मला निःसंशय कपटमय वाटतें आहे, तरी ह्या तुझ्या असह्य वाग्विषानें माझ्या सर्वांगीं संचार केला आहे. ह्यामुळें माझा क्रोधाग्नि इतका कांहीं भडकला आहे कीं, जणूं तुझें तो आतां भस्मच करील! परंतु तुझा योग्य मार्गानेंच नाश झाला पाहिजे, असें माझ्या मनांतील इतर सात्विक वृत्तींचें मला सांगणें आहे. अशा कपटानें माझें व्रत भंग करण्याची इच्छा करतोस काय! अरे निर्लज्जा, आतां तुला उपदेश करणें व्यर्थ आहे. तरी एवढेंच सांगतें कीं, माझा पवित्राचरण प्रियकर रघुनंदन आतां लंकेंत आला आहे. तो तुझा काळच आला! तो तुझे प्राण हरण केल्याशिवाय कदापि सोडणार नाहीं! व तुजसारख्या अनन्वित कर्में करणारांचा आतां जगांत अस्तच झाला पाहिजे. तरच जगतास शांतिसुखाचा लाभ होणार आहे. आतां तूं कांहीं केलेंस तरी वांचत नाहींस. व जेणेंकरून तूं जीवन्त राहशील, अशी तुला आतां बुद्धि किंवा युक्ति सुचणार नाहीं. तेव्हां माझ्या वीरभर्त्याचे ते प्राणहारक बाणसर्प तुझ्या ह्या पापमय देहाचे लचके तोडीतपर्यंत, जे थोडे तुझे आयुर्दिन राहिले आहेत, त्या दिवसांत त्या गिरिजापति शंकराचें ध्यान कर. त्याला शरण जा. काळाला वश होऊन तो मेरील तसलीं कृत्यें अजून तरी करूं नको. माझ्या शरीरास स्पर्श करून मला ह्या पापनगरींत आणलेंस व ह्यामुळें तुझ्याशीं मला भाषण करावयास लागत आहे, ही मला कोणत्या माझ्या कर्माची शिक्षा भोगावी लागत आहे, कोणास माहीत!"

रावण—तो राम यमाच्या घरचा प्रिय अतिथि झाला, ही गोष्ट तुला खोटी वाटते काय? मला ठाऊकच होतें कीं, ह्या मंदबुद्धिस्त्रीला असेंच वाटेल! ह्मणूनच मीं ह्याच्या खरेपणाविषयीं त्या शूर विद्युज्जिव्हास सांगूनच ठेविलें होतें कीं, तें रामाचें शिर येथें आण ह्मणून! तो पहा महात्मा आलाच.

असें तो रावण बोलतो आहे तों विद्युज्जिव्हानें एक शिर व एक धनुष्य सीता देवीपुढें ठेविलें! त्यांच्याकडे पहातांच ती अगदीं तटस्थ झाली! श्वास सुद्धां सोडीना! तिच्या डोळ्यांचें पातेंही हालत नव्हतें! तेव्हां असें वाटे कीं, कुशल कारागिरानें ही घडलेली सुंदर, निश्चल, निःशब्द, सुवर्णमय पुतळीच होय! तीं सर्व सामुद्रिक लक्षणें,

तीं विशाळ नेत्रें, त्या भ्रुकुटी, तें विशाल भाल, ती हनुवटी, तें मुख, तें अधर, ते गाल, आणखी बारीक सारीक तिला ठाऊक असलेल्या सर्व खुणा, तो दिव्य चूडामणि, पहातांच, हें आपल्या प्रियाचेंच शिरःकमल होय, अशी तिची पक्की खात्री होऊन ती अन्तःशोकभरानें अगदीं व्यथित होऊन धाडकन् भूमातेवर पडली! क्षणैकानें त्या अशोकवनिकेंतील अशोक वृक्षांच्या मंद वाऱ्यानें सावध होऊन क्षणांत शोकविषानें काळी ठिक्कर झाली! तिच्या मुखांतून कांहीं वेळ शब्दच निघेना! पुनः पुनः ती त्या शिरःकमलाकडे पाहून त्याचें अवघ्राण व चुंबन घेऊन बोलूं लागली. "प्राणप्रिया, काय माझ्या वांट्यास आलें हें! जो प्रसंग मंदोदरीवरही येऊं नये ह्मणून सदा इच्छीत होतें, त्याच प्रसंगानें आज मला गांठिलें! प्राणनाथ! आतां मी काय हो करूं! काय बोलूं! कोणास हाक मारूं! मीं असा आपला काय तरी अपराध केला! अहो, माझ्याशीं एकदां तरी बोला! माझ्याकडे एकवार तरी पूर्ण नेत्रकमलें उघडून पहा! मला "ओ" द्या! मला ह्या कारागृहांतून आज मुक्त कराल, उद्यां न्याल, ह्मणून आशा करीत आपल्या चरणकमलांचें चिंतन करीत येथें मोठ्या दुःखानें काळक्रमण केलें. आणि हें शेवटीं काय केलेंत! अहो, ह्या पापिणीला कडकडून आलिंगन द्यावयास आपलें सर्व मृतशरीरसुद्धां माझ्या मांडीवर नाहीं! हाय! हाय! अहो, ह्या अमंगळ राक्षसनगरींत मला दीनेला एकटी टाकून आपण लोकान्तरची वाट धरलीत, हें आपल्या कोणत्या गुणाला शोभलें बरें? अहो कृपानिधे, स्वस्त्रीवर असें निष्ठुरत्व गाजविल्यानें कोणत्या अन्य लोकीं आपलें यश गाजणार आहे! मला आतां जगांत कोण आहे बरें! मी कोणत्या आगींत येथें आहें, हें जाणूनही आपण परलोकीं गमन केलें! तेव्हां आपण माझा खचित कांहीं तरी महान् अपराध ऐकिला असेल. परंतु हें आपलें करणें कोणासही मानवणार नाहीं. स्त्रीचा अपराध तिला दाखवून त्याबद्दल शिक्षा, क्षमा किंवा उपदेश करणें हा पतीचा खरा धर्म होय, असें मी समजतें. पूर्वजन्मीं मी कोणी तरी आपली वैरिणी होतें, ह्मणून अपल्यास लेशही सुख न देतां शत्रूच्या—शत्रूच्या नव्हे मृत्यूच्या—स्वाधीन केलें! तो पराक्रमी हनुमान् आला, त्यानें सुग्रीवमहाराजांचें व सर्व वानरवीरांचें बल, शौर्य, सांगितलें. आणखी आपलें व भावोजींचे अतुल पराक्रम तर मीं डो-

ण्यांनीं पाहिलेच होते. ह्या अगम्य नगरींत सुलभ रीतीनें प्रवेश व्हावा ह्मणून अश्रुतपूर्व अशा सेतुबंधनाचीही शुभवार्ता माझ्या कानीं पडली! पण शेवटीं आतां हें काय विपरीत दृष्टीस पडत आहे! हाय! हाय! हें ब्रह्माण्ड-सरोवरांतील एकच शीरःपद्म त्या प्रमत्त गजानें कसें तोडिलें! अहो! जगतांतील सर्व सागर जेव्हां आटून जातील, अथवा अंतरिक्षांतून हा सूर्य सर्व ग्रहांसह जेव्हां पृथ्वीर तुटून पडेल, तेव्हांच तुह्माला शत्रुहस्तें मरण येईल, अशी माझी खात्री होती! पण ते जसाचे तसे आज असतां तुमची मात्र ही अशी स्थिति झाली! ह्यामुळें तुमचें मरणवृत्त मला अगदीं खोटें वाटतें! परंतु हें पुढें सर्व सुलक्षणान्वित शिरःसरोरुह दिसतें आहे! किति तरी माझे नेत्र पापी हे! जें जें पाहूं नये तें ह्यांच्या पुढें येत आहे! माझा पिता हें वर्तमान ऐकून कसा वांचेल! माता जीवित धारण कशी तरी करील! ह्या अभागिणीसाठीं नाहीं नाहीं ते आजपर्यंत हाल सोसून शेवटीं ह्या विदेशीं आपण प्राणही दिलेत, ही वार्ताविषधारा आपल्या मातांच्या कर्णीं पडतांच त्या मोह पावून खचित मरून जातील! परंतु मला आपलें प्रत्यक्ष मुखदर्शन होत असतांही मरण येत नाहीं! काय आश्चर्य हें! भरतभावोजी तर साहस करून प्राण देतील! शत्रुघ्नजीही शोकवश होऊन काय करतील नकळे! हेममृगचर्मासाठीं मीं आपणास वनांत घालविलें, हें वृत्त लक्ष्मणभावोजींच्या मुखांतून सर्वांस समजतांच, सर्व लोक माझी यथेच्छ निंदा करून नानाप्रकारें मला दोष देतील! मी त्या दोषास सर्व प्रकारें पात्रच आहें. त्या माझ्या एका दोषामुळें बहुत अनर्थ घडले आहेत. वानरपतीस व सर्व वानरांस त्रास होऊन त्यांचा विलक्षण नाश झाला. व आपलें मरण हें त्या दोषाचा व माझ्या दैवदशेचा पूर्ण परिपाक होय! अहो, माझ्या एका दोषामुळें जरी हा मजवर असह्य दुःखप्रसंग आला, तरी तो दोष मजकडून व्हावयास त्या कैकेयी सासूबाई कारण नव्हत काय! त्याच जर आपल्याविषयीं आशा निष्ठुर नसत्या तर आपलें वनांत येणें कसें होतें? मग माझ्या हातून तो महान अपराध कसा झाला असता? अहो, ती कामातुर शूर्पणखा नाहींका ह्या शोकाचें कारण? असो, आतां बडबडुन काय होतें? कोणाचा दोष असला तरी माझें जीवित, माझी हौस, माझें सुखसर्वस्व, माझा उत्सव, माझे मनोरथ, हीं सर्व कांहीं आपल्या बरोबर गेलीं. हीं नसतां मनुष्यानें ज-

गांत कसे दिवस काढावे? प्राणनाथ, स्त्रियांस वैधव्यदशा फारच हो दुः-
सह आहे! ज्या अबला ह्या दुःखाग्नींत सांपडतात त्यांचे हाल त्याच जा-
णोत! ह्यांच्याहून दीन व दयेपात्र असें जगांत दुसरें कोणी नाहीं! निराशा,
दुःख, शोक, दैन्य, औदासीन्य, लज्जा, शीण, श्रम, लोकापवाद, सं-
कोच, भय, ह्यांच्या संगतीनें त्यांस ह्या जगांत सुखप्राप्ति कशी व्हावी?
त्यांचें सर्व सुख पतीबरोबर जातें. गाईपेक्षांही अशा स्त्रिया गरीब होत.
आणि त्या जर अपुत्रवती असतील तर मग त्यांच्या दुःसह दुःखास सी-
माच नाहीं! तेव्हां मला अशा वैधव्याजालांत टाकून आपण लोकान्तरीं
गमन केलेंत, ह्यांत आपण कोणतें सच्छील प्रकट केलेंत? आर्यपुत्र, तुह्मी
मला हजारों वेळ ह्मणालां होतां कीं, "हीं चौदा वर्षें संपलीं आणि मला
राज्यपदप्राप्ति झाली, ह्मणजे प्रजांस पोटच्या मुलांप्रमाणें सुख देईन, कोठें
तिळभरही अन्याय होऊं देणार नाहीं, सर्वांस नीतीनें वागवीन, मला
बंधूंचें तर पूर्ण साहाय्य आहेच, तुझें मात्र पाहिजे." हें बोलणें सत्य केल्या-
शिवाय सत्यप्रतिज्ञ पुरुषानें इहलोकांतून जाणें हें सर्वथैव अनुचित
होय. " दुष्ट राक्षसांचा नाश करून सर्व जगतास सुख देईन, " ह्मणून
ह्मणालेत, परंतु त्यांतील कांहींच आपल्या हातून नहोतां, सर्व जगतास सुख
देण्याचें ऐकीकडेच राहून उलट आपलाच नाश करून घेऊन, मी आपली
प्राणप्रिया असतांही, मला ह्या अमंगळ दुःखनगरींत ठेवून गेलां! मला,
वनांत येऊं नको, ह्मणून ह्मणत असतां, मी आपणास स्त्रीला पतिविरहानें
होणारें दुःख कळविलें, तेव्हां सदय होऊन मला वनांत येण्याची आपण
आज्ञा दिलीत. ह्मणून माझें येणें आपल्यास संमतच होतें. इतकें असूनही
पुढें आपणावर असा प्रसंग येईलच असें मला स्पष्ट सांगतेत, तर आपलें
वचन मीं शिरसा मान्य केलें असतें. प्राणनाथ! माझे ज्ञाताज्ञात सर्व
कांहीं अपराध मला एकदां क्षमा करून मजशीं अमृताहूनही मधुर
असें भाषण करा. आपल्या मधुरतर भाषणाशिवाय मला कोणाचेंही
बोलणें आवडत नाहीं. वसिष्ठासारख्यांनीं सांगितलेलें आपलें दीर्घायु व
शतानंदांनीं कथन केलेलें माझें महद्भाग्य कोणीकडे? आणि आपलें हें
पंचेचाळीसाच्या आंतील वय व माझे हें वैधव्य कोणीकडे? हाय! हाय!
त्या सत्पुरुषांची वचनें खोटीं ठरविण्याचेंही अतुल सामर्थ्य माझ्या
ह्या फुटक्या ललाटपट्टांत आहे! अहो, एकदां नेत्रें उघडा, ह्मणजे ही

शोक करणारी दासी जनककन्याच आहे, असें आपल्यास समजेल, व हिची दया येईल! हे इक्ष्वाकुकुलकमलभास्कर, तुमच्या अस्तानें आतां जगांतील सर्व विद्याकमलिनी म्लान झाल्या ! कला अविकसित राहि- ल्या! गुणगण थंड पडले ! आतां गुणिजनांस सर्वत्र अंधकार भासेल ! अहो, त्यांचे सर्व मार्ग बुजाले! दुष्ट जनांस सर्व मार्ग मोकळे झाले ! प्राणपते, आतां आपण प्रेतशेष होऊन क्षणैकानें चरित्रावशेष व्हालना? हाय ! हाय ! हे हृदयंप्रिया, आपल्या विशाल वक्षःस्थळीं दयामृताचा सांठा होता, तो आज कोठें आहे? ह्या दुष्ट लंकाधिपाच्या काळजास झोंबणारे भुजंगच काय, अथवा विजयप्रासादचे आधारस्तंभच काय, असे आपले दीर्घ, पुष्ट, कठिण व ज्यांवर धनुष्याची ज्या ओढून घट्टे पडले होते, ते भुज आज कोठें पडले आहेत? हा मन्मानसराजहंसा ! हा वसिष्ठप्रियशिष्या ! हा चापश्रुतिवागदेवीप्राणवल्लभा ! हा दयाघना! हा रघुवंशवल्ल्यंकुरा ! हा पितृवचनसंगीतलुब्धसारंगा ! हा गुणरत्नाकरा! हा सकलजगन्नयनामृतांशो! हा प्रिया ! हा सरस्वतीकंठाभरणा! हा पि- तृमृत्युहेतुवनगमना ! हा कौसल्याहृदयानंदवर्धना ! हा द्विजकुलपोषका! हा विराधखरदूषणमारीचकबंधप्रभृतिदुष्टनिहंत्या ! हा वालिप्राणशोषण कर्त्या! हा भरतवत्सला ! हा शृंगवेराधिपप्राणाधिकप्रिया ! हा भगवद्- भारद्वाजात्रिशरभंगसुतीक्ष्णागस्त्यविश्वामित्रदत्ताशीर्वादा ! हा सुग्रीवराज- साहाय्या ! हा मारुतिशौर्यगुणग्राहका ! हा बिभीषणाश्रया ! हा सरला- न्तःकरणा ! हा अयोध्याजनचकोरचंद्रा! रामचंद्रा ! आतां मीं काय करूं? काय ह्मणून आठवूं? सहस्त्रशः आपले हेतु पूर्ण केल्याशिवाय लोकांतरीं कसे गेलां? अहो बिभीषणास लंकाधिपति करणार,ह्मणून सांगितलेंत,त्यास पुरे दाहा दिवस तरी लोटले काय ! काय अद्यापि दशमुखाच्या हातून त्याचे कंठनाळ चरचर चिरण्यासारखे पूर्ण अपराध झाले नाहीं ? कीं अजून माझें पाप शिलक आहे ? किंवा लोकांचा ताप निवारण होण्याचा समय अद्यापि प्राप्त झाला नाहीं ? आतां आपली मनोरमा कृति मीं कोठें बघावी! हाय !हाय ! अमृतासम आपलें भाषण कोठें ऐकावें? आज जगांतील कृपासागर शुष्क झाला ! गुणप्रासादनगरीस आग ला- गली ! तेजोराशीचा अस्त झाला ! विद्यापर्वताचें कालाशनीनें पिष्ट- केलें ! सौंदर्यखाण ढांसळून अनर्थ घडला ! वसुंधरा विधवा झाली ! साधु-

जन उदासीन झाले ! आज कल्पवृक्ष मोडून पडला ! इत्यादि अनेक प्रकार आपल्या एकट्याच्या जाण्यानें झाले ! हाय ! हाय ! आपल्या शरीराचे त्या मेल्या दुष्ट राक्षसांनीं फार फार हाल केले असतील! अहो प्राणप्रिया, लग्नापासून मीं आपल्या आज्ञेशिवाय अद्यापि कांहींही केलेलें नाहीं. तेव्हां आतां मीं ह्या स्वजनरयक्त स्थानीं काय करावें, ती आज्ञा ह्या एका मुखकमलांतून बाहेर येऊं द्या. आपलें दर्शन आतां लौकर होईल, अशा पूर्ण आशेनें एकेक क्षण घालवीत असतां, मध्येंच अशा दर्शनानें मला अपरंपार शोकोदधींत टाकणें हें, प्राणपते, तुह्मांस योग्य कसें दिसतें ! प्रिया, आपल्या पूर्वदृढालिंगनाच्या स्मरणानेंच हें पहा माझें सर्वांग रोमांचित झालें आहे! आपणाला ह्या उष्ण अश्रुजलावांचून मीं येथें कशानें बरें स्नान घालावें? परंतु तें जल तरी नेत्रांत आहे कोठें? प्रियकरा, आतां शोक करणें व्यर्थ आहे. माझें मलाच ह्या स्थळीं सांत्वन करून घेतलें पाहिजे. आपण जिच्याकारितां आपले प्रियप्राण देऊन जीवर अत्यंत प्रेम दाखविलें, तिनेंही आतां आपलें प्राणदानानेंच आपल्यावरील निष्कपट प्रेम प्रकट केलें पाहिजे. अहो, आपलें सर्वच चारित्र जर स्मरणीय आहे, तर मी आतां काय काय ह्मणून आठवून रडूं ! हा दुर्दैवी धनुष्या! येथें कशाला आलें आहेस! त्या वेळेस कांहींच पराक्रम न दाखवितां, ज्यानीं सदा यज्ञोपवीताप्रमाणें आपल्या स्कंधावर तुला वागविलें, त्यांला अशा अवस्थेंत पाहणें तुला बरें वाटतें ना ? ते कधींही तुला भूमीवर ठेवीत नसत, माझ्या हातीं देत. तेव्हां मजकडे तरी कांहीं पाहावें कीं नाहीं? एकूण तूं सर्वदा वांकडें खरें! प्राणनाथ! आपण माझे पंचप्राण. तेव्हां आपण गेल्यावर मी प्राणहीन अर्थात् प्रेत झालें आहें. " हे लंकाधिपते, हे मज्जनकमित्रा, हें माझें प्रेत ह्या शिराबरोबर आतां लौकर दहन कर. मी ह्याच्याबरोबर गमन करणार. " ह्या प्रमाणें ती शोक करीत असतां, तिला पुनः बळकट मूर्च्छा येऊन भूमीवर पडली. इतक्यांत तो खिन्नमनस्क रावण अति महत्त्वाच्या कामाकारितां ह्मणून तेथून निघून गेला. व विद्युज्जिव्हही तें शिर व धनुष्य घेऊन तेथून अदृश्य झाला.

ह्याप्रमाणें सीता देवी शोकस्थितींत असतांही, तेथील बहुतेक दुष्ट राक्षसी तिला लंकानाथाला आतां तरी अनुकूल हो, ह्मणजे तुला कोणत्याही प्रकारचें दुःख अथवा कसलाही शोक कधींही प्राप्त होणार

नाहीं, ह्मणून सांगत होत्याच ! त्यांचें त्या प्रसंगी हें सांगणें, त्या पेटलेल्या तिच्या शोकाग्नीवर तेल ओतणें नव्हे काय ? तरी त्रिजटा तिचें सांत्वन करीत होती. परंतु रामचंद्राकडील खरोखर वृत्त काय आहे, हें तिला पक्कें ठाऊक नसल्यामुळें तत्संबंधानें तिला कांहीं विशेष बोलतां येत नव्हतें ! आतां पुढें हें आपलें जीवित कसें घालवावें, ह्या-चिंतेंत व अनेक संशयांत ती रामपत्नी असतां त्या स्थळीं वारंवार येणारी बिभीषणाची स्त्री सरमा आली. ती येतांच तिच्या येण्यानें आपली चरित्रनायिका पूर्वीं जसा अत्यानंद दाखवीत असे, तसा ह्यावेळीं तिनें दाखविला नाहीं, एवढेंच नाहीं; तर तिनें तिच्यापुढें पुनरपि त्या-लांबलचक शोकाध्यायास प्रारंभ केला! हा विलक्षण विलाप सरमेच्यानें जरी ऐकवत नव्हता, तरी त्यांत ओतप्रोत भरून असलेल्या पतिप्रेमादिकाच्या योगानें तो तिला एकाप्रकारें सुश्राव्यच वाटत होता ! तिनें सीतेला हा शोक व्यर्थ आहे ह्मणून वारंवार सांगून रामलक्ष्मण, मत्पतिसहवर्तमान कुशल आहेत, हें मला ठाऊक आहे, असें कळविलें. आणि अनेक कारणांनीं, उदाहरणांच्या योगानें व प्रत्यक्ष प्रमाणांवरून, रामचंद्राच्या पक्षाचा काय किंवा दुसऱ्याकोणाच्या पक्षाचा काय, असा अकस्मात् कधींही पराभव होणार नाहीं, हें तिला सिद्ध करून दाखविलें. तें शिरःकमल व तें धनुष्य हीं कपटानें कोणीं निर्माण केलीं असतील, असें, सीताबाई, तुमच्या संशयी मनांत अजून कसें बरें आलें नाहीं? अशासारखें बहुतवेळ तिनें तिच्याशीं भाषण करून रामपत्नीचेंही त्यावर उलट शंकांनीं भरलेलें बोलणें ऐकून घेऊन त्याचेंही थोडक्यांत खंडन करून तिचें समाधान केलें. शेवटीं सीतादेवीलाही हा पूर्ण कपटमय प्रकार आहे, असें वाटलें. तिनें सरमेचे आपल्यावर बहुत उपकार आहेत व तूंच मला ह्या शोकसागरांतून अनेकवेळ वर काढिलें आहेस, अशा तात्पर्याचें भाषण केलें तें, श्रोतेहो, आपल्यास विस्तारभयास्तव सांगतां येत नाहीं. नंतर सरमा ह्मणाली "हे ऐका, वाद्यांचे भयंकर ध्वनि! आतां जें मीं कांहीं तुह्मांस सांगितलें त्याला जणूं तीं अनुमोदनच देत आहेत! आतां युद्ध लौकरच होईल. युद्ध ह्मटलें ह्मणजे त्यांत दोन्ही पक्षांचा फार नाश होतो. असा सर्वस्वनाशाचा भयंकर प्रसंग येऊं नये ह्मणून लंकानाथाला, आपणांस पतीच्या स्वाधीन करण्याचा पुष्कळांनीं उपदेश केला ! परंतु हट्टी राजापुढें कोणाचें काय

चालतें ? वृद्ध सासूबाईनींसुद्धां त्यांना काय थोडें सांगितलें ! परंतु नाहींच ते ऐकत!त्याचे माल्यवान्मामा व दुसरे कित्येक वृद्ध मंत्री ह्यांनीं तर उपदेशांची पराकाष्ठा केली. पण ते स्वतःची व आपल्या पक्षाची अत्यंत स्तुति व रामलक्ष्मण व सुग्रीवादिवानर व प्राणनाथाथ ह्यांची अतिशय निंदा,करून त्यांचा आपल्या सैन्याबरोबर एक घटिकाही टिकाव लागणार नाहीं,असें प्रतिपादितात. रामाला तर आमच्यांतील कोणीही एकादावीर केव्हांच यमसदनास पाठवील,असें ते बरळतात!तेव्हां,सीताबाई, आतां कांहींदिवस घनघोर युद्ध झाल्याशिवाय, लंकानाथांसह त्यांचा दुराग्रह अस्तास जाणार नाहीं!"

सीता—मलाही युद्धप्रसंग वाईट वाटतो, पण काय करावें ? कृपा करून आतां युद्धांत काय काय होईल तें मात्र मला वरचेवर कळवीत असा. सरमाबाई,आपले प्राणनाथ बिभीषण शत्रुपक्षास मिळूनही आपल्यास मजजवळ येऊं देतात, हा मंदोदरीबाईचाच मजवर अनुग्रह असेल.

सरमा—सीताबाई,युद्धाचें वर्तमान कळविणें फारच दुःखप्रद काम आहे. तरी जसें मला समजेल व फावेल तसें सर्व वृत्त आपणांस सांगेन बरें. लंकेत रामचंद्र आल्यावर लंकानाथपक्षाकडील लोकांनीं तिकडील सर्व सैन्य वगैरे किती आहे, तें सर्व समजून घेतलें ! त्याप्रमाणेंच रामचंद्रपक्षीय लोकांनींही इकडील सैन्यनिरीक्षण केलें, असें मीं ऐकिलें. इकडील सर्व बारीक सारीक गुप्त गोष्टी प्राणनाथांकडून त्यांस समजतात.ते राक्षसांचीं कपटकृत्यें केव्हांच रामचंद्रांना सांगतात. येथें आल्यापासून त्या सैन्यांत वानररूपानें अनेक वेळ गेलेल्या राक्षसांस ओळखून त्यांना त्यांनीं वानरसैन्याचे दृष्टीस तेव्हांच आणून दिलें. मला वाटतें आतां युद्धप्रसंग अगदीं ठेपलाच. कारण,साम करण्याविषयीं रामचंद्रांकडून तो महामान्य वक्ता वालिपुत्र अंगद महाराजांकडे मी येथें येण्यापूर्वीं नुकताच येऊन गेला. उभयतांची फारच झटापट होऊन, शेवटीं तो वानरश्रेष्ठ क्रोधाविष्ट होऊन स्वसैन्यांत परत गेला.

सीता—सरमाबाई,ह्या युद्धांत प्रियप्राणनाथांला आपल्या प्राणनाथांपासून फारच साहाय्य होणार आहे. प्राणनाथांनीं ह्मटल्याप्रमाणें ह्या लंकेचे बिभीषण लौकरच महाराज होवोत !

नंतर आणखी त्यांच्या कांहीं गोष्टी होऊन सरमा निघून गेली.

प्रियश्रोतेहो, ह्या पुढें सविस्तर कथानक झटलें ह्मणजे त्या दोन सैन्यांमध्यें चाललेल्या भयंकर युद्धाचें वर्णन होय! परंतु हा युद्धेतिहास आपणांस सांगण्याचें कांहींच कारण नाहीं. एक तर तुह्मी जिचें पवित्र चारित्र ऐकत आहां ती ह्या भयंकर कृत्याचें आदिकारण असली तरी तिचा खुद्द ह्या संग्रामांत कांहीं एक संबंध नाहीं. दुसरें, अमक्या वीरानें अमुक वेळांत अमुक लोक मारिले, अमुक पक्षांत जिकडे तिकडे हाहाकार उडाला! स्त्रिया अनाथ होऊन वक्षःस्थळें बडवून अनिवार्य शोक करूं लागल्या! अमुक पक्षांत जयघोष झाला! अशा सारखेंच सांगत बसावयाचें! तिसरें, आमच्या लोकांनीं ह्या युद्धकथा आतां त्वरित विसरल्या पाहिजेत. कारण हातांत शस्त्र धरण्यासारखे भयंकर प्रसंग स्वराज्यांतच यावयाचे, पण सध्यां ह्या अपवित्र प्रसंगांतून ईश्वरानें कृपाळू होऊन आह्मांस सोडविलें आहे! सध्यांचे आपले राजे फार फार दयाळू आहेत. खडतर शस्त्रादिकांनीं आमच्या अत्यंत कोमल हस्तांस लेशही इजा होऊं नये ह्मणून, व " न धरीं शस्त्र करीं मीं, गोष्टी सांगेन युक्तीच्या चार," ही जी भगवत्प्रतिज्ञा, प्रत्यक्ष त्याच्या हातूनही पूर्ण झाली नाहीं, ती साधारण मनुष्याचे हातूनही पूर्ण करण्याची त्यांनीं जबाबदारी घेऊन, ह्या युद्धप्रिय भारतवर्षांतील लोकांकडून नुकताच शस्त्रन्यास करविला आहे! असो. हें रामरावणयुद्ध फारच भयंकर झालें. असें अद्यापि पृथ्वीवर कधींही झालेलें नाहीं, असें ह्मणतात! दोन्ही पक्षांकडे मोठमोठे प्रबळ योद्धे व अगणित सैन्य होतें. त्यावेळीं लोकांस फार लांब दिसत असे, असें दिसतें. मग आ[illegible]ंच्याप्रमाणें कांहीं तरी साधनांच्या योगानें तें दिसो, किंवा दृष्टीचें सामर्थ्य वाढविण्याची एकादी विद्या त्यांस माहीत असो, अथवा स्वाभाविक तशी दृष्टीची शक्तीच असे. जसे रामपक्षांत राम, लक्ष्मण, हनुमान, सुग्रीव, बिभीषण व त्याचे चार सेवक, अंगद, जांबुवंत, गज, नल, नील, द्विविद, गवय, कुमुद, पनस, केसरी, सुषेण, प्रजंघ, रभस, गंधमादन, तार, ऋषभ, मैंद, रंभ, शरभ, अनुप्रस्थ, सूर्यानन, पावकाक्ष, प्रसभ, सुपार्श्व, ज्योतिर्मुख, हरिलोम, गवाक्ष, विनत, हर, इत्यादि अनेक वीर होते. तसेच रावणपक्षांतही रावण, इंद्रजित, कुंभकर्ण, प्रजंघ, जंबुमालि, शत्रुघ्न, विरूपाक्ष, तपन, विद्युन्माली, कुंभ,

निकुंभ, प्रघस,प्रहस्त, दर्मुख, ब्रह्मशत्रु, महापार्श्वे, महोदर, आग्नकेतु, यज्ञकोप, वज्रदंष्ट्र, त्रिशिरा, रभस, सुप्तघ्न, धूम्राक्ष, विद्युज्जिव्ह, शार्दूल, सरण, विकट, शुक, दुर्धर्ष, सूर्यशत्रु, नरांतक, देवांतक, महानाद, मकराक्ष, द्विजिव्ह, यूपाक्ष, अतिकाय, शोणिताक्ष, वज्रमुष्टि, अशनिप्रभ, असे हजारों नांवें घेण्यासारखे योद्धे होते. ह्यांतील अनेकांच युद्धप्रसंग वर्णनीय झाले ! एकेक वीरानें लक्षगणति लोक मारले, असे उभय सैन्यांत बहुत सेनानायक होते. रामपक्षाकडे रामचंद्र, लक्ष्मण, बिभीषण व त्याचे चौघे अनुयायी हेच काय ते धनुष्यबाणांनीं व शस्त्रास्त्रप्रयोगानें युद्ध करणारे होत. बाकी सुग्रीवादि सर्व वानरवीर मोठमोठ्या शिळांनीं, पर्वतशिखरांनीं व वृक्षांच्या योगानें,शत्रूंस ठार करीत. कधीं कधीं शत्रूंचीं आयुधें व त्यांचें पडलेले रथ वगैरे घेऊन त्यांनींच युद्ध करीत ! राक्षसपक्षाकडील आयुधांचीं नांवें—शूल,पट्टिश, खड्ग, परिघ, धनुष्य, बाण, परशु,गदा, कुंतल,तोमर, त्रिशूल, मुसळ, भाला, मुद्गर,ढाल, प्रास,गोफीण, अशाप्रकारचीं होतीं. ह्या पक्षांत अस्त्रज्ञही बहुत लोक होते.हें युद्ध अनेकच दिवस चाललें, असें जरी खात्रीनें सांगतां येत नाहीं,तरी तें चैत्र महिन्यांत झालें व निदान अठरा दिवस तरी चाललें असावें,असें वाटतें. ह्या युद्धांत लक्षावधि प्राण्यांचा चकाचूर उडविणारे झटले ह्मणजे,राम लक्ष्मण,हनुमान्, सुग्रीव,अंगद तसेच रावण, इंद्रजित, कुंभकर्ण हे होत. रावणपुत्र इंद्रजित हा मंत्रविद्येंत मोठा पटाईत असल्यामुळें उत्तम अस्त्रज्ञ होता. त्यानें लक्षावधि वानर मारून त्या सैन्याचे केवळ पंचप्राण जे रामलक्ष्मणादिक ह्यांसही अगदीं निश्चेष्ट ह्मणजे केवळ मृतप्राय करून सोडले होते. कुंभकर्णानेंही अगणित वानर मारून त्यांच्या रक्तांच्या नद्या वाहविल्या ! क्रोधाविष्ट रावणानें रामचंद्राच्या बरोबरीनेंच पराक्रम केला. ज्या इष्टकार्याथे इंद्रजित व दशानन एकान्तांत हवन करीत होते, त्यांस जर बिभीषणाच्या व त्याच्या स्त्रीच्या सांगण्यानें वानर अपरिहार्य विघ्न न करते,तर रामपक्षाचाच पराभव होऊन,जगांत "जिकडे धर्म,तिकडे जय," असा जो दृढ ग्रह होऊन गेला आहे, त्याला मोठाच अपवाद,किंबहुना त्या ग्रहाच्या विरुद्ध नियमच होऊन राहिला असता ! प्रथमतः इंद्रजितानें युद्धसागरांत शिरून जेव्हा तो खळबळून टाकि-

ला व रामलक्ष्मणांस बहुतवेळ मृतप्राय करून वानरसैन्यांत सर्वत्र भीति पसरून टाकिली होती, तेव्हां रावणाच्या आज्ञेनें विमानांतून त्रिजटेकडून सीतेलाही ती भयंकर रणभूमि दाखवून तिला पुनः एकदां शोकव्याकुल केलें होतें. पुढें एका प्रसंगीं ह्या मायाविशारद रावणपुत्रानें युद्धांत हुबेहूब सीता दाखवून तिचा त्यानें गळा कापिला व रामलक्ष्मणांस व सर्व वानरमंडळीस कांहीं वेळपर्यंत दुःखनिमग्न केलें होतें. परंतु बिभीषणानें त्यांतील खरें काय तें सांगून त्याचें समाधान केलें. एकदां ह्या मेघनादानें ( इंद्रजितानें ) लक्ष्मणास विगतप्राण केलें होतें! त्यास व दुसऱ्या कित्येक वानरांस सुषेणाच्या आज्ञेनें मारुतीनें अगम्य अशा स्थानाहून आणलेल्या अमृतसंजीवनी ओषधीनें सजीव केलें! हा त्या काळच्या अनेक चमत्कारांपैकीं एक मोठा चमत्कार ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. अशा ओषधी आतां कधीं मानवाच्या हस्तगत होतील त्या होवोत!

रावणमरणाचे दिवशीं इंद्रानें रामाकरितां आपला दिव्यरथ सारथी मातलीसह पाठविला होता, असा इतिहास आहे. बिभीषण शत्रुपक्षास मिळाल्यानें आपली सर्वप्रकारें हानि झाली, असें रावणास वाटून इंद्रजिताच्याही अनुभवास आलें. ह्या उभयतांनीं युद्धप्रसंगीं बिभीषणाच्या ह्या कृत्याबद्दल त्याची फारच निर्भर्त्सना केली! रावणपक्षीय लोकांनीं जर लक्षावधि वानर मारून विलक्षण पराक्रम केला ह्मणून कथन केलें आहे, तर त्या पक्षाचा पराभव करून ज्यांनीं विजय संपादन केला, त्या रामपक्षाकडील रणशूर योद्ध्यांनीं त्यांच्यापेक्षां किती विलक्षण पराक्रम केला असेल, हें निराळें सांगणें नकोच. असो. शेवटीं रामचंद्रानें रावणास मारिलें. तेव्हां जिकडे तिकडे शांतता झाली. फार तर काय, पंचमहाभूतेंही प्रसन्न झालेलीं लोकांस भासलीं. जिकडे तिकडे रामपक्षाचा जय झाला ह्मणून आनंदघोष झाला. लक्ष्मणानें इंद्रजितास, व रामचंद्रानें कुंभकर्णास परलोकाप्रत पोंचविलें, त्यावेळेसही कांहीं अंशीं अशाच तऱ्हेचा वानरपक्षांत आनंद पसरला होता! लंकाधिपाच्या पक्षांतील दुसरे हजारों वीर विरुद्धपक्षांतील कोणकोणत्या योद्ध्यांनीं मारिले, त्यांचीं नांवें ह्या प्रसंगीं सांगावीं, असें एकदां मनांत येतें, परंतु विस्तारभयास्तव तें सारें मनच्यामनांत ठेवावें लागत आहे.

रामचंद्राच्या हस्तें तो अत्यंत पराक्रमी, महान् तेजस्वी, अतुल वै-

भवशाली व ज्यास कधींही पराभव माहीत नव्हता, असा तो पापात्मा लंकापति दशानन मरतांच त्या घोर संग्रामाचा अंत झाला. ती लंकानगरी अगदीं उद्ध्वस्त व उद्विग्न दिसूं लागली. इंद्रजित मेल्यावर लगेच तिला शत्रुपक्षाकडील लोकांनीं आग लाविली होती! अपरिमित राक्षसस्त्रिया विधवा होऊन दीनवाण्या रडत बसल्या. रणभूमीकडे कोणाच्यानें पहावेना. तेथें सर्व रक्ताचा चिखल व छिन्नविच्छिन्न अवयवांचे व मोडलेल्या रथादिकांचे जिकडेतिकडे भयंकर पर्वतप्राय ढीग पडलेले होते! नानाप्रकारचीं जनावरें व भयंकर पक्षी आपलें काम यथेच्छ करीत होते! त्या स्थानीं हजारों स्त्रिया हृदयद्रावक शोक करीत होत्या. कोणी आपल्या प्रियाचा तुटलेला एकादा अवयवच सर्व देह समजून त्यास आलिंगनादि देऊन हृदयविदारक विलाप करीत होत्या. कोणी तसेच अर्धेमुर्धे अवयव शोधीत असतां, त्या प्रेतराशींवर पडत होत्या! कोणी रावणाला नानाप्रकारें शिव्या देत होत्या! पतिव्रता रावणस्त्री मंदोदरीनेंही त्या संग्रामस्थळीं येऊन प्रियभर्त्याचें मृतशरीर जवळ घेऊन त्याचे नानाविध पराक्रम, त्याच्या संगतीनें भोगिलेलें अपार सुख, त्याचें अतुल वैभव, केलेलें धर्माचरण, व त्यास सीतामुक्तीकरितां बहुतांनीं व आपण केलेला उपदेश आठवून, आपल्या विलापरवांनीं सर्वांस रडावयास लाविलें. व त्याच्या दुसऱ्याही हजारों स्त्रिया मोठमोठ्यानें आक्रोश करीत होत्या. तिच्या सुनाही मोठमोठ्यांनीं न ऐकविण्यासारखे हंबरडे फोडीत होत्या. ह्मणून ती रणभूमि चालतेच काय! किंवा बोलतेच काय! किंवा रडतेच काय! किंवा सर्व जगत् भक्षणच करिते काय! किंवा करुणारसाची माताच काय? अशी वाटत होती! असो.

रावणाचें बिभीषणाच्या हातून यथाविधि दहन होऊन क्रियाकर्मान्तर झाल्यावर बिभीषणास राज्याभिषेक होऊन त्यास लंकाधिपत्य मिळालें. त्या समारंभांत लक्ष्मण व सर्व वानरमंडळी व राक्षसप्रजा होती. रावण मरणपावल्यावर चौथे पांचवे दिवशीं हा समारंभ झाला. नंतर सात आठ दिसांनीं रामाज्ञेनें आमच्या चरित्रनायिकेस शोकविमुक्त करण्याकरितां त्या अशोकवनिकेंत मारुति गेला. त्यावेळेस तरुतळीं बसलेली ती तापसी रामभार्या, एकमेका विरुद्ध अशा अनेक मनोभावांनीं क्षणक्षणांत विलक्षण दिसत होती. कांहीं कारणानें बिभीषण-

पतीस रावणवधाचें वृत्त तिला कळविण्यास यावयास सांपडलें नाहीं, ह्मणून प्रियपतीच्या सुखरूपतेविषयीं साशंक होऊन ती नानाप्रकारच्या कुतर्कांत निमग्न होती. इंद्रजितादि महापराक्रमी वीर, लक्ष्मणभावोजी व दुसरे योद्धे यांनीं, जसें काय आपाआपले वांटेच समजून, परलोकीं पाठविले असून, प्राणनाथांकडून हा पापी अद्यापि जीवंत राहणार नाहीं, असें तिच्या मनांत वारंवार येत होतें. तरी दशानन मृत्यु पावला ह्मणावा, तर तत्क्षणीं बिभीषणास राज्याभिषेक झाल्याचें सुवृत्त मला अजून सरमाबाईकडून अथवा कोणाकडून कसें कळत नाहीं? असेंही ती उद्गार काढीत होती. बरें बिभीषणांस राज्यपद मिळालें ह्मणावें, तर पांच सात दिवसांपूर्वी तो राक्षसीय जयवाद्यांचा ध्वनि कोठून कर्णीं पडला बरें? जर त्या नीतिभ्रष्ट दशाननाचा विजय सूचविणारीं तीं वाद्यें वाजत होतीं असें ह्मणावें, तर तो निर्लज्ज माझ्याकडून कठोर वाणी वदवावयास किंवा प्राणत्याग करवावयास ह्यास्थळीं आल्यावांचून कसा राहता? किंवा ह्या माझ्या रक्षणकर्त्या राक्षसी आतांशा मौनव्रत कां धरत्या? पण सरमाबाई येत नाहींत व त्रिजटाही कोठें दिसत नाहीं, ह्यावरून मला जरी प्रणनाथाच्या विजयाविषयीं बळकट संशय येतो, तरी त्या सदयान्तःकरण स्त्रिया मंदोदरीवर मोठा दुःखपर्वत कोसळल्यामुळें त्या साध्वीकडे गेल्या नसतील कशावरून? ही शंका दूर होत नाहीं. विजयी झालेले प्राणनाथ मला आतां भेटतीलच, ह्या त्यांच्या दृढ समजुतीमुळें मंदोदरीबाईकडे जाणें त्यांना इतकें कठिण वाटलें नसेल. परंतु प्राणनाथाचा जर विजय झाला असता, तर ते तरी ही वार्तारूप अमृतधारा माझ्या अत्यंत बुभुक्षित कर्णांत अजून कशी नपाडते बरें? ज्यापेक्षां आतां वाद्यध्वनि ऐकूं येत नाहींत, त्यापेक्षां युद्ध संपलें, हें तर खचित होय. काय रावणाचे अगोदर बिभीषणाचा अंत झाला? व त्यामुळें लंकाधिपति कोणास करावें, ह्या चिंतेत प्राणनाथ असून विचारी सरमा कोठें दुःखार्णांत जळत आहे! असें असेल तर मात्र हें जीवित मला असह्य झालें आहे. तो दुष्ट निर्लज्ज युद्धांत मरण पावला, बिभीषण जीवन्त आहेत, व प्राणनाथाचा जय झाला, ह्या जरी सर्व गोष्टी खऱ्या असल्या तरी मजविषयीं प्राणनाथांच्या मनांत एखादी कुकल्पना आली नसेल तरी कशाव-

रून!व त्याचमुळें अजून मला ते आपलें पवित्र दर्शन देत नसतील! अशा सारख्या अनेक विचारांनीं व संशयांनीं तिचें अंतःकरण अगदीं व्यग्र झालें होतें, इतक्यांत हजारों राक्षसांस छेदणारा, आपल्या स्वामिनीच्या हृदयभूमीवर दंगा करणारे हजरों कुतर्क, संशय इत्यादिकांस छेदण्याकरितां तो सुग्रीवाचा प्रधान पुढें येऊन "हे अयोध्यास्वामिनि, हा आपला अत्यंत नम्र सेवक केसरिपुत्र हनुमान् कृतकार्य होऊनत आपल्या चरणकमळीं नमन करीत आहे," असें ह्मणाला.

हें वाक्य तिच्या कानीं पडतांच ती अत्यंत हर्षानें रोमांचिततनु होऊन वर पहाते तों तो अमृतरसाचा देहच काय, अथवा आनंदाचा ठेवाच काय, अथवा प्रेमातिशयाचा उगमच काय, अथवा सन्मनोरथाचा सारथीच काय, असा तिला दिसला! तेव्हां ती ह्मणाली. "प्रियदर्शना, उदारचरिता, मारुते, तुझें कल्याण असो! तुझें फार दिवसानीं दर्शन झालें. मारुते, प्राणप्रियाकडील काय वृत्त आहे तें सर्व आपल्या मधुरवाणीनें मला अगोदर सांग. तूं येथून गेल्यापासून तों रावणपुत्र इंद्रजित मरण पावला एथपर्यंतचें सर्व वृत्त बिभीषणपत्नीकडून मला संक्षेपतः कळलेंच आहे. त्यानंतर कांहीं एक वर्तमान समजलें नसल्यामुळें अनेक कुतर्कांनीं मी व्यग्र झालें आहें. तर मजवर कृपा कर." नंतर मारुतीनें हात जोडून रावणवध होऊन बिभीषणास राज्याभिषेक झाला, एथपर्यंत सर्व वृत्त सांगितलें. तें सांगत असतां तो मधून मधून त्यावर अपला अभिप्रायही देत असे. दशाननाच्याही पराक्रमाविषयीं फारच स्तुति करून तो ह्मणाला, "रामचंद्रांच्याच हातून ह्मणून रावणाचा वध झाला. त्यांना तरी अशा दुष्टाचा नाश करावयास आपल्यावरील अत्यंत प्रेम हेंच कारण होय. व असें त्यांचें आपल्यावर अप्रतिम व अकृत्रिम प्रेम असावयास आपल्या अंगीं असणारे लोभनीय गुणच हेतु होत. त्यांतही आपलें कडकडीत पातिव्रत्य प्रमुख होय. तेव्हां पर्यायानें आपणच त्याचा वध केला, असें झालें. आणखी मला असें वाटतें कीं, आपण उभयतांनीं जन्मास येऊन पृथ्वीवर महत्कृत्य करावयाचें तें केलें. रावणवधापेक्षां दुसरें कांहीं कठिण कार्य जगांत उद्भवेल किंवा असेल असें क्षणभरही मनांत यावयास नको. स्वामिनि, बिभीषणमहाराजांचें जर आह्मांस साहाय्य नसतें, तर आमचाच विजय झाला असता, असें

ह्मणणें खचित साहसाचें झालें असतें. स्वामिनि, आपण जशा रामचंद्रदर्शनाविषयीं, तसेच तेही अपल्या दर्शनाविषयीं, फार उत्सुक झाले आहेत. तो दर्शनसमारंभ बिभीषणमहाराजांच्या द्वारें आतां लौकरच होईल. आपण आतां अयोध्येंतच आहां असें समजा. लंकेंत येतांच व नंतर रावण मरतांच लगेच आपल्या दर्शनास यावें असें माझ्या मनांत अनेकदां आलें होतें, परंतु रामाज्ञा मला नसल्यामुळें मी सर्वथा पंगु होतों. आज आपल्यास रामचंद्रांचा विशेष निरोप आहे, असें नाहीं तर, "रावणवधासारखें दुर्घट कार्य परमेश्वरकृपेनें शेवटास गेलें: आतां तुझी भेट लौकरच होईल," एवढाच आहे. वास्तविक पहातां रावणवध होतांच मला आपल्याकडे त्यांनीं पाठवावयाचें होतें, परंतु इतके दिवस विलंब करण्याचें त्यांचें कारण कांहीं असलें तरी मला तें असें असावेंसें वाटतें कीं, आपल्या अत्यंत आतुरतेवर कांहीं निग्रह करावा, हें त्यांच्या मनांत आलें असेल!" हें सर्व एकून रामपत्नीच्या नेत्रांवाटे अनेक भावदर्शक अश्रुधारा खळखळां वाहूं लागल्या व ती अगदीं स्तब्ध झाली. बराच वेळ गेला तरी आपली स्वामिनी कांहीं बोलत नाहींसें पाहून, तो रामसेवक विस्मयाभिभूत होऊन म्हणाला, "आपलें हें मौन पाहून मला फारच वाईट वाटतें. तर अशा मौनव्रताचें कारण समजुन घेण्याविषयीं हा दासजन तत्पर आहे." "प्रिय मारुते," सीता ह्मणाली, "अत्यंत कठिण जें रावणवधरूप कर्म तें शेवटास नेल्याचें वृत्त तूं मला ऐकिविलेंस तेणें करून मला अत्यानंद झाला आहे, पण त्या महासाध्वी मंदोदरीकडे मन गेलें ह्मणजे फार वाईट वाटून अंतःकरण करपून जातें! आतां प्राणप्रियाचें दर्शन होणार ह्मणून जरी फार हर्ष होत आहे, तरी त्यांनीं दर्शन देण्यास इतका दिनावधि लाविला, त्यामुळें मनांत येणाऱ्या कुभावनांनीं व ज्यांना त्या कपटमय हरिणामागें लावून जें बोलूं नये तें बोलून ज्यांच्यावर मीं भलताच निंद्य आरोप केला, व ज्यांना युद्धासारख्या भयंकर खटाटोपांत पाडण्यास मींच सर्वप्रकारें कारण झालें, त्या उदारधी बंधुद्वयापुढें हें मुख न्यावें लागत आहे ह्मणून, एका प्रकारें फार उदासीनताही वाटते. आणखी ज्यांच्या साहाय्यानें माझा शोध लागून अगाध सागरांत सेतु बांधिला गेला व रावण पंचत्वाप्रत पोंचला,

त्या वानरलोकांतील अति बुद्धिमान्, विद्वान्, पराक्रमी, व नम्र असा तूं मजपुढें असून, ज्याहून अत्यंत संतोषप्रद दुसरें वृत्तच नाहीं असें वर्तमान सांगत असतां, तुला तुझ्या योग्यतेप्रमाणें बक्षीस द्यावयास मजपाशीं प्रेमाश्रुजलावांचून कांहींच नाहीं, म्हणून तर फारच विषाद होत आहे! आणखीही लक्षावधि राक्षसस्त्रिया विधवा होऊन शोकाकुल असतां मला नानाप्रकारें दुःशब्दांनीं ताडीत असतील, ह्याविषयींही मला कमी वाईट वाटत आहे असें नाहीं. इत्यादि विचार मनांत घोळत असल्यामुळें मी कांहीं बोललें नाहीं." नंतर मारुति ह्मणाला, "अशासारख्या उदार विचारांनीं भरलेलें अंतःकरण ज्यांचें आहे, अशा आपण आमच्या स्वामिनी, जणू कामधेनूच, असतां ह्या दासानें आपल्या आज्ञारूप बक्षीसापेक्षां आणखी दुसरी कसली वांच्छा करावी बरें! एखाद्या अत्यंत मूल्यवान रत्नखचित भूषणाहून आपल्या रसभरित भाषणाची व प्रेमाची मी निसंःशय अधिक योग्यता मानितों. मजविषयीं आपल्या हृदयांत प्रेमवृद्धि उत्पन्न होणारी आपली सेवा मजकडून घडली ह्मणजे तेंच माझें खरें बक्षीस होय. प्रेमापासून बक्षिसाची उत्पत्ति ना! मग शाहाण्यानें सर्व वृक्षाची इच्छा करावी किंवा त्यापासून होणाऱ्या हिरव्या दुध्यों फळांतच संतुष्ट राहावें! असो; आतां लौकरच लंकाधिपति बिभीषणमहाराज रामचंद्रांच्या आज्ञेनें आपल्यास चिरविरहित प्रियप्राणेशाच्या दर्शनार्थ न्यावयास येतील! आज रामचंद्राच्या दर्शनानें आपले रडूनरडून सुजलेले नयन तृप्त होतील. आज आपले कर्ण त्यांच्या मधुर भाषणानें भरून जातील. आज आपले सर्व क्लेश परिहार होतील! त्या दुष्ट राक्षसेंद्राच्या वारंवार दर्शनानें आपल्या नयनांस किंवा त्याच्या ह्या नगरींत राहून सर्वांगास आलेली अपवित्रता नेत्रांतून वाहणाऱ्या प्रेमाश्रूंनीं किंवा भेट होतांच अनेक मनोभावनांनीं सर्वांगीं आलेल्या विपुल घर्मोदकानें धुवून जाईल! आतां त्यांस आपला कांहीं निरोप असेल असें वाटत नाहीं. तरी आपल्या दर्शनार्थ त्या अगदीं आतुर झाल्या आहेत ह्मणून मी सांगतों. अहो सीतादेवी, ज्यांनीं आपल्यास बहुतप्रकारें पीडा दिली, त्या ह्या दुष्ट राक्षसी येथें दिसत आहेत! तर ह्यांचें पारिपत्य करण्याविषयीं मला आपली आज्ञा व्हावी." हें ऐकतांच ती ह्मणाली "मारुते, त्यांचे सर्वापरा-

य क्षमा करणें, हेंच त्यांना कडक पारिपत्य होय. धन्याचे आज्ञेप्रमाणें किंवा त्याचे इच्छेला अनुकूल असें सेवकांचें आचरण असतें. सेवक ह्मणजे एक स्वामीच ! सेवकाला स्वतःचें शील नाहीं, मत नाहीं, बाईट बरी निवड नाहीं, ह्मणून अशा परावलंबिनी राक्षसींस शिक्षा करणें योग्यनाहीं. ह्यांचा चालक किंवा आत्माच जो दशानन ह्यास आपण देहान्त शिक्षा दिलीच आहे. तर ह्यांस दयादृष्टीनें पाहाणें, हेंच आपलें खरें कर्तव्य होय." ह्याभाषणाची मारुतिरायानें फार स्तुति करून तिला हस्तांजलि जोडून तिचा निरोप घेऊन गेला.

नंतर लौकरच त्या स्थळीं रावणबंधु बिभीषणमहाराज रामभार्येस रामचंद्राच्या दर्शनार्थ नेण्याकारितां मोठ्या थाटानें आले. बरोबर मोठमोठी मानकरीमंडळी होती. ज्यांत महाराजपत्नी सरमा व तिची कन्या कला ह्या प्रमुख आहेत असा आर्यमहिलासमाजही मोठा होता. अनेकविध वाद्यें होतीं. हा नूतन लंकाधिपति सीतेजवळ जाऊन मोठ्या नम्रतेनें वंदन करून करद्वय जोडून ह्मणाला, "अहो सीताबाई, हा रामसेवक आपल्यास रामदर्शनार्थ न्यावयास आला आहे. अगोदर आपणांस ह्या स्त्रिया रणयज्ञाचें जणूं अवभृतस्नान घालण्याकारितां सर्व तयारी करून आल्या आहेत, तर त्यांची ही [illegible] पूर्ण करावी." नंतर सींत राज्ञी व राजकन्या अग्रेसर आहेत अ[illegible] अनेक स्त्रिया पुढें झाल्या. त्यांनीं सुस्वर मंगल गीतें गाऊन अनेकविध सुगंधिद्रव्यें तिच्या मलिन पण कोमळ अंगास लावून तिला स्नान घातलें. रघवेिळस, पतिविरहानें स्त्रिया अशा कृश होतात, असे उद्गार कित्येक स्त्रियांनीं काढिले. तिच्याकडून मूल्यवान वस्त्रें परिधान करवून सुंदर अलंकार लेवविले. नंतर जी आपल्या अंतःकरणाप्रमाणें स्वच्छ व शुभ्र वस्त्र नेसली असून अंगावरही जिनें तशाच रंगाचें एक महावस्त्र घेतलें आहे, व काळे लांब लांब केश पृष्ठभागावर सोडले आहेत, व जी अत्यंत कृश दिसणारी तरी तेजानें विलक्षण शोभणारी ह्मणून शुक्ल प्रतिपदेची चंद्रकलाच काय ! किंवा आज पातिव्रत्यविद्या अगदीं पूर्ण झाली ह्मणून गुरुगृहीं स्नातच काय अशी, व एका अंगाला सरमा व दुसरीकडे कला असून जिचे त्यांनीं हात धरिले आहेत ह्मणून, पूर्वीं रामलाभाच्या संशयानें कृश झालेली आणि विजया व यशोदा ह्यांचे कर धरून त्यां-

ऱ्यावर भार टाकणारी त्या सविस्तर स्वयंवरप्रसंगाची स्मृति देणारी अशी ती सीतादेवी पुढें आली. तेव्हां रामचंद्राच्या व सीतादेवीच्या नांवाची सर्वांनीं विजयद्योतक मोठी गर्जना केली. नंतर तिला सर्वांगसुंदर अशा पालखींत बसवून मोठ्या थाटानें तिची मिरवणूक काढीत रामलक्ष्मण, सर्व वानरमंडळीसह ज्या प्रदेशीं होते तेथें, सर्व लोक यावयास निघाले. मार्गांत व बरोबर इतकी कांहीं गर्दी होती कीं, पाय ठेवण्यासही कोठें जागा नव्हती!

नंतर तें नियमित स्थळ जवळ आलें असावें असें तिला वाटून त्या त्रिभुवनसुंदरीनें शिबिकेंतून उतरून पायानेंच जाण्याविषयीं आपली इच्छा दर्शविली. तेव्हां जेथें वाऱ्याचीही गति कुंठित झाली होती, अशा त्या गर्दींत हजारों राजचिन्हांकित राजाधिकारी व स्वतः बिभीषण महाराज पुढें असून लोकांस फार पीडा देऊन मोठ्या श्रमानें रामपत्नीसाठीं तो समूह दुभंग करीत असतां, लोकांचीं अगदीं दाणादाण होऊन गेली! लोक एकमेकांवर पडूं लागले, पुढच्यालापाठीमागचा लोटूं लागला! लहान लहान अगदीं गुदमरून गेले! कोणाचीं वस्त्रें फाटून गेलीं. कोणाच्या डोक्यांचीं उष्णीषें पडून गेलीं व कोणांचीं पायांतून पादत्राणें निघून गेलीं! अशावेळीं शेवटीं शेवटीं रामचंद्राची तिकडे दृष्टि गेली. त्यास तो सर्व प्रकार पाहून फार राग आला. तो तेव्हां मोठ्यानें ओरडून बिभिषणास जें ह्मणाला तें, श्रोतेहो, ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. तें हें कीं-" बिभिषणा, जनकनंदिनीस यावयास मार्ग मिळावा ह्मणून ह्या मंडळीस असा त्रास दिलेला मला अगदीं आवडला नाहीं. मला हे लोकही प्रियच वाटतात. लंकेशा, स्त्रिया मोठ्या सुंदर मंदिरांत एकान्तांत असल्या, किंवा त्यांचा मूल्यवान् व पायघोळ पोशाक असून आणखी त्यांचें मुख किंवा नखही कधीं दृष्टीस पडलें नाहीं, किंवा त्या अन्तःपुरांत सातां पडद्यांपलीकडे असल्या किंवा एखाद्या दुर्भेद्य अशा दुर्गांत ( किल्ल्यांत ) राहत असल्या, ह्मणजेच त्या समर्याद, विनयवती, किंवा गुणांच्या खाणी असतात, असें समजणें भ्रांतिमूलक होय. त्या कोठें किंवा कोणत्याही स्थितींत असोत, त्यांचें अन्तःकरण निष्कपट असून आचरण सर्व प्रकारें निष्कलंक असलें, ह्मणजे झालें. त्याच खऱ्या गुणशीलवती होत. तशांत जेथ सभ्य लोक असतात, अशा लहान मोठ्यास समारंभांत किंवा जेथें आपला पति आहे, अशा

स्थलीं तर गर्दीतूनही यावयास त्यांना कांहींच प्रत्यवाय नसावा."

नंतर रामाज्ञेनें सीतादेवीस बिभीषण राजानें त्यांच्या संनिध आणिली. उभयतांची दृष्टि एकमेकांवर जातांच त्यांच्यामध्यें प्रीति, अत्यानंद, दुःख, यांसारखे समान, आणि दया, आश्चर्य, विस्मय, व लज्जा, संकोच, भय, पूज्यभाव, इत्यादि असमान मनोभाव व स्वेद, रोमांच, नयनाश्रु इत्यादि उत्पन्न होऊन त्यांच्या योगानें त्या पतिपत्नींची जी स्थिति झाली, ती स्पष्ट करण्यास पृथ्वींतील कोणत्याही भाषेंतील शब्द समर्थ होणार नाहींत! अगोदर कोणीं काय बोलावें, हें प्रथमतः उभयतांनीं मनांत योजून ठेविलें होतें तरी एकासही सुचेना! तेव्हां एवढी मोठी गर्दी असूनही तेथें कांहीं वेळ अगदीं सामसुम झालें! सर्वांचे डोळे व कान त्या दोन मानवरत्नांकडे लागले! नंतर रामानें तिला जवळ बसविलें व सद्गदित स्वरानें म्हटलें, "प्रिये, तूं ओळखतांसुद्धां येत नाहींस! किती तरी कृश झालीस ही!! ही एक तुझी कृशता तुजविषयीं मला काय बरें सांगत नाहीं! सर्व सांगते. त्याप्रमाणेंच हे खोल गेलेले व सुजलेले नयन, बसलेले गाल, शुष्क झालेले ओंठ, हे न बोलतांही मजवरील तुझें निस्सीम प्रेम व्यक्त करीत असून तुझ्या पवित्र व निष्कपट अन्तःकरणाची साक्ष देत आहेत. जानकि, तुला हरण करणारा तो दशानन परलोकाप्रत पोंचविला! हें अवघड कृत्य अनेकांच्या साहाय्यानें पूर्ण झालें! रावणवधानें सर्वत्र आनंद झाला आहे. फार तर काय पंचतत्वेंही संतुष्ट झालीं म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. दशाननवधाची प्रतिज्ञा करून ती शेवटास गेली, म्हणून आज मी कृतार्थ झालों आहें. जानकि, तुजवर माझें किती प्रेम आहे, हें सर्व स्थावरजंगमात्मक सृष्टीस ठाऊक आहे. प्रिये, मला वेड लावून टाकणारें असें माझें अनावर प्रेम तुजवर असतांही मीं केवळ तुजकरितांच हा दशाननवधपर्यवसायी प्रयास केला नाहीं, तर लोकांनीं मजविषयीं "रामाला कांहींच पराक्रम नाहीं, त्याला क्रोध म्हणजे काय, अपमानाच्या यातना कशा दुःसह असतात, हें कांहींच समजत नाहीं," असे मनास टोचणारे उद्गार काढूं नयेत, म्हणून मीं हा यत्न केला. लोक मला अत्यंत प्रिय आहेत लोकमताला, प्रिये, मी तुजपेक्षांही फार मान देतों. तेव्हां तूं मला अधिक वाटत नाहींस, तुजपेक्षां लोकांविषयीं मला फार वाईट वाटेल. त्यांचें म्हणणें जर कदाचित् असत्य किंवा अ-

संभाव्य असले तर त्यांच्या मनाप्रमाणें करून त्याचा वाईट बरा परिणाम त्यांच्या अनुभवास आणून देणें ह्यांतच मला फार आनंद वाटतो. जनकनंदिनि, ज्या कृत्याच्या योगानें आपला फार अपमान झालेला आहे, आपली अपकीर्ति चोहोंकडे पसरत आहे व आपलें पदोपदीं सर्वस्वी अहित होत आहे, असें कोणीं कृत्य करूनही जर एकादा पुरुष किंवा पुरुषसमाज हा केवळ दैवगतीचाच प्रकार आहे, असें ह्मणून स्वस्थ बसून त्याचें पारिपत्य करण्याविषयीं कांहीं यत्न न करील, तर ती पुरुषव्यक्ति किंवा तो समूह केवळ पायांखालीं चेंगरून जाणाऱ्या कीटकाच्या किंवा कीटकसमुदायाच्या उपमेस पात्र होऊन तो इहपरलोकीं अमुकएक तरी हित साधीत असेल असें ह्मणतां येत नाहीं! जानकि, स्त्री कितीही प्रेमाची असली तरी ती प्राप्य आहे! असें असून मी तुझ्यासाठीं काय काय परिश्रम केले, किती हिंडलों, किती रडलों, कोणाचें साहाय्य मिळविलें, हें तुला ठाऊकच आहे. मग जननीसारखी अप्राप्य व अप्रतिम प्रेमाची वस्तु दुसऱ्यानें हरण केली तर तिच्या सत्पुत्रांनीं, तिच्या पुनर्दर्शनासाठीं फारच प्रयत्न केले पाहिजेत, हें माझें अंतर्गत तुझ्या ह्या पुनर्दर्शनानें लोकांस समजणार नाहीं काय? जिच्या उदरांत आपण वास करतों, जिचें स्तन्य प्राशन करून थोर व पुष्ट होतों, जिच्या अंकावर किंवा सर्वांगावर नाचून जिला आपण बहुत त्रास देतों, जी सदा आपल्या हिताविषयीं झटणारी, फार काय सांगावें, जिच्या शिवाय कोणाचाही जगांत प्रवेश नाहीं, अशा मातेची व स्त्रियेची तुलना कधींही होणें नाहीं! जानकि, मला जें कांहीं तुला सांगावयाचें होतें तें ह्या भाषणांत तुला सांगितलेंच आहे. परंतु अधिक स्पष्ट हवें असल्यास सांगतों कीं, प्रिये, तुझा मीं स्वीकार केला असतां, मला लोक निःसंशय, दोष देतील. तेव्हां लोकापवादाचें कृत्य मी कधींही करणार नाहीं!

हें रामचंद्राचें भाषण ऐकून पुष्कळांस वाईट वाटलें. लक्ष्मण व सुग्रीवादि वानर तर यांस फार राग आला, असें त्यांच्या मुखचर्येवरून दिसलें. "एवढें घनघोर युद्ध करून हेंच जर त्यापासून मिळालेलें विजयाचें फळ होय, तर आह्मांस धिक्कार असो!" असें कित्येक ह्मणाले. तरी आतां ही महासाध्वी काय करते आहे, हें पाहण्याविषयीं बहुत मंडळी उत्सुक होती.

सीता—हाय!हाय!प्राणप्रिया,काय मी ऐकत आहें हें! हे प्राणनाथां-च्याच मुखांतील शब्द काय? किंवा हें हालाहल विष आहे! अहो प्राणनाथ! हें सर्व मी पाहतें आहें,ऐकत आहें,हें सर्व खरें आहे,किंवा हें स्वप्न आहे, किंवा एकादें मायावी राक्षसकृत्य आ ? मजवरील आपलें अत्यंत प्रेम आपल्या कोमल अन्तःकरणास माझा अंगीकार न करण्याविषयींच सांगतेंना? अचेतन सृष्टीसही रडविणाऱ्या आपल्या मजविषयींच्या अत्यंत शोकामुळें आपण माझी मुक्तता केली नाहीं, तर आपल्याठायीं पराक्रम नाहीं व आपण अपमानाच्या यातना जाणत नाहीं, असें लोक ह्मणतील,म्हणून त्या रावणाचा वध केला,असें जर आपण ह्मणतां,तर त्यास मारल्यावर इतके दिवस मला जीवन्त कशाला ठेविलें? लगेच तत्क्षणीं कोणाकडून तरी ह्या अदर्शनीय व पापिनीस्त्रीचा कंठनाल कां कापविला नाहीं! ह्मणजे लोक आपला पराक्रम जाणते व माझीही ह्या जगांतून खरी सुटका होऊन आपल्या मुखांतील हे अनंगीकाराचे अंगारोपम शब्द ऐकावयास नको होते! अहो, रावणासच जर मारावयाचें होतें तर मजसाठीं शोक कशाला करावयास हवा होता? आज जें आपण आरंभिलें आहे हेंच जर रावणवधानंतर आपणास कर्तव्य होतें,तर हा घोर युद्धप्रसंग येऊन एवढ्या जीवांचा व्यर्थ नाश तरी झाला नसता. आपलें हृदयसर्वस्व किंवा आत्माच जो वानरश्रेष्ठ मारुति तो ज्यावेळेस प्रथमतः माझ्या शोधासाठीं येथें आला,त्यावेळेस मी केशपाशानें ह्या कोडग्या जीविताचा अंत करीत असतां त्यानें तसें साहस न करण्याविषयीं मला कां सांगितलें? तेव्हांच जर माझ्या ह्या अपवित्र शरीराचा व चरित्राचा शेवट झाला असता तर हा पुढील सर्व प्रकारें असमाधानकारक व अकीर्तिकर प्रकार झाला नसता.माझ्या त्यावेळच्या मरणानें मग लोक आपल्याठायीं पराक्रम नाहीं,वगैरे कांहीं एक अनुमानें कधींही न काढिते, लंका उद्ध्वस्त झाली नसती,राज्ञी मंदोदरीवर प्रस्तुतचा प्रसंग आला नसता व लक्षावधि विधवा स्त्रिया शोकाकुल झाल्या नसत्या.प्रिया,मी जरी लंकेंत होतें,तरी सर्वकाल आपले चरणकमल चिंतन करीत रानांतच असल्याप्रमाणें होतें. तेव्हां मजविषयीं भलतीच शंका घेऊन प्राकृत पुरुषासही न शोभणारें कृत्य करूं पहातां ह्यास काय ह्मणावें! आतां दैवदुर्विलासानें माझ्या शरीरास पंचवटींत

यानें स्पर्श केला.व अनेकदां स्वसंरक्षणार्थ त्याच्याशीं मला भाषण करावें लागलें. ह्यास माझा उपाय नाहीं. अहो प्राणनाथ, आपली मी जी ही दशा पाहतें,ह्यावरून आपण मला हें अश्रुतपूर्व व कठोर वचन बोलून माझा त्याग करीत आहां, हें मला अजूनही खरें वाटत नाहीं. जर खरेंच असेल तर आपण मुखानें असें वचन बोलण्यापेक्षां हातांत शस्त्र घेऊन मला पुढील मार्ग दाखवावा,हेंच मला उचित दिसतें.

राम—जानकि, ह्या तुझ्या बोलण्यांत कांहींच अर्थ नाहीं, असें मी ह्मणत नाहीं.परंतु काममदांध झालेल्या त्या दशाननाच्या राजधानींत जिणें इतके महिने काढिले, तिचा एकदम स्वीकार करणें मला प्रशस्त दिसत नाहीं. ह्यावरून तुझा पावित्रपणा मी कमी लेखितों असें नाहीं. तरी लोकदृष्टीनें जेथें संशयास जागा आहे, तें कृत्य मीं निःसंशय होऊन तरी कसें करावें ! आतां मी तुझा अंगीकार करीत नाहीं, ह्मणून तूं मजबरोबर अयोध्येस येऊं नको व तेथें राहूं नको, असा माझ्या ह्मणण्याचा आशय मुळींच नाहीं. किंवा तूं मिथिलेस पित्याचे घरीं राहूं नयेस,असेंही माझें ह्मणणें नाहीं.

सीता—प्राणनाथ,ह्यावर काय बोलावें हें मात्र मला मुळींच समजत नाहीं. परंतु माझा कांहींच अपराध नसतां माझा त्याग केलेला ऐकून आपणास सज्जन काय बरें ह्मणतील?अहो,लोकांच्या इच्छेप्रमाणें वागणें, त्यांचें मत स्वीकारणें, हें चांगलें खरें. परंतु माझा त्याग करावा, असें सज्जनसुद्धां आपलें मत प्रकट करतील काय ! प्राणनाथ, आतां मी काय करूं ! मला आपल्या ह्या आचरणानें लोक काय बरें ह्मणतील ! हें कृष्णवर्ण तोंड आतां मीं जगतास कसें दाखवावें ! त्रैलोक्यांतील सर्व वस्तु सुसाध्य असूनही जर एक पति अनुकूल नाहीं तर त्या स्त्रीचें वांचणें काय उपयोगी ! तिचे गुण सर्वप्रकारें निंद्य होत ! तिजवर मग जनकजननीसुद्धां ममता करीत नाहींत ! लोक हव्या त्या तिजविषयीं कल्पना काढितात!जिनें जन्मांतरीं महा पातक केलें असेल त्याच दुर्दैवी स्त्रियेवर सुशील पतीचा प्रकोप होतो, अशी माझी दृढ श्रद्धा आहे. हाय ! हाय ! ह्या वृत्तश्रवणानें सासूबाई मजविषयीं काय बोलतील ! भरतशत्रुघ्न भावोजी मनांतल्या मनांत काय ह्मणतील! मातापितरें माझी ही अवस्था ऐकून लज्जित होऊन कोणासही मुख दा-

खविणार नाहींत ! प्राणनाथ, आपण अत्यंत दयाळु, क्षमाशील असतां मजविषयींच असें आपलें अत्यंत निष्ठुर अंतःकरण कसें झालें? अहो, त्या दुष्ट दशाननाचा वध करून मला त्या कारागृहांतून मुक्त केलेंत, पण आपल्या हृदयरूपलंकेचा नाथ असून अत्यंत बळकट असा जो संशयरूप सहस्रमुखी रावण त्याचा वध करून ह्यांतून माझी सुटका करण्याविषयीं कोणीही आतां समर्थ नाहीं!! हाय! हाय! काय ही माझी अवस्था! हे भूमाते, मला तूं तरी पोटांत घे. तूं सर्वापराध सहन करणारी आहेस. अथवा, हे सर्वत्र संचार करणाऱ्या वायो, तूं तरी मला कोठच्या कोठें लांब नेऊन टाक ! हे महासागरा, तुझी एकच लहरी मजवर कृपा करावयास पुरे आहे ! हे आकाशा ! मला तुझ्या पोटांत कोठें अवकाश मिळेल काय ! प्राणनाथ, निरपराधिनी स्त्रीच्या त्यागासारखें आणखी अपकीर्तिकर कर्म जगांत कोठलें असणार? ह्या आपल्या एका कृत्यानें, रावणाच्या वधाच्या योगानें आपण मिळविलेलें विपुल यशोवैभव नष्ट होईल, ह्यांत संशय नाहीं. तर ह्याचा पुनः पुनः विचार करा. मी पुनः सांगतें कीं, माझा जर स्वीकार करावयाचा नव्हता तर पंचवटींतून येथें मुळींच यावयाचें नव्हतें. प्राणनाथ, मी आपल्यास त्या कपटमय हेमहरिणामागें लावून लक्ष्मणभावोजींस, अविचारानें भलतेंच बोललें, ह्याविषयीं मला काय ती अगोदर शिक्षा करून मग माझा अंगीकार करावा. ह्या महान् अपराधामुळें मी सर्व प्रकारें दोषी आहें, व त्या अपराधास उद्देशून जर ही शिक्षा असती, तर गोष्ट निराळी. परंतु तत्संबंधानें आपण कांहींच न बोलतां केवळ संशयाच्या योगानें व लोकभीतीस्तव अनपराधेसही जीवत्यागाची शिक्षा देतां, ह्यास काय ह्मणावें! आपण सुज्ञ व दीर्घदर्शी आहां. आपल्या हातून अपराध किंवा अन्याय कधीं व्हावयाचा नाहीं, हें मला पक्कें विदित आहे. तेव्हां मींच महान् अपराध केला, असें जगांत प्रसिद्ध होणार ! तुह्मीं जर माझा स्वीकार करीत नाहीं, तर अग्नीच माझा अंगीकार करील ! त्यावांचून मला आतां जगांत सन्मार्ग दाखविणारा कोणी नाहीं. अहो भावोजी, कृतापराधाबद्दल आपल्यापुढें मी येण्यास सर्वस्वी अपात्र असतांही, आपण मजकरितां अग्नि पेटवावा, हें आपल्यास शेवटचें काम सांगत आहें. तर आपण ह्या प्रसंगीं मजवर कृपा करावी.

नंतर लक्ष्मणानें रामाज्ञेनें मोठा अग्नि प्रज्वलित केला.त्याच्या मोठमोठ्या ज्वाला, सीतेच्या पातिव्रत्यभयानेंच जणूं कांपत होत्या ! सर्व तयारी झाली ! तेथील सर्व प्रेक्षकांस फार वाईट वाटलें. " रामचंद्रांनीं हें फार निंद्य कर्म केलें, हाच जर ह्या साध्वीचा परिणाम करणें होता, तर रामचंद्रास लंकेंत यावयाला कशाला पाहिजे होतें?"ह्याप्रमाणें लोक अनेकप्रकारें बोलूं लागले!हजारों लोक त्या विमलचरित सर्वांगसुंदरीकडे पाहून ढळढळां रडूं लागले. कित्येक " कोणाचें कशा तऱ्हेनें मरण लिहिलेलें असतें याचा नेम नाहीं, " अशासारखे उद्गार काढीत होते. कित्येकांस"ही साध्वी स्त्री जळावयाचीच नाहीं,"असें वाटत होतें!"जीवंत स्त्रीनें अग्निप्रवेश केला, हें आपण अजून पाहिलें नाहीं," ह्मणून कित्येक एकमेकांशीं ह्मणत होते. अशी लोकांची गडबड चालली असतां, आमच्या चरित्रनायिकेनें रामचरणांचें वंदन करून त्या अग्नीस प्रदक्षणा करून आंत उडी टाकण्यापूर्वी " हे निगमगीतगौरव, अग्ने ! मी तुझी आतां ह्या समयीं करद्वय जोडून प्रार्थना काय करावी ? तूं अनेक रूपानें सर्वान्तरस्थित आहेस. अर्थात् सर्वज्ञ आहेस. तेव्हां माझें मनोगत जाणतच आहेस. मग कोणत्याही प्रकारानें स्पष्ट करतां यावयाचे नाहींत असे जे कांहीं ह्या अन्तःकरणांत विचार घोळत आहेत, ते उगाच तुजपुढें अर्धवट बोलून तरी काय उपयोग ! तथापि ह्या प्रसंगीं ही माझी वाणी माझ्या आधीन नाहीं ह्मणून " हे भगवन् पावक ! जर ह्या जनककन्येचें ह्या परमपवित्र व अनुपम रामचंद्रचरणारविंदावांचून कधीं स्वप्नांतही परपुरुषावर क्षणैक तरी मन गेलें असेल, तर त्वां ह्या शरीराचें क्षणांत भस्म करावें, " एवढें वदविते. ह्यापेक्षां अधिक बोलून पतीनें अनंगीकृत ह्मणून महापापि हें शरीर आतां भूमीवर ठेवून तिला भार होऊं देणें इष्ट नाहीं." इतकेंच सद्गदित स्वरानें ह्मटलें. त्यावेळेस ती करुणसागरांतून निघालेली लक्ष्मीच काय, किंवा अग्नीस पवित्र करणारी व तेज देणारी देवताच काय, अशी दिसत होती ! तेव्हां प्रेक्षकसमाजांत चोहोंकडे हाहाकार उडाला! "ह्या साध्वीचें पवित्र चारित्र आज संपलें, रामाला आतां क्षणोक्षणीं अतोनात पश्चात्ताप होईल. त्यास वेड लागेल. किंवा तेही आतां आंत प्रवेश करतील. " अशासारख्या लोकांच्या मनांत कल्प-

ना आल्या. "आपण एवढे लोक येथें असून कोणीही रामचंद्रांस, "सीताबाईंचा आपण स्वीकार करावा," असें निक्षून किंवा प्रार्थनापूर्वक सांगितलें नाहीं, ही मोठी चूक झाली," असेंही कित्येक बोलूं लागले. बराच वेळ गेला. "सीता जळून तिची रक्षा झाली, आतां आपण येथें किमर्थ बसावें?" असें कित्येक ह्मणत होते, इतक्यांत त्यांतून सर्वलक्षणान्वित मूर्तिमंत अग्नि, जसा पिता कन्येस वराला देण्याकरितां लग्नमण्डपांत घेऊन येतो, त्याप्रमाणें त्या महासाध्वीला तेथें घेऊन आला व लगेच आपण अदृश्य झाला! तेव्हां सर्वत्र, आश्चर्य! महदाश्चर्य!! धन्य, धन्य!! सीतामाईचा जयजयकार, अशा शब्दांचा चोहोंकडे कानठाळे बसण्यासारखा सतत ध्वनि उठला! जनकनंदिनी तर अग्नींतून निघालेल्या सुवर्णमूर्तीप्रमाणें दिसत होती. तिला सर्वांनीं नमस्कार केले. त्या साध्वीला रामचंद्रानें तत्क्षणीं दृढालिंगन दिलें. पण त्याच्यानें पुढें कांहीं बोलवेना! तरी त्याच्या नेत्रांतून सीतामस्तकीं पडणाऱ्या अश्रुबिंदूंनीं प्राणपतीचें हृदय किती कोमल आहे, व आपल्याविषयीं किती प्रेम आहे हें तिला लगेच कळलें. ही स्त्री कांहीं साधारण नाहीं, हिचें शुद्धशील लोकांच्या दृष्टिगोचर व्हावें, ह्मणूनच रामानें हिचा बाह्यतः अंगीकार केला नाहीं, असें पुष्कळांनीं बोलून दाखविलें. नंतर "प्राणप्रिये, माझ्यामुळें तुला फारफार यातना भोगाव्या लागल्या, तरी त्यांविषयीं आतां कांहीं मनांत आणूं नको. आतां आपण आपल्या प्रिय अयोध्येंत चलावयाचें." इतकें त्याक्षणीं रामचंद्रांनीं ह्मणतांच, सीतादेवी ह्मणाली, "माझ्यामुळें मात्र आपल्यास फार श्रम झाले आहेत, श्रम किती झाले हें आपल्या कृश शरीरावरून दिसतच आहे!"

नंतर बिभीषणानें त्या सर्व वानरमंडळीचा वस्त्रालंकारांनीं बहुमान केला. व जशी रामाविषयीं तशी त्या लोकांविषयींही आपली कृतज्ञताबुद्धि प्रकट केली. बिभीषणानें आपल्या ह्या राज्यांत कांहीं दिवस राहण्याविषयीं रामचंद्राची विज्ञप्ति केली, परंतु वैशाख शुद्ध पंचमीच्या किंवा षष्ठीच्या दिवशीं प्रियबंधुभरतास भेटलेंच पाहिजे, नाहीं तर शेवटीं भलताच अनर्थ होईल, अशा अर्थाचें त्याच्याशीं रामचंद्रानें भाषण केलें व त्यास आपल्या निघण्याची तयारी करण्याविषयीं सांगितलें. बि-

भीषणानें त्यांची सर्व तयारी केली. व त्या विस्तीर्ण पुष्पकविमानांतून अयोध्येस निघण्याचें ठरलें. लंकापतीनें, आपली भार्या सरमा व कन्या कला ह्यांसह अयोध्येस येण्याविषयीं रामचरणीं विज्ञापना केली. ती रामचंद्रानें तत्क्षणीं मान्य केली.

रामचंद्र, बंधु लक्ष्मण व प्रिया सीता यांसह आणखी बिभीषण व त्याची मंडळी आणि प्रमुख प्रमुख असे हजारों वानर, यांस समागमें घेऊन त्या विस्तीर्ण व वेगवान् विमानांत बसून अयोध्येकडे यावयास निघाला. विमान चाललें असतां त्यांतून रामचंद्र आपल्या चंद्रानना प्राणप्रियेला पृथ्वीवरील नानाप्रकारचीं स्थळें व चमत्कृति दाखवीत होता. तीं अशींकीं, "ही पहा, प्रिये, ती भयंकर रणभूमि. ह्या स्थळीं इंद्रजिताचें व लक्ष्मणाचें भयंकर तुमुल युद्ध झालें! ह्या जागीं तो पराक्रमी दशानन गतप्राण झाला! येथें मंदोदरीनें हृदयद्रावक शोक आरंभिला! हे पहा, मृतराक्षसांच्या अवयवांचे ढिगांचे ढीग पडले असून सर्वत्र दुर्गंधी सुटली आहे! हा पहा तो बिभीषणस्त्रीनें तुला सांगितलेला सेतु! अहाहा! वरून ह्याची विलक्षणच शोभा दिसते! सागरोदक पहा कसें दिसतें तें! ह्यावरील हें ऊन फारच मनोहर व कविकल्पनेला पोषक असें दिसतें. ह्याठिकाणीं बिभीषण अपल्या चार प्रधानांसह आह्मांस साहाय्य करावयाकरितां आला." अशीं ठळक ठळक स्थळें दाखवून तेथें काय घडलें, हें संक्षेपानें कथन करीत असतां सीतेला जसा काय रामचंद्र आपला, सर्व उलट इतिहास सांगत आहे असें वाटे. ह्याप्रमाणें रामचंद्रानें आपल्या प्रियेला सांगतां सांगतां "ती पहा, सुग्रीवमहाराजांची किष्किंधानगरी!" असें ह्मणून त्यास्थळीं तें विमान थांबविलें. वानरांनीं तेथें कांहींवेळ उतरून आपल्या संबंधिजनांच्या घाईघाईनें भेटी घेतल्या. सुग्रीवपत्नी व दुसऱ्या कित्येक स्त्रिया आपल्या पतींसह पुढें अयोध्येस येण्याकारितां निघाल्या. रामानें पुनः विमान चालू केलें. पुढेंही रामचंद्र वातावरणांतून सीतेला प्रमुख प्रमुख स्थानें दाखवीत होता. पुढें पंचवटी आली. येथपासून सीतेच्या ओळखीचा प्रदेश लागला. सीतादेवीनें, लंकेपासून पंचवटीपर्यंतचीं सर्व स्थळें पूर्वीं पाहिलीं नव्हतीं ह्मणून तीं फार लक्षपूर्वक पाहिलीं. आणि पंचवटीपासून चित्रकूटपर्यंतचें व पुढीलही प्रत्येक स्थळ तिच्या परिचयाचें होतें, तें वरून आपल्यास ओळखतां येतें किंवा

नाहीं, हें बघण्याकरितां ह्मणून, व त्या सर्वांवर तिची फार ममता होती ह्यास्तव, तींही लक्षपूर्वक पाहिलीं. परंतु ह्यांतील कित्येकांकडे ती सूक्ष्मावलोकन करीत असतांही तिला तीं स्पष्ट किंबहुना मुळींच दिसलीं नाहींत ! कारण कीं, मागील अनेक प्रसंग आठवल्यामुळें तिच्या नयनांतून प्रेमाश्रु वहात होते ! चित्रकूटीं विमान येतांच भरदिशीं पवित्र भारद्वाजाश्रम आला ! तेथें रामचंद्रांनींआपलें विमान थांबविलें.

सर्वांनीं त्या महर्षींचें दर्शन घेतलें. रामलक्ष्मण व सीता त्या आश्रमांतून गेल्यापासून तों तेथें पुनः परत येईपर्यंत चौदा वर्षांत रामचंद्राच्या चारित्रांत जे जे प्रसंग घडून आले ते ते त्या योगबलसंपन्न भगवान् भारद्वाज महामुनीनें त्यांस सांगून रामाच्या हस्तें रावणवध झाला हें फार चांगलें झालें, असें ह्मटलें ! व यावच्चंद्रदिवाकर राहणारा हा सर्व इतिहास घडून येण्यास मुख्य कारण जी सीता, तिच्या अनेक गुणांची स्तुति करून तिच्या अलभ्य दर्शनानें आपणांस फार संतोष झाल्याचें दर्शविलें. आणि साध्वी स्त्रियांची केवढी योग्यता आहे, त्यांच्या हातून जगांत केवढालीं परोपकाराचीं कृत्यें होतात, पतींना त्यांचें केवढें साहाय्य असतें, इत्यादि ह्यांविषयीं बोलून रामचंद्रानें प्रिय बंधु भरताकडील त्यांस विचारलेला सर्व समाचार ऋषीनें त्यास यथास्थित सांगितला. तो ऐकत असतां भरताच्या रामचंद्रावरील निष्कपट प्रेमाच्या गोष्टींनीं तेथलि सर्व श्रोत्यांच्या सर्व वृत्ति तटस्थ झाल्या ! त्या सर्व मंडळीनें आज रात्रौ येथें राहून उदायिक षष्ठीस सर्वांनीं अयोध्येस जावें असें त्या महामुनीनें रामचंद्रास सांगितलें. रामचंद्रानें जसा त्या मुनीस तसा त्याच्या वचनासही मान दिला. नंतर मारुतीला रामचंद्रानें "मारुते, तूं आतां नंदिग्रामीं जाऊन मी येथें सर्व मंडळीसह आलों असून उद्यां प्रातःकाळीं तुझी भेट घेईन," ह्मणून भरतास निरोप सांगावयास सांगितला. व "अगोदर येथून जवळ असलेल्या शृंगवेरनगरास जाऊन तेथील गुहराजासही माझें सर्व वर्तमान सांग. मारुते, तला काहीं सांगावयाला नकोच, पण प्रियभरतास व ह्या गुहराजास, मी, बंधु व प्रिया यांसहवर्तमान चौदावर्षांपूर्वीं चित्रकूटाहून निघालों, तो आज येथें परत आलों असून ह्या महर्षींच्या आज्ञेनें ह्या पुण्याश्रमीं राहिलों आहें, येथपर्यंत आमचें सर्व इतिवृत्त कथन कर," ह्मणून आणखी त्यास नित्रतेसमयीं कथन केलें. ह्या वेळीं

सर्व वानरांनीं मनुष्यरूपें घेतलीं होतीं, त्याप्रमाणें तो रामदूतही मानव-रूपानेंच शृंगवेरनगराहून नंदिग्रामीं भरताश्रमीं गेला. रामासाठीं ज्यानें मुनिवेष धारण केला असून जो फलमूळें खाऊन अगदीं कृश झाला आहे, व रामचिंतनांत निमग्न असून त्याचे दर्शनाविषयीं अत्यंत आतुर झाला आहे, अशा भरतापुढें त्यानें येऊन सर्व वृत्त त्यास कळविलें. भरतास तो रामवृत्त कथन करणारा साक्षात् रामचंद्र वाटला ! व रूप-सादृश्यामुळें तो भरत मारुतीसही दुसरा रामचंद्रच भासला ! भरत तर त्या अत्यानंदकारक वृत्तानें कांहीं वेळ निश्चेष्ट पडला होता ! त्या रा-मदूतास तो नानाप्रकारचीं बक्षिसें द्यावयास लागला. परंतु त्यानें त्यांतून कांहींही ग्रहण केलें नाहीं. अहाहा ! सेवक असावे तर असे मारुतीरायासारखे निरिच्छ व स्वामिकार्यरत असावे. असे जेव्हां व ज्यास्थळीं लोक होऊं लागतात, तेव्हांच व त्यास्थळींच नीति वास करूं लागते व लक्ष्मी धांव घेते ! असो. त्या दूताला भरतानें सर्व कांहीं पुनः पुनः तेंच तेंच रामवृत्त विचारिलेंच, परंतु "ते मला कोणत्या वेळीं भे-टतील ?" "हा प्रश्न कितीदां त्यास केला असेल, हें त्या एका हनुमंतालाच ठाऊक ! रामचंद्र आज उद्यां यावयाचे हें भरतास पूर्वी विदित असल्यामुळें त्यानें त्याच्या स्वागतसमारंभार्थ अगोदरच चोहोंकडे तयारी करविली होती. अयोध्येंत व तन्निकट असलेल्या त्या नंदिग्रामीं तर मोठीच त-यारी केलेली होती. भरतानें तत्क्षणीं हें रामदर्शनाचें वृत्त प्रधानांस कळवून त्यांनीं तत्काल सर्व अयोध्यावासिप्रजाजनांस समजेल असें केलें ! तो दूत निघून रामाकडे आला. नंदिग्रामीं हां हां ह्मणतां लोकांची अतोनात गर्दी होऊन गेली ! राममाता व शत्रुघ्न तेथें आलीं. त्या शिवाय आ-णखी हजारों कुलीन स्त्रियांनीं तो ग्राम आपल्या येण्यानें अलंकृत केला. लहान मोठे अधिकारी भरताज्ञेनें तेथें जमले. वसिष्ठवामदेवादि-ऋषिमंडळीसही तेथें येणें अवश्य वाटलें. मिथिलेश्वर सीरध्वज जनक, भरताचा मामा युधाजित, यांसारखे संबंधी व दुसरेही, रामचंद्रदर्शनार्थ व रामराज्याभिषेकार्थ आलेले भूपति व ऋषिजन तेथें प्राप्त झाले ! अनेक प्रका-रचे रथ, हत्ती, घोडे यांस, व असंख्य सैन्यास, त्या गांवाची क्षेत्रमर्यादा अत्य-ल्प झाल्यामुळें त्यांना जवळच्या दुसऱ्या कित्येक गांवांचा आश्रय करावा लागला! तेथें लक्षावधि जमलेल्या लोकांची सुव्यवस्था ठेवणाऱ्या अधि-

काऱ्यांची बरीच गर्दी झाली. राजाश्रयानें असणारे, हजारों सुस्वर वाद्यें वाजविणारे, व दुसरे अनेक कलाकुशल व गुणी लोक, त्यास्थळीं एकत्र झाले. असें तें भरताचें एकान्तांतील निवासस्थान अल्पकाळांत सर्व प्रकारच्या लोकांनीं अगदीं गजबजून गेलें होतें ! तरी त्यारात्रीं आणखी लोक अनेक स्थळांहून तेथें येतच होते.

त्या रात्रीं तेथें थोड्यांसच निद्रा लागली असेल. बहुतेकांना ही रात्र केव्हां एकदां संपून रामसूर्याचा कधीं उदय होतो आहे, असें झालें! रामचंद्रदर्शनाविषयीं लहान थोर सर्व फारच आतुर झाले होते. तरी कित्येक लोकांचें त्या तेजस्विनी पूर्वदिशेकडे लक्ष जातांच आपल्या रामचंद्रविषयक चाललेल्या गोष्टी अपूर्ण राहिल्या असें पाहून त्यांस असें भासलें कीं, सर्वग्रहमंडलमध्यवर्ती भगवान् सूर्यनारायण ह्यासही तो अनुपम महोत्सव पाहण्याविषयीं अत्यंत उत्सुकता वाटली व ह्मणूनच तो दिवाकरही भूलोकावर लौकर येत आहे!! असो; प्रातःकाळ होत आहे, तों तें पुष्पकविमान दक्षिणेकडे भारद्वाजाश्रमाच्या नभोभागावर दिसलें ! तिकडे सर्व पहात आहेत इतक्यांत अगदीं दिसेनासें झालें ! तेव्हां त्या संबंधानें लोक अनेक तर्क काढीत होते. त्यांत, तें विमान शृंगरवेरनगरींत उतरलें असावें, हाही एकतर्क कित्येकांनीं काढिला, व तोच खरा होता. थोड्या वेळानें पुनः तें वर दिसलें. तें जसें काय सर्वांच्या आनंदाचें घरच, किंवा सर्व जगतांतील अयोध्येंत येणारें सपक्ष यशच असें भासलें. " हें आलें, हें पहा, मोठमोठें दिसूं लागलें, आतां आंतील लोक स्पष्ट दिसूं लागले," अशा प्रकारचे तत्संबंधानें लोकमुखांतून उद्गार निघत आहेत, तों तें आकाशयान त्या स्थळीं आलें. तें अंतरिक्षांत दिसूं लागलें, तेव्हांपासूनच जर लोक रामनामाचा एक सारखा जयजयकार करीत होते, मग तेथें येतांच त्या परमपवित्र नामाचा फारच विलक्षण गजर झाला, हें आणखी कथन करणें नकोच ! तेव्हां प्रभातकालाचा मंदमंद वारा वहात असून सर्व जगतांतील प्रसन्नता तेथें अगदीं गच्च भरून राहिली होती ! विमान त्या नंदिग्रामीं येतांच भरतादि सर्व मंडळी त्या स्थळीं झटदिशीं आली. त्या अंतरिक्षनौकेंतून बिभीषण व वानरमंडळी बाहेर येत असतां, त्या सर्वांचे स्वागतार्थ भरतादिमंडळी अगदीं तत्पर होती. सर्व

मंडळी उतरल्यावर राम, नंतर सीता व शेवटीं लक्ष्मण उतरला. त्या तिघांस पहातांच भरत तर अत्यंत प्रेमामुळें व आनंदातिशयानें क्षणभर अगदीं तटस्थ, निशःब्द व पुढील कर्तव्याविषयीं अगदीं मूढ झालाच, पण वसिष्ठांसारखे महाज्ञानी व सुमंत्रप्रधानांसारखे स्वकर्तव्यदक्ष जुने अधिकारी ह्यांनींसुद्धां त्या प्रसंगीं मौन धरलें! ह्यामुळें तेथें एवढी मनुष्यांची गर्दी असतांही कोणाच्या मुखांतून एक शब्दही बाहेर पडत नव्हता! तेव्हां ज्यावेळीं जगांत मनुष्यांमध्यें भाषाव्यवहार नव्हता, त्यावेळच्या आदिमस्थितीची कित्येकांस कल्पना आली असावी! पुढें भरतशत्रुघ्नांनीं रामलक्ष्मणांस दृढालिंगन देऊन आपल्या अंतःकरणांतील प्रेमभाव व विरहावस्था नयनाश्रूंनीं कळविली. नंतर सुमंत्रादिकांनीं त्या आलेल्या मंडळीस बसण्याकरितां केलेल्या रम्य स्थळीं बसविलें. राम मुख्यासनावर बसला. जानकीही वसिष्ठाज्ञेनें रामाजवळ बसली. लक्ष्मणबिभीषणादि सर्व लाक योग्य स्थानीं बसले. मग तेथें लोकांची फारच गर्दी झाली. त्यांच्या दर्शनार्थ तेथें मोठमोठे लोक आले. त्यांनीं राम, लक्ष्मण व सीताबाई ह्यांची अनेकप्रकारें स्तुति गाइली. परंतु हा सर्व प्रकार तुटक तुटक चालला होता. वसिष्ठांस त्या तिघांनीं नमन करून त्यांपासून जेव्हां पूर्ण आशीर्वाद घेतले, त्यावेळीं वसिष्ठमहाराजांनीं त्यांचें चारित्र सर्वांस ऐकविलें. तें फारच हृदयंगम होतें. त्या मनोहर व विस्तृत भाषणांतील शेवटच्या शेवटच्या भागाचा सारांश असा होता कीं, "रामचंद्रा, तुझें सर्वच चरित्र पुनः पुनः मनन करण्यासारखें आहे. जेव्हां जेव्हां ह्याविषयीं विचार करावा, तेव्हां तेव्हां त्यापासून मनाला नवीन नवीन समाधान होतें व मनुष्याचें जगांत खरें काय कर्तव्य आहे हें सूक्ष्म पहाणारास समजून आपलें इहपरलोकीं कल्याण कशानें होईल, ह्याचाही स्पष्ट बोध होतो. पित्राज्ञेचें मोल राज्यपदापेक्षां किती तरी पट अधिक आहे, हें सर्व पृथ्वींतील पुत्रांस त्वा आपल्या आचरणानें उघड केलेंस एवढेंच नाहीं, तर गुरुजनांच्या इच्छेप्रमाणें मोठ्या श्रद्धेनें, सन्मानपूर्वक व सान्तःकरण आचरण केल्यास असाध्य दिसणाऱ्या गोष्टीही सुसाध्य होतात, हें महत्तत्त्व लोकांच्या प्रत्ययास अणून दिलेंस! बंधुप्रीति, स्वस्त्रीप्रेम हीं जर बरोबर आहेत, तर गृह काय आणि अरण्य काय हीं एकच आहेत. आणखी आपली अत्यंत प्रेमाची वस्तु

जर कोणीं कपटानें किंवा अन्यप्रकारें हरण केली असेल, आणि तो चौर्यकर्मकर्त्ता कितीही बलवान् दिसला, तो कसाही मायेचा बाजार पसरविणारा असला, त्याची कोठेंही—दशादिशांच्या पलीकडेही—वसति असली व आपलें बल कितीही कमीसें वाटलें, तरी तेजस्वी पुरुषांनीं ती वस्तु त्या चोरापासून हरएक प्रकारें परत आणण्याच्या सतत उद्योगांत असावें. ती हस्तगत होईपर्यंत आपणास अन्न गोड लागूं नये, निद्रा येऊं नये, तिचें वेड लागावें, तिच्याच चिंतनांत सतत असावें, तदर्थ शरीर कृश करावें, अशासारखीं अनंत तात्पर्यें तुझ्या परमपवित्र आचरणापासून ग्रहण करण्यासारखीं आहेत. लक्ष्मणाचेंही असेंच अनुकरणीय चरित्र आहे. गुणवती सीतेच्या चरित्राचीं सर्व स्त्रियांनीं पारायणें करावीं, असें तें वेदतुल्य आहे!" नंतर रामचंद्रांनीं आपलें चौदावर्षांतील सर्व वर्तमान थोडक्यांत सांगितलें. आणि त्या कालांत आपणांस काय काय लाभ झाले तेंही कळविले. आणि रावणवधासारखें बिकट कार्य शेवटास जाण्यास जीं अनेक कारणें सांगितलीं, त्यांतील मुख्य पित्राज्ञा अथवा मात्राज्ञा होय, ह्मणून सांगितलें. भरतानें त्या तिघांविषयीं फारवेळ बोलून ऐकणारांस करुणरसानें स्नान घातलें. नंतर सीता, रामलक्ष्मणांसह स्त्रीसमाजांत गेली. तेथें सीतारामचंद्रांस कौसल्येनें एकदम पोटाशीं धरून लक्ष्मणास आलिंगन देण्याकरितां एक हात पुढें केला! तिनें त्यांस अश्रुजलानें न्हाणिलें! त्यांच्याकडे ती निरखून पाहत असता, त्यांचीं तीं अंगसंस्कार नसल्यामुळें मलिन दिसणारीं मुखें, ते अस्ताव्यस्त केश व अत्यंत कृश झालेलीं शरीरें, दृष्टीस पडतांच तिला फारच वाईट वाटून ती रोदनस्वरानें ह्मणाली, "रामा, अरे लक्ष्मणा, मुली जानकी, काय तुमची दशा झाली ही? तुह्मांला ओळखण्याचीसुद्धां पंचाईत पडते! हाय! हाय! चौदावर्षांत तुह्मांस कसा तो सुग्रास ठाऊक नसेल! निद्राही सुखाची मिळाली नसेल! त्या दुष्टानें हिला लंकेंत नेल्यावर तर आपली सर्वांची काय स्थिति झाली होती, हें कितीही ऐकिलें तरी तिचें खरें स्वरूप ध्यानांत यावयाचें नाहीं! हा आपल्या दर्शनाचा सुदिन उगवायाचा होता, ह्मणूनच आपण जीवन्त राहिलों. नाहींपेक्षां तो आपल्या वियोगाचा काळ ह्मणजे प्रत्यक्ष काळच होता!" अशासारखें तिनें प्रेमाचें बहुतवेळ भाषण केलें. नंतर आपल्या दर्शनानें व भाषणांनीं

सर्वांस संतुष्ट करून रामलक्ष्मण पुनः पुरुषसमाजांत येऊन पूर्व स्थानीं बसले. नंतर भरतानें चित्रकूटावरून निराश होऊन आल्यानंतर आपण कशा वृत्तीनें राहून राज्य कसें चालविलें होतें तें सांगून "प्रियबंधो, हें घे आतां आपलें सर्व राज्य," असें ह्मणून शत्रुघ्नहस्तें राज्यसंबंधी मुख्यमुख्य वस्तु तेथें त्याच्या स्वाधीन केल्या।तो आणखी ह्मणाला."पूज्य बंधो, तुह्मांस आतां राज्याभिषेक झालाच. वसिष्ठादि महर्षींनीं जें आपलें स्तोत्र गाइलें,तेच वेदोक्त मंत्र होत.हीं अनेक वाद्यें वाजत आहेतच. स्त्रियांचींही मंगलगीतें चाललीं आहेत. महामान्य सीरध्वज महाराज, युधाजितमामा,बिभीषण, सुग्रीव, मारुति व अंगदादि वानरमंडळी वगैरे, राजे, संबंधी, मित्र व हितेच्छु प्रजाजन येथें आहेतच." नंतर वामदेवांनीं भरताच्या ह्या भाषणाची स्तुति करून अयोध्येस आतां लौकर निघावें ह्मणून त्यास सूचना केली.ते ह्मणाले,"आजच रामचंद्रास यथाविधि राज्याभिषेक होणें आहे. पंचवटीमध्यें हजारों ज्यानें राक्षस मारिले, सेतुबंधनासारखें असंभवनीय कार्य शेवटास नेऊन लंकाप्रवेश केला व ज्याचें वैभव अपार असून बलसंपत्तीही विलक्षण होती, अशा दशाननाचा पराभव होणें ज्याच्यावांचून सर्वथैव कठिण होतें, असा हा पुण्यात्मा, मंगलनामा व विमलकीर्तिमान् रामचंद्र त्या दुष्टाचा घात करून बिभीषणास लंकाधिपत्व देऊन सबंधु व सस्त्रीक असा भरतशत्रुघ्नांसारख्या प्राणप्रिय बंधूंस व मातांस ज्या नियमित दिवशीं भेटला, आणि जी लंकेंत असतां जिचें पातिव्रत्य भंग करण्याकरितां रावणानें हरतऱ्हा केल्या, परंतु जिच्या शुद्ध मनाला लेशाही विकार झाला नाहीं, अशा महासाध्वीचें प्रियपतीसह ज्या दिवशीं सर्वांस दर्शन होत आहे, किंवा केवळ रामच अशा लक्ष्मणाची मूर्ति चौदावर्षांनंतर ज्या दिवशीं दृष्टीस पडत आहे, तो हा दिवस किती मंगलकारक असावा बरें ! असा सकलशुभलक्षणान्वित दिवस कधीं तरी ज्योतिष्यांस सांपडेल काय ! आणखी आपल्या किंवा विशेषतः सर्व लोकांच्या अत्यंत प्रियवस्तूच्या हरणकर्त्यास मारून ती वस्तु हस्तगत करून प्रफुल्लवदन होत्साता जो पुरुष आपल्या आप्तमित्रांस किंवा देशबांधवांस भेटतो, तो मानव खचित खचित देवावतार होय. त्याचें चरित्र परमपवित्र असून तें प्रतिदिनीं चिंतनीय आहे. अशा न पुरुषांच्या

प्रतिमा घरोघर पूजनीय व वंदनीय होतात. व तो भेटीचा दिवस सर्व देशांत महोत्सवाचा व सुमुहूर्ताचा होय. तेव्हां ज्याच्या उदयानें हा मंगल दिवस उगवला, त्यास आजच राज्याभिषेक होणें उचित होय. एतदर्थ श्रीमान् भरतानें सर्व सिद्धताही केलेली आहे. ह्मणून येथें आतां विलंब न करितां ह्यांस घेऊन लौकर अयोध्येस चलावें. आबालवृद्ध अयोध्यावासी लोक ह्यांच्या प्रियदर्शनाविषयीं अगदीं आतुर झाले आहेत." नंतर जनकानेंही यथावकाश त्यांस आलिंगन देऊन, तो वीतराग असतांही, अपत्यप्रेमाचें स्वरूप कसें असतें तें न बोलतां आपल्या मुखावरील रोमांचांनीं व नेत्रोदकानें सर्वांस स्पष्ट दाखविलें. नंतर तो जें त्यांस बोलला तें सर्वच बोलणें उत्तम होतें तरी, आपल्या प्रिय मुलीस जें उद्देशून बोलला तें फारच हृदयविदारक असल्यामुळें तें सांगितल्यावांचून पुढें जाववत नाहीं. "कन्ये, तुझें सर्व चरित्र ऐकून मला फार आनंद झाला. रामभद्राला वनांत जावें लागलें, हें ऐकून मला प्रथमतः फार दुःख झालें होतें खरें, परंतु त्याचें वनगमन हें पित्याचे आज्ञेमुळेंच होतें, असें कळतांच मला त्याच्या ह्या पवित्र आचरणानें फारच समाधान व आनंद झाला. आणि तूं तर अशावेळीं छायेसारखी प्रिय पतीबरोबर वनांत गेलीस, हें मिथिलेंत श्रवण केल्यापासून माझे कान अगदीं अमृतरसानें भरून गेले आहेत! पुढें तुझें अरण्यांतील सद्वर्तनही तुझ्या गुणांला अनुरूपच होतें. आतां महाशय लक्ष्मणास जें तूं बोललीस, त्याविषयीं तूं अनेकदां पश्चात्ताप व लज्जा प्रकट केली आहेस, ह्मणून त्या गोष्टीचें नुसतें स्मरण करणेंही तुला दुःखद होईल! म्हणून त्याविषयीं कांहीं बोलत नाहीं. एवढा काळपर्यंत रामभद्र व लक्ष्मण तरी तुजबरोबर होते. परंतु ह्यानंतर तुझें हरण व लंकेंत तुला वर्ष सवावर्ष त्या दुष्ट राक्षसाधिपानें दिलेला त्रास, व तुझें त्या भयंकर राक्षसनगरींत रात्रंदिवस वास्तव्य, ह्या सर्वांविषयीं विचार केला असतां, प्रियकन्ये, तूं ज्या कित्येक अलौकिक गुणांचें तेथें प्रदर्शन केलेंस, तेणें करून तूं सर्व स्त्रीजातीसच काय परंतु सर्व मनुष्यजातीस यावच्चंद्रसूर्य भूषणभूत झाली आहेस, ह्यांत लेशाही संशय नाहीं. ह्या मुळेंच तुझें अर्थात् रामभद्राचें चारित्र फारच हृद्यंगम झालें आहे. रावणासारख्याचा वध झाला, हें सर्व तुझ्या सदाचरणाचें फल होय. तुझ्या शुद्धाचरणाचें खरें स्वरूप लक्षांत आलें ह्मणजे अग्निप्रवेश करून-

न सुवर्णाप्रमाणें तुझें बाहेर येणें, यांत कांहींच मला आश्चर्य वाटत नाहीं." ह्याप्रमाणें त्यानें सीतेची तशीच रामलक्ष्मणांचीही फार स्तुति केली. त्या स्थळीं व त्या वेळीं प्रत्येक मनुष्यप्राण्याचा बोलण्याचा विषय एक होता. तो कोणता तर सीतारामलक्ष्मण ह्यांचें अत्यंत हृदयद्रावक चरित !

नंतर त्या नंदिग्रामांतून अयोध्येस जाण्याची सर्व सिद्धता झाली. अनेकविध वाद्यें वाजूं लागलीं. राम, लक्ष्मण, सीता व जनक, ही मंडळी एका भव्य रथांत बसलीं. भरत व शत्रुघ्न ह्यांनीं रामचंद्रावर चौऱ्या धरिल्या. सुमंत्रप्रधानानें सारथ्य पतकरिलें. ते रथाचे चार घोडेही ईर्ष्यामय व सानंद दिसत होते. हा रथ जेव्हां निघाला, तेव्हांपासून ह्या त्रिवर्गांच्या नांवाचा गजरही बरोबर चाललाहोता ! हा रथ मध्यें असून ह्याच्या पुढें व मागें दुसरे अनेक रथ व दुसरीं अनेक वाहनें होतीं. राजस्त्रिया वगैरे पालख्यांतून चालल्या होत्या. आमची शुद्धचरिता सीतादेवी त्या रथांत बसत नव्हती, परंतु मोठमोठ्यांच्या आग्रहानें तिला तसें करणें भाग पडलें. रामलक्ष्मण व सीता ह्यांनीं व भरतानेंही वनांत धारण केलेले पोषाक टाकून नवीन मूल्यवान् वेष परिधान केले होते. अंगसंस्कारही तेथें झाल्यामुळें त्यांचीं स्वरूपें पाहिल्यापेक्षां विशेष दर्शनीय वाटत होतीं. रामचंद्राबरोबर तिकडून आलेल्या मंडळींपैकीं थोडी रथांत बसून बहुतेक पादचारीच निघाली. ह्याशिवाय अनेक मांडलिक, सरदार, मानकरी, अधिकारी, व सख्यसंबंधी लोक ज्या रथांत बसले होते असे कित्येक रथ रामाच्या रथापुढें व मागें होते. आणखी जवळच्या रथांत वसिष्ठादि ऋषिमंडळ होतें. दुसरे हजारों लोक घोड्यांवर स्वार झाले होते. रामाच्या रथाचे घोडे शुभ्र पांढरे असून फारच उंच व सुंदर होते. त्या समूहांत सर्वत्र नानाप्रकारचे मंगलसूचक व विजयद्योतक असे ध्वज फडकत होते. शृंगारलेले हत्तीही त्या समारंभांत कमी नव्हते. आणखी त्यावेळीं प्रचारांत असलेलीं सर्व राजचिन्हें बरोबर होतीं, व अतोनात राजवैभव कथन करणाऱ्या अनेक लक्षणांनीं तो समूह सुशोभित दिसत होता. शिवाय लक्षावधि लोक पुढें मागें दोन्ही बाजूंस प्रसन्नमुद्रेनें आनंदप्रदर्शक उद्गार काढीत चालले होते. अशा अवर्णनीय थाटानें, त्या ग्रामांतून अयोध्येस जाणारी त्यावेळची रामचंद्राची स्वारी, ह्यावेळीं आह्मास,

हा देशांतून पाश्चात्य द्वीपांकडे जाणाऱ्या विपुल व शिघ्रगति संपत्तीची स्मृति कशी देणार नाहीं बरें ? ती स्वारी चालली असतां अयोध्या नगरीची एका दिशेकडील ती उंच तटाची भिंत आमच्या चारित्रनायिकेच्या दृष्टीस पडली ! तत्क्षणीं तिच्या मनांत अनेक विचार व नयनांत अश्रु एकदम आले ! तिला असें वाटलें कीं येथून हजारों कोश दूर व अगाध समुद्रांत असून,जेथें मायावी राक्षसांची गर्दी,आणि दुर्जय राक्षसेंद्राची आपल्यावर वक्रदृष्टि होती अशा लंकानगरींतील भव्य व बळकट तटांच्या आंत हजारों दुष्ट राक्षस व राक्षसी ह्यांनीं मी परिवेष्टित असून प्राणनाथ व भावोजी ह्यांचे क्षमेस सर्व प्रकारें अपात्र अशी असतां, प्रिय अयोध्यानगरीची ही भिंत ह्मणजे माझ्या दृष्टिगोचर होऊन मी पुनरपि मनुष्यलोकांत जाऊन पडेन, असें मला मारुतिदर्शनापर्यंत एक क्षणभरही वाटलें नव्हतें ! असो, ह्याप्रमाणें तिचें मन सर्वत्र ह्मटल्या स्थळीं क्षणांत भटकत असतां तो रथ त्या सौभाग्यवती अयोध्यानगरीच्या दाक्षिणात्य महाद्वारांतून आंत गेला.तेव्हां त्या चिरप्रवाशांना पुनरपि जननीच्या भेटीचा आनंद झाला. व त्या वानरमंडळीस व लंकाधिपति बिभीषणासही फार समाधान झालें. त्या पुरद्वारांतून आंत रथ येतांच जो कांहीं त्या स्वराजनिष्ठलोकांच्या मनांतील अनेक सद्भावमिश्रित जयघोष बाहेर आला, तो कोणत्याही उपमेनें तुमच्या हृदयांत वठणार नाहीं.तो त्यांचा अयोध्याप्रवेश सदयहृदय कवींच्या अचाट कल्पनांस, कुशल चित्रकारांच्या हस्तांस,स्वराजभक्तांच्या नयनांस व स्वजन्मभूमिप्रीत्यर्थ आपले प्रियप्राण महत्संकटांत घालणाऱ्या शूर पुरुषांच्या अंतःकरणास, बुभुक्षितांस अन्नदर्शनाप्रमाणें, वाटला ! ज्या विस्तृत व सुंदर अयोध्यामार्गानें ती स्वारी चालली होती त्या मार्गांत त्या विस्तीर्ण नगरींतील सर्व लोक जमले होते ! ह्यावरून तेथें किती गर्दी झाली असेल ह्याचें तुह्मीच अनुमान करा. आणि ज्यावेळीं सर्व लोक रामसीतालक्ष्मणादिकांस पाहण्याच्या उत्सुकतेनें पुढें होत, तेव्हां तर ते आपले प्रियप्राणच जणूं त्यांस अर्पण करीत आहेत असें भासे ! शृंगारलेल्या वातायनांतून पाहणाऱ्या स्त्रिया तर मखरांतील नवकुसुमित युवतीच वाटत ! ह्या स्वारीची नायिका व नायक हीं ज्या रथांत बसलीं होतीं, त्याबरोबर कानठाळे बसण्या-

सारखा जयजयकारक ध्वनि व नानाप्रकारची स्तुति चालली असून त्यांवर ते लक्षावधि प्रेक्षक आपल्या नेत्रकमलांचे [illegible] वहात आहेत असें दिसे! त्या रथात अनक सुगंधित व सुंदर पुष्पांच्या माळा, गजरे, फुलें, पुष्पगुच्छ, लाह्या, ह्यांची इतकी कांहीं वृष्टि होत होती कीं, ते रथ वरचेवर त्यांनीं भरून जात ! व ह्यामुळें ते रिकामे करावे लागत ! तीं पुष्पें महा प्रसाद समजून त्यांच्या लाभार्थ लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्या रथावर पडत! पंचवीस सव्वीस वर्षांपूर्वीं शिवचापाचा भंग करून रामास सीतारत्नाचा लाभ झाल्यानंतर राम व त्याचे बंधु आपआपल्या भार्यांसह अयोध्येंत आले, त्या वेळीं जो लोकांस आनंद झाला होता, त्यापेक्षां ह्यावेळीं लोकांस फार आनंद कां वाटला, हें येथें स्पष्ट करून सांगावयास नकोच.

रामचंद्र सभार्य व सलक्ष्मण अमुक महिन्यांत आपल्या अयोध्येस येणार, हें त्या राजधानींतिल लोकांसच केवळ माहित होतें असें नाहीं, तर त्याच्या विस्तृत राज्यांत सर्वत्र सारखें विदित होतें. कारण कीं, त्या रामचंद्रादिकांची लोकप्रियता फारच विलक्षणच होती. अयोध्यानगरीच्या बाहेरचेही हजारों लोक तेथें आले होते. चौदा वर्षांत आपल्या ह्या गुणसंपन्न भावी रामराजाची दररोज ह्मणजे कोणीं आठवण केली नसेल असें क्वचित घडलें असेल. महात्मा राजा रामचंद्र, महामान्या साध्वी सीता व महाशय बंधु लक्ष्मण ह्यांच्या अगमनानें आपल्यास अत्यानंद झाला आहे, हें त्यांस कळण्याकरितां लोकांनीं नानाप्रकार केले होते. त्या नगरींतील सर्व घरें लोकांनीं रंग देऊन सुशोभित केलीं होतीं. सर्वत्र व विशेषतः त्या मार्गांत विजयद्योतक ध्वजांची प्रजाजनांनीं फारच गर्दी करून सोडली होती. पुष्पमाला घरांच्या बाहेर व मार्गांत टांगल्या होत्या. अनेक पौरस्त्रिया हातांत आरत्या घेऊन त्यांस ओवाळण्यास तयार होत्या. रामचंद्रादिकांसही हा सर्व प्रेमप्रकार पाहून फार आनंद झाला, व तत्सूचक प्रेमाश्रु त्यांचे डोळ्यांतून टपटप पडूं लागले. असें राजाप्रजांचें, अप्रतिम व अकृत्रिम प्रेम आतां ह्या काळीं व पुढें पृथ्वीवर क्वचितच दृष्टीस पडेल ! गोडगोड व लांब लांब मानपत्रांत, खुबीदार लेखनप्रकारांत व मधुरतरभाषणांत तें ह्या युगीं आतां वास्तव्य करीत आहे. त्यांचे

खरें वसतिस्थान जें सुंदर हृदयमंदिर तेथें त्याला ठाव हळूहळू नाहींसा होत चालला आहे! असो, त्या प्रजाजनाच्या हृदयांतील प्रेम बाहेर अनेक उद्गारांनीं पडत होतें, त्यांतील कांहीं उद्गारांचें तात्पर्य सांगितल्या शिवाय माझ्यानें पुढें जाववत नाहीं "हे चंद्रवत्प्रियदर्शन, अयोध्याधीश, अहो विमलचरितराज्ञीसीताबाई, हे सुशील लक्ष्मणबंधो, आपल्या दर्शनानें आह्मांस विलक्षणच आनंद झाला आहे. आपल्या चिरविरहामुळें आह्मांस व्यवहारांतील कांहींच कामें सुचत नव्हतीं! ह्या काळांत आह्मी कोणतेंही आनंदकारक कृत्य केलें नाहीं. फारतर काय पुत्रजन्मोत्सव किंवा विवाहकार्यसुद्धां करणें कित्येकांस अप्रशस्त वाटलें! जीं केवळ केल्यावाचून गत्यंतर नव्हतें, अशींच कार्यें मोठ्या प्रयासानें तुमचें स्मरण करीत केलीं. पहा बरें, ह्या एवढ्या राजधानींत कोणीं नवीन घर बांधलें आहे? कीं कोणी नसून अलंकार केला आहे? किंवा कोणीं मोठ्या मोलाचें वस्त्र विकत घेतलें आहे? तुमच्या विरहानें आह्मीं हा सर्व काळ केवळ दुःखांत घालविला. ह्या चौदावर्षांत देशामध्यें कोणताही व्यवहार चालावा तसा चालला नाहीं. जरी आह्मी अन्नसेवन करीत होतों, उदक पीत होतों, व वस्त्रें नेसत होतों, तरी आह्मी दुर्भिक्ष्यपीडित देशांत असल्याप्रमाणें रहात होतों अहो रामचंद्र, आपण गेल्यापासून आह्मांवर असंतोषाचें साम्राज्य सुरू झालें. सीतामाई, आपण आपल्या ठिकाणीं येथें आह्मांस उदासीनता ठेवून गेलां होतां! व हेरसत्वशील लक्ष्मणा, आपण आमचा सर्व उत्सव घेऊन गेलां होतां! आह्मांस आपला चौदावर्षांतील सर्व इतिहास समजला. त्याजवरून आपली कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुंशक्ति, देवीच्या अंगीं असलेले अनेक विलक्षण गुण व लक्ष्मणाचें पर्वत तुल्य धैर्य, हीं आह्मांस पुनःसमजलीं! अशा अर्थाचे अनेक त्या समयास उद्गार व शोभणारे नवीन रचलेल्या कवितांचे चुटके त्यांच्या कर्णांवर पडत होते. ते केवळ त्यांच्याच हृदयाचें पाणी करीत होते असें नाहीं, तर त्या परकीय वानरमंडळीचीं व बिभीषणमहाराजांचींही ह्यांचे योगानें, अंतःकरणें द्रवून जात होतीं! व मनें अनेक विचारांनीं भरून जात होतीं! ह्याप्रमाणें ते रथ जणूं प्रेमसागरांतूनच चालले होते! रामचंद्रादिकांच्या मनांत लोकप्रेमाविषयीं जें कांहीं वाटत होतें, तें सर्वा-

स जरी स्पष्ट सांगतां येत नव्हतें, तरी त्यांनीं आपल्या प्रफुल्ल मुखांनीं, हस्तांनीं, व माना हालवून जितकें व्यक्त करवेल, तितकें व्यक्त केलें. अशा थाटानें रामचंद्र बरोबरीच्या मंडळींसह मुख्य व सर्वांत जुन्या राजवाड्यांत आले. तत्क्षणीं रामहृदयांतील पितृमरणदुःखाग्नि चेतला!

नंतर त्या दिवशीं घाईघाईनें पण यथासांग रामचंद्रास राज्याभिषेक झाला. सर्व नगरी उत्सवमयी दिसत होती! तेव्हां तर लोकांच्या आनंदास पारावार नाहींसा झाला. ज्याच्यावर आपलें सुखदुःख अवलंबून असावयाचें तो राजा जर आपल्या स्वतःच्या सुखाकडेही दुर्लक्ष करून केवळ प्रजांच्या हितचिंतनांत सदासर्वदा निमग्न असणारा असला, तर ती प्रजा किती आनंदी, किती उद्योगी व किती सुसाहसकर्माविषयीं प्रवृत्त होईल, ह्याचें अनुमान करणें अगदीं सोपें आहे. आणि तोच राजा जर जुलमी व प्रजांस नाडणारा असला, तर त्याचें, कोणत्या तरी प्रकारें, कधीं एकदां वाटोळें होतें आहे, ह्मणून प्रजा वाट पाहत असतात, हें तुह्मांस मी नवीन तत्व सांगतों आहें, असें नाहीं. जो कोणी आपलें बरें करील त्याच्या बऱ्याविषयीं लोक ह्मटतात, हाच सिद्धांत सर्व विश्वांत अबाधित चालावयाचा. ह्या नियमाला विकल्प किंवा अपवाद मिळणार नाहीं! असो; रामचंद्र महाराजांस, रखा प्रजाधिप होतांच प्रजाजन आनंदनिमग्न होऊन कित्येक दिवस महोत्सव करितात, ह्या सर्वकालीन सारख्या दिसणाऱ्या लोकाचाराचें येथें सविस्तर वर्णन करणें नलगेच. श्रोतेहो, आमच्या चरित्रनायिकेनें मारुतिरायाची भेट होण्यापूर्वी प्राणत्यागार्थ जो केशपाश हस्तांत धरिला होता, त्या केशपाशावर आज महान् महान् ऋषींनीं उदक अभिषिक्त करून, जणूं तिच्या सर्वांगास, राजाधिराज रामचंद्रमहाराजांला प्रजापालनीं साहाय्य करण्याविषयीं वेदमंत्रांनीं मंत्रोपदेश केला, असें ह्मटल्यास हरकत नाहीं.

राज्याभिषेक झाल्यावर रामचंद्रमहाराजांनीं सुग्रीव, मारुति, अंगद इत्यादि वानरमंडळीस, बिभीषणास व दुसऱ्या अनेक मांडलिकांस, प्रधानादि अनेक लहान मोठे अधिकाऱ्यांस, त्यांचे त्यांचे योग्यतेप्रमाणें बक्षिसें देऊन आपली कृतज्ञताबुद्धि दर्शविली. धर्मकार्यांत व अन्यत्रही

तत्संबंधानें विपुल द्रव्य खर्चिलें. नंतर यथाकाळीं समारंभार्थ आलेले लोक आपआपल्या स्थानीं निघून गेले.

ह्याप्रमाणें आमची चरित्रनायिका सीता, हिला महाराज्ञीपद प्राप्त झालें. व तिचा स्वामी जो रामचंद्र हे महाराजपदारूढ झाले. जो समारंभ चौदावर्षांपूर्वी होणार होता तो आज झाला. सर्व जगतास जनककन्येकेच्या खऱ्या गुणांचें पूर्ण स्वरूप समजावें व रामचंद्राच्या लोकोत्तर पराक्रमाचें ज्ञान व्हावें, ह्मणूनच जणूं हा चौदा वर्षं वनवासाचा प्रसंग त्यांच्यावर विधीनें आणिला! अग्नींतून तावून आल्यावर खऱ्या सुवर्णाची जशी योग्यता लोकांस समजते, त्याप्रमाणें अनेक महान् महान् संकटांत सांपडलेल्या मनुष्यानें आपलें शुद्धाचरण ठेवून त्या प्रसंगीं मानसिक धैर्य व शौर्य दाखविलें ह्मणजे त्याची खरी योग्यता लोकांस कळते. मनुष्य अनेक प्रसंगांत गुंतून गेल्यावर त्या प्रसंगास वश न होणारा फारच विरळा. व अशाच विरळ मनुष्याचें सरळ, रसाळ व पवित्र चरित्र सांगावयास आह्मांस उत्सुकता वाटते. असो; रामचंद्रमहाराजांचे हातीं राज्यसूत्रें येतांच सर्वत्र शांतता व समाधान झालें. कां होणार नाहीं? रामासारखा दयार्द्र, सत्यप्रतिज्ञ, पराक्रमी व अद्भुतकर्मकर्ता राजा असून त्याला सर्वप्रकारें प्रोत्साहन करणारी राज्ञी सीता ही सर्व विमल गुणांनीं शोभणारी, व लक्ष्मणभरतशत्रुघ्नांसारखे सद्गुणसंपन्न धाकटे बंधु साहाय्यकर्ते होते. रामचंद्रमहाराजांनीं राज्य स्वीकार करतांच जेणेंकरून आपल्या प्रजांस सुख होईल तो सतत यत्न चालविला. सत्यप्रतिज्ञ, सदय, उद्योगतत्पर व प्रजाहितैकेच्छु नरपति असला ह्मणजे त्याच्या राज्याचें स्वरूप सांगावयास नकोच. तें उत्तम असावयाचेंच. परंतु त्याविषयीं दोन शब्द बोलल्याशिवाय राहवत नाहीं. रामराज्यांत पक्षपात कोठेंही नव्हता. मग त्यावेळीं गोरा व काळा, हीं नूतन गुणविशेषणें न्यायास कोठून प्राप्त होणार? अमुक अमुक प्रजांस द्यावयाचें, असें राजवचन मिळतांच तें त्यांस मिळावयाचेंच. नुसतें वचन देऊन ठेवावयाचें, किंवा दिल्यावर वचनभंगासारखें महापाप त्यास कधींही करावें लागत नसे. कोणत्याही व्यवहाराचा सत्यवचन हा दृढ पाया होय, हें तत्त्व त्यावेळीं सर्वांस पूर्णपणें कळत होतें. ज्यावेळीं ज्याचें राज्य असतें, त्यावेळीं त्याच्या राज्यपद्धतीची खूप स्तुति ऐकण्यांत येते. प-

श्रात् तींतील दुर्गुण बाहेर पडतात. परंतु राम राजा असतां त्याचे विमल शासनपद्धतीची जी प्रशंसा होत असे, तीच आज सत्यप्रिय इतिहासकर्ते करीत आहेत। आतां कालाच्या दीर्घपगामुळें जीं कित्येक आज लोकांस सुखें हळूहळू सुलभ झालीं आहेत व ह्यांहूनही पुढें होतील, त्यांचें त्यावेळीं स्वप्नही नव्हतें हें उघड आहे. तरी प्रजांस सर्वप्रकारें सुख व्हावें हें जें विमलराज्यपद्धतीचें मूलतत्व त्याचा रामराज्यांतील सर्व अधिकाऱ्यांनीं चांगला अभ्यास केला होता. त्यावेळचे सर्व लहान मोठे अधिकारी आपआपल्या कामांत व्यग्र असून पापभीरु होते. उत्कोचग्राही किंवा प्रमत्ताधिकारी कोणी नव्हते. ह्यामुळें प्रजाजनांस फार सुख होत असे. त्यावेळीं लोकांत पापकर्मांची प्रवृत्ति फारच कमी असे. ह्याचीं कारणें स्वधर्मानिधनंश्रेयोबुद्धि, जीवनार्थकालह्रासाभाव, धनधान्यसमृद्धि, लोकसंख्यानतिक्रम, इंद्रियदमन, चैनीच्या वस्तूंची अनावश्यकता, अशासारखीं जरी अनेक असलीं तरी, अपराधकर्त्याला राजाकडून कडक शिक्षा होत असे, हेंही एक मुख्य कारण होतें. प्रजा पापकर्मनिरत नसल्यामुळें तेव्हां राज्य चालविणेंही फार सुलभ झालें होतें. आणखी त्या वेळच्या राजांच्या धनतृष्णा फार नसत. ह्मणून क्षणोक्षणीं राजांविषयीं मनांत तिरस्कार उत्पन्न करणारे असे प्रत्यक्षाप्रत्यक्ष कर फार नसत. कितीही बलसंपन्न राजा असला तरी आपल्या मांडलिकराजांशीं केलेले संधिनियम केवळ वृकाजाशिशुन्यायानें कधींही मोडीत नसे. मग रामासारख्या न्यायशील व सत्यनिष्ठ राजाविषयीं ह्यासंबंधानें आणखी काय सांगावें ? सारांश अशा केवळ जनकजननीतुल्य राजाच्या सुखच्छायेंत ते प्रजाजन अपत्यांप्रमाणें कालक्रमणा करीत होते. अहाहा! काय तो वर्णनीय काल! असा काल जेथें सदोदित वास करतो, तो भूभाग धन्य होय.

अहो, रामराजासारखे प्रजांच्या कल्याणाविषयीं तत्पर असे हजारों राजे ह्या अमच्या पुण्यभूमींत झाले असून त्यांच्या सुखाधिकारित्वाखालीं आमच्या कोट्यवधि पूर्वजांनीं आपलीं आयुष्यें, सदाचरणांत घालविलीं आहेत. त्यांस कधीं उदरचिंतनाच्या काळजींत दिवस कंठावे लागले नाहींत. तर ज्यांना पितृवत्पालन करणाऱ्या राजाच्या छायेखालीं राहण्याची आज लक्षावधि वर्षें सवई होऊन गेली आहे, असे जे आह्मी

भरतजननद्वासी लोक ह्यांच्या सुखार्थ ह्या सुज्ञ परकीय प्रभूनें किती झटलें पाहिजे बरें ? ह्या भारतप्रजांवर बलात्कार होऊं लागला किंवा पक्षपाताचा समय त्यांच्यावर येऊन ठेपला किंवा अन्नाची त्यांस विवंचना पडूं लागली, किंवा दुबळी प्रजा ह्मणून तिची पदोपदीं मानहानि होऊं लागली. अथवा धर्मसंबंधानें त्यांचीं मनें दुःखित झालीं, तर त्यांस किती वाईट वाटेल बरें ? व इतिहासोक्त पुण्यप्रतापौदार्यधैर्याद्यनेकगुणनिधान राजांचीं पुराणचरित्रें मोठ्या श्रद्धेनें व पूज्यबुद्धीनें अवलोकन करीत असतां, लोकांच्या मनांत त्या वेळची येणारी प्रजांची सुस्थिति व आज प्रत्ययास येणारी अल्पही दुःस्थिति त्यांच्या मनांत काय उत्पन्न करील, हें स्पष्ट सांगणें नकोच. मी पुनःपुनः सांगतों कीं, कित्येक यवन राजांच्या जुल्मी राज्यांत जो आह्मांवर अनेक प्रकारचा जुलूम झाला त्याशिवाय आह्मी आज लक्षावधि वर्षेंपर्यंत बहुधा राजनीतिकुशल राजांच्या राज्यांतच दिवस घालविले आहेत. ह्मणून ह्या राज्यांत जें कांहीं अह्मांस सुख होत आहे, त्यासाठीं जरी आह्मी फार फार कृतज्ञ आहोंत, तरी तें ह्मणजे आह्मांस अननुभूतपूर्व आहे, असें मात्र नाहीं. जें दुःख होत असेल किंवा होईल तें मात्र सोसण्याची आह्मांस संवय नाहीं !

ह्याप्रकारें मीं तुह्मांस श्रीमती सीतादेवीचें, तिच्या लहानपणापासून तों ती महाराज्ञीपदारूढ होईपर्यंत, चारित्र सांगितलें. तिच्या पवित्र कथारूपगंगाप्रवाहांत रामचरितवार्तारूप यमुनानदीचा ओघ मिळतांच त्यास विशेष आल्हादत्व, गांभीर्य, महत्त्व व शोभा येऊन तो प्रवाह लोकादररूप महासागरास सहस्रमुखानें मिळावा, हें साहजिकच आहे. ह्या चारित्रांतील प्रत्येक भाग विस्तारपूर्वक सांगण्यासारखा असून सर्वकालीं कल्याणकारक, सदुपदेशक व अत्यंत मनोरम असा आहे. परंतु ह्या साध्वीचें चरित्र आजच मला एथपर्यंत सांगावयाचें होतें ह्मणून संकोच करावा लागला. ह्यामुळें ह्या सुश्राव्य चारिताचा मजकडून अनेक प्रसंगीं रसभंग झाला असेल हें उघड आहे. ह्या कथारसात मी अगदीं तल्लीन झाल्यामुळें मजकडून भलताच प्रसंग कदाचित् सविस्तर सांगण्यात आला असेल. जेथें विस्तार पाहिजे, तेथें संकोच झाला असेल. कोठें विषयांतर झालें असेल, कोठें दुःशब्द पडला असेल, कोठें शब्दयोजना चुकली असेल, कोठें भलताच अलंकार पडला असेल, कोठें

श्रोत्यांचीं नेत्रें अश्रुजलानें न्हाणयाचीं राहिलीं असतील, कोठें सर्वांगावर रोमांच उभे राहिले नसतील ! असे अनेक दोष ह्या कथा सांगणाराकडून घडले असूनही आपण ही कथा अवधानपूर्वक ऐकिली, ह्याचें मुख्य कारण ह्या सीताचरित्रांत मनोवेधकता हा गुण नैसर्गिकच आहे, हें उघड आहे. प्रियश्रोतेहो, सीतारामाचें हें चरितामृत ऐकिल्यापासून काय काय इहपरत्र लाभ होतील हें सांगावयास लागलों असतां आणखी उशीर होईल ह्यामुळें, व ह्या उभयतांच्या चरित्रांपासून होणाऱ्या लाभांविषयीं ठायीं ठायीं अनेक उद्गार आले आहेतच, ह्मणून तत्संबंधानें विशेष न बोलतां इतकेंच ह्मणतों कीं, कित्येकांस जरी ह्या मनुष्यावतार देवतांच्या चरित्रांचें सर्वस्वी अनुकरण करतां यावयाचें नाहीं असें वाटेल, तरी सीतादेवीचें आपल्या प्रियभर्त्यावर असलेलें अनुपम प्रेम, तिचें त्याच्याबरोबर मोठ्या आनंदानें वनांत जाणें, तेथें रामाज्ञेबाहेर क्षणभरही न वागणें, मोठ्या समाधानानें राहणें, जें मिळेल तें संतोषानें खाणें व रामचित्तास सर्वकाळ आपलेंसें करून घेणें, ह्यांतील कोणती गोष्ट आज आमच्या स्त्रियांस करतां येणार नाहीं बरें ? त्याप्रमाणेंच लंकेंत गेल्यावर स्वापराधामुळें अत्यंत भयभीत असतांही ती साध्वी, दशाननाच्या मधुर भाषणास किंवा अपार वैभवास क्षणभर तरी भुलून रामचरण विसरली काय ? नाहीं, नाहीं. मग अशा सारख्या प्रसंगीं तिच्या ह्या विमलाचरणाचें स्त्रीसमाजानें अनुकरण करण्यास कोणती असंभवनीयता पुढें येते बरें ? पातिव्रत्यासारखे कडकडीत धर्म अंगीं असल्यावर स्त्रियांवर अग्निप्रवेशासारखे कितीही भयंकर प्रसंग गुदरले, तरी त्यांतून हरएक युक्तीनें किंवा सहज लीलेनें परमेश्वर पार पाडतो, अशीं हजारों उदाहरणें पदोपदीं आपल्या दृष्टीस पडत आहेत. नंतर सीतेला राज्ञीपद मिळाल्यावरही गर्वादि दुष्टचांडाळांनीं त्या साध्वीला स्पर्श केला नाहीं. तसाच आमच्या भाग्यवती स्त्रियांनाही ह्यांचा विटाळ न व्हावा, ह्मणून त्यांनीं सदोदित जपलें पाहिजे. कोणत्याही अवस्थेंत स्त्रिया असोत, त्यांनीं सीतेच्या आचरणाचें स्मरण करून वर्त्तावें असें तें निष्कलंक व पवित्र आहे. आपल्या कुटुंबीय मनुष्यांशीं किंवा परकीय मनुष्यांबरोबर ती कशी वागत होती हें जरी पूर्वोक्त चारित्रांत सविस्तर कथन केलेलें नाहीं. तरी जें कांहीं आहे,

तें थोडें आहे असें नाहीं. तिचें जनकजननींशीं स्तुत्य वर्त्तन, सखीज-नांबरोबर अकृत्रिम प्रीति, गुरुजनांशीं पूज्य व विनम्र भाव, सेवकांशीं ममतेची वागणूक व सर्व प्रजाजनांचे ठिकाणीं वात्सल्यबुद्धि, ह्यांतील तिचा प्रत्येक गुण आर्यस्त्रीनें पुत्रवत् आपलासा करून घेतला पाहिजे.त-रच,स्त्रियांनो, ह्या संसारांत तुह्मांस अपारसुख वाटून मरणोत्तर उत्तम गति मिळेल. संसारांत तुह्मीं आहां ह्मणून शोभा आहे. तुह्मीं घरांतील संपत्ति आहां. कितिही पति दारिद्री असला आणि तुह्मी जर सुप्रसन्न आहां, तर त्या घरांत काय कमी आहे बरें? आणि घरांत लक्ष्मी राबत असूनही घरची स्त्री जर मूर्तिमती अवदसा आहे, तर तेथें दारिद्य यावयास आणखी काय पाहिजे? माझ्या प्रिय भगिनींनो, ह्या सीताचरितांचें तुह्मी दररोज स्मरण करीत जा. ह्मणजे त्या साध्वीच्या पुण्यप्रसादानेंच तुम्हामध्यें व तुमच्या संततीमध्यें सद्गुण वास करूं लागतील व ते इहप-रत्र तुह्मांस अक्षय्य सुखाच्या अधिकारिणी करतील.

श्रोतेहो,हे एका,नऊ वाजले!तेव्हां आतां उशिराची पराकाष्ठा झा-ली! ह्मणून रामचरितापासून आपण काय काय घ्यावें हें सूत्ररू-पानेंही सांगतां येत नाहीं. रामचरित काय किंवा सीतावृत्तान्त काय, हीं सागरासारखीं असून कागदावर चित्र लिहितेवेळीं खरे समुद्र ज्याप्रमाणें दाखविले जातात, त्याप्रमाणें त्यांचीं चारित्रें मीं आपणांस दाखविलीं, हें पुनःपुनः सांगतों. आज राम हें पवित्र नांव उच्चारतांच जे आपल्या मनांत अनेक सद्भाव उत्पन्न होतात, ह्याचें कारण त्यांचे अंगीं असणारे अनेक अनुकरणीय गुण होत. रामचंद्राचेठायीं सत्यपरायणता व पितृमातृभक्ति किती होती बरें? तदर्थ त्यानें वनवास पतकरून कंद-फळें खल्लीं व राज्यवैभव तृणवत् मानिलें. असे सुखपरित्याग करून कोणत्याही सद्गुणार्थ आपलें जीवितही खर्चे करणारे पुरुष आतां आ-मच्या देशांत कधीं पाहण्यांत येतील बरें? केवळ स्वसुखाविषयीं रात्रंदिवस मरणाऱ्या ह्या कोडोगणती मनुष्यवसतींत असा पुरुष आतां क्वचितच निपजावयाचा. एखादा होतोसा वाटला तर त्याच्या पुढें लाभाचें ताट वाढून आलें पुरे कीं,त्याच्या तोंडास पाणी सुटून त्याला तो वश झालाच! अमुक एक गुणाचा अमुक एक मनुष्य बाणा बाळगतो असें झाल्यावर त्याचें खरें परीक्षण होण्याचे त्याच्यावर अनेक प्रसंग येतात,

परंतु त्यांतून निभावणारे असे थोडच. अणीबाणीच्या प्रसंगींही जे आपलें वर्त्तन सज्जन लोकांच्या मनास दुःखविणारें असें ठेवितात, त्या महामान्य ह्मणविणाऱ्या पुरुषांत व काकपक्ष्यांत भेद तो कोणता? 'देह जावो अथवा राहो,' अशी प्रतिज्ञा करून जे कोणी पुरुष आरंभिलेल्या सदुद्योगांत सतत मन लावितात, तेच पुरुष वंदनीय व अनुकारणीय होत. अशांचीच खरी कीर्ति होऊन ते जगांतील इतिहासांत अमर होऊन राहतात! अशा कीर्तिमान् पुरुषांच्या जन्मानें जगांत अनेक लाभ होतात. असेच पुरुष जगांतील लोकांचे कंठमणि होतात. अशांच्याच योगानें जन्मभूमीचें ऋण फिटतें. हेच लोक सद्धर्माची उन्नति करतात. व लोकांस खरें कर्त्तव्य काय हें आपल्या सदाचरणानें सांगतात!

निःसीम अधिकार, अकुंठित ऐश्वर्य किंवा अप्रतिहत बल इत्यादिकांच्या योगानें प्रमत्त होऊन जगांत अनन्वित कर्मे करून लोकांस पीडा देणारे ह्यांच्या किंवा दुसऱ्या हजारों पापिजनांच्या पारिपत्यार्थ, किंवा सद्धर्मोत्तेजनासाठीं, अथवा हें सर्व अफाट विश्व नियमबद्ध चालावें ह्मणून, आश्चर्यचकित करणाऱ्या ह्या सृष्टीच्या कर्त्यास कधीं सृष्टिरूप बनावें लागतें, किंवा हवें तें रूप घ्यावयाला भाग पडतें, हें जरी खरें आहे, तरी तो सृष्टिनियामक मनुष्यावतार घेऊन जे जगांत कधीं कधीं आह्मास अनेक चमत्कार दाखवितो, ह्याची जीं अनेक कारणें आहेत, त्यांतील हेंही एक अगलें पाहिजे कीं, मनुष्यप्राण्यानें परमेश्वराची सदा भीति बाळगून जगांत सद्धर्मानें वागून कालक्रमणा करावी—हा जो परमेश्वराचा मुख्य हेतु, तो सृष्टींतील अनेक बाह्योपाधींनीं मूढ झालेला मनुष्य अगदीं विसरून जातो, त्याला स्मृतिवर आणावा. अर्थात् अशा मनुष्यदेहधारी परमात्म्याच्या अनुकरणीय तेवढ्याच कृत्यांचें मनुष्यानें अनुसरण करून बाकी सर्व त्याच्या हजारों विस्मयाभिभूत करणाऱ्या कृतींचें महत्त्व कृतज्ञताबुद्धीनें सतत गात राहणें, हाच मनुष्यजन्माचा खरा हेतु होय. त्या बुद्धिदात्यानें मनुष्यप्राण्यास दिलेल्या अप्रतिम ज्ञानाच्या बलानेंच जो कोणी कृतघ्न मूढमनस्क होत्साता त्यास विसरेल किंवा आपल्याच मतें अकुतःपराभव होऊन जगांत नास्तिकमत पसरील, तो दूध पाजणाऱ्यासच दंश करणारा पुष्ट कृष्णसर्प होय! कित्येक मतवादी परमेश्वर मनुष्यरूप कधीं घेत नाहीं वगैरे प्रतिपादन करतात,

परंतु तो असें कां करणार नाहीं ? ह्याचा निकाल त्यांनीं आपल्या मनाशीं कधीं करून घेतला आहे काय?मनुष्यानें नीतिधर्मानें वागावें, अशी भगवंताची इच्छा आहे व ती सर्वांस मान्यही आहे. तर ती मनुष्याकडून पूर्ण होण्यास त्यानें मनुष्यरूप घेऊन जर आह्मांस अशा रीतीनें सन्मार्ग दाखविला,तर ह्यांत ईश्वराच्या कोणत्या अलौकिक गुणास हीनत्व येतें ? एकादा सदिच्छ गुरु किंवा पिता शिष्यवर्गाच्या किंवा मुलाच्या, कल्याणार्थ जर त्याच्याबरोबर पाठ घोकूं लागला, किंवा खेळावयास लागला,तर त्या गुरूनें किंवा पित्यानें कांहीं कालपर्यंत शिष्यवर्गाबरोबर कींवा मुलाबरोबर पतकरलेलें शिष्यत्व किंवा बालत्व त्यांस नीचत्व आणील किंवा त्यांचें गुरुत्व अधिक गुरुत्वाप्रत पोंचवील? असो;नर करणी करील, तर नारायण होईल, अशी मानवदेहधाऱ्यांची योग्यता आहे. तेव्हां ते आपल्या शुद्ध आचरणानें सीतारामांच्याही योग्यतेस पोंचतील,ह्यांत संशय नाहीं. मनुष्यानें आपली योग्यता ह्यांच्याहून कमी मानली तरी त्यांच्या आचरणाचें आह्मांस पुष्कळ अंशीं अनुसरण करतां येणार आहे.

देशातील राजे काय किंवा दुसरे लोक काय जे आपलें जन्म किमर्थ आहे, आपणांस जगांत काय केलें पाहिजे, कशामुळें आपलें आयुष्य फुकट जात आहे,सतत उद्योगानें व अत्यंत धर्मश्रद्धेनें काय काय चमत्कार झाले आहेत, सदाचरण शब्द उच्चारतांच मन कसें प्रफुल्ल होतें, सद्गुणांसाठीं जिवत्याग करणारांच्या कीर्तीनें चंद्रसूर्यांसही कसें लोपविलें आहे, इत्यादि गोष्टींचा वारंवार विचार करून, शेवटीं सन्मार्गाचें अवलंबन करून त्यांतच देहविसर्जन करतात,तेच खरे पुरुष होत. व जे म्हणून आजपर्यंत सत्पुरुष झाले, ते अशा अनुकरणीय गुणांनींच अलंकृत होऊन गेले. तेव्हां, लोक हो, ह्या सीताचारितांत आलेल्या अनेक सद्व्यक्ति ज्या मार्गानें गेल्या त्या मार्गानें तुह्मी जा. ह्मणजे तुह्मांस इहपर सुखप्राप्ति होईल."

ह्याप्रमाणें त्या यतिवर्यानें ही मनोरम कथा सांगितली.ही पूर्ण होऊन ते चतुर्थाश्रमवासी " नारायण ,नारायण," हा भगवन्नामोच्चार सतत करीत राहिले तरी ही कथा चाललीच आहे, असें त्या श्रोत्यांस कांहीं वेळ वाटलेंच होतें ! ह्या त्यांच्या एका चित्तवृत्तीवरून, ही कथा त्यांस किती आवडली हें स्पष्टच होतें. नंतर श्रोत्यांनीं त्या यतिश्रेष्ठा-

ची यथासांग पूजा करून अनेक प्रकारें स्तुति केली, आणि त्यांचे चरणीं मोठ्या भक्तीनें व संमानपुरःसर मस्तकें घांसून पुनरपि अशी कृपा करण्याविषयीं विज्ञाप्ति केली. नंतर देवदर्शन घेऊन रात्र झाली असतांही रस्त्यांतून त्या महाशयाचे गुणानुवाद गात गात आपापल्या घरीं सावकाश गमन केलें.

समाप्त.

# शुद्धिपत्र.

पृष्ठ २१ पंक्ति २७ मध्यें व पुढें कित्येक स्थळीं जनकराजाच्या मुख्य प्रधानाचें नांव सुदमन पडलें आहे, तें सुदामन् असें वाचावें.

पृष्ठ ६५ पंक्ति १७–१८ मध्यें, लक्षावधि रुपये खर्च, असें आहे तेथें, बहुत द्रव्याचा खर्च, असें वाचावें.

कैकेयी ही दशरथराजाची कोठें कनिष्ठ व कोठें मध्यम स्त्री आहे असें पडल्यामुळें, ती कोठें रामाची कनिष्ठ माता, कोठें मध्यम माता असें व कोठें सीतेची धाकटी व कोठें मधली सासू असें लिहिलें गेलें आहे, तरी ती दशरथाची कनिष्ठ स्त्री, रामाची कनिष्ठ माता व सीतेची धाकटी सासू आहे, असें सर्वत्र समजावें.